॥ श्रीलक्ष्मी पल्लिनाथ प्रस

भा. इ. सं. मं. पुरस्कृत ग्रंथमाला क्रमांक ४०

कऱ्हाडे ब्राह्मणांच्या इतिहासाचीं साधनें
व
गुण्ये(णे) घराण्याचा इतिहास

प्रथम व द्वितीय खंड

विठ्ठल त्र्यंबक गुणे

प्रकाशक—
रावसाहेब डॉ. त्र्यंबकराव रघुनाथ गुणे,
एल्.एम्. ॲन्ड एस्.
रिटायर्ड हेल्थ ऑफिसर,
गुण्यांचा बंगला, स्टेशन रोड, पंढरपूर

मुद्रक—
सदाशिव रामचंद्र सरदेसाई
बी. ए., एल्एल्. बी.,
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत'
छापखाना, ४१ बुधवार, पुणें २

॥ श्री ॥

अर्पणपत्रिका

श्रीक्षेत्र पंढरपूरचे नामांकित सेवानिवृत्त मुख्य आरोग्याधिकारी (First Class Health Officer) व सोलापूर जिल्ह्यांतील ख्यातनाम डॉक्टर; माझे वडील तीर्थरूप

डॉ. त्र्यंबकराव रघुनाथ गुणे

व

माझी मातोश्री

कै. सौ. सावित्रीबाई गुणे

या उभयतांस;

आणि गुण्ये घराण्यांतील भूतपूर्व व विद्यमान

कर्तबगार मंडळींस;

हा गुण्ये(णे) घराण्याचा इतिहास (खंड १ व २)

सप्रेम व सविनय अर्पण करीत आहें.

विठ्ठल त्र्यंबक गुणे.



ती. डॉ. त्र्यंबक रघुनाथ गुणे



ती. सौ. सावित्रीबाई गुणे

पुरस्कार

प्रस्तुत गुण्ये घराण्याचा इतिहास भा. इ. सं. मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथ-मालेंत समाविष्ट करण्यास मंडळास आनंद होत आहे. यापूर्वी वाठारकर, निंबाळकर, पानसे व आठल्ये या घराण्यांचे इतिहास मंडळानें पुरस्कृत केलेच आहेत. असे वेगवेगळ्या वर्णांतील जुन्या घराण्यांचे इतिहास तयार झाल्यावर राष्ट्राच्या एकंदर संस्कृतीवर वेगळाच प्रकाश पडेल. सुमारें वीस चित्पावन घराण्यांचे कुलवृत्तांत तयार झाले आहेत. देशस्थ ऋग्वेदी व शुक्लयजुर्वेदी यांचे बहुधा दोन व कऱ्हाड्यांचे हा धरून तीन कुलेतिहास आढळतात. मराठ्यांत आंग्रे, वाठारकर व आणखी एकदोन सोडल्यास वर्णसंख्येच्या मानानें घराण्यांचे फार कमी इतिहास आहेत ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. मराठे संस्थानिकांचीं घराणीं आपण सोडून देऊं. त्यांचे इतिहास त्या त्या सरकारच्या खर्चानें विस्तृत तयार होतात व कांहीं झालेहि आहेत. पण इतर जाधव, कदम, थोरात, सांवत, दाभाडे, चव्हाण, शिर्के, घोरपडे इत्यादि अनेक इतिहास-प्रसिद्ध मराठे घराण्यांचा आज पत्ता नाहीं. मग महार, मांग, न्हावी, गोसावी, मारवाडी यांसारख्या जातींतील घराण्यांची आठवणहि होणें कठीण. घराण्यांचे इतिहास बहुधा त्या त्या घराण्यांतील सुबुद्ध व समाजसेवानिरत व्यक्ति करीत असतात. तेव्हां वरील घराण्यांतील मंडळींनींच चंग बांधून साधनें जुळविलीं पाहिजेत व आपआपले इतिहास आज कसे का होईनात पण प्रसिद्ध करावेत. असो.

गुण्ये घराण्याच्या इतिहासाचे लेखक व संपादक माझे तरुण मित्र श्री. विठ्ठलराव गुण्ये यांनीं लहान वयांतच इतिहासाच्या साधन-चिकित्सात्मक अभ्यासास सुरवात केली ही मोठी स्तुत्य गोष्ट आहे. सेवानिवृत्त झाल्यानंतर मग कांहींतरी करावयाचें म्हणून इतिहासाकडे वळणारे पुष्कळ दिसतील; पण कॉलेजांत शिकत असतांनाच असा व्यासंग आपखुषीनें पदरमोड करून लावून घेणारे गुण्यांसारखे तरुण किती सांपडतील ? कॉलेजचाच अभ्यास बहुतेकांना डोईजड वाटतो व रसिक मन चवचाल करमणुकींकडे ओढ घेत असतें.

वडिलांचे पैसे मागतील तेव्हां तयारच असतात. तेव्हां भारदस्त विद्याविषयाकडे प्रवृत्ति न होणें क्रमप्राप्तच. श्री. गुण्यांनीं स्वतःच्या घरचा व इतर गुण्येमंडळींचा पैसा उभा करून प्रस्तुत कुलवृत्तांत प्रसिद्ध केला ही त्यांची पूर्वायुष्यांतील पहिली मोठी कर्तबगारीच म्हणतां येईल. इतस्ततः विखुरलेली माहिती गोळा करून तिचें नीट संकलन करण्याला कोण यातायात पडते व सत्य इतिहास पुढें ठेवण्यास बुद्धीची केवढी सूक्ष्मता लागते, हें प्रा. पोतदार यांनीं प्रस्तावनेंत स्पष्ट केलेंच आहे. प्रस्तुत इतिहासाच्या साधनविभागांत चांफेट-दप्तर, मठ-दप्तर, आश्वी-दप्तर, वैद्य-दप्तर, भा. इ. सं. मंडळ-दप्तर, डेक्कन कॉलेज-दप्तर इत्यादि अनेक दप्तरांतील कागद नवीनच पुढें आणलेले दिसतील. मावळंकर, सरदेसाई किंवा आठल्ये या घराण्यांच्या कागदपत्रांइतकें यांतील पत्रांना महत्त्व नसलें तरी तीं ऐतिहासिक साधनें आहेत हें विसरतां कामा नये. तेल्यातांबोळ्यांच्या हिशेबाइतकी पूर्वी अशा साधनांना किंमत होती पण ती आतां फारच वाढली आहे. संशोधनदृष्टीचा पल्ला दूरदूर जातो आहे. राष्ट्रीय व सामाजिक इतिहासाला टाकाऊ असें कांहीं नसतें, ही जाणीव आतां आमच्या विद्वानांना झाली आहे. तेव्हां जुन्या काळचें जें पुढें येईल तें पाहिजेच आहे. गुण्ये घराण्यांत बऱ्याच ऐतिहासिक व्यक्ति होऊन गेल्या आहेत हें ८ व्या प्रकरणावरून सहज ध्यानांत येईल. ‘ कुलदेवता, कुलधर्म व कुलाचार ’ हें सबंध प्रकरण श्री. ना. गो. चापेकर यांच्यासारख्या समाजशास्त्रज्ञांना अत्यंत महत्त्वाचें वाटेल यांत शंका नाहीं. आपण आज कुलाचार पाळले नाहींत तरी त्यांतील अर्थ लक्षांत घेऊन त्यांकडे परंपरारक्षक म्हणून पाहिल्यास आपल्यांत पोक्तपणा खास येईल. केवढी परंपरा घेऊन आपण आलों आहों, ती एकदम झटकून झाडून टाकणें काय फायद्याचें, यासारखे विचार मनांत येतील. श्री. य. ल. गुण्ये, ग्वाल्हेर दरबार वकील, पुणें, यांनीं आपल्या संग्रहांतील कुलधर्म–कुलाचाराची जी सविस्तर यादी प्रसिद्ध करण्यास दिली ती फार उपयुक्त आहे. यांतील श्रावण शु॥ ७ (शीतलासप्तमी)चा ‘ कोकोबा ’ हा जलस्थानाहून आणतात व पोंचवितात यांत कांहीं वेगळा इतिहास आहे खास. असो.

तेव्हां आपल्या घरण्याचा ससाधन, सुसूत्र व सत्य इतिहास प्रसिद्ध करण्यांत कांहीं कमीपणा वांटण्याचें कारण नाहीं. यांत संकुचित मनोवृत्ति दिसत नसून

उलट ती व्यापक झालेलीच आढळेल. प्रत्येकानें आपली शिदोरी तयार केल्यावर एकत्र गोपाळकाला करतां येतो. आणखी अनेक घराण्यांचे इतिहास जे उकडहंडी लावून ठेवलेले आहेत ते हंडी फोडून लवकर बाहेर केव्हां पडतात याची वाट पाहून आहों. आपण आपल्या सरपोतदार घराण्याचा इतिहास लिहूं घातला आहे, असें प्रा. पोतदार सांगतात. मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. तो इतिहास झालाच तर फार नमुनेदार होईल यांत शंकाच नाहीं. प्रस्तुत पुस्तकांतली त्यांची प्रस्तावना अशा इतिहासाभ्यासाच्या मार्गांतील एक विद्युद्-दीपिका (टॉर्च) म्हणतां येईल.

शेवटीं, श्री. विठ्ठलराव गुण्ये यांनीं आपल्या कुलाचें ऋण फेडून इतिहास-वाङ्मयांत एक चांगली भर घातल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करतों व या पुरस्कार-प्रवचनाची समाप्ति करतों.

वैशाख शु॥ १०,
शके १८६६.

चिंतामण गणेश कर्वे
चिटणीस,
भा. इ. सं. मंडळ.

प्रस्तावना

१. सांप्रत ' घराण्यांचे इतिहास ' ही इतिहास-शाखा बरीच पुष्ट होत चालली आहे. आज पन्नास-पाऊणशें वर्षे इतिहाससाधनसंशोधनाचा जो प्रचंड उद्योग महाराष्ट्रांत मोठ्या आस्थेनें आणि जोमानें प्रतिदिनीं वर्धमान गतीनें चालला आहे त्याचें एक अभिनंदनीय प्रत्यंतर या दिशेनें आपणांस मिळत आहे, ही समाधानाची गोष्ट होय.

२. संस्थानिकांत प्रतिनिधि घराणें, मुधोळकर घोरपडे, कुलाबकर आंग्रे, जमीनदार मंडळींत सरदेसाई, आठल्ये, बर्वे, आपटे, भावे, गोळे, रास्ते, पानसे इत्यादि दहापंधरा आणि इतरहि कांहीं मिळून पंचवीस-तीस घराण्यांचे बरेच सप्रमाण इतिहास लिहून प्रसिद्ध झाले आहेत; आणि आणखी कित्येकांची तयारी व जुळवाजुळव चालू आहे. तथापि अद्यापि कोठें आरंभच झाला आहे म्हटलें तरी चालेल. महाराष्ट्रांत विद्वान्, शूर आणि कर्तबगार घराणीं शेंकड्यांनीं मोजतां येतील इतकीं आहेत, आणि त्या सर्वांचे सविस्तर आणि सप्रमाण इतिहास लिहून झालेच पाहिजेत. प्रस्तुतच्या **'गुण्ये घराण्याचा इतिहास'** या ग्रंथाचे योगें या नवीन आणि स्पृहणीय प्रथेंत चांगली आणि महत्त्वाची भरच पडत आहे, आणि या सुयशाबद्दल प्रस्तुत ग्रंथाचे **तरुण संपादक चि. विठ्ठल त्र्यंबक गुण्ये,** बी.ए., हे केवळ समस्त गुण्ये मंडळीच्याच नव्हे तर सर्व इतिहासप्रेमी जनांच्या हार्दिक धन्यवादास निश्चयानें पात्र झाले आहेत. वयाच्या तेविसाव्या वर्षांच्या आंत त्यांनीं पितरांची केलेली ही पूजा अत्यंत गौरवास्पदच गणली पाहिजे.

३. घराण्याचा इतिहास म्हटला म्हणजे त्या कामीं कोणातरी त्याच घराण्यांतील उत्साही व्यक्तीनें पुढाकार घेऊन तें कार्य तडीला न्यावें हें केव्हांहि त्या व्यक्तीस भूषणावह होय. तथापि इतिहासलेखनाचें कार्य खरेंखुरें यशस्वी होण्यास संपादक होणाऱ्या व्यक्तीला कांहीं विशेष प्रकारची पात्रता अंगीं आणावी लागते. केवळ उत्साह, अभिमान किंवा स्वास्थ्य यांनीं काम भागत नाहीं. विशेषतः जुने लेख शोधणें, बिनचूक वाचणें, कालनिर्णय करणें, वंशावळी जुळविणें इत्यादि संशोधकीय आणि किचकट कामें या प्रकरणीं उरकावीं लागतात,

आणि हीं कामें पूर्वाभ्यासाशिवाय यथायोग्य तडीस नेणें दुर्घट असतें. जुने लेख आमच्या इकडे प्रायः मोडी लिपींत असतात. जों जों लेख जुना तों तों सांप्रतच्या मोडी लिपीच्या वळणाहून त्या जुन्या मोडीचें वळण पुष्कळ निराळें. **लिपीची अडचण ही पहिली;** आणि **दुसरी अडचण भाषेची.** कारण जुन्या लेखांतून शेंकडों फारशी आणि अरबी शब्द आलेले असतात. यद्यपि कै. प्रो. माधवराव पटवर्धन यांच्या 'फार्शी—मराठी कोशा'सारख्या ग्रंथानें ही अडचण पुष्कळशी कमी होत असली तरी अनभ्यस्त माणसाची या प्रकरणीं त्रेधातिरपीट उडाल्याशिवाय राहणें कठीण !

४. **तिसरी अडचण** तर वरच्यापेक्षांहि अवघडशी आहे आणि ती म्हटली म्हणजे जुन्या लेखांचे काळ निश्चित करण्याची. आधीं तर पुष्कळ वेळां जुन्या पत्रांतून पत्रलेखनाचा शक किंवा सन दिलेलाच नसतो आणि खाजगी पत्रांतून तर तशी पद्धतच विशेष रूढ असलेली आढळते. नुसती तारीख किंवा मिति आणि बहुतकरून महिन्यांचें नांव इतकेंच फार करून असतें. वार जोडीला दिला असला तर असतो नाहींतर तोहि नाहीं. काय करावें या स्थितींत माणसानें ? कसा काळ ठरवावा अशा पत्रांचा ? पैवस्ती म्हणजे पत्र पावल्याची नोंद जेव्हां घातलेली आढळते तेव्हां तेथेंहि तसलाच तोटकेपणा आढळतो. पूर्वीं घरचीं दफ्तरें लावतांना सनवार व महिनेवार पत्रें किंवा कागद लावून त्या त्या सनाची व महिन्याची एक निराळी चिठी किंवा कडी करून तींत तीं तीं पत्रें तशीं बयाजवार बांधून ठेवीत. पण आम्हांला आज हीं पत्रें शोधून काढावीं लागतांत तीं सर्व बहुशः गळाठ्यांतून; तेव्हां तबलखी किंवा मुखवस्त्रें म्हणजे वर म्हटलेल्या शकसनादिकांच्या चिठ्या किंवा कागदी कड्या आतां थोड्याच जागच्या जागीं असलेल्या आणि त्यांत तीं तीं पत्रें व्यवस्थित ठेवलेलीं अशा आढळतात ? आतां सारा अस्ताव्यस्त पडलेला गळाठा चाळावा लागतो आणि त्यांतून उपयोगी वाटणारे कागदपत्र निवडून घ्यावे लागतात.

५. पण एवढ्यानें काय झालें आहे ? मजकुराकडे यावें तों तीर्थरूप भगवंतराव दादाचे० अपत्यें गंगाधर गोविंद असा किंवा रा. वि. राजमान्य रा. गोपाळराव नारायण० यांस नारो भगवंत याचा इ. अशीं मोघम नांवें यावयाचीं ? जेव्हां अनेक पत्रें चाळावीं, सगळे मागचेपुढचे संदर्भ जोडावे, पडताळे पहावे तेव्हां

कोठें या अंधारांतून थोडाथोडा प्रकाश पडूं लागतो! पण कालनिर्णयांत शिवाय अडचण पडते ती म्हटली म्हणजे त्या वेळीं वापरांत आणि वहिवाटींत असलेल्या मुसुलमानी सनांची आणि महिन्यांची. ते ‘ जिल्हेज ’ आणि ‘ जिलकाद ’ आणि ते ‘ इसने ’ नि ‘ ईहिदे ’ ‘ मया ’ आणि ‘ मयातैन ’ आणि तो ‘ अल्लफ ’! बिनचूक जंत्र्या जर नसत्या तर हात जोडून स्वस्थच बसणें भाग पडतें! नाहींतर हें एवढें गणित पदोपदीं आणि ज्याचें त्यानें कोठून आणि कसें केलें असतें? आणि हरघडीं गणक ज्योतिषी कोठला आणावयाचा? पण कै. बाळाजी प्रभाकर मोडक किंवा कै. गणेश सखाराम खरे या थोर पुरुषांनीं अत्यंत परिश्रम करून शें-दोनशें वर्षांचीं गणितें करून या कामीं उपयोगीं पडणाऱ्या माहितीचीं सुलभ कोष्टकें करून जंत्र्याच प्रसिद्ध केल्या आहेत हे त्यांचे केवढे उपकार झाले आहेत? मोडक यांच्यापेक्षां खरे यांची सूक्ष्मता अधिक आहे आणि त्याहिपलीकडे जाऊन स्वि. वा. दि. ब. स्वामीकन्नू पिल्ले यांनीं इंग्रजीत जो ‘ एफिमेरीज ’ म्हणून शकमितिकोश प्रसिद्ध केला आहे तो सात प्रचंड भागांत मद्रास सरकारनें छापून काढल्यानें आतां हें कालनिर्णयाचें काम अगदीं सुलभ झालें आहे. मोडक, खरे, पिल्ले यांच्या वरील जंत्र्यांच्या पूर्वीं दुसऱ्या छापील किंवा हस्तलिखित जंत्र्या होत्या पण त्या फार स्थूल आणि आतांच्या सूक्ष्मतेच्या दृष्टीनें प्रायः निरुपयोगी म्हटल्या तरी चालेल. केरूनाना किंवा शंकर बाळकृष्ण दीक्षित यांच्यासारख्यांनीं सुलभ कोष्टकें तयार केलीं होतीं आणि सिवेलदीक्षित आणि पिल्ले, केतकर प्रभृतींचे दुसरे ग्रंथ या कामीं साहाय्यभूत होण्यासारखे असले तरी बरीच कोष्टकें काढून लावून उलटपालट आंकडेमोड केल्याशिवाय कांहीं उत्तर त्यांतून निघत नाहीं. गणिती मंडळींनींच तें करावें. साध्यासुध्यांचीं तेथें कांहींच डाळ शिजावयाची नाहीं. अलिकडील काळांत पुण्यांत आमचे परममित्र इतिहासपंडित दत्तोपंत आपटे हे स्वतः कल्पक गणिती व थोर ज्योतिर्विद असून घराण्यांच्या इतिहासाचे कामीं त्यांनीं विशेष आस्थेनें लक्ष पुरविलें असल्यानें आणि अभ्यासू मंडळीस लागेल ती मदत वाटेल तेव्हां तत्परतेनें ते करीत असल्यामुळें सर्वांस एक मोठा आधार होता. दुर्दैवानें दत्तोपंत थोड्याच महिन्यांपूर्वीं वारले आणि आतां नवीन होतकरू अभ्यासी मंडळी खरोखरीच पोरकी झाली आहेत! असो. कालनिर्ण-

याच्या अडचणी, भानगडी आणि कटकटी काय असतात त्या प्रत्यक्ष अनुभव घ्यावा तेव्हांच खऱ्याखुऱ्या कळतील।। इतकेंच सांगून ठेवतों कीं, हें काम जितकें डोक्याचें तितकेंच धोक्याचेंहि आहे।। या कामांत मोठेमोठे म्हणविणारे गोते खातात आणि हास्यास्पद चुका करतात। तेव्हां कोणी छापलें आहे एवढ्यावरच विसंबून भागत नाहीं. छापलेलें आणि पूर्वी अभ्यासलेलेंहि पुनः पुनः तपासून शुद्ध करून घ्यावें लागतें। काम नीट करावयाचें तर सोपें नाहीं, कष्टाचें आहे। याच ग्रंथांतील एक लहानसें उदाहरण देतों म्हणजे थोडा उलगडा होईल.

६. गु. घ. इ. प्रथमखंड ले. ९ हा ‘शाहू रोजनिशी’ (वाड) या वाडकृत छापील ग्रंथांतील उतारा आहे. पण या उताऱ्यावर संपादक गुण्ये यांनीं साल घातलें नाहीं. आतां शाहू रोजनिशींत वाडांनीं या लेखाचें मूळ अस्सल शाहू रोजनिशींतील साल ‘इहिदे खमसैन मया व अलफ’ देऊन तारीख ‘रमजान १’ हीहि दिली आहे. यावरून इंग्रजी सन १७५०-५१ असा येतो तोहि नोंदला आहे. परंतु संपादकांना ले. ९ वर तीच तारीख द्यावी किंवा नाहीं अशी कांहीं तरी शंका येऊन म्हणा किंवा अन्य कांहीं समजुतीमुळें म्हणा त्यांनीं ले. ९ वर तारीख व सालच घातलें नाहीं. ह्याच ले. ९ मध्यें “श्रावण शु. ५ सौम्यवार” या दिवशीं धोंडो बल्लाळ यांस “वेतनांत मुकासे दिले” अशी माहिती शाहू रोजनिशींत आलेली उतरून घेतली आहे. “श्रावण शु. ५ सौम्यवार”ची ही नोंद शाहू रोजनिशींतून दाखल करतांना वाडांनीं ती “इहिदे खमसैन मया व अलफ, रमजान १” या तारखेच्या नोंदींच्या पोटांतच दिलेली असल्यानें उघड आहे कीं, धोंडो बल्लाळ बाबतची सदर श्रावणची नोंद ही व “रमजान”ची नोंद ही एकाच व त्याच दिवसाची, सालाची व महिन्याची असली पाहिजे. आणि त्याप्रमाणें दाखवितांहि येते.

७. मोडकजंत्रीवरून इहिदे खमसैन मया व अलफ या सालची रमजान १ म्हणजे मराठी गणनेप्रमाणें शा. शक १६७२, प्रमोद संवत्सर, श्रावण शु. २ मंगळवार हा दिवस येतो. याची इंग्रजी तारीख २४ जुलै इ. स. १७५० येते. आतां शाहू रोजनिशींत तर या रमजान १ इ. ख. म. अलफच्या खालील तपशीलांत धोंडो बलाळ (गुण्ये) यांस मुकासा दिल्याचा दिवस श्रावण शु. ५

सौम्यवार असा दिला आहे. सौम्यवार म्हणजे बुधवार होय. आपल्याला निश्चय करावयाचा तो हा कीं, " श्रावण शु. ५ सौम्यवार " ही नोंद कोणत्या सालची आणि ती रमजान १ इहिदे खमसैनला जुळते काय–असे दोन प्रश्न आहेत. श्रावण शु. ५ सौम्यवार हा वरील शके १६७२ चा धरून मोडक जंत्री पाहिली तर त्याप्रमाणें श्रा. शु. ५ ला सौम्यवार त्या सालीं येत नाहीं. तो सौम्यवार अथवा बुधवार श्रावण शु. ५ ला न येतां ३ ला येतो. पण या श्रावण शु. ३ ला रमजानची तारीख १ न निघतां २ निघते, असा घोटाळा होतो. जेथें वार व तिथि दिलेली असते ती नोंद, विशेषतः वार, हा अधिक प्रमाण समजावा असा या कामांतील पूर्वानुभव आहे. तेव्हां सौम्यवार, बुधवार, ही गोष्ट कायम; कारण वाराचें नांव अक्षरांत लिहिलेलें आणि अक्षरांत तर चूक होण्याचा संभव आंकड्यांत चूक होण्यापेक्षां फारच कमी. तेव्हा शंका वाटली कीं, ५ हा आंकडा तर चूक नसेल? २-३-५ या आंकड्यांच्या लपेटींत पुष्कळ सारखेपणा येतो व घोटाळा होतो. तेव्हां ५ ही वाचनाची किंवा छापण्याची चूक असावी आणि खरा आंकडा मूळांत २ किंवा ३ असावा. वास्तविक येथें मूळ शाहू रोजनिशीच पाहिली पाहिजे. ती पडली 'पेशवे दफ्तरां'त. पण एकदा तोहि उद्योग सवडीनें केला पाहिजे. असो, तर आतां ५ ऐवजीं ३ चा बदल प्रमाण समजतां येईल आणि तसें अनुमान केलें तर 'सौम्यवार' श्रावण शु. ३ ला जंत्रींत येतो. आतां राहिली अडचण रमजान १ ची; कारण जंत्रींत श्रावण शु. ३ बुधवाराला रमजान २ निघतो. आपणांस माहीत आहे कीं, मुसुलमानी चंद्र आणि मराठी तिथि यांच्यांत मोडक जंत्रींत एक १ दिवसाचा फरक पुष्कळ वेळां आढळून येतो. तें साहजिक आहे. आपल्या मराठी तिथि सूर्यस्पृष्ट असतात आणि मुसुलमानांचे दिवस चंद्रदर्शनावर अवलंबून असतात. तिथींच्या घटकापळांची नोंद खरे जंत्रींत किंवा पिल्लेच्या एफिमिरीजमध्यें दिलेली आहे तशी मोडकांनीं काढली असलीं तरी कोष्टकांत दिलेली नाहीं. पण एक दिवसाची सवड आपण वर सांगितलेल्या अनुभवावरून घेऊं शकतों. सौम्यवार, बुधवार हें टोंक आपलें कायम धरावयाचें; आणि रमजान १ किंवा २ यांतला एक दिवसाचा फरक मो. जं. वरून क्षम्य समजावयाचा. याप्रमाणें आलेल्या शंकांचें निरसन होऊन

श्रावण शु. ३ सौम्यवार अशी खरी तिथि धरली पाहिजे हें ठरविलें. ५ ही चूक ठरली; आणि हा योग ज्या वर्षी १६७२ ला जुळतो आणि इहिदे खमसैनची सालची रोजनिशींतली नोंदहि लागू होते त्या अर्थी धोंडो बल्लाळ यांस मुकासा मिळाल्याचा दिवस शके १६७२ श्रावण शु. ३ सौम्यवार हा निश्चित झाला. तर्क, अनुमान, गणित आणि पूर्वानुभव यांच्या बळावर ही निश्चिती केली. मूळ शाहू रोजनिशी पाहणें आणि श्रावण शु. ३ व ५ आणि रमजान १ व २ चें सूक्ष्म गणित करून पाहणें एवढेंच आणखी केलें म्हणजे हें अगदीं ठाम कायम होऊं शकेल.

८. पण सुदैवानें आपले हे श्रम वांचण्याला एक फार बळकट प्रमाण छापलेल्या शाहू रोजनिशींतच बऱ्या धोंडो बल्लाळच्या श्रावण शु. ५ सौम्यवाराच्या नोंदीच्या वर लगतच आढळतें तें असें. पहा पृ. ६७ वर अशी नोंद आहे:—

" घनःश्याम नारायणः—पेशजीं नारोराम मंत्री होते ते मृत्यु पावले सबब मशारनिल्हेकडे वाकनिशी सांगितली. **सुरुसन इहिदे खमसैन राजशक ७७ प्रमोद नाम संवत्सरे श्रावण शुद्ध तृतीया सौम्यवासर छ १ रमजान** सालीना नेमणूक १०००० शिवाय सरंजाम. " ही नोंद सर्व शंकाकुशंकांचें निरसन करण्यास पूर्णपणें समर्थ आहे. हींत शक, मिति, वार, संवत्सर, तिथि, चंद्र असे सर्व योग दिलेले आहेत. ही पूर्ण आहे. राजशक ७७ म्हणजेच शालिवाहन शक १६७२. येथें तिथीची नोंद सुदैवानें अक्षरांत दिली आहे; आंकड्यांत नाहीं. तृतीया अशी स्पष्ट अक्षरेंच आहेत; आणि छ १ रमजान ही मुसुलमानी तारीखहि दिली आहे. कांहीं शंकेला जागाच उरली नाहीं. शिवाय ही नोंद गुण्यांचे यजमान जे घनबा मंत्री त्यांचेबद्दलच आहे. सर्वच योग जुळला पण खटाटोप केवढा पडला ?

९. शंकास्थळ म्हणून आणखी एक उदाहरण घेतों. ले. १ आणि ले. २ हेच पहा. ले. १ हा विठ्ठलभट गुणीये यांस शंभर लारीची वृत्ति चांफेटास दिल्यासंबंधांत परशराम त्र्यंबक प्रतिनिधींचें पत्र गोविंद पुरुषोत्तम (वोर्पे-पोतदार) देशाधिकारी यांस आहे; पण मूळ पत्र न मिळाल्यामुळें संपादकांनीं येथें त्या पत्राची नकल मिळाली ती छापली आहे. आणि ले. २ हा 'पंतप्रतिनिधीची बखर' या बखरींतील उतारा आहे. या उताऱ्यांतहि विठ्ठलभटास दिलेल्या

चांफेट वृत्तीबाबतच्या परशराम त्र्यंबक प्रतिनिधींच्या पत्राची नोंद आहे. या नोंदीत सर्व तपशील नाहीं.

१०. ले. १ चा काळ ठरवितांना तो आपण ले. २ वरून ठरविला असें संपादक टीपेंत म्हणतात. परंतु गंमत अशी आहे कीं, ले. २ मध्यें फक्त तारीख आहे. सनाची नोंदच नाहीं ! ले. १ नकल आहे खरी पण त्यांत मुसलमानी सन व तारीख दोन्ही दिलेलीं आहेत. म्हणजे ले. १ मधील सदरहू उल्लेख त्याचा कालनिर्णय करण्यास त्या लेखापुरते समर्थ आहेत. त्याला ले. २ ची गरज नाहीं.

११. ले. १ आणि ले. २ हे एकाच वृत्तीविषयाविषयीं आहेत हें स्पष्ट दिसतें. दोहींतहि तारीख आहे पण ती निराळी आहे. महिना 'सवाल' मात्र दोहोंतहि दिला आहे. पण ले. १ मध्यें 'छ २३' सवाल तर ले. २ मध्यें त्याच पत्राचा दिवस 'चंद्र २०' सवाल, असा दिवसांत फरक आढळतो. आली शंका, २० कीं २३ ? ले. १ तर बोलूनचालून नकल किंवा नकलेची नकल. ले. २ अव्वल इंग्रजींत तयार झालेला आणि तोहि मूळ प्रतीवरून छापलेला नाहीं तर नकलेवरूनच. कोंकणांत शोध करीत असतां 'पंतप्रतिनिधींची बखर' या नांवानें पारसनीसांनीं छापलेल्या बखरीचा कर्ता विठ्ठल आपाजी सबनीस ऊर्फ पोतदार हा कर्ता आणि माहीतगार असा आमच्याच घराण्यांतील आमचा एक पूर्वज होऊन गेल्याची निश्चित माहिती मला मिळाली. विठ्ठल आपाजीनें इ. स. १८४९ त सदरील बखर लिहून पुरी केली. विठ्ठल आपाजी चांगला माहितगार; जुन्या कागदपत्रांचा सांठाहि त्याजपाशीं भरपूर आणि विशाळगड दप्तरांतील माहितीहि त्याला वश्य होती. अशा माहितगारानें लिहिलेल्या बखरींत 'चंद्र २०' दिला आहे तो मुळांतच तसा आहे कीं मूळांत २३ आहे ? कीं छापणाराची चूक आहे ? कीं ले. १ वाल्यानेंच २० ऐवजीं २३ दिला ? ले. १ च्या मुळांत वास्तविक काय आहे ? कीं येथेंहि नकलकाराची चूक म्हणावी ? २० कीं २३, कसा प्रश्न सोडवावा ? प्रश्न कांहीं मूळ पाहिल्याशिवाय कधींच सुटण्यासारखा नाहीं. उपोद्बलक अन्य प्रमाणें म्हणावीं तर तींहि मिळालेलीं नाहींत ! ले. १ मध्यें आणखी एक शंकास्थान मात्र निघतें. पत्राच्या शेवटीं 'छ २३ सफर मया व अलफ' अशी एक नुसती तारीख

टाकली आहे. येथें महिना सवाल नाहीं सफर दिला आहे. तो मुळांत तसाच आहे असें घटकाभर समजूं. पण तारीख २३ च आहे. वर पत्रांत २३ म्हणून खालींहि महिन्याचा फरक न कळल्यामुळें २३ च दिली कीं खालची २३ पाहून वरही २० असून २३ केली नकलकारानें? अशा एकामागून एक शंकाच येत जातात. शिवाय मूळ पत्राच्या शेवटीं ही 'छ २३ सफर' ची तारीख कसली? हिचें प्रयोजन काय? अशा पत्रांतून या तारखा केव्हां व कां येतात? ही तारीख रुजुवातीची समजावी काय? सवाल नि सफर म्हणजे सुमारें तीन महिन्यांचें अंतर!

१२. इकडे या शंका भंडावतात तर ले. २ मध्यें बखरकर्ता म्हणतो गुण्ये वृत्तिपत्रावर "आदिपुरुष श्रीराजाशाहू छत्रपति०" असा शिक्का आहे. आधीं नुसतीं 'आदिपुरुष' अशीं अक्षरें प्रतिनिधि शिक्क्यांत यावयाचीं नाहींत. 'श्रीआईआदिपुरुष' अशीं अक्षरें यावयाचीं. म्हणजे बखरकाराची नोंदच घाईची; कांहीं म्हणा पण ती चूक खरी. ले. १ चा नकलकार शिक्याची नोंदच करीत नाहीं हें किती विपरीत? कारण जुन्या नकलांतून निदान शिक्क्याच्या जागीं नुसता 'शिक्का' एवढीं अक्षरें तरी असतातच. आणखी ले. १ मध्यें दिलेला सन हाच ले. २ चा समजावा लागतो. पण त्या वेळीं म्हणजे 'इसन्ने मया व अलफ' (इ. स. १७०२) मध्यें श्रीछत्रपति शाहू मोकळा होता कोठें? तो पुढें पांच वर्षांनंतर सुटून आला! त्या पूर्वी सर्व कारभार श्रीताराऊ राणी पाही आणि त्या वेळीं परशराम त्र्यंबक प्रतिनिधि यांचा हुद्दा त्यांचें नांवें चाले; पण शिक्क्यांत नांव 'श्रीराजा **शिव**' असें ताराऊच्या शिवाजीचें येई; **शाहूचें** नव्हे. तेव्हां एक तर पंतप्र० बखरकर्ता शिक्क्यांतील नांव देतांना चुकला किंवा बखरीच्या नकलकारानें किंवा पारसनीसासारख्या संपादकांनीं कांहीं अनवधानानें चूक केली! सन (इ. स. १७०२) इसन्ने कायम धरला तर **शाहू** शिक्यांत बसत नाहीं; आणि शिक्यांत शाहू बसविला तर 'इसन्ने' जुळत नाहीं. परशराम त्र्यंबकाकडे प्रतिनिधकीचें पद राजारामकाळीं, शिव-काळीं व शाहूकाळीं भिन्नभिन्न काळीं अधूनमधून चाललेलें आहे असें म्हणा-वयास स्पष्ट आधार आहेत; अनेक आहेत. तो काळ फार धामधुमीचा, गृह-कलहाचा; पदांच्या घालमेली त्यांत फार अधिक वेळीं झाल्या. परशराम

त्र्यंबकाची तर फारच दशा उडाली. मूळ तो ताराबाईकडचा; पुढें शाहूकडे ओढला गेला. पण त्याचा एक मुलगा कृष्णाजी ताराबाईपक्षाचा प्रतिनिधि झाला! पण बापलेकांत दुजाभाव कल्पण्यास आज तरी प्रमाणें नाहींत. असा मोठा घोटाळा आहे आणि तो स्पष्टपणें, संगतवार पण साधार उलगडण्यास अस्सल व विश्वसनीय अशीं पुष्कळच तत्कालीन साधनें मिळालीं पाहिजेत. थोडीं-थोडीं मिळतहि चाललीं आहेत. घराण्यांच्या इतिहासांच्या आंदोलनामुळें पुष्कळच नवीन साधनें पुढें येत आहेत. त्यांचा या प्रकरणीं अतिशय उपयोग होईल आणि ही गुंतागुंत उकलत जाईल. तात्पर्य ले. १ ची मूळ सनद पुढें आली पाहिजे, आणि इतरहि अस्सल साधनें गुण्ये घराण्याचीं व इतरांचीं पुढें आलीं पाहिजेत तेव्हांच अनेक संदिग्ध बाबींचे अचूक कालनिर्णय होऊं शकतील. तोंवर नवीन कागदपत्र शोधण्याचें काम चालूच ठेविलें पाहिजे.*

१३. वर दोन तीन अडचणींचें निरूपण केलें. पण अडचणी दोनतीनच आहेत असें नाहीं, अनेक आहेत. लेख अस्सल, नकल, खरा, खोटा इत्यादिक परीक्षा फारच जबाबदारीनें आणि माहितगारीनें करावी लागते. जुन्या काळचे शिक्के, लेखनपद्धति, मायने, इत्यादींबद्दल सूक्ष्म ज्ञान आणि दीर्घ परिचय संपादकास असावा लागतो. हस्ताक्षर ओळखण्याचा बारकावा दृष्टींत ठसावा लागतो. टोपण नांवें तर तिरपीट उडवितात, ते धागे काळजीनें हातीं बळकट धरावे लागतात. वडीलधाकुटपणाचीं नातीं ठरवितांना फार सावधपणानें चिकित्सा करावी लागते. जोडगिरींच्या कागदांचीं भेंडोळीं फाटून तुकडे झालेले असतात; तेव्हां अशीं निरनिराळीं भेंडोळीं आणि त्यांतील निरनिराळे तुकडे जुळविण्यांत फारच डोकें खर्चावें लागतें; वादकज्जे तर हरहमेष चाललेले, त्यांत दाखल केलेले करीणे, साक्षी इत्यादींतून आपापली बाजूच जो तो सजवून मांडणार, त्यांतून सत्य निवडण्यास न्यायाधिशी निःपक्षपातीपणा आणि समतोलपणा राखावा लागतो. अशा किती म्हणून बाबी सांगाव्या? आणि इतकेंहि करून

* ले. १—इसन्ने मया व अलफ छ २० सवाल = इ. स. १७०२ मार्च ९–सोमवार फा. व. ७ शके १६२३ वृष; सदर, छ २३ सवाल = मार्च १२ गुरुवार, फा. व. १०; आणि छ २३ सफर सन सलास मया व अलफ = बुधवार, ता. ८ जुलै इ. स. १७०२, आषाढ व. १० शके १६२४ (खरे जंत्री).

शंकास्थानें आणि अपुरेपणा कांहीं संपत नाहीं. जशी माहिती वाढते तशा जुन्या शंका गेल्या तरी नव्या शंका उभ्या राहतात. पण असें होऊनहि आपली ज्ञानांत प्रगतिच होत राहते यांत शंका नाहीं.

१४. घराण्यांच्या इतिहासासाठीं एक अत्यंत महत्त्वाचें साधन म्हणजे तीर्थोपाध्यायांकडे आमच्या पूर्वजांनीं लिहून दिलेले आणि या तीर्थोपाध्यायांनीं आजवर जिवापलीकडे जतन करून ठेवलेले लेख होत. असें दिसतें कीं, नाशिक, त्र्यंबकेश्वर येथील उपाध्यायांच्या जवळ असलेले लेख सर्वांत जुने असावेत. वेरूळ, पैठण येथेंहि जुने लेख मिळावयास पाहिजेत. पण तेथील उपाध्यायांजवळ सांप्रत तरी त्यांचा विपुल भरणा आढळून येत नाहीं. ना. त्र्यंबकेश्वर येथें सुमारें तीनशें ते चारशें वर्षांचे प्राचीन लेख आढळून येतात. त्यांतल्या त्यांत त्र्यंबकेश्वरचे लेख जरा अधिक जुने असावेत असें दिसतें. या लेखांचा आम्हीं बारकाईनें जातीनें शोध केला आहे. त्यावरून मूळ जुन्या अस्सल लेखांच्या वह्या आणि त्यांच्या विविध नकलांच्या व नामावळ्यांच्या वह्या वगैरे बरेच प्रकार या वह्यांत आढळून आले. वास्तविक मूळ अस्सल लेखच शोधकानें पाहून उतरून आणले पाहिजेत. जाणत्या माणसानेंच त्या त्या जुन्या लेखांचा उतारा केला पाहिजे. प्रत्यक्ष उपाध्याय मंडळी किंवा इतर कोणाकडून तरी असल्या लेखांचे उतारे करून आणले तर त्यांत गौणपणा येणें साहजिक आहे. नकलेचे दोष नकलेंत येणार. शिवाय नकलेंत अनेक तपशील नकल ज्या करणांसाठीं केली असेल त्यांस्तव गाळले जाण्याचाहि संभव असतो. मूळच्या आसपासच्या लेखांचाहि उपयोग कालनिर्णयास होतो. सबब शास्त्रतः शुद्ध आणि इष्ट प्रथा म्हणजे मूळ अस्सल लेखांची जाणत्याकरवीं मिळविलेली नकल. प्रत्यक्ष संपादकालाच हें काम करतां येईल तर उत्तम. कारण हे तीर्थोपाध्यायलेख म्हणजे एक पहिल्या प्रतीचें ऐ. साधन होय. प्राचीन लोक धर्मश्रद्धेमुळें जसे लेख देतांना आढळतात तसें अर्वाचीन करीत नाहींत. अलीकडे तर तीर्थोपाध्यायांचा तिरस्कार करून लेख देण्याची टाळाटाळ करणारे व हेटाळणी करणारे आणि त्यांत आपण मोठा पुरुषार्थ केला अशी फुशारकी मिरविणारेहि पुष्कळ आढळून येतात. अशा कृत्यानें आपल्या कुलाचा आणि कुलेतिहासाचा लोप आपण घडवून आणीत आहोंत हें मात्र त्यांच्या ध्यानीं बिलकूल येत नाहीं. तुम्ही तीर्थविधि करा

किंवा करूं नका, श्रद्धा तुमची असो किंवा नसो, मात्र तीर्थोपाध्ये मंडळींनीं उपाध्येपणाची वृत्ति मिळवून त्याचे लेख घेण्याची जी योजना काढली तिच्याबद्दल त्यांस द्यावेत तेवढे धन्यवाद थोडेच होत. आज अनेक कुलांतील मंडळींचा तपास लावण्यास महत्त्वाचें असें तेवढें एकच साधन उपलब्ध आहे. या तीर्थोपाध्यायांनीं अनेक संकटांतून, राज्यक्रांत्यांतून आणि विप्लवांतून या वह्यांचे आणि लेखांचे, स्वतःच्या उदरभरणाचें साधन म्हणून कां होईना, **आज चारशें वर्षें** एवढ्या काळजीकाळ्यानें जतन केलें हा त्यांचा राष्ट्रावर महद्-उपकार झाला आहे. जुन्या लेखांचें हें अपूर्व भांडार म्हणजे राष्ट्रीय धन समजून त्याची पुढची व्यवस्था लागली पाहिजे. किंबहुना स्वदेशाविषयीं नितांत ममता पोटीं असणाऱ्या सरकाराचें तें एक पवित्र कर्तव्यच होय. सत्यप्रतिपाळक सर्व सज्जनांचेंहि तें पालनीय कर्तव्यच ठरेल. आज तें कर्तव्य कसोशीनें पाळलें गेलें असतें तर तुकाराम, रामदास, शिवाजीमहाराज, संताजी घोरपडे, रामचंद्रपंत अमात्य अशा एक ना दोन शेंकडों, हजारों महनीय पुरुषांचीं **प्रत्यक्ष हस्ताक्षरें** आम्हांस या लेखांतून उपलब्ध झालीं असतीं. हा नुसता तर्क नाहीं. हीं सत्य प्रतिज्ञेचीं उत्तरें आहेत. छत्रपतींचे उपाध्ये नाशिक त्र्यंबकेश्वरीं आजहि आहेत. शिवाजीमहाराज, ताराऊ आईसाहेब इत्यादि तेथें येऊन गेल्याचे पुरावे आहेत. पण ते मूळ लेख आतां नष्टच झाले असें वाटतें. आज दुष्प्राप्य तर झालेलेच आहेत. तुकारामबोवांचाहि लेख होता.पण तेवढाच मिळत नाहीं. पुढील मिळतात. प्रस्तुत या उपाध्यायांची वृत्ति मोडकळीसच आल्यामुळें कित्येकांची अतिविपन्न दशा झाली आहे. आपल्यांतील भाऊबंदकी आणि कालमाहात्म्याकडे केलेलें दुर्लक्ष हीं तर या दुःस्थितीस कारण झालेलींच आहेत. परंतु समाजाचेंहि दुर्लक्ष्य अक्षम्य समजलें जाईल असें झालें आहे. विद्वानांचेवर तर हा मोठाच दोष प्राप्त होतो ! ! कोणाचें लक्षच नाहीं; मूळ वह्या सांदीकोपऱ्यांत पडल्या आहेत; कृमिकीटकांच्या भक्ष्यस्थानीं पडत आहेत; गंगार्पण होत आहेत; फाटून तुटून जात आहेत. आतां जितक्या लवकर या महनीय आणि संरक्षणीय भांडाराचा जीर्णोद्धार होईल तितका केला पाहिजे आणि या कामीं विद्वान् आणि सरकार यांनींच पुढाकार घेतला पाहिजे. नेपाळचे राजे, शीख, वाणी उदमी, उत्तर दक्षिणेकडील नाना जातींचे

लोक यांचे उपाध्ये या क्षेत्रीं आहेत आणि यांच्या पूर्वजांचे शेंकडों लेख आम्हीं डोळ्यांनीं पाहिले आहेत. महाराष्ट्रांत हे तीर्थोपाध्यायच तेवढे असे सन्माननीय राहिले आहेत कीं, त्यांस समस्त भारतवर्षांतील हिंदु राजेरजवाड्यापासून तों तहत वाणी-उदम्यापावेतों शेंकडों घराण्यांनीं त्यांचे "विद्यार्थि" म्हणवून घेऊन त्यांचें "गुरुत्व" मान्य केलें आहे. असो. येथें याहून अधिक विस्तारानें लिहिणें उचित नाहीं. पण घराण्यांचे इतिहास लिहिणाऱ्यांनीं नुसते तीर्थोपाध्यांकडील लेख किंवा नकला किंवा नकलांच्या नकला आणवून संतुष्ट न राहतां **जाणीकपणानें मूळ अस्सल लेखांची तपासणी व शोध करून** त्या माहितीचा व साधनांचा परामर्श आपल्या इतिहासरचनेसाठीं करून घेतला पाहिजे.

१५. आणखी एक सूचना येथें करून ठेवणें अप्रस्तुत होणार नाहीं. अलीकडे जुन्या कागदपत्रांचें **यथावत् प्रतिमीकरण** साध्य झालें आहे. या यांत्रिक सोईचा लाभ जुन्या लेखांच्या प्रतिमा करून घेण्यासाठीं अवश्यमेव केला पाहिजे. माय्क्रोफिल्मिंग पद्धतीनें जुन्या कागदांचे फोटो यथाप्रतिम घेऊन ठेवणें आणि मग त्या प्रतिमांच्या गुंडाळ्या नीट ठेवून त्यांवरून वाटेल तेव्हां यथाप्रति करून घेणें हें नवीन यांत्रिक योजनेमुळें आतां फार अल्पखर्चांत घडून येतें. आज पंचवीस वर्षें ही यांत्रिक सोय उभ्या भारतवर्षांत फक्त पुण्यास सरकारी रीत्या प्रस्थापित झाली होती. 'फोटोनोंदणी' नांवानें ती पुढें आली. तिला मोठा विरोध झाला आणि पुढें तिजकडे आणि तिच्या अनेकविध उपयुक्ततेकडे कोणाचें लक्षच गेलें नाहीं. प्राचीन लेख आणि प्राचीन वस्तु यांच्या प्रतिमा घेऊन ठेवण्यास इतकें स्वस्त, सुलभ आणि उपयुक्त असें अन्य साधनच नाहीं. परंतु याचीहि माहिती थोडयांसच असल्याचें दिसून येतें आणि याचा उपयोग तर फारच थोडे करून घेतात. प्रस्तुतच्या युद्धकाळीं या शोधाचा आणि सोईचा उपयोग अतिशय मोठ्या प्रमाणावर अमेरिकादि यंत्रप्रगत देशांतून घेत आहेत आणि लवकरच हिंदुस्थानांतहि त्याचा अतिशय वेगानें प्रसार होईल. चित्रपट तर आतां चांगलेच लोकप्रिय झाले आहेत आणि त्याचीच ही जोडकला आहे. ती वाढणार ! शांततेची पुनः जोड होतांच जुन्या कागदपत्रांचें, पोथ्यांचें रक्षण या पद्धतीनें करविण्याच्या प्रथेस मोठ्या जोराची चालना दिली पाहिजे.

१६. घराण्यांचे इतिहासासाठीं उपयुक्त असणारे कागदपत्रहि याप्रमाणेंच प्रतिमीकृत झाले पाहिजेत. आणि या कार्यांत लक्ष घालणाऱ्यांनीं हाहि उपक्रम हातीं घेतला पाहिजे. कारण, घराण्यांच्या इतिहासप्रकरणीं असा कटु अनुभव आला आहे कीं, "झालें! आतां सर्व पाहून झालें! छापून झालें! आमचा इतिहास तयार झाला! आतां कांहीं जुन्या कागदांचें काम उरलें नाहीं!!" अशी खोटी आणि विपरीत समजूत होऊन आपल्या जवळील कागदपत्र निरुपयोगी अतएव अरक्षणीय समजण्याचाहि भ्रम कोठें कोठें डोकावूं लागला आहे. हा भ्रम दूर केला पाहिजे. **घराण्यांचे सांप्रत होणारे इतिहास हा प्रारंभ आहे.** यांत आलेल्या व घेतलेल्या माहितीची पुनः तपासणी केली पाहिजे; विपरीत आणि चुकीची माहिती दुरुस्त केली पाहिजे. असे सर्व संस्कार यापुढेंच करावे लागतील. तेव्हां आज तयार झालेले हे इतिहास म्हणजे पाया समजून त्यावर इमारत अजून उभारावयाचीच आहे हें सर्वांनीं लक्षांत ठेवावयास पाहिजे. या इतिहासानें कामाची दिशा समजेल; अज्ञान बरेंच दूर होईल; खरी माहिती शोधण्याविषयीं इच्छा होईल. असे सर्व परिणाम पुढें घडून येतील. आणि मग घराण्यांच्या इतिहासांच्या सुधारून वाढविलेल्या आवृत्त्या आपणांस काढाव्या लागतील. तरी भलतेच समज आपण रुजूं देतां कामा नये. आज शें-दीडशें वर्षांत कोणी घराण्यांचे इतिहास लिहिण्याचें काम केलें नाहीं. तेव्हां आतां पुढें तरी या कामाकडे कोणाची दृष्टि लवकर वळते अशी निराशा मनांत ठेवूं नये. ज्ञानलालसा वाढत आहे; नवीन साधनें उपलब्ध होत आहेत; आपलें जुनें ज्ञान नीटनेटकें व साफसूफ होऊन सजूनसाजून नव्या ज्ञानाला बरोबर घेऊन येत आहे; भारतवर्षांत ऐतिहासिक संशोधन प्रांताप्रांतांतून जोरानें होऊं लागलें आहे; नवीन ऐतिहासिक तत्त्वज्ञानेंसुद्धां उदय पावत आहेत; आपला इतिहास आपण लिहिला पाहिजे ही बुद्धि उदय पावली आहे; भारत-वर्षाचा विस्तृत इतिहास अनेक खंडांत प्रसिद्ध होण्याच्या योजना तयार झाल्या असून त्याप्रमाणें लवकरच तो प्रसिद्ध होईल अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. अशा वेळीं नवे नवे अभ्यासक पुढें येतील आणि आपल्या घराण्यांचे, प्रांतांचे, समाजांचे आणि देशांचे अपुरे आणि अधुरे इतिहास सांग व संपूर्ण केले जातील याविषयीं कांहीं शंका मनांत ठेवण्याचें कारण नाहीं.

१७. याच ग्रंथाच्या संपादकाचेंच उदाहरण घ्या. इंटरच्या वर्गांत असतां विद्यार्थिदशेंतच त्यांनीं आपल्या गुण्ये घराण्याच्या इतिहासाचीं साधनें जुळविण्यास प्रारंभ केला आणि सतत दोनतीन वर्षे अत्यंत आस्थेनें प्रयत्न करून आज ४०० पानांचा ' गुण्ये घराण्यांचा इतिहास ' छापून प्रसिद्ध करण्यापर्यंत मजल गांठली यावरून काय दिसतें ? आम्हीं वर म्हटलें आहे त्याचें प्रमाणच यांत मिळत नाहीं काय ? इतिहासाविषयीं प्रत्यहीं पण शनैःशनैः वाढत असलेल्या आस्थेचेंच हें द्योतक नाहीं ? चि. विठ्ठलराव गुण्ये यांनीं या कामीं प्रथमच पाऊल टाकलें तेव्हां त्यांना सुदैवानें त्यांच्या सत्कीर्ति वडिलांचा मनःपूर्वक पाठिंबा लाभला, आर्थिक चिंतेचा चटका त्यांना लागला नाहीं असे भाग्ययोग त्यांच्या वांट्याला आले खरे. परंतु येवढ्यानें होण्याजोगें हें काम नव्हतें, हें मागें या कामांतील ज्या अडचणींचें निरूपण कांहींसें केलें त्यावरून कळून येण्यासारखें आहे. या तरुण संपादकाची तारीफ करतों ती येवढ्यासाठीं कीं, त्यांनीं या कामीं साधनें जुळविणें, वाचणें, लावणें इत्यादि सर्व आरंभीं किचकट वाटणारीं पण पुढें एक प्रकारचा आंतरिक आनंद देणारीं कामें स्वतः पार पाडण्याचें ठरवून सर्व परिश्रम केले. जाणिकांच्याकडून अवश्य तें साहाय्य त्यांनीं नम्रभावानें मिळविलें आणि आतां स्वकुलाविषयींचे एकटेच पहिल्या प्रतीचे जाणकार म्हणून पदवी त्यांनीं प्राप्त करून घेतली. त्यांचा अभ्यास आणि दृष्टि आतां पुष्कळच प्रगल्भ झालीं आहेत आणि आतां उत्पन्न झालेली आवड अशीच वाढीस लागेल अशी बरीच आशा आम्हांला वाटत आहे. ' **कऱ्हाडे ब्राह्मणांच्या इतिहासाचीं साधनें** ' असा एक व्यापक मथळा जो त्यांनीं आपल्या दोन्ही खंडांच्या माथ्यावर घातला आहे त्यावरून असें अनुमान होतें कीं केवळ स्वकुलापुरताच हा व्याप मर्यादित न करतां ते स्वज्ञातीचा इतिहास शोधण्याचा पुढला टप्पा गांठूं इच्छितात.

१८. हा क्रम कांहीं वावगा नाहीं. दिसण्यांत तो लहान दिसतो आणि कित्येकांस तर तो क्षुद्र, संकुचित आणि उपेक्षणीय असा वाटेल. परंतु या कित्येकांची ही दृष्टिच निभ्रांत, अविवेकी समजावी. व्यापकपणाच्या, विश्वकुटुंबित्वाच्या अथवा मानवी समतेच्या लंब्यालंब्या वाता मारणाऱ्यांची कांहीं या जगांत उणीव नाहीं. परंतु तसला बाणा आपल्या रोमारोमांत भिनवून तशीं आचरणें

प्रत्यक्ष आचरणारे खरेखुरे वंद्य महात्मे जगांत किती आढळतील ? विश्वकुटुंबाचा संकोच राष्ट्रवादांत, राष्ट्रवादाचा संकोच जातिवादांत किंवा प्रांतवादांत, प्रांताचा किंवा जातीचा उपजातिवादांत किंवा ग्रामवादांत, आणि ग्रामाची अखेर कुलवादांत आणि कुलाची व्यक्तिवादांत असा क्रमसंकोचहि झालेला व्यवहारांत दृष्टीस पडतो. मनाला खरें विश्वव्यापक बनविण्याचा प्रयत्न करणें हेंच खरें शिक्षण आणि थोरपणा होय. हें लक्षांत वागवून आणि तसा प्रयत्न सतत आणि प्रामाणिकपणानें करून मग व्यक्ति, कुल, ग्राम, प्रांत, देश इत्यादि अभिमान तारतम्यानें परंतु सत्यावरील निष्ठा ढळूं न देतां वागविण्याची संवय लावणें यांत कांहीं वावगें नाहीं आणि माणुसकीची, समाजाची, देशाची, कुलाची, राष्ट्राची कोणाची कसलीहि खरी हानि होण्याची भीति नाहीं. खोटे अभिमान कधींच शेवटास जात नाहींत. त्यांचे फुगे केव्हां तरी फुटल्याशिवाय राहत नाहींत. यासाठीं सत्याची कास बळकट धरावी; मनाचा व्यापकपणा आणि शांति ढळूं देऊं नये आणि मग सर्व लहानमोठे अभिमान गुणग्राही बुद्धीनें आपआपल्या मर्यादेंत बाळगण्यांत असली तर शोभाच आहे; लज्जा नाहीं।

१९. " कऱ्हाडे ब्राह्मणांच्या इतिहासाचीं साधनें " अभ्यासणें आणि प्रसिद्ध होणें या दृष्टीनें अगत्याचें आहे. वास्तविक कऱ्हाडे ब्राह्मणांचीच काय आब्राह्मण-चांडाल, आर्य-आर्येतर, शकयवन सर्वांचेंच खरे आणि सप्रमाण इतिहास पुढें यावयास पाहिजेत. खऱ्या इतिहासभक्तानें सर्वांच्या इतिहासप्रसिद्धीची हांव धरली पाहिजे आणि त्या कामीं झटलें पाहिजे. कोणीं अल्पस्वल्प जे कांहीं प्रयत्न करतील ते जर सद्भावानें आणि योग्य दिशेनें होत असतील तर त्यांचें मनःपूर्वक स्वागत केलें पाहिजे आणि त्यांस प्रोत्साहन दिलें पाहिजे. सत्याची निष्ठुर दृष्टि दुर्बल कधींच होऊं देतां कामा नये. सत्य समजून घेतलेंच पाहिजे. भविष्यकाळीं सर्वांना हितकर असलेलें ऐक्य आणि संघटना करण्याचे कामीं कांहीं निरुपयोगी झालेलीं सत्यें सद्यःकालीं विसरण्याचें औदार्य दाखविलें पाहिजे आणि कांहीं पूर्वकाळीं विसरलेलीं किंवा दृष्टिआड केलेलीं सत्यें सद्यःकालीं उपयोगी म्हणून अधिक आग्रहानें पुरस्कारलीं पाहिजेत. हें सर्व योग्य असलें तरी कोणतेंहि अल्पस्वल्प सत्य असेना, अप्रिय किंवा कटु असेना, तें पारखून नष्ट होऊं न देतां त्याचा संग्रह हा केलाच पाहिजे.

२०. या सत्यसंग्रहांतून निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या अंशांचा कमीअधिक उपयोग करावा लागतो. पण सत्य अज्जी नष्ट करणें, निदान जाणूनबुजून तसें करणें केव्हांहि विहित नाहीं. त्या सर्व सत्यांची समजूत यथार्थ मांडणीनें करणें ही आपली चतुराई आहे आणि तें "कौशल" अंगीं आणणें आपलें कर्तव्य आहे.

२१. कऱ्हाडे ब्राह्मणांचे संबंधानें माहिती व आधार एकत्र केलेला एक निबंध सुविख्यात विद्वान् रा. प. कृ. गोडे यांनीं लिहिलेला त्याची उपयुक्तता व योग्यता जाणून या ग्रंथास जोडण्यांत आलेला आहे. कऱ्हाडे ब्राह्मणांत जमीदार मंडळींचा भरणा बराच मोठा आहे आणि अद्यापिहि अनेक कऱ्हाडे ब्राह्मण घराणीं आपली उरलीसुरली जमीदारी रत्नागिरी प्रांतीं भोगीत असल्याचें आढळून येतें. जमीदारीच्या प्राप्तीस्तव यांपैकीं बहुतेक घराण्यांतून थोडाफार कां होईना पण कागदपत्रांचा भरणा आढळतो. पैकीं बऱ्याच जुन्या कुळकटांतून विद्यानगर अथवा विजयानगरच्या तळकोंकणांतील राजवटींचा चुकतामाकता उल्लेखहि येतो. गुण्ये घराण्यांच्या कागदपत्रांतहि तो आढळतो. तसाच पाध्ये, सरदेसाई इत्यादि घराण्यांचे कागदपत्रांतहि आढळतो. पुढें 'इदलशाही'चे उल्लेख मात्र अस्सल कागदपत्रांतूनहि आढळतात इतकेंच नव्हे, कित्येक आदिलशाही कागदहि पुरोहित, पोतदार, सरदेसाई, आठल्ये वगैरे घराण्यांचे जवळ असल्याचें आढळतें. नंतर मग शिवशाही, आंग्रे, प्रतिनिधि, अमात्य इत्यादिकांपासून तों तहत ब्रिटिश अंमलापर्यंतचे कागदपत्र आढळून येतात. तसेंच आठल्ये, सरदेसाई, पोतदार, पुरोहित, भाटवडेकर प्रभृति अनेक घराण्यांत जदनामे व वंशावळीहि जुन्या काळीं केलेल्या आढळून येतात. घराण्यांच्या इतिहासाला उपयोगीं पडण्यासारखी सामग्री पुष्कळशा कऱ्हाडे ब्राह्मण घराण्यांतून आढळून येते. हा एक सांगण्यासारखा विशेष आहे.

२२. तसाच दुसरा विशेष म्हटला म्हणजे पेशवाईंत बरींच कऱ्हाडे ब्राह्मण घराणीं माळवा, बुंदेलखंड, रेवाखंड वगैरे भागांत पसरलीं आणि अद्यापिहि सागरजालवण वगैरे भागांत त्यांच्या शाखा नांदतांना आढळून येतात.

२३. कऱ्हाडे ब्राह्मणांच्या इतिहासाचीं साधनें एवढा मर्यादित विषय घेतला तरी अभ्यासाला केवढें क्षेत्र आहे याची कल्पना यावरून येईल. सुमारें चारशें

वर्षांपर्यंत अनेक कऱ्हाडे कुटुंबांचा मागपत्ता कागदपत्रांवरून अखंड लावतां येतो आणि त्यांचा शाखाविस्तार अखिल हिंदुस्थानांत लांबवर अनेक स्थळीं पोंचलेला आढळतो. एवढ्याशा मर्यादित विषयाचा पायाशुद्ध अभ्यास करावयाचा म्हटलें तरी एका माणसाचा जन्महि त्यास पुरणार नाहीं. अनेक अभ्यासकांचें साहाय्य लागेल आणि अनेकांचे परिश्रम खर्ची पाडावे लागतील. रा. ब. गोविंदरावनाना सरदेसाई आणि कोल्हापूरचे दुसरे गोविंदरावतात्या या उभयतां विद्वानांनीं जेव्हां आपल्या प्रख्यात आणि एक हजार वर्षांच्या अविच्छिन्न परंपरेच्या घराण्याचा इतिहास सजविण्याचें कार्य हातीं घेतलें तेव्हां सुमारें दोन हजार कागदपत्रें गोळा करण्यांत त्यांस यश आलें आणि तीन प्रचंड खंडांत मावळंगकर सरदेसाई घराण्याचा इतिहास प्रसिद्ध झाला. यांत आणखी एका खंडाची तरी भर पडण्याइतकी आणखी सामग्री मिळणें शक्य आहे. शिपोशीचे श्री. विष्णुकाका आठल्ये यांनींहि आठल्ये घराण्याचे इतिहासाचा साधनखंड प्रसिद्ध केला आहे तोहि ग्रंथ नमुनेदार झाला आहे. आज हा गुण्ये घराण्याचा इतिहास तिसरा प्रसिद्ध होत आहे. आम्हीहि तीनचार वर्षांपूर्वी आमच्या पोतदार-सरपोतदार घराण्यांचे कागदपत्र जमवून प्रारंभ केला आहे तोहि ग्रंथ प्रकाशित होईल अशी आम्हांस उमेद आहे. या संशोधनांत सायलेकर आणि पुरियेकर-पुरोहित घराण्यांकडे महत्त्वाची सामग्री असल्याचें आम्हांस आढळलें. इतरहि अनेक घराण्यांत वरीच सामग्री मिळेल असें आमचें सानुभव अनुमान आहे. चित्पावन घराण्यांतील अनेक कुलांचे इतिहास प्रसिद्ध झाले आहेत व तें काम उत्साहानें अति वेगानें पुढें जात आहे. यजुर्वेदी कुलांपैकीं औंधकर पंतप्रतिनिधि आणि शेटये या घराण्यांचे इतिहास अलीकडे प्रसिद्ध झाले आहेत. अशी कांहीं हालचाल ब्राह्मण मंडळींत चालू आहे. आणखीहि कांहीं नांवें सांगतां येतील. कांहीं टिपणवजा खर्डेहि पूर्वी प्रसिद्ध झालेले आढळतात. मराठा मंडळ त्याहून केवढें विस्तृत आणि व्यापक ! परंतु, आंगरे, देवासकर पवार, वाठारकर निंबाळकर असे थोडेच नांव घेण्यासारखे इतिहास त्या मंडळीकडून प्रसिद्ध झाले आहेत. अनेक अनेक शूर, वीर मराठा घराणीं अजून जागींच झालीं नाहींत. त्यांस जाग आणली पाहिजे. त्याचप्रमाणें वैश्य, शूद्र आणि अतिशूद्र या जुन्या परिगणनेंत समाविष्ट होणाऱ्या घराण्यांकडेहि दुर्लक्ष होतां कामा नये.

२४. कुलेतिहासांप्रमाणेंच स्थळेतिहासहि प्रसिद्ध झाले पाहिजेत. आजपर्यंत या शाखेंत फार थोडें काम झालें आहे. स्थल, कुल, व्यक्ति, नाना घटितें, नाना शास्त्रें, कला, व्यवहार, आचार, विचार या सर्वांचें इतिहास शोधून रचलेच पाहिजेत, तेव्हांच एखाद्या समाजाचा सर्वांगीण आणि सप्रमाण इतिहास रचणें शक्य होईल.

२५. असो ! घराण्यांच्या इतिहासरचनेचा सांप्रत जोरावत असलेला उद्योग हा एक सदुद्योग आहे हें लक्षांत येण्यापुरतें कांहीं विवेचन वर केलें आहे. निरनिराळे संपादकहि आपापलीं एतद्विषयक प्रयोजनें व दृष्टि प्रसंगानें विशद करीत असतात. इतकेंच काय गत घटनांविषयीं आपले आग्रह, अभिमान आणि अभिप्रायहि प्रगट करीत असतात. तसें करण्याचा त्यांस अलबत हक्क आहे. तसाच तो अन्य विमर्शकांसहि आहे. पण उभयतांना आधारभूत होणारी जी माहिती, नि मूळ अप्रकाशित आणि प्रकाशित परंतु विलग पडलेलीं साधनें यांचेंच महत्त्व सर्वांत विशेष आहे. विविध संपादकीय अभिप्राय किंवा टीका विचारानें ग्रहण करणें किंवा त्यागणें हें चिकित्सक वाचकांचें आणि अभ्यासकांचें काम आहे आणि तें करण्यास त्यांस या इतिहासांतून मिळणाऱ्या नवीन सामग्रीमुळें केवढा तरी लाभ होतो ! मग या उद्योगास अजाणपतेपणें कां दूषावें ? उलट या इतिहासशाखेचें प्रवर्तन समृद्ध होईल असेंच सर्वात्मना करणें हेंच सुबुद्धपणाचें आणि प्रगतिपरत्वाचें दर्शक होय. या दृष्टीनें पाहतां या ग्रंथाचे तरुण संपादक चि. विठ्ठलराव गुण्ये, बी.ए., हे सर्वथा प्रशंसेस पात्र आहेत असें आम्हांस वाटतें. या कामीं मिळालेल्या अनुभवाचा उपयोग करून त्यांनीं नवेनवे इतिहास आणि नवीनवी विश्वसनीय माहिती पुढें आणावी आणि सर्वांच्या ज्ञानांत भर घालावी एवढें सांगून हा प्रस्ताव लिहिण्याचा मान दिल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानून तूर्त लेखणीस विराम देतों !

'लोककल्याण' पुणें–अक्षय्यतृतीया, शके १८६६ } **दत्तो वामन पोतदार**

निवेदन

इसवी सन १९४० च्या मे महिन्यांत रत्नागिरीस गेलों असतां तेथें रा. शांताराम रामचंद्र गुण्ये, मु॥ वेरल, ता. रत्नागिरी, यांची व आमची प्रथम भेट झाली; व कोंकणांत गुण्ये मंडळी असल्याचें समजलें. पुढें त्याच वर्षी भाद्रपदांत अनंत चतुर्दशीचे सुमारास (श. १८६२) पुण्यास रा. यशवंतरावजी लक्ष्मण गुण्ये, ग्वाल्हेर दरबार वकील, यांची भेट होऊन या घराण्याविषयीं पांच-सहा पानांचें एक लहानसें टांचण त्यांनीं केल्याचें आढळून आलें व शिल्लेदार कै. यशवंतराव लक्ष्मण गुण्ये, ग्वाल्हेर, यांचें हस्तचित्रहि पाहावयास मिळालें. व तेव्हांच जमल्यास या घराण्याविषयीं माहिती गोळा करावी असें ठरविलें. पुढें सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक प्रा. दत्तो वामन पोतदार यांची भेट घेतली व पुढील एकंदर कार्याचें स्वरूप ठरविलें. त्याच वेळीं रियासतकार गो. स. सरदेसाई यांचीहि पण याकरितां म्हणून गांठ घेतली. तें वर्ष इंटरचें असल्यानें त्या सालीं फक्त ऐतिहासिक पुस्तकांतील गुण्यांचे उल्लेख टिपून ठेवण्याचें काम केलें. पुढें १९४१ च्या मेमध्यें माहिती मिळविण्याचें काम बरेंच जोरानें चालू ठेवलें. श. १८६३ च्या वर्षप्रतिपदेस एक विनंति-पत्रक काढून तें निरनिराळ्या गुण्यांकडे पाठविलें व कुलवृत्तान्त-प्रश्न-पत्रिका भरून मागविल्या. तसेंच पुन्हां एकदां कोंकणांत गुण्यांच्या सर्व गांवीं स्वतः जाऊन कागदपत्रें व माहिती जमा करून आणली. पुढें ज्यूनिअर बी.ए.चें वर्ष चालू झाल्यानें या कामास बराच हातभार लावितां आला. श्रावणांत नाशिक व त्र्यंबकेश्वरास जाऊन तेथील उपाध्याकडील गुण्यांचे लेख मिळविले. त्याचप्रमाणें काशीहून वा॥ भाऊ भैया कात्रे यांच्याकडूनहि लेख मिळविले. त्यामुळें पुढें वंशावळी तयार करणें सुकर झालें. याच सुमारास कोंकणांतून रा. अंताजी केशव गुण्यांकडून या घराण्याविषयींचे जुन कागद आले. अशा प्रकारें दोन्ही खंडांचें साहित्य थोड्याफार प्रमाणावर जमा झालें, व मग दिवाळीच्या सुट्टींत खंड १ व २ची कच्ची प्रत लिहून काढली. पुढें आणखी कांहीं माहिती मिळविली. त्याच सुमारास १९४२ च्या जानेवारींत 'गुण्ये व्यक्तींची सूचि' छापून ती निरनिराळ्या गुण्यांकडे पाठविली. यानंतर ज्यू. बी.ए.च्या अखेरीस श. १८६४ च्या वर्षप्रतिपदेच्या सुमारास दोन्ही खंडांच्या मुद्रण-प्रति लिहून काढल्या, व पुढें सीनियर बी.ए.चें वर्ष चालू झाल्यानें बहुतेक काम येथेंच बंद ठेवलें. पुढें शके १८६५ त म्हणजे गेले वर्षी पुनः हें काम हातीं घेतलें, व

पुस्तक छापण्याचा विचार करून एक विनंति-पत्रक गेल्या श्रावणांत सर्व गुण्यांकडे पाठविलें व वर्गणी जमा करण्याचें काम चालूं झालें.

पुढें गेल्या वर्षांच्या दिवाळीच्या सुट्टींत दोन्ही खंडांत पुन्हां बराच फेरबदल केला. विशेषतः दुसऱ्या खंडाचें स्वरूप अगदीं पूर्णपणें बदललें. हें बहुतेक सर्व काम सौ. वैजयंती गुण्यांच्या मदतीनें केलें. पुढें नोव्हेंबरांत छापण्यास सुरवात झाली व आतां तें काम पूर्ण होत आलें आहे.

या इतिहासाविषयीं जें कांहीं आम्हांस लिहावयाचें होतें तें आम्हीं 'इतिहास वाचण्यापूर्वी' यांत लिहिलें आहे. हा इतिहास 'कऱ्हाडे ब्राह्मणांच्या इतिहासाचीं साधनें' या मालिकेंत छापत आहे. ही माला कोणीं नव्यानेंच सुरू केली आहे असें नाहीं; तर या इतिहासांत खंड १ मध्यें मुळ्ये, हळबे, डोंगरे, करकरे, भाटवडेकर, शहाणे इत्यादि घराण्यांविषयींहि पण प्रसंगोपात माहिती आली आहे; व शिवाय एका विशिष्ट ज्ञातीविषयींची माहिती जर एकाद्या पुस्तकांत येत असेल व तें पुस्तक जर अशा विशिष्टमालेंत छापलें तर त्या जातीच्या इतिहासाच्या दृष्टीनें हें विशेष सोइस्कर होईल एवढ्याकरितां आम्हीं असें केलें आहे.

पुण्याचे रा. य. ल. गुण्ये, ग्वाल्हेर दरबार वकील व रा. शा. रा. गुण्ये, ज्यू. बी.एस्सी. विद्यार्थि फर्ग्युसन कॉलेज, पुणें, या उभयतांनीं आम्हांस अगदीं प्रथमपासून मदत केली आहे. ती. जगन्नाथ गणेश गुण्ये ऊर्फ स्वामी कुवलयानंद व नगरचे ती. वै. पं. गंगाधरशास्त्री गुणे व ती. वामन भालचंद्र गुणे, कालें शाखेपैकीं भिलवडीचे मेजर स. वा. गुणे व कऱ्हाडचे रा. स. य. गुणे, वकील, यांनीं प्रथमपासून या कामीं आम्हांस प्रोत्साहन दिलें आहे. याशिवाय ज्या ज्या कुलबंधूंनीं आम्हांस या कामीं मदत केली आहे त्या सर्वांचे आम्हीं आभारी आहोंत.

पुण्याचे प्राध्यापक दत्तो वामन पोतदार यांनीं या कामीं आम्हांस प्रथमपासून मार्गदर्शन केलें असून पहिल्या खंडांतील कागदपत्रें बारकाईनें वाचलीं आहेत व सविस्तर प्रस्तावनाहि पण लिहिली आहे. त्यांनीं आपला बहुमोल वेळ खर्चून या कामास मदत केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. रियासतकार राव० गो. स. सरदेसाई यांनीं आम्हीं या कामास सुरवात केली तेव्हां योग्य तें मार्गदर्शन केलें त्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत.

याशिवाय पुणें येथील भा. इ. सं. मंडळांतील इतिहास-संशोधक शं. ना. जोशी व ग. ह. खरे कुलवृत्तांत संघाचे चिटणीस रा. कृ. वि. पेंडसे, अनेक कुलवृत्तांताचे लेखक वाो परांजपेशास्त्री व वाो दातारशास्त्री, आमचे मित्र रा. वि. त्र्यं. शेटे, वकील, पाचे-शेटे कुलवृत्तांताचे लेखक या सर्वांनीं वेळोवेळीं मदत केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. हें काम संकलनात्मक असल्यानें एकट्याच्या हातून होत नाहीं. त्यास अनेक लोकांची मदत लागते. पुणें येथील वरील व्यक्तींशिवाय पुण्याच्याच आणखी कित्येक व्यक्तींनीं आम्हांस मदत केली आहे. तसेंच मावळंकर-सरदेसाई घराण्याच्या इतिहासाचे लेखक रा. गो. स. सरदेसाई, कोल्हापूर, शिपोशीचे रा. वि. वा. आठल्ये, आठल्ये कुलवृत्तांताचे लेखक, राजापूरचे रा. रघुनाथ कृष्ण पाटणकर इत्यादि मंडळींनींहि प्रसंगीं मदत केली आहे. ज्यांनीं ज्यांनीं आम्हांस मदत केली त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोंत.

पुणें येथील भांडारकर प्राच्य विद्यासंशोधन-मंदिरांतील सुप्रसिद्ध क्युरेटर रा. प्र. कृ. गोडे, एम्. ए., यांनीं या कामीं आम्हांस वारंवार मार्गदर्शन केलें असून त्यांचा 'The Origin and Antiquity of Karhada Brahmins' हा विद्वत्तापूर्ण निबंध या इतिहासांत छापावयास दिला याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. आमचे संस्कृत विषयाचे प्राध्यापक प्रो. गोरे एन्.ए. यांनींहि वारंवार सूचना केल्याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहों. पुणें येथील भा. इ. सं. मंडळानें या इतिहासाचा त्यांच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत स्वीकार केला याबद्दल आम्ही सदरील संस्थेचे चिटणीस रा. चिं. ग. कर्वे यांचे आभारी आहोंत.

आमचे चुलत सासरे ती. रा. रा. सदाशिव रामचंद्र सरदेसाई यांनीं आपुलकीच्या भावनेनें या युद्धयमान परिस्थितींत सुद्धां शक्य तों लवकर या इतिहासाच्या छपाईचें काम व्यवस्थित पार पाडलें याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोंत. त्याचप्रमाणें छपाई चालू असतां प्रुफांची तपासणी बरोबर होते कीं नाहीं हें प्रेसचे मॅनेजर रा. एम्. एस्. बोकील यांनीं बारकाईनें लक्ष घालून पाहिलें, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

अक्षय्य तृतीया,
श. १८६६.
इ. स. १९४४
२५ एप्रिल, पंढरपूर.

आपला कुलबंधु

विठ्ठल त्र्यंबक गुणे

इतिहास वाचण्यापूर्वीं

प्रथम खंडाविषयीं—

या खंडांत गुण्ये घराण्यांतील खासगत कागदपत्रें, सनदा, वगैरे; आणि ऐतिहासिक पुस्तकांतील गुण्ये व्यक्तींचे उल्लेख, ही माहिती दिली आहे. या घराण्यांतील मंडळींच्या खासगी दप्तरांशिवाय अन्य दप्तरांतूनहि या घराण्याविषयीं माहिती देणारे कागद उपलब्ध झाले. बहुतेक सर्व कागद मुळांत मोडीमध्यें लिहिले आहेत. बालबोधींत नकला करतांना समजण्यास सोपें जावें म्हणून कांहीं ठिकाणीं विरामचिन्हें दिलीं आहेत. मूळांत तीं नाहींत. प्रत्येक नकलेस स्वतंत्र लेखांक दिला आहे व लेखांकाचा क्रम शक्यतों कालक्रमानें लावला आहे. प्रत्येक कागदाच्या माथ्यावर डाव्या बाजूस तो कोठें मिळाला त्याचा जाड्या अक्षरांत उल्लेख केला आहे. खासगी दप्तरांत मिळाला असल्यास दप्तराचा उल्लेख केला आहे, व व्यक्तींकडून मिळाला असल्यास त्या व्यक्तीचा उल्लेख केला आहे. तसेंच त्या कागदांत ज्या प्रमुख गुण्ये व्यक्तीचा उल्लेख आला असेल तिच्या नांवाचा उल्लेख, वरील दप्तराच्या उल्लेखाच्या खालच्या बाजूस जाड अक्षरांत, (त्या व्यक्तीचा दुसऱ्या खंडांतील वंशावळीचा नंबर व तींतील त्या व्यक्तीचा क्रमांक व पुढें कंसाबाहेर त्या व्यक्तीच्या शाखेच्या गांवाचें नांव यांसह) उल्लेख केला आहे. यामुळें त्या लेखांकाचा दुसऱ्या खंडाशीं काय संबंध आहे याची बरोबर कल्पना येईल. याशिवाय प्रत्येक लेखांकाच्या प्रारंभीं मोठ्या टाइपांत चौकटी कंसांत त्याचें इतिहासांत महत्त्व काय आहे तें दिलें आहे. बऱ्याच ठिकाणीं तळटीपांतून ऐतिहासिक संशोधनाच्या दृष्टीनें चर्चा केली आहे. कांहीं महत्त्वाच्या लेखांकांचा इंग्रेजींत थोडक्यांत तात्पर्यार्थहि पण दिला आहे.

या प्रथम खंडांतील लेखांकांची वर्गवारी दप्तरानुक्रमानें पुढीलप्रमाणें करतां येईल.

चांफेट-दप्तर नं. १:—या दप्तरांतील एकूण ९ कागद छापले आहेत. ते, चांफेट शाखेपैकीं वडील व धाकट्या घराण्यांत इ. स. च्या अठराव्या शतकांत वतनासंबंधीं सुमारें ७० वर्षें वाद चालू होता त्याविषयीं व पुनसेच्या खोतीवतनासंबंधीं आहेत. या कागदावरून या शाखेची सुमारें चारशें वर्षांची जुनी

माहिती मिळूं शकते. त्यांत कांहीं कागद घरवांटणीविषयींहि आहेत. लेखांक नं. २४, २८, २९, ३०, ३१, ३२, ३४, ७७, ७८ हे सर्व कागद चांफेटच्या रा. सीताराम गोपाळ गुण्यांकडून मिळाले.

चांफेट दप्तर नं. २:—चांफेटचे वाो. केशवभट गुण्यांकडे हे कागद मिळाले. लेखांक नं. १ व ८० ह्यांत ले. नं. ८० महत्त्वाचा आहे.

मठ-दप्तर:—या दप्तरांतील सुमारें २७ कागद छापले आहेत. हे सर्व कागद प्रामुख्यानें मठगांवचे गुण्ये व हळबे यांच्यामध्यें अठराव्या शतकाच्या मध्यांत सुमारें ३०-४० वर्षें खोती व वतनासंबंधीं झालेल्या वादाविषयीं आहेत. शिवाय त्यांत कांहीं खासगत वांटणीपत्रेंहि पण आलीं आहेत. याशिवाय कांहीं कागद गुण्ये विरुद्ध हळबे व डोंगरे यांच्यामधील वादाविषयीं आहेत. या सर्व कागदांवरून या शाखेविषयीं विजयनगरचा तळकोंकणांत अंमल होता त्यावेळेपासूनची माहिती उपलब्ध झाली आहे. सुमारें साडेचारशें पांचशें वर्षांची माहिती मिळूं शकते. ह सर्व कागद मठच्या रा. अंताजी केशव गुण्यांकडून मिळाले. लेखांक नं. ११, १२, १७, १८, २७, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५५, ६३, ६४, ६५, ६८, ९९, १००.

आश्वी-दप्तर:—हे सर्व कागद आश्वीशाखेसंबंधीं आहेत व त्यांत एकूण १४ कागदांचा अन्तर्भाव होतो. त्यांत कांहीं खाजगी वांटणीपत्रेंहि पण आहेत. या कागदांवरून या शाखेंतील गुण्यांच्याकडे सरदार कानड्यांच्याकडील श्रीमंत पेशव्यांच्या पागेची फडणिशी होती असें दिसतें. या शाखेंतील निरनिराळ्या मंडळींकडून ते मिळाले. लेखांक नं. ६६, ७३, ७६, ८१, ८७, ८८, ८९, ९०, ९१, ९२, ९३, ९४, ९५, ९६.

संकीर्ण कागदपत्रें:—यांत एकूण १३ कागदांचा अन्तर्भाव होतो. हे सर्व कागद निरनिराळ्या शाखेंतील गुण्यांच्यासंबंधीं आहेत. सनदा, कैफियती, फेरिस्ते, पत्रें, अशा स्वरूपाचे ते आहेत. ह्यांतील कांहीं कागद ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहेत. उदा. ले. ७९ व ८२ पहा. लेखांक नं. ४, ५, ७१, ७२, ७९, ८२, ८४, ८५, ८६, ९७, ९८, १०२, १०३.

गुण्ये व्यक्तींच्याकडून मिळालेल्या कागदांची वर्गवारी संपली. पुढें देत असलेलीं कागदपत्रें इतर संग्रहांतून मिळालीं आहेत.

वैद्य-संग्रहः—वाईकर वैद्यांचें घराणें हें इतिहासप्रसिद्ध घराण्यांपैकीं एक आहे. सदरील वैद्यांचे दिवाण रामचंद्रपंत करकरे म्हणून होते. त्यांचा व आश्वी शाखेंतील गुण्यांचा कांहींतरी संबंध होता असें दिसतें. यांत एकंदर १३ कागदांचा अन्तर्भाव होतो. ते सर्व आश्वीशाखेंतील गुण्यांसंबंधीं आहेत. लेखांक नं. १३, १४, १५, १६, २१, २२, २३, २५, २६ ५४, ५७, ५९, ६०. या वैद्य घराण्याचें बरेंच मोठें दप्तर सदरील वैद्यांचे वंशज रा. रा. शंकरराव लक्ष्मण वैद्य मुा पुणें यांच्याकडे पुण्यास आहे. त्यांना इतिहास-संशोधनाची अतिशय आवड असून सांप्रत ते आपल्या घराण्याचा इतिहास व सदरील दप्तरांतील ऐतिहासिक कागदपत्रें छापींत आहेत. त्यांच्याकडून हे कागद आम्हांस मिळाले, त्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत.

पुणें येथील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या दप्तरांतून या घराण्यासंबंधीं सुमारें ९ कागद मिळाले. या कागदांत लेखांक नं. ८३ मधील कालें येथील इतिहासप्रसिद्ध गुण्ये घराण्याची कैफियत अतिशयच महत्त्वाची आहे. हे बहुतेक सर्व कागद कालें–कऱ्हाड शाखेविषयीं आहेत. लेखांक नं. ६, १९, ५१, ५२, ५३, ५६, ५८, ८३, १०१. त्याचप्रमाणें पुणें येथील डेक्कन कॉलेजांतील दप्तरांत कालें-कऱ्हाड शाखेसंबधीं लेखांक नं. १११ व ११२ हे दोन महत्त्वाचे कागद मिळाले. त्यावरून पेशव्यांच्या वर्तानें नागपूर दरबारांत वकील असलेल्या सदाशिव राम गुण्यांच्या योग्यतेची बरोबर कल्पना येते. सदरील लेखांकांतच सदाशिवपंतांच्या स्त्रीनें सहगमन केल्याचा उल्लेख आहे. ही गोष्ट या कुलांतील स्त्रियांस खचित भूषणावह आहे! याशिवाय पुण्यास असलेल्या एलिनेशन आफिसमधील पेशवेदप्तरांतून लेखांक नं. १०४ ते ११९ च्या नकला घेतल्या आहेत. हे बहुतेक कागद सरदार कानडयांच्या पागेसंबंधीं आहेत. त्यांतून आश्वीशाखेंतील गुण्यांसंबंधीं बरीच माहिती उपलब्ध झाली आहे. याशिवाय आजपर्यंत छापलेल्या ऐतिहासिक पुस्तकांतील गुण्ये व्यक्तींचे उल्लेख पुढील १६ लेखांकांत दिले आहेत. लेखांक नं. २, ३, ७, ८, ९, १०, २०, ३३, ३५, ६१, ६२, ६७, ६९, ७०, ७४, ७५ हे महत्त्वाचे आहेत.

सर्व असल कागद त्या त्या संग्रहांत त्या त्या व्यक्तींकडे आहेत. आम्हीं फक्त नकला घेतल्या आहेत. आम्हांस कागदपत्रें नकला करून घेण्यास दिल्या-

बद्दल आम्ही त्या त्या व्यक्तींचे व संस्थांचे आभारी आहोंत. अशा प्रकारें प्रथम खंडांतील ११९ लेखांकांची वर्गवारी संपली.

द्वितीयखंडाविषयीं:—या दुसऱ्या खंडांत एकंदर १० प्रकरणें व ३ परिशिष्टें आलीं आहेत. या खंडांत या घराण्यांतील निरनिराळ्या प्रमुख पांच शाखांच्या सुमारें गेल्या १३ पिढ्यांच्या वंशावळी व त्यांतील व्यक्तींची माहिती दिली आहे. या खंडांतील बहुतेक सर्व माहिती खंड १ मधील लेखांकावर आधारलेली आहे. निरनिराळ्या प्रकरणांचा गोषवारा याप्रमाणें.

प्रकरण पहिलें:—यामध्यें या कार्याचें एकंदर प्रयोजन काय याची सविस्तर चर्चा केली असून कुलवृत्तान्तांची आवश्यकता कितपत आहे हें सविस्तर लिहिलें आहे. **प्रकरण दोनमध्यें** या घराण्यांतील कुलदेवता व कुलधर्म आणि कुलाचार यांच्याविषयीं साग्र चर्चा केली आहे. प्रत्येक कुलाचाराचे तिथि अनुक्रमानें सविस्तर वर्णन केलें आहे. **प्रकरण ३ मध्यें** वंशविस्तार, कोंकणांतील मूळगांव आणि या खंडांतील वंशावळीसंबंधीं वाचकांच्या दृष्टीनें आवश्यक तें स्पष्टीकरण या तीन गोष्टींची माहिती दिली आहे. गेल्या ४ शतकांतील वंशविस्तार पाहूं जातां या घराण्याच्या स्वतंत्र अशा पांच शाखा कराव्या लागतात. (१) मठ-शाखा. (२) चांफेट-शाखा. (३) आडिवरें–राजवाडी-शाखा. (४) सासवड–पुणें–पन्ना–शाखा. (५) शिरगांव-इंदूर–शाखा. या सर्वांत चांफेट शाखेचा विस्तार फारच मोठा झाला आहे व तिच्या पुनः कालें-कऱ्हाड, आश्वी इत्यादि उपशाखा झाल्या आहेत. मठ शाखेच्या व आडिवरें शाखेच्याहि पण पुनः ग्वाल्हेर वगैरे उपशाखा झाल्या आहेत. हीं शाखांचीं नांवें गांववार जसजशी वस्ती झाली त्यावरून दिलीं आहेत. पृष्ठ २३२ व २३३ वरील वस्तीच्या नकाशावरून आपण मूळचे कोणत्या शाखेचे आहोंत हें समजेल. चांफेट व मठ या दोन शाखांच्या विस्तारानें या घराण्याच्या लोकसंख्येच्या तीन-चतुर्थांशापेक्षां अधिक लोकसंख्या व्यापली आहे. चांफेट शाखा मठची उपशाखा आहे असें दिसतें. सर्व गुण्ये मूळचे रत्नागिरी जिल्ह्यांतील व विशेषतः रत्नागिरी तालुक्यांतील राहणार आहेत. कोंकणांतील मूळ गांवाविषयीं या प्रकरणांत बरीच चर्चा केली आहे. या दुसऱ्या खंडांतील वंशावळी व वृत्तांत-प्रकरणें वाचण्यापूर्वी पृ. २३१ वरील माहिती अवश्य वाचावी म्हणजे एकंदर लिखाण वाचणें सोपें जाईल. **प्रकरण**

४ मध्यें मठशाखेचा गेल्या १३ पिढ्यांचा वृत्तांत दिला आहे. त्यांत वंशावळीसंबंधीं प्रथम कांहीं संशोधन दृष्टीनें आवश्यक ती चर्चा केली आहे. नंतर शक्य तोंवर प्रत्येक वंशावळींत खंड एकमधील लेखांकाचे आधार दिले आहेत. छापण्याच्या सोईकरितां म्हणून एकाच मुख्य वंशावळीच्या ११ उपवंशावळी केल्या आहेत. पुढें वंशावळी-अनुक्रमानें व्यक्तींची माहिती दिली आहे. विद्यमान व्यक्तीच्या मागें * हें चिन्ह घातलें आहे. **प्रकरण ५ मध्यें** चारप्रमाणेंच चांफेट शाखेचा वृत्तांत दिला आहे. **प्रकरण ६ मध्यें** राहिलेल्या तीन शाखांच्या वंशावळी व वृत्तांत, ' संकीर्ण ' या शीर्षकाखालीं दिलीं आहेत. **प्रकरण ७ मध्यें** या घराण्याविषयीं सामाजिकदृष्ट्या सविस्तर चर्चा केली आहे. या घराण्याची एकंदर लोकसंख्या अर्थात् विद्यमान मुलें व पुरुषव्यक्ति २०० आहे; व ती ५५ ठिकाणीं विभागली आहे. एकंदर कुटुंबें ५५ आहेत. या प्रकरणांतील या घराण्यांतील शिक्षण, वयोमान, उद्योगधंदे इत्यादींविषयींची चर्चा उपयुक्त ठरेल असें वाटतें. यानंतर **प्रकरण ८ मध्यें** सुमारें १८ ऐतिहासिक व्यक्तींचीं प्रथम खंडांतील लेखांकांच्या आधारें सविस्तर चरित्रें दिलीं आहेत. **प्रकरण ९ मध्यें** दोन्ही खंडांतील या घराण्याविषयींच्या माहितीचा थोडक्यांत उपसंहार करून घराण्याची एकंदर प्रगति कोणत्या प्रकारची आहे हें दाखविलें आहे. यानंतर शेवटच्या **दहाव्या प्रकरणामध्यें** गेल्या चारशें वर्षांत होऊन गेलेल्या व विद्यमान् व्यक्तींची नं. १ ची एक मोठी सूचि दिली आहे. तीवरून प्रत्येक वाचकास आपली माहिती सहज मिळूं शकेल. याशिवाय नं. २ ची ऐतिहासिक व्यक्तींची सूचि व नं. ३ ची कुटुंब-सूचि याहि उपयुक्त ठरतील असें वाटतें.

यानंतर या खंड दोनच्या अखेरीस ३ परिशिष्टें दिलीं आहेत. परिशिष्ट नं. १ मध्यें तीन सूच्या दिल्या आहेत. त्यांतील सूचि नं. ३ ची विषयसूचि या इतिहासाच्या वाचनाच्या दृष्टीनें उपयुक्त होईल. ती पुणें येथील भा. इ. सं. मं.तील संशोधक रा. शं. ना. जोशी यांनीं तयार करून दिली आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. तसेच परिशिष्ट नं. २ मधील कऱ्हाड्यांच्या प्रांतवार वस्तीची माहितीहि उपयुक्त होईल असें वाटतें. याशिवाय परिशिष्ट नं. ३ मधील पुणें येथील भाडारकर संशोधन-मंदिरांतील सुविख्यात संशोधक रा. प्र. कृं. गोडे यांचा ' कऱ्हाडे ' या नांवाच्या पुरातनत्वाबद्दलचा इंग्रजींतील निबंध या जातीच्या इतिहासाच्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त ठरेल असें वाटतें.

अनुक्रमणिका

गुण्ये(णे)घराण्याचा इतिहास प्रथम खंड


(ऐतिहासिक कागदपत्रें वगैरे)

गुण्ये(णे) घराण्याचा इतिहास द्वितीय खंड (कुलवृत्तान्त)

गुण्ये(णे) घराण्याचा इतिहास

खंड पहिला व दुसरा

श्री अंबाबाई (कुलदेवता)



कोल्हापूर

[कऱ्हाडे ब्राह्मणांच्या इतिहासाचीं साधनें]

॥ श्रीलक्ष्मी-पल्लीनाथ प्रसन्न ॥

गुण्ये(णे) घराण्याचा इतिहास

प्रथम खंड (साधन विभाग)

(ऐतिहासिक कागदपत्रें वगैरे)

लेखांक १

[चांफेट शाखेचे मूळ पुरुष केशवभट्ट गुण्ये यांचे नातू विठ्ठलभट हरभट गुण्ये यांना चांफेट गांवीं १०० लारींची जमीन, विशाळगडकर प्रतिनिधींकडून इनाम मिळाल्याची सनद. ही जमीन अद्याप चांफेट येथील गुण्यांच्याकडे चालते आहे.]

श्री नकल

चांफेट दप्तर नं. २. *इ. स. १७०२ मार्च ९

विठ्ठलभट हरभट (१-५) शक १६२३ फाल्गुन व॥ ७

राजश्री गोविंद पुरुषोत्तम देशाधिकारी व लेखकवर्तमान व भावी प्रांत गोसावी यासि.

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक परशराम त्र्यम्बक प्रतिनिधि नमस्कार सुरु इसन्ने मया व अलफ वेदमूर्ति विठलभट बिन हरभट गुणीये

* या सनदेची तारीख लेखांक २ च्या तारखेवरून निश्चित केली आहे. एप्रिल १८९० इ. स. मध्यें हीच सनद इंग्रजसरकारकडून त्यांच्या पद्धतीनुसार मिळाली आहे.

गोत्र अत्र सूत्र आश्वलायन वस्ति मौजे चांफेट ताा पांवस प्रांत राजापूर हे बहुत भले योग्य सिद्ध सत्पात्र स्नानसंध्यादिक सत्कर्मे आचरोन या राज्याचे कल्याण इच्छिताहेत यांचे चालविणे हे अगत्य या करितां मौा **चांफेट** ताा **पांवस** प्रांत **राजापूर** येथे नूतन इनाम वृत्ति भूमि + + दाभोली लारी

५० कीर्दीपैकीं बागाईत व जिराईत पैकी जमीन
५० पडपैकी जमीन
१००

एकून पनास लारी कीर्दीपैकी व पडपैकी ५० लारी एकूण एकसे लारी वृत्ति दिल्ही असे तरी राजश्री **आणाजी दत्तो** यांचे कारकीर्दीस जमिनीस धारा व गलियास निर्ख आहे. त्याप्रमाणें नेमून देऊन यांस व यांचे पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जाणे. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रत लिहून असलपत्र भोगवटीयाबद्दल भटगोसावी यांस परतोन देणे जाणिजे छ २३ सवाल समक्ष मोर्तब असे.

बार सुरु प्रवार

छ २३ सफर सन सलास मया व अलफ

लेखांक २

*पंतप्रतिनिधींची बखर पान ७३

इ. स. १७०२ मार्च ९
श. १६२३ फा. व. ७

वेदमूर्ति विठ्ठलभट बिन हरभट गुणे मौजे चांफेट यांस शंभर कुरीची जमीन चांफेट गांवी पुत्रपौत्रादि दिली ती चंद्र २० सवालची आहे. त्या शिक्यांत आहे " आदिपुरुष श्री राजा शाहूछत्रपति स्वामी कृपानिधि तस्य परशराम त्रिंबक प्रतिनिधि."

* लेखांक नं. १ मधील सनदेचा ले. २ हा प्रतिनिधींच्या बखरींतील उल्लेख आहे. ले. नं. २ च्या साह्यानें ले. नं. १ ची तारीख ठरवितां येते.

लेखांक ३

हरि बल्लाळ (१३–६) चांफेट
बाळाजीपंत (१–१५) चांफेट

"रामदास व रामदासी"–
शक १८५३ भाद्रपद अंक १३६.

या अंकांत 'इस्लामपूरठाण्याची वहिवाट टिप्पण ७ वें' या प्रकरणांत (पा. ५९) शके १५९२ पासून शके १७३४ पर्यंतची इस्लामपूरठाण्याची वहिवाट कोणीं केली यासंबंधीं माहिती दिली आहे त्यांत श. १६४२ (इ. स. १७२०) ते श. १६७९ पर्यंत शाहूच्या कारकीर्दीतील माहिती दिली आहे ती पुढीलप्रमाणें:—

"शके १६४२ श्रीमंत **शाहू** महाराज याणी मानसपुत्र म्हणून **कुसाजी भोसले** यासी वालवे व **इसलामपूर** सरंजामास दिल्हे. याकामी कुसाजी भोसले नामे इसलामपूरची मामलत सांगून मामलेदार याजकडून यवज नेमणूक भोसलेकडे खर्चास देवीत आले. त्याची वहिवाट ठाणे मारी **राघोनारायण** व **महारुद्र महादेव देशपांडे विसलापुरी** घरे करून राहिले येकूण साले सुार कारकीर्द मामलेदार;

'*प्रथम **हरिबल्लाल गुणे** कालेकर यांनीं मामलत केली खंड सात हजारावर केली कारभार **बालाजीपंत गुणे** व **आपाजाव कशालकर** मामलत ठराव हुजुर सातारा.'

लेखांक ४

[कालें शाखेंतील बाळाजी जनार्दन गुणे यांच्या पूर्वजांनीं संपादलेल्या मौजे रीळें येथील कुलकर्णीपणाच्या वतनाचाउल्लेख त्र्यं. येथील लेखांतून वारंवार आला असल्यानें ही सनद येथें देत आहें. आज हें वतन या शाखेंतील गुण्यांकडे नाहीं.]

---

* प्रथम म्हणजे शाहूच्या अंमलाखालीं गांव आल्यावर; म्हणजे इ. स. १७२० पासून पहिलीं ८ वर्षें; म्हणजे १७२८ पर्यंत असा मासिकांत उल्लेख आहे.

कऱ्हाडचें दप्तर
बाळाजी जनार्दन (१–१५)

श्री

तां. २१।४।१७४२
श. १६६४ चैत्र वा। १३

श्री
वर्धिष्णुर्विक्रमै
र्विष्णोः सा मूर्तिरिव
वामनी शंभुसुनो
रसौ मुद्रा शिवरा
जस्य राजते
—अष्टकोनी

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६८ दुंदुभीनाम संवत्सरे चैत्र बाहुल त्रयोदसी सौम्यवासर क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी **खंडो रायाजी** व **बालाजी जनार्दन उपनाम गुणे** गोत्र अत्री सूत्र

०श्री◡
राजा शाहू नरप
ति हर्षनिधान बा
ळाजी बाजीराव
मुख्य प्रधान
० ० ०
—गोल

०श्री◡
आई आदि पुरु
ष श्रीराजा शाहु छत्रप
ति स्वामी कृपानिधि त
स्य श्रीनिवास परशु
राम प्रतिनिधि
—अष्टकोनी

अस्वलायेन कुलकर्णी मौजे **सिराळे खुर्द** व मौजे **रिळे** ता। सीराळे प्रांत मलकापूर यासीं दिल्हे वतनपत्र येसीजे तुम्ही **शाहूनगर** नजीक किल्ले सातारा एथील मुक्कामीं येऊन स्वामीसन्निध विनंती केली कीं हर्दू गावींचे कुलकर्ण पुरातन वतन आपलें आहे त्यास आवंतरा मुळें कांहीं दिवस पोट भरावयास गेलो व धामधुमीकारितां गांवही बेचिराख होतें महाराजाही **कऱ्हाड** वगैरे जागा मोगलाई ठाणीं तीं उटऊन मुलकास कौल देऊन वसाहत केली ते समयीं आपण आलों ता। मार देशमूख देशपांडीयांची भेटी घेतली वतनावर येऊन दोही गावचें कुलकर्ण आनभवूं लागलों त्याउपरि राजश्री **येसाजी भोसले** आपले जिल्हेत आले कसबा सिराळे येथील

ठाणीं यांत मुक्काम केला ते समयीं सन इहीदे आरबैन मया आलफ रौद्र संवत्सरी आपणास तलब करून नेऊन पुरसीस केली जे तुमचा वतनावरील भोगवटा राहिला असतां दरम्यानें वतन काये म्हणून अनुभविता त्यावरून आवंतरामुळें गेलो होतो ते मुलकास कौल झालीयावरी देशमूख देशपांडीयांस पुसोन वतनावर आलों हे सदरहूप्रमाणें वर्तमान निवेदन केलें त्याचा दाखला मनास आणावा याजकरितां त्याहीं ता मार चे देशमूख देशपांडे व हर्दू गावींचे मोकदम व चौगुले व रयेत व बारा बळीते व भोंवर गावींचे मोकदम कुलकर्णी आणवून तहकीकात केली वतनदार खरे जालो त्यावरून त्यानीं आपलीं पत्रें करून दिलीं आहेत ही महाराजा हीं मनास आणून भोगवटीयास पत्रें करून देऊन वतन वंशपरंपरेनें चालविलें पाहिजे म्हणोन विदीत केलें आणि मारनिलेची पत्रें आणून दाखविलीं तीं मनास आणितां गोहीसाक्षीनसीं तुम्हीं वतनदार खरे जाला त्यावरून त्यानीं तुम्हांस पत्रें करून दिल्हीं आहेत याजकरितां स्वामी तुम्हांवरी कृपाळू होऊन सदरहू दोही गावचें कुलकर्ण तुमचे तुमच्या दुमाला केले असे तरी कुलकर्णाचा हकलाजिमा कानुकायदा इनाम सुदामत असेल तो घेऊन दंडकप्रमाणें वतनाची सेवा करून तुम्हीं आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें वतन अनुभवून सुखरूप रहाणें जाणीजे* लेखनालंकार मर्या

रुजुसुरु संमत सा संमत देयंरा

नीविस सुमंत मंत्री सरकार जते

वार सुद सुरुवार बार वार बार —षट्कोनी

लेखांक ५

राजाराम वासुदेव गुण्ये, कुर्णे.

अनंतभट (१–६) मठ श्री नकल इ. स. २४–१२–१७४३

जनार्दन भट (१–७),, श. १६७४ पौष शुा ९

आज्ञापत्र समस्त राजकार्य धरंधर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री, श्रीनिवास परशराम पंडित प्रतिनिधि ता कमाविसदार मौजे असोडे ता

---

* येथून अक्षर वेगळ्या वळणाचें.

हातखंबे प्रा राजापूर सुरु सलास आबैन मया व अल्लफ वेदमूर्ति राजेश्री **अनंतभट व जनार्दनभट बिन कृष्णंभट** उपनाम **गुण्ये** गोत्र अत्रि (सूत्र) आश्वलायन वास्तव्य मौजे मजकूर यांनीं **साताऱ्याचे** मुक्कामीं येऊन विदीत केले कीं आपण कुटुंब वत्सल याकरितां पूर्वि **महाराज श्रीछत्रपति थोरले कैलासवासी याणी वर्षासन तांदूळ** देविले ते सांप्रत चालत नाहींत तरी स्वामिनीं कृपालु होऊन काहीं पड जमीन देविलीया उपभोग करोन स्नान संध्या करुन राज्यास कल्याण चिंतून राहूं म्हणोन विनंति केली त्याजवरुन मनास आणिता हे ब्राह्मण थोरे सत्पात्र यांचे चालविल्यानें श्रेयस्कर जाणोन मौजे मजकुरी पडजमीन बिघे २ दोन ठिकाण सायलीची मळी लेहून दिल्हे असे तरी चतुःसीमापूर्वक वेदमूर्तींचे दुमाला करुन यासी व यांचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेने सदरहू दोन बिघे जमीन इनाम चालविणे प्रतिवर्षी पुरातन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रत लेहून घेऊन असल पत्र भोगवटीयासी याजवळ परतोन देणे छ. ७ जिल्काद निर्देश समक्ष.

लेखांक ६

[कालें शाखेचे मूळ पुरुष बाळाजी जनार्दन गुणे यांना मौजे हिरहली या गांवचा सरदेशमुखी व मोकाशाचा अंमल मिळाल्या-बद्दल सनद.]

भा. इ. सं. मंडळ, पुणें **श्रीराम नकल**
बाळाजी जनार्दन (१-१५) चांफेट

श. १६६७ ज्यो शुा ९
इ. स. २८।५।१७४५
श. १६६८ ज्यो शुा ८
इ. स. १७।५।१७४६

माा अनाम देशमूख व देशपांडे पोा **अलंद** गोसावी यासी

छ श्री **नारो राम मंत्री** सुमा सीत आर्बैन मया व अलफ मौजे **हिरहली** पाा माार येथील मोकासा व सरदेशमुखी जकात सुधा आमल नूतन इनाम करुन दिल्हा असे राजश्री **बाळाजी जनार्दन गुणे** याणी सेवा येकनिष्टेने केली यांचे चालविणे आवश्यक जाणौन सदरहू आमल मौजे

मार येथील मोकासा व सरदेशमुखी जकात सुधा आमल मा
निल्हेस इनाम दिल्हा असे तरी यासी व याचे पुत्र पौत्रादि
वंशपरंपरेने चालविणे या असल पत्राचि नकल करून घेउन
हे पत्र भोगवटीयास परतोन देणे दरसाल नवीन पत्राचा
आक्षेप न करणे जाणिजे छ ७ माहे जावल मोर्तब असे.

(सिका)

बार

लेखांक ७

आश्वी येथील पागेचा उल्लेख–राजवाडे खंड २
—*पेशव्यांची शकावली–पान १०५ इ. स. १७४८ मार्च २१

" पागा मुक्काम कवडी येथें नवा बाण स्थापन केला छ २ रबिलाखर (२१ मार्च १७४८) खासा स्वारी देहेर व खांदेशपर्यंत गेली तो नासरजंग व कारभारी रामदासपंत चालून आले व लढाई झाली. नंतर **अशी उंबरीवर** फाल्गुन मासी (मार्च १७४८) तह होऊन पुढें हिंदुस्थानांत गेले. "

लेखांक ८

[कालें शाखेपैकीं, बाळाजी जनार्दन व त्यांचे पुत्र हे मन्त्र्यांचे दिवाण असल्याचा उल्लेख.]

रामाजी बलाल (१३–१) चांफेट
धोंडो बल्लाळ (१३–३) ,,

शाहू महाराजांची रोजनिशी
राजकीय (ब) इतर माहिती–ले० वाड
पान ६६

" १४६।७ मंत्री यांचे दिंमतीचे व फडणिशीचे व मुतालकीचे वगैरे
इतर लोक होते ते...

---

* राजवाडे खंड २ पान १०५ वर पेशव्यांची शकावली या प्रकरणांत हा मजकूर आला आहे.

मुतालिकः—१ विट्ठल कानो, १ बाळाजी जनार्दन, १ रामाजी बलाल, १ धोंडो बल्लाळ, १ फडणीस बहिरो रघुनाथ

146—The information under this head is taken not from the diaries but from a memo prepared and kept in the records of Satara Raja.

[A piece from the diary of Shahu, gives the names of Fadanavis and Mutaliks at the court of the Mantris Balaji Janardhan and his sons Ramaji and Dhondo Balal are referred as the Mutaliks of Mantri.]"

लेखांक ९

शाहू महाराजांची रोजनिशी (पान ६८)

राजकीय (ब) इतर माहिती

"१४७ पेशजी **नारोराम मंत्री** होते ते मृत्यू पावले* हल्लीं त्यांचे पुत्र **घनश्याम नारायण मंत्री** यासी वेतनाचे ऐवजीं मुकासे पत्रे फडनिशी....

पान ६९

रामाजी बलाल यासी पेशजी सरंजाम होता तो दूर करुन हल्ली त्यांचे बंधू **धोंडो बलाल** मुतालीक पंत मंत्री यांस वेतनात मुकासे दिले असत श्रावण शु. ५ सौम्यवार, १ मौजे आउस गांव परगणे आंबे जोगाई सरकार धारूर १ मौजे **हिरहली** परगणे **आलंद** १ मौजे **वारुड** परगणे **धारुर** संमत मजकूर १ कसबा **भिलवडी** प्रांत **मिरज** जमीन वाण १ एकूण ४"

लेखांक १०

[माधवराव पेशव्यांच्या रोजनिशींतील रामाजी बल्लाल गुणे यांच्या तनख्याचा उल्लेख-दरबार खर्चार्थ १०,००० रु. तनखा होता.]

* नारो राम मंत्री १७५०-५१ मृत्यू पावले व नंतर त्यांचे पुत्र घनःश्याम नारायण मंत्री झाले. रामाजी बलाल गुण्यांची पुण्यास केव्हां नेमणूक झाली तें ह्या माहितीच्या आधारें ठरवितां येईल.

रामाजी बलाल (१३-१) चांफेट.

थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी

पान १३४

" ......सदरहू महाल अमरचित्ता व कडेचूर, खर्चाबद्दल राजश्री जानोजी भोसले सेनासाहेब सुभा यानीं सरकारांत मुत्सद्दी यास दिले, तनखा रुपये

८३७५० परगणे कडेचूर	
३७७५० परगणे अमरचित्ता	
१२२५००	१०००० चिंतो अनंत
तपशील	१०००० रामाजी बलाल*
८३५०० सखारामपंत	७००० गंगाधर यशवंत दिमत होळकर
६०००० खासा	५००० चिंतो विठ्ठल
२३५०० सकरोबा	५००० निळो गोपाल
८३५००	२००० बाळाजी शंकर
	१२२५००

लेखांक ११

[मठ शाखेंतून कुर्णे शाखा निघाली त्या वेळचें वाटणीपत्र. राघो विष्णु गुण्ये कुर्णे शाखेचे मूळ पुरुष होत. प्रथम ते हरचिरींत होते. नंतर कुण्यांस आले. या लेखांकापुढील लेखांक नं. १२, १७ आणि १८ हे वाटणींसंबंधींच आहेत.]

मठ दप्तर	श्री	इ. स. १७५७
कृष्णाजी (१-८); राघोपंत (१-९)		शक १६७९

---

* रामाजी बलाल ' गुणे ' असा उपनांवासह उल्लेख नाहीं. तरीपण थोरले माधवरावांचे कारकीर्दींत सदर ' गुणे ' हेच नागपूर दरबारांत पेशव्यांकडून वकील असल्यानें या मुत्सद्यांच्या यादींत नांव आहे.

यादी भांडी सुरु समान खमसैन मया व अलफ

राजश्री कृष्णाजी पंताकडे

२ परात लहान, थोर

३ तपेली

१ तिसेरे

१ फुटके पाणीचे

१ ......लीचे

३

२ तपेली मापटेची

१ तांबूल

१ कलसा

१ पंचपात्री पितली

१ कासांडी लाहान

२ बहुगुणीं

१ नवे

१ जुने

२

१ काईल

१ देवची

१ ताभनी (ताजानी ?)

१ पितली

२

२ पली

१ लोखांडी

१ पितली

२

राजश्री राघो पंताकडे

१ हांडा

१ तपेले पाइलीचे

१ मुदाले

१ तवली

१ तातली (तेलतवा ?)

१ तांमन (ताजान ?)

२ तपेली मापटेची

१ पली लोखंडी

१ तपेले जयगड पाौ

१ तपेले घरी घेतले

१ बहुगुणें

१ पितली

१ तपेले तिसेरे गुा नारायणभट

१ ताहाणे (ताहोणे ?)

१ तांबूल

२ पंचपात्र

१ तांबेचे

१ पितलचे

२

३ लोखांडी आवते

१ कुदली

१ लागेरे (कटेरी, केंगर ?)

१ समई
१ चाडे समईचे
२ पेस व कुदली
३ कुराड व कोयली लफये

कोलती

१ दुसेरे तपेले
२५

१ ईला
३
२ देवस
१ जाजान ? (ताभन ?)
१ स पुस्ट
२
१ पली पितलेची
२४

लेखांक १२

मठदप्तर

श्री

इ. स. १७५७
श. १६७९

यादी वस्तां सुरु समान

राजश्री कृष्णाजीपंत

८८।०)।।=	प्रा सोने
८८८२।·	काप
	पुतल्या ८
८८८३	कंकण्या
८८८८।।२	राजकांड्या आठमामे (कांड्या)?
८८८१८।·	बाल्या आदतोला जोड २
८८।०)।।=	
	कुडक्या
	विष्णु
	गोपा

राजश्री राघोपंत

८८२।।	गोठ रुपे
८८१।।	प्रा ८
८८१।८	प्रा ८
८८२।।·	
८८३।·	जोडवी रुपे
८८।।	जोडवी
८८१।	साखल्या
८८।।	वाले
८८।।	गोठ ४
८८।।	पटा
८८३।·	

जना

रुपे

॰॰१ प्रा गोठ ८

॰॰१॥ साखल्या

... पटा तोले १०

॰॰५।॥॰

सोने सौ. पारवती

॰॰॰३ कंगल्या !

॰॰॰३ पाटल्या

॰॰२ पुतल्या

॰॰॰॥ बाल्या

॰॰॰१ राजकांड्या

॰॰।३॥ ॰॰।२॥२

॰॰२॥२ सौ. लकासिमी

॰॰॰ काप

पुतल्या ५

॰॰॰।॥ बाल्या मासे ८

॰॰॰२ पाटल्या

॰॰२ पाटी

॰॰॰१ राजकांड्या

॰॰।२॥२

॰॰।१॥ सौ. जानकी

॰॰॰३ काप

॰॰॰४॥ पाटल्या

पुतली १

॰॰।१॥

॰॰१...१॥२

॰॰॰२ आंगठ्या

॰॰१, ३॥=

लेखांक १३

[आश्वी शाखेचे मूळ पुरुष महादेवभट गुण्ये यांचें हें पत्र आहे. पत्रावरून बच्याजी महादेव गुणे व त्यांचे चुलत बंधु चिमणाजी गोविंद कोणत्यातरी स्वारीवरून परत आले असावे असें दिसतें. 'वेण्णेवर मुक्काम झाला' इत्यादि उल्लेखांवरून हें पत्र इ. स. १७५० च्या सुमाराचें असावें असें वाटतें.]

महादेवभट (१-१२)-चांफेट

बाळंभट (५-३)- ,,

बच्याजी महादेव (५-१)- ,, **श्रीगजानन**

वैद्यसंग्रह-पुणें

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री

रामचंद्रपंत करकरे यांसी*

प्रति **महादेवभट गुण्ये** नमस्कार विनंति उपरी येथील क्षेम ता। मार्गसीर्ष वद्य नवमी सुखरूप असो विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले लिहिले वर्तमान कलले. राजश्री चिमणाजीपंत यांचें पत्र पाठविलेत तेहि वर्तमान कलले अशास त्याजकडून मुलाचें नांव-नक्षत्र लिहून आले म्हणजे आम्हाकडे पाठऊन देणें चिरंजीव राजश्री **बच्याजीपंत व चिमणाजीपंत**

---

* रामचंद्र गोपाळ करकरे हे वाईच्या वैद्यांचे दिवाण होते. वाईचे रामभट वैद्य व विश्वनाथभट वैद्य मोठे सावकार व राजकारणी पुरुष होते. महादेव-भटांनीं त्यांच्यापासून १०० रु. कर्ज घेतलें होतें. (ले. २१ पहा.) शाहूचा व त्यांचा बराच निगडित संबंध होता. नागपूरकर भोसल्यांच्या राजकारणाशीं यांचा नेहमीं संबंध असे. महादेवभट गुण्यांचा व करकरे दिवाणांचा कांहींतरी जवळचा संबंध असावा असें या व पुढील लेखांकांवरून दिसतें. महादेवभट गुणे देशावर आल्यावर प्रथम साताऱ्यास राहत असावेत. (ले. ५७ व ५९ पहा.) वाईकर वैद्यांचे वंशज रा. शंकर लक्ष्मण वैद्य हे सध्यां पुण्यास असतात. त्यांच्या जवळच्या ऐतिहासिक कागदपत्रांतून हा कागद व पुढील सर्व 'वैद्य-संग्रह' म्हणून ज्यांवर लिहिलें आहे ते कागद मिळाले.

आजच घरास आलें. श्रीमंतांची फौज आली. वेण्णेवर मुकाम जाहला आहे. चिरंजीव बालास कोंकणात मुलीस आणावयास पाठविला आहे तो उदईक येईल कलावे बहुत काये लिहिणें हे विनंति.

लेखांक १४

[रामचंद्रपंत करकरे वाईच्या वैद्यांचे दिवाण यांना महादेवभट गुण्यांनीं हें पत्र साताऱ्याहून लिहिलें आहे (ले. १३ पहा). महादेवभटांचे पुत्र बच्याजी महादेव गुणे, आश्वीकर गुण्यांचे मूळ पुरुष, यांना वर्षप्रतिपदेस ८-४-१७५८ शनिवारीं पागेचे सर्व अधिकार लाहोरच्या स्वारींत मिळाल्याचा उल्लेख या पत्रांत आहे. बच्याजीपंताचे बंधु लक्ष्मणपंत नागपुरास नौकरीकरितां जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. (ले. १५ पहा.)]

महादेवभट (१-१२)- चांफेट
लक्ष्मण महादेव (५-२) - ,, श्री
बच्याजी महादेव (५-१) - ,, इ. स. १४-७-१७५८
बाळंभट (५-६) - ,, *श. १६८० आषाढ शु॥ ९
वैद्य-संग्रह

---

* या पत्राचें हस्ताक्षर लक्ष्मण महादेव गुण्ये यांचें आहे. त्यांचीं पुढील लेखांक १५, १६ व हा लेखांक १४ हीं स्वतःचीं पत्रें आहेत.

या पत्राची तारीखः— " श्रीमंतांची स्वारी देशास यावयास... श्रावण अखेर... पोहचतों" इत्यादि या पत्रांतील मजकूर "त्रिंबक सिवदेव यांनीं पंत-प्रधानास" पाठविलेल्या पत्रांतील पुढील मजकुराशीं बरोबर जुळतो–पेशवेदप्तर सिलेक्शन नं. २७ पत्र नं. २२७.—" श्रीमंत राजश्री दादास्वामी लाहूरचा बंदोबस्त करून अबदालीस नदिजा देऊन माघारे जयनगर प्रांतास आले... श्रावण अखेर पुणियास पोहोंचावे ऐसा विचार आहे... ". हें पत्र ३।८।१७५८ चें आहे. या पत्राच्या आधारानें वरील महादेवभट गुण्यांच्या पत्राची तारीख निश्चित करतां येते. कारण या पत्रांत " ... बच्याजीपंत नाना यांची लाहूर नजीक लस्कर... पत्रे आली " इत्यादि उल्लेख आहे. [पुढील पानावर चालू

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री

रामचंद्रपंत करकरे यासी

प्रति **महादेवभट गुण्ये** कृतानेक आसीर्वाद विनंति उपरी. येथील कुशल जाणून ता आषाढ शुद्ध नवमी भृगुवासर स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे. विशेष. सांप्रत पत्र येऊन वर्तमान कळत नवते त्यास हाली वेंकाजी बा पत्र पाठविलें संतोष जाहलो येसेच निरंतर पत्र पाठऊन संतोषवींत जाणें. यानंतर येथील वर्तमान. आपले कृपेकरून सर्व सुखरूप आहेत वरकड सविस्तर चिरंजीव **बालंभट** आले आहेत हे मुखजबानी सांगता निवेदन होईल. वहूत काय लिहिणे कृपालोभ असो दिजे हे विनंति

दस्तुरखुद.

वडिलांचे सेवेसी **लक्षुमण माहादेव** दोनी करकमल जोडून सीरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येसीजे. वो राजश्री **वैद्यबावा** पुणीयाहून आले नाहीं म्हणोन लिा त्यास श्रावणा आलिकडे येऊन **नागपुरास** जाणार किंवा दसरा जालियावर जाणार हे सविस्तर लिहून पाठविणें आमचे न गेलियास सर्व गोष्टीचा घात आहे. वैद्यबावा जाणार म्हणोन विस्वासावर समागमे जावयासीं राहिलो त्यास भटजीचे जाणें तों लवकर होता दिसत नाहीं. दिसगतीनें जातील. बरे. रुणानुबंद दुसरे. मातुश्रीस बरे वाटत नवते त्यास आपले कृपेकरून ज्वरमुक्त जाहलो. आरोग्य आहे. चिंता न करणें. तीर्थस्वरूप राजश्री **बच्याजीपंतनाना यांची पत्रें लाहूर नजीक लस्कर वैशाख शुध्ध एकादसीची पत्रे आली होतीं. तेथें लिहिलें कीं श्रीमंतांची स्वारी देशास यावयास स्वार जाहाली आहे. मजल दरमजल श्रावण अखेर पावेतो येऊन पोहचतो म्हणोन लिहिले होते. वर्षप्रतिपदेस**

[मागील पानावरून चालू]

लाहोरच्या स्वारींत बच्याजीपंत गुणे असतांना १८।५।१७५८—वैशाख शुा ११ स त्यांनीं पाठविलेलें पत्र महादेवभटांना मिळाल्यावर आषाढांत हें पत्र महादेवभट आणि लक्ष्मण महादेव या उभयतां पिता-पुत्रांनीं रामचंद्र पंत करकरे यांस लिहिलें आहे. या पत्राची तारीख ले. १५, १६ नीं अधिक निश्चित होते.

श्रीमंतांनीं तीर्थस्वरूपांस आपदागिरी दिल्ही पागेचे कामकारभार कुल येकत्यारी स्वाधीन केली म्हणोन लिहिले होते. आपणांस कळावे म्हणोन लिहिले असे. नागपूरचे जाणीयाचे स्मरण असों द्यावे. वरकड समस्त सुखरूप आहेत. बहुत काय लिहिणे कृपावृधी केली पाा हे विज्ञापना.

सौाा मातुश्री मामीचे चरणावरी मस्तक ठेऊन सीरसांाा नमस्कार लिाा परिसोन लोभ करीत जाणें हे विनंति वाड्यांत समस्त मंडळीस आमचा सांा नमस्कार सांगणें चिरंजीव बालाजीपंत व मनुबाईस आसीर्वाद लिहिले परिसोन लोभ करीत जाणे हे आसीर्वाद.

लेखांक १५

वैद्यसंग्रह पुणें,
महादेवभट (१–१२) चांफेट

श्री

* शनिवार श्रा. वाा८
श. १६८०
इ. स. २६-८-१७५८

राजश्रिया विराजित राजमान्य
(राज) श्री रामचंद्रपंत यांसी,

प्रति महादेवभट गुण्ये कृतानेक वेदोक्त आसीर्वाद विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीयें लिहीत असीले पाहिजे. विशेष. बाजी महंमद या समागमें पत्र पाठविलें पावलें. संतोष जाहाला. वेाा राजश्री

---

* श्रावण वद्य ३ शके १६८० इंदुवासर (२१-८-१७५८) च्या सुमारास विश्वनाथभट वैद्य पुण्याहून वाईस येण्यास निघाले असावे असें दिसतें. श्रावण वद्य ३ शके १६८० (२१-८-१७५८) हा दिवस प्रवासास चांगला म्हणून विश्वनाथभटांना पुण्यास देण्यांत आला होता. (वैद्यसंग्रहांत मुहूर्ताचा अस्सल कागद आहे.) बहुधा ते याच दिवशीं प्रवासास निघाले असावे, व दोनतीन दिवसांत वाईस पोचले असावेत व वाईस दोन तीन दिवस त्यांचा मुक्काम झाला असावा. कारण लेखांक १५ पाहतां वाईहून नागपुरास "द्वादशीस बुधवारीं वऱ्हाडास जावयास निघणार" असा मजकूर आहे. श्रावण वद्य द्वादशी तारीख ३०-८-५८ ला होती. महादेव भटांचे ता. १४-७-१७५८ चें पत्र (लेखांक १४ पहा) व पुढील लेखांक १६ यांचे आधारें ह्या पत्राची तारीख अधिक निश्चित होते. या दृष्टीनें वैद्यसंग्रहांतील वर उल्लेखिलेला मुहूर्त अत्यंत महत्त्वाचा आहे.

वैद्यबावा घरास आले म्हणोन लिा द्वादसीस बुधवारीं **वराडात** जाणार. त्यास चिरंजीव **लक्ष्मणपंतांची** रवानगी करून देणें म्हणोन लिा त्यास उदईक रविवारीं प्रस्तानानं निघतात. मंगलवारीं सायंकाल पावेतों आपल्यापासी येऊन पोहचतील. कलले पाहिजे. वरकड वर्तमान येथास्थित असे बहुत काय लिहिणें कृपालोभ असो दिजे हे विनंति.

*आपत्ये (ल) **क्षुमणाने** दोनी कर जोडून सीर सां नमस्कार विज्ञापना. पत्र पाठविलें पावलें वर्तमान कललें त्यास उदईक सायंकाळीं निघून मंगलवारीं येऊन पोचतो कललें पाहिजे बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

लेखांक १६

[लक्ष्मणपंत गुण्ये, आश्वीकर गुण्यांचे मूळ पुरुष महादेवभट यांचे द्वितीय पुत्र, नागपुरास पोहोंचल्याचें पत्र लिहितात. मागील लेखांक १५ पहा.]

वैद्यसंग्रह पुणें **श्री** **आश्वीन शु. १०।१६८० गुरुवार**
लक्ष्मण महादेव (५-२)-चांफेट **ता. १२।१०।१७५८**

तीर्थस्वरुप राजश्री **रामचंद्र**
पंत मामा वडिलांचे सेवेसी

बालके लक्षुमण **माहादेव** कृतानेक चरणावरी मस्तक ठेऊन सीर सां नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ताा आस्वीन शुध दशमी गुरुवासर मुकाम **नागपूर** जाणोन सुखरुप असो विशेष आपली आज्ञा घेऊन स्वार जाहालो. ते भाद्रपद वद्य त्रयोदसी **गुरुवारी**§ नागपुरास सुखरुप पावलो. आपणास कळावे म्हणोन लिा असे. तीर्थरुपास पत्रे लिहिली आहेत. हे प्रविष्ट करून

---

* येथून पुढील मजकूर पत्राचे मागील बाजूवर आहे. सर्व पत्र लक्ष्मणपंतानें स्वतः लिहिलें असावें. (लेखांक १४ पहा.)

§ भाद्रपद वद्य त्रयोदशीस मोडक जंत्रींत शुक्रवार आहे. या पत्राची तारीख ले. १४, १५ वरून ठरवितां येते.

प (त्राचे) उत्तर आणऊन आम्हांकडे जासुदासमागमे पाठऊन द्यावी आम्ही सुखरुप आहो धंदा रोजगार सोये पाहून करितो. दरबार वोढगस्त फार जाहाले आहे. रसदी रोजगार आहेत. जे घडोन येईल ते खरे. तीर्थरुप अशक्त आहेत परामृश्र करीत असावे येणारा समागमे पत्र पाठऊन संतोषवीत जावे बहुत काये लिहिणे. चिटी तेथून गव पाहोन बरोबर मि-(ले) ल तर हजार दीडपंधरासे पावेतो करणें. येथें सेकडा हुंडणावल रुा दाहा जाहाली आहे. मजकारितां गव बनेल तर करणें आम्हास येथें सोय पाहून चिटी करतो हे विनंति. होा मातुश्री मामी वडिलांचे सेवेसी सां नमस्कार लिा परिसोन लोभ करीत जाणें परात व कासंडी मागाऊन कमलू हाती पाठऊन देतो. कलले पाहिजे हे विनंति. चिरंजीव बाळाजी-पंत व मनुबाई व कासीनाथ यासी आसीर्वाद लिा परिसिजे हे आसीर्वाद.

लेखांक १७

मठदप्तर | श्री असल | ता. ९-५-१७६०

श० १६८२ विक्रमनाम संवत्सरे
वैशाख व. ९

तथिस्वरुप राजश्री कृष्णाजी विष्णु
गुणे दादा वडिलांचे सेवेसी

आपत्ये राघो विष्णु गुणे सा नमस्कार विनंति शके *(१६८२ विक्रमनाम संवत्सरे वैशाख वद्य) नवमी त दिनी लिहून दिल्हे फारीखत ऐसीजे तुम्ही व आम्ही येकत्र होतो त्यास विभक्त जाहालो बंधुपणाचा जोडीचा व कर्जवामाचा विभाग होणें त्या निमित्ये कलह साहा च्यार महिने होत होता त्यावरी तुम्ही व आम्ही राजश्री बापुजीपंत कारखानीस किले विशालगड व राजश्री भिकाजी नाईक सरदेसाई व राजश्री

---

* कंसांत घातलेला मजकूर अस्सल कागदास भोंकें पडल्यानें नकलेवरून घेतला आहे.

बालाजी कृष्ण सरदेशकुळकर्णी ताा **खिलणा** याही पंचाईती ग्रहस्त मौजे **उमरें** येथें मिलाले होते त्याकडे गेला त्यास वर्तमान श्रुत केले त्यावरुन सदरहु पंच्याईत कसबा **हरचिरीस** आमचे घरास आले व आम्ही व तुम्ही आलो येथें जोडीचे व वस्तभाव थाली टावके व गुरे ढोरे कर्जबाम होते त्याची यादी लिहोन या विभागवंत करुन दिलेत (त्याची याद)* तुम्हापासी व आम्हापासी पंच्याईतांनीं दिली आहे त्याप्रमाणें आम्ही घेऊन समजालो **कुलबांनीं बनाम गुणी** व तिच्या पोरग्या २ दोन व पोरगे ३ तीन आहेत त्यापैकी आम्ही तुम्हास पोरगी **बनाम चिमणी** उमर वर्षे बारा व पोरगा **बनाम सोमा** साडे तीन वर्षेचा. येकूण दोन दागीने आम्ही

(मागील बाजू)

घेतले आहेत. सदरहू खेरीज मौजे **कुरतेडची** खोती ताा सन तिसा खमसैन साल गुदस्त पर्यंत होती त्यास गांवची बाकी दिवाणची पडेल ती उभयेतानीं द्यावी हे लिहिले सई हे विनंती.

साक्ष

वाा गणेश पाध्ये मोघे
धर्माधिकारी ताा **लांजे**
१

बाळाजी अनंत देशकु
लकर्णी ताा लांजे
१

पत्र प्राा साक्ष **मोरेश्वर**
भट्ट तांबे
१

सोमदे प्रभुदेसाई व आपा
जी गोविंद देशकुळकर्णी
ताा हरचिरी
हरदे प्रभु व गणेश प्रभु

---

* कंसांत घातलेला मजकूर अस्सल कागदास भोंकें पडल्यानें नकलेवरून घेतला आहे.

लेखांक १८

मठ दप्तर   श्री असल   इ. स. १७६०
श. १६८२

यादी देणे वाटप कृष्णाजी विष्णु व राघो विष्णु सुरु ईहिदे सीतैन मयाव अलफ वाटप रुपये १५१५ याचा तपशील

निा कृष्णाजी विष्णु
८०७॥·

√२५१ लग्न खर्च पैकीं
१२१ आलीकडील खुद कर्ज
पोटास
६२॥· सोने राघो विष्णु यो

फाजील

५१ सोने ८८८३८१॥
१२॥ पुतल्या ५ पैकीं
निमे यादर पांच प्राो

६२॥·
९५॥· मोरभट तांबे १९१
पैकीं निमे रोख दिल्हे

५३०
बाकी देणे रुपये
२७७॥·
यासी कर्जदारी नांवनिसी
१२०॥· काजी ईभ्राम खां दरकर
रुा २५० पैकी
२५ विठलसेट गुजर
रुा ५३ पैकी तक्षमे

निा राघो विष्णु
८०७॥·

√२०० कृष्णाजी वामन पैकीं चिठी
माहादेव
१७१॥· गुा नारायेणभट आली
कडील कर्ज पोटास

३७१॥·

बाकी देणे रुाये
४३६
यासी देणे कर्जदारी नावानिशी
९५॥· मोरभट तांबे १९१

९४।· काजी ईभ्राम खोदर
रुा २५० पैकीं
२८ विठ्ठल शेठ गुजर
रुपये ५३ पैकीं

३३ नारोपंत पराडकर
रुपये ६३ पैकी
३॥· नारायण जोशी
१० आंतोजी नाईक
आंबर्डेकर

६२।· तिलसेट मलुष्टे
रुा ६२।· पैकीं तक्षीम
सारेचे ६२।·
३० मारो विठ्ठल पराडकर
(मागील बाजू)
३५।· कित्ता काझी
इभ्राम रुा दोनसेपनास पैकीं
४।।· अंबादास गुजर
२७७।।·

२५।· अंतसेट मलुष्टे
५ राम चेबरडा
२ आबासेट बाल्या
३ कृष्णा माडवकर
·।।· भिका बाष्टा
२ बालसेट सोनार
१ अंतोपाध्ये
७ बालाजी राम खेर
६ गोपाळभट ळळीत
७ आपाभट नवाथे
१५० अनी च्या वस्ता (अनसूया?)
५० पुतल्या सुमार १०
यकूण
१०० रोख
१५०
३ सोमदे प्रभुदेसाई
१।।· कृष्णंभट डोंगरा
१२ शंकरभट तांबे
९ सदासीव जोसी १५।।
पैकी देणे बाकी
४९८।।÷
पैकी ऐवज फाजील सोने
५१ ताले ८८८ ३८१।।·
दर १५।। प्रा
१२।। पुतल्या २।। दर ५ प्रा
६३।।·
बाकी देणे कर्ज रुपये
४३५८÷

गुरे दागिने

निा कृष्णाजि विष्णु

१ पाडा राघा म्हार
मौजे कुरतडे
१ रेडा गांगणपैकी
२ पाडथा
१ घरी १ वेतली
२ गाई
ऐन म्हैसीचे मुा
२ म्हैसी
१ ऐन १ जरड

८

निा राघो विष्णु

१ बैल कुरतडेत
निा बाळाकडसरा पैा
१ पाडा म्हार भुता पैा
१ गाई घरची
२ म्हैसी
१ म्हैस १ रेडी उमेदवार
१ पाडी भुता म्हार फाौ
मौजे कुरड
१ पाडा रामा म्हार हरचेरीकर

७

लेखांक १९

[कालें शाखेपैकीं, सदाशिवराव भाऊ पेशव्यांच्या खासगतीस असलेल्या लक्ष्मण बल्लाळ गुण्यांना ही सनद मिळाली आहे.]

०श्री०

राजा शाहू नर
पति हर्ष निधान
बाळाजी बाजी
राव प्रधान

लक्ष्मण बलाल (१३-२) चांफेट

ता. १५-२-१७६१
श. १६८२ माघ शुा ११

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान ताो मोकदमानीं मौजे काले प्राो कराड सुाा इहिदे सीतेन मया व अलफ मौजे मारचे व मौजे नांदगाव पाो सिराले येथील सिवेचा कजिया आहे यामुळे हरदू गांवचे सिवेमधील जमीन चालीस

पन्नास वर्षे पडली आहे म्हणून हुजुर विदीत जाले त्यावरून त्या जमिनीचे कुरण सरकारांत ठेऊन राजश्री **लक्ष्मण बलाल** यांचे स्वाधीन केले असे तरी तुम्हीं खलेल न करणें जाणिजे* छ ९ रजब आज्ञा प्रमाण* ०श्री लेखन सीमा

लेखांक २०

[आश्वीपागेच्या जवळपासच्या पागांची माहिती.]

थोरले माधवराव–रोजनिशी विभाग २ इ. स. १७६३–६४
प्रकरण १८ वें वेठ पान ३१७

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं

७४१ (१३२) सरकारचे कुरणांतील गवत कापावयासी महाल निहाय बेगारी येऊन सालाबाद गवत कापून उतरुन देतात व कांहीं माहालेचे बेगाऱ्यानीं गवत कापून द्यावे त्याचे दरहजारी रुपये ४ प्रमाणें रुपये पाठवितात व त्याप्रमाणें साल मजकुरी बेगारी रुपये पाठवून देणे म्हणोन, कमाविसदार महाल निहाय यास;

आर्बा सीतैन मया व अलफ रबिलाखर २५ १७६३–६४

२ रसानगी यादी छ १२ रबिलाखर

६ गवत कापून द्यावयाचा करार त्याचे नक्त दरहजारी रुपये ४ प्रमाणें साल गुदस्ताप्रमाणें सालमजकुरी रुपये हुजूर पाठवून देणे म्हणोन

१ परगणे **वण दिंडोरी** गवत पुले २५०००० एकूण दर ४ प्रमाणें रुपये १००० हजार.

१ परगणे हवेली **संगमनेर** निसबत **शिवाजी बलाल** गवत पुले २००००० एकूण दर ४ प्रमाणें रुपये ८०० आठसे......

[आवश्यक तेवढ्याच दोन सनदा घेतल्या आहेत.]

---

* येथून अक्षर निराळें.

लेखांक २१

[लेखांक १३ पहा. महादेवभटांनीं काढलेलें हें कर्ज त्यांचे पुत्र बच्याजी व मोरोपंत यांनीं सन १७८८ मध्यें परत केलें. ले. ५९ पहा.]

वैद्यसंग्रह, पुणें

श्री नकल वै शुा ९ श. १६८४
ता. २।५।१७६२

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री
रामचंद्रपंत स्वामी गोसावी यासी

आश्रित **महादेवभट गुणे** कृतानेक नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे. विशेष. आम्हांस शंभर रुपयांची निकड आहे तर राजश्री **अंतोबा नाडे** याजकडे शंभर रुपयाची चिटी जरूर जरूर पाठवावी. व्याज आठ आणे प्रमाणें दरमहा देऊं. कलले पाहिजे. मिति वैशाख सुध नवमी शके १६८४ चित्रभानु नाम संवछरे कृपालोभ कीजे हे विनंति असल खत ताा चिमणाजीराम बालाजीराम याजपासी द्यावयासी बापुजी विश्वनाथ याजकडे पाठविलें मिती चैत्र शु.१२ शके १७०८ पराभवनाम संवछरे.

लेखांक २२

चिमणाजी गोविंद (११-१) चांफेट
वैद्यसंग्रह

श्री

†ता. ७।९।१७६२
भाद्रपद वाा ४
श. १६८४

तीर्थ स्वरूप राजश्री **रामचंद्र**
पंत मामा वडिलांचे सेवेसी

आपत्ये **चिमणाजी गोविंद गुण्ये** दोनीकर जोडून सां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ताा भाद्रपद वद्य ४ मुाा पुणे सुखरुप असो विशेष

† वैद्यसंग्रहांतीलच भाद्रपद वद्य पांचचें एक मोरो रामचंद्र करकरे यांचें पत्र उपलब्ध आहे (ले. २३ पहा). त्या पत्राचा काळ सुमारें १७६२ जवळ-पासचा आहे. हें पत्र व सदरील करकऱ्यांचे पत्रांतील मजकुर हीं दोन्ही

आपण आसीर्वाद पत्र पाठविले ते पावले बहुत समाधान जाहाले लिहिले वर्तमान कलले राजश्री **मोरोपंताविसी** लिहिले त्यास पहिल्या धंद्यावर तोफखान्यातच राहिले आहेत त्याणी आसामी देतो म्हणून कबूल करून लिहिण्यास सांगितलें आहे. तेथेंच राहिलें आपणांस कलावें म्हणोन लिा आहे. आम्हाकडील वर्तमान......आमच्या रोजगाराचे ठीक नाहीं. राजश्री **सदाशिव पंत** घरीच बसले आहेत आद्याप पावेतो कांहीं समजावीसी जाहाली नाहीं आपणास कलावे म्हणोत लिा आहे. सदैव आसीर्वादपत्रीं सांभाळीत असावे......बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंति. सौासंपन्न मातुश्री मामीस सां नमस्कार परिसीजे लोभ कीजे. हे विनंती.

लेखांक २३

वैद्यसंग्रह *८।९।१७६२

श्री गोविंद प्रसंन भाद्रपद वाा ५, १६८४

तीर्थरुप राजश्री दादावडिलांचे सेवेसी

आपले **मोरयानें** चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना येसीजे येथील वर्तमान ताा भाद्रपद वद्य ५ मुकाम **पुणे** सुखरुप जाणोन स्वकीये लेखन करावयास आज्ञा केली पाा. यानंतर आम्ही वडिलांचा

[पृ. २४ वरून]

एकमेकांशीं संबंधित आहेत. हें पत्र भाद्रपद वाा ४ चें आहे, तर तें भाद्रपद वद्य ५ चें आहे. त्या पत्रांत याप्रमाणें मजकूर आहे.—‘ (चिमणाजी गोविंद गुणे) मार निले हे पत्राचे उतर देणार होते परंतु मार निलेची गांठ पडली नाहीं ’ व यावरूनच हें पत्र मोरोपंत करकऱ्याकडे द्यावयाचें असल्यामुळें एक दिवस आधीं म्हणजे भा.वाा ४ स लिहिलेलें दिसतें. वरील मोरोपंत करकऱ्यांचें पत्र १७६२ चे सुमाराचें असल्यानें हेंहि त्याच सुमाराचें असावें. शिवाय या पत्रांतील मोरपंतासंबंधींचा मजकूर त्या पत्राबरोबर जमतो आहे. इत्यादि कारणांमुळें हें पत्र १७६२ च्या सुमाराचें असावें.

* हें पत्र रामचंद्र गोपाळ करकरे, वाईकर वैद्यांचे दिवाण, यांचे चिरंजीव मोरो रामचंद्र करकरे यांचें आहे. पत्रांतील चिमणाजीपंत गुणे, चांफेट शाखा वं. नं. ११·१ हे होत. पत्रांतील ‘ईसन्ने सीतेन’च्या उल्लेखांवरून हें पत्र त्या काळचे सुमाराचें म्हणजे इ. स. ११६२ सुमाराचें असावें.

निरोप घेऊन आलो ते राजश्री **नारोपंत सबनीस** तोफखाना याजकडे गेले. त्यास त्याणी आम्हास आज्ञा केली कीं तुमचें कामकाज पेसजी प्रांत तुम्हाकडे करार आहे. दप्तरी लिहीत जाणे म्हणून आज्ञा केली त्यावरुन त्याजपासी आहे. पंक्तीस भोजन होते. सरकारांतून घोडे माणूसहि करुन देतो म्हणुन मान्य केले आहे. कितेक साहित्याच्या गोष्टी, राजश्री **जानो गणेश परभुणे** वाईकर येथें आले आहेत त्याजकरुन रा। नारोपंत नानास सांगणे त्या सांगितल्या आहेत. व परभुणे मा।र यानीं वडिलास पत्र दिल्हे आहे. तेहि पा। आहे. येऊन पोहोंचेल त्यावरुन कलेल राजश्री **चिमणाजीपंत गुणे** यासी पत्र पा। तेहि त्यास दिल्हे. मा।रनिले पत्राचे उतर देणार होते परंतु मा।रनिलेची गाठ पडली नाहीं म्हणुन उतर न आले. श्रीमंत राजश्री **केसोबास** हि आ। विसी सांगितले होते त्यास त्यांणीं हि कबूल केलेच होते की जर कोठें सेपनास रु आ। लाऊन देऊं म्हणुन मान्य केलेच होते. परंतु सबनीसानीं कामकाज सांगितल्या उपरी ते टाकून यावे. याजकरिता न आलो तोफखांनींयांत तीनसे रु. आसामी करार होईल येसे दिसून येते. त्यास सबनिसाकडील सरकारची आसामी करार करुन घेतो. आ। करार जाली म्हणजे मागाऊन सविस्तर लिहून पा। परभुणे वाईकर यांणीं आपल्या घरास पत्र पा। आहे वजीनस पा। आहे. ते मा।रनिलेच्या घरांत पोहोंचते करावे व **बाजीभट थिटे** यासी सबनीसाचे पत्र आहे तेहि पा। आहे त्यास पावते करावे. सविस्तर आर्थ मागाऊन लिहून पाठवितो राजश्री **केसो कृष्ण सेंबेकर** आले आहेत तेहि दोचौ दिवसीं जाणार

(पान २)

आपण येणार हे वर्तमान त्याहि ऐकिले होते. याजकरिता वडिलांचा मार्ग लक्षीत होतो. परंतु वडिलास यावयासी न बने, येसे कलो आले. त्यास तेहि जाणार आहेत पैका टका येणे त्यास आपण येते तरि सर्व बनोन येते. केसोपंत बहुत हैराण आहेत. कर्जवाम बहुत जाले आहे. सरकारांतहि करारा प्रा। येवज देणे घेऊन सन ईसनेसीतेनचा येवजहि जबरदस्तीनें घेतला परगणे यांत रुा वसुल न जाला ठाणी मोगलांनीं घेतली. म्हणून मा।र निले सांगतात. राजश्री **रामाजीपंत सेंबेकर** यांचेहि कोठें ठिकाण नाहीं. नानास

आम्हीं पुसीले ते सांगतात कीं घरांतून निघाल्या उपरी तीन रोजचे वर्तमान कीं, रामाजीपंत होते. त्या उपरीं कोणीकडे गेले काय वर्तमान जाहाले हे नकले. येसे सांगतात. वरकड वर्तमान मागाऊन लिहून पाठवितो बहुत काय लिहिणे कृपा लोभ आसोदीजे हे विज्ञती हो चिरंजीव **बालास** व **सदाशिव** व **गोपाल** यासी व मनीस आसीर्वाद.

[मागील बाजू–] तीर्थरुप सौ मातुश्री **लक्ष्मीबाई** वडिलांचे सवेसी सां नमस्कार. सविस्तर अर्थ पत्रावरून कळेल हे विज्ञती.

लेखांक २४

[पुंनसेच्या खोतीची साग्र माहिती देणारा गोविंद नारायण गुण्यांचा करिणा. हा ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा आहे.]

चांफेट दप्तर नं. १ — श्री — इ. स. १७६४

गोविंद नारायण (१-१४) — शके १६८६

करिना जबानी **गोविंद नारायण गुणे** ग्रामोपाध्ये [व खोत] मौजे **चांफेट** व मौजे **पुंनस**, ता पांवस सुरु खमस सीतेन मया व अलफ लिहोन दिल्हा करिना येसाजे; मौजे पुंनस ता मजकूर येथील खातीचा कजिया **सिवजी प्रभु** यांचा व आमचा लागला त्याची हकीकत [राजश्री देसक ता मजकूर याही केली ?] + + + + + + + + + + + + लना त्यास मौजे मजकूर हा गांव पुरातन कुणबावे करी गावचा दस्त आठरासे लाहारी होता त्यांत तीनसे लाहारींचा कुणबावा आमचा दीडसे लाहारींचा सिवाजी प्रभु याचा बाकी वरकड गांवकरी कुणबी वगैरे याचा होते. गांवची खोतीस खोत पाहिजे त्यास चौघांच्या मते जो करणे तो करीत मागे आमचे आजे **कृष्ण पाध्ये** याणी + + + + + + [दाहा वर्षे ?] खोतीचा कारभार केला त्याजवर **गोविंद प्रभु** सिवाजी प्रभुयाचे आजे याणि [व आपले पणजे याणी] दोन तीन वर्षे केली त्याजवर **गोविंदभट व जांनभट शाहाणे कोसकर** याणी केली त्याजवर **रामाजी अनंत सुभेदार** याचे कारकीर्दीत रा **कृष्णाजी वामन देसाई** ता मजकूर याणी

निवारस गांव म्हणोन खोती केली त्यास कधीचा गांव [लांबीचा ?] वला तेव्हां त्या + + + + + + + + **नेवालकर** यांचे स्वाधीन केली त्याणी टाकली त्यावर **भोलभट शाहाणे** जानभट याचे पुत्र याणी केली त्याणी टाकलीयावर **नरसो पाध्ये नेवालकर** हरदेपाध्ये याचे चुलत बंधु याणी केली त्यास **सावंताची** स्वारी या प्रांतास आली तेव्हां नरसोपाध्ये याणी खोती टाकून **कासीस** गेले तेव्हां गांव वोसाड

२

पडला तेव्हां कारकीर्द **रामराव** याची रत्नागिरीस होते व **प्रचीतगडी आपाजी विश्वनाथ** सुभेदार होते गांव खराब होता तेव्हां आपाजी विश्वनाथ याजकडून **गणो सिवदेव पेंढरकर** याणी **पांवस** महालाचा हवाला प्रचीतगड तर्फेनें केला तेव्हा गांव खराब महालाचा गांव वोसाड तो भरावा म्हणोन हवालदारास आगत्य त्याणी **कासी प्रभूस** गांवची माहीतगिरी म्हणोन बोलाउन आणून गांव भरावयासी सांगितला त्याजवर त्याणी कुलाचा शोध करुन गांव भरिला निमेतकसीम कासी प्रभु यास दिल्ही निमे प्रचीतगड तर्फेची गणेशपंती केली. ते तर्फेचे ते खावंद. रत्नागिरीतर्फेचा कोल पाहिजे त्या करिता **रामाजी गोविंद काशी प्रभु यांचे बंधु हे रत्नागिरीस** कौल आणावयासी गेले तेथे बोलीचाली केली आणि कौल घ्यावा तो रा **आणाजी तुबाजी सरदेशकुलकर्णी** हे तेथें होते त्याणी सांगितले की **पुंनस** गांव खोती आपली आणि तू कौल कां घेतोस येसे म्हणोन कौल घ्यावयाचा तटविला तेव्हां आणाजीपंतास गावचे स्वामित्व दरसाल गला पंधरामण द्यावयासी करुन त्यास कागद लेहून दिल्हा तेव्हा त्याणी कउल घेउन दिल्हा गणेशपंताचे तर्फेनें गांवात कारभारी **दादो विठल** दुमाल्या येक वर्ष होता त्यावर **कृष्णाजी**

३

विष्णु गुणे व **संकरसेट गांगण** याणी मिलोन निमे व निमे कासी प्रभु याणी दोनतीन वर्षे खोती केली कृष्णाजी विष्णु याणी टाकली यावर कासी प्रभु व च्यार गांवकरी आम्हाकडे आले तेव्हां आम्ही मौजे **कणगोली** ता **लांजे** येथे होतो ते समई निमे खोती करा म्हणोन आमच्या गली

पडले तेव्हा आम्ही निमे खोती मान्य करुन मौजे मजकुरा आलो त्यापासून निमे कासी प्रभु व निमे आम्ही सन सीतचे आर्बैनाचे आवली पावेतो निमे निम करीत आलो सनसीतचे आवला सालापासून आणाजीपंत याचे पुत्र रा **नारो आणाजी** याणी गावांत माणसे आणिली तेव्हा त्याणी येक तकसीम सिवाजीप्रभु याणी येक तकसीम आम्ही येक तकशीम येसे तीन तकसीमा करुन सन समान आर्बैन पावेतो चालविले त्यावरसी **सावंताची धामधुम जाहाली** त्यासमई नारो आणाजी परागंदा जाहाले आम्ही लुटुन गेलो त्यास पेस्तर सालची दुसाला लागवड जाहाली त्याची सरकारांतून पाहाणी जाहाली त्याची उगवणी येक साल सिवाजी प्रभु व आम्ही केली येक सिवाजी प्रभु याणी केली पेस्तर नारो आणाजी याणी गाव करुन यास उतर चिटी आणुन दीली आणि **दामो पाध्ये** यास वाटा देउन गावची लागलागवड केली बी बीयाणे कर्जवा

(पान ३, मागील बाजू)

म जे लागले ते दामोपाध्याकडून देविले आणि आशाढ मासी निघोन आपण देशास गेला मागे गावची दिवाणची उगवणी व्हावी त्यास खावंद नाहीं गावांत वरातदार आले त्याणी **नारो आणाजी** याचा चाकर सुभाना व सिवाजी प्रभु गुदस्ताचा कमाविसदार म्हणोन खाले **रत्नागिरीस** नेले. हे गेल्यानंतर दामो पाध्याचे नांव दिवाणांत कोणी सांगितले ते नकले परंतु दामोपाध्यास बोलाउन नेले आणि पुंनसेची खोती तुम्ही केली होतीत त्याची उगवणी करुन द्यावी म्हणोन तगादा केला हे उडवाउडव करीत होते परंतु सत्य सुक्रुतावर आले तेव्हां कबूल करुन कतबा लेउन देउन निरोप घेउन आले आणि सिवाजी प्रभु व आम्हास बोलाउन नेले, आम्हास येकट्यास गांव न वाढे तुम्ही माहीत आहां तुम्ही आम्ही गांव वैवाटु तेव्हा सिवाजी प्रभु बोलिले कीं गांव नुकसानीं आम्ही तकसीम करावीयासी आम्हास कारण काये आम्ही स्वामित्वाचे पत्र आणाजीपंतास दिल्हे आहे ते आणून द्याल तरी तकसीम करुं त्यावरुन दामोपाध्ये आणाजीपंताचे गली पडोन पत्र आणून दिल्हे आणि येक तकसीम दामोपाध्ये येक तकसीम सिवाजी प्रभु येक तकसीम कृष्ण प्रभु

(पान २, मागील बाजू)

याप्रमाणें येक साला वैबाटले पेस्तर दामोपाध्ये याची तकसीम त्याची त्याकडे बाकी दोन तकसीमा राहिला त्या आम्ही व सिवजी प्रभु व कृष्ण प्रभु याणी केल्या दामोपाध्यांनीं टाकिल्यानंतरी त्याची तकसीम देखील सारागांव आम्ही त्रिवर्गीहि वैबाटला सन इसनें सीतेन पावेतो चालिले सन सलासापासून दोन वर्षे आमची तकसीम देखील तेच करितात आम्हास देत नाहीं गांव आपला म्हणतात त्यास पुरातन हकिकत याप्रमाणें आहे हे खरें करुन देऊं* याप्रमाणें गावचे पुरातन वृत्त असोन आम्हास गावांत गवतकाढीस समंध नाहीं येसे म्हणतात तर हे तरी पुंनसेचे कोणी खोत वतनदार केले यास खोती कोणी दिली आणि आम्हास कोणीं नाईं सारखी केली यापेक्षां वतनदारी आमचीच भारी पुंनसेंत असोन आम्हास मात्र नाहीं आणि यास कोणी दिली ते आम्हास सांगावे तेव्हा आम्ही उगेच राहो. गावांत सेतभात भारी आमचेच असोन हेच खोत वतनदार येसे चौघाचे मते खरे जाहाले तर मग आम्ही यासी कज्या करणार नाहीं या प्रोा करिणा आपला आहे खरे करून देउ नदेवे तर दिवाणचे अन्यायी हा करिणा लेहून दिल्हा सई

[This Karina jabani (a kind of complete information given before the Court) gives us the complete history of the Khoti Vatan of village Punas from about 1650 A. D. to 1764 A. D. This is written in 1764 by Govind Narayan Gunye.]

---

* येथून हस्ताक्षर बदललें आहे. [ ] या कंसांत घातलेला मजकूर हा निराळ्या शाईनें लिहिला असून तो पाठीमागून कोणींतरी ओळींच्या मध्येंच लिहिला आहे. पुंनसेच्या खोतीचा वाद गोविंद नारायण गुणे व शिवाजी प्रभु मुल्ये यांच्यामध्यें लागला; परंतु पुढें त्याचा निकाल काय झाला हें ते कागद न मिळाल्यानें कळत नाहीं. एवढें खरें कीं चांफेटच्या गुण्यांनीं कांहीं दिवस पुंनसची खोती केली असावी.

लेखांक २५

[आश्वीकर गुण्यांचे मूळ पुरुष महादेवभट गुण्ये यांच्या कर्जाचा उल्लेख. लेखांक २१ व लेखांक ५७ पहा.]

शं. ल. वैद्य यांचें दप्तर, पुणें
महादेवभट (१-१२) चांफेट

ता. १४।९।१७६५
शक १६८७ पार्थिव नामसंवत्सरे
मार्गशीर्ष शु. १

श्रीमहागणपतयेनमः

श्रीसरस्वत्यैनमः श्रीगुरुभ्योनमः

आडावा खाते बाकी येणें निा राजश्री बाबुराव विश्वनाथ वैद्य बाकी शके १६८७ पार्थिवनाम संवत्सरे मार्गशीर्ष शुा १ समायीक येणे निघाले त्याची निमे वाटणी मोघम कुळारग ही तपसील

यो समाईक कुळारग रुपये येणे

पैकी वजा निमे रामचंद्र बलाल मोघम कुळारग येणे बाकी कुळारग निा बाबुराव जमाखर्चाबद्दल मोघम आसामी या सायै

किता रुपये

....

५० माहादेवभट गुणे रुपये १०० पैकी

लेखांक २६

[महादेवभट गुण्यांच्या कर्जाचा उल्लेख.]

शं. ल. वैद्य. श्री इ. स. १७६६
महादेवभट (१-१२) चांफेट शक १६८८

हिसेब मदादेवभट गुणे सुरु

सबा सीतैन मया व अलफ

१०० चित्रभानू नाम संवत्सरे वैा शुा १०

२९८= व्याज दर ·।।· प्राा++++

...नाम संवत्सरे श्रावण अखेर

मुा सायै......पाो व्याज

६ माहे १२
१०६

६।= माहे १२
११॥=

६॥। माहे १२
११९८=

७८= माहे १२
२॥।= माहे ४८ २०
२९८=
१२९८=

लेखांक २७

[माधवराव पेशव्यांचें कृष्णाजी हरि यांस पत्र. सदाशिवभट गुण्ये व गोविंद बल्लाळ हळबे यांच्यामधील खोती वतनासंबंधीं चाललेला वाद तोडणेबद्दल.]

मठदप्तर

*** श्री नकल** **इ. स. १९ आक्टोबर १७६७**
शक १६८९ आश्विन वा। १२

सदाशिवभट (१–१०)
धोंडो जनार्दन (१–१२)

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री **कृष्णाजी हरि**
गोसावी यासी

सेवक **माधवराव बलाल प्रधान** नमस्कार सुरु समान सीतेन मया व आलफ वाो **सदाशिवभट गुण्ये** मौजे मठ ता। हातखंबे यांचे बंधु **धोंडो**

***गुण्ये व हळबे यांच्यामधील वाद**:—मठ-शाखेपैकीं सहाव्या पिढीचे (वं. नं. १) कृष्णाजी विष्णु व सदाशिवभट अनंतभट व धोंडो जनार्दन गुण्ये यांच्या विरुद्ध बाबाजी गोविंद हळबे यांचा वाद १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत चालू होता. मठ येथील गुण्यांच्या कुणबाव्यांतच टेंबकराचा कुणबावा

जनार्दन गुण्ये याणी हुजूर विदीत केले कीं **गोविंद बलाल हलबे** याचा व आपला मौजे मजकूरचे **खोतीचा व घरठिकाणाचा कजिया लागला** आहे त्यास **विशालगडी** त्यांचे व आमचे करिणें कतबे जाहाले तेथून ते

[मागील पानावरून चालू]

समाविष्ट होत होता. तो स्वतंत्र आहे असें हळबे लटकेंच म्हणत. त्यामुळें गुण्ये मठची खोती आपल्याकडे आहे असें हळब्याविरुद्ध म्हणत. ले. ३६ वरून पाहतां पुरातनकालीं मठ गांव गुण्यांनींच संपादन केला व प्रथम पांचव्या पिढीचे (वं. नं. १) बाळंभट गुण्ये वगैरेंनीं खोती वतन हळब्यांना दिलें. त्याचें कारण म्हणजे गुण्यांचें तें वतन चालविण्याचे बाबतींतील अज्ञान ! गुण्ये शेवटपर्यंत कुणबावेकरी ग्रामोपाध्येच राहिले. हळब्यांना विशाळगडीं दिवाणांत मान होता. खोती वतन ते चालवीत. तथापि एकंदरींत त्यांची भांडकुदळपणाची प्रवृत्ति होती असें दिसतें. कारण त्यांनीं टेंबकर हा कुणबावा मठच्या ८ कुणबाव्यांत मोडत नसून तो गुण्यांच्या कुणबाव्यांतीलच एक पोटभाग असतां कारणावांचून कुरापत काढून सुमारें ४० वर्षे गुण्यांना त्रास दिला. गुण्यांचें दिवाणांत वजन नव्हतें, यामुळें त्यांना वारंवार पेशवे सरकारकडे धांव घ्यावी लागे.

या वादांतून नवीन कांहींच निष्पन्न झालें नाहीं. टेंबकर कुणबावा गुण्यांचा झाला. व खोतीवतन हळब्यांचें म्हणून ठरलें. गुण्यांना दारिद्र्य मात्र प्राप्त झालें ले. ४५ व ६८ पहा, त्या वेळेची ही वादाच्या खर्चाची यादी; म्हणजे आज किती खर्च झाला असतां याची त्यांवरून कल्पना येईल ! हळब्यांची भांडकुदळ वृत्ति दिसून आली. गुण्यांनींच अखेरीस मोठेपणा घेऊन वादामुळें हळब्यांचें मठच्या खोतीचें अमानत असलेलें वतन पेशव्यांकडून सोडविलें !

शेवटचा महत्त्वाचा फायदा म्हणजे या वादामुळेच मठ-शाखेची आज, **विजयनगर**चा तळ कोंकणांत अंमल होता तेव्हांपासूनची माहिती, मठगांवची वसाहत, व निरनिराळ्या वेळीं गांवावर गुदरलेले प्रसंग व त्यांतून गुण्यांनीं अत्यंत धैर्यानें गांवाचें केलेलें संरक्षण, इत्यादि गोष्टींबद्दल साग्र माहिती मिळते, शिवाय या वादामुळेंच या शाखेची सुमारें इ. स. १५४० पासूनची वंशावळ उपलब्ध झाली आहे. हळबे न भांडते तर ही माहिती मिळणें अशक्यच होतें. तेव्हां याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें ओघानेंच प्राप्त होतें.

या वादाचे माहितीकरितां पुढील लेखांक पहाः—३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४५, ४६, ४७, ४८, ६३, ६४, ६५, ६८, ९२.

आपण उभयेतां रत्नागिरीस सुभा गेलो तथें फडशा जाहाला नाहीं. मौजे मजकूरची खोती चौघा चारीयामध्ये खोतीचे वडिलपणाचा मानपान देवाची पालखी व सिमग्याचं खेळा वगैरे आपले चालत असतां गोविंद बलाल वडीलपण व खोती आपलीच म्हणोन कजिया सांगतात व घरठिकाण आपले म्हणोन कजिया करितात तरि येविसी वाजवी मनसुबी होऊन फडशा होये ते केले पाहिजे म्हणोन त्याजवरुन हे पत्र तुम्हास सादर केले असे तरि तुम्ही भोंवर गाव व जमीदार व मौजे मजकूरचे गांवकरी मेलून चौकसी करुन वाजवी असेल त्याप्रमाणे विल्हे लावणें आणि हुजूर लेउन पाठवणें रुमायात कोणाची येकंदर न करणे सदरहु मनसुबी दो महिन्यांत येथास्थित करणे दोहो महिन्यांत पडशा न होये तरि खोती अमानत करुन हरदूवादी हुजूर **पुण्यास** पाठवणे जाणिजे छ २५ जमा दिलोवल बहुत काये लिहिणे.

लेखांक २८

[चांफेट शाखेपैकीं वडील घराण्याचे भटंभट गुण्ये व धाकट्या घराण्याचे गोविंद नारायण यांच्यामध्यें वतनी ठिकाणाबद्दल सुमारें ७० वर्षे *वाद चालला होता. त्या वादांत गोविंद नारायण यांनीं दिलेली माहिती.]

---

* **चांफेट शाखेंतील दुसरा महत्त्वाचा वाद**:–पहिल्या वादाकरितां लेखांक २४ चीं तळ टीप पहा. वडील घराण्याचे भटंभट ऊर्फ रामकृष्णभट्ट (पिढी नं. ५ वं. नं. २) व धाकट्या घराण्याचे गोविंद नारायण गुणे (वं. नं. १) यांच्यामध्यें कांहीं खासगत ठिकाणांसंबंधी व चांफेटच्या खोती वतनासंबंधी झालेला वाद. ह्या वादास भटंभटांचे आजे केशवभट यांनीं प्रथम सुरुवात केली. त्याचा निकाल १७६९ त भटंभटाचे कारकीर्दीस लागला. भटंभटांचे आजे केशवभट यांचा काल इ. स. १७०० च्या सुमाराचा आहे. एकूण सुमारें सत्तर वर्षे तीन पिढ्या चांफेट शाखेंतील वडील घराण्यांत व धाकट्या घराण्यांत वाद चालला होता. या वादांतून भटंभटास नवीन कांहींच

चांफेट दप्तर १ श्री $\frac{1}{3}$ इ. स. १७६८
गोविंद नारायण (१-१४) श. १६९०

यादी करिण्यावरून पुरसीस **गोविंद नारायेण** यांची सुा तिसा सीतेन मया व अलफ.

हरदे पाध्ये विभक्त होउन घरांतील संपदेचा विभाग घेउन **निंबूचे वाडीस** जाऊन राहिले म्हणून लिहिले त्यास ते समई वाटे कसकसे वडिलार्जित कुणबी दोन भाऊ होते त्यापैकी येक कुणबी हरदे पाध्ये याणी निंबूचे वाडीस घेऊन गेले त्यास त्या कुणब्याचे नांव काये व

[मागील पानावरून चालू.]

फायदा झाला नाहीं. त्यांचा भांडकुदळपणा मात्र लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आला. गोपाळ गोविंद गुण्यांनीं वाद जिंकला. लेखांकांच्या वाचनावरून सर्व कळेलच. विशेष माहितीकरितां ले. नं. २८, २९, ३०, ३१, ३२ पहा.

ह्या वादाचा मुख्य फायदा म्हणजे, चांफेट शाखेची गेल्या पांचशें वर्षांची माहिती या वादांत गुदरलेल्या पुरसिसी व करिण्यांवरून उपलब्ध झाली आहे. हा वाद चालू असतां त्यास कंटाळून लहानशा जमिनीच्या तुकड्याकरितां भांडत न बसतां गोविंद नारायणाचे धाकटे बंधु, आश्वी शाखेचे मूळ पुरुष महादेव नारायण गुणे ऊर्फ महादेव रघुनाथ गुणे (दत्तकानंतर), देशावर आले असावे असें दिसतें. पुढें त्यांचे वडील बंधु गोविंद नारायण यांचे पुत्र गोपाळ गोविंद यांनीं हा वाद जिंकला. गोपाळ गोविंदाचे वडील बंधु चिमणाजी गोविंद महादेवभटांचे बरोबरच देशावर आले होते. तेव्हां अर्थातच ते या वादापासून आलिप्तच होते. (ले. १३ व २२ पहा). तथापि चिमणाजी गोविंदाचे पुत्र विठ्ठल चिमणाजी पुनः कोंकणांत परत गेले. ते व गोपाळ गोविंद यांच्यामध्यें झालेलें वांटणीपत्र उपलब्ध आहे. (ले ३४ पहा.)

चांफेट येथील खोतीचें वतन प्रथम रघुनाथ कृष्ण गुणे (वं. नं. १), महादेवभट गुणे (आश्वी शाखेचे मूळपुरुष), यांचे वडील, यांना मुळ्यांनीं इ. स. १७०० च्या सुमारास दिलें. पुढें रघुनाथभटांचे दत्तक पुत्र महादेवभट देशावर राहावयास साताऱ्यास आल्यामुळें तें वतन पुढें विठ्ठल चिमणाजींच्या वंशाकडे चाललें. (ले. ३२ व ७७ पहा.) व नंतर विठ्ठल चिमणाजी गुण्यांचा म्हणजे वडील घराण्याचा निर्वंश झाल्यानें १८३० नंतर पुढें हें वतन गोपाळ गोविंदांचे वंशांकडे हल्लीं चालू आहे. (वं. नं. ११ शा. चांफेट पहा.)

जाहाले व ते समई मुख्ये खोत कोण होते वाटपाचे कागदपत्र व साक्ष मोझा याचे साधन पुरऊन देणे कलम १. याचे उत्तर हरदे पाध्ये विभक्त होऊन निंबूचे वाडीस जाऊन राहिले ते समई घरांतील वस्त भाव गुरे आद्य करून वडिलार्जित संपदा होती त्याचे वाटा निमेनिम प्राा करून घरचे घरीच घेतला वाटप करते समई उदा कोणी न्हवतां व वाटपाचे कागदपत्रहि केले नांहीं व साक्ष मोझाहि कोणी नांहीं व ते कारकीर्दीस मुल्या खोत कोण होता त्याचे घराण्याचे नांव काये हाली तुम्हाकडे कुणबी आहेत हे कोणाचे त्याचे वंशाचे; त्या कुलध्याची मूल पुरुषापासून वंशावळ लिहून देणे कलम २. याचे उत्तर कुणबी यांचे वंशावलीची यादी अलाहिदा दिल्ही आहे हे लिहिले सई बीाा गोपाल गोविंद गुण्ये.

(पान १ वरील मागील बाजू)

त्याचे नांव आपणास ठावके नाहीं वाटप जाहाले त्यास वर्षे आदमासे संभर होतील येणे प्राा प्रथम कलमाचे उत्तर लिहिले सई बीाा गोपाल गोविंद गुण्ये.

निंबूचे वाडीहून केशभट, विठलभट गांवास आल्यानंतर वतनी ठिकाणे जमिनीचे वाटप करून घेतले म्हणोन लिहिले त्यास वाटप निमे निम प्राा जाहाले किंवा कम पेश जाहाले. हे कोणकोण ठिकाणाचे जाहाले वाटप कोणाचे विद्यमानें जाहाले किंवा * नमस व जागलघाट या दोम ठिकाणचा विभाग करुन घेतला नाहीं सबब पेसजी ठिकाणे ईदल शाहा कारकीर्दीस ईनाम चालत होती त्याजवर माहाराज छत्रपती यांची कारकीर्द जाहाली ते समई ईनामदारापासून खंड घेतला त्याची तक्षीम त्याणी द्यावी ते दिली नाहीं आमचे वडिली खंड दिला सबब ठिकाणे आम्हाकडें राहिली म्हणउन लिहिले त्यास खंड ईनामतीचा पडला ते समई येकत्र

(* येथून कलम ४ सुरू होतें.)

भाऊपणांत घरचे घरी समजोन घेतले त्याचे उतर लिहून देणे **कलम ३. याचे उतर हरदे पाध्ये गेले** होते त्याचे लेक केशभट व विठल-भट हे गांवास आलीयानंतर जमि-नीचे वाटप **गोविंद प्रभुमुल्ये** याचे विद्यमानें करून वाटप निमे निम प्रो करुन घेतले ठिकाणे तपसील:- किंवा विभक्त होते ते व खंड लारी पडिल्या त्याचा कागद पत्र आथवा साक्ष मोझा व व ईनामतीबद्दल खंड पडिला किंवा ईनामतीचा वसूल घेतला याचे उत्तर लिहून देणे कलम ४.

२

पुरसीस करिण्यावरून गोविंद नारायेण

तिसरे कलम

१ खासा ठिकाण घरवंदाचे
१ गिमवस आंबे खालील
१ उंबर जमीम नजीक सेवर
१ तलेची मळी
१ सीवार नजीकांतले
१ टेंटवाचे नीवेस
१ सेवरीचे सकल नजीक चिठवणे
१ झोरेचे पाणी यानजीक

येकूण ठिकाणे आठ यांचे वाटप आदमासे निमेनिम प्रो जाहाले आहे यांत कमजाजती जाहाले तर निमेनिम वाटून घ्यावे त्या प्रो मान्य असे बीा गोपाल गोविंद.

भटंभटाचा वडिलाचा वाटा जाहा-ला वाट्याचा कजीया राहिला नांहीं

चवथे कलम ४

याचे उत्तर नमस व जागलधाट हि ठिकाणें वडिलार्जित वतनी विभागाची परंतु पूर्वि इनामतीबद्दल खंड पडला तो **सिवाजी माहाराज** यांनीं वलकाबजाती दूर करून **खंड लारी ७५ पावणासे घेतल्या त्या समई विभक्त आगोदरच जाहालो होतो त्याची नांव निसी**

१ हरदे पाध्ये भटंभटाचे वडिल
१ कृष्ण पाध्ये आपले वडिल

सदरहु ईनामतीचा खंड घेतला हा कशाबद्दल घेतला हे आपणास टाउक नांहीं वडिलाचे मुखीचे ऐकिलें नांहीं खड लारी पडल्या त्या विसी कागद पत्राची व साक्ष मोझाची

म्हणून लिहिले त्यास पूर्वि वाटप जाहाले हे कोणे पुरुषाचे कारकीर्दीत तुमचा पुरुष कोण व त्याचे पुरु-

पुरवणी आपल्या वस्तु होत नांहीं हे लिहिले सई गोपाल गोविंद गुणे.

(पान २ मागील बाजू)

षकोण ते समई मुल्याचा वडिल पुरुष कोण होता वाटप जाहाल्यास वर्षे किती जाहाली याचे उतर लिहून देणे **कलम ५.** याचे उतर वाटप करुन घेतले जामिनीचे त्या पुरुषाची नांवे **केशभट** व **विठलभट** हे भटंभटाचे वडिल आमचे वडील **कृष्ण पाध्ये** या उभयेताहि वाटप करुन घेतले त्या समई मुल्याचा पुरुष गोविंद प्रभु हे लिहिले सई बीाा गोपाल गोविंद.

आपले वडिल येकत्र असतां हरदे पाध्ये मौजे मजकुराहून निघोन गेले ते समई वडिलार्जित बटकी व गुलाम घरी होती कि न्हवती याचे उतर लिहून देणे.

याचे उतर चाकर व नवकर व बटकी होती हरदे पाध्ये निंबूचे वाडीस गेले ते समई होती परंतु काहीं दिवसाई नकल जाहाले हे सई

गयाली स्थले दोन तीन आम्हाकडें व येक त्याकडे हि हरदे पाध्ये व कृष्ण पाध्ये यांचे कारकीर्दीची आलिकडील विभक्त जाहालियावर ज्यास जसे सामर्थ होते त्या प्राो तेथाली ठिकाणाची वैवाट करीत आले म्हणून लिहिले त्यास हि ठिकाणे तुम्हास गांवचे कमाविसदार याणी सत्ता निवृत करुन दिली किंवा चालवणुकेस दिली किंवा ठिकाणदारापासून खरेदी करुन घेतली किंवा दान आर्थ गावांत यासी आथवा हाकिमाने वतनी करुन दिल्हे या पाो कोणे अन्वये साधन केले याचे उतर लिहून देणे **कलम १.**

६.

३

पुरसीस करिण्यावरुन **गोविंद नारायेण**

सदरहु वटकी व गुलाम हरदे पाध्ये हे निंबूचे वाडीला गेले ते समई कम पाौ पोरगा व वटीक समागमे नेली किंवा नांहीं हें आपणास ठाऊक नांहीं हे लिहिले सई बीाा गोपाल गोविंद.

सावे कलमाचे उतर सदरहू ठिकाणचे ठिकाणदार गावाहून परागंदा जाहाले ते समई मुल्यास ठिकाण चालवावयास न वोढे तया करितां मुल्यानीं चालवणुके बदल दिली ठिाा बिाा

१ कात्रा
१ भागवत
१ सेवडे

३

येकूण ठिकाणे तीन हि गोविंद प्रभु याणी **रघुनाथ भटास** दिली यासी वर्षे आजमासे ८० येंसी कम पेश होती हे लिहिले सई बिाा **गोपाल गोविंद गुण्ये.**

[This is the 'list' (यादी) of the information about the different points of quarrel, provided by Govind Narayan Gunye to Vishalgad Court.]

लेखांक २९

[चांफेट शाखेंतील वडील घराण्यांचे भटंभट गुण्ये व धाकटे घराण्याचे गोविंद नारायण यांच्यामधील वाद चालू असतां, भटंभटांनीं दिलेली माहिती. या जबानींतील वंशावळ चांफेट व आश्वी शाखेच्या वंशावळीचे दृष्टीनें महत्त्वाची आहे.]

चांफेट दप्तर १　　श्री नकल　　इ. स. १७६८

भटंभट (२–१)　　शके १६९०

* (ज) वानी **भटंभट गुण्ये** उपाध्ये मौजे पुंनस व चांफेट (ताा पाव) स सुरु तिसा सीतेन मया व अलफ लिहोन दिल्हा करिना (ऐसा) जे आपला व तीर्थस्वरुप राजश्री **गोविंदपंतकाका** यां (चा वतन) समंधे भाउपणाचे तक्षिमे विसीं कज्या लागोन उभ (यता मा) हाली जाउन राजश्री देशक ताा माा याजवळ विदीत केले (वरुन) आम्हास सांगितले की आम्ही मौजे माारी येऊन पंचांच्या........ करुन उभये-ताची समजी करु येसे सांगोन उभयता (निरो)प दिल्हा खाली उभये-ताचे समजीब्रदल **महादजी(....दे)साई, सदासिवपंत देसाई** येसे उभ-यतां चार ग्रहस्त स (मवित येउन) मौजे माारास आले आणि आज्ञा केलीजे गोविंदपंत याजकडे.........चा विभाग येणे हे खरे असल्यास कतबा करिना लि होन देणे त्याव(रुन) कतबा लिहोन दिल्हा तेव्हा करिनां लिहोन देणे म्हणोन आज्ञा केली त्यास (करी)ना ऐसाजे **मूल पुरुषाचे नाव केशंभट गुण्ये** त्याचे पुत्र

....

(हरि)**भट** ह्यांचे पुत्र दोघे
(वडील **केशभट**) दुसरा **विठलभट**
.................यांचे नकल
०
....

दुसरा **कृष्णंभट** ह्याचे पुत्र ४
१ वडील **रघुनाथभट**
१ दुसरा **गणेशभट**
१ तिसरा **नारायेण**
१ चौथा **हरभट**
—
४

रघुनाथभटाचे पुत्र माहादेभट, नारायेणभटाचा पुत्र दत्तक. माहादे भटांचे पुत्र चार.

* वाळवीनें कागद खाल्ला असल्यानें कंसांतील मजकूर कांहींसा अंदाजानें लावला आहे.

१ वडील बन्याजीपंत
१ दुसरा लक्ष्मणपंत
१ तिसरा बालाजीपंत
१ चौथा **मोरोबा**
४

गणेशभटाचे नकल नारायेणभटाचे पुत्र हालि **गोविंद नारायेण.**

(येणे) प्रमाणें मूळ पुरुषाची संतत त्यास मूळ पुरुषाचे पुत्र दोन **हरभट** (**कृष्णं**)**भट दोघे सखे बंधु येकत्र** होते येकत्र असता खानवीलकर, (धाम)धुमीमुळें आपले **पणजे हरभट** हे **खानवलीस** जाउन राहिले (खानवील)कर याजवळ सलुख करुन मौजे मारी घरी उपद्रव न होये

२

......या अर्थास्तव तेथें जाउन राहिले आणि ते समई **कानोजिराव** ....कर याजवल ठिकाण जागा मागोन तेथेंच राहिले सदरहु... ...साहित्याकरितां चाफेहून कुणब्रणीयाचा पोरगा १ येक व दु......स येक दोन गाई व दोनच्यार भांडीं याप्रमाणें नेउन तेथें राहिले आणि (खा)नवलकर याची मनधरणी करुन मौजे मारचे घरी उपद्रव होये तो (सोस)ला आणि आपण कांहीं दिवस तेथेंच असता मृत्य पावले त्यांची (बा)ईको व **पुत्र केशभट व विठलभट** येसी त्रिवर्गे निघोन गावास आली (त्या)नंतर घरी पूर्ववत् प्रमाणें राहावे त्यास दीर कृष्णंभट हे एकत्र (रा)हावयाकरितां खटपट करूं लागले तेव्हां तक्षिमे प्रा...... ......लाचे अन्वये आणि नास्तिपक्षाचा काल कज्या करावयास (सामर्थ्य) नाहीं तेव्हां खासगत ठिातच वडिलार्जित घर होते त्या नजीक ....त्यांत राहिली पुढें कांहीं दिवसांनीं मूल जाणते जाहाल्या (नं) तर तक्षीमा मागो लागावे परंतु कांहीं तक्षीम न देत हे वृत्त **गोविंद** (**प्रभु**) **मुल्ये** याजवळ जाऊन सांगितले. तेव्हा गोविंद प्रभु याणे सांगितले...... जाऊन आपले िाची सेते आहेत त्यांत जोत बांधणें ऐसे सां(गितले तर ......) मुलानीं सेतांत जोते बांधिली त्यावर येक दोन (......लख)

भट व गणेशभट येसे जाऊन जोते सोडीत यैसे हो. . . . .तेव्हा हे वर्तमान मागति गोविंद प्रभु याजवळ जाउन सांगित(ले. ते)व्हा गोविंदप्रभु बोलिला जे उदईक जोते सेतांत घेउन जाणे. . . . आपणहि तिकडेसच येतो येसे सांगितले त्यावरुन जोते घेउन (से)तात जात गोविंदप्रभुहि कामाकाजाचे उद्योगाचे निमित्ते. . . रुन तिकडेस जात हे तिकडेसच गेले, येसे वर्तमान रघुनाथभट . . .जीस कलल्यानंतर कज्या करावयाचे सोडीत या प्रकारे करुन वर्षे पांच सात थले कमाविस केले तेव्हडी सेते मात्र आमचे स्वाधीन (आहेत) ज्याजती आमची तक्षीम यावयाविसी तेच समई ....करीतच असत तेव्हां गोविंद प्रभु बोलिले की तुम...... **निास शंबर लाहारीचा कुणबावे याचा आकार जाहाला आहे (व) उपाध्येपण पुंनस व चांफेट या दोंगावचे आहे** ...... प्रस्तुत तुम्ही चालवणें पुढें तुमची तक्षीम याजकडे (......न)व्हे तेहि तुमची देवऊं येसे सांगितले (आईकोन) याचा सोडिला दोहो गांवचे उपाध्यायपण आम्हा

(पान २ मागील बाजू)

.................त्यात मुल्याकडेस पुर्णिमा व द्वादशी मात्र ते जे ....जात असत बाकी उपाध्यपण आम्हाकडे चालत ....पुढें तक्षिमेविसी कलह करावा तो विठलभट देवाज्ञा (जा)हाले त्या आगोदरच **केशभट आपले आजे हे देवाज्ञा जाहाले होते** ...... पुढे आपले तीर्थरुपाचे कारकीर्दीस शंभर लारीचा ...... बावा) दोहो गांवचे उपाध्यपण पुर्णिमा व द्वादशीखेरीज (क)रुन चालतच होते त्यास **गोविंदपंत** याणी उपाध्य(पणा) विषई कलह आरंभउन आमच्या गाई उपाध्यपण (समं)धीच्या कुणब्यांकडेच पोसावयासी दिल्ह्या हो(त्या) तेथून जबरदस्तीनें नेल्या तेव्हां तीर्थरुप बोलिले किं (···तुम···) उपाध्यपणाचा वाटा घेणें आणि आमचे कुणबावे याचा (वास्या)प्रो बाकी तक्षीम राहिली आहे ती आमची सोडून दे(णे······) प्रो कलह होऊं लागला येसा कांहीं दिवस कलह होत आला ··· कलहाचे निवारण येथे न होय येसे जाहाले तेव्हा तीर्थरुप ··· **विशालगडास** गेले आणि वर्तमान निवेदन करुन **गों (विंद)** ··· ··· ··· **व काशीप्रभु मुल्ये** यासी

बोलावणं करून गडास ... ... तेव्हा तेथें पंचाईत होउं लागली तेव्हां आम्हांस सांगीत ... ... आम्ही सांगो ते तुम्ही आई-कणें येसे सांगितल्यावरुन न तीर्थरुप बोलिले कीं तुम्ही गोत गंगा पांच पंचाईत (आहा) ते वाजवी असेल तेच तुम्ही कराल याप्रमाणें आम्ही (आईको) येसे बोलिले तेव्हा कागद पत्राचा मसुदा केला होता तो वाचून दाखविला तेव्हा तीर्थरुप बोलिले कीं वतन ...मध्यें रुा पडिले आहेत येसे सांगितात त्याचा कागद पत्रा(नि)सी दाखला पुरल्हा विना आपला निशा पटत नाहीं रुा पडिले ... ... म्हणोन सांगतात हे लटिके येसे बोलिलेयानंतर याचा (दा)खला माहाली जाऊन देशकाचे मते पुरउन देतील या उभयेतास मा (हा)ली रवाना करावे येसे सरकारांत सांगोन सर-कारचा निरोप घेऊन माहाली रवाना केले महाली आल्यानंतर याचा पत्ता न पुरे...तेव्हां तैसेच राहिले त्या वेलापासून कलह होतच आहे ... तक्षीम गोविंदपंत याजकडेसच यावी ती तुम्ही (पंचा) इत मनास आणून देवणार समर्थ आहा या प्राो

(पान १ मागील बाजू)

(क)रिना आहे सदरहू इनामत शंभर लारीची आम्हा (कडे चालत) आहे या प्राो खरी करुन देउ. सदरहु करिना लिहोन दिल्हा ... ... या प्रमाणें सडी साक्षीनिसी खरें करून देऊं. खरें करुन (न) देवे तरी वादास खोटे दिवाणचे अन्याई आपनाजवल कागद **पेशजी मनसुबी विशालगडी** होत होती (त्या समईचे) कागदाची नकल होती ती दिल्ही याखेरीज आपणा जवळ दुसरा कागद नाहीं असोन पुढें काढूं तरी रद असे याखेरीज आपला करिनां लिहावयाचा (कांहीं) हि नाहीं हे लिहोन दिल्हे सई सहीचे दस्तुर खुद बीाा **बाबू केशव नेने** मखतसर मौजे **मावलंगे** ताा **पांवस.**

[This Jabani of Bhatambhat Gune in 1768 is a very important piece. It gives complete information as to why Bhatambhat Gunye was quarrelling with Govind Narayan Gunye and in addition a good geneology of Champhet Branch.]

लेखांक ३०

[गोविंद नारायण गुण्ये व भटंभट गुण्ये यांच्यामध्यें वाद चालू असतां, चांफेटचे खोत मुल्ये यांनीं चांफेटच्या व पुंनसेच्या खोती-संबंधी दिलेली माहिती.]

चांफेट दप्तर नं. १ इ. स. १७६९
गोविंद नारायण (१–१४); भटंभट (२–१) श. १६९०

४ पुरवणी जबानी **सिवाजी प्रभु व बापुजी प्रभु मुल्ये** खोत जौजे पुंनस व चांफेट ता। पांवस सुरु तिसा सीतैन

गोविंद नारायेण व भटंभट गुणे उपाध्ये दुमौजे पुंनस व चांफेट येथील उपाध्यपण वतनी त्यांचे व कुणबावा पुरातनी आहे खोती मूलपण आमचे खोती मूलपणास त्यास समंध नाहीं हाली त्याजकडें तक्षीम तिसरी खोती चांफेटची चालत्ये या मागे पहिली कांहीं दिवस त्याजकडें तीन तक्षीमा व आम्हाकडें चार तक्षीमा याप्रमाणें दाहावीस वर्षे चालले पुढें अलीकडेस निमे निमे प्रो चालवीत होतो हाली तिसरी तक्षीम चालत्ये यापूर्वी खोती मूलपण आमचे आम्ही करीत होतो गुणे आपला कुणबावा व उपाध्यपणाची वृत चालवीत आले गुण्यास सदरहू पुंनस व चांफेट या हरदू गांवीं खोती मूलपणास समंध नाहीं गुण्याकडें व त्याचे निसबतीचे कुणबी याजकडें लग्नमूहूर्त जाहाला म्हणजे खोती मूलपणाचा मानपान आम्ही घेत आलो व ते देत आले व त्याचे निसबतीचे कुणबी याजपासून सालाबाद खोती समंधे येक वटे घेत आलो सदरहू खोती **तीर्थरुप कासी प्रभु आपले चुलते यांचे कारकीर्दीपासून तक्षीम चालत आली** त्यापूर्वी त्याजकडें कुणबावा मात्र होता याप्रमाणें साक्ष मोझ्यानिसे खरे करुन देऊं हें लिहिलें सही छा मजकूर बी।।

दामोदर प्रभु मुल्ये खोत दुमौजे मा। सदरहू मौजे चांफेट येथील **तक्षीम** गोविंद नारायेण गुणे याजकडे चालत्ये म्हणून लिहून दिल्हे

आहे त्या वरुन पुसीले जे गोविंद नारायण गुणे यांचे निसबतींत या आगे कोणा पुरुषाचे कारकीर्दीपासून चालत आली त्यास वर्षे किती जाहाली ते लिहून देणे व कोणा आन्वये गोविंद नारायण याजकडे चालत आली ते लिहून देणे त्यास आपले चुलते कासीप्रभु मुा खोती करीत असतां येकटयास गांव न वाडे (वोढे)? याजकरितां तक्षीम दुसरीयास देऊन आपल्या मदतीस आणावा हे चितांत आणुन हे आपले स्वकीय जाणोन गोविंद नारायेण याचे चुलते रघुनाथभट गुण्ये उपाध्ये यास लक्षीम चालवावयास दिल्ही ते रघुनाथ भटी आजमासे दाहा बारा वर्षे चालविली त्या आलीकडे गोविंद नारायेण यास ज्या साली जसी तक्षीम देत आलो त्या प्रमाणे करीत आले परंतु त्यांचे + + + + + म नव्हे *रघुनाथ भटापूर्वी गुणे याच्या पुरुषाने खोतीची तक्षीम कोणी केली नाहीं सदरहू लिा प्राा सडी साक्षीनिसी व कागद पत्रानिसी व भोगभोगवटेनिसीं खरे करुन देऊं खरें करुन न देवे तर वादास खोटे दिवाणचे गुनेगार हे लिा सही बीाा दामोदर प्रभु मुल्ये खोत मौंजे पुंनस व चाफेट ताा मजकूर

लेखांक ३१

[भटंभट व गोविंद नारायण गुण्ये यांच्यामधील वादाचें निवाडपत्र. ऐतिहासिक दृष्ट्या हा उतारा अत्यंत महत्त्वाचा आहे.]

चांफेट दप्तर नं. १ जेष्ठ शुा १३ शके १६९१

गोविंद नारायण (१-१४) ता. १७-६-१७६९

भटंभट (२-१)

यादि निवाडा वेाा भटंभट व गोविंद नारायेण गुण्ये उपाध्ये मौजे चांफेट ताा पावस सुरु सबैन मया व अलफ

---

* रघुनाथ भटांचा काळ वंशावळ पाहतां इ. स. १७०० च्या सुमाराचा आहे. हे रघुनाथ भट आश्वीकर गुण्यांचे मूळ पुरुष महादेवभट यांचे, दत्तक वडील होत.

पंच

२ ता लांजे

१ नारो केशव देसाई

१ बालाजी अनंत देशकुलकर्णी

१ सदाशिव ज्योतिर्सी व धर्माधिकारी

येकूण नऊ पंच आहेत

उभयेता गुणीये यांचा जमिनीविसी वाटपाचा कलह लागला होता त्याची हकिकत मनास आणितां पूर्वी जमिनीचे वांटप जाहले होते त्यांत कम॰ पेश होते ते निमे निम सारखे करोन द्यावे येणेप्रमाणें ठराव जाहला **कलम १**

गयाली ठिकाण **मावलंगकर व कात्रा व भागवत** येकूण ठिकाण तीन त्यापैकीं एक ठिकाण मावलंगकर हे भटंभटाकडे चालत आले त्याची चवकशी मनास आणितां पूर्वि भटंभटाचे वडिलीं ईनामत घेतली हे ठिकाण त्याजपासून भटाकडें चालत आले त्यास वर्षे अजमासे साठ सत्तर जाहाली बाकी दोन ठिकाणे हि **गोविंदपंत** याजकडें आहेत त्याचा विभाग द्यावा म्हणोन भटंभट कजिया सांगो लागले त्याची चवकशी मनांत आणितां भटी इनामत घेतली त्यापूर्विंच गोविंद नारायेण यांचे वडिलाकडेस चालत होती त्याजपासून आजपर्यंत निसबत उपभोग होत आला असतां भटंभट आपला विभाग द्यावा म्हणोन मनसुभी सांगावयास प्रवर्तले. पंचा इतानीं मौजे मजकूरचे ग्रामस्तासी चवकशी केली. त्यावरुन **सिवाजी प्रभु-मुल्ये** समेत मौजे मजकूर याणी सडा लिहून दिले आहे कीं ही दोन ठिकाणें गोविंदपंत याजकडे आहेत हि उभयेता गुण्ये येकत्र असले वेलेची नव्हत आलीकडें **गोविंदपंताचे चुलते रघुनाथभट व पिते नारायणभट** यांचे स्वाधीन कमाविशीबद्दल आमचे आजे **गोविंद प्रभु** याणी केली भटंभटास या ठिकाणाविसीं कजिया करावयास सबंध नांहीं सदरहू ठिकाण स्वाधीन केले त्यापूर्वि **रघुनाथनटाचे पिते गोविंदपंताचे आजे व भटंभटाचे पणजे विभक्त जाहले, त्या आलीकडील ठिकाणें; तेव्हां भटंभटास ठिकाणाशी संबंध नाहीं** येणेप्रमाणें ठराव जाहला **कलम २**

कुणबी याचे तक्षिमेविषयी भटंभट कलह करीत होते त्याची पूर्विल हकिकत मनास आणितां वडिलार्जित कुणबी येक होता त्याचे लेक दोन त्यापैकी **हरदे पाध्ये भटंभटाचे पणजे** विभक्त होऊन **लिंबूचे वाडीस** गेले ते समई एक पोरगा घेऊन गेले एक पोरगा **गोविंद नारायेण यांचे आजे कृष्ण पाध्ये** याणी घेतला त्याची संतत हालि गोविंद नारायेण याजकडें आहे. लिंबूचे वाडीस हरदेपाध्ये एक पोरगा घेऊन गेले तो त्याजकडें आहे. लिंबूचे वाडीस हरदेपाध्ये एक पोरगा घेऊन गेले तो त्याजकडें काहीं दिवस होता पुढं मृत्यू पावला. त्यावरीं कांहीं दिवशीं हरदेपाध्ये हि निंबूचे वाडीस मृत्यू पावले. तदनंतर त्याचे पुत्र **केशवभट** व **विठलभट** मौजे मजकुरास आले, ते विभक्त राहून **गोविंद प्रभु मुल्ये** खोत मौजे मजकूर याजपाशी म्हणो लागले जे आमच्या जमिनीचे वाटप करुन देणें म्हणोन, त्यावरुन गोविंद प्रभु याणीं जमिनीचे वाटप करुन दिले त्याप्रमाणें आजपर्यंत चालत आहे. तेव्हां कुणब्याचा कज्या केला नाहीं. पुढां कांहीं दिवशीं **काशी प्रभु मुल्ये** याजवल येउन **विठलभट** बोलिले कीं, आम्हास कुणबी नाहीं आमच्या विभागास कुणबी आला होता तो मृत्यू पावला, येसे म्हणो लागले. त्यावरुन कासी प्रभु याणी रघुनाथभट गुण्ये यासी बोलावून आणून सांगितले की हे तुमचे बंदभाऊ यास विभाग कुणबी याचा आला होता तो कुणबी मृत्यू पावला यास कुणबी नांहीं तुमच्या विभागांस आला त्याची संतत तुम्हाकडें जाहाली आहे त्यापैकीं एक कुणबी तुम्ही यांस देणे तेव्हा हे गोष्ट रघुनाथ भट मान्य न करीत तेव्हां कासी प्रभु यानीं आपली भीड वेंचून एक कुणबी **भागा म्हाद्या** देविला, ऐसे असतां हालि भटंभट म्हणतात कीं निमे आमची तक्षीम द्यावी, त्यास त्या कालीं निमे तक्षिमेचाच अन्वय देविला असतां तरी ते समई कुणब्याचे पुरुष च्यार होते परंतु त्यां पैकीं एकच देविला तेव्हा वाटपाचा अधीन्वहे याप्रमाणें त्या कालीचे वृत्त पुढां, **हरभट भटंभटाचे तीर्थरूप** याणी जमिनेचा ताक्षिमेचा कजिया करुन **विशालगडास** गेले. आणि गोविंद नारायण व कासी प्रभु मुल्ये यांस पांच रुपये मसाला करून गडास नेविले आणि याची पंचाईत पंचाईतीकडे लावून दिली. तेथें

निवाडा जाहला कीं भागाम्हाद्यां कुणबी हरभटास देविला होता त्याचा लेक **माला माहाद्या** हरभटाकडे सुरळीत वर्तत नाहीं त्याचे मोबदल्यास दुसरा कुणबी **गोंद्या म्हाद्या** हरभटास देऊन त्याजकडें माला आहे तो गोविंद नारायण यांनीं घ्यावा याप्रमाणें **विशालगडी** निवाडा झाला तें पत्र बाजीनस आहे. ते समयीं हरभट कुणब्याचा विभाग होणेचा आहे.
+ +
+ बदला देविला तो मान्य होऊन समजोन आले येसे असतां हालि विभाग येणें म्हणोन भटंभट म्हणतात हे अनन्वीत. विशालगडच्या कराराप्रमाणें कुणबीयास संबंध नाहीं येणेप्रमाणें ठराव झाहाला **कलम १**

गोविंद नारायण याजकडें वडिलार्जित कुणब्याचे खेरीज दोन कुणबी आहेत. त्याची तक्षीम द्यावी. म्हणोन भटंभट कजिया करीत होते त्याची हकिकत मनास आणितां पूर्वि **दादभट ढेकरावा बावडे**प्रांतातून आला त्यासमई त्या प्रांतातून पांच सात कुणबी याचे संगतींत आलें त्यांपैकीं दोन येथें राहिलें. त्याकालीं कुणबीयास भक्षावयास नाहीं कर्जवाम कुणब्यास होते ते गोविंद नारायण यांचे चुलते रघुनाथभट याणी कुणब्यांचा अंगीकार करून त्यांचे कर्जवाम मागील होतें ते फेडून आपले संगतीस ठेविले त्यापासून आजपर्यंत गोविंद नारायण याजकडे आहेत. त्यास **अदमासे वर्षें पावुणसे** जाहली यांचें पाल ग्रहण याजकडेसच जाहाले सबब कुणब्यास समंध भटंभटास नाहीं **कलम २**

भटंभट व गोविंद नारायण गुण्ये यांचा विभागाविषयीं कलह लागला त्यास गोविंद नारायण यांजकडे जमीन जुमला व समेती चालते हि वडिलार्जित वतनीं याचा विभाग येणें म्हणोन भटंभट यांनीं खोती वडिलार्जित वतनी गोविंदपंताकडे चालते, गोविंदपंताकडे चालते हि खरी करुन देऊं म्हणोन भटंभटांनीं लिहून दिलें त्याची चवकशी मनास आणितां मौजे मजकूरचे समेतीची तक्षीम **मुळीये** याणीं गोविंदपंताचे चुलते रघुनाथभट यासी **कासी प्रभु** यांणीं चालवणुकेबदल, ती ज्यावर्षीं जशी तक्षीम देत त्याप्रमाणें चालवींत आले. समेतीसंबंधानें मानपान चालविणें तो मुल्याकडेसच चालत आला. गोविंदपंताकडे समेतीची तक्षीम चालत होती त्यास

सत्यसुधीनें पुसिलें, त्यानीं लिहोन दिले कीं आम्हाकडें समेतीची तक्षीम चालते ही आमची वडिलार्जित वतनी नव्हे. **आमचे चुलते रघुनाथभटाचे कारकीर्दीस चालवणुकेबद्दल कासी प्रभु याणी दिली. परंतु आपली वतनीं खोती नव्हे.** खोती वतनीं मुल्यांची याप्रमाणें लिहोन दिले ऐसे पुरातन वृत असतां भटंभट म्हणतात कीं, खोती गोविंद नारायण याजकडें चालते ती वतनी ऐसे म्हणत होते ते खोटे, समेती मुल्याची वतनीं खरी गुण्यास समेतीचा संबंध नांहीं. याप्रमाणे निवाडा झाला.

ठिकाण **सेवडा** बागायेती हे ठिकाण गोविंद नारायेण याजकडें अजमासें साट सतर वर्षे कमाविसी चालत आली त्यास हाली भटंभट निमे तक्षीम द्यावी म्हणोन कलह करुं लागले त्यावरून याची चवकशी मनास आणिता उभयतां गुण्ये व मुळ्ये.........मनास आणितां, **शिवाजी प्रभु व बापुजी प्रभु मुळ्ये** यांनीं सांगितले कीं पूर्वीं गोविंद नारायण यांचे चुलते रघुनाथभट यांस आमचे वडील कासीप्रभु यांचे तीर्थरुप गोविंद प्रभु आमचे आजे याणी ठिकाणे नेमावणेबद्दल करून दिले. परंतु वतनच करुन दिले नांहीं म्हणून बोलिले तेव्हां गोविंदपंत बोलिले कीं सदरहु ठिकाण आम्हांस मुळीयांनीं सतानीवृत वतन करून दिले, येसे सांगिले परंतु याचा दाखला कागदपत्र साक्ष मोझ्या नाहीं, तेव्हा पंचाईताचे मते जाहले कीं, येकाचे इनामावरि ऐकाने चालावे येसे जाहले तेव्हां मुळीये यास पुसिले तेव्हां सिवाजी प्रभु व बापुजी प्रभु मुळ्ये याणीं सांगितलें कीं, **गोविंदपंत वडीलवृद्ध आहेत.** ते इमान पुरस्कार सांगतील ते आम्हास मान्य आहे. त्यावरून गोविंद पंतास पुसिले, तेव्हां पांच पंचाइतासमक्ष व भटंभट गुण्ये यांचे समक्ष सांगितले कीं सदरहू ठिकाण आमचे चुलते रघुनाथभट यासी गोविंद प्रभु मुळ्ये......याणी नेमावणीबद्दल मिरास वतनीकरुन दिले ऐसे सत्य पुरस्कर सांगितले. त्यावरुन मुळ्ये यांनीं ठिकाण सोडून गोविंद नारायण यास दिले ऐसे असता भटंभट निमे तक्षीम मिळावी म्हणोन कजिया करीत होते. त्यास उभयेताचे वडील विभक्त असतां मुळ्ये याणी रघुनाथभट यांसच दिले. याप्रमाणें निवाडा झाला असतां भटंभट आपली तक्षीम द्यावी ऐसे म्हणतात ते अप्रमाण छ. १२ सफर.

लेखांक ३२

चांफेट दप्तर नं. १

इ. स. १७६९

पुा मसुदा उभयता गुण्यांचे मनसुबी प्रकरणी

भटंभट व गोविंद नारायेण यांचा विभागा विषयी कलह लागला त्यास गोविंद नारायेण याजकडें जमीन जुमला व समेती चालते हि वडिलार्जित वतनीं याचा विभाग येणे म्हणोन **भटंभट** यांनीं समेती वडिलार्जित गोविदपंताकडे चालत्ये ही खरी करून देऊं व म्हणून भटंभटी लेहून दिल्हे त्याची चौकशी मनास आणिता मौजे मजकूरचे समेतीची तक्षीस मुल्ये याणी गोविंद-पंताचे चुलते रघुनाथभट यासी काशीप्रभु यानी चालवणुके बद्दल तक्षीम दिल्ही ज्या वर्षी जशी तर्क्षीम देत त्या प्रो चालवीत आले समेती संबंधानें मान पान तो मुल्याकडेसच चालत आला व गोविंद नारायेण याचकडेस समेतीची तक्षीम चालत होती त्यास सत्य सुधीनें पुसिले त्यानें लेहून दिले कीं आम्हाकडें समेतीची तण चालत्ये हि आमची वडिलार्जित वतनी नव्हे आमचे चुलते **रघुनाथ-भट याचे कारकीर्दीस चालवणुके बद्दल कासीप्रभु याणी दिल्ही** परंतु आपली वतनीं समेती नव्हे

सिवाजी प्रभु व बापूजी प्रभु मुळ्ये यांनीं सांगितले कीं गोविंदपंत वडील वृद्ध आहेत ते जे इमान पुरस्कर सांगतील ते आम्हास मान्य आहे त्येवरुन गोविदपंतास पुसिले तेव्हां पांच पंचाईतासमक्ष व भटंभट गुण्ये यांचे समक्ष सांगितले कीं सदरहू ठिकाण आमचे वडील चुलते रघुनाथभटयास गोविंद प्रभु मुळ्ये, समेती यानी नमावणीबद्दल सिरास वतन करुन दिल्हे येसे सांगितले त्यावरून मुल्ये याणी

समेती वतनीं मुल्याची याप्रमाणें लेहून दिल्हे येणे प्रमाणें पुरातन वृत्त असतां भटंभट म्हणतात की समेती गोविंद नारायण याजकडे चालत्ये हि वतनीं येस म्हणत होते ते खोटे समेती मुल्याची वतनी खरी गुण्यांचा समेतीशी संबंध नांहीं या प्रमाणें निवाडा झाला.

ठिकाण सोडून गोविंद नारायेण यास दिल्हे येसे असतां भटंभट तक्षीम यासी म्हणून कज्या करीत होते त्यास उभयेतांचे वडील विभक्त असता मुळयेयानीं रघुनाथभट यासच दिल्हे.

साक्षी

२ तर्फ लांजे
 १ नारो केशव देसाई
 १ बालाजी अनंत देशकुलकर्णी
१ सदाशिव जोशी ताा हरचिरी
१ सोमदे प्रभुदेसाई ताा हरचिरी
३. १ महादेव पाध्ये
 १ सिवाजी प्रभु
 १ बापूजी प्रभु

सुरु तिसा सीतेन मया व अल्लफ

लेखांक ३३

[मठशाखेपैकीं धोंडो जनार्दन गुण्ये कोंकण सोडून काशीस राहावयास गेले होते. असें या उल्लेखावरून दिसतें.]

धोंडो जनार्दन (१-१२) मठ आठल्ये घराण्याचा इतिहास पान १२८
इ. स. १७७३

लेखांक ७०:— असल पेशव्यांचे शिपोशी गांवाबद्दलचे निवाडपत्र
१९-३-१७८३

"१ सिउबाई व चिमाबाई यांचे पत्र गणेशभट आठले यास त्यांतील अन्वय, सिदंभट व रामभट व बावणभट यासी शिपोशीविसीं कजिया

लागला आहे, त्यास तुम्हास कांहीं ठावके असेल तरी लेहून पाठवणे तुम्ही पत्र पाठाविले त्यांस तुम्ही व ते विभक्त जालियावर **रुद्रभटी** गांव मेळविला हे आम्हास सत्यसुकृते ठाउक आहे ते चिरंजीव आपाजवळ लिहून दिल्हे मिा ज्येष्ठ (वाा) ५ मुकाम श्री काशी सन १८३० हस्ताक्षर **धोंडो जनार्दन गुणे** कासीतील वर्षे.''

लेखांक ३४

[चांफेट शाखेचे मूळ पुरुष केशंभट्ट गुण्ये यास पुत्र तीन; एक हरभट, दुसरे कृष्णंभट व तिसरे गोविंदभट. प्रथमपुत्र हरभट यांचे वंशज—हें चांफेट शाखेंतील वडील घराणें—आज चांफेटास आहेत. तिसरे पुत्र गोविंद यांचे वंशज म्हणजे आजची कऱ्हाडकालेंशाखेंतील गुण्ये मंडळी होत. गोविंदभट किंवा त्यांचे वंशज चांफेट सोडून इ. स. १७०० च्या सुमारास देशावर कऱ्हाड येथें आलें असावें. दुसरे पुत्र कृष्णंभट यास पुत्र दोन, एक रघुनाथभट व दुसरे नारायणभट. रघुनाथभटाचे पुत्र महादेवभट, इ. स. १७२० च्या सुमारास देशावर साताऱ्यास आले. त्यांचे वंशज म्हणजे आश्वीकर गुण्ये होत. कृष्णंभटाचे दुसरे पुत्र नारायणभट यास नातू दोन—चिमणाजी गोविंद व गोपाळ गोविंद. त्यांत चिमणाजी गोविंदाचे पुत्र विठ्ठल चिमणाजी. या लेखांकांतील वांटणीपत्र सदरील विठ्ठल चिमणाजी व गोपाळ गोविंद या पुतण्या-चुलत्यांमधील आहे. पुढें १९ व्या शतकांत विठ्ठल चिमणाजीचा निर्वंश झाला. सध्यां गोपाळ गोविंदाचे वंशज चांफेटास आहेत. त्यांचेकडे हीं सर्व वतनें चालू आहेत.]

श्री.

विठलभट (११-३), गोपाळभट (११-२) चांफेट

ता. २३-७-१७७३
श. १६९५ विजयनाम संवत्सरे
श्रावण शुा ४ भ्रुगुवार

समजीपत्र वो राजश्री **विठलभट गुणे** व वो राजश्री **गोपाळभट गुणे** मौजे चांफेट ताा पावस सुरु आर्बा सबैन मया व अलफ उभयेता भटजी भाउपणाविसी जमीन जुमला वगैरे वाटपाविसीचा कजिया घेऊन माहाली राजेश्री देसकाकडें उभयेता आले त्यावरुन राजेश्री **बाबुराव शंकर व माहादाजी रघुनाथ व सदासीव नारायेण देसाई** ताा मजकूर व राजश्री **बाजी प्रभुदेसाई** ताा **हरचिरी** चौघाहि उभयेताचे वृत्त कागद पत्र सडी साक्ष पहिल्यापासून व आलीकडील मनांस आणून त्यांतील आर्था चितांत आणून उभयेताची समजी काडिली.

खासगत ठिकाणे आगरजमीन व भुईभाटले सीवार सेत .भात जे आहे ते नमस जागलघाट सुध्धा कंमपेशा पाहोन निमे निमे प्रमाणें वाटून घ्यावे कलम १. खुद कुणबी म्हाद्ये याची घरे पांच आहेत त्यापैकीं येक घर माला म्हाद्या **विठलभट** या याजकडें व हाली च्यार घरे गोपाल-भट याजकडें आहेत याविसी कलह होता त्यास जाग्या म्हाद्या कुटुंबा-सुद्धा येक घर विठलभट यास द्यावा —कलम १.

गयाली ठिकाणें विठलभट याज-कडें पूर्वेकडील १ येक व त्याचे पश्चमे कडील दोन ठिकाणे गोपालभट याजकडें याप्रमाणें भोगवटा आहे त्यापैकीं दोन ठिकाणेपैकीं आपणास विभाग यावा या आर्थी विठल-भट याचा कलह त्यास सदरहू दोन ठिकाणापैकीं विठलभट याचे ठिका-णलगते ठिकाण त्या ठिकाणांपैकीं **गोपालभट यांचे** घराचे पूर्वेकडील जमीन सपात धारोधार विठलभट यासी द्यावीं सदरहूं जमिनीची हद गावीं येऊन करुन देऊ तेणेप्रमाणें उभयेताहि वर्तावे —कलम १.

(मागील बाजू)

ठिकाण सेवड हे पहिल्यापासून गुणे याजकडेस चालत आहे परंतु आलीकडें मुल्ये आपले ठिकाण येसे म्हणतात याजकरितां त्या ठिकाणची गांवीं चौकसीमुले तोड होऊन गुण्याचे ठिकाण येसे खरे जाहाल्यास उभ येताहि निमेनिम प्रमाणें वाटून घ्यावे —कलम १.

येकून च्यार कलमाची तोड समजीमुळें सदरहुप्रमाणें काडिली याप्रमाणें उभयेताहि वर्तावे ठिकाणाचे वाटप करुन द्यावयाचे आहे त्यास गांवीं येउन हदमहदूद करुन कंपेश ठिकाणे असतील ते निमेनिम प्रमाणेवाटून त्याची याद आलाहींदा करून देऊं त्याप्रमाणें उभयेताही उपभोग करून सुखरुप राहावे फिरोन आघाटी घेउं नयें आघाटी घेईल त्यास त्याचे वडिलाची सपत असे छ २ जमादिलोवल मुकाम रत्नागिरी शके १६९५ विजयनामसंवछरे श्रावण शुध च्यतुर्थी भ्रुगुवार श्रीा **अंताजी जिवाजी मोकादम** ता‍ा **पावस**

निशाणी

*विठलभट्ट गुण्ये सदर्हु लिहिल्याप्रमाणें मान्य असो स्वदस्तुर.

गोपालभट गुण्ये सदरहु लिहिल्याप्रमाणें मान्य असो दुस्तुर खुद.

लेखांक ३५

[पागा–आश्वीची संपूर्ण माहिती.]

सवाई माधवराव-पेशवे रोजनिशी

प्रकरण १८ वें–वेठ पान २४४ ते ४६

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं

“१०८९ (१०५)–**प्रांत गंगाथडी** येथील सालाबाद गवत कापून द्यावयाची नेमणूक आहे, त्यास वेगारीमुळें रयतेस उपद्रव लागतो सबब गवत कापणावळ व गंजीस आणणावळ सुद्धां दर हजारीं रुपये २ प्रमाणें रयतेपासून घ्यावयाचे करार केले असेत. तरी सदरहू शिरस्तेप्रमाणें प्रांतांतील मामलेदारापासून पैका घेणे ज्याजती वेगारीविशी वगैरे उपद्रव न लावणें म्हणोन;

खमस सबैन मया व अलफ रमजान ९

---

*बाळबोधींत या दोन ओळी आहेत.

सनदाः—

१ **गंगाधर शंकर** यांस कीं, दिंमत पागा हुजूर गवताची नेमणूक, पुले, पागाठाणे **आसी खुर्द** येथील सुमार,

५०,००० तर्फ **हवेली संगमनेर**
३०,००० तर्फ **राहुरी**
२०,००० तर्फ **बेलापूर**
१,००,०००

एक लक्ष गवताविशी सनद

१ **सेखाजी मुळे** यास सनदकी तुम्हाकडील पागा **जोर्खे** येथें आहे. तेथील बेगमीस मौजे मजकूर पैकीं गवत पुले सुमार ७५००० पाऊण लक्ष तर्फ हवेली संगमनेर येथील बेगारीनें कापून द्यावयाची नेमणूक आहे त्याविशीं.

१ **गिर्जोजी बर्गे** यास कीं तुम्हाकडील पागा मौजे **आसी बुद्रुक** तर्फ हवेली संगमनेर येथें आहे, तेथील बेगमीस तर्फ मजकूर बेगारीनें मौजे मजकूरचे कुरणापैकीं गवत पुले सुमार, २५,००० पंचवीस हजाराची नेमणूक आहे त्याविशी सनद १

१ **गोविंदराव बारावकर** यास कीं तुम्हाकडील पागा **मौजे देसोंडी** येथें आहे तेथील बेगमीस मौजे मजकूरचे कुराणांपैकीं तर्फ राहुरी येथील बेगारीनें पुले सुमार ७५,००० पाऊण लक्षाची नेमणूक आहे त्याविशी सनद.

१ **निळकंठराव रामचंद्र** यास कीं तुम्हाकडील पागा कसबे. **नांदूर** येथे आहे तेथील बेगमीस कसबे मजकूरचे कुरणापैकीं तर्फ राहुरीं येथील बेगारीने गवत पुले सुमार ४०,००० चाळीस हजार नेमणूक आहे त्याविशी सनद.

१ **नारो आपाजी** यास कीं तुम्हाकडील खिलार मौजे **सांगवी** येथें आहेत तेथील बेगमीस ढग्याचे डोंगरीहून गवत तर्फ हवेली संगमनेर

येथील वेगारींनें गवत पुले १०,००० दहा हजार घ्यावयाची नेमणूक आहे त्याविशी सनद.
६

(1089) It was usual for the Rayats of Prant Gangathadi to supply labourers free of charge for cutting grass for government. As this arrangement was found to be a source of annoyance to the people it was ordered that in lieu of forced labour Rs. 2 for each thousand bundles to be cut should be levied from the Mamlatdars *of province.*''

A. D. 1774-75

लेखांक ३६

[मठ शाखेचे गुण्ये व हळवे यांच्यामध्यें अठराव्या शतकाच्या मध्यांत जो कज्या, खोती व इतर कांहीं वतनी ठिकाणासंबंधीं सुरू झाला, त्याचा निकाल श. १७०० (ले. ४७ पहा) मध्यें लागला. या कज्यांत पुढें देत असलेली पुरसीस सदाशिवभट गुण्ये यांनीं दाखल केली आहे. कज्या विशालगडच्या प्रतिनिधींचे कोर्टांत चालला होता. या पुरसिसीवरून मठ शाखेची तळकोंकणांत विजयनगरचा अंमल होता तेव्हांपासूनची माहिती उपलब्ध झाली आहे.]

मठ दप्तर
श्री
सदाशिव भट (१-१०) मठ — इ. स. १७७४
श. १६९६

पुा पुरसीा सदासिव भट गुणे सुरु खमस
सबैन मया व अलफ

तुम्हां गुण्यांच्या वशांत खोती कोण कोणी केली वर्षे किती कारकीर्द कोण दरवोस्त किंवा
उन गांवास आले त्यावेळेस चौधा ग्रहस्तास आणिले तेव्हां दुसरा पाट काढून ठिकाणे वाटून

तक्षिमेनें याचा झाडा लाउन देणे कलम १. याचे उतर आमचे वडिल आसोडे यांत नांदत असतां समई वोढया पलिकडील लावगनांत पाट पाणी काडून वसाहत केली होती त्याजवर कनकगीर गोसावी याणे आसोडे व खानु व आजणारी या तिही गांवची जमीन हकिमापासून मागोन घेउन गाव संचत्र करुन देवास इनाम करुन घेतला आणि देवाजवल मठ बांधिला म्हणोन गांवाचे नाव मठ येसे पडिले त्या समई आपले वडिलानीं गांवच दिल्ही पुढें कुणवाव्याचे वाटप जाले त्या समई आपले आजे कृष्णभट हे वडिलकीचा कारभार करीत परंतु वेदिक खोतीच्या कारभारांत फारसें गम्य नाहीं यास्तव **गोविंद जोसी** यास दिवाणांत जाबस्वालास व गांवची वेवट सांगितली होती त्या पलिकडें हलबे याणी खोतीचा कारभार केला नाहीं कृष्णंभट सुध्दा वेदिक होते त्यास ते मृत्य पावल्यानंतर पुढें कारभार **केसो रुद्र भाटवडेकर** यांसी सांगितला पुढील वृत कारि-

(मागील बाजू)

मूलमण व खोती व ग्रामोपाधिक व इनाम जमीन हकिमीं येसी वतनदारी करुन घेतली ते कारकीर्द राजानरपती विद्यानगर येसी आख्या आहे. त्यापासून सर्व अधिकार आमचे वडिल करीत आले त्याची नांवे लिहावी तर बउता वर्षाच वृत आहे यास्तव नांवे लागत नांहीं त्या आलीकडें कारकीर्द विज्यापूरच पातशाई तेव्हां पुढें सैदास गांव मोकासा जाहला आपले पुरुष ण्यांत तपसीलवार लिहून दिल्हे आहे.

रामभट त्यांचे पुत्र शंकरभट त्यांचे पुत्र विष्णुभट हे सर्व गांवचा कारभार करीत होते त्याजवर विष्णुभट मृत्य पावले तेव्हां आपले आजे कृष्णभट गर्भी होतें तेव्हां गणज्या गुरव व गणनाथ सिवगण याणी गांवची वैवाट कांहीं वर्षे केली आजे कृष्णभट जाणते जाल्यावर चिंद्रवेली,

[This Puravani Purasis of Sadashivbhat Gunye (in written 17th A.D.) is very important. It gives the historical information about the village Math. It is said 'that this village was brought under habitation by a Gosavi by name Kanakagiri; taking from the officer of govt. (Hákim), the parts of the lands of 3 different villages—Asode; Ajanari and Khanu. He then built a church (Math) near God Someshwar and at that time the village was given Inam to God Someshwar. Hence the village was named as Math. This event took place during the reign of Vijayanagar'. Sadashivbhat says that the names of his ancestors belonging to that period are not known, but all the original rights of the village were granted to them who were brought there (in Math) from Asode by Kanakagiri-Gosavi. Names of his ancestors from the reign of Vijapur in Kokan are given as Rambhat, his son Shankar, his son Vishnu. During the reign of Shivaji Vishnubhat's son Krishna was living in Math and he enjoyed all the original rights.]

---

१. या लेखांकाच्या प्रारंभीची डावी बाजू यानंतर वाचणें.

लेखांक ३७

[मठ शाखेचे गुण्ये व मठचे हलबे यांच्यामध्यें मठगांवच्या खोतीसंबंधीं कज्या चालला असतां, सदाशिवभट गुण्ये यांनीं मठच्या खोतीचा इतिवृत्तान्त दिला आहे. विजयनगरचा तळ कोंकणांत अंमल होता तेव्हांपासूनची साग्र माहिती दिली आहे.]

मठ दप्तर श्री इ. स. १७७४
सदाशिवभट (१–१०) मठ श. १६९६

पुा पुरसीस **सदासिवभट गुणे** सुरु खमस सबैन

तुम्हा गुण्याकडें खोतीचा कारभार चालला **प्रथम प्रथम वतन प्राप्त जाले ते कारकीर्द विद्या नगरचा नरपती राजा याची** त्यापासून आपले वडिल आनभवीत आले त्यास वर्षे आज ता आजमास जाली त्या पुरुषाची नांवे ठउक नाहीं आलिकडील खोती केली त्या पुरुषांची नांवे ठाउक आहेत **नावनिसी कारकीर्द ईदलशाई**

१ रामभट
१ त्यांचे पुत्र शंकरभट
१ त्यांचे पुत्र विष्णुभट
३

तिघा पुरुषानीं संतत दरोबस्त खोती केली

हलबे व **डोंगरे** याणी खोती केल्याची स्मर्ते येसी पंच्येयेसी वर्षा पलिकडे डोंगरे व हलबे याजकडे खोती कधी चाललीच नाहीं पंच्येयेसी वर्षा आलिकडे आपले **बाळंभट गुणे** याणी खोतीच्या तीन तक्षिमा करुन येक खुद आपल्याकडे ठेउन येक **बालंभट हलबे** यासी दिल्ही व येक **रामभट डोंगरे** यासी दिल्ही याप्रमाणें करुन पस्तीस च्यालीस वर्षे चालविले त्याखेरीज दरोबस्त आगर तक्षिमेनें डोंगरे व हलबे याणी पंचेयेसी वर्षा पलिकडें खोती कधी

(मागील बाजू)

त्यास वर्षं, त्याजवर विष्णुभट मृत्य पावले त्या आलिकडे त्यांचे पुत्र केलीच नाहीं तक्षिमेनें च्यालीस वर्षा आलिकडें आम्ही दरोबस्त

कृष्णभट याणी खोती केली वर्षे आजमासे सुमार ४५ जाली ते समई कारकीर्द थोरले सिवाजाराजे पर्यंत दरोबस्त वतन आनभवीत आले. त्या आलीकडें तक्षिमेनें बालंभट गुणे याणी खोतीं केली आमासे वर्षे पस्तीस च्यालीस त्या आलीकडें खोतास वर्षे दरोबस्त खोतीचा कार (भार) आम्हाकडे आगदीच चालला नाहीं.

सोडली त्यास वर्षे च्यालीस बेतालीस जाली त्या आलीकडे डोंगरे व हलवे कांहीं दिवस तक्षिमेनें करीत होते आजमासे वर्षे वीस वर्षे त्या आलीकडे वीस वर्षे दरोबस्त हलवे करतात.

[In this paper complete history of the Khoti Vatan of Math and the other rights from the reign of Vijayanagar upto Peshava, in Kokan, is given by Sadashivbhat Gunye in A. D. 1774.]

लेखांक ३८

[मठ शाखेंतील गुण्यांची कोंकणांत विज्यापूरच्या आदिलशाहीचा अंमल होता तेव्हांपासूनची वंशावळ, गुण्ये व हळवे यांचेमधील वाद चालू असतां दाखल केली आहे.]

मठ दप्तर

श्री

सदाशिवभट (१-१०) मठ　　इ. स. १७७४

श. १६९६

जबानी सदाशिवभट गुणे मौजे मठ ताा हातखंबे सुरु खमस सबैन.

पुरसिसींत पुरुष लेउन दिल्हे ते विज्यापूरचे पात शाई यांचे कारकीर्दीत

१ रामभट,निपणजे यांचे तीर्थरूप

कृष्णंभटाचे पुत्र

१ विष्णुभट

१ बालंभट

१ अनंतभट

१ त्यांचे पुत्र शंकरभट निपणजे
१ शंकरभटाचे पुत्र विष्णुभट पणजे
१ त्यांचे पुत्र कृष्णंभट आजे कारकीर्द सिवाजी राजे

१ ज्यनार्दनभट
४

वालंभटास पुढें संतत नाहीं वरकडाची संतत आहे त्याची
++

२ विष्णुभटाचे पुत्र
१ कृष्णाजीपंत
१ राघोपंत
२

२ अनंतभटाचे पुत्र
१ सदासिवभट
१ रामभट

१ ज्यनार्दनभटाचे पुत्र धोंडोपंत

लेखांक ३९

[मठ शाखेचे गुण्ये व हळबे यांच्यामध्यें वतनीं ठिकाणासंबंधीं व कुणबाव्यासंबंधीं वाद चालू असतां, विशाळगडच्या कोर्टांत सदाशिवभट गुण्यांनीं पुढील करिणा दाखल केला आहे. त्यांत निरनिराळ्या वेळीं गांवांत कोणकोण कुणबावेकरी होते, हें कारकीर्दवारीनें दिलें आहे. ऐतिहासिक दृष्ट्या हा कागद महत्त्वाचा आहे.]

मठ दप्तर श्री शंकर नकल ता. २१-५-१७७५
सदाशिवभट (१-१०) मठ शक १६९७ वैा वा ८

करिणा जबानी **सदाशिव भट गुण्ये** मौजे मठ ता हातखंबे सहुर खमस सबैन मया व अलफ मौजे मजकूरपैकीं कुणबावा आठवी तक्षीम **टेंबकर सुधा** आपला त्यास **बाबजी गोविंद** हलबे म्हणतात कीं, टेंबकर सचत्र कुणबावेदार तुमच्या कुणबाव्यांतील नव्हे त्याजवरून आम्हीं उभ-

येतां सुभां आलो. ता आज्ञा जे कुणवाव्यांचा करिणा लेहून देणें म्हणोन त्याजवरून कुणवाव्याची मूळ हकीकत ठिकाण, झाडे, आगर जमिनीचे व परसुपरडे

१ गुण्ये सारणीवरले ठिकाण
१ सारणीचे दक्षणेस रुद्रभट भाटवडेकर
१ त्याचे दक्षिणेस टिकाण गुण्ये
१ त्याच्या दक्षणेस हलबे
१ त्याच्या दक्षणेस रामभट डोंगरे
१ त्याच्या दक्षणेस केशभट डोंगरे
१ त्याच्या दक्षणेस देवस्थली
१ त्याच्या दक्षणेस वलामा

८

येकूण ठिकाणें आठ आगर पाटावरती पाणदी खालती आगराची वाटपे, आगर पाटा खालती आसेत आपल्या आगराचे जमिनीची कीर्द मशागत कृष्णंभट आपले आजे येकले म्हणोन न होये यास्तव टेंबकर गणपतीचा पुजारी वाडा खेडकुली मौजे चिंद्रवली येथील दोघे बंधु तांबायांची आगरे सिंपत असत त्यांतील येक बंधु आणून भाटवडेकर व हलबे या दोहींच्यामध्यें आपलें ठिकाणांत ठेविला त्यास आपले आगर त्या ठिकाणांतील वगैरे सिंपत होता उपरांता सर्वांनीं आगरे नेमावली त्याजवर आगरे लागास यावयाचे सुमारे देवस्थली व वलामा गयाल पडिले त्यांच्या आगराची मशागत कोणाच्या वस्तु न होये तेंव्हां कुणवावे सारखे केले.

बीा तपसील कुणवावे

१ गुण्ये
१ भाटवडेकर व निमे देवस्थलि गयालसुधा
१ हलबे व निमे गयाल वलामा सुधा

१ दामभट डोंगरे निमे गयाल व-
लामा सुधा
१ केशभट डोंगरे निमे गयाल
देवस्थली सुधा

५

त्याजवर सीवार वाटप जाहाल्यावर, (कृष्णभट येकटे सा) टेंबकर (यास वरकसली सुद्धां चालवणुकेस) आपले आठवे तक्षिमेंतील निमे विभाग करून दिल्हा यासिवाय वरकसलीचे कुणबावे

१ पूर्वेकडील कोंड **गणेशभट भाट-
वडेकर**
१ पश्चिमेकडील कोंड **गणेशभट
डोंगरे**
१ गुरव देव सनिध पूर्व पश्चिमेच्या-
मध्यें

गुरवास येकट्यास न ओढे तेव्हा त्याणें

(पान १ मागील बाजू)

निमे कुणबावा म्हारास लावला
येकूण कुणबावा येक.

३

येकूण आठ कुणबावे सदरहू प्रमाणें आठांनीं दिवाण दस्त पडेल तो तो सारखा द्यावा याप्रा कांहीं वर्षे चालविलें त्याजवर टेंबकर याची बहीण त्याच्या घरी होती ते सर्प डंश होऊन मृत्यपावली आणि सर्प घरालगतां गडगा होता यांत राहिला तो मारावयास सांपडेना व तेथुन न जाई तेंव्हां घर सोडावे लागले ह्या वेळेस आम्ही आपले गोठ्यांत जागा देउन ठेविला तेंव्हां गुरे वाड्यांच्या उत्तरेस जुना घरबंद होता तेथें आपले घरचे उपाध्यपण **रामकृष्णभट व गोविंदभट;** नवाथ्ये (लांजे प्रांताहून आले) त्यास

देउन मुलास अध्यान सांगावयानिमित्य मुखवस्तु त्या घरवंदावर (घर बांधोन) ठेविले होते त्यास रामकृष्णभट मृत्य पावलें गोविंदभट यात्रेस गेले तेव्हां त्या घरांत भाकड गुरे ठेविली दुबती गुरे तीन च्यार होती ते घराच्या दक्षणेस घरा संनिध ठेविली त्याजवर आपले आजे **कृष्णंभट मृत्य पावले त्या समई केसो रुद्र भाटवडेकर** त्यांचे **मेहुणे** त्यांच्या हाती आपले चुलते **विष्णुभट व बालंभट व अनंतभट व ज्यनार्दनभट** हे **चौघे लाहान होते** ते त्यांच्या स्वाधीन केलें व गांवची वैवाट त्यांच्या स्वाधीन केली त्याणीवैवाट दाहावीस वर्षे केली पुढें आपले चुलते जाणते जाहाल्यावर त्यांच्या व यांचा वैवाट संमधे हर्षामर्ष लागला उपरांत विष्णु भट मृत्य पावले त्याजवर केसो रुद्रहि सा, चौ महिन्यांनीं मृत्य पावलें व **हरबा टेंबकर** मृत्य पावला तेव्हां त्या घरांत **हारि गणेश केलकर** गुमस्ते नि॥ कुलकर्णी हे कांहीं दिवस हलबे यांच्या सोप्यांत होते तेथून (गोठ्याची दागदोजी करुन) घराची दाग दुजी करुन येक दोन वर्षे होते ते गेल्यावर **भानभट** डोंगरे भाईबंदिच्या कलह निमित्य येक दोन वर्षे राहिले होते ते गेल्यानंतर तें जागा रिकामीच पडली होती पुढें कुणबावे करी **अंतो विष्णु डोंगरे** मृत्य पावले व **नारो विठ्ठल डोंगरे** कुणबावा टाकून चिंद्रवलीस गेले त्याजवर **नारो गणेश भाटवडेकर कोंडकरी** याणी दोन च्यार वर्षे गांवची वैवाट केली पुढे **भालेराई** जाहाली त्यामुलें दोन वर्षे गांव परा

२

गंदा होता त्याजवर **मुलकाच्या संचणीस कासी रगंनाथ पोतदार आले** त्याची व **बाल जोसी** हलबे यांची गांठ **लांजेच्या** मुकामी पडली तेव्हां गांवास कौल देऊन गांवची कीर्द करणें म्हणोन सांगितले त्याजवर गांवी येउन गांवची वसाहात केली त्यासमई केसो रुद्र व अंतोविष्णु व नारो विटल हे तीन कुणबावे पडले सबब गांवात होते त्याणी कुणबावे वाटून घेतले बी॥ तपशील

१ गुण्ये खासगत केसोरुद्र भाटवडेकर यां॥	२
१ हलबे व नारो विठल डोंगरे कोंड येकूण	२

१ रामभट डोंगरे व केशवभट डोंगरे यो २
१ नारो गणेश भाटवडेकर याणे आपला आपण केला १
१ गुरव व म्हर उभीरास होता १
५ ८

याप्रमाणें पांच सात वर्षे चालविले त्याजवर नारो गणेश मृत्य पावले तेव्हा गावच्या तक्षीमा तीन करुन येणे प्रा गांव चालविला बीा

१ गुण्ये बालंभट
१ बाल जोसी हलबे
१ हरभट व रामभट डोंगरे उभयेता बंधु
३

याप्रमाणें तिघा जणांनीं तक्षिमा करुन चालविल्या त्यासमई बाल जोशी हलबे लिहिणार जाबसाली असत याजकरितां वेवाट दिवाणांत अथवा माहाली जाणे ते हलबे(स)च पुढें (केले होते तेच वेवाट आमचे विद्यमानें करीत पुढें) सदरहू तक्षिमा तीस बतीस वर्षे-परियेंत (त्रिवर्गींनीं चालविल्या) त्याजवर (आमची नातवनीं जाली) हलबे याची चाल चौ गोष्टीनें मातबरी पडलीं तेव्हां आपले सोप्यांत हरि गोविंद नानल होते. त्यांच्या लेकीचे लग्न जाहाले त्यासमई हलबे याणी साडेच्या मानाकरितां कलह केला त्यासमई बालंभट आपले चुलते याणी साडेचा मान दिल्हा नाहीं यामुळें घरीं अनापेत पडोन आपले मातुश्रीस आठ वर्षे बहुत बरे वाटत नव्हते देवधर्मकरितां निवडले जे हलबे या समागमे तुम्ही (कलह करतां म्हणून तुमचे घरी अनापेत आहे; हलबा वाद कलह न केला म्हणजे बरे होईल येसे सांगितले-वरुन गुण आला.) किमपि कलह करु नये व खोती सोडाल तरि बरी (ते समई तक्षिम सोडली) तेव्हा आपली मातुश्री बरी जाहाली त्यापासून तीर्थरुप सुखवस्तु दाखल होते त्यास चालीस बेचालीस वर्षे अजमासे जाहाली मध्यें कांहीं दिवसांनीं माहादाजीपंत करकरे गोठ्याच्या जाग्यावर आपणास पुसोन वर्ष दोन वर्ष राहिले होते ते गेल्यावर रामभट डोंगरे कोंडामध्यें होते ते आपले ठिकाणांत घर बांधोन

(पान २ मागील बाजू)

राहणार म्हणोन आले त्यास पाटावर घर हलबे याणी बांधले पाणी त्याच्या ठिकाणास निर्मल नांहीं त्यामुळें आमच्या सेजारी वाड्याच्या जाग्यावर येक दोन वर्षे राहिले होते उपरांत आपले ठिकाणांवर जाउन हलबे याच्या धारा घालून पाट नेउन राहिले उपरांत **केसो बलाल, भट** आमच्या ठिकाणांत येउन राहिले. त्याणी दाहा पांच रोप्या व फणसाची झाडे दोनतीन केली होती त्यास ते गेल्यावर हलबे जबरदस्तीनें आपले माणसाकडून सिंपणे करीत व आलीकडे दाहापांच रोप्या गोविंद बलाल हलबे याणी रोप्या व नारळ माड येक घातले तेव्हां आपण कज्या करुन अडथळा करावा तो मातुश्री आपली अद्यावस्त राहिली होती यास्तव कलह केला नांहीं इतक्यांत **धोंडो हरि डोंगरे** याणी रोप्या उपडून टाकिल्या तदनंतर येकमेकास धाही देऊन दिवाणांत गेले दो दिवाणाहून पंचाइत नेमून घेउन गांवी आले पंचाईत आले नांहीं तेव्हां आमची मातुश्री वारल्यानंतर पंधरा दिवसीं हलबे यांचा व आमचा परसु व परडे निमित्य कजिया होउन पुढे **विशालगडास** गेलो तेथें कतबे कारणें कुणबाव्याचे वगैरे दिल्हे त्याच्या सड्या साक्षी जाहाल्या पुढें फडशा व्हावा तो पंत प्रतिनिधि बरे वाटत नव्हते म्हणोन उभयेतांस निरोप दिल्हा कारकून पाठउन ज़मीन जुमला पाहोन फडशा करावा येसा करार (करुन आलो) तों ते (मृत्य पावले) मग तैसाच राहिला डोंगरे व हळबे आपल्या ठिकाणांत कलह करितात तरि आपले वतनी ठिकाण, या उभयेतास समंध नांहीं हे खरे करुन देउ* सदरहू वाडा धोंडो हरि याणी बांधो नये म्हणोन आडथला केला आहे. त्यास हि जागा आपली वतनीं म्हणोन वाडा बांधत आहो, आपली जमीन नव्हेसी जाहाल्यास सरकारचे गुन्हेगार छ २१ रावल.

[This Karina of Sadashivbhat Gunye, written in 1774 gives the information about the bringing under habitation,

* येथून अक्षर निराळें; हें अक्षर व कंसांत घातलेल्या शब्दांचें अक्षर सारखे आहेत. पाठीमागून कोणी तरी दुरुस्ती केली असावी. कंसांत घातलेले शब्द मागून ओळींमध्यें लिहिले आहेत. वळण निराळें आहे.

the village Math and, about the various tenants, brought by Krishna Gunye in Math.]

लेखांक ४०

[गुण्ये व हळबे यांच्यामध्यें वतनी ठिकाणासंबंधीं, कुणबाव्यासंबंधीं व खोतीसंबंधीं वाद झाला. पुढील कागदांत वतनी ठिकाणासंबंधींची माहिती आली आहे.]

विष्णु कृष्ण (२-३) मठ **श्री** **इ. स. १७७५ आक्टोंबर**
आश्विन शुा १, १६९७

दाा बो **विष्णु कृष्ण गुण्ये** मौजे मठ ताा हातखंबे सुरु सीत सबैन मया व अलफ कारणे लेहून दिल्हा कतबा येसाजे मौजे मारचे खोतीचा व कुणबाव्याचा कजिया निमित्त **विशाल गडी** मनसुबी ++++ गांवात **बाबजी गोविंद** हलबे याणी जबरदस्तीनें **श्री सोमेश्वर** देवळा संनिध कासाराचे गयाळी ठिकाणावर घर बांधिले हे वर्तमान कलताच श्रीमंताच्या कानावर घातले तेव्हां त्याजपासून गुन्हेगारी घेऊन मनसुबीचा फडशा होय तो पावेतों घरात मुले माणसे नेऊं नये असा कतबा घेऊन फडशा होय तो पावेतों घर सरकारांत अमानत ठेविलें त्यास आठ वर्षे जाली हली सुभा मनसुबी होत असतां फडशा जाहला नसतां माणसें जबरदस्तीनें घरांत नेली त्या समई द्वाई दिल्ही ते हि न मानीत माणसे घरांत धटाईनें घातली साा बाबजी गोविंद याणी घरांतून माणसे काढून त्याणीं मनसुबीस हुजुर येणे येविसी सरकारची सनद अलाहिदा सादर जाली आहे ते ठिकाण कासाराचे बाबजी गोविंद यांचे नव्हे हे खरे करून देऊं न देऊं तारि दिवाणचे गुन्हेगार तेरीख छ १३ साबान हा कतबा लेहून दिल्हा सही बिकलम खुद

लेखांक ४१

[माधवराव नारायण यांचें सदाशिव केशव यास पत्र. गुण्ये व हळबे यांच्यामध्यें आपसांत समजीपत्र झालें असतां तें विचारांत न

घेतां, हळबे पुन: पूर्ववत् वागूं लागले. तेव्हां माधवराव नारायण पेशव्यांनीं हळव्यांची खोती जप्त करण्याचा हुकूम सोडला व दोघा वादीस पुण्यास पाठविण्याची आज्ञा केली.]

मठ दप्तर श्री तालीक इ. स. १७७६ ऑगस्ट २
सदाशिवभट (१-१०) मठ श. १६९८ श्रावण वाा ३

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य
राजश्री सदाशिव केशव गोसावी
यासी

सेवक **माधवराव नारायण प्रधान** नमस्कार सुरु सबा सबैन मया व अलफ वाो राजश्री **सदाशिवभट गुण्ये** यांचा व राजश्री **बावजी गोविंद** हळबे यांचा मौजे मठ ताा हातखंबे ताो रत्नागिरी येथील खोतीचा कजिया लागला आहे सबब साल गुदस्ता खोतीची जप्ती सरकारांतून करुन कमाविस **भिकाजी त्रिंबक सरदेश कुलकर्णी** ताा **खिलणा** यास सांगोन राजश्री **महिपतराव कृष्ण माजी मामलेदार** ताो मजकूर यास सनद छ. १० सवाली साल गुदस्ता सन सीत सबैनात सादर जाहाली होती ते समई **तोतयाचे** दंग्यामुळें जप्ती जाली नाहीं त्याजवरून हे सनद तुम्हास सादर केली असे तरी खोतीची जप्ति करुन जप्तीचा कमाविस **भिकाजी त्रिंबक** यास सांगितली असे तरी माार निलेचे हाते खोतीचे कामकाज घेऊन उत्पन्न होईल ते तालुके मजकूरचे हिशेबी जमा करणें आणि बावजी गोविंद हळबे यास हुजूर पाठउन देणे जाणिजे छ १६ रबिलाखर अज्ञा प्रमाण

लेखांक ४२

[मठ शाखेचे गुण्ये व हळबे यांच्यामध्यें झालेल्या वादांत जो एकंदर पत्रव्यवहार झाला त्या प्रत्येक पत्राचें सार या सदाशिवभट गुण्यांच्या यादींत आलें आहे.]

मठ दप्तर श्री ॐ इ. स. १७७६

सदाशिवभट (१-१०) श. १६९८

यादि **सदासिवभट गुण्ये** खोत मौजे मठ ता हातखंबे ता रत्नागिरी मौजे मजकूरची खोती व ग्रामोपाध्यपण व वडिलकी पुरातन आमची त्यास ग्रामोपाध्यपण आमचे आम्हाकडें सुरलीत चालत आहे खोती व वडिलकीसमंधे मानपान आम्हाकडें चालत आहेत खोती **बाबजी गोविंद** हलबे रयेत कुणबावेकरी याजकडें पनास साठ वर्षे चालते याविसी आलिकडील कागदपत्र दाखल्याचे ईा पासून ता सन सबान सबैन मया व अलफ

२ सन समान सीतेन मया व अलफ

१ हुजूरजी सनद **कृष्णाजी हरि** याचे नांवे कीं मनसुबीचा फडशा करणें फडशा न होय तरि गांव अमानत करुन हरदुवादी हुजूर पाठविणें म्हणोन पत्र छ २५ जमा दिलोवल

१ सदरहू आन्वये **भिकाजीपंत भट** सुभा मुतालीक होते त्यास कृष्णाजी हरि यांचे पत्र छ ११ रजब

—
२

२ सुभाहून मनास न आणिले याजमुळें सन खमस सबैतांत मागती सुभा जाउन आले वृत निवेदन केले. त्यावरुन साक्षीदार यांच्या सड्या घेतल्या त्या सड्या येथोस्थित न जाहाल्या सा मागती हुजूर निवेदन करुन सन खमस सबैनांत हुजूरचीं पत्रें घेतली.

१ हुजुरची सनद **महिपतराव कृष्ण** यांचे नांवे मनसुबी विलेस लावणें सडी साक्षीनं विलेस लावणें विलेस न लागे तरि करिणे व (बखैर)? देउन हरदुवादी हुजूर पाठविणे म्हणोन पत्र छ २९ जमादिलोवल.

१ सदरहू आन्वये **सिवाजी आप्पाजी** सुभा मुतालीक होते त्यास महिपतराव कृष्ण यांचे पत्र छ १ जमादिलावल.

—
२

२ सुभा बाबाजी गोविंद हलबे यांचा पक्ष भारी याजमुळें मनसुबी तेथें विलेस न लागे आणि हुजूरहि न पाठवीत याजमुळें सन सीत सबैनांत हुजूर फिर्याद होउन पत्रे नेली

१ महिपतराव कृष्ण यांचे नांवे, पत्रकी मनसुभी तेथें विलेस लागत असली तरि तेथें विल्हेस लावणें नाहींतर हरदु वादी कागद-पत्र सुधा हुजूर रवाना करणे म्हणोन पत्र छ ९ जमादिलाखर.

१ सदरहू आन्वये सिवाजी आपाजी सुभामुतालीक होते त्यास महिपतराव कृष्ण यांचे पत्र छ १३ जाा खर

२

१ मनसुबीचा फडशा हिमायतीमुळें सुभा न होय आमचे पुतणे विष्णु कृष्ण हुजूर आले मागाहून सिवाजी आपाजी हुजूर आले त्यासमई कासाराचे ठिकाण गयाली याजवर हलबे मजकूर यांच घर बांधावयाचे सुभाहून चिटी दिल्ही कज्याची निर्गत न होता ठिकाण मजकुरांत घर न बांधावे येसा करार त्यामुळें दाहाबारा वर्षे चौथारा पडला होता येसे असतां आम्ही परोक्ष घर बांधावयासी सनद दिल्ही साा आम्हीं हुजूर फिर्याद केली त्याजवरुन हुजुरुन महिपतराव व सिवाजी आपाजी यास समक्ष ताकीद होउन महिपतराव याणी सुभा

भास्करपंत मुतालीक होते त्यास पत्र दिल्हे कीं मन-सुभीचा फडशा न होता हलबे ठिकाणाचा फडशा न होता घरांत गेले सबब बाहेर काढावे म्हणोन पत्र छ १६ साबान सनसीत सबैन मया व अलफ

३ सदरहु पत्रे घेतली असतां हिमायतीमुळें फडशा न होय साा हुजूर फिर्याद जाहलो त्यावरुन हुजुरून मौजे माा रची खोती अमानत होउन भिकाजी त्रिंबक सरदेश कुलकर्णी याजकडें कमाविसी सांगोन सनदा सादर जाहाल्या सन सीत सबैन मया व अलफ.

१ **महिपतराव कृष्ण सुभेदार** यासी पत्र छ १० शोवल
१ भिकाजी त्रिंबक सरदेश कुलकर्णी यासि पत्र छ मार
१ सदरहू आन्वयें सिवाजी आपाजी सुभामुतालीक होते त्यास महिपतराव (कृष्ण) यांचे पत्र छ २२ शोवल

३

२ सदरहू सनदा सादर जाहाल्या असतां मनसुब्रीचा फडशा न होय व खोती आमानत न होये सा सन सीत सबैनांत हुजूर फिर्याद होऊन गावचे जप्तिविसी पत्रें घेतली
१ महिपतराव कृष्ण सुभेदार यासी पत्र छ ६ जिल्हेज
१ सदरहू आन्वये सिवाजी आपाजी यासी महिपतराव यांचे पत्र छ २१ जिलकाद

२

२ सदरहू सनदा घेतल्या असतां हिमायतीमुळें फडशा न होये आमानांत ठिकाणांत घर हलबे बांधोन घटाईनें राहिले आमचा सुभा उपाये नांहीं तेव्हां हलबे यासी हुजूर यावया विसी द्वाही देउन आम्ही हुजूर आलो जाहाले वर्तमान विदीत केले त्याजवरुन हुजुरुन गांव आमानत करावया विसी व हलबे घरांतून काढावयाविसी हुजूरची पत्रें नेली सन सीत सबैन मया व अलफ
१ महिपतराव कृष्ण सुभेदार यासि पत्र छ ३ सफर
१ सदरहू आन्वये सिवाजी आपाजी यासि पत्र छ ६ सफर

२

सदरहू गांवची जप्ती व्हावी व हलबे घरांतून काढावे तों **तोतयाची गडबड** जाहाली त्या मुले गांवची जप्ती व हलबे घरातून निघावयाचे राहिले.

१४

२ सन सब्रा सबैन मया व अलफ गुदस्ता गांव आमानत करावा म्हणोन सनदा सादर जाहाल्या असता हिमायतीमुळें व तोत-

याचे दंग्यामुळें जप्त जाहाला नाहीं म्हणोन सरकारांतून आमानत करावा म्हणून सनदा

१ **सदाशिव केशव** सुभेदार यासी पत्र छ ६ रा। खर

१ भिकाजी त्रिंबक सरदेश कुलकर्णी यासि पत्र खोतीची कमाविस करुन उत्पन्न होईल ते सरकारांत जमा करणे म्हणोन पत्र छ मा।र

२

१६

लेखांक ४३

श्री तालीक

गोपाळ कृष्ण गुण्ये (२-१) मठ ता. ६-७-१७७७

श्रीमंत राजश्री **पंतप्रधान**
स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक **बच्याजी नारायण मोघे** कारकून नि।। **हरि बलाल फडके** सा। नमस्कार विज्ञापना येसीजे रा। **गोपाळ कृष्ण गुणे** तोतयाकडून राजश्री **गोविंद येशवंत अभ्यंकर** याचे घराचे जप्ती होऊन वस्तभाव आणिली त्यांत कर्ज खते सांपडली त्याच्या वसुलास गेले वसूल करून आणिला याजकरितां सरकारांत विनंति करून गुण्ये मारनिले यासी येवज देणे म्हणोन तगा (दा) लाउन खत सवा तेरासे रु।। येत्रे घेतले त्याजवरि सरकारांतून रुजुवात करुन आणविली तेथें **विजयदुर्गा**हून गांवी चौकसी करितां गावचे कुलकर्णी याचे वि।।नें वसूल केला त्याचे तेरीज व जप्त पेशजी घर केलें त्या कारकुनाची यादी वगैरे कागद आणिले त्याची रुजुवात रत्नागिरीस दप्तरी पाहून रुजु होऊन खर्चाची याद व सुभाचे पत्र आलें त्याजवरुन गुण्ये याजकडें तफावत लागली नाहीं येसे जाहले त्याजव(रुन) हाजीर जामीनाविसी आज्ञा जाहाली त्याजव(रु)न आपण जामीन असो याजकडें कझ्या लागल्यास हजीर करुन देऊं हजीर न होत तरी निखवतीचा जाबसाल क(रुन) देऊं शके १६९९ हेमलंबी नाम संवछरें आशाढ शुद्ध **२**

सुरु समान सबैन मया व अलफ छ २९ जाल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना बीाा बीाा खुद.

लेखांक ४४

[गोविंद यशवंत अभ्यंकर यांस सवाई माधवरावांचें पत्र. अभ्यंकर मारनिलेनीं तोतयास सामील झाल्याबद्दलचा आरोप करून गोपाल कृष्ण गुण्ये यांचेकडून १३२५ रु. चा कर्जरोखा घेतला तो माघारी घेण्याबद्दल. कारण गुण्येमजकूर हे निर्दोषी होते.]

मठ दप्तर श्री नकल इ. स. १७७७ सप्टेंबर १६

गोपाळ कृष्ण (२–१) मठ श. १६९९ भाद्रपद शुा। १४

राजमान्य राजश्री **गोविंद येशवंत** गोसावी यासी,

सेवक **माधवराव नारायण** प्रधान नमस्कार सुाा समान सबैन मया व आलफ तुम्ही गुदस्ता सरकारांत येऊन समजाविले कीं **गोपाल कृष्ण गुण्ये** याणी तोतयास मिलोन आपले घर जप्त करून वस्तभाव वगैरे नेवविले व कर्ज लोकांकडे होते त्याची खत सापडली त्या प्रोा कुलाकडून जबरदस्तीनें कर्ज वसूल करुन येवज घेतला तो तोतयाकडें दिल्हा नांहीं मधीच ठेविला याजमुळे आपण त्याजपासून सवातेरासे रुा चे खत लेहून घेतले म्हणोन सांगितले त्याजवरून मनास आणितां गोपाल कृष्ण याणी विदीत केलें कीं गोविंद येशवंत यांचे घर **विसाजी माहादेव साटे** वाा **बुरंबाड** ताा **संगमेश्वर** याजकडून **तोतयानें** जप्त करुन वस्तभाव नेली होती कर्जाची खते सांपडली त्याचे वसुलास मजला पाठवावयास लागले ते समई आपण अनमान केला परंतु जबरदस्तीनें पाठविले तेव्हां गेलो. घराची जप्ती आपण केली नांहीं कर्जाचा वसूल **बाबूभट बापट** दिाा **गोविंद येशवंत** व **हरि बलाल कुलकर्णी मौजे हिदले** ताा **सालसी** याचे गुजरातीनें करुन येवज साखरप्याचे मुकामीं **धोंडो गोपाल** याजवल दिल्हा तफावत केली नांहीं असे असतां येवज मधीच ठेवला म्हणोन गोविंद येशवंत याणी लटके निमित्य देउन आपल्यास मारहाण करुन सवातेरासे रुा चे खत लेहुन जबरदस्तीनें

घेतले आहे म्हणोन सांगितले त्याजवरुन येविसीची चौकसी करावयाबदल **रा गंगाधर गोविंद** ता **विजयदुर्ग** व **सदासिव केशव** ता **रत्नागिरी** यास हुजूरनें पत्रे सादर केली त्याजवरुन त्याणी चौकसी करुन वसुलाचे यादी सुधा हुजूर लेहून पाठविलें ते मनास आणितां कर्जाचे व गलयाचे रुाये गोपाल कृष्ण याणी वसूल केले तो येवज धोंडो गोपाल याजपासी दिल्हा त्या प्रोा कीर्दीस जमा आहेत व सन सीतांत विसाजी माहादेव याचे विद्यमानें जप्ती जाली त्याची याद वाजीनस आहे त्या पक्षी दोहि गोस्टीचा कझ्या याजकडे लागला नांहीं याजकरितां हाली हे पत्र तुम्हांस सादर कले असे तरी तुम्ही मााारनिले पासून सवातेरासे रुा चे खत लेहून घेतले आहे ते माघारें देणे फिरोन बोभाट येउं न देणें जाणिजे छ १३ साबान, आज्ञाप्रमाण.

लेखांक ४५

[गुण्ये व हळबे यांचे वादासंबंधीं महत्त्वाची माहिती देणारें पत्र.]

मठ–दप्तर;

श्री

कृष्णाजी विष्णु (१–८) सदाशिवभट (१–१०) मठ इ. स. १७७८ श. १७००

सेवेसी **कृष्णाजी विष्णु** व **सदासिवभट गुण्ये** मौजे मठ ताा हातखंबे तालुके रत्नागिरी सुाा तिसा सबैन मया व अलफ. **रघुनाथ धोंडदेव व बाबजी गोविंद हलबे** मौजे मजकूर याचा व आमचा खोतीचा व ठिकाणाचा कुणबाव्याचा **कज्या लागोन वीस वर्षे जाहाली** सज्या साक्षी होउन निर्णय नांहीं. कज्यामुळें **फार खराबी जाहली**. तिगस्ता हुजूरुन वादी हलबे यासी बोलावणे जाहले असतां सुभास पक्षपात होउन घटाईनें वादी पाठविला नांहीं त्याजवरुन हुजुरोन गाव अनामत करावा म्हणोन दोनच्यार सनदा सादर जाहाल्या असता वाद्याचा पक्ष भारी गाव अनामत न होये गाव अनामत व्हावा तो तोतयाचे गडबडीनें राहिले पुढें आपली हलाखी जाहाली कज्यामुलें नाश फार जाहाला कज्याचे नांव घेताच नाश होतो म्हणोन **खंडोजी देसाई** ताा मााार याजकडेस सालमजकुरीं जमुन आपली हकिकत सांगोन कज्याचे नांव घेताच नाश होतो आणि

मनसुबीचा फडशा होत नांहीं कज्या सांगोन परिणाम नांहीं हें सांगोन जावे, तो देसाई याणी समंजीचा अर्थ काढून समजोन असावे म्हणोन उभयंता वाद्यांची समजी काढली जे: आठवी तक्षीम कुणबावा आपला त्यांत कांहीं दिवस कुणबावेची कीर्द करीत असतां उगवणी न होये त्या वेळेस आपले आठवे तक्षीमेंत टेंबकर म्हणोन ठेवला होता त्यास हलबें स्वंत्र म्हणोन हलबे वादी याणे कजिया सांगोन होते. तो कुणबावा तुमचा तुम्हीं करुन सुखरुप राहणें याप्रमाणें देशमुखाचे विद्यमानें होउन एकमेकाची पत्रे जाहाली असतां हाली धिटाईनें कुणबावाचे शेतास द्वाही देऊन टेंबकर खेरीज करुन करावा म्हणोन अडथला करितात त्यास देशमुखाचे विद्यमानें टेंबकर सुधा कुणबा घावा असे जाहले आहे त्या प्रो चालावे आणि सालमजकुरी धारा उतरुन देणें हलबे धटाई केल्यास गांव अमानत करुन उभयतां वादी हुजूर पाठवावे म्हणोन सनद मामलेदार ताा रत्नागिरी यासी पत्र.

लेखांक ४६

मठ-दप्तर श्री तालीक इ. स. १७७८ आगस्ट ४

कृष्णाजी विष्णु (१–८) मठ श. १७०० श्रावण शु॥ ११

दाा बेाा कृष्णाजी विष्णु व सदासिवभट गुण्ये मौजे मठ ताा हातखंबे सुरु तिसा सबैन मया व अलफ खासगत घर ठिकाणांत व रुपणींत बाबजी गोविंद हलबे याचा आमचा कजिया आहे त्यास पाच सांगतील त्यास आपण मान्य सदरहू आसामी कोणा निशेचे असे पाहिजेत ते लेहून देणें म्हणून त्यास आसामी

१ बाबजी केशव देशकुलकर्णी ताा लांजे

१ बालाजी अनंत देशकुलकर्णी ताा लांजे

१ बाबजी त्रिंबक खोत मौजे आजणारी ताा देवले

सदरहू आसामी लेहून दिल्हे आहेत हे सांगतील त्या प्रो वर्तो न वर्तो तर दिवाणचे गुनेगार हे लिहिले सई छ १० रजब बीाा गोपाल कृष्ण गुण्ये सदरहू प्रमाणें बाबजी गोविंद मान्य म्हणोन लिहून दिल्हे आहे.

लेखांक ४७

[मठशाखेचे गुण्ये व हलबे यांच्यामध्यें झालेल्या वादाचें निवाड-पत्र हलब्यांनीं गुण्यांना लिहून दिलेलें. असेंच एक निवाडपत्र गुण्यांनीं हलब्यांना लिहून दिलेलेंहि पण आहे.]

मठ दप्तर
श्री तालीक इ. स. १७७८ ऑगस्ट ६
कृष्णाजी विष्णु (१-८) मठ शक १७०० विलंबीनाम संवत्सरे
सदाशिवभट (१-१०) ,, श्रावण शुा १३

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री कृष्णाजी विष्णु व वो राजश्री सदाशिवभट गुण्ये ग्रामोपाध्ये मौजे मठ ताा हातखंबे स्वामीचे सेवसी.

पाो रघुनाथ धोंडदेव व बाबजी गोविंद हलबे खोत मौजे मजकूर नमस्कार विनंति सुरु तिसा सबैन मया व अलफ आम्ही तुम्हापासी निाा कुणबावा टेंबकर सचंत्र म्हणोन कज्या दहावीस वर्षे सांगत होतो आणि पंचाइत सरकारांत उभयतांनीं आजपर्यंत आपण वाद सांगितला हाली उभयेता मौजे मजकुरी मिलोन समजोन असावे ऐस निश्चय केला कज्या सांगावा त्यास परिणाम लागत नाहीं यास्तव समजोन असावे.

येणे प्रा —————————— कलमे.

खोतीचे वतनाविसी कजिया, टेंबकराचा कुणबावा आम्ही तुम्हाकडेस न देउ सचंत्र म्हणो याजकरितां खोतीचे वतनाविसी कजिया होता ते खोटे म्हणून लिहून दिल्हे खोतीचे वतन वडलार्जित आमचे आम्हाकडेस चालवावे तुम्ही गांवचे रयत कुणबावेकरी कुणबावा टेमकर सुध्धा करून गाव शर्तेनें सदरहु कुणबावा गावचे दिवाण दस्तीचा उगवणी आम्हाकडेस देउ(न) सुखरुप राहाणे

तुम्हाकडेस आम्ही चालवावे बीाा ताा

१ ग्रामोपाधीक व घर उपाधीक आम्हाकडील तुम्हाकडेस पुरातन वडिल तुम्हाकडेस वडिल परंपरागत चालत आल्या प्राो तुम्हाकडेस आम्ही चालवावे आलीकडेस कजियामुले दिकत करुन देत नव्हतो ते तुमचे तुम्हास द्यावे कलम

१ मौजे मजकूरचे ग्रामोपाधीक

कुणब्रावा अणभवावा, आम्ही टेंब्र-करचा कजिया सांगत होते तो खोटा कलम १. तुम्हाकडील आमचे खोती-चे वेगमान तांबूल श्रावणीचा साडा पुरातन तुमचा घरचा वडिलार्जित आम्हास चालत आला त्यास आली-कडे **सवासिवभट** याणी आपले मुलींची लग्ने केली त्यापैकीं **आठल्ये व गोलवलकर** या दोन लग्नांत दिकत करून दिल्ही नाहींत सदरहु मान पुरातन प्राो द्यावे. फिरोन दिकत करु नये कलम १

तुमचे पुरातन चालत आल्या-प्रमाणे तुम्हाकडेस चालवावे. दिकत करु नये कलम.

१ मौजे मजकुरी ठिकाण **टेंब्रकर** कुणब्रावा आम्ही सचंत्र म्हणोन कजिया करीत होतो यामुळे तुम्ही आम्हापासी खोती आपली म्हणोन कजिया सांगितला तो खोटा म्हणोन तुम्ही आम्हास लिहून दिल्हे त्यावरुन आम्ही कजिया सांगत होतो तो खोटा कुणब्रावा खुद तुमचा टेंब्रकर-सुद्धा तुमचा तुम्हाकडेस आम्ही चालवावा टेंब्रकराचे ठिकाणांत आम्ही वहर कोणी झाडे बुडे केली आहेत त्यासुध्धा तुमचे, तुमचे स्वाधीन केले असे दिकत आम्ही करु नये कलम

५ किता कलमे देवाचे मान चालत आल्या प्राो चालवावे

१ देवाची पालखी
१ खेले सिमग्याचे
१ पोवते
१ दिवाली
१ वोवालणी
१ कलश

५

सदरहु मान चालत आल्या-प्रमाणें चालवणें

सदरहू प्रा॥ तुम्ही व आम्ही समजोन असावे अतःपर कजिया करु नये. हे लिहून दिल्हे सही छ ११ रजब श्रावण शुद्ध १३ त्रयोदशी शके १७०० विलंबीनाम संवत्सरे बी॥ खुद बावजी गोविंद हलबे

[A paper of agreement between Halbe and Gunye, which was proposed by Khandoji Desai, a long standing dispute of 20 years between the two parties.]

लेखांक ४८

मठ–दसर

श्री

सदाशिवभट (१-१०) मठ

इ. स. १७७९

श. १७०१

तेरीज जमीन येकंदर मौजे मठ ता॥ हातखंबे सुरु समानीन मया व अलफ.

	‿—अज जमीन	आगर जमीन	(कुडियाट)? जमीन	गीमवस जमीन	उमर जमीन
केशंभट डोंगरे	८९।१।	८१।।।२।।	८५।१	८१।३।।	८।।४।
बावजी गोविंद हलबे	८१६८।।।	८२।३।।	८६।३।।।	८३८१।।	८४८२
सदाशिवभट गुणे	८४।।।।।।	८।।४।।।	८।।।१।	८१।।(३।।)?	८१८१
टेंबकर	८४।।।१।	८।।।।१।	८३।।	८।।	८१
भाटवडेकर	८९८३।।।	८२८३	८२८४।।	८१।४।	८३।२
धोंडो हरि डोंगरे	८११८१।।।	८२८२।।।	८४।।३।	८१।।३	८२।।२।।।
देवस्थली	८१।।३।।।	८१।।१।	८८२।।	०	०
वलामा	८१।।।२।।।	८१।।।।।	८८२।।	०	०
श्री सोमेश्वर	८।।३।।।	८।।३।।।	०	०	०

लेखांक ४९

मठ-दप्तर　　श्री गजानन　　इ. स. १७७९ डिसेंबर ५
श. १७०१ कार्तिक वा। १३

छमो। अनाम गोपाल लक्ष्मण वलामे नि।। सरदेसाई ता। खिलणा व गोपाळ अनंत देसाई व बालाजी केशव कुलकर्णी ता। लांजे यासी महिपतराव कृष्ण सुभेदार तालुके रत्नागिरी सुरु समानीन मया व अलफ गुण्ये डोंगरे व हलबे मौजे मठ ता। हा तखबे यांचा ठिकाणचे जमिनीचा कजिया आहे त्याचे निवाड्याबदल ... ... कारकून व सिपाई

°श्री
श्री माधवच
रणी तत्पर म
हीपतराव कृ
ष्ण नीरंतर

पा। आहेत तरी तुम्ही तेथें जाउन जमिनीच्या ह ... ...
...पाहोन साक्ष ... ...
वाजबीचे रीतीनें फडशा करुन सुभा लिहोन पाठविणें [2]जाणिजे छ २६
जिल्काद. मोर्त
ब सू
द.

---

१. मठ शाखेंतील दुसरा महत्त्वाचा वाद गुण्ये, विरुद्ध डोंगरे व हळबे यांजमधील:—सहाव्या पिढीचे सदाशिवभट अनंतभट गुण्ये व ७ व्या पिढीचे गोपाळ कृष्ण गुण्ये यांच्या विरुद्ध हा वाद धोंडो हरि डोंगरे मठकर यांनीं चालविला होता. मठ येथील गुण्यांचे राहते ठिकाणासमोरील खासगत ठिकाण डोंगरे आपल्या मालकीचें आहे, असें म्हणत. खरें पाहिलें असतां तें गुण्यांच्या मालकीचें होतें. या वादाचा निकाल सदाशिवभट गुण्ये यांनीं केलेल्या '**सत्यानें**' झाला व ठिकाण गुण्यांचें खरें झालें. या वादावरून सदाशिवभट गुण्यांचा सात्विकपणा व सत्यप्रियता व्यक्त होते. कारण मौजे सोमेश्वर येथें सर्व ग्रामस्थांदेखत त्यांनीं सत्य करून दाखविलें. (ले. ५५ पहा.) हळब्यांनाहि त्यामुळें आपोआपच माघार घ्यावी लागली. या वादांत मठच्या पुरातन धाऱ्यासंबंधीं सर्व माहिती आलेली आहे. (ले. ५० पहा). या वादाच्या विशेष माहितीकरितां ले. ३९, ४९ ५०, ५५, ९२ व ९३ पहा.

२. येथून अक्षर बदललें.

लेखांक ५०

[मठचे गुण्ये व मठचे डोंगरे व हळबे यांच्यामध्यें खासगत ठिकाणाबद्दल वाद झाला त्यांचें हें निवाडपत्र आहे. तें ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाचें आहे]

मठ दप्तर — इ. स. १७७९ डिसेंबर ता. ३१
गोपाळ कृष्ण (२-१) मठ — श. १७०१ विकारी नाम
सदाशिवभट (१-१०) मठ — संवत्सरे मार्गशीर्ष वा ९

निवाडा पत्र शके १७०१ विकारीनाम सं....र मार्गसीर्ष वा भुगुवासर दर जागा मौजे **मठ** ता **हातखंबे** प्रांत राजापूर तालुके रत्नागिरी येथें **सदाशिवभट बीा अनंतभट व गोपालकृष्ण गुण्ये** ग्रामोपाध्ये यांचा व **धोंडो हरि डोंगरे** मौजे मार या उभयताचा गुण्ये राहतात त्या ठिकाणांचे पुढील जमिनीचा कजिया लागोन हरदुजण सुभास रत्नागिरीस गेले. दिवाणांत आपलाली हकिकत विदीत करुन कतबे जामीन व राजिनामे लिहोन देउन विनंति केली कीं आमची मनसुभी मौजे मारी नेमून द्यावी म्हणोन त्यास आज्ञा जाहाली जे पंचाईत नेमून द्यावे त्याजवरुन हरदु वादी याणी आपल्ये रजाबंदीचे पंचायत नेमून घे + + + + + + सुभाहून का(रकु)न व सीपाई रवाना करुन पंचाईता

* * * *

स ताकिदी दिल्या १ तुम्ही मौजे मारी मिलोन लिखित व मुक्त साक्ष पा (होन) वाजबीजे रीतीनें फडशा करणें त्या प्रो गांवीं पंचाइत जमा होउन मनास आणिता सदासिवभट गुण्ये याणी लिहोन दिल्हे जे ठिकाण पुरातन वतनी आपले त्याची हद पूर्वेकडे पाणदीखाले व दक्षणेकडे सारण व पश्चिमेकडे देवाचे आगर निा डोंगरे व उतरेकडे परसु परडे याचा गडगा पुढें जमीन राहिली ती पाट ठिकाणावरील यामध्ये ठिकाण पाटाखाले व पाटावर्ते आपले व व आपले घरांत व गोठे यांत **धोंडो हरि याचा बाप हरभट डोंगरा** पांच सात वर्षे राहिला होता आणि निघोन आपल्या ठिकाणावरी गेला व **टेंब्रकर** आठदहा

वर्षे तेथें राहोन गेला त्याजवर आणखी ब्राह्मण सात आठ आसामी दोन च्यार

*   *   *   *

वर्षं राहून जात याप्राो गुण्ये याणी लिहोन दिल्हे व धोंडो हरि डोंगरे याणी लिहोन दिल्हे मौजे मारी पुरातन कुंणबावे आगर जमिनीचे आगरी यांची नांवनिसी बाबजी गोविंद हलबे व केशभट डोंगरे व आपण धोंडो हरि डोंगरे व भाटवडेकर हे च्यार कुणबावेकरी आसामीस तीनसे लाहारी या प्राो व सदाशीवभट गुण्ये व टेंबकर दर दिडसे लारी प्राो तीनसे या प्राो वेवाट पुरातन चालत होती आगराची मांडणावल अनुक्रमें श्रीदेव सोमेश्वर नि॥ आपण धोंडो हरि वोढ्यापासून आगरपाट व दारपाट मिलोन पाटावर्ती पुर्वेस पाणदीस लागले त्याचे उत्तरेस केशभट डोंगरा वोढ्यापासून पाणदी पावेतो त्यापुढें भाटवडेकर त्या जवल सदासिव भट गुण्ये त्याजवल बाबजी गोविंद हलबे सेवट कोनीं

*   *   *   *

++ स ++ गुण्ये येकूण ठिकाणें होते + + + + + ठिकाण आपले निसबत व केशभट हो दोन्ही ठिकाणें वोढ्यापासून पाणदीपर्यंत आहेत वर्कड च्यार ठिकाणदार पाटाखाले राहीले पाटावरील जमीन त्यास नांहीं व गुण्ये यासी आपले वडिलाहि ठिकाण दिल्हे म्हणोन लिहोन दिल्हे आणि पुरसीसीकरितां फिरोन त्याणीच लिहोन दिल्हे कीं देवाचे आगर आपली निसबत आगर पाटावर्ते दाहा आकरा हात जमीन आहे त्यापुढें दार पाटा पावेतो व पाटापलिकडे आपली हद दक्षणेस गुण्ये याच्या सोप्याच्या पावल्या पावेतो व पूर्वेस पाणदीखाले व उत्तरेस कशभटाचे खुंटी पावतो यामधील ठिकाण आहे. हे वतनीं आपले देवाचे नव्हे कशभटांचे ठिकाण पाटावर्ते पाणदीपर्यंत आम्हा दोघाखेरीज पुढील च्यार ठिकाणदार पाटाखालेच राहिले दार पाटावर्ती त्यास ज

*   *   *   *

मीन नाहीं याप्राो लिहोन दिल्हे व बाबजी गोविंद हलबे यांणीं लिहोन दिल्हे जे दोन डोंगरे व हलबे व भाटवडेकर दर तीनसे (ला) हारी गुण्ये व टेंबकर दर दीडसे प्राो तीनसे लाहारी याप्राो पूर्वी कुणबावे

चालत होते याखेरीज दर थली वलमा व वरले गांवकरी यांचे बरकसीचे कुणबावे आहेत भरड जंगल जमिनीची टिकी लिहोन दिल्ही खुद आपली पंच्वीस व सदाशिवभट गुण्ये यांची सतरा व धोंडो हरि यांची पंधरा येसी सीवार जमीन लिहोन दिल्ही या प्रो त्रिवर्गाही लिहोन दिल्हे त्याजवर उभयता वादी याणी दाहा आसामी साक्षीदार लिहोन दिल्हे त्याज प्रो दोन आसामी आले नाहींत बाकी आठ आसामी साक्षीदार याणी सड्या लिहोन दिल्ह्या त्यांतील आनवये जे; सदाशिवभट गुण्ये राहतात ते ठिकाण गुण्ये यांचे या ठिकाणांत आणखी को(णा)ची दुसरी हद खुटी जमीन आहे येसे आपणां

* * * *

स ठाऊक नाहीं व पाटाखाली क + + + याचे आगर आहे त्यांत गुण्ये याची झाडे माडे आहेत त्यापुढें हलबे याच्या पोफली आहेत व गुण्ये यांचे गोठ्याजवल पांचसात वर्षे धोंडो हरि डोंगरे राहिले होते त्याजवरि आपलें हालि आहेत त्या ठिकाणांवर गेले व आणखी दोन चार ब्राह्मण वर्ष दोन वर्ष राहोन गेले येसे बहुतेका सडीदारांनीं लिहोन दिल्हे आहे व येका सडीयांत ज्याजती लिहिले जे गुण्ये राहतात याचे पुढें डोंगरे याची जमीन आहे म्हणोन दाहाबारा वर्षे कजिया लागलीयापासून हलबे व डोंगरे यांच्या मुखे ऐकतो, आणखी येका सडींत लिा आहे कीं टेंबकर यांची नारल व फणसें होता म्हणोन येकिले याज प्रो सडियांतील आर्थ त्याजवरुन वाद्यास सांगितले जे; मागील कागद पत्र उपयोगी कोणाजवल आसलीयास आणून देणें त्याजवर **धोंडो हरि डोंगरे यांचे बापानें सोलासे अठ्या(सी,स) कांत गांवचे ठिकाण** · · · · · · (लि) होत ठेविला होता तो आणून दिल्हा

* * * *

त्यामध्यें लिा आहे जे दक्षणेकडे ध (दा?)मची डोंगरें यांची खुद ठिकाणें दोन त्या ठिकाणापासून उतरेस देवाच्या ठिकाणापर्यंत ठिकाणदार वोढ्यापासून पाणदीपर्यंत लाविले आहेत. देवाचे ठिकाण आपल्या निसबतीस लाविले त्या ठिकाणाच्या माथा गुण्ये यांचे आगर व हलबे यांच्या रोप्या ज्याच्या त्याजकडेस चालत होत्या व दारपाटावलिकडें गुण्ये यांचा गोठा

वगैरे जमीन गुण्ये उपभोग करीत आहेत परंतु तेथें देवाचा आपला संदर्भ लाविला नाहीं त्याचे पुढें उतरेकडें केशभट डोंगरे व इतर मिलोन पांच आसामी ठिकाणदार वोढ्यापासून दारपाटपावेतो लाविले आहेत पाटावलिकडेस कोणा ठिकाणदाराची जमीन लाविली नाहीं याप्रो ठिकाण झाडे यांतील अर्थ व पुरातन रकमा कुणबावे धोंडो हरि याचा तीनसे लाहारीचा कुण(बावा) + + + + व टेंबकर दिडसे प्रो तीनसे.

*   *   *   *

लाहारी व इतर कुणबावे लिहोन लावोन दिल्हे आहेत त्या प्रो जमीन त्यांचे नांवे आज ता। चालत आहे. बाबजी गोविंद याणी लिहोन दिल्हे त्याजवरुन आगर गीमवस व उमर कुडयाट जमीन जे गांवात होती त्याची मोजणी केली व ठिकाणावरील पात जंगल डोंगर जमीन याची टिकी बाबजी गोविंद यापासून लिहोन घेतली व जमिनीची मोजणी पाहातां त्यांत धोंडो हरि यांची आगर जमीन दोन बिघे पावणे तीन पांड व कुडियाट वगैरे जमीन पावणे नउ बिघे च्यारपांड भरड जमिनीची ठिकी पंधरा या प्रो डोंगरे याची जमीन व गुण्ये आगर जमीन पावणे वीस पांड व कुडियाट व गीमवस व उंबर जमीन तीन बिघे, येक पांड भरडाचे जमिनीची ठिकी सतराया प्रो माजणी व भरड जमिनीचा आजमास जाहाला तेंव्हां अर्थ पाहतां हलबे व डोंगरे याणीच पूर्वील कुणबावे लिहोन दिल्हे ज्याची जमीन त्याच्या नांवे चालत आहे येसे असत

*   *   *   *

गुण्ये याची जमीन कमी कां असावी आ + +ण्ये यांच्या+ +पाती ज्याजजी जमीन धोंडो हरि यासी कसी यावी इतर ठिकाणदारा प्रो गुण्ये कुणबावेकरी नवेत म्हणावे तरी आगर जमीन गीमवस व उंबर कुडियात व भरड जमिनीची टाकी सर्व जमिनी त्याजकडेस आहेत तेंव्हा धोडो हरि+ चे निमे जमीन गुण्ये याची असावी येसे दिसते धोंडो हरि याणी लिा जे; गुण्ये+ +घरास व परडे यास जागां वडिलांहि दिल्ही म्हणोन लिा ते लटके देवाचे ठिकाण निा आपली धोंडो हरि व केशभटाचे ठिकाण येसी दोन ठिकाणे पाटावरती पाणदी पावेतो गेली फुडील ठिकाणदार पाटाखालेच राहिले आणि पुरसीस

करीतां मागती त्याणीच लिा कीं देवाचे ठिकाण वोढ्यापासून आगर पाटा (व) लीकडेस दहा आकरा हात आहे त्याचे वर्तेदार पाटा पावेतो आगर जमीन व पाटावलीकडे पाणदीपावेतो आपली खुद वतनीं देवाची नव्हे म्हणोन त्यानीच लिहोन दिल्हे व त्यांचा बाप हरभट डोंगरा याणी ठिकाण झाडयात लिा जे देवाचे आगर आपल्याकडें आहे परतु कोटपर्यंत येसे लाविले नाहीं. तथापी सहजात विस्मरण जाहलें म्हणावे तरी देवाचे आगराचे माथा गुण्ये याचे आगर जवल हलवे यांच्या रोप्या आहेत त्या ज्याच्या त्याजकडे चालतात पाटवर्ते गुण्ये याच्या घराफुडील पाटावलीकडील व पाटाखाले जमिनीचा गुण्ये उपभोग करितात येसें असतां त्या जमिनीचा + + त्याणी कांहींच लाविला नाहीं व त्याचेजवल कशभट डोंगरा तो वरकड ठिकाणदाराबरोबर पांच ठिकाणदार पाटाखालेच परिछिन्न लाविले आहेत. तेव्हां मागं जे थोंडो हरि याणे देवाचे ठिकाणाची आगर पाटावलीकडे दाहा आकरा हात जमिनीची हर लाविली तेच खरी येसी दिसत्ये त्या वलिकडें आपले पाणदीपर्यंत खासगत ठिकाण व पाटावलिकडें पाणदीपर्यंत केशभटाचे ठिकाण लाविले

* * * *

ते खोटे प्रमाणांत येत नाहीं सडयाचे आन्वये पाहतां गुण्ये याचे ठिकाण सर्वांसडिदाराहि लाविले आहे ठिकाणांत खुटीचा कजिया पाहिला नाहीं यक + डींत टेंबकराचा फणस लाविला. त्यास टेंबकर व डोंगरा सुखवस्तु तेथें कांहीं दिवस होते आणि आपले ठिकाणांवरी गेले व आणखी बाधेकरी ब्राह्मण होते कांहीं वर्षे राहोन गेले म्हणोन गुण्ये याणी लिा आहे तेव्हां बाबजी गोविंद; टेंबकराची जमीन गुण्ये याच्या घराजवल पांडदीडपांड आहे येसे सुभा म्हणत होते त्याचा दाखला कांहींच पुरत नाहीं हलवे, टेंबकर तेथे राहिला म्हणोन गुण्ये याच्या द्वेषामुळें बाबजी गोविंद म्हणतात त्याचा दाखला नाहीं ते लटके व डोंगरे याचे साधन पाहतां कोणी येकाहीं खरेपणास फुरत नाहीं गुण्ये यांचे ठिकाणाची हद पाटाखाली सारणीपासून उतरेकडे व पश्चमेकडें देवाच्या आगराचे वर्ते तेथें गुण्ये यांचे आगर जमीन साहापांड आहे त्याजवळ गावीक

जमीन होती ते पांचसाहा पांड हलबे याजकडे चालत आली त्यास हाली हलबे याची नेमावणी रोप्या रोपें पनास चाळीस वर्षांची मांडणावल आहे. ती जमीन त्याजकडें चालत आल्याप्रो चालेल तेविसी गुण्ये व डोंगरे याणी कजिया करावयासी प्रयाजन नाहीं त्यांचेजवळ गुण्ये यांच्या केली व रोप्या दोन पांड जमिनींत आहेत. ते जमीन गुण्ये याजकडेस आहे त्याचे पुढें चवदा पंधरा पांड जंगल दरड जमीन गावीक आहे त्याचे फुडे उतरे-कडेस नाऱ्या सेवटी दोन पांड जमिनींत हाली गुण्ये यांचे रोपे रोप्या आहेत ते जमीन गुण्ये याची पाटाखालेली जागे, गुण्ये याची जमीन आहे व येके जागे बाबजी गोविंद हलबे याची जमीन आहे ती ज्याची त्याजकडे चालत आल्याप्रो चालले परस्परें कजिया करु नये व दार पाटा वलीकडेस जमीन सवा बिघा त्याची हद दक्षणेस सारण पूर्वेकडें पाणंद उतरेस दगडाचा टोण्या मध्ये पाटाखालील तिजा + + व पाटावरील ठिकाण गुण्ये याचे सारंश सर्व साधनांचा निर्णय पाहता जमिनी मोजणीवरुन व सञ्याच्या अर्थावरुन व वादी धोंडो हरि यां

* * * *

ञ्याच लिहिण्यावरुन बाबजी गोविद हलबे याणी पूर्विल कुणबावे लिहोन दिल्हे त्याच्या आन्वयावरुन व धोंडो हरि यांचे पिते हरभट यांचे ठिकाण झाड्यावरुन गुण्ये यांचे ठिकाणांतील जमिनिसी **धोंडो हरि डोंगरा भांडत होता तो लटका पडला** सदाशिवभट व **गोपालकृष्ण गुण्ये खरे जाहाले** येणे प्रो पंच्याईतमतें निवाडा जाहाला असे छ २२ माहे जिल्हेज सुरु समानीन मया व अलफ.

---

* या निवाडापत्राचे जीर्ण झाल्यामुळें ११ तुकडे मिळाले. मूळांत हे तुकडे मजकुराचे अनुरोधानें लागलेले नव्हते. ते वाचन करून क्रमानें लावले. नंतर वाचल्यावर असें दिसून आलें कीं, सर्व तुकडे मिळून एक निवाडापत्र आहे. सध्यां लाविलेल्या क्रमावरून तरी एकमेकांशीं प्रत्येक कागदाचा बरोबर संबंध लागला आहे असें दिसतें. बहुधा या क्रमांत चुकी नसावी. अक्षर व कागद ११ हि तुकड्यांचे, एकच प्रकारचीं आहेत. कागद संपल्याचेंहि * * चिन्हें दर्शवितात.

साक्षीदार

दीा लक्ष्मण गणेश देशकुल-
कर्णी ता मजकूर

१ अंताजी लक्षुमण खोत मौंजे घाटिवले ता देवले	१ बेहुजूर गोपाल अनंत; देसाई ता लांजे
१ गोंदजोसी मोघे पालकर	१ गोपाल पाध्ये मोघे धर्माधिकारी ता लांजे
१ निला रघुनाथ खोत मौंजे जांभरुण ता केळयें माजगांव	१ गोविंद पाध्ये(मो)घे धर्माधिकारी ता लांजे
१ गोविंद नीलकंठ डोंगर कोंड ता मार	१ बाबण जोसी धर्माधिकारी ता हातखंबे

[This Nivad Patra is important from the point of the history of the Village Math. The ancient land revenue of Math was 700 Laries]

लेखांक ५१

[काळें शाखेपैकीं कृष्णराव व हरि बल्लाळ गुण्ये यांनीं सन १७५० च्या सुमारास पेशव्यांना तीन लाख रुपये कर्ज उभारून मदत केली. त्या कर्जासंबंधीं हा कागद आहे. या कर्जासंबंधीं साग्र माहितीकरितां ले. ८३ पहा]

[भा. इ. सं. म. संग्रह. तांबवेकर सावकार दप्तर]

श्री

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री
*हरिपंत तात्यास्वामींचे सेवेसी

* हें पत्र सदाशिव राम गुणे, (१३-७) चांफेट यांनीं हरिपंत तात्या फडक्यांना लिहिलें आहे. सदाशिव राम गुण्ये इ. स. १७७९ ते १७९० पर्यंत नागपुरास भोंसल्याकडे पेशव्यांचे वतीनें वकील होते. त्या काळांतील हें पत्र आहे.

पोष्य सदाशिव राम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी राजश्री सदासिव नाईक तांबवेकर यांचा येवज आम्ही कर्ज देणे आहे त्याजपैकीं रुाये ४००० च्यार हजार रुाये राजश्री कृष्णाजी थोरात याजकडे आमचा कर्जाचा येवज येणे आहे त्यापैकी देविले आहेत तर आपण कृष्णाजी थोरात यास ताकीद करऊन नाईकास च्यार हजार रुाये त्याज-कडून पावत ऐसे करून द्यावे. आपल्या केल्यानें यैवज थोराताकडील यैवज उगउन येईल याजकरितां विनंति लिा आहे याप्राो मान्य करुन काम होय तो अर्थ करुन द्यावा येणे करुन माझी मोकलीक व नाईकाचे काम दोनी होऊन येतात विशेष काये लिहूं कृपालोभ कीजे हे विनंति.

लेखांक ५२

[भा. इ. सं. मं. संग्रह. तांबवेकर सावकार दप्तर]

श्री इ. स. १७८० मार्च १६

श. १७०१ फाल्गुन शुा १०

यादी नरसो मेरेश्वर तांबवेकर सुरु समानीन मया व अलफ सिवाजी थोरात याजकडे सदासिव राम गुणे याचे कर्ज येणे आमचे कर्ज सदा-सिव राम याणी देणे त्या पाौ मारनिलेनि थोरात याजकडे रुपये पंचवीस हजार देविले. त्या येवजी सरकारांतून तााा वालवे पाो गाव सिवाजी थोरात यांचे सरंजामाचे देविले ते देह ... ... सुमार

१ मौजे सीगांव
१ मौजे बांवची
१ मौजे येडे
१ मौजे कोरेगांव

४

च्यार गाव जप्त करुन श्रीनिवास शामराव यांजकडें जप्ती सांगोन आम्हांस यैवज पावतां करावा याप्राो सन समानांत सरकारांतून करार करुन दिल्हा. त्याजपाौ ते साली साडेसदतीससे रुपये आम्हास पावले आलीकडें

दोन सालें थोरांत याणी खलेल करून येवज दिल्हा नाहीं येविसी थोरात त्यास ताकीद होऊन करारा प्रा॥ येवज आम्हांस पावतां होय ते केले पाहिजे येविशी पत्रें.

१ च्यार गांवास

१ सिवाजी थोरात यांस.

१ श्रीनिवास शामराव प्रां॥

करांड यास कीं पेशजीच्या

करारप्रा॥ गांवाची जप्ती करुन

येवज तांबेकर यास पावतां करणे म्हणोन.

३

सिवाजी थोरात यांजकडे सदासिवराम यांचे कर्ज येणे त्याज पौ॥ सदासिव राम याणीं नरसोबा नाईक तांबेकर यांस पंचवीस हजार रुा॥ देविले त्या ऐवजी सरंजामापौ॥ च्यार गांवची जप्ती सन समानांत करुन छतीससे रुपये पावले आलीकडें दोन सालें पावलें नाहीं सबब हाली पेशजी च्यार गांव जप्त केलें होते ते हाली जप्त + + + + + + + पंचवीस + + + + + + + + काचे वसुल होत तो पावेतो जप्त करुन ऐवज देत जाणे म्हणोन श्रीनिवास शामराव मामलेदार प्रांत कराड यास——सनद

च्यार गांव जप्तीविसी १

१ च्यार गांवास पत्र ३

१ जमीदारास

१ सिवाजी थोरात यास

३ ४

च्यार सनदा पत्रें

छ ९ रोाबल समानीन

रा॥ विठलपंत नि॥ घनबा

लेखांक ५३

[ह्या लेखांकांवरून कालें शाखेंतील गुण्ये मंडळी १७२० इ. स. च्या सुमारास सातारा जिल्ह्यांत निरनिराळीं वतनें मिळवून त्यांचा उपभोग घेत होती असें दिसतें.]

[भारत इतिहास-संशोधक मंडळ, पुणें; यांतील दप्तरखाना— चांदोरकर संग्रह-रुमाल नं. ७, कागद नं. ३३२६:—]

सदाशिवराव (१३·७)चांफेट श्रीलक्ष्मीकांत इ. स. १७८० मार्च १७
शके १७०१ फाल्गुन शु॥ १२

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री
नारो सिवदेव देशपांडे पा**ा** **वाई** स्वामीचे सेवेसी
पा**ो** **सदासिव राम गुण्ये*** अजहद देशमुख पा**ा** मजकूर नमस्कार विनंति उपरी मौजे **दुधी** सा**ा** **कोरेगांव** प्रां**ा** मा**ा**र इसा-
फत देशमुखीचा गांव त्यांचे मागील दाखल्याचे

कागद ——— **सुमार**

१ सन ११२७ अकरासे सतावीसाचा तुमार
१ मौजे **माहुलीची** ताकीद सन ११२१
१ देशमुखाचा रोखा मौजे **करंजखोपेवर** सन ११२३

३

(मागील बाजू)

येकूण तीन कागद प्रयोजन लागले यास्तव तुम्हापासून घेतले आहेत गावचे काम करुन घेऊ आणि सदरहू कागद तुमचे स्वाधीन करु **मृगसाल जाहालीयावर** कागद देऊ मिती रा छ १० रबीलोवल सु**ा** समांनीन मया व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंति.

---

* सदाशिव राम गुणे इ. स. १७७९ ते १७९० पर्यंत नागपूर दरबारीं पेशव्यांचे वकील होते. त्यांचें हें अस्सल पत्र आहे.

विदमान दौलतराव नाईक
पिसाल देशमुख प्रा। मजकू
र. ——————

——

लेखांक ५४

[ले. २१ पहा. बच्याजी महादेव आश्वी शाखेचे मूळ पुरुष होत. या लेखावरून इ. स. १७८१ च्या पूर्वी त्यांचे वडील महादेवभट गुण्ये निवर्तले असावे असें दिसतें.]

शं. ल. वैद्य, पुणें　श्री　इ. स. १७८१ डिसेंबर १०
श. १७०३ मार्गशीर्ष व॥ १०

माहादेवभट (१–१२); बच्याजी महादेव (५–१) चांफेट
मोरो महादेव (५–४) चांफेट

हिसेब माहादेवभट गुणे सुरु
* बच्याजी माहादेव व मोरो माहादेव गुणे
इसने समानीन मया व अलफ सो
१०० ———— चित्रभानु संवछरे वैशाख
श्रुा। १० हा। खत ———— रुपये
११७॥। व्याज दर ।॥ प्र ———— ता। शके १७०३
मार्गसीर्ष वद्य १० मु। वर्षे १९८७॥।
——
२१७॥। ———————— रुपये

——

* ही ओळ लहान अक्षरांत ओळ १ व ३ यांच्यामध्यें लिहिली आहे. वास्तविक ओळ १ व ३ या जोडून आहेत. बहुधा सर्व मजकूर लिहिल्यावर ही ओळ लिहिली असावी.

लेखांक ५५

[डोंगरे व गुण्ये यांजमधील वादाचे सुभा रत्नागिरीस झालेलें निवाडपत्र-हकिकत मनोरंजक आहे.]

मठ-दप्तर
कृष्णाजी विष्णु (१-८) मठ
सदाशिवभट (१-१०) ,,
धोंडो जनार्दन (१-१२) ,,

श्री गजानन इ. स. १७८२ जानेवारी २७
श० १७०३ प्लवनामसंवत्सरे माघ शु॥ १३

*सोमेस्वर

० श्री ~
श्री माधवच
रणी ततर म
हीपतराव कृ
ष्ण नीरंतर

निवाडपत्र अजस्वारी महिपत राव कृष्ण सुभेदार तालुके रत्नागिरी ता। कृष्णाजी विष्णु व सदासिवभट बिन अनंतभट व धोंडो जनार्दन गुण्ये ग्राम उपाध्ये मौजे मठ ता। हातखंबे प्रांत राजापूर सुरु ईसने समानीन मया व अलफ शके १७०३ प्लवनाम संवत्सरे तुमचा व धोंडो हरि डोंगरे मौजे मजकूर यांचा तुमचे घराजवळ जमीन ठिकाण आगरपाटापासून पूर्वेस पालंदी पावेतो आहे त्ये जमिनीविसी तुमचा व त्यांचा कजिया लागोन हर-दुजण सुभा आलेत आपलाली हकिकत विदित करुन कतबे करिने पुरसीसा व साक्षीदारांच्या यादी लेहोन दिल्यात त्याजवरुन सुभाहून गांवी कारकून व तिराईत पाठउन ठिकाणांची चोंकसी करुन मोजणी केली व ग्रामस्तांच्या जबान्या लेउन घेउन सुभा आले त्यास वादी डोंगरे याचा आक्षेप कीं ग्रामस्तांची रुबरु चौकसी करावी त्याजवरुन ग्रामस्त सुभा आणून पुन्हा जबान्या लेहोन घेतल्या दोही वेळच्या जबान्या व मोजणीचे कागदपत्र पंचाइताजवळ दिल्हे पंचाईत बसोन मनास आणितां जबान्याचा अर्थ म्हणावा तरी दोन वेला जबान्या जाहाल्या त्यापैकीं कांहीं क्रिया बाल व कांहीं राहिल्या त्या दोन वेलां दोहों प्रकारचे अर्थाच्या दिल्ह्या. सबब

जमान्या वातल मनसुभीचे उपयोगी नाहीं मोजणीचा अर्थ म्हणावा तर मोजणीचा अजमास होउन जमीन सजली परंतु तोड मोजणीवरुनच न होय. यासीवाय ठिकाण समंधे कागदपत्र वगैरे साधन उभयेतापासी नाहीं तेव्हा चौघाचे मते **हरदुवादी यांतून येकानें सत्य करुन जमीन घ्यावी येसे ठरले** त्याजवरुन गुण्ये सत्य करावयासी मान्य जाहाले त्यासी धोंडो हरि राजी होउन कतबा लिहोन दिल्हा जे, गुण्ये याणी स्नान करुन श्री च्या देवालई घाटे खाली उभे राहोन सदरहु जमिनीची हदमहदुद लाउन जमीन वतनी आपली ऐसा उच्चार करुन सांगावी त्याप्रमाणें जमिन गुण्ये यांनीं घ्यावी त्ये जमिनीसी आपण कजिया करणार नाहीं म्हणोन व सदरहु जमीनपैकीं पांच पुांड जमिनींत **बावजी गोविंद हलबे** यांची कीर्द नारळीची व सुपारीची वगैरे झाडांची चालीस पंच्येचालीस वर्षांची आहे. सबब त्यास सुभा आणुन पुरसीस करितां बावजी गोविंद याणीं कतबा लिहोन दिल्हा जे त्या जमिनीपैकीं पांच पांड जमिनींत आपली नेमावणी आहे. परंतु सारे जमिनीचे गुण्ये याणी सत्य केले म्हणोन आपण जमीन सोडून देऊं जमिनीविसी आपण कजिया करणार नाहीं याप्रमाणे हलबे याणी लिहोन दिल्हे. येणे प्रमाणें डोंगरें व हलबे यांचे कतबे जाहाले त्याज वरुन उच्चाराची यादी ठरउन सुभाहून रा **रामाजी सिवदेव** कारकून बरोबर सिपाई देउन मौजे मजकुरी पाठविले. त्याणीं श्री देव मौजे मजकूर यांचे देवलाई ता मजकूरचे देशक व सिष्ट ब्राह्मण व ग्रामस्त जमा करुन त्यांचे समक्ष व वादी धोंडो हरि व बावजी गोविंद यांचे देखतां श्री च्या देवालई घाटे खाले सदासिवभट गुण्ये उभे राहोन सुभास उच्चार पत्र जाहाले होते जे; सदासिवभट गुण्ये यांचे घर आहे त्या ठिकाणाचे पूर्वेस पालंदी पाटावरती व दक्षणेस सारण पालंदीपासून आगर पाटापर्यंत व पश्चमेस आगरपाट व उतरेस आगरपाटांच्या धरणापासून पूर्वेस तले आहे त्याजवरतां बाध तेथ पावेतो जमिनीची हद हे चतुःसीमा पूर्वक ठिकाण जमीन गुण्ये यांची आपली असा उच्चार करुन बोलावे म्हणून ठरले होते त्याप्रमाणें **सदाशिवभट गुण्ये याणी सर्वां समक्ष वदोन श्रांवण वद्य त्रितियेस शके मजकुरी** (इ. स. १७८१ आगस्ट ७) सत्य केले

उपरांतिक डोंगरे व हलबे यासी पंचाईतानीं पुसीले कीं गुण्ये याणी सत्य केले यांत तुमची बोलावयाची कांहीं दिकत राहिले आहे की काय त्याजवरुन डोंगरे व हलबे बोलिले कीं कराराप्रमाणें गुण्ये याणी सत्य केले आमची दिकत कांहीं राहिली नाहीं. सदरहु ठिकाण जमीन गुण्ये यांची खरी जाहाली ऐसे बोलोन डोंगरे याणी लिहोन दिल्हे जे, मौजे मजकुरी सदासिवभट गुण्ये यांचा व आमचा ठिकाणाविसी कजिया होता त्याची तोड सुभाहून आमचे मान्यतेनें ठरलि कीं गुण्ये याणी श्री देव सोमेश्वर मौजे मजकूर येथें सत्य करावें म्हणोन त्याप्रमाणें मौजे मजकुरी देशक व धर्माधिकारी जोसी व सिष्ट ब्राह्मण व गांवकरी व सरकारचें कारकून यांचे समक्ष घाटे खाली चतुःसीमापूर्वक गुण्ये याणी ठिकाणाचे सत्य कराराप्रमाणें केले याउपरी ठिकाणासी गुण्ये यासी भांडणार नाहीं याप्रमाणें धोंडो हरि याणी आपले स्वदस्तुरे लेहून दिल्हे. व बाबजी गोविंद हलबे यांची पांच पांड जमिनींत कीर्द होती त्यास वापरोपीच्या शिरस्तेप्रमाणें तुम्ही पैका दिल्हांत तो त्याणी घेउन नेमावणी समेत जमीन सोडिली सदरहू ठिकाण जमीन दरोबस्त तुमची खरी जाहाली धोंडो हरि भांडत होता तो खोटा पडला त्याजपासून गुन्हेगारी घेउन तुम्ही सत्य करुन पार पडिलेत तुमची जमीन खरी जाहाली सबब सरकारांत तुमचे माथा जिवन मवाफिक हरकी रुपये ५० पनास करार करुन पैकीं वजा निमे विशालगड रुपये २५ पंचवीस बाकी सरकारांत रुपये २५ पंचवीस पोता वसूल घेउन तुम्हास हे निवाडपत्र सादर केले असे तरि सदरहु च्यतुःसीमा पूर्वक ठिकाण जमीन तुमची तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें उपभोग करुन दिवाण दस्ताची उगवणी करुन देउनसुखरुप राहाणे *जाणिजे छ १२

माहे सफर मार्तब सुद मोर्तब

सुद

[अशाच प्रकारची भोगवट्याची सनद विशाळगडच्या प्रतिनिधींकडून मिळाली आहे.]

---

* येथून अक्षर बदललें. तसेंच 'सोमेस्वर'चें अक्षर वेगळें आहे.

[This is a paper of judgment of the case which was fought between Gunye and Dongare, given by Muhipatrao Krishna Subhedar at Ratnagiri. It is interesting to note; how when all means were at an end, Sadashivbhat Gunye was asked to do 'Satya,' under the bell in the temple of Someshwar before the Villagers, to prove that he was the owner of the land.]

लेखांक ५६

भा. इ. सं. मंडळ, पुणें

धोंडो बलाल (१३-३) चांफेट श्री तालीक इ. स. १७८२ जून १४

सिका माधवराव

नारायण

याचा

छ मा़ा अनाम देशमुख देशपांडे पा़ो **आंबे जोगाई** यासी **माधवराव नारायण** प्रधान सुरु **सलास** समानीन मयाव अलफ मौजे **आउसगांव** प्रा़ो मजकूर येथील मोकाशाचा अमल **धोंडो बलाल** मुतालीक दिा़ा राज-मंत्री याजकडें पेशजीपासून चालत आहे त्यास मोकाशाचा वसूल गांवकरी मा़ार निलेकडें सुरलीत देत नाहीं म्हणोन हुजूर विदीत जाले त्यावरून हे आज्ञापत्र सादर केले असे तरी मौजे मजकुरचे मुकदमास ताकीद करून सुदामत प्रा़ो मोकासा बाबेचा अंमल मा़ार निले कडील कमाविसदाराकडें सुरलीत देवणें जाणिजे छ २ रजब आज्ञा प्रमाण बार

लेखांक ५७

[ले. २५ पहा. या लेखांकावरून कोंकणांतून देशावर आल्यावर महादेवभट गुण्ये, आश्वी शाखेचे मूळ पुरुष प्रथम साताऱ्यास राहत होते असें दिसतें.]

१५ सप्टेंबर इ. स. १७८४

श. ल. वैद्य, पुणें श्री शके १७०६ आश्विन शुा १

*खतावणी शके १७०६ क्रोधीनाम संवत्सरे आश्वीन शुा १ माहे जिल्काद सुरु खमस समानीन मया व अलफ खासगत राजश्री बाबुराव विश्वनाथ वैद्य ता शके १७०७ विश्वावसुनाम संवत्सरे अश्विन अखेर माहे जिल्हेज येणे व फाजील देणें कुळारग रुपये

मकार विल्हे

पान १ श. १७०६ ते १७०७ खाते माहादेवभट गुणे पुत्र बच्याजी

जमा —— २५ उतर साल गुदस्ता प्रमाणे

१५७ (पान मागील वहिचे)

रुपये ५० पैकीं जमा

पान ३० श. १७०७ ते १७०८ खाते माहादेवभट गुणे सातारकर

—— २५ उतर साल गुदस्ताप्रमाणे

१

पान ६० श. १७०८ ते १७०९ खाते माहादेवभट गुणे सातारकर

—— २५ उतर साल गुदस्ताप्रमाणे

३०

पान ८३ श. १७०९ ते १७१० खाते माहादेवभट गुणे सातारकर

२५ २५ उतर साल गुदस्ताप्रमाणे

+ पाा १२१ ६०

---

* श. १७०६ पासून एकच खतावणी चालू आहे. प्रत्येक वर्षारंभीं आरंभास हा मजकूर आहे.

+ कीर्द वहि पान १२१ वर जमा असे. बाबूरावांचे बंधू कासीराव यांच्या खतावणींतहि असाच त्यांच्या वांटाच्या २५ रु.चा उल्लेख आहे. ले. २५ पहा.

लेखांक ५८

[भारत इतिहास-संशोधक मंडळ, पुणें. शिकंदरलाल आतार संग्रह, रु. नं. कागद नं. २४९/१७]

सदाशिवभट रामभट (१३–७) चांफेट
श्रीधनाई प्रा नकल

इ. स. १७८६ मार्च १३
फाल्गुन शु॥ १४ शके १७०७

* आज्ञापत्र राजश्री **कृष्णाजी थोरात** ता मोकदमान को वालवे प्रां पनाला सुरु सीत समानीन मया व अलफ वो राजश्री **सदासिवभट रामभट गुणे** याजकडे ईनाम जमीन बीा ता

·।।· को मार येथे पेशजीपासून इनाम जमीन आलाहिदा सनद चाहूर आर्धा

·।।· मौजे **येडे** ता मार येथे पेशजीची सनद चाहूर ·।· पाव व मौजे **बुरली** प्रा **कागल** येथें चाहूर ·।· पाव येकूण हरदो गावीं मिलोन आर्धा चावर आहे त्याच्या सनदा भटजीजवल आहेत सा त्याच्या मुबदला जमीन को मारी हाली नेमून देविली असे तरी सदरहु आर्धा चावर जमीन भटजी मार निले याच्या दुमाला चतु:सीमा पुर्वक करुन देणे

१

येकूण चावर एक जमीन भटजी याजकडे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवणें छ १२ जा वल मोर्तब असे

लेखांक ५९

[ले. २१ व २५ पहा. महादेवभट गुण्यांचें कर्ज त्यांचे पुत्रांच्या कारकीर्दींत फिटलें गेलें. यावरून आर्श्वीकर गुण्यांच्या, देशावर आल्यानंतरच्या प्रथम कांहीं दिवसांच्या सांपत्तिक परिस्थितीचें अनुमान करितां येतें.]

---

* हल्लीं ही जमीन भिलवडी येथील गुण्यांकडे चालू आहे.

शं. ल. वैद्य, पुणें | इ. स. १७८८ जून ५
माहादेवभट (१-१२) चांफेट | श. १७१० किलक नाम संवत्सरें
ज्येष्ठ शुा १

॥ ४२ ॥ रोजकीर्द श. १७१० किलक ... ...

जेष्ठ शुध १ ताा वद्य ३० सुरु समान समानीन
मया अलफ माहे रमजान ———— जमा रुपये
जमाई ———— रुपये ———— खर्च

*

....

२५ माहादेवभट गुणे सातारकर
याजकडें कर्ज येणें होते त्या पाा
वसूल गुा बालाजी रामचंद्र
करकरे रुा १०० पाो चौथाई
मिती पाा ८३

लेखांक ६०

[ले. २१ व २५ पहा.]

शं. ल. वैद्य | इ. स. १७८८
माहादेवभट (१-१२) चांफेट | श. १७१० कीलक नाम संवत्सरे

रोजकीर्द खासगत राजश्री कासीराव विश्वनाथ वैद्य सुरु तिसा समानीन मया व अलफ माहे मोहरम उर्फ आस्वीनमास शके १७१० किलक नाम संवत्सरे जमाई ... ... रु.
जमाई ... ... रु. खर्च ... रु.

[1]........................

---

* यापूर्वी पुष्कळच जमाखातीं आहेत; कीर्दीच्या पान १२१ वर हा मजकूर आहे. पाा ८३ हें खतावणीचें आहे.

१ यापूर्वी पुष्कळच जमाखातीं आहेत. कीर्दीच्या १४७ पानावर हा मजकूर आहे. पान ९४ हें खतावणीचें होय.

२५ माहादेवभट गुणे गुा कृष्णराव वैा हस्ते बालाजी रामचंद्र करकरे समाईक कर्ज येणे मुा रु. १०० शंभर पैा चौथाई नांवे हरि बलाल जोग मलकापुरीं मुदला मुदल घेतले व्याज सर्वांनीं सोडिले मिति आस्वीन वद्य ९ रोख विा बाबूराव गद्रे (पान ९४.)

लेखांक ६१

सवाई माधवराव पेशवे रोजनिशी विभाग ३ इ. स. १७८७-८८
इतर मुलकी नोकर; पान १९

मोरो विष्णु (२-११) मठ ८४६ (९७८)

सनद परवानगी रुबरु

८४६ (९७८) कारकून निसबत दप्तर यांचे तांदूळ वगैरे जिन्नस खेरीज फिरंगाण कोंकणांतून हरएक घाटे व गल्ला देशांतून खरेदी करुन एक खेप पुण्यास आणतील त्यास आणू देणें जकातीचा तगादा न करणें म्हणून साल गुदस्ताप्रमाणें साल मजकुरी दस्तके

तिसा समानीन मया व अलफ सफर १ १७८७-८८

चालते दफ्तर	दस्तके	तांदूळ वगैरे	बैलसर
मोरो विष्णु गुणे	१	१	१०
बापूजी महादेव * (गुणे)?	१	·॥·	५

* दुसरे बाजीराव रोजनिशींत याच प्रकरणांत बापूजी महादेव गुणे असा स्पष्ट उल्लेख आहे तेव्हां हेहि बापूजी महादेव कदाचित् गुणे असावेत असें वाटतें.

लेखांक ६२

सवाई माधवराव रोजनिशी विभाग ३

प्रकरण २१—सार्वजनिक उत्सव; * पान ३०१

"११५० (९६६)—

कमावीस भेट राजश्री राव यास विजया दशमीस छ ८ मोहरमी सीमा उल्लंघन करुन स्वारी वाड्यांत आलियावर नजर केल्या ते जमा रुपये

समान समानीन मया व अलफ रबिलावल २९ १७८७-८८

....

५ सदाशिव राम गुणे

५ माधवराव कृष्ण गुणे

२ जगन्नाथ धोंडदेव गुणे"

लेखांक ६३

[गुण्ये व हळवे यांच्यामध्यें पूर्वीं झालेलीं समजीपत्रें पाहून पेशव्यांनीं मठच्या गुण्यांचा ८ व्या हिश्शाचा कुणबावा वादामुळें जप्त केला होता, तो मोकळा करण्याची आज्ञा रत्नागिरीचे सुभेदार महिपतराव कृष्ण साठे यांस दिली आहे.]

मठ-दप्तर श्री तालीक इ. स. १७८९ एप्रिल ३

कृष्णाजी विष्णु (१–८) मठ श. १७११ चैत्र शुा ८

सदाशिवभट (१–१०)–,,

धोंडो जनार्दन (१–१२)–,,

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

राजश्री **महिपतराव कृष्ण** गोसे

* पान ३०६ वर वरील गुण्यांचीं नांवें त्यांत दिलेल्या नक्त रुपयांचे आंकड्यांसह दिलीं आहेत. पुष्कळच नांवें या यादींत आहेत; सदाशिव राम (१३-७) चांफेट; माधवराव कृष्ण (१३-१२); जगन्नाथ धोंडदेव (१३-९).

सेवक **माधवराव नारायण** प्रधान नमस्कार सुरु तिसा समानीन मया व आलफ **कृष्णाजी विष्णु व लक्ष्मणभट बिन सदाशिवभट व धोंडो जनार्दन गुण्ये** ग्रामोपाध्ये मौजे मठ ता। हातखंबे तालुके रत्नागिरी याणी हुजूर विदीत केले कीं आपला व **बच्याजी धोंडदेव व बावजी गोविंद** हलबे यांचा मौजे मजकूर येथील खोती कुणबावा याविसी कजिया लागला तेव्हां खंडोजी देसाई ता। मजकूर याणी समजी पाडोन परस्परें पत्रेकरुन देविली असतां हलबे फिरुन कजिया करु लागले यास्तव आम्ही हुजूर फिर्याद करुन सन तिसा सबैनांत सरकारचे पत्र तालीके मजकूरचे मामलेदारास नेले की समजी पत्राप्रमाणें हलबे न वर्तत तर खोती व ठिकाणें जप्त कर्णे त्याप्रमाणें मामलेदारानीं जप्ती केली असतां हलबे वादास उभे न राहात व समजी पत्राचे अन्वये वर्तत नांहीं. जप्तीमुळे आपले बांद बांधीस्तीची खराबी जाहाली आहे. याजकरितां समजीपत्रें पाहून आमचे आठवे तक्षीमेचे कुणबावयाची जप्ती मोकली केली पाहिजे म्हणोन त्याजवरुन गुण्ये व हलबे यांची पेशजी समजीपत्रें परस्परे जाहाली आहेत तीं पाहून गुण्ये यांचे आठवे तक्षीमेचे कुणबाव्याची जप्ती मोकली करुन हे पत्र तुम्हास सादर केले असें. तरि गुणे याचे आठवे तक्षिमेचा कुणबावा याचे स्वाधीन करुन दिवाणदस्ताची उगवणी याजपासून करून घेत जाणे *जाणिजे छ ६ रजब बहुत काय लिहिणे.

लेखांक ६४

[गुण्ये व हलबे यांच्यामधील वाद संपल्यावर, हें मठ येथील कुणबाव्याच्या आठव्या हिश्शाच्या भोगवट्याचें पत्र सुभा रत्नागिरीकडून गुण्यास सादर केलें आहे]

मठ-दप्तर श्री इ. स. १७८९ आगस्ट ८

श. १७११ श्रावण वा।२

---

* येथून अक्षर बदललें.

॰ श्री ॅ

श्री माधव च
रणी तत्पर म
हिपतराव कृ
ष्ण नीरंतर

अजस्वारी राजश्री **महिपतराव कृष्ण** सुभेदार तालुके **रत्नागिरी** ताहा **कृष्णाजी विष्णु व लक्ष्मणभट बिन सदाशिवभट व धोंडो जनार्दन गुण्ये** ग्रामोपाध्ये मौजे मठ ताा हातखंबे प्रांत राजापूर सुरु तिसेन मया व अलफ. हुजूरची सनद छ १६ रजब सन तिसा समानीनची सुभा सादर जाहाली ते पैवस्ता छ २ शोवाल सन तिसेन तेथें आज्ञा कीं **कृष्णाजी विष्णु व लक्ष्मणभट बिन सदासिवभट व धोंडो जनार्दन गुण्ये** ग्रामोपाध्ये मौजे मठ ताा हातखंबे तालुके रत्नागिरी याणी हुजूर विदीत केले कीं आपला व **बच्याजी धोंडदेव व बाबजी गोविंद हलबे** याचा मौजे मजकूर येथील खोती व कुणबावयाविसी कजिया लागला तेव्हां खंडोजी देसाई ताा मजकूर याणी समजी पाहून परपपरे पत्रें करुन देविली असतां हलबे फिरोन कजिया करुं लागले यास्तव आम्हीं हुजूर फिर्याद करुन सन तिसा सबैनांत सरकारचें पत्र तालुके मजकूरचे मामलेदारास नेले कीं समजी पत्राप्रमाणें हलबे न वर्तत तरी खोती व ठिकाणे जप्त करणें त्याप्रमाणें मामलेदारांनीं जप्ती केली असतां हलबे वादास उभे न राहात व समजी पत्राचे अन्वये वर्तत नाहीं जप्तीमुळे आपले बांद बंदस्तीची खराबी जाहाली आहे याजकारितां समजी पत्रें पाहून आमचे आठवे तक्षिमेचे कुणबाव्याची जप्ती मोकली केली पाहिजे म्हणोन त्यावरुन गुण्ये व हलबे यांची पेशजी समजी पत्रें परस्परे जाहाली आहेत ती पाहून गुण्ये याची आठव्ये तक्षिमेचे कुणबावे याची जप्ती मोकली करुन हे पत्र तुम्हास सादर केले असे तरि गुण्ये याचे आठवे तक्षिमेचा कुणबावा यांचे स्वाधीन (करुन) दिवाण दस्ताची उगवणी यापासून करुन घेत जाणे म्हणोन त्यावरुन पेशजी **हलबे व डोंगरे व गुण्ये** त्रिवर्गाची मौजे मजकूरचे खोती विषई व टेंबकर सुधा कुणबाव्याचे

जमिनीविसी कजिया लागला तेव्हां त्रिवर्गांचे कतबे करिनें व पुरसीसा होउन सड्या घेतल्या आहेत त्यास तुम्ही तकरीर सुभा लिहून दिल्ही आहे त्यांत मौजे मजकुरीं आपला कुणबावा टेंबकर सुधा आठवा म्हणोन व सनसीत सबैनांत मौजे मजकूरचे ग्रामस्त व ताा मजकूरचे साक्षीदार यांच्या सड्या सुभाहून घेतल्या आहेत त्यापैकीं कांहीं जणाच्या लिहिण्यांत मौजेमजकुरीं कुणबावे आठ त्यांतील गुण्या कुणबावे करी येक व कांहीं जणांच्या लिहिण्यांत गुण्यांचा व टेंबकरांचा कुणबावा येक म्हणोन सडयांतील अन्वये व रघुनाथ धोंडदेव व बाबाजी गोविंद हलबे याणी तुम्ही कृष्णाजी विष्णु व सदाशिवभट गुण्ये यांचे नांवें समजी पत्र सन तिसा सबैनांत छ११ रजबी लिहून दिल्हे आहे त्यांतील अर्थ, टेंबकराचा कुणबावा स्वतंत्र असें म्हणोन तुम्हाकडे न देऊं यास्तव तुम्ही खोतीची वतनाचा कजिया आम्हापासीं करीत होतेत तो खोटा म्हणोन लिहोन दिल्हेत खोतीचे वतन वडिलार्जित आमचे आम्हीं अनुभवावे तुम्ही टेंबकराचे कुणबाव्याचा अनुभव करुन वसूल आम्हाकडें द्यावा आम्हीं टेंबकराचा कुणबावा स्वतंत्र म्हणोन तुम्हापासीं कजिया सांगत होतो तो खोटा व देवाचे मान पालखी व सिमग्याचे खेले व कलश व दिवालीचे दिवे व पोंवते याप्रमाणे मान तुम्हाकडें चालत आले आहेत ते तुमचे तुम्ही अनुभवावे व आमचा तांबूल श्रावणीचा व साड्यांचा मान पुरातन तुमचे घरचा चालल्याप्राा तुम्ही आम्हास द्यावा व आमचे घरचे उपाध्यपण व ग्रामोपाध्यपण तुम्हाकडें पुरातन चालल्याप्रमाणें आम्ही चालवावे म्हणोन व याचे अन्वये तुम्ही कृष्णाजी विष्णु व सदासिवभट गुण्ये याणीं उभयतां हलबे यास समजी पत्र लिहून दिल्हे आहे त्या **वरुन पंचाईता मते पाहातां मौजे मजकुरी कुणबावे आठ त्यांतील टेंबकर सुधा गुण्यांचा कुणबावा येक असे सडयाचे अन्वयावरुन व समजीपत्रावरुन ठरले** सबब तुम्हापासून सरकारात शेरणी रुपये ५० पंनास रााये घेउन टेंबकरसुधा आठव्या कुणबाव्याची हुजूरचे आज्ञे प्रमाणें जप्ती मोकली करुन हे पत्र तुम्हास सादर केले असे तरी सालमजकुरापासून तुम्ही आपल्या कुणबाव्यांतील जमीन जुमला व झाड झाडोरा

व मानपान याचा उपभोग पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें करुन दिवाण दस्ताची उगवणी करीत *जाणे जाणिजे छ १६ जिलकाद. मोर्त

व सू

द०

[याच प्रकारच्या गोषवाऱ्याचें महिपतराव कृष्ण यांचें कमाविसदार मौजे मठ यास सुरु तिसेन मया व अलफ छ १६ जिलकादचें अस्सल आज्ञापत्रहि पण आहे; तसेंच अशा प्रकारचें आणखी एक भोगवटा-पत्र विशाळगडच्या प्रतिनिधीकडूनहि पण मिळालें आहे.]

लेखांक ६५

[गुण्ये व हलबे यांच्यामधील वाद संपल्यावर इ. स. १७८९ त गुण्यांना, त्यांचा मठ येथें जो आठव्या हिश्श्याचा कुणबावा होता तो त्यांचा ठरल्यानें त्याच्या भोगवट्याचें पत्र मिळालें. परंतु हळब्यांची खोती जप्तच होती ती या पत्रावरून मोकळी झाल्याचें समजतें.]

लक्ष्मणभट (८-२) मठ

यादी वेदमुऊर्ती **लक्षुमणभट गुण्ये** ग्रामोपाध्ये मौजे मठ ता। हातखंबे तालीके रत्नागिरी याणी विदित केले कीं मौजे मजकुरी आमचा कुणबावा टेंबकर सुधा आहे. त्यांतील जमीनजुमल्याविसी **रघुनाथ धोंडदेव** व **बाबाजी गोविंद** हलबे मौजे मजकूर याचा व आमचा काजिया लागला होता त्याचे वृत मनास आणून **खंडोजी देसाई** ता। मार याणी उभयताची समजी करुन दिल्ही असतां हलबे + + + + स आले याकरितां आम्ही सरकारांत विनंति करून सनद घेतली की देसाई याणी समजी केली त्याप्रमाणें हलबे यास वर्तवणें न वर्तत तरी त्याजकडें मौजे मजकूरची खोती चालत आहे ती जप्त करुन हुजूर पाठवून देणे म्हणोन त्यावरुन सुभाहून हलबे यास बलाउन आणून ताकीद केली ते समजीप्रमाणें न यैकत सबब

---

* येथून अक्षर बदललें.

हलबे याकडील खोती जप्त करुन हुजूर जावयास सांगितले परंतु ते हुजूर आले नाहींत यास्तव सन तिसा समानीत साली आम्ही समजीप्रमाणें कुणबावा आपणाकडे चालवावा याकरितां हुजूरची सनद सुभा नेली तेथें चौकसी करुन आमचा कुणबावा आम्हाकडे चालता करुन पत्रें दिल्ही त्याप्रमाणें आम्ही अनुभव केला खोती अद्याप जप्तीस आहे त्याची मोकळीक करुन द्यावयास हलबे यास जातवानी मुले पुणीयास यावयाचे सामर्थ नाहीं. याकरितां कृपाळू होऊन मजकूरची खोती हलबे याकडे चालती करुन दिली पाहिजे.

लेखांक ६६

आश्वी दप्तर

इ. स. १७९६।१७९७

उपरी राजश्री जनार्दन बच्याजी याजकडे, मौजे पिंपरी, लोकी व अजमपूर व मौजे वोझर ता। हवेली संगमनेर हे च्यार गांव सरंजामास आहेत. त्यास जनार्दन बच्याजी व मोरो महादेव व महादाजी बलाल या त्रिवर्गाचा विभक्तपणामुळें घरवाटणीचा कज्या लागला आहे. त्यास जनार्दन बच्याजी व मोरो महादेव उभयेता मिलोन महादाजी बलाल याचा तिसरा विभाग सुरळीत देत नाहीं म्हणोन महादाजी बलाल याणी विदीत केले त्यावरुन कज्याची निर्गत होईतोपर्यंत च्यारी गांव सरकारात जप्त ठेवावयाचा करार करून हे पत्र* तुम्हास लित असे. तर अलाहिदा मोकदमाचे नांवे सनद दिल्ही आहे त्याप्रो च्यारी गावची जप्ती करून अमलाची

---

* हें पत्र माधवराव रामचंद्र कानडे यांचें आहे. आश्वी शाखेचे मूळपुरुष महादेवभट गुणे यांचे पुत्र मोरोपंत (५-४) चांफेट; व नातू जनार्दनपंत (५-५) चांफेट; आणि महादाजीपंत (५-६) चांफेट; या त्रिवर्गामध्यें वरील च्यार गांवचे वांटणीसंबंधीं कज्या लागल्याचा उल्लेख आहे. जनार्दन बज्याजीकडे हीं चारी गांवें सरदार कानडयांच्याकडून सरंजामास होतीं असें दिसतें. रावबाजीनें कानड्यांचा लाखाचा सरंजाम जप्त केला; त्या वेळेपासून गुण्यांचा व कानडयांचा संबंध संपला असावा. ले. ७३ पहा.

देखरेख तुम्ही करून येवज सरकारात वसूल करून पाठवीत जाणे. सुरु सबा तिसैन मया व अलफ.

लेखांक ६७

सवाई माधवराव पेशवे–रोजनिसी विभाग ३

प्रकरण २१ वें सार्वजनिक उत्सव पान ३१४.

११५३ रोजकीर्द राजमंडळ स्वामी राजश्री पंतप्रधान सुरु सन खमस तिसैन मया व अलफ छ २३ जमादिलाखर यात विजयादशमीचे पोशाख सनगे खर्च आहेत तीः—

इ. स. १७९५ जानेवारी १५

श. १७१६ पौष वा १०

...तपशील चालू...

७९७०३॥· शिलेदार सनगे

....

१०१।· विष्णु धोंडदेव गुण्ये

लेखांक ६८

[मठ येथील गुण्ये व हलबे यांच्यामध्यें इ. स. १७४० पासून ते १७८० पर्यंत जो वाद झाला, त्यांत आलेल्या खर्चाची यादी.]

मठ दप्तर श्री इ. स. १७९६

विष्णु कृष्ण (२-३); गोपाल कृष्ण (२-१), सदाशिवभट (१-१०)श.१७१८

हिशेब बाबजी **गोविंद** हलबे यांच्या कजियामुळें खर्च जाहाला त्याचा एकंदर आकार खासगत **गोपाल कृष्ण गुण्ये** सुरु सबातिसेन मया व अलफ.

---

* पान ३२१ पासून शिलेदारसनगे सुरू होतात, त्यांत पान ३१५ वर वरील गुण्यांचा उल्लेख आहे; विष्णु धोंडदेव (१३–१०) चांफेट.

१५८ पुण्यांत विद्यमान विष्णु कृष्ण
हुजूरच्या सनदा घेणे वाा
१३८ विाा विष्णुपंत
२० विाा गोपाल कृष्ण

१५८

पौा वजा दुसरे यादींत जमा
आले ते दूर केलें ऐकून रुाो
१६४४ विाा सदासिवभट गुण्ये
व गोपाल कृष्ण
७६१॥ विाा सदाशिवभट
८८२॥ विाा गोपाल कृष्ण

१६४४

१८०२

१४७४।॥≡॥ वरील घर व रुपये
१०९७।॥=॥ घर व कुडयाटे वरील१
७६९।॥=॥ हा वई
३२८ कुडियाट वगैरे

१०९७।॥=॥·
३७७८ ।· रुपण घर व कुडियाट

१४७४।॥≡॥

३२७६।॥≡॥
पौा वजा विाा सदाशिवभट रुाो
७६१॥·
बाकी २५१५।≡॥·

लेखांक ६९

दुसरे बाजीराव पेशवे यांची रोजनिशी इ. स. १७९७।९८

मोरो विष्णु (२–११) मठ पान २०१

राघो नारायण (५–२) मठ सनद १

बापूजी महादेव (सासवड-पुणें शाखा) रसानगी यादी

१९७।६० इ. स. १७९७; ९८

कारकून निसबत दप्तर यांचे तांदूळ वगैरे जिन्नस खेरीज फिरंगाण कोंकणांतून हरएक घाटे व गल्ला देशांतून खरेदी करुन एकदम पुण्यास आणतील त्यांस आणू देणें जकातीचा तगादा न करणें म्हणून सालगुदस्ताप्रमाणें सालमजकुरीं दस्तके

६ इतर मुलकी नोकर

	दस्तके	तांदूळ वगैरे खंडी	बैलस
मोरो विष्णु गुणे	१	१	१०
राघो नारायण गुणे	१	१	१०
बापूजी महादेव गुणे	१	·॥·	५

लेखांक ७०

किरकोळ टिप्पणें

राजवाडे खंड ७ वा;

'शके १७१८ तलनाम संवत्सरे सुरु सन सबा तैन मया व अलफ सन १२०६ संवत् १८५३ राजशाक १२३ इ. स. १७९६ व १७९७'

पान १६

'खासबारदार गुणे याजकडे*'

इतिहाससंग्रह, ले० द. ब. पारसनीस

* खासबारदारी विष्णु धोंडदेव गुण्ये (१३-१०) चांफेट यांच्याकडे होती. ले. ८३ पहा. सदाशिवपंत गुणे (१३-७) चांफेट—कऱ्हाड.

पुस्तक ७ वें ऐतिहासिक टिपणें भाग ६ पान २
' पुण्यांतील ठळक मंडळी
१७९३–९४

श्री

यादी गृहस्थ मंडळी नांवनिशी सुा आर्बा
तिसैन मया व अलफ
.... पान ६

सदाशिवपंत गुणे यांचे पुतणे

लेखांक ७१

राजाराम वासुदेव गुणे मुा कुर्णे यांचें दप्तर.	श्री नकल	इ. स. १८०० जून १४
	Stamp	श. १७२२ ज्येष्ठ वा॥ ८
	Eight	इ. स. १८०१ जून ३
	Annas	श. १७२३ अधिक ज्येष्ठ वाा ७

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजेश्री **मोरो अनंत व विठ्ठल नारायण गोसावी** यासी.

सेवक **बाजीराव रघुनाथ प्रधान** नमस्कार सुरु सन इहिदे मय्यातेन व अलफ राजेश्री **राघो नारायण गुण्ये** कसबा **हरचिरी** तालुके **रत्नागिरी** हे कुटुंब वत्सल व कुणबावा भारी न करितां मशारनिल्हेनीं वरघाटी होउन म्हशी सर ३ तीन भत्याबद्दल व कुणबाव्याचे लागवडीस खेरीज दस्ती पर-लकी कुणबी यांचे घर एक येणें प्रमाणें आणिणार ती पाळावयाविसी सरसुभाहून ही सनद तुम्हास सादर केली असेत मशारनिल्हे तीन म्हैशी व एक घर सदरहू प्रमाणें आणतील ती त्याजकडे साल दरसाल पाळ चालविणे नवीन सनदेचा आक्षेप न करणें जाणिजे छ २० मोहरम प्रांत हुजूर.

मोर्तब असे

असलप्रमाणें नकल केली तारीख ७ जानेवारी सन १८३१ बाजी बल्लाळ लोटलीकर मामलेदार हुजूर राा ताा माा ʋ

दू.

असल बरहुकुम नकल कृष्णाजी यज्ञेश्वर पाटणकर नकलेवरून नकल रुजु पाहणार माहादाजी गणेश खेर कारकून ता। मजकूर दिजंबर सन १८३४.

लेखांक ७२

[हें दिवडगांव अद्याप गंगाधर नारायणांचे वडील बंधु राघो नारायण गुण्ये, पुण्यांतील उत्तर पेशवाईंतील सावकार, यांच्या वंशजांकडे चालू आहे.]

दत्तात्रेय विश्वनाथ गुण्ये, **इ. स. १८०१ ऑक्टोबर**
इनामदार, दिवड, मु॥ दिवढ **श्री** **१०**
गंगाधर नारायण (५-३) मठ **आश्विन शु॥ ३ श. १७२३**

राजश्री **गंगाधर नारायण** उपनाम **गुण्ये** गोत्र अत्रि सूत्र आश्वलानन ग्रामोपाध्ये मौजे मठ ता। हातखंबे तालुके रत्नागिरी प्रांत राजापूर गोसावी यास

ॐ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक **चिमणाजी शंकर सचीव** नमस्कार सुरु इसन्ने मयातेन व अलफ शके १७२३ दुर्मतिनाम संवत्सरे तुम्हीं हुजूर कसबे **भोर** येथील मुकामी येउन विनंति केली कीं आम्हीं स्वामीचे दवलतीचे उपयोगी पडलो यास्तव कुटुंबाचे योगक्षेमार्थ नूतन इनाम गांव देउन वंशपरंपरेनें चालविले पाहिजे त्याजवरून मनास आणिता तुम्ही दवलतीचे उपयोगी पडला तुमचे चालविणें आवश्यक जाणोन तुम्हावरी कृपाळु होऊन कुटुंबाचे योगक्षेमार्थ **मौजे दिवड ता॥ पोनमावल** हा गांव नूतन इनाम **स्वराज्य व मोगलाई** येकूण दुतर्फा कुलबाब कुलकानु हलिपटी व पेस्तरपटी देखील इनाम तिजाई व हम चौथाई खेरीच दरोबस्त जल तरु काष्ट पाषाण निधि निक्षेप सहित भोगवटीयास सादर केले असे

तरी सदरहू मौजे मजकूर हा गांव इनाम तुम्हीं वडिलांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनभवून सुखरुप राहणे जाणिजे छ १ जमादिलाखर दाा हुकुम पत्रावधि

दस्तुर वार

लेखांक ७३

आश्वी दप्तर

यादी सुरु इहिदे अशर मयातेन व अलफ
माधवराव रामचंद्र याजकडील सरंजामाचे जप्तीचे गांव.
५ ताा. हवेली पाो संगमनेर
१ मौजे वोझर बुाा १ मौजे पिंपरी १ मौजे लोकी
१ मौजे अजमपूर १ मौजे टेंभी.
५

[रावबाजीनें माधवराव रामचंद्र कानड्यांचा सरंजाम जप्त केला. त्यामुळें वरील गांवें जप्तींत गेलीं, त्यांची ही यादी आहे. आश्वी शाखेच्या गुण्यांचेकडे मौजे टेंभी सोडून चारी गांव सरंजामास होते. ले. ६६ पहा.]

लेखांक ७४

पेशव्यांचे पागा–आश्वी येथील मुक्काम*

कारकीर्द	रोजनिशी पान	इंग्रजी साल, मुसलमानी साल, महिना व ता.	मुक्काम
बाजीराव–बल्लाळ यांची	बाळाजी बाजीराव यांची २३५ पान	सीत सलासीन मया व अलफ १७३५–३६ महिना रमजान ता. ३-४	आशी उंबरी–परगणे संगमनेर नदी प्रवरा उत्तर तीर.
बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब	,, २४१ पान	इसन्ने आर्बैन मया व अलफ १७४१–४२ महिना जिलकाद ता. ३	मौजे आसी पा। संगमनेर.
,,	२४५ पान	इहिदे खमसेन मया व अलफ १७५०–५१ महिना सफर ता. २५	मौजे आसुंबरी ता० हवेली परगणे संगमनेर प्रांत गंगाथडी.
,,	२५५ पान	खमस खमसेन मया व अलफ महिना जमादिलाखर ता. २१	मौ० आशी उंबरी प० संगमनेर, प्रवरातीर.
माधवराव बलाल व रघुनाथ बाजीराव	४२६ पान	तिशा सितेन मया व अलफ १७६८–६९ महिना सफर ता. १	मौ० आसी परगणे संगमनेर.

* यावरून आश्वीची पागा सन १७३५ पासून अस्तित्वांत असावी असें दिसतें.

लेखांक ७५

[ह्या आश्वी येथील मुक्कामांत रावबाजीनें तशा विशेष गोष्टी कोणत्याच केल्या नाहींत. पागेच्या दृष्टीनें हे मुक्काम महत्त्वाचे आहेत.]

दुसरे बाजीराव यांचे पागा–आश्वी येथील मुक्काम

कारकीर्द	रोजनिशी पान	इंग्रजी साल, मुसलमानी साल, महिना व ता.	मुक्काम
बाजीराव–रघुनाथ पेशवे	दुसरे बाजीराव ३१५ पान	समान मयातैन व अलफ ११-२-१८०८ महिना जिल्हेज ता. १३	मौजे आसी खुर्द ता० हवेली प० संगमनेर.
,,	,,	वर्ष तेंच १८-३-१८०८ महिना मोहरम २०	मौजे आसी खुर्द.
,,	३१८ पान	आशर मयातैन व अलफ २७-२-१८१० महिना मोहरम २२	मुक्काम आशी उंबरी.
,,	३१९ पान	इहिदे आशर मयातैन व अलफ १९-२-१८११ मोहरम २४	मौजे आशी परगणे संगमनेर.

		वर्षे तैंच २५ मोहरम ते ४ सफरपर्यंत ५ सफर १-३-१८११ (५ सफर)	मौजे कोपरगांव प० कुंभारी.
,,	३२१ पान	इसन्ने आशर मयातैन व अलफ १८११ रबिलावल १२ ते जमादिलावल १३ जमादिलावल १४ ते १५ ता. ६, ७-६-१८११ (ज. १४, १५) जमादिलावल १६ ता. ९-६-१८११ (ज. १७) जमादिलावल १७	मौजे आशी प.संगमनेर बेट, मौ० कोपरगांव प० संगमनेर. आशी खुर्द. कसबे संगमनेर. आशी खुर्द.
,,	३२२ पान	सलास आशर मयातैन व अलफ ता. २६, २७-२-१८१३ सफर २४–२५	मौजे आशी खुर्द तर्फ हवेली परगणे संगमनेर.
,,	३२४ पान	आर्बा आशर मयातैन व अलफ रमजान २२ रमजान २३ ता. १९-९-१८१३	कसबें राहतें मौजे आशी खुर्द.
,,	३२५ पान	आर्बा आशर मयातैन व अलफ ता. १४, १५, १६-२-१८१४ सफर २२ ते २४	मौजे आशी खुर्द ता०हवेली प०संगमनेर.

लेखांक ७६

[आश्वी शाखेपैकीं, कृष्णाजी रामचंद्र ऊर्फ अबा गुण्ये यांचें नारायणराव रामचंद्र गुण्यांना हें पत्र आहे. नारायणराव व्यापार करीत होते असें पत्रावरून दिसतें. पत्राचा शक चुकीचा आहे. कारण कृष्णराव वयाचे सुमारें ७५ वे वर्षी सन १९०१ मध्यें निवर्तले.]

आश्वी दप्तर इ. स. १८२० ऑगस्ट ता. २१ (?)

श्रावण शु॥ १३

नारायणरावजी रामचंद्र श्रीगजानन श. १७४२ (?)

(५-१३) चांफेट

कृष्णाजी रामचंद्र (५-१०) चांफेट

चिरंा राजमान्य राजश्री **नारायणरावजी गुणे** यास **कृष्णाजी रामचंद्र गुणे** आनेक आसीर्वाद उपरी येथील कुशल ताा श्रावण शुाा १३ शके १७४२ पावेतो मुक्काम **अहंमदनगर** येथें श्रीकृपेकरुन कुशल असो विाा तुम्ही **गोपाळ्या मारवाडी** याजबराबर व **मसुगडी** याजबराबर असीं दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं लिहिले मजकूर समजलें त्याची उत्तरे व इकडील मजकूर विाा

१ तंबाकु व पांवरुणें लिहिल्याप्रमाणें पोंहोचली बाकी राहिलेली सामान हि लवकरच येईल ही आशा आहे.

१ हुंडीचे रपये घेउन पाा आहेत.

१ गोपाला याजबराबरील पत्रांत मजकूर **गणपुले** याजकडील निन व्याजी भांडवलानें समाईक व्यापार सुरु केला आसा आसून हलि आलेले पत्रावरुन दोनसे रुपये आणखी घेऊन मागील बाकीहि आदा केल्याचें लिहिलें त्याजवरून कांहींच उमज पडेना. बाकी कोणीकडून रुपये आणून-आदा केली............

[१]......चा प्रसंग पडल्यास नाकांत नथ सुद्धा घड नांहीं याजमुळें तसे करीत नांहीं. बहुधा येथील सर्व घोटाल्यांतून निघोन नथ होईल तेव्हाच खटले आणूं.

[२]सदरी लिहिलेले सर्व मजकूर मनन होउन तपसीलवार व्यापारासंबधी पत्र फारच लवकर अगदीं विलंब न करतां पाो शाहणे याणी फार उत्तम प्रकारच्या गोष्टी उपयोगी सांगितल्या त्याचा खुलासा भेटीखेरीज होणार नांहीं, उत्तर काय लिहिले ते कळवावे. प्रदक्षणा इकडून दुसरे पत्र आल्याखेरीज......करु नयेत माणसे आजारी पडली ते विघ्नच आहे. आसे भडजीनें सांगितले आतां पुढें वाईट दिवस येणार नाहींत आसे भट म्हणतो परंतु राघोकडील पत्रानें फारच हातपाय मोडलें कळावे लोभ करावा हे आसीर्वाद.

ताा तंबाकूवर कर बसणार आहे या कारणानें फार माहाग होईल असे बोलतात, भिउं नये नफा होईल, तुमची जी पत्रें येतात त्यांत पर्जन्याची हकिकत कांहींच लिहीत नाहीं त्यास हे बराबर नांहीं लिहीत जावी.

[३]वडिलाचे सेवेसी आपत्याचे सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना वि॥ सर्व मजकूर चिंराा यांचे पत्रावरुन समजतील उत्तर तपसीलवार प्रो......

शेवेसी सिरसातीाा सौा मातोश्रीस सिाा

हेंच पत्रीं **नारायणराव** यांस **शंकराचा** कृतानेक साष्टांग नमस्कार आपण जो उद्योग आरंभिला आहे तो फार चांगला आहे. ऐकून संतोष झाला. या कार्यांत आपणास चांगला नफा व्हावा आणि तो आपण मला द्याल असी आशा आहे. हे विनंति.

---

१ ' चा प्रसंग येथून या पत्राचे पानाची मागील बाजू सुरू होते. या मागील बाजूच्या मजकूराचा या दर्शनीं बाजूचे मजकुराशीं संदर्भ बरोबर न लागल्यानें मध्यंतरीं पानें गहाळ झालीं असावीं असें वाटतें.

२ येथून स्वतंत्र प्यारेग्राफ सुरू होतो.

३ मुखपृष्ठावरील बाजूस (मागील बाजू पूर्ण झाल्यावर) हा मजकूर आडवा लिहिला आहे. पत्र अपूर्ण आहे.

लेखांक ७७

[चांफेट येथील खोतीबद्दल कंपनी सरकारांत दिलेली माहिती.]

चांफेट-दप्तर नं. १ **हु** **नकल ता. १।१२।१८२१**
श्रीधर विठ्ठल (११-१०)

सरकार कंपीनी बाहादुर तालुके रत्नागिरी दस्त खत बैस्म **श्रीधर विठल गुण्ये** उमर वर्षे ३१ जात कराडे ब्राह्मण खोत मौजे **चांफेट** ता **पावस** तालुके मजकुर सुरु ईसनें अशरीन मयातेन व अलफ कारणें सरकारांत कतबा लिहून दिल्हा ऐसाजे मौजे मजकूर या गांवचे खोतीचे वतन तुम्ही किती वर्षे अनभविता पुरातन वतनी गांव तुमचा किंवा कसा साध्य केला गांव कुलारगी किंवा खोतकी येविसी साधनाचे कागदपत्र व साधनें काय असतील ती असल रुजु करुन त्याच्या नकला लिहून देणें म्हणोन हुकुम ऐशास; मौजे मजकूर हा गांव पुरातन वतनी तक्षीमा, मुल्ये खोत; दरोबस्त गांवच्या **तक्षीमा दोन**, व आम्ही **गुण्ये** खोत दरोबस्त गांवचीं **तक्षीम तिसरी** येणेप्रमाणें उभयता खोतीची वहिवाट वंशपरंपरेनें अनभवीत आहो. **कोणत्या पुरुषानें गांव कसा साध्य केला हे वडिलांनीं आम्हाजवळ सांगितलें नाहीं खोतीस वर्षे अजमासे दोनशेंपर्यंत होत आली वतन समंधे कागद कौल हबसी यांचा छ १० जिलकाद सन तीसा अशर मया व अलफेचा माहालची** खंडणी जाहाली त्यांत आमचे **निपणजे रघभट खोत** कदीम मौजे मजकूर यांचे नांव आहे. तो असल जमीदार याजपासी आहे. या मागील साधनाचे कागद पत्र भाउबंद देशांत आहेत त्या जवल असतील आम्हाजवल नाहीं गांव खोतकी लिहून दिल्हे यांत कम पेश जाहाल्यास सरकारचे गुन्हेगार हा कतबा आम्ही आपले अकल हुषारीनें व खुषर जाबदीनें लिहून दिल्हा सई छ ५ रबिलोवल तारीख १ डिजंबर सन १८२१ दस्तुर श्रीधर विठल गुण्ये खोत मौजे मजकूर

साक्ष
१ चिटको रामचंद्र देसाई
ता पांवस दस्तुर खुद

सई **श्रीधर विठल गुण्ये** खोत
मौजे मजकूर दस्तुर खुद

१ बाबणाजी आत्माजी देश
कुलकर्णी ता॥ मा॥ दस्तुर
बापुजी धोंडदेव देश कु
लकर्णी

लेखांक ७८

[ले. ७७ पहा.]

चांफेट दप्तर नं. १ श्री ता. १९।३।१८२८
श्रीधर विठल (११–१०)

यादी **मौजे चांफेट तर्फ पांवस** ताळीके रत्नागिरी सुरु सन समान अशरीन मयांतेन व अलफ हुजूरचा हुकूम सन १८२८ सालीं बारा नंबरचा गावांमध्यें + + + + + + + + चा खोत कोण व त्याची तक्षीम कितीकावी या बाबद तपसीलवार सादर जाहाला ऐशास मौजे **मजकूर येथील वडिल घराण्याचे विठल रामचंद्र मुल्ये खोत यांची दरोबस्त गांवपैकीं तिसरी तक्षीम ते हाली परागंदा हिंदुस्थानांत आहेत.** दुसरें घराण्याचे आम्ही श्रीधर विठल गुण्ये खोत आमची दरोबस्त गांव पैकी तिसरी तक्षीम मौजे मजकूर येथील फौजदारी कामाबाबद गांवी खबरदारी राखणें म्हणोन आम्हांस सरकारचा हुकूम जाहाला तो बरसीर आहे ह(कीक)द लिहून दिल्ही सई तारीख १९ माहे मार्च्य सन १८२८.

साक्ष सई श्रीधर विठल गुण्ये खोत

१ **रामचंद्र अनंत दलवी**; माव मोजदार मौजे मजकूर पावस दस्तुर खुद.
दस्तुर खुद दस्तुर खुद

१ **नारो रामचंद्र** + + + + (जोते ?) तर्फ लांजे दस्तुरखुद.

लेखांक ७९

सदाशिव यशवंत गुणे मु॥ श्री ता. २६।१२।१८४३
कऱ्हाड यांचा संग्रह श. १७६५

यादी राजश्री रामराव व्यंकटेश गुणे,

सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ सन १२५३ फसली. आमचे पणजे बालाजी जनार्दन यांस श्रीमंत महाराज छत्रपती यांनीं श्रीमंत पंत मत्री यांची मुतालकीची असामी करून दिल्ही. त्यास पुत्र रामाजी बलाल व लक्ष्मण बलाल व धोंडो बलाल व बापूजी बलाल व कृष्णराव बलाल असे होते त्यास असाम्या व सरंजाम गांव दोन व प्रतिनिधी याजकडून इनाम गांव दरोबस्त येक व वकिली समंधे वेतन खेरीज होते. व लक्ष्मण बलाल श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब यांचे जवळ होते. ते पानिपतवर श्रीमंत भाऊसाहेब याजवर गर्दी जाहाली त्या वेलेस त्याजबरोबर गेले व कृष्णराव बलाल यास पायगुडें यांचे पांगेची असामी दिवाणगिरीची होती तिची तैनात नक्त रुा. १६९५।• व धोंडो बलाल यांचे नांवे, आमचे पणजे बालाजी जनार्दन मृत्यू पावल्यानंतर श्रीमंत पंत मत्री याजकडील मुतालकीची असामी होती ती मारानिल्हे यांचे नांवे जाहली. ती पुढे त्यांचे पुत्र जगन्नाथ धोंडदेव याचे नांवे चालली. त्या समंधे सरंजाम व वेतन व जमीन काा भिलवडी येथील व गांव सरंजाम देहे तीन सरदेशमुखी पाा प्रगणे आलंद व परगणे धारूर येथील रामाजी बलाल यांचे नावे सरंजाम श्रीमंत माधवराव बलाल प्रधान याणी दिल्हे ते देहे दोन मौजे अैतवडे कर्यात कासेगांव प्रांत पनाळा हा गांव दरोबस्त व मौजे सालसिर्बे प्रांत करहाड येथील देशमुखी व सरदेशमुखी व नाथाजी सालोखे याज बाा जमीन सुा. सरकारी अमल सरंजामास सन खमस सीतेनांत करून दिल्हे. व श्रीमंत पंत प्रतिनिधी याणी मौजे सालसिर्बे प्रांत करहाड हा गांव येथील दरोबस्त (जिल्हा) ? आमल वगैरे आर्बा सीतेनांत इनाम करून दिल्हा व काा नांदगांव येथील जमीन येणे प्राा चालविले. पुढे रामाजी बलाल मृत्य पावल्यानंतर त्यांचे पुत्र सदाशिव राम यांचे नांवे चालत आले. पुढे सदाशिव राम मृत्य पावल्यानंतर आमचे आजे बापूजी बलाल यास पुत्र व्यंकटराव बापूजी यांचे नांवे सरंजाम वगैरे सरकारांतून करार करून दिल्हा. त्याजवर व्यंकटराव बापूजी राजश्री हरीपंत तात्या फडके याजबरोबर कर्नाटकचे स्वारीस

गेले. तेथें मृत्य पावले त्याजवर मामूल प्रा॥ आमचे नांवे सदरहू सरंजाम वगैरे येकंदर चालत आला.

त्याचा——————————ता॥

कीता रामराव व्यंकटेश

२३७८॥।= मौजे अैतवडे खु॥ प्रांत पनाळा.

५६०॥।. मौजे सालसिर्बे प्रांत कराड येथील हुजूर मामल्याची आमल सरकारी सरदेशमुखी वगैरे सरंजाम.

७२७॥. मौजे सालसिर्बे येथील इनाम पंतप्रतिनिधी याजकडून.

१२५ का॥ नांदगाव येथील इनाम जमीन.

३७९२८=

ता॥

३७७॥. चालू——————

कीता जगन्नाथ धोंडदेव

७२० का॥ भिलवडी येथील इनाम.

५०० सरंजाम मौजे हिरहली प्रगणे आलंद

५२॥. सरंजाम मौजे आऊसगांव व वराडे प्रा॥ धारुर.

२००० वेतन सरदेशमुखी पा॥.

३२७२॥.

ता॥

७२० चालू का॥ भिलवडी येथील इनाम जमीन.

२५५२॥. गैर चालूं

५५२॥. गांव मोंगलाईत गेलें.

२००० सरदेशमुखी पा॥ वेतन.

२५५२॥.

३२७२॥.

१२५ का॥ नांदगाव येथील जमीन इनामी

२५२॥ इनाम मौजे सालसिर्बे प्रात कऱ्हाड हा गांव प्रतिनिधी याजकडून चालत होत त्या पा॥ शेरीची जमीन आम्हाकडे चालत आहे ते बिघे ९२

३७७॥

३४१४॥= गैर चालूं

२३७८॥= मौजे अैतवडे

५६०॥· मौजे सालसिर्बे प्रा करहाड येथील हुजूर मामल्याचा अमल जती सन आर्बा मयातेनांत

४७५ मौजे सालसिर्बे प्रांत करडा येथील जिल्हे आमल दरोबस्त अकार ——— रुा.

७२७॥·

पो गोखले याणी येक सालीं ++ घेत गेले आणि आपले अखेरीस आम्हाकडें शेरी जमीन बिघे ९२ तिची अकार रुा

२५२॥·

चालत होती ती चालून बाकीचा गांव चारसे पंच्याहत्तर रुा सरकारांत गेले.

३४१४॥=

३७९२८=

येणेप्रमाणे आम्हाकडे चालत होते, त्याप्राो चालूं आहे. व गैरचालू याचा ताा सदरी लिहिला आहे व आम्हा उभयेतांस पेनसन रुाो ६०० सालीना चालूं **कुपणी सरकारचा** अमल जाल्यापासून आहेत व मौजे अैतवडे खुद प्रांत पनाळा हा गांव दरोबस्त सरंजामास सरकारांतून आम्हाकडें **श्रीमंत माधवराव नारायण** यांचें संपूर्ण कारकीर्दी परियंत चालत आला आलीकडें **श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब** यांचे कारकीर्दींत शके १७१७ सीत तिसैनापासून **रत्नाकरपंत, पनाळकर** यांचे कारभारी हे मौजे मजकूरचें कुलकर्ण, आपले म्हणो लागले आणि खटल्यास आरंभ केला. आणि गांवास उपद्रव करूं लागले. श्रीमंत राजश्री

बाजीराव साहेब यांची कारकीर्द नवी. तेव्हां आम्ही श्रीमंतास विनंति केली त्याजवरून छत्रपती पनाळकर यांस पत्र दिल्हे. त्याची नकल व गांवचे वहिवाटीची सनदापत्रें यांच्या नकला दाखल्यास पाहण्याकरितां दिल्हया आहेत. परंतु गांव रत्नाकरपंत याणी दाबला तो सोडला नाही. त्याजवरून शके १७४१ चे सालीं श्रीमंत छत्रपती व ग्रांटसाहेब बाळवेचे पेट्यास जमाबंदीस आले. त्यावेलेस तेथें आम्ही फिर्याद केली कीं मौजे मजकूर हां गांव आमचें नांवे + + सरकारांत पडत आहे. म्हणोन केल्यावरून रत्नाकरपंत पनाळकर यांचे कारभारी याजकडील कारकून इकडून आणोन चौकसी केली. त्यांणी गांव जबरीनें दाबला असें ठरलें. तेव्हा पंतराजाज्ञा याजकडून गांव सरकारांत घेतला तो हाली इलाखा सातारा छत्रपती याजकडे आहे. त्यास तो गांव आमचा आम्हाकडे चालविण्याची आज्ञा जाहाली पाहिजे. मौजे सालसिर्बे प्रांत करहाड हा गांव जिल्हे आमल दरोबस्त श्रीमंत पंतप्रतिनिधी याणी ईनाम करून दिल्हा तो गांव श्रीमंत पंत प्रतिनिधी यांचे संस्थानची जप्ती गोखले याणी केली त्यानंतर गोखले याचा आमल होता, तो परियंत चारसे पंच्याहातर रुो. आम्हापासून येक साली म्हणोन घेत गेले. त्या पाो आम्हाकडे शेरीची जमीन बिघे ९२ चालविली + ती हली अजपरियंत चालत आहे. परंतु चारसे पंच्याहातर रुो येकसाले म्हणोन घेत गेले ते गोखले याजकडील महाल सरकारांत घेतले त्यावेलेस महालचे बेहेड्यांस व बेरीज जमेस धरून महालच्या सोडचिटया बरोबर सोडचिटी सरकारांत गोखले दिल्ही. तेव्हा आमचा गांव इनाम गेला. त्याजवर आम्ही पांच चार वर्षे येथे खराब जाहालो. परंतु श्रीमंत राजश्री बाबासाो याजपासी आमची दाद लागोन आमचा इनाम गांव असे समजोन सोडला नाहीं. त्यास हली आमची सरकारांत चौकसी होऊन ईनामाचे पत्र पाहून आमचे आम्हाकडे चालविले पाहिजे. आम्ही बहूत गरीबदारीत आहो. आम्हास उत्पन्न करून दिल्हे त्यांत निर्वाह लागत नाही याजकरिता आमचे गांव आम्हाकडें चालविले पाहिजेत. तारीख २६ दिशंबर १८४३ ईसवी.

सही : रामचंद्र व्यंकटेश गुणे कालेकर,
दस्तुरखुद.

लेखांक ८०

[हा जदनामा चांफेटास मिळाला. सनदवाल्या विठ्ठलभटांचे हरभट हे पुत्र नाहींत. विठ्ठलभटांचे वडील बंधु केशवभट म्हणून होते त्यांचे पुत्र हरभट होत. ले. २९ पाहा. व तसेंच खंड २ शाखा चांफेट व नं. १ पाहा. त्र्य. व. ना.च्या लेखावरून हरभट हे केशवभटाचे पुत्र होते हें उघड होतें. जदनाम्यांतील वरील उल्लेख चुकीचा आहे. बाकीचा मजकूर महत्त्वाचा आहे.]

जदनामा विठलभट बिन् हरभट गुण्ये राहणार मौ. चांफेट तर्फ पांवस यास इनाम असून भटंभट बिन हरभट यांचे सरकार हिशेबी ऐन रुपये ४८१५८९ पडत आहेत त्याबाबद माहालचे + + + तालुके रत्नागिरी सुरु सब्बा आबैन मय्यातेन व अलफ

मूळ पुरुष सनदवाला विठलभट बिन हरभट गुण्ये

- हरभट बिन विठलभट (हे मयत होऊन सुमारें १२५ वर्षे झालीं, परंतु शक मिती माहीत नाहीं.)
  - १ भटंभट उर्फ रामकृष्णभट (हे मयत होऊन सुमारें ६० वर्षे झालीं. शक मिती माहीत नाहीं.)
  - २ सदाशिवभट (हे मयत होऊन सुमारें ४० वर्षे झालीं परंतु शक मिती माहीत नाहीं.)
  - ३ केशवभट (हे मयत होऊन सुमारें ५० वर्षे झालीं परंतु शक मिा माहीत नाहीं.)
    - हरभट (उमर वर्षे ५१ हे वरघाटी असतात.)
  - ४ विठलभट (हे मयत होऊन सुमारें ६० वर्षे झालीं परंतु शक मिती माहीत नाहीं.)
  - ५ अनंतभट (हे मयत होऊन सुमारें ५० वर्षे झालीं श.मि.माहीत नाहीं.)

१काशिनाथभट (हे मयत होऊन सुमारें २५वर्षें झालीं शक मिती माहीत नाहीं)

२विश्वनाथभट (हे मयत होऊन सुमारें ४०वर्षें झालीं शक मिती माहीत नाहीं)

३ विष्णुभट (हे मयत होऊन सुमारें ५०वर्षें झालीं शक मिती माहीत नाहीं)

४गणेशभट(हे आश्वीन व.८ रोजीं मयत झाले परंतु सुमारें२०वर्षें झालीं शक माहीत नाहीं.)

५दामोदरभट (हे मयत होऊन सुमारें ४०वर्षें झालीं परंतु शक मिती माहीत नाहीं.)

६ रघुनाथभट (उमर वर्षें६५ हे जालवणास असतात.)

७वासुदेवभट (हे मयत होऊन सुमारें ३५वर्षें झालीं परंतु शक मिा माहीत नाहीं.)

१ गंगाधरभट (हे मयत होऊन सुमारें १५ वर्षें झालीं श. मि. माहीत नाहीं.)

२ बाबजीभट (उमर वर्षें३५ हे वरघाटी असतात)

१बाळकृष्णभट (उमर वर्षें४१ हे वरघाटी असतात.)

१बाळंभट उर्फ रामकृष्णभट (उमर वर्षें४० हे इंदूरास असतात.)

२सखारामभट (उमर वर्षें३८ हे पुण्यास असतात.)

३ सीताराम-भाऊ (उमर वर्षें३५हे वरघाटी असतात.)

४ सदाशिव ऊर्फ जयराम (उमर वर्षें३२ हे हजर आहेत.)

५आत्मारामभट (उमर वर्षें २२ हे गांवीं असतात.)

१विनायकभट (हे मयत होऊन सुमारें १८ वर्षें झालीं. श.मिा माहीत नाहीं.)

१मोरभट (उमर वर्षें १८हे गांवीं असतात.)

२दामोदरभट(उमर वर्षें १६ हे गांवीं असतात.)

३वासुदेवभट (उमर वर्षें १२ हे गांवीं असतात.)

१विठलभट(उमर वर्षें३०हे वरघाटी असतात.)

२केशवभट(उमर वर्षें २२ हे गांवीं असतात.)

३महादेवभट(उमर वर्षें १८ वरघाटी असतात.)

येणेंप्रमाणें वंशावळीचा जदनामा लिहून दिल्हा; यांत कांहीं नांवें व ऊर्फ नांवें असोन लिहावयाचीं ठेविलीं असें नाहीं, हें लिहून दिल्हे.

सही ता. माहे दिजंबर सन १८४६

लेखांक ८१

आश्वी दप्तर ता. २७।७।१८४७

विनायक लक्ष्मण (१०-१) चांफेट

श्री नक्कल नंबर ८२

सिक्का ठाण्याचे कलेक्टर साहेबाचा

दाखला कलेक्टर साहेब जिा **ठाणे** यांचे आफिसांतून देण्यांत येतो सन १८४७ सालीं जुलई महिन्यांत हुजूर ठाणे मुक्कामी कमेटी बसोन उमेदवार लोकांची परीक्षा जाहली त्या कमेटि बुकांत नंबर ९ यांत **विनायक लक्ष्मण गुणे** राहणार **मुरबाड** जात ब्राह्मण उमर वर्षे यांचे नांवे ८६ परीक्षेस लागले आहेत ताा २७ माहे जुलई सन १८४७ इाा.

बजाजी गोविंद कारकून सही साहेब कलेक्टर याची

सही महंमद इभ्राम + + + +

लेखांक ८२

[कुर्णेशाखेपैकीं उत्तर पेशवाईंत पुण्यास येऊन राहिलेल्या राघो नारायण गुण्यांचे दप्तरांत हा कागद मिळाला. राघो नारायण गुणे हे फार मोठे सावकार होते. त्यांनीं भोरच्या सचिवांना जें कर्ज दिलें त्याची संपूर्ण हकिकत या फेरिस्तांत आलेली आहे.]

नारायण गंगाधर गुणे, इनामदार, दिवड, पुणें

कृष्णाजी रघुनाथ (५-८) रामचंद्र श्री असल बाा नकल ता. २९।८।१८४८
रघुनाथ (५-९) मठ

यादी फेरिस्त प्राा वादी श्रीमंत राजश्री पंत **सचीव चिमणाजी रघुनाथ** याजकडे **चिमणाजी शंकर सचीव** यांचे वेळचा **राघो नारायण गुण्ये** यांचा कर्जाउ वगैरे ऐवज येणे त्याचा वारस पुत्र **कृष्णाजी रघुनाथ व रामचंद्र रघुनाथ गुण्ये** याणी फिर्याद एजंट साहेब बहादूर याजकडे केल्यावरून साहेबाचा हुकूम जाला कीं असल कागदपत्राचे फेरिस्त काढून पाहावयास सरकारांत द्यावे म्हणोन माजी यजंट साहेबाचा तोंडीचा हुकुम

ता। २९ सपटंबर सन १८४८ ईांचा जाला त्याजवरून सदरहू कागदा-बद्दल फेरिस्त हे तयार करून कागद सरकारांत दिल्हे ते बीा तपसील कर्जाउ ऐवज येणे त्याचे

८ साठ हजाराबद्दल राघो नारायण यांचे नांवे
*

....

३२ दिनचर्येचे खर्चास वगैरे ऐवज दिल्हा ईंा शके १७२३ तागाईत शके १७२६ आश्वीन अखेर परियंत ऐवजाचा भरणा चांदवड केला त्याची खते व मखलासीच्या यादी व परवानगीनें जाला त्याचे रद कर्जास कांहीं रकमास ऐवज लाउन वराता वगैरे दिल्ह्या त्या पौ गैरादा होउन कांहीं वराता पैा वसुल आला त्या वयाज (व्याज) कटमितीनें वगैरे जाले त्यांत वरातीचा वगैरे वसुल पावला तो वजा जाउन बाकी येणे रुपये त्याजविसीचे कागद ....

....

५ शके १७५२ सन अशर व सन इहिदे अशर सालीं साली दिनचर्येस खर्चास ऐवज चांदवड दिल्हा त्याची रुजवात होउन मखलासी जाली छ १९ स साल आश्वीन मास सन आर्बा अशर यादी नकल भरणा रुा ११३२६८९८६ येविसी कागद.

....

१ पत्र श्रीमंत राजश्री पंत सचीव यास राघो नारायण गुणे यांचें राजश्री विश्वासराव दाजी रास्ते यास रुपये १३६५ तेरासे पासष्ट आमचा कर्जाउ ऐवज येणे त्यापौ देविले आहेत तरी हप्तेबंदीनें देत जाणे म्हणोन निा चेत्र शुा ५ शके १७४९ सन सबा आशरीन मयातेन व अलफ पत्रावर शेरा सचीव यांणीं लेहून दिल्हा कीं सदरहू तेरासे पासष्ट रुपये देविले जातील सन मार छ २४ रमजान चेत्र मास असल रास्ते याजकडे देविलें त्याची नकल.

---

* ह्या फेरिस्तांतील आवश्यक तेवढाच मजकूर येथें दिला आहे. जेथील कांहीं मजकूर गाळला आहे तेथें टिंबें दिलीं आहेत. हें फेरिस्त सुमारें २५ फूट लांब आहे. जाड टाईपांतील आंकडे कागदांचा समुदाय दर्शवितात.

३ दुमाले पटीचा ऐवज महाल निहाय येथील पानसरे वगैरे सुद्धा तुम्हाकडे रद कर्जास लाउन दिल्हा आहे. त्याचा ठराव होउन ज्यास ऐवज रोख द्यावयास नेमिले सबब खत पत्र तुम्हास देउन न ऐवज मजुरा घेतास त्यापौ ऐवज थकला तर सरकारांतून वसूल करून दिल्हा जाईल वसूल न जाल्यास गैरादा करून तुमचा ऐवज देणे तो सरकारांतून दिल्हा जाईल म्हणोन सचीव यांचें पत्र छ २२ सफरचें सन ईसन्न मयातैन, राघो नारायण यांचे नांवें असतां वसूल करून देवीत नाहींत व आपणहि देत नाहींत त्यास सदरहु दुमाले पटी वा। खते वगरे आपले वडिलाचे कारकुनाचे नांवे आलाहिदा आहेत त्याजबद्दल ऐव येणे.

(१ याद ऐवज येणे त्याची रुपये ११९७८२.

२ सचीव यांचें पत्र छ २२ सफर सनई सन मयातैन राघो नारायण यांचे नांवें सदरी मार लिहिला आहे तें खात्रीपत्र: असल १ *आहीला गून **कांहीं** अक्षरें गेलीं सबब प्रत्यंतरास नकल १ यो दोन चिमणाजी शंकर यांचे)

$\overline{२}$

४९

नेमणुकी कलमबाबद् कागद्

१५ नेमणूक हुजूर वेतनाबदल

(२ वेतन सालीना पालखी शागीर्द पेश वगैरेसुधा नेमणुक रुपये तीन हजार वगैरे कलमे च्यार कराची याद मखलासीची छ ५ सवाल उर्फ फालगुन मास सन इहिदे मयतैन राघो नारायण यास असल यादी नकलीं कांहीं आक्षरे गेली त्याची प्रतंतरास जुनी नकल यो दोन

११ आलीकडें वतना ऐवजी नेमणूक निमे रुपये १५०० पंधरासे करून दरसाल द्यावयाची आज्ञा समक्ष जाली सनई सन अशरीनचे सालापासून, त्याजविसी सचीव याची दस्ता ऐवजी पत्रें व वराता वगैरे राघो नारायण यांचे नांवे.

हरचिरी ता. रत्नागिरी येथील सदरील गुण्यांचे घरास आग लागली त्यामुळें दप्तर जळालें.

३ पत्रे.............................

....

५ वराता व ताकीद पत्रे मामलेदार वगैरे यांचे नांवे

....

२ पावत्याच्या नकला पंधराशे रुपये वेतनाचे
नेमणुका पौ सचीव यांचे नांवे राघो नारायण
यांच्या.........................

....

११

२ नेमणूकी पैकी बाकी ऐवज येणे बा यादी

.............................)

१५

९ दरकी असाम्या करून दिल्ह्या आहेत त्या चालवीत नाहींत येविसी सनदा कागदपत्र

१ हुजुर (देवावे) १ करावयाची दरक गंगाधर नारायण यांचे नांवें परवानगी यादीवर होऊन मखलासी होईल त्याजवर देवावे करीत नांहीं म्हणून करायाची याद छ १५ जिलकाद सन ईसने मयातैन सीका मोर्तबची

१ हशमनिशी किले सुधागड येथील गणेश रघुनाथ गुणे यांस बक्षीस देऊन दरबारचे कामकाज वंशपरंपरेनें करीत जाणें म्हणोन सनद छ १९ जिलकाद सन सलास मयातेन वेतन सालीना नेमणुक केली तरी या सुद्धां बा सनद नकल.

ऐन नक्त	भात खंडी
ऐन २००	५
पोरगा ९॥	१॥
२०९॥	६॥

सदरहू असामी बदल रसद रुपये बारासे घेउन रद कर्जात नांवे लिाबे खासगी रुपये १५० एकूण रुपये १३५० साडे तेरासे घेउन आसामी

करून दिली आहे त्याबद्दल सनद नांवची खेरीज चालविण्याविसी पत्रे वगैरे आहेत.

६ किले **वितंडगड** येथील आसाम्या दोन ब्रहुकूम सनदा नांवाच्या व खेरीज चालविण्याविसी पत्रें वगैरे आहेत.

(१ कारखानिसीकडील फडनिसी **नारो हरि गुणे** यांचे नांवे सनद छ १९रमजान सन सलास मयातैन वेतन सालीना रुपये दोनसे प्रमाणे मोर्तबाची

४ मजमु **केसो लक्ष्मण** यांचे नांवे सनद छ १९ रजब सन आर्बा मयातैन बेहेडे याचे नेमणुके प्रोा वतन पावत जाईल म्हणोन....

१ सनद **गोपाल हरि** यांचे नांवे छ १ रमजान सन आर्बा आशर मजमुची आसामी **लक्ष्मण केशव** कारखानिसी कडील फडनिसी नारो हरि याजकडे आहे त्यास दोनी आसामीचे वेतन च्यार साल पावलें नाहीं म्हणोन विदीत जाले त्याजवरून हे पत्र तुम्हास सादर केलें असें तरी बेहेडे याचे नेमणुके प्रमाणें च्यार साला वेतन पावते करणें येविसी पुन्हा बोभाट येऊं न देणें म्हणोन सनद मोर्तबची)

६

१ यादी दरकी आसाम्या किले सुधागड येथील हशम निसी व किले वितंडगड येथील कारखानिसी व मजमु येकणू तीन आसाम्या व वेतनाचे नेमणूकेचा ऐवज येणे ते अजमासे रुपये ३२८०५)

९

२ **न्यायाधिसीचे काम राघो नारायण गुणे यास** रघुनाथराव चिमणाजी सचीव याणी सन सलास सलासीन साली सांगितले त्याजबाा भोजन खर्च वगैरे नेमणूक रुपये ३०० तीनसे प्रमाणें न्यायाधिसीकडे नेमणुकीचे ठरावाची याद मखलासी परवानगीचे सन सलास सलासीनचे साला-बदल छ २६ जिल्हेज वैशाख मास सनइसनें सलासीनांत जालीं त्यांत लागले आहेत त्याप्रमाणें ईाा सन सलास तागाईत खमस सलासीन तीन साले काम केले दरसाल रुपये ३०० तीनसे प्रो येविसी कागद

(१ मखलासी परवानगीची याद न्यायाधिसीचे नेमणुके बाा रुपये

८१० आठसे दाहा छ २६ जिल्हेज सन इसनें सलासीन नकल. १ याद वसूल बाकी येणें रुो ६६१८९८९ सन खमस अखेर)

२

सदरहू बाकी येणें रुजवातीनें निघेल ती देवावी.

२६

यादी राघो नारायण गुण्ये याजकडें ता पौनमावळ येथील घारे देशमुख यांचे वतनाचे अमानती सरकारांतून करुन वहिवाट सांगितली ईा सन सन्ना अशरीन शके १७४८ ता सन ईहिदे आर्बैन शके १७६२ पंधरा सालें होतीं त्याचे टरावाचे छ ११ रावल सन सन्ना आर्बैन फाल्गुन शुा १३ शके १७६० चे सालीं जाली त्याची न्यायाधीश याणी असल बरहुकूम नकल गुण्ये यास दिल्हीं ता २९ राखर सन सन्ना आर्बैन सही राघो भिकाजी न्यायाधीश या यादीस गुण्ये यास मजुरा रुपये १८०० आठरासे दिल्हे आहेत ती याद चिकटबंद साहा येकूण कागद १.

कर्जाऊ व नेमणुक कलमाचा वगैरे यैवज येणें त्याजबा सरकारांत फिर्यादी केल्या, हुकूम जाले, **त्यांच्या नकला व असल वगैरे कागद** यादी फिर्यादी राघो नारायण याणी केल्या.

२ प्रथम **गवरनर कौंसलांत** इंग्रजी अर्जी तारीख ११ डिजंबर सन १८२० व तारीख २० ज्यानेवारी सन १८२१ ईा केली त्याचा हुकूम **कमिशन उलियम च्यापेलीन** साहेब बहादुर यास आला त्यांणीं मेहेरबान **रसीदंट ग्रांट**साहेब यास चकती दिल्ही त्यास इंग्रजी अर्जी व मराठी नकल.

१ कौंसिलांत अर्जी दिल्ही तारीख २१ ज्यानेवारी सन १८३१ ईा त्याचा हुकूम ता १८ आप्रेल सन मार **सातारकर महाराज** याजकडें अर्ज केला पाहिजे म्हणोन पत्र असल राघो नारायण यांचे नांवें

१ महाराज सरकारांत यादी दिल्ही मिा आश्वीन शुा १० शके १७५३ सन १८३१ ईा त्याजवर महाराज सरकारांतून हुकुम त्यांतील हसील, येविसीं चौवर्षे हुकुम जाहालें जाहागीरदार व (नकलोबाद राहा-विसी जमानींत)? त्याचा बंदोबस्त पक्का होईल हे पाहून असें दुसरें न

करीत हे होणे कंपणी सरकारांतून या सरकारास सला कशा रीतीनें होईल हे जाहीर जाल्या खेरीज ईकडील सरकार करुं शकत नाहीं छ २४ जाा वल सन इसनें सलासीन ताा ३१ आगटंबर सन १८३१ ईसवी असल याद.

१ गौरनेर साहेब याजकडे अर्जी ता. २४ अगष्ट सन १८३१ दिल्ही त्याजवर हुकुम येविसीं मेहरबान **यजंट साहेब बाहादुर जिल्हा दक्षण** याजकडे अर्जी करुं सकत आहे ताा १२ सतंबर सनमजकुर असल.

५ यजंटसाहेब बाहादूर याजकडें दिल्ह्या त्याच्या नकला वगैरे.

....

१ याद छ २४ जिल्काद सन सीत सलासीन पंतसचीव **रघुनाथराव चिमणाजी** याणी फिर्यादी आसामी ३९ चे यादींत सरकारांत महाराज व रसीदंट साहेब याजकडें कलम बादीत जाब दिल्हा कीं **राघो नारायण गुणे** याचा कर्जाऊ ऐवज हिशेबी चाळीस वर्षांचा देणे त्याची **ग्रांट साहेब** यांचे वेलेस फिर्याद केली **मुंबईहून हुकूम** आहे. आपसांत समजूत करावी असे सांगितले ते समई नानासाहेब याणी दरसाल रुपये १५०० पंधरासें द्यावयाचे ठरविले ते पावत आहेत व ईनाम गांव येक त्याजकडें चालत आहे. वगैरे कलमांत माार लिहिला आहे शके १७५७ फाल्गुन वाा ११ रविवार

११

७ राघो नारायण गुण्ये यांचे वारस पुत्र **कृष्णाजी रघुनाथ व रामचंद्र रघुनाथ गुणे** याणी केल्या त्या यजंटसाहेब बाहादूर याजकडें

(१ यादी ताा ३ फोप्रवारी सन १८४३ शके १७६४ माघ शुाा ४ याजवर हुकुम प्रतिवादी सातारे ईलाख्यांतील सबब मेहेरबान **रसीदंटसाहेब** याजकडें फिर्याद करावी ताा माार याचे कारण चिमणाजी रघुनाथ यांचे नांवे प्रतिंत लागले नवते सबब आसा जाला

२ यादी ता. २७ मार्च सन १८४८ इसवी दिल्ह्या. १ इनाम गांव अमानत **घारे देशमुख यांचे** खटल्याबद्दल केला त्याची मोकलीक करून देण्याविसी १ कर्जाउ वगैरे ऐवज येणे त्याबद्दल दावा रुाो

२३०७२१८९ ८३

२

सदरहु यादी दिल्यावरुन सचीव यांस पत्रें गेलीं नंबर २५४।२५५

२ सचीव यांचे जबाब आले ते मेहेरबान ब्रांणसाहेब यांचे नांवे छ २४ जाखर सन समान आर्बैन,

१ प्रा पत्र नंबर ७८७ ईनाम गांवाबदल

१ प्रा पत्र नंबर ७८८ कर्जाउ वगैरे ऐवजाबा

सदरहु बरहुकुम कीं अर्जदार यास मा॥र कलवाव ता॥ ६ जून सन १८४८

१ याद ता॥ जून १६ सन १८४८ ईसवी दिल्ही त्यांतील हसील ऐवजाचा उलगडा व ईनाम गांवची मोकलीक करुन देविली पाहिजे त्याजवर हुकूम पंतसचीव साहेब याजकडून जबाब आला आहे तो पाहावा खात्रेस न लागे तर कायद्याप्रमाणें ईलाज करावा ता॥१६ जून सन मा॥ नंबर ८४९

१ अर्जी कर्जाऊ व नेमणुकीचे कलमाबदल वगैरे ऐ (वज) येणें त्यांत वसूल वजा होऊन बाकी येणे सुरती रुपये २२९५१७८१५८९

सदरहू ऐवजाची उलगडा व ईनाम गांव मौजे दिवड ता॥ पौनमावळ याची आमानती धारे देशमुख यांचे वतन समंधे आमानती आवजाचे खटल्याबद्दल केली आहे त्याची मोकलीक करून देवावी सदरहू योग्य कारण लिहिले आहे हे पाहून ऐवजाची व ईनाम गांवची वगैरे नादारींत फिर्याद घेण्याविर्सि हुकूम देविला पाहिजे ता॥ २९ सप्तंबर सन १८४८ ईसवी दिल्ही त्याजवर तोंडचा हुकूम जाला कीं आसल कागद पत्र पाहाण्यास सरकारांत फेरिस्त लाऊन द्यावे)

७

१८

तेरीज एकंदर कागद सुमार

४९ कर्जाउ ऐवज प्रकर्णी

८ साठ हजाराचें

३२ दिनचर्येचे खर्चास ऐवज दिल्हा त्याजबा

५ शके १७३२ ऐवज दिल्हा त्याज बा।
१ सचीव यास पत्र रुपये १३६५
३ दुमाले पटी बा।
—
४९

२६ नेमणुकी कलमाबदल
१५ हुजुरुचे वतनाबद्दल
९ दरकी आसाम्याबदल
२ न्यायाधिशीचे कामाबदल
—
२६

१ घारे देशमुख ता। पौनमावल यांचे वतनासमंधे आमानती ऐवजाचे ठरावाची याद सचीव याजकडील नकल राघो नारायण यांचे नांवें
१८ कर्जाउ नेमणुकी कलमाचा वगैरे ऐवज येणें त्याज बा। सरकारांत फिर्यादी केल्या त्या समंधे
—
९४

येणेप्रमाणे कागद पत्र तूर्त योग्य कारण पाहावयास दिल्हे आहेत मनन होऊन अर्जी नादारींत घेण्याविसी हुकूम जाला पाहिजे. येविसी कागद पत्र फार आहेत जसे कारण लागेल तसे पाहून पुरावा हाजर करुं व ईनाम गांव मौजे दिवड ता। पोनमावळ येविसी सनदा व वहिवाटीविसीं मामलेदार यास वगैरे सनदा ताकीद पत्रें दिल्या आहेत त्याच्या नकला वगैरे कागद आलाहिदा आहेत कारण लागल्यास देऊं तारीख २३ माहे जून सन १८४९ इसवी

सही कृष्णाजी रघुनाथ गुण्ये दस्तुरखुद

मिती आषाढ शु॥ ३ मंदमार
शके १७७१ सन खमसैन मया
तैन व अलफ यजंट साहेब यांचे
कचेरीस राजश्री भिवराव रामचंद्र
सिरस्तेदार याजकडें कागद
दिल्हे असेत

लेखांक ८३

[ही शिवराम विष्णु गुण्यांची कैफियत ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्वाची आहे. कालें येथील इतिहासप्रसिद्ध गुण्ये घराण्याचें सर्व वृत्त यांत आलें आहे.]

भारत इतिहास-संशोधक मंडळ-पुणें; **ता. २४-१-१८५८**
शिवराम विष्णु (१५-२)चांफेट

सिवराम विष्णु गुणे यांची हकिकत शाहू महाराज यांचे कारकीर्दीपासून शाहाजी महाराज पावेतों

१ कैलासवासी शाहू महाराज यांची स्वारी कोंकणांत गेली तेव्हां आमचे पणजे बालाजी जनार्दन गुणे हे खानुमठ येथून स्वारीबरोबर देशांत आले तेव्हां महाराजांनीं काम सांगून ठेविले. पुढें नागपूरकर भोसले यांजकडें कांहीं कामास पाठविलें. तें काम महाराज यांचे मनोदयानुरुप झाले सबब महाराज कृपाळू होऊन मौजे खरोड पेटा तासगांव येथील जमीन १॥ चावर इनाम दिल्ही. तेव्हांच त्या जमिनींत आमचे पणजे याणी वाडी बसविली कांहीं दिवसांनीं पुढें जसें प्रतिनिधि यांचे मुतालिक **येमाजी सिवदेव** व **सचीव** यांचे **रांजेकर** तसे आपण प्रधान मंत्री यांचे मुतालकीचा हुद्दा आमचे पणजे बाळाजी जनार्दन यास देऊन मोगलाई इलाख्यांतील मौजे **ऐसगांव** व मौजे **वरुडे** व मौजे **शिरहाळी** पो। आलंद या तीन गांवचा चौथाई अंमल मोकासा दिल्हा पुढें मत्री याणी कसबे भिलवडी प्रांत मिरज येथील जमीन एक १ चावर राजमत्री करून दिल्ही.

२ नंतर बाळाजी जनार्दन याणी महाराजास अर्ज केला कीं माझे कुटुंब + + + + घरास जागा व तेथें कांहीं उत्पन्न दिल्हे पाहिजे त्यावरून महाराजानीं प्रतिनिधी यास आज्ञा केली; त्यानीं मौजे काले पेटा कराड येथें घरास जागा व त्या नजीक ४० बिघे जमीन व मौजे **कासारसिंर्बे** हा गांव असे ईनाम दिल्हे तेव्हा काले येथें वाडा व त्या जमिनींत विहीर करून आंबराई, नारळ वगैरे बाग केली.

३ बाळाजी जनार्दन यांचा अंतकाल होते समई महाराज याणी वचन दिल्हे कीं, तुझे मुलगे आहेत यांचे पालगल्हण करीन मोठे होऊ दे काळजी करूं नको असें सांगितले नंतर बाळाजी जनार्दन याचा काल जहाला तेंव्हाच थोरला मुलगा रामाजी बलाल यास मंत्रीची मुतालकी देऊन उत्पन्न होते ते चालविले.

४ महाराज याणी आपला अंतकाल होण्याचे पूर्वि बाळाजी जनार्दन यांचे मुलगे **रामाजी बलाल या सुद्धा ६ आाा यास बोलाऊन त्याची हुशारी पाहून त्यांची नेमणुकी केल्या त्याचा तपसील**

मुलगे ... ... आसामी

१ **रामाजी** बलाल यास मंत्री यांची मुतालकी दिल्ही होती ती काढून त्याजला नागपूरकर भोंसले याजकडून हुजुरचे वकिलीचे काम सांगितले

१ **लक्ष्मण बलाल** यास पेशवे याजकडें नेमिले

१ **धोंडो** बलाल यास मंत्रीची मुतालकी दिल्ही

१ **कृष्णराव** बलाल थोरात दिनकरराव वालवेकर याजकडे नेमिले

२ बापूजी बलाल व हरि बलाल हुजूर ठेविले.

६

याप्रमाणें नेमणुका केल्या पुढें शाहू महाराज कैलासवासी जाले. महाराजांनीं त्यांची नेमणूक (केली) तिकडे काम करीत होते, बापूजी बलाल घरी राहिले हरि बलाल थोरात याजकडें पतकांत पेशवे याजकडून (रुकार) ? सिरले ते कृष्णराव व हरि बलाल दोघे **थोरात** याजकडें काम करीत होते.

५ रामजी बलाल नागपूरकर याजकडून पुण्यास कांहीं कामाबद्दल होते तेंव्हा त्याणी व लक्ष्मण बलाल या दोघानी **पेशवे** यांचा उपयोग केला सा पेशवे याणी मौजे तांबवे व मौजे अैतवडे खुर्द असे + + + + + +

६ कृ + + + + + चे उपयोगी पडले सा त्याणी + + + सरंजाम जमीन दिल्ही ती साहाचे नांवे दिल्ही.

७ पेशवे यांची फौज **हिंदुस्थानांत** गेली त्याजबरोबर थोरात यांचे पतक घेऊन कृष्णराव बलाल व हरि बलाल गेले तेथें दोन वर्षे सुमारे होते. पतकास थोरात याजकडून खर्चास मिळालें नाहीं तेव्हा कृष्णराव; हरि बलाल याणी सावकाराचे कर्ज काढून तीन लक्ष रुपये दिल्हे ते थोरात याजकडून यावयाचे तेव्हा पेशवे याणी त्याची जहागीर कृष्णराव बलाल याजकडें सांगून त्याणी पतकाचा व थोरात याचा जातीचा खर्च चालवून बाकी राहील ती रदकर्ज करुन द्यावे असे ठरऊन दिल्हे याप्रमाणें जहागिरीची वहिवाट थोरले माधवराव पेशवे यांचे कारकीर्दींत होती ती माधवराव सवाई अखेर केली त्यांत रदकर्ज झाले नाहीं सवालक्ष रुपये सुमारे येणे राहिले.

८ रामाजी बलाल नागपूरकर यांचे नौकरीवर मेले. त्यांचे पुत्र **सदासिवराम** तेच काम करीत होते, लक्ष्मण बलाल पेशवे याज बरोबर **पाणपतचे** लढाईत गेले. तेथें गरदींत मेले. त्यास पुत्रसंतान नाहीं. धोंडो बलाल मंत्रीचे नौकरीवर मेले त्यास पुत्र **जगन्नाथ धोंडदेव** व **विष्णु धोंडदेव** असे दोघे, कृष्णराव व हरि बलाल यास संतान नाहीं पुण्यातच मेले. बापूजी बलाल यास **व्यंकटराव बापूजी** येक पुत्र बापूजी बलाल घरी कालें येथें मेले. तिघांच्या वंशाच्या + + + **सवाई माधवराव** यांचे कारकीर्दित राहिले.

९ स + + + + + संतान नाहीं व्यंकटराव बापूजी + + + दिवाणगिरी व **विष्णु धोंडदेव** याजकडें **खासबारदार यांची सबनीस** असी दोन कामे दोघास **नाना फडणीस** यांणी सांगून गाव व जमिनी वगैरे उत्पन्न होते तसे चालविले. जगन्नाथ धोंडदेव मंत्रीकडून पुणें मुकामी होते ते त्याच चाकरीवर मेले. त्यास पुत्र नारो जगन्नाथ व हरि जगन्नाथ असे दोघे; व व्यंकटराव बापूजी मेले त्यास पुत्र रामचंद्र व्यंकटेश येकच येकूण तिघे लहान विष्णु धोंडदेव आमचे बाप कायम होते ते खासबारदार यांचीं सबनिसिचे काम करुन तिघे मुलगे घेऊन गांव व जमिनीचे उत्पन्न घेऊन सवाई माधवराव अखेर इतमाम राखून होते.

१० **बाजीराव पेशवे** यांचीं कारकीर्द जाली त्याणी गांव जप्त करुन कामे होती ती काढली तेव्हां आमचे वडिल विष्णु धोंडदेव घरी बसले सरकारचा वशिला राहिला नाहीं तेव्हा थोरात वगैरे यास कर्ज काढून

कृष्णराव बलाल याणी दिल्हे ते कर्जदार सावकार याणी बापू गोखले यांचे वशिल्यानें तगादे केले तेव्हा जमिनीचे उत्पन्न काढून (लावून) देऊन कांहीं सावकारांच्या तोडी केल्या व जिनगी विकून कांहीं सा(व)कार फेडिले. कांहीं जिनगी राहिली ती **करवीरकर महाराज** यांणी मौजे **काले** येथून लुटून नेहली तेव्हा प्रपंच्यास जमिनीचे व जिनगीचे उत्पन्न राहिले नाहीं कर्ज काढून प्रपंच चालउन मोठे नादारीनें आमचे वडिल विष्णु धोंडदेव + + + + + + +

११ **कंपणी** + + + + (**ब्रह्मा**)**वर्तास** गेले तेव्हा मेहेरबान **आलफिस्तन साहेब बाहादूर** याजकडें आमचे वडिल विष्णु धोंडदेव जाउन हि सर्व हकिकतीचा अर्ज केला तेव्हां साहेब याणी आमचे वडिलास हुकूम केला कीं तुमचे साहा आसामी पैकी दोन आसामींचा वंश आहे ते हजर व्हावे म्हणजे बंदोबस्त होईल त्याजवरुन बापूजी बलाल यांचा वंश, **रामचंद्र व्यंकटेश** व धोंडो बलाल यांचा वंश **नारो जगन्नाथ** व **हरि जगन्नाथ** व आमचे वडील विष्णु धोंडदेव असे तीन असामी दोघांचा वंश, चार आसामी हजर जाले. तेव्हा मेहेरबान आलफिस्तन साहेब बाहादूर याणी, रामचंद्र व्यंकटेश यास तीनसे रुपये व विष्णु धोंडदेव आमचे वडिल यास तिनशे जगन्नाथ धोंडदेव याचे चिरंजीव दोन या सुा करुन दिल्हे. येकूण साहशे रुपये पेनसीन करुन दिल्हे. पुढें आमचे वडिल वृद्ध दरसाल **पुण्यास** जाणे होईना सा मेहेरबान **च्यापलीन साहेब** बाहादूर याजपासी अर्ज केला कीं माझे वडिल बंधुचे दोघे पुत्र आहेत यांचे नावे पेनसीन करुन द्यावे त्याजवरुन साहेबानीं मेहेरबानगी करुन नारो जगन्नाथ व हरि जगन्नाथ हे आमचे चुलत बंधु यांचे नांवे तिनशे रुपये करुन दिल्हे त्याप्रमाणें रामचंद्र व्यंकटेश व नारो जगन्नाथ व हरि जगन्नाथ या तीन आसामीस साहासे रुपये पेनसीन पावत आहे. आमचे वडिल मृत्यपावले सबब येत नाहीं + + + + +

१२ आम्ही + + + + + + + चे मुलगे थोरले **गणेश विष्णु** हे **मंत्री** याजकडें वीस वर्षे नौकरी करीत आहेत, हरिहर विष्णु नौकरी करीत **हिंदुस्थानांत** गेले, **धोंडो विष्णु** घरी आहे. मी **सिवराम विष्णु**

माहाराज सरकारांत नौकरी करण्याविसी आलो. ते थोरले माहाराज सात, आठ वर्षे उमेदवारी करुन होतो. महाराजांनीं किरकोळ कामे सांगितलीं होतीं त्यांत पोटापुरतां गुदारा हात होता. दरमहा समैन (खर्च?) देत नव्हते वर्षांतून दोनतीन वेला मिळून देत होते त्याणें **सातारा** मुकामचा खर्च चालत होता. महाराज **कासीस** जाण्याचे पूर्वि येक महिना सुमारें घरी वडिलास समाधान नाहीं सा गेलो तेव्हां साहामहिने घरी होतो. वडिलाचा काळ जाला. कैलासवासी **शाहाजी माहाराज** गादीवर बसले ते वेलेस येणे जालें नाहीं. पुढें आलों ते लवकर सोय होण्याचे दिसले नाहीं आणि मी लग्न केलें त्याजबद्दल मजला जातीस कर्ज होते त्याचे तगादे बसले. सा मोठा सावकार याजकडें तीन चार वर्षे चाकरीं राहून दरोबस्त कर्ज फेडिले पुढें सन १८४८ इसवी सालीं पुण्यास चाकरीं करण्याकरतां गेलों तेथें पैमाषी खात्याकडें दोनतीन वर्षे उमेदवारी करुन पुढें कमेटी जाली त्यांत मी परीक्षा मेहेरबान **नाष साहेब इस्कोयर** यांचे कचेरी + + + + + मेहेरबान बेल **साहेब** व मेहेरबान + + + + + याणी परीक्षा घेतली साहेब + + + + + याणी मोजणीची जागा देउन मेहेरबान इवन साहेब आसीष्टन याजकडे नेमणुक करुन इंडी जिल्हा **सोलापूर** येथें जाणे विशी हुकूम दिल्हा. तो मेहेरबान **नाष साहेब** यांचे सहीचा आहे तो मजपासी आहे. इंडीकडें जाण्याकरतां **सातारियाहून** खर्चास घेउन जावयाचे याजकरितां आलों ते साताऱ्यांत आजारी पडलो. तेव्हां मेहेरबान नाष साहेब बहादर यास रपोट केला त्यांणीं पधरा दिवस मुदतीवर वाट पाहून माझी जागा दुसऱ्यास दिल्ही. मी दोन महिन्यांनी बरा जालों. पैमाषीकडे जाण्यास जागा राहिली नाहीं मग महाराज यांची स्वारी **तुळजापुराहून** आल्यानंतर विनंति केली कीं पेशजी थोरले महाराजांचे वेलेस उमेदवारीं आठ वर्षे केली ती महाराजांचे लक्षांतच आहे. त्यास माझी सोय करुन दिल्ही पाहिजे. आज्ञा झाली कीं जागा खाली जाली म्हणजे सोय होईल आज्ञे- प्रमाणें सन १८४४ जानेवारीं महिन्यापासून उमेदवारी केलीं ती ते आगष्ट सन १८४७ पावेतो केली तेव्हा महाराजापासीं फडणीस आमात्य याणी विनंति केली कीं, सिवराम विष्णु गुणे, पेशजी व हाली मिळोन दाहाबारा-

वर्षे उमेदवारी केलीं, खर्चानें बहुत खराबीस आला त्यास कोणती ती आज्ञा व्हावी तेव्हा माहाराजानीं मजवर कृपादृष्टी करुन मी पुरात ++ +++ दाहाबारावर्षे खर्चाचेवोढींत +++++ सन १८४७ इसवी पासून दरमहा रुा ३० तीस रुपये करुन हुजूरची नौकरी सांगितली त्याप्रमाणें आजपर्यंत करीत आहे.

१३ शाहूमहाराज याणी माझे पणजे बालाजी जनार्दन गुणे यास देशांत आणून त्यांचे पालगण केले त्यांचे पुत्र धोंडो बलाल त्यांचे पुत्र विष्णु धोंडदेव त्यांचा मी सिवराम विष्णु हाली माहाराजांचे कारकीर्दींत उमेदवारी सुा १५ पंधरावर्षे सुमारे चाकरीं करीत आहे व माझे वडिल विष्णु धोंडदेव यास मेहेरबान आल फिष्टन साहेब बहादूर याणी या हकिकतीवरुन पेनसीन करुन दिल्हे होते.

१४ हि हकिकत खुदावंद फियर साहेब बाहादूर कमिशनर यास जाहीर होण्याकरितां लिहिले आहे. मेहेरबानगी होऊन हकिकतीचा मजकूर श्रुत व्हावा. हि हकिकत कांहीं माहितीनें व कांहीं कागदोपत्रीं दाखल्यानें लिहिली आहे. ता २४ आगष्ट सन १८५० इसवी.

[This Kaifiyat was written by Shivaram Vishnu Gime to present before Inam—Commission, in August 24, 1850 A. D. Balaji Janardhan Gune the great-grand father of the writer migrated near Satara, coming with the Swari of Shahu on Desha (देश) from Konkan. He got the favour of Shahu by his excellent services ; and then he was appointed, Mutalik of Pant Mantri. At the time of his death, Shahu promised him, that he will appoint his sons in his services. They were young at that time. The year before his death Shahu appointed the 6 sons in his services as following ; Ramaji who was the Mutalik of Mantri was then appointed as a Vakil in Nagpur Darbar from Peshwa ; Dhondo Balal was given the Mutalaki of Mantri. Hari Balal and Bapuji Balal were appointed by him in his private services. Lakhamana Balal was to serve Sadashivaraobhau in his

private affairs. Krishnarao was appointed as a Divan of Thorat.

Krishnarao and Hari Balal while on war in North India helped Peshva, by giving them loans of 3 lacs of rupees by their own power, which their, superior, Thorat avoided to do. Hence the whole jahagiri of Thorat Walvekar was granted to Krishnarao by Peshva ; on terms that he should give the personal expenses of Sardar Thorat and through the remaining money return the debt. A debt of 1 lac and 25 thousands remained unpaid, at the time of Bajirao II and hence finding that due, His Sardar Gokhale, took almost all of the property of Gune in the possession of state.

Lakhaman Balal was killed at Panipat, Ramaji's son Sadashivaram was also Vakil at Nagpur from 1779 upto 1790 A. D., after his father. Vishnu Dhondev the son of Dhondo Balal was appointed as Khasbardar by Nana Fadanavis. His brother Jaganath Dhondeva was the Mutalik of Mantri, Vishnu Dhondev was a very unfortunate fellow, he saw all his property plundered by Gokhale and had even to pass his days in poverty.

In short this branch of our family is one of the few families who served the nation during Peshva period. No complete information of this family has been brought to light, though the family is historical.]

लेखांक ८४

[आश्वी शाखेचे रामचंद्र जनार्दन गुण्ये, यांना त्यांचे आत्येबंधु दामोदर पर्वतराव खेर यांचें पत्र.]

प्रो. नारायण पांडुरंग गुणे, शिकारपूर श्री इ. स. १८५५ मार्च ७
रामचंद्र जनार्दन (५-७) चांफेट आश्वी शके १७७६ फाल्गुन व॥ ४

रामुदादा यांचे आते-बंधु
कागल संस्थानचे कारभारी*

ती॥ राजमान्य राजश्री रामचंद्रपंत दादा गुणे मुा आश्वी वडिलांचे शेवेसी

बालके दामोदर पर्वतराव खेर याचा शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत फाल्गुन वा ४ शके १७७६ पावेतो असिर्वादे मुक्काम कागल येथें यथोश्चित असो विशेष आपलेकडून दोनतीन पत्रें टपाल मार्गे अल्यात घरच्या घोडीची सिंगी पाठविण्यास सुगीचे दिवस असल्याकरतां गडीमाणसें मिळत नाहींत म्हणोन वगैरे मार, त्यास येथोन ती सिंगी आणविन्या करितां मुद्दाम गणु सायप्पा मोतद्दार व सोनु पाटील सटवेंडकर अशे दोन माणशे हुशार पाठविले आहेत तर याजबराबर सिंगी पाठवावी हे मनुष्यें हुशार मार्गानें सिंगी सांभाळून आणतील करितां कांहीं आंदेशा न घेता आले मनुष्याबराबर सिंगी रवाना व्हावी वरकड मजकूर अधिकोत्तर नांहीं चिरंजीव राजश्री विनायकराव व गणपतराव मंडलींसह कुशल आहेत बहुत काय लिहिणें श्रुत होय हे विज्ञापना

दामोदर पर्वतराव खेर

ताजाकलम; आपले घोडीचे तंगाच्या कड्या व रिकिब्या जोडपितळ्याच्या आहेत तशा येथें करविण्याचे करितां तंगासहित कड्या रिकिब्या याजबराबर पाठवाव्या म्हणजे तशा करुन त्या लवकर परत पाठऊं व कुराणांतील बरु सुतरी (सुकरी ?) २०० दोनसें चांगले पाठऊन द्यावे बहुत काय लिहिणें हे विज्ञापना

---

* या दोन ओळींचें हस्ताक्षर व शाई दोन्हीं वेगळीं असून मागाहून कोणीं तरी लिहिलें आहे. दामोदर पर्वतराव खेर हे रामचंद्र जनार्दन गुण्यांचे आते-बंधु होत.

लेखांक ८५

[भिलवडी येथील वतनी जमिनींसंबंधीं फैसलनामा]

मेजर सदाशिवराव वासुदेव गुणे मुा भिलवडी

हरि जगन्नाथ (१४-३) चांफेट } उतारा २७।३।१८५६
गणेश विष्णु (१५-१) ,,

फैसलनामा बिद्यमा येथरीजसाहेब बाहादूर असिस्टंट इनाम कमिशनर सन १८५६ ईसवी फैसल नं. २५३२ तालुके तासगांव नंबर १०२ कसबा भिलवडी प्रात मिरज तालुके तासगांव जिल्हा बेळगांव या गावचे हिशोबात गणेश विष्णु कालेकर व हरि जगन्नाथ गुणे संपादक रामाजी बलाल व धोंडो बलाल गुणे देणे मंत्री याचे वहिवाटदार संपादकास नातू व्हावे. वास्तव्य कसबा मजकूर म्हणोन ८१२०८३।।।• येकशेवीस बेघी पावणेचार पांड जमीन ३५८४ पस्तीस रुपये च्यार आणे ईनाम पटीवर दाखल आहे त्याजबदल

सारांश

कसबा भिलवंडी प्रांत मिरज तालुके तासगांव जिल्हा बेळगांव येथील जमीन सर्व ईनामपटीवर गणेश विष्णु कालेकर व हरि जगन्नाथ गुणे यां नावाने चालत आहे त्या जमिनचि ऐवजी पेशवाई कारकीर्दीचे घडणी व तैनात जाबता वगैरे कागद पहिल्यापासून सनदी हकदार वगैरे खर्चाचे पोटी नदी हुकेरी ७५० सातशे व पंनास (कपणी ६४७८३८७) रुपये खर्च असोन पटवर्धन यांचे आमलांतील हिशोबात ८११९।।•४।।। येकसे-साडेयेकुणीस बिघे पावणे पांच पांड जमीन दाखल होऊन चालत आली आहे यास्तव सदरहु जमिनीचा आकार प्रतबंदी आनवये सातशे व पनास रुपये हुकेरी याचे कुंपणी ६४७८३८७ साहासे सतेचालीस रुपये तीन आणे सात पै पर्यंत असले तर तितकी जमीन माजी आमला अखेरची वहिवाट-दार जगंनाथपंत व विष्णुपंत बिन धोंडोपंत गुणे कालेकर या उभयताचे पोटची पुत्रपौत्रादि वंश कायम आहे तो पावेतो. ३५८४ ईनामपटीवर चालविली पाहिजे कदाचित सदरहू ८११९।।•४।।। जमिनीचा आकार कंपणी रुा। ६४७८३८७ हून जाजती झाला तरी सदरहू रुो आकाराची

जमीन चालून बाकी राहिलेली जमीन सरकार खालसांत करावी. आणि सदरहू हरदू इसमा पैा येकाद्याचा वंश नष्ट जाला असतां निमे जमीन लागलीच सरकार खालसात दाखल करावी. असे नजरेस आल्यावरुन ठराव केला आहे. तारीख २७ माहे मार्च सन १८५६ ईसवी मुकाम बेलगांव

दस्तूर केशव रामकृष्ण हंगामीकारकून   Signed A. J. Etheridge
तपासणार राजाराम अनंत हुजूरकारकून   Assisst. Inam Commr.

True Copy
A. J. Etheridge
Assist Inam Commr.

वर लिहिले जमिनीवर ज्यास हा फैसलनामा मिळेल त्या सिवाये दुसरे कोणी भाऊबंद अथवा दुसरे कोणाचेहि मालकीबदल किंवा हकाबदल अगर बहिवाटीबदल आथवा दुसरे कोणाचेहि सबबेन दावा असेल तर तो दावा चालवण्यास या फैसलनाम्यावरुन आठकाव होत नाहीं या फैसलनाम्यांत कोणाचे नांव दाखल असल्यामुळें किंवा कोणाचे नाव दाखल नसल्यामुळें कोणाचा वारसा जमिनीवर कांहीं कमी अथवा जाजती होतो असें नाहीं. जमीन किती दिवस माफीनें चालले ईतक्यापुरता या फैसलनाम्याचा आर्थ आहे तारीख सदर

उताराकरणार वेंकाजी श्रीनिवास कारकून हंगामी निा कमेटी } A. J. Etheridge, Assist. Inam Com.

(मागील बाजूस):—रुजु पहाणार केशव रामचंद्र हंगामी कारकून
तपासणार राजाराम अनंत हुजूर कारकून.

लेखांक ८६

[धार संस्थान बंडांतून मोठ्या कर्तबगारीनें, राघो नारायण गुण्यांनीं सोडविलें त्याबद्दल त्यांना धारसरकारनीं खालील दोन गांवें इनाम दिलीं आहेत.]

रा. रा. माधवराव, विनायकराव गुणे इनामदार, धार
राघो नारायण (१४-५) चांफेट

श्रीशंकर

Given before me by His Highness Anant Rao Puar Sansthan Dhar, to Raghunath Narayan Dhar 3 February 1864.

....
Superintendent
.........Dhar.

राजश्री रघुनाथराव गुणे
गोसावी यांस

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित आनंदराव पवार संस्थान धार रामराम विनंति उपरी तुम्ही सरकार चाकरी इमानें इतबारे केली असोन न्यायपत सुटण्याबद्दल बहुत परिश्रम केले अशी आमची पूर्ण खात्री जाहल्यावरुन तुम्हास काहींतरी निर्वेध उपजीविका सरकारांतून असावी जाणोन तुम्हास गांवे प्रगणें धार येथें

१ मौजे एकलहुना
१ मौजे कालु खेडी

सदरहु गांव दोन साल मजकुरापासून नेमून देऊन आलाहिदा वर्तमान भावी कमाविसदार व जमीदार यांचे नांवे पत्रें करुन देऊन तुम्हास भोगवटीयास दिली असें तरी हरदुगांवचा उपभोग कुलबाब कुलकानु जलतरु काष्ट पाषाण तृणानिधिनिक्षेप सहित जमीनदारी हक्क इनाम धरमादा खेरीज करुन तुम्ही व तुमचे वारस मौजे मजकूरचा भोगवटा नेमणुकी शिवाय पुत्रपौत्रादि वंशपरंपरा बीगर चाकरी करीत जाणें. एखादी नवीन बाब अगर दुसरें हर कोणतेहि बाबतींत आम्हाकडून आगर वंशजाकडून तोषीस लागणार नाहीं मिती आश्विन शुद्ध दशमी रोज चंद्रवासर सन १२७२ फसली संमत १९२१ शके १७८६ धातानाम संवत्सरे तारीख १० माहे आक्टोबर सन १८६४ इसवी रवाना छ ८ माहे जमादिलावल सुरुसतेन मयातेन व आलफ बहुत काय लिहिणें हे विनंति मोर्तबसुद

श्री
श्री भवानीश्वर
चरणी तत्पर यशवंत
राव सुत आनंदराव
पवार निरंतर शके
१७८९

समक्ष पाहिली नोंद नोंदणी बुकांतील अनुक्रम नं. ६४ यात केली असे ता. १२ माहे जुलाई सन १९०२ इसवी.

गोविंद बजाजी
इनाम कमिश्नर, धार

मोहर
इनाम कमिशनर
कचेरी दरबार
धार.

लेखांक ८७

[मागील ले. १४ पहा. या लेखांकावरून आश्वीशाखेपैकीं बच्याजी महादेव गुणे (५–१), चांफेट यांना पूर्वीं जी आफ्तागिरी दिली होती तीशिवाय आणखी पालखी मानाप्रीत्यर्थ सरदार रामचंद्र गणेश कानडे यांनीं दिली असें दिसतें. या लेखांकाची तळटीप पहा.]

आश्वी दप्तर.

इ. स. १७७३।७४
श. १६९५

तैनात जावता पथक दिमत **माधवराव रामचंद्र** सुरु आर्बा सबैन मया व अलफ पेशजी पागा व पथक होते ते दूर करून साल मजकुरापासून नवा करार तैनात सालीना ——— रु.

२५००० रामचंद्र गणेश

२०००० कदीम तैनात

१५००० ऐन

५००० पागेचे कसरीत द्यावे असे बोलण्यास होते ते

२००००

५००० ज्याजती साल मजकुरापासून

२५०००

६०००० पथक राऊत २०० आकार ३०० प्रा घोडे माणूस धडधडीत करोल भालेकरी आड हत्यारी व आसाम्या आढकच्या सिरस्त्याप्रमाणें बाळगाव्या.

७२७० कारकून—

३३७५ बाबूराव यादव दिवाण
२८७५ पेशजी देखील पालखी
५०० जाजती
३३७५

२६०० बच्याजी महादेव फडणीस
(२१)०० पेशजी
११०० ऐन
१००० पालखी रामचंद्र गणेश याणी दिली ती वही वाटे करून
२१००
५०० जाजती
२६००

४५० गणेश गोविंद मजमदार
५०० गोपाल गणेश दप्तरदार
३४५ अंताजी बाबाजी पोतनीस
७२७०

१२०० हत्ती एक ऐकूण सालीना
९३४७०

*येकूण त्र्याणव हजार त्र्यारशे सतर रुो सालीना तैनात करार करून पेशजीचा जातीचा सरंजाम आहे तो व दुसरा भरतीचा लाऊन द्यावा या प्रो करार.

लेखांक ८८

[आश्वी शाखेपैकीं बच्याजी महादेव गुणे (५–१) चांफेट, पागा फडणीस यांच्या सरंजामाची संपूर्ण माहिती या कागदांवरून मिळते; शिवाय सरदार कानड्यांच्या पदरीं एकंदर कोण कोण कारकून होते तेंहि समजतें. ले. ८७ पहा.]

आश्वी दप्तर

इ. स. १७८२।८३
श. १७०४

(यादी) ! राजश्री माधवराव रामचंद्र सुरु सलास समानीन मया व अलफ बाा कारकून आसामी———————योा रुोा.

---

* रामचंद्र गणेश कानडे यांच्याकडे श्रीमंत पेशवे यांची हुजूरची पागा होती व शिवाय एक पथक होतें. पेशव्यांना ज्या ज्या सरदारांनीं महाराष्ट्र राज्य वाढविण्यास मदत केली त्यांपैकी हे एक प्रमुख होते. त्यांना जरिपटका निशाणाचा मान होता. प्रत्येक लढाईंत श्रीमंतांबरोबर ते वरील जरिपटक्यासह आघाडीस असत. थोरले माधवराव पेशव्यांचे ते अगदीं उजवा हात होते. विसाजी कृष्ण बिनिवाले व मारनिले या उभयतांनीं सन १७६२ पासून पुढें १७७२ पर्यंत उत्तरेंत व कर्नाटकांत स्वाऱ्या करून पानिपतीची उणीव भरून काढली. आश्वी शाखेंपकीं-(५–१) चांफेट खं. २ पहा; बच्याजी महादेव गुणे हे सदरील पागेचे फडणीस होते असें दिसतें. ले. १४ पाहतां सन १७५८ पासून ते रामचंद्र गणेशांच्या जवळ पागेवर होते असें दिसतें. माधवराव रामचंद्र हे रामचंद्र गणेशाचे पुत्र होत.

कीता

१६८॥। वासुदेव बलाल

१६७१॥ बऱ्याजी महादेव फडणीस

१३००॥।= सरंजाम गांव

११११९ पिंपरी, लोकी आजमपूर व वोझर देह ४ तनखा

११८॥।= सरदेसमुखी मौजे वाघुडू तनखा रुो

१३००॥।=

३७०॥= नख्त पोतापोा.

१६७१॥।

११९॥=॥। सदासीव रघुनाथ

१९१ वासुदेव कृष्ण

६०॥·॥ भास्करराम

५१।≡ विसाजी पांडुरंग

२१८८= गोपाळ गणेश दप्तरदार

५६ नारो त्रिंबक

१३६॥-॥। नारो बलाल

८७ महादाजी जिवाजी

२०० हरि नारायेण

कीता

५३ राघो शामराव

१२। बापुजी यादव

४१८८≡। चिमणाजी महादेव

३३७॥-॥। गणेश बलाल

६९।-॥ कृष्णाजी गोविंद

१०० आबाजी गणेश

२१२०॥ बाबूराव यादव दिवाण

२१२०८- सरंजाम गांव देह.

१३०६॥।- मौजे आडगांव

८१३। मौजे निंबगांव (टेंभी)

२१२०८- २

·।≡ नख्त पोतापोा.

२१२०॥·

५० महादाजी शंकर

२५४॥ गणेश गोविंद

२२२ अंताजी सदासिव पोतनीस

१४॥=॥ खंडो लक्ष्मण

२६·।·॥ सदासिव कृष्ण

४ गंगाधरपंत बिडकर

२०० रामाजी बलाल भिडे

लेखांक ८९

[या लेखांकावरून आश्वी शाखेपैकीं महादाजी बलाल गुणे (५–६) चांफेट हे परगणे मेहुणबारे प्रांत खानदेश, यांचे कमाविसदार असावे. मोरो महादेव त्यांचे चुलते हे बच्याजी महादेवाबरोबर फडणिसीचे कामावर होते असें दिसतें. सदाशिव राम गुणे (१३–७) चांफेट. या ले. ची तळटीप पहा.]

आश्वी दप्तर

१७८५।८६

श. १७०७

मुखवस्त्र झडती खासगत श्री सदासीस बाा राजश्री माधवराव रामचंद्र सुरु सीत समानीन मया व अलफ शके १७०७ विश्वावसुनाम संवछरे बाा अवलसाल ताा अखेर साल बाकी साल गुदस्त वाा झडती रुो

तपसील

प्रो मेहुणबारे बाा **महादाजी** बलाल कादार बाा झाडा —— रुो

बाा मुारा —— रुो

कारकून

६५० **महादाजी** बलाल कादार

६०० बाा नेमणूक

५० आवदागिरीचे सामानाचे दुसाल मिळोन

६५०

—— रुो

तपसील

कारकून आा —— यो रुो

मोरो महादेव

३०० छ २९ सफर बाा + + पो मेहुणबारे छ १ रोवल

१२४॥≡ छ २९ माहे मजकुरी ताा होते ते नांवे खर्च लिहिले साा

१८१।।= बा। झाडा परगणे मेहुणबारे वि॥ महादाजी बलाल का॥दार मौजे वाघडू पा॥ चालिस गांव अमल सरदेशमुखी बाती बा॥ तनखा तैनात सरंजाम रु॥

६०६।।-

१११९ मौजे पिंपरी, लोकी व अजमपूर व वोझर ता॥ हवेली संगमनेर अमल सरदेशमुखी बाबती सुधा या॥ तनखा रु॥

१७२५।।÷

१०० पा॥ मेहुणबारे देणे महादाजी बलाल गुणे रु॥

१८२५।।÷

सिलेदार —————————— रु॥

नि॥ मोरो महादेव

३ छ २९ सफर

६६ स्वारी कर्नाटक

२४ बा॥ खीलोवल ता॥

४२ बा॥ जावल ता॥ रजब माहे ३

६६

देहानगी खर्च —————————— रु॥

१०० छ ६ रोज देणे सदासीव राम गुणे वकील दि॥ मुधोजी भोसले रु॥*

---

* लेखांक ८९ ची नकल आश्वी संग्रहांतील कागदांत मिळाली. ती अपूर्ण असावी असें वाटतें.

लेखांक ९०

[आश्वी शाखेपैकीं मोरो महादेव गुणे (५-४) चांफेट; यांचा सालीचा तनखा. ले. ८९ पहा. महादाजी बलाल (५-६) चांफेट]

आश्वी दप्तर इ. स. १७९०।९१

श. १७११

*यादी रा मोरो महादेव फडणीस येकंदर रुो बा तनखा.

सुरु सन तिसा समानीन मया व अलफ. श. १७१०.

५५० मुा पुणे

१०० माहे जोल छ ७

ताा छ ८ देणे महादाजी बलाल नक्त रुो

४५० माहे जाखर तैनात पाो बाकी देणे ते बा

वराता पाा मेहुणबारे

४३८॥≡॥ ऐन बाकी

११।·।· बक्षीस

४५०

---

*अशाच प्रकारच्या मोरो महादेव यांच्या नांवच्या आर्बा समानीन व खमस समानीन म्हणजे श. १७०५ व १७०६ च्याहि पण याद्या आहेत. त्यांत श. १७०५ मध्यें एकूण रुो १३३६॥।≈ व श. १७०६ मध्यें १३२१८≈।· दिले आहेत. बऱ्याजी महादेव गुणे, सदरील गुण्यांचे वडील बंधु श. १७१२ च्या सुमारास निवर्तले असावे असें दिसतें ले. ९१ पहा. त्यामुळें ते या वेळीं वृद्ध असावेत म्हणून मोरो महादेव त्यांचें काम पाहत असावेत. ले. ८८ त म्हणजे श. १७०४ मध्यें बऱ्याजी महादेवांचा उल्लेख आहे, व श. १७०५ पासून मोरो महादेवांच्या नांवच्या याद्या उपलब्ध आहेत. चालू याद श. १७१० मधील आहे. शिवाय श. १७१२ पासून रा. जनार्दन बऱ्याजी फडणिसीचे काम पहात होते असें दिसतें. ले. ९१ व ९२ पहा. यामुळें श. १७०५ पासून ते श. १७११ पर्यंत ७ वर्षे पेशवे सरकारच्या हुजूर पागेच्या फडणिसीचें काम आश्वी शाखेपैकीं मोरो महादेव गुणे पहात असावेत असें दिसतें.

५५४॥≡ पो मेहुणबारे येथील हिशेबी पो चालिसगांव पो तनखे बा।
१८१॥= मौजे वाघड्ड पो सरदेशमुखी बाबती
३७२ मौजे तळेगांव पौ
३०९॥÷ सरदेशमुखी
६३ घासदाणा भिलपटी
३७२॥÷
५५४॥≡
१११९ मौजे पिंपरी लोकी व अजमपूर व वोझर आकार नेमणुक रुो
२२२३॥≡

लेखांक ९१

आश्वीदसर

४१२०० माधवराव रामचंद्र यास तैनात
४०००० जातीस
१२०० पालखी
४१२००
३०००० स्वार आा १०० येकूण दर राऊती सालीना मोईन रुो ३०० प्रो
१५०० हती नग १ येकूण
५००० कारकून आा ५ येकूण ++ सालीना रुो
२२७५ यादो बाबूराव दिवाण बाबूराव यादव मृत्य पावले सबब यांचे नावे करार बा सनद छ २१ जोवल सन ईहिदे तिसैन रुो

१६७५ जनार्दन बच्याजी फडणीस*
बच्याजी महादेव मृत्य पावले
सबब यांचे नांवे करार बा। सनद
छ २१ जोवल सन इहिदे
तिसैन रुो

३५० गणेश गोविंद मजमदार

४०० सदाशिव गणेश दप्तरदार,
गोपाळ गणेश व विठल गणेश
(मृ)त्य पावले सबब यांचे नांवे
करार सनद छ १६ रमजान सन
खमस तिसैन रुो

३०० अंताजी सदासीव पोतनीस रुो

५०००

७७७००

लेखांक ९२

[आश्वी शाखेपैकीं जनार्दन बच्याजी गुणे (५–५) चांफेट; हे सरदार माधवराव रामचंद्र कानडे यांच्या हुजूरच्या पागेवर फडणीस होते. ले. ९१ पहा. त्यांच्या वार्षिक उत्पन्नाची ही यादी आहे. त्यावरून प्रांत खानदेशपो मौजे वाघडू व तलेगांवची सरदेशमुखी त्या वेळीं त्यांचेकडे होती असें दिसतें.]

* हा कागद आहे अशाच स्वरूपांत मिळाला. याची नक्की तारीख कळत नाहीं. आश्वी शाखेपैकीं हुजूरच्या पागेचे फडणीस बच्याजी महादेव हे मृत्यु पावल्यावर त्यांचे पुत्र जनार्दन बच्याजी गुणे (५-५) चांफेट यांना तीच कामगिरी मिळाल्याचें दिसतें. छ २१ जमादिलोवल इहिदे तिसैन म्हणजे श. १७१२ पौष वा।७ बुधवार, व २६ जा. १७९१ त्याच सुमारास बच्याजी महादेव (५-१) चांफेट निवर्तले असावे असें दिसतें.

आश्वी दसर इ. स. १७९११९२

श. १७१३

यादी रा. जनार्दन बच्याजी फडणीस येकंदर सो बाा तनखा सुरु इसन्ने तिसैन मयाव अलफ

५५४॥≡ पो मेहुणबारे भोवरगांव आहेत ते तनख्या प्रो जमा

१८१॥।= मौजे वाघडू प्रो सरदेशमुखी बाली

३७२॥।÷ मौजे तलेगाव प्रो सरदेशमुखी घासदाणा भिलपटी

५५४॥≡

१११९ मौजे पिंपरी, लोकी, अजमपूर व वोझर ४ देह तनखा सो

१६७३॥≡

लेखांक ९३

आश्वीदसर

*पाटीलक्या राा माधवराव रामचंद्र याच्या—
खासगी पाटिलक्या प्राा खानदेश प्रो आकार
विाा सिवराम बाबूराव काादार.

सो

*ही ओळ मागून शाईनें लिहिलेली आहे. अक्षर अगदीं पुसट झालें आहे. माधवराव रामचंद्र कानडे यांच्या उल्लेखावरून ह्या पाटिलक्या त्यांच्या असाव्या. व तसेंच हा कागदहि पण श. १७१० च्या सुमाराचा असावा. मौजे वोझरची पाटीलकी सांप्रत आश्वी शाखेच्या गुण्यांकडे चालू आहे. गुण्यांना ती कानड्यांनीं बक्षीस दिली होती असें ऐकिवांत आहे. महादाजी बलाल गुणे हे प्रांत खानदेशपैकीं परगणे मेहुणबार येथील १३ गांवांचे कमाविसदार होते. ले. ८९ व ९० पहा. त्यांनाच बहुधा ही पाटीलकी बक्षीस मिळाली असावी.

१३५।।।≤ मौजे वोझर पोा चालिसगांव पोा निमे हिस्सा व हक ईनाम जमीन सुध्रा रुो.

३०८~।।।· मौजे वाकडी पोा चालिसगांव पोा निमे हिसा

१६६८।।।·

लेखांक ९४

आश्वी दप्तर

इ. स. १८६५ सप्टेंबर ७

[या लेखांकांतील वांटणीपत्र हें आश्वी शाखेंतील गुण्यांमध्यें झालेलें पहिलेंच वांटणीपत्र असल्यानें तें महत्त्वाचें आहे. या वांटणीपत्राचा प्रारंभ व आरंभीचा बराचसा मजकूर तो कागद हरवल्यानें मिळाला नाहीं. सदरील लेखांकांतील मजकुराचा कागद त्या कागदास जोडलेला असावा असें या कागदावरील डिंकामुळें दिसतें. खंड २, वंशावळ नंबर ५ मध्यें सहाव्या पिढीचे जे जनार्दन बच्याजी गुणे, आश्वीकर, दाखविले आहेत त्यांचे दोन पुत्र रामचंद्र व लक्ष्मण. त्यांत रामचंद्राचे पांच पुत्र (वं. नं. ५ पहा) व लक्ष्मणपंताचे दोन पुत्र (वं. नं. १० पहा) या उभयता चुलतबंधूंमध्यें हें वांटणीपत्र झालें आहे.]

५२५ शेत मळें

दोन रुपये

Stamp office इंग्रेजी गोल शिका.

४५० नंबर १३ टिके शेरी उर्फ कंबरमोडी येकर २६ ८५ आकार रुो. अठरा ह्या नंबरांत विहीर आहे. व आंब्याची झाडे १७ सतरा वगैरे आहेत पाो आंब्याची झाडें १७ हली आहेत ती झाडे खेरीज करून जमीन व विहीर व इतर झाडें हे सर्व तुम्हाकडें त्याजवर आमचा समंध नांही. हा नंबर तुमचे वाटणीत आला आहे त्याची

सर्बंध वहिवाट तुम्ही करून सरकारचा सारा तुम्ही द्यावा. परंतु त्यांत आंब्याची झाडे १७ नवीन आमचे वडिलांनीं म्हणजे रामचंद्र जनार्दन गुणे याणी लाविली आहेत. त्याचे उत्पन्न फळें वगैरे व खोडा सुा तुमची समंध नांहीं सर्व उत्पन्न आम्ही आंब्याचे घ्यावे व त्याचे संरक्षण उमेदीस येण्याचे खत वगैरे घालणेस तुम्ही हरकत करूं नये व त्या झाडाखाली जमीन गुंतल्याबदलही तुम्ही कांहीं सारा वगैरे मागू नयें. वोसव्याबद्दल पिकाची नुकसान देणार नांहीं झाडावर समंध तुमचा नांहीं व तुमचेकडून झाडास इजा उपद्रव लागूं नये. खोडा मगदूर माफक आळे वगैरे करून पाणी आम्ही देत जाऊं. झाडा खेरीज खालील जमिनीवर वारसा आमचा नांहीं वर लिहिल्या प्राो. आळी मात्र आम्ही करीत जावीं या नंबराची किंमत अजमासे झाडे आंब्याची खेरीज करून रुाो साडेच्यारशे.

७५ नंबर ५ पाो येक १ एकर २७८१३ आकार रुाो १२ बारा या ठिकाणाचे नांव उकीराची शेरी हा नंबर सर्व तुम्हांकडे सदरहू नंबर आमचा संपादन केला आहे तो तुम्हाकडें असण्याचे कारण सदर वाटणी झाल्यांत तुमचे वाटणींत पाऊणशें रुाो शेतीत कमी आले त्याबदल हा नंबर आम्ही तुम्हास दिल्हा आहे

५२५

२५ सिकारीचे मळ्यांतील आंब्याची झाडे आमचे नंबर पाो सदरी तुम्हांकडे तीन लिहिले आहेत त्याची किंमत अजमासे पंचवीस रुाो = आमचे आंब्याचे झाडास जो शेरा लिहिला आहे तोच या झाडास लागूं असून त्या प्राो वर्तावे

२०० मौजे आश्वी खुर्द येथील वाड्या पो वाटणी उतर बाजूचे हली तुम्ही मागल वोसरीवर भिंत घातली आहे त्या सिरस्त्यानें पूर्व पछम लांबी हात ७० व दक्षण उतर रुंदी त्याच भिंतीपासून हात ३०॥· या भिंतीचे दक्षणेस तुमचे निमे हिश्या पो. जागा हात दोन पूर्व पछम आम्हांकडे जाती ती जागा समाईक भिंत होणें त्यांत जावयाची बाकी आणखी भिंतीस जागा लागल्यास निमे तुम्हाकडील व निमे आम्हाकडील : भिंतीचे वेळेस खण उतरले म्हणजे तुम्ही तुमचे वाटणीची जागा जाईल तितक्या वाश्या पुर्त दांडे मात्र देऊं. बाकी लाकडावर तुमचा वारसा नाही. जमीन भिंतीत जाणार आहे—

७५०

येणे प्रो साडेसातशें रुपयाची मिळकत तुमचे वाटणीवर
१५००

येणे प्रो स्थावर वाटून घेतले आहे. त्याची येकंदर उभयेता मिळून किंमत रुपये पंधराशे पो सदरी लिहिले प्रो आम्ही रुपये साडेसातश्याची जिनगी घेतली आहे = समाईक जिनगी राहिली तिजबदल वगैरे कलमे खाली लिहिल्या प्रो.

१ खानदेशात गाई आहेत त्या गाऱ्हे काल्हवडी रंगीबेरंगी समाईक =

(मागील बाजू)

पाहिजे तेव्हा वाटून घ्याव्या. समाईक आहे तो पावेतो गायख्याची राखोळ व वनचराईचा खर्च होईल तो समाईक द्यावा कारणपरत्वे येकमेकाचा खर्च ज्यास्त कमी पडल्यास येकमेकांनी मुजरा घ्यावा. सके १७८६ चे कितिक श्रा १ पासून गायख्याची राखोळ व वनचराईचा खर्च समाईक——

१ लाकडी सामान समाईक आहे ते——

१ गाडा मोठा येक धुऱ्या व येक वाके व सरे वेगळेकरून सरमजाम सुा चराट सिवाय.

१ तुंब्राचे गाडीचे दोन पाय.
१ पाकळ्याचे गाडीचे झापड याचे दोन पाय
२ पेटी व चौफाळा
१ १

५

१ खानदेश जिल्ह्यात चाळिसगांव तालुक्यांत मौजे वाघडु या गावांत पाटिलकीची तकसीम आठ आण्याची आहे ती समाईक.

१ तुमचे घराचे वाटणीत आड आहे त्याचे पाणी दोघानीं पाहिजे तेव्हा न्यावे. धुणे धुवावे वगैरे जो आडाचा उपयोग तो दोघाने करावा व रस्ताहि तुमचे वाटणींतून आम्हास येण्याजाण्याचा आहे तो रस्ता. आडाची किंमत चौघानुमचे ठरेल त्या पो. निमे तुम्ही आम्हास दिल्ही म्हणजे आडाचा व रस्ताचा हक आमचा नाहीं. तुम्ही किंमत देईपरियंत आड समाईक आहे.

१ मौजे आश्वी येथील वाडयांत सदरी लिहिल्या प्रो वाटण्या जाल्या. त्याचे दरम्यानची मोटी भिंत घालणे ती भिंत तुम्हास घालण्याची जरूर लागल्यास तीस जो खर्च लागेल तो निमा आम्ही देऊं व निमा तुम्ही द्यावा.

१ वाडयाचा दरवाजा आमच्या वाटणींत आहे त्याणें आम्ही तुम्ही वागत जावें.

१ तुमच्या वाट्यास दोन नंबर आले त्या सरकारी शेऱ्या आहेत. सबब सारा अधीक बसेल किंवा कमी होईल आगर कोणताही प्रकार तेथे नवीन कमज्यास्ती होऊं लागेल त्याबद्दल सर्व नफानुकसान तुमचे तुम्हाकडे व आमचे नंबरची आम्हाकडे.

१ वाडयाचे पछम बाजूचे वाडग्यांत विहीर हली आहे ती. ती आपली नसल्यामुळें उभयताचा तिजवर वारसा नाहीं.

१ आम्ही तुम्ही येके ठिकाणीं फार दिवस नसल्यामुळे मागील वडलोपार्जित वगैरे कर्ज जालेले त्यांतून विठल रामचंद्र गोडे याचे कर्जा पो. निमा भाग रुपये ५२५ पाचशे पंचवीस हे तुम्ही त्यास परभारे देऊन

त्याची पावती आम्हास दिल्ही आहे. बाकीचे कर्ज आमचे माथा. त्यांत तुमचा समंध नाहीं. कंबरमोडीत विहीर आमचे वडिलानीं नवीन केली व ती आता स्वतंत्र तुमचे वाटणीत आली तिजबदल किंमत रुपये येकसे पंचाहातर १७५ टरली त्याविसी तुम्ही आलाहिद आम्हास रोखा करून दिल्हा आहे सबब ही विहीर स्वतंत्र तुमची जाली आहे.

येणे प्रो वाटणी आजरोजी तुमचे आमचे विचाराने ठरऊन ही फारकती जाली आहे. याखेरीज तुम्हाकडे आम्हाकडें जे वहिवाटीत शेत वगैरे असतील ते ज्याचे त्याचे मालकीचे समजून त्याजवर परस्पराची वारसा नाही आता ही फारकती जाली आहे. करिता या मागील कोणतेहि तंटा राहिला नाही. ही फारकती आम्ही पांच आसामीनी समजून उमजून राजीखुषीने व आकल हुषारीने लिहिली बीा सई तीा १४ माहे सपटंबर सन १८६५ इसवी मुा सन १२७५

*

A 123912

वामनराव व कुशाबा व राघोबा व दामोदरपंत व नारायेण, रामचंद्र गुणे राा मौंजे आस्वी खुर्द

गुा वामनराव गुणे

ता. ७ माहे सपटंबर

सन १८६५

गंगाधर लक्ष्मण लो.

लेखांक ९५

श्री

इ. स. १८६७ नव्हेंबर ४

शक १७८९ कार्तिक शुा ८

बारा रुपयें

Stamp office. — इंग्रेजी गोल स्टांप

---

*हा मजकूर पानाच्या अखेरीस उलट्या बाजूवर लिहिला आहे व हस्ताक्षरहि वेगळें आहे.

खरेदीखत शके १७८९ प्रभवनाम संवछरे माहे कार्तिक शुा ८ सोमवार ते दिवशी खरेदी घेणार राजमान्य राजश्री पांडुरंग भास्कर पंडित विंचूरकर निजबत श्रीमंत राजश्री माधवराव विठल विंचूरकर यासी खरेदी देणार *वामन व कृष्णाजी व रघुनाथ व दामोदर व नारायण–रामचंद्र गुणे मौंजे आस्वी खुर्द ताा हवेली तालुके संगमनेर सन १८६७ ईा कारणें खत लिा देतो ऐसीजे कीं. आम्हीं तुम्हापासोन घेतले रुा २००० अक्षरी दोन हजार सुर्ती, या ओवजी आम्ही तुम्हांस तुकडी अहंमदनगर पोट तुकडी संगमनेर तालुके संगमनेर पाो मौजे आस्वी खुर्द व मौजे पिंपरी लोकी अजंपूर येथील आमचे वडिलोपार्जित उपभोगास असलेले शेत मळें व आंब्राई हाली तुम्हास खरेदी देऊन तुमचे उपभोगास दिल्हे ते चतुसीमा वगैरे खाली लिहिले प्राा

७ शेतमळें येकंदर टिकी सात

१ आस्वी खुर्द येथील आमचे खासगत मिरासी टिके थडीची मलई उर्फ गांवचा मला प्राा नंबर १ जिराईत बागाईत खराब सुा येकंदर येकर ६८२७ आकार १४८४ याची चतुसीमा पूर्वेस नंबर ३ दक्षणेस नंबर २ व गावठाण व नंबर ६६ उतरेस श्री **प्रवरानदी**

---

* वंशावळ नं. ५ शाखा चांफेट खंड २ पहा. त्या वंशावळींत जे सातव्या पिढीचे रामचंद्र जनार्दन गुणे, आश्वीकर दाखविले आहेत, त्यांचे वामन व कृष्णाजी रघुनाथ व दामोदर व नारायण हे पांच पुत्र होत. या पत्रांत उल्लेखिलेले विनायकराव लक्ष्मण व गणपतराव लक्ष्मण गुणे हे वरील पांच बंधूंचे चुलत बंधु होत. वं. नं. १० पहा शा. चांफेट.

या खरेदीखतांतील खरेदी दिलेली सर्व मिळकत खरेदी देणाऱ्या कै. ती. राघो रामचंद्र गुणे व कै. ती. नारायण रामचंद्र गुणे यांनीं पुढें थोड्याच वर्षांत परत मिळविली. नारायणरावांचा निर्वंश झाल्यानें हल्लीं ही सर्व मिळकत, वामनराव व कृष्णाजी, व रघुनाथ व दामोदर या चौघां बंधूंच्या वंशजांकडे चालत आहे.

या नंबरांत दोन थारोळ्यांची दगडी तोडीनें बांधलेली विहीर येक आहे.

६ मौजे पिंपरी लोकी अंजंपूर पो। टिकी साहा सरकारी बहुत दिवस वहिवाटीस असलेली.

२ मौजे अंजपूर व पिंपरी येथील नंबर दोन मिळोन सिकारीचा मळा.

१ अंजपूर पां. प्राा नंबर २० टिके गाडेवाण जिराईत बागाईत खराब सुाा. येकंदर येकर १०८३१ आकार रुो. ६८१२ यासी चतुसीमा पूर्वेस नंबर २१।२२ दक्षिणेस नंबर १९ पश्चमेस सीव पिपरीची उत्तेरस सीव तक्रारपूरची. या नंबरांत विटबंदी बांधलेली दोन थारोळ्यांची विहीर येक आहे व आंब्याची झाडे ४ च्यार पो। उतरेचे बांधावरील झाडे ३ तीन आमचे चुलतबंधु विनायकराव व गणपतराव गुणे यांचे वाटणीस गेली आहेत. व बाकी येक झाड आमचेकडें सदर झाडाचे दक्षणेस वावरात आहे ते राहिले आहे.

१ पिंपरा प्रो. प्राा नंबर ६ टिके लबाड याचे जिराईत बागाईत खराब सुाा येकंदर एकर २०८३७ आकार ७८८ यासी चतुसीमा पूर्वेस सीव अंजपूरची दक्षणेस नंबर ८।७ पश्चमेस नबर ७।५ उतरेस तक्रारपूरची सीव या नंबरांत विहीर नाहीं परंतु सदरी अंजपूरचा नंबर २० जो लिहिला त्यांत विहीर आहे त्या विहिरीचे बागाईत या नंबरांस बसले आहे.

२

४ मौजे तक्रारपूर पो। जुने गांवठाण व शेऱ्या मिळून टिंकी च्यार.

१ टिके शेरी प्राा नंबर १२ जिराईत बागाईत खराब सुाा येकंदर येकर ३१८१५ आकार १६८८ यासी चतुसीमा

पूर्वेस नंबर ११ दक्षणेस नंबर ९ व वोढ्यापलीकडे सीव आस्वी खुर्दची पश्चमेस नंबर ९ व वोढा वोलांडून सीव आस्वी खुाची. उतरेस नंबर १३।१४।१५ या नंबरात दगडी गरंगळीनें बांधलेली (सीकरा)१ विहीर आहे.

१ टिके जुने गांवठाण प्रा नंबर १४ जिराईत खराब सुा येकंदर ११८१० आकार २८१२ यासी चतुसीमा पूर्वेस नंबर १५।१६ उतरेस नंबर १२ रुजु दक्षणेस नंबर १२ पश्चमेस नंबर १३ उतरेस श्री प्रवरा नदी या नंबरांत नवीन आंबे व जांभळीची लागण केली आहे.

१ टिके शेरी प्रा नंबर १५ जिराईत खराब सुा येकंदर येकर १५८२४ आकार रुपये ५८८ यासी चतुसीमा पूर्वेस नंबर १७ दक्षणेस नंबर ११।१२ पश्चमेस नंबर १४ उतरेस नंबर १६.

१ टिके शेरी प्रा नंबर १६ जिराईत बागाईत खराब सुा येकंदर येकर ३८८१७ आकार रुपये ३६ पो वजा तकुब बागाईताबदल सन १२८४ पो ६८१२ बाकी हली ठराव रुपये २९८४ सन १२८४ पासोन पुढें रुपये ३६ यासी चतुसीमा पूर्वेस नंबर १७ दक्षणेस नंबर १५ पश्चमेस नंबर १४ उतरेस श्री प्रवरा नदी या नंबरांत दगडी तोडीनें बांधलेली विहीर येक दोन थारोळ्यांची आहे. व नवीन आंब्याची व जांभळीची लागण केली आहे.

४
६
७

१ आंब्राई, आंब्याची झाडे सत्रा मौजे पिंपरी येथील अजपूर पो. तकापूरचा प्रा नंबर १३ यांत आहेत. त्या नंबराच्या चतुसीमा, पूर्वेस नंबर १४ दक्षणेस नंबर १२ पश्चमेस वोढा वोलांडून सीव मौजे आस्वो

खुर्द उतरेस श्री प्रवरा नदी येणे प्रो। चतुसीमेचे नंबरांत पश्चम बाजूचे खोडव्यांत झाडे १७ सतरा आहेत. खोडव्यांत व खोडव्याचे बांधावर मिळोन झाडे १६ व खोडव्याचे पूर्वेस उतरेचे कोपऱ्यास खोडव्या बाहेर येक झाड आहे. असी येकंदर झाडे सत्रा आहेत. ती झाडांचे मात्र फक्त उत्पन्न सुा। आमचेकडें राहून सर्व नंबरची जमीन व इतर दुसरी झाडे विहीरी सुा। सर्व असे विनायकराव व गणपतराव गुणे यांचे वाटणीस गेले आहे. फक्त झाडें आम्हाकडें राहिली ती झाडें.

८

येणे प्रो. शेतमळ्यांचे नंबर सात व आंब्राई येक झाडे सत्रा. येकूण स्थावरें आठ दरयेक स्थावरास चतुसीमा सदरी लिहिल्या आहेत त्या चतुसीमेचे आंतील येकंदर सातहि नंबरची जिराईत बागाईत खराब सुा। येकर १३५८१ आकार रुपये सन १२८४ पो. ८२८८ तेथोन पुढें बागाइताचे तकुब आहे ते ६८१२ येकूण सदरसालापासोन पुढें येकंदर ८९८४ साऱ्याची जमीन व जी आंब्याचीं झाडें लिहिली आहेत ती झाडें व नवीन लागण केलेली झाडें व सिवाय बोर बाभुळ चिंच कौठ वगैरे हरयेक झाडें निंब वगैरे व सदरी लिहिलेल्या विहिरी पाण्या सुा। च्यार व हाली सातहि नंबरांत जिराईत बाजरी वगैरे व बागाईत ऊस वगैरे माल आहे. त्या मालांत जिराईतांत निमा हिसा व बागाईतांत तिसरा हिसा आमचा मालकीचा आहे. तो सर्व नंबरांतील हिसा व नंबर १३ तक्रारपूर पो. यांत आंब्याची झाडे सत्राची आंब्राई लिहिली आहे.

ती आंब्राई असे येकंदर सर्व तुम्हास यास खरेदी दिल्हे आहे त्यास ++ चा व आंब्राईचा ईतके दिवस घेत आलो त्या प्रो तुम्ही वोंष

आठ रुपये
Stamp office

दोन हजार रुप- सदरहू शेतमळ्या- आम्ही उपभोग परंपरा व लेकराचे

* हा स्टँप पानाचे अखेरीस उलटा छापला आहे. एक १२ रुपये व एक ८ रुपये स्टँपचा असे दोन कागद एकत्र चिकटवून त्या कागदावर हें खरेदीखत लिहिलें आहे. आठ रुपयांच्या स्टँपचा कागद उलटा जोडल्यानें स्टँप उलटा दिसतो.

लेकरी उपभोग घ्यावा. आमचा काहीं येक समंध व वारसा राहिला नाहीं सर्व मालकी तुमची आहे. त्यास सदरहू शेतमळे व आंब्राई तुम्ही दुसऱ्यास खरेदी देण्यास आगर पाहिजे तसी वेवस्था करण्यास मालक आहात. भाऊबंद व सावकार वगैरे हिला—

(मागील बाजू)

*गु. बाजार D 70352 तारीख ४ नवंबर

वासनराव व कृष्णाजी व रघुनाथ सन १८६७

व दामोदर व नारायण रामचंद्र गुणे आस्वी खुा * ऽ गुा नारायण

रामचंद्र गुणे

गंगाधर लक्ष्मण लोऽ

हरकत करूं लागल्यास त्यांचे निवारण आम्ही करूं तुम्हांस तासीस लागू देणार नाहीं. शेतचा सारा व बांद वरोळ्या आम्ही घालीत आलो त्या प्राो तुम्ही सारा द्यावा व बांद वरोळ्या घालीत जाव्या. सालमजकूर पासोनचा तुम्ही सारा देऊन बांद वरोळ्या घालीत जाव्या सन १२८४ पासोन पुढें हाली तकुब ६८१२ तक्रारपूरचे प्राा नंबर १६ स बागाईत बाा रुपये आहेत. ते सदरसालापासोन पुढें तुम्ही देत जावे. सदर शेत मळ्यांचे नंबर ७ पाो. तक्रारपूरचे नंबर सदरीं १२।१४।१५।१६ येकूण च्यार लिहिले आहेत. ते नंबर पूर्वीपासोनच तुमचे नांवचे आहेत व मौजे आस्वी खुा येथील प्राा नंबर १ व पिंपरी, लोकी अजपूर पाो. अजपूरचा नंबर २० व पिंपरीचा नंबर ६ येकूण नंबर तीन हाली तुमचे नांवे करून दिल्हे आहेत. सदरहू शेतमळें व आंब्राई अजमितीस तुमचे ताहायात दिल्हे आहे. सदरहू शेतमळें व आंब्राई पूर्वीच तुम्हांस खरेदी देण्याचे ठरून सरकती सुा सदरहू शेतांत तुम्ही आपले वतीचे घालून त्याचे करार पूर्वीच लिा घेतले. खरेदी खत होणे राहिले होते. ते अजमितीस करून दिल्हे आहे. व नंबर तुमचे नांवे नंदण्याचें तीन राहिले होते ते हि तुमचे नांवे करून दिल्हे या खरेदी खताचे रुपयाचा भरणा असा कीं; मागील तुमचा येकंदर हिशब

* * या दोन चिन्हांतील व तसेंच ऽ ऽ या दोन चिन्हांतील अक्षर वेगळ्या वळणाचें आहे.

करून देणे निघाले रुपये आकासे येकसष्ट व हाली तुम्हांकडून आमचे सावकारास देविले ते, गोपाळ वामन गणपुले यास रुपये च्यारसे व विठल रामचंद्र गोडे यास रुपये तीनसे येकूण मागील देणें व सावकारास दिल्हे मिळोन रुपये आटरासे येकसष्ट व हाली रोख तुम्हापासोन घेतले किरकोळ सावकारास देण्यास स्टांप कागद घेण्यास वगैरे रुपये येकसे येकूण च्याळीस येकूण येकंदर दोन हजार रुपयाचा भरणा भरून पावलो. हे खरेदी खत आम्ही पांचहि जणानें राजीखुषीनें अकलहुषारीनें आणि स्वसंतोषानें लिा दिल्हे सही दस्तुर नारो रामचंद्र गुणे आस्वी खुा

साक्षी

१ रावजी बाबूराव कुलकर्णी आश्वी खुर्द दस्तुरखुद.

१ रामचंद्र गणेश देशपांडे प्रा संगमनेर दस्तुरखुद

१ गोपालदास गणेसदास लाहोटी दुकान संगमनेर दाा खुद

१ + + + + नथजराम मारवाडी दुकान (आश्वी खुा) ? दाा खुद

१ गंगाराम अनंतररीामा ति व कसबे संगमनेर दाा खुद

१ रामचंद्र वल्लद सटवाजी पाटील गाईकवाड मौजे आस्वी खुर्द दस्तूर रावजी बाबूराव कुलकर्णी

राा नंबर १.

सह्या

१ सही वामन रामचंद्र गुणे मुकाम पुणे दस्तुर खुद ताा ९ नवंबर सन १८६७ ईाा

१ कृष्णाजी रामचंद्र गुणे दस्तुरखुद मुकाम पुणें ताा ९ नवंबर सन १८६७

१ सही रघुनाथ रामचंद्र गुणे मौजे आस्वी खुर्द दस्तुरखुद

१ सही दामोदर रामचंद्र गुणे आस्वीकर मुाा कसबे कर्जत ताा १० माहे नवंबर सन १८६७ इाा दस्तुरखुद

१ सही नारो रामचंद्र गुणे आस्वीखुर्दकर दस्तुरखुद

सन १८६७ चे दिजंबर महिन्याचे २८ वे तारखेस तीन वाजतां संगमनेरचे सबरजीस्टरचे कचेरींत आणून दिल्हा.

१ सही नारो रामचंद्र गुणे मुा संगमनेर दस्तुर खुद

फी ६८१२ सहा रुो बारा आणे घेतली.

हरि गोविंद सबरजिस्टर

वामन रामचंद्र गुणे व कृष्णाजी रामचंद्र गुणे वा। पुणे दस्तऐवज करून खाते लाऊन धंदा लिहिण्याचा यांचे पुणे शहरचे सबरजिस्टरचे सही सिक्यानिसी जाले मुखत्यार पत्रावरून मुखत्यार नारो रामचंद्र गुणे राहणार आश्वी खुर्द हे व रघुनाथ रामचंद्र. गुणे वा। आश्वी खुर्द धंदा लिहिण्याचा द. व दामोदर रामचंद्र गुणे राहणार कर्जत यांचे श्रीगोंदे येथील सब रजिस्टरचे सही सिक्यानिसी जालेले मुखत्यार पत्रावरून मुकत्यार नारो रामचंद्र गुणे वा। आश्वी खुर्द हा व नारो रामचंद्र गुणे धंदा लिहिण्याचा राहणार आश्वी खुर्द हे

[1]या खरेदी खतास स्टांप वीस रुाचा पाहिजे परंतु वीस रुाच्या स्टांपावर या खरेदी खताचा मजकूर लिहिला जाणार नाहीं जाणोन येक स्टांप रुपये बाराचा व येक स्टांप रुपये आठचा असे स्टांप दोन जोडून येकंदर वीस रुाची किंमत पुरी केली आहे

ता। ४ नवंबर सन १८६७ ई।

दस्तूर नारो रामचंद्र गुणे

१ सही वामन रामचंद्र गुणे मुा पुणे द. खुद

ता। ९ नवंबर १८६७ ईां

१ सही कृष्णाजी रामचंद्र गुणे मुा पुणे दस्तुर खुद...............

१ सही रघुनाथ रामचंद्र गुणे दस्तुर खुद

१ सही दामोदर रामचंद्र गुणे मुा का। कर्जत

ता। १० नवंबर दस्तुर खुद १८६७

१ सही नारो रामचंद्र गुणे आश्वी खुर्द दस्तूर खुा[2]

---

१ व २ या अंकांमधील मजकूर पानांवर मध्यंतरीस आडवा लिहिला आहे. अक्षर निराळ्या वळणाचें आहे.

दस्तऐवज करून खाते लाऊन + + + + ऐवज भरून दिल्ह्याचे व ऐवज पोंचल्याचे कबूल करितात.

१ सही वामन व कृष्णाजी रामचंद्र गुणे वा। पुणे यांचे मुखत्यारपत्रांवरून सही

१ नारो रामचंद्र गुणे वा। मौजे आश्वी खुर्द मु।। संगमनेर दस्तुर खुद

१ रघुनाथ रामचंद्र गुणे मौजे आश्वी खुर्द मु।। संगमनेर दस्तुरखुद

१ सही दामोदर रामचंद्र गुणे वा। कसबे कर्जत मुखत्यार पत्रावरून सही नारो रामचंद्र गुणे मौजे आश्वी खुर्द मु।। संगमनेर दस्तुरखुद

१ सही नारो रामचंद्र गुणे मौजे आश्वी खुर्द मु।। संगमनेर दस्तुरखुद

रामचंद्र गणेश देशपांडे व भालचंद्र वामन गणपुले वा। संगमनेर यांचे सा। सदरहू नारो रामचंद्र व रघुनाथ रामचंद्र यांचे ओळखी वि।। घेतली.

१ रामचंद्र गणेश देशपांडे प्रा। संगमनेर दस्तुरखुद.

१ सही भालचंद्र वामन गणपुले कसबे संगमनेर दस्तुरखुद.

ता। १६ ज्यानेवारी सन १८६८ ई।।

हरि गोविंद सबरजिस्टर

१ ले नंबराचे बुकाचे ६ वे कलमाचे ८३।८४।८५।८६।८७।८८।८९। ९० वे पानांत ४४२ चे नंबरीमधे क.

ता। १६ ज्यानेवारी सन १८६८ ई।।

हरि गोविंद सबरजिस्टर

सबरजिस्टरचा स्टांप

—इंग्रेजी गोल

E 83554

*गुजरी बाजार संगमनेर

---

*हा मजकूर पानाच्या अखेरीस उलट्या बाजूवर लिहिला आहे. अक्षर वेगळ्या वळणाचें आहे.

वामनराव व कृष्णाजी व रघुनाथ दामोदर व नारायण रामचंद्र गुणे मौजे आस्वीखुर्द

गंगाधर लक्ष्मण लो.

लेखांक ९६

[आश्वी शाखेपैकीं रामचंद्र जनार्दन (वं. नं. ५-७ शा. चांफेट) यांच्या पांच पुत्रांमध्यें झालेलें हें वांटणीपत्र आहे. त्या वांटणीपत्रांतील पुढें देत असलेला उतारा दोन वर्षांपूर्वी घेतला. त्यानंतर हें वांटणीपत्र हरवल्यामुळें आज उपलब्ध नाहीं; नाहींतर सर्वच छापण्याचा विचार होता. पुढें देत असलेल्या उताऱ्यांत आश्वीकर गुण्यांच्या वडील घराण्यांतील मंडळीच्या वडिलार्जित मिळकतीची सर्व माहिती आली आहे.]

दामोदर रामचंद्र (५-१२)–चांफेट	गोपाळ कृष्ण (७-१)– चांफेट
चिंतो वामन (६-११)– ,,	आनंद कृष्ण (७-२)– ,,
मोरो वामन (६-२)– ,,	रघुनाथ रामचंद्र (५-११) ,,
स्टांप	ता. ५।५।१९०१

फारकत शके १८५३ प्लवनामसंवत्सरे ज्येष्ठ शुा ८ ता. ५ माहे मे सन १९०१ इसवी रोजीं लिहून घेणार दामोदर रामचंद्र गुणे, चिंतो वामन गुणे, मोरो वामन गुणे, गोपाळ कृष्ण गुणे, आनंद कृष्ण गुणे यासी, यासी लिहून देणार रघुनाथ रामचंद्र गुणे धंदा पेन्शनचे उत्पन्नावर निर्वाह करणेचा व लिहिणेचा राहणार आश्वी आज मुक्काम कोल्हापूर कारणें फारखत लिहून देतों जे, आजपर्यंत आपण सर्व एक विचारानें वागत आलों. हल्लीं वडिलार्जित मिळकतीची व्यवस्था माझ्याच्यानें होत नाहीं व एकमेकांचे मनांत वेगवेगळे राहण्याचे आल्यावरुन वडिलार्जित सर्व स्थावर जंगम मिळकतीची वाटणीकरणेचें आपणांमध्यें ठरलें त्यावरुन सदरहू वाटणीपत्र लिहून देतो ती मिळकत खालीं लिहिल्याप्रमाणें.

तुकडी अहमदनगर पोट तुकडी संगमनेर पौ मौ. पिंपरी येथील जमिनी.

सर्व्हे नंबर	एकर	आकार	प्रकार	पूर्व	दक्षिण	पश्चिम	उत्तर
१७	२९८९	२०	जिराईत	१६	१४	शीव मौजे आश्वी	१८।१९ २०।२१
२०	९८२८	४	बागाईत	२१।२२	१७	१९	प्रवरानदी
२१	१५८६,	९	जिरा. व बागाईत	२४	१६।१७	२०	२२।२३
२२	२०८८	२५	बागाईत	२३	२१	२०	प्रवरानदी
२३	१६८१०	२०	जिरा. बागाईत	२४	२१	२२	प्रवरानदी
	जि. अहमदनगर ता. संगमनेर पौ मौ. प्रतापपूर येथील जमिनी						
३५	९	७	बागाईत	३८	३३।३४	शीव आश्वी बुद्रुक	३६ व सी. आश्वी बुव
३६	९८२७	१८	बागाईत	३७।३८	३५	शीव आश्वी बु.	शीव आश्वी बु.
	जि. अहंमदनगर ता. संगमनेर पौ उंबरी बाळापूर येथील जमीन;						
५२	७८१८	१३	जिराईत	———	१५,	१६,	१७
	जि. अहंमदनगर ता. संगमनेर पौ. आश्वी खुर्द येथील जमिनी;						
१	६८२४	१०	जिरा. बागाईत	३	गांवठाण व लिंब,	गाव-ठाणमार्ग	प्रवरानदी
६० (पोटतुकडीनिमी) पूर्व बाजूची पाईन	११८२७; ११८८		जिराईत	सर्व्हे नं. २३	सर्व्हे नं. ५०	पौ निमे वाटणी गोपाळविनायक गुणे यांची	५९

नांदतावाडा वडिलार्जित मौ० आश्वी येथील चौदिवाळी रायवळी किलचबंदी धाबी पूर्वाभिमुख लांबी पूर्वपश्चिम हात सुमारें ६० रुंदी दक्षिणोत्तर हात सुमारें ४२, शिवाय दरवाजाबाहेर दक्षिण अंगास बांधलेले धाबी खण ९ व पश्चिमेकडिल परसु कुंपणाचे आतील विहिरीसुद्धां; यास चतुः सीमा पूर्वेस दरवाजाबाहेर बखळ जागा व सरकारी रस्ता दक्षिणेस लक्ष्मण गाडे याचे घर व खासगी परसु पश्चिमेस कुंपणापलिकडें रस्ता व

उत्तरेस **विनायकराव व गणपतराव गुणे** यांची घरें मध्यें भिंत समायीक आहे व सदरहू घरांत आड समाईक आहे त्या सुद्धा येणे प्रमाणें चतुः-सीमापूर्वक घर, कवाडे, दारे, फळ्या, फरताळें, दगडमाती, तदंगभूत वस्तु सुद्धा व इमल्याखालील जमिनीसुद्धां घर वडिलार्जित आहे.

ता० संगमनेर पौ मौ० **प्रतापपूर** येथील गांवाबाहेर गांवठाणांत नदीस जाणेचे रस्त्यानजीक पूर्व अंगास बखळ जागा लांबी हात सुमारें ३०, रुंदी हात सुमारें   ची होती. ता० संगमनेर जि० अहंमदनगर पौ मौ० **पिंपरी लोकी आजमपूर** पौ **तक्रारपूर** येथील सर्व्हे नंबर १८, आंब्याची झाडे १२ आहेत. व सर्व्हे नं. २०।२२।२३ मौ० पिंपरी येथील जमिनी यांत आंब्याची झाडें १३ आहेत व मौ० **प्रतापपूर** सर्व्हे नं. ३५।३६ यांत आंब्याची झाडे २ आहेत. सर्व्हे नं. २२ यांत जांभळीची झाडें ६ व कळकीची बेटे ३ आहेत. जि० **खानदेश** ता० **चाळिसगांव** पौ **मौ० ओझर व वाघडु** या गांवचे निमे पाटिलकी वतन व तेथील वतनी जमिनी दोन आहेत त्या; येणें प्रमाणें वडलार्जित स्थावर मिळकत होती तुम्हांस खाली लिहिल्याप्रमाणें वाटून दिली आहे. (अपूर्ण)

लेखांक ९७

यशवंतराव लक्ष्मण गुण्ये, ग्वाल्हेर दरबार वकील पुणें } **इ. स. १८६६**
यशवंतराव लक्ष्मण (८-८) मठ } **शक १७८७**

यादि पित्राचि नांव निशि येशवंतराव लक्ष्मण गुण्ये याजबद्दल मुक्काम लष्कर संमत् १९२२

अस्मत् पितृ पितामह प्रपित्तामहानां लक्ष्मण सदाशिव अनंत शर्मणां अत्रिगोत्राणां वसुरुद्रादित्यस्वरुपाणां

अस्मत् मातृ पितामहि प्रपितामहिनां रमापार्वती काशीदानां

अत्रिगोत्राणां वसुरु......

अस्मत् मातामह......

अस्मत् पत्नी भागिरथीदे अत्रि. वसु.

अ. पितृव्य.

१ बाजीश. अत्रि. सपत्नी. वसु.
१ शंकरश. अ. स. व.
१ ब्रह्मीभूत सखाराम श. अ. स. व.
अ. भ्रातु.
१ शिवराम श. अ. स. व.
१ वासुदेव श. अ. स. व.
१ घनःश्याम श. अ. स. व.
१ सदाशिव श. अ. स. व.

आवश्यक तेवढीच माहिती घेतली आहे.

लेखांक ९८

[कालेंशाखेंतील गुण्येमंडळींना जें पोलिटिकल पेन्शन मिळतें त्याची हकिकत.]

[मेजर सदाशिव वासुदेव गुणे यांचे संग्रहांतील] इ. स. १८६७ जून २५

नारो जगन्नाथ (१४-२) चांफेट. आठ आणे स्टॅम्प

मेहेरबान यथरीज साहेब बाहादुर सटलमेट हपीसर प्रांत दक्षण मुकाम पुणे

यादी नारोजगन्नाथ गुणे मौजे काले पो कराड जिल्हा सातारा राहणार पुणे पेठ सदाशिव गायअलीत घर खासगत बालाजी नाईक केलकर यांचे शेजारी कारणे यादी देण्यांत येते अैसाजे आमचे वडिलांचे राजपत्रीं सरंजाम चालत असोन अवल इंग्रजीस निजाम सरकारचा व इंग्रज सरकारचा तहनामा जाहाला त्यावेळेस सरंजाम तहनाम्यांत दिल्हा त्याचे मोबदला पेनसीन चांदवड रुपये ३०० करुन दिल्हे.

२ मौजे अऊसगांव पो आंबे जोगाई व मौजे वराडे पो धारूर येथील मोकासा व मौजे हिरहाली पो आलंद येथील मोकासा व सरदेशमुखी हें अंमल पेशवाई अखेरपर्यंत आमचे तीर्थरुप जगनाथ धोंडदेव गुणे याजकडे चाललें त्याचे मोबदला पेनसीन अवल इंग्रजीस करुन दिल्हे त्याचा तपशील

३०० जगन्नाथ धोंडदेव यांचे पुत्रास	३०० रामचंद्र व्यंकटेश गुणे
१५० आम्ही नारो जगन्नाथ	
१५० हरी जगन्नाथ	
३००	
६००	

यणे प्रो करुन दिल्हे त्याप्रमाणे पुण्याचे हुजूर खजिन्यांतून पावत आलें

३ सन १८४२ इसवीचा **रूळ कोर्ट आफ डरेक्टरचा गौरनेर कौंसलांत आला कीं ज्याचा सरांजाम सन १७५१ चे पलीकडील असेल त्याचे वारसाकडें पुस्त दरपुस्त चालवावे** सन १७५१ चे आलीकडील आणि सन १७९६ इसवीचे पलीकडील अडीच पुस्त त्याचेपुढें दीड पुस्त चालवावे तो रूळ मेहेरबान येज्यंट साहेब बाहादुर प्रांा दक्षण याजकडे आल्यावरून त्याणी दरोबस्त लोकांच्या कैफियती व संदापत्रे घेतली त्यावेलेस आम्ही हजर केली. नंतर साहेब मनसुफ याणी सरंज्याम पट व पेनसीनपट तयार केला त्या पेनसीन पटांत पहिलें प्रतींत आमचे नांव व हरि जगन्नाथ व रामचंद्र व्यंकटेश याचे दाखल करुन पुस्त दरपुस्त चालवावे म्हणोन ठराव केला तो पट गौरनेर कौंसलांत दाखल होऊन बिलायतीस रवाना जाला तेथे मंजूर होऊन परत येजंट कचेरीस आला.

४ सन १८५२ ह्याचे साली **ईनाम कमेटी** मुंबई ईलाख्यांत सुरु जाली तेंव्हा सरंजाम व इनाम व पेनसीनपट वगैरेची चवकसी कर्ण्याविसी सरकारचा हुकूम त्याजकडें आल्यावरुन चौकसी सर्व सर्व लोकांची सुरु जाली. ते वेळेस आम्हास बोलावणे होऊन आम्ही संदा पत्रें व कैफियत व वंशावळ वगैरे सर्व पुरावा हजर केला पुढें त्याणी काये ठराव केला तो आम्हास लेखी लिहून कळविला नांहीं परंतु ताहोयात ठराव केल्याचे अयेकिण्यात आले.

५ पुढे सर्व पेनसीनदार लोकांनीं गौरनेर कौंसलांत वगैरे ठिकाणी बहुत अर्ज केले कीं आमचा सरंजाम राजपत्रीं सन १७५१ ईसवीचे पलीकडील असोन तो **निजाम सरकारास** देउन त्याचे मोबदला मुलुख घेऊन सरहद

ठरविली आणि तहनामा जाला त्यास आमचा सरंजाम अथवा त्याचे मोबदला पेंनसीन पुत्रपौत्रादि वंशपरंपरा चालविले पाहिजे. त्याजवरून सरकारचा हुकुम ईनाम कमिटींत येऊन त्यांणीं पेशवे सरकारचे दप्तरांत दाखला पाहून ज्याचा सरंज्याम सन १७५१ इाचे पलिकडील होता त्याचा सरंजाम व पेनसीन पुस्त दरपुस्त चालविण्याचा ठराव करुन सरकारास पो तो विलायत मेहरबान राणी सरकारांत मंजूर होऊन चालू जाला. त्याजबा त्याजला जबाव लेखी मिळाले म्हणोन अयेकिन्यात आहे.

६ आमचे येकंदर पेनसीन रु. ६०० पो रामचंद्र व्यंकटेश गुणे मयत जाले त्याचे पुत्र २ व्यंकटराव, गोविंदराव रामचंद्र गुणे त्याणी सदरहु पेनसीन पो ३०० रु. बापाचे पेनसीन चालवावे म्हणोन त्याणी सरकारांस अर्ज केला आहे. हरि जगन्नाथ गुणे मयत त्याजला सालीना रुपये १५० मिळत होते त्याज पो त्यांचे कुटुंब सईबाई उर्फ राधाबाई याजला पेनसीन ताहायात ४८ रु० मिळत आहेत सदरहु हरि जगन्नाथ यांचे पुत्र ३ पौ. बडील सीताराम मयत याचे पुत्र विनायेकराव याणी दरोबस्त पेनसीन मयत तारखेपासून मिळण्याविसी अर्ज केला आहे.

७ आम्हास पेनसीन पुण्याचे हुजुर खजिन्यांतून सालीनां कपणी रु. १४४ मिळत असे ते ताहायात चालवावे म्हणून मेहेरबान कलेकटर साहेब बाहादूर याजकडें लिहून गेले असे सदरहु पेनसीनचे बाबदींतीत आमचा अर्ज असा आहे कीं आमचा सरंज्याम राजपत्रीं सन १७५१ इाचे पलिकडील आहे. येविसीं सर्व पुरावा येजंट कचेरीस व ईनाम कमेटीत दिल्हा आहे तो व पेशवे दप्तराचा दाखला पाहाण्यांत येऊन सदरहु आमचे पेनसीन पुस्त दरपुस्त म्होन पुत्रपौत्रादि वंशपरंपरा चालविण्याविसीचा ठराव होऊन आम्हास लेखी समज रुळाप्रो मिळाली पाहिजे.

ता. १० माहे जून सन १८६७ इा.

सही नारो जगंनाथ गुणे

¹ जाहीर होऊन बाळाजी आपाजी हुजूर कारकून याजकडें ताजून सन १८६७ ईसवी

दप्तर नंबर ६३४।५५९ S. B. G. आवक नंबर. १३५७

²रा नंबर ८१९ यास जबाब.

तुम्ही लिहिले त्या पेनसनाबाा पूर्वी ईनाम कमिस्नर खात्यांतून चौकसी होऊन जें तुम्हाकडें पेनसीन चालत आहे ते तुमचे हयात पर्यंत चालविणेंविसयीं सरकारचा ठराव नं. ४४८९ ता. २० आगटंबर सन १८५४ ईसवीचा आल्यावरून तुम्हास तपसील वार मार नंबर ३६४६ ता. २२ सप्टंबर सन १८५७ ईसवीचे पत्रांत कळविला आहे. त्यासिवाये इकडून जाजती तजवीज होऊं शकत नाहीं कळावे ता. २५ जून सन १८६७ इसवी.

बाळाजी आपाजी हुजूर कारकून
A. S. Ethridge.
³ C. O.

....
८८ E 532158 १११६

ता. १८ जून इसवी १८६७ नारो जगन्नाथ गुणे हस्ते विनायक भिवराव, वामनाजी गणेश दस्तुर खुद.

लेखांक ९९

[ऐतिहासिकदृष्ट्या हा लेखांक फार महत्त्वाचा आहे. या लेखांकाची फूटनोट पहा.]

श्री २

मठ-दप्तर.
कृष्णभट (१–२)–मठ
विष्णुभट (१–४)–,,
बाळंभट (१–५)–,,

१, २, ३ येथून अक्षर बदलतें आहे.

*तेथें प्रसूत झाहाली तेथें आमचे आजे **कृष्णभट गुण्ये** याचा जन्म झाहाला मागे मठामध्यें वडिलाचे निसबतीचे कुभाकरी कुळमी येक दोन मखत्शीर होते त्याणी गांवचा कारभार कांहीं वर्षे चालविला उपरांतिक कृष्णभट थोर झाहाले मातुश्री अगोदर निवर्तली आपले लग्न तेथेच केले **भाटवडेकराचा** समंध केला उपरांतीक पूर्ववतंदारीचा परामृष केला तो **असोडे** गेले लावगन ओस होते तेव्हा **+ वाडा कोंड+वीहून** व **चिंद्रवलीहून भाटवडेकर +रुद्रभट+बंधु २ दामभट बंधु १ केशवभट बंधु १ व देवस्थली १ व निवसराहून गोंद जोशी** हलबे त्यांचे तीर्थरुप वृद्ध होते येसे लावगनांत आणुन पूर्वपाटाची उजेरणी करुन दुसरा पाट वरुन साधुन स्थले नेमु

* ह्या महाशाखेच्या वखरीवजा वृत्तान्ताचें पहिलें पान उपलब्ध नसल्यानें याचा लेखक व तो केव्हां लिहिला गेला हें नक्की कळत नाहीं. सर्व वृत्तान्त बालबोधींत लिहिला आहे. पुढील कारणावरून हा वृत्तान्त सदाशिवभट गुणे (ब. नं. १–१० मठ शाखा) यांनीं गुण्ये व हलबे यांच्यामध्यें आठराव्या शतकांच्या उत्तरार्धांत वाद चालू असतां लिहिला असावा असें दिसतें. त्याचीं कारणें. (१) 'आपले आजे कृष्णभट' या उल्लेखावरून कृष्णभटांचे (१–२ शा. मठ) नातू सदाशिवभट (१–१० शा. मठ) हेच लेखक असावेत. (२) या वृत्तान्ताचा लेखक, 'विष्णुभट आपले पितृव्य'–विष्णुभट (ब. नं. १–४ शा. मठ); तसेंच, 'बाळंभट आपले पितृव्य'–बाळंभट (ब. नं. १–५ शा. मठ), याप्रमाणें विष्णुभट व बाळंभटास उल्लेखितो; त्यावरून लेखक सदाशिवभटच असावेत. कारण सदरील व्यक्ति सदाशिवभटांचे चुलते आहेत. (ब. नं. १ मठ शाखा पहा.) (३) 'प्रथम कज्या हलबे यांनीं केला.' धोंडो हरि यांनीं रोप्या उपडून टाकिल्या. त्यांचा यांचा कलह लागला' धोंडो हरि हे डोंगरे होत. ज्या वेळीं हलबे व गुण्ये यांच्यामध्यें वाद चालू होता तेव्हांच गुण्ये व डोंगरे यांच्यामध्येंहि पण वाद चालू होता. 'आमचा कज्या लागोन किला आलों.' इत्यादि उल्लेखांवरून गुण्ये विरुद्ध हलबे व डोंगरे यांच्यामध्यें वाद चालू असतां हा वृत्तान्त सदाशिवभटांनीं लिहिला असावा असें दिसतें. कारण या दोन्ही वादांत सर्व माहिती त्यांनींच पुरविली आहे. लेखांक २७ व लेखांक ४९ यांची तळटीप पहा.

(न)++ तपशील याचे (मा) ख्यास सारणी पलिकडें ठिकाण खासगत कृष्णभटी आपल्याकडें ठेविले त्याचे दक्षिणेकडें भाटवडेकर रुद्रभटास दिल्हे त्याचे पलिकडें दाखले आपले ठेविला त्याचे दक्षिणेस हलवे त्याचे दक्षिणेस **दामभट** डोंगरे त्याचे दक्षिणेस **केशवभट डोंगरे** त्याचे दक्षिणेस **देवस्थली** त्याचे दक्षिणेस **वलामे चोरवण्याहून** आणून त्यास ठिकाण करु दिल्हे कृष्णभटी आप(ल्या)रुल्या खाली स्थले ठेविली त्याची आगरमांडणी येकस्याचे वस्तु न होय तेव्हां **वाडा खेडकुली** तेथें गणपतीची पुजा करीत होता त्याचा बंधु टेंबकर लावनास अणून भाटवडेकर व हलवे यांचे मध्ये भागे ठिकाण आपले त्यांत आणून ठेविला उपरांतीक आगराचा कीर्दी झाहाल्या ++++++++++++ भटा

(पान २ मागील बाजू)

स बंधु **दानभटाचे** तीर्थरुप कोंढवी मध्यें रोपीवरुन पडून मृत्य पावले. त्याची स्त्री कृष्णभटाची मावशी यामुळें त्या स्थली येकत्र पांच सात वर्षें होते उपरांतीक बायको थोर झाहालीयावर आपले ठिकाणांत राहिलें **गांवचा वडिलकीचा कारभार व ग्रामोपाधीकाचा अधिकार पूर्ववत्प्रमाणें कृष्णभट करुं लागलें** पुढें आगरे लागास आली तेव्हां देवस्थली वळामा गयाळ पडले त्याची आगराची मशागत येकस्याचे वस्तु न होय तेव्हा दो स्थलाचे चार विभाग करुन भाटवडेकर हळवे व डोंगरे दोन याचं निसब तीस लावली पुढे दिवाणचे उगवणीस कुळ भावे सारखे करणें प्राप्त झाहाले तेव्हां कृष्णभटाखाली जमीन अधीक होती त्यांतील आगर पाटाखाली चौघास लाउन आपल्या कुळभावेंप्रमाणें चाररसारे आपला येक येकून **पांच सारखे केले** वडिलकीची जमीन आपल्याकडें कांहीं अधीक ठेविली **आहे** वडिलाचे कारकीर्दीचे गांवामध्यें कुळभावेकरी कुळभी होते **साठेरा पडला ते मेले काहीं परागंदा झाहाले** तेव्हा त्या खाली जमिनी होत्या त्या आगराचा कुळभावे वरवाटुन दिल्ह्या व कांहीं इतरास कुळभावे **करुन** दिल्हे पूर्वेकडील कोंढ **गणेशभट भटवडेकर** यास दिल्हा देवळाजवळील गुरवास कुळभा करुन दिल्हा देवळाचे पश्चिमेकडील कोंढ **गणेशभट डोंगरेस** कुळभावा करुन दिल्हा येणे प्रमाणें गांवचे **कुळभावें ८ आठ**

सारखें केलेनीं त्या अगोदरच कासार ईदल शाईचा अखेरी परागंदा झाहाला.

श्री २

त्या खाली स्थले होती ती कुळभावे वेवास्थाखाली लागली कासाराचा घरवंदा परसु परडेचा जागा उभीरास ठेविले। ती आहे. तो कासार कोठे तरी आहे यैसे समजले होते यास्तव जागा उभीरास राहीला गावचा वडिलकीचा कारभार व ग्रामोपरधीकाचा अधीकार कृष्णभट गुण्ये करीत होते पुढें ते देवाज्ञा होणार त्या समई **केसो रुद्र भाटवडेकर** यास बोलाउन (आणू) न कृष्णभटी आ (पली) मुलं लाहान + + (अज्ञान) ? होते ते त्याचे हाती दिल्हे आणि सांगितले कीं मुलं थोर होतं तंव गावचा कारभार तु कर येसे **तो मेवणा यास्तव सांगितलं।** मुलाच चालवणेस येस सांगितलं। उपरांतीक ते देवाज्ञा झाहाले तदनंतर केसो रुद्र याणीं पत्रा अठरा वर्षे कारभार केला। उपरांतीक **विष्णुभट** आपले पितृव्य याणी कारभार करावा यैशीया बुधी झाहाली तेव्हां कारभार करु लागले तेव्हां त्याचा याचा कज्या झाहाला तनिमित्य विष्णुभट वारले पुढं ती महिन्यानें कसोरुद्र वारले उपरांती **नारो गणेश भाटवडेकर कोंडकरी हे हरि विश्वनाथ** याचे भाचे दिवाणांत जाणे येणें त्याचे असे यास्तव **बाळंभट गुण्ये** आपल्ये पितृव्य याणी त्यास कारभार सांगितला याणी दोन चार वर्षे कारभार केला उपरांतीक **भालेरावींत ती मूले प्रांत उझेड पडला तेव्हा काशी रंगनाथ पोतदार प्रांतचे लाव-**

(पान २ मागील बाजू)

णी कोंकणांत गेले तेव्हा **बाळ जोशी** शहाणा निघाले. काशी रंगनाथ यास लांजेचे मुकामी भेटले तेव्हा त्याणी सांगीतले कीं गांवा कौल देतो तुम्ही सर्व गावांस येउन सर्वांनीं गावची वसात करणें त्यावरुन सर्वांनीं येउन गावची वसाहत केली तेव्हां गावामध्यें कुळभावेकरी होते कांहीं परागंदा झाहाले गावामध्यें राहतां **गुण्ये व हळबे व डोंगरे व नारो गणेश कोंडकरी व** म्हार गुरव इतके होते तेव्हां दिवाणची उगवणी करावी एत निमित्य कुळभावे दोन दोन केलें गुण्ये व भाटवडेकर हे दोन

खासगत तीर्थरुपांनी आपल्याकडें टेविले, हलबचा व गणेशभट डोंगरे कोंड त्याचा कुळभावे दोन हळबे कडेस लाविले. दोनिही डोंगरे रामभट हरभट यांचे निसबतीस लाविले नारो गणेश कोंडकरीं त्याचा त्याकडेस होता गुरव म्हार उमीरास होता येसे वाटप कांहीं वर्षी(र्षे) चालले त्याजवर राजक्रांतीमुळें (पलोन) गेले होते त्यावर फिरोन गावांत आले त्या समई कुलभावे सारे मोडले तेव्हां गाव येकांदर खोती झाहाली तेव्हां तीर्थरुपाचा काल प्रतिकूल विष्णुभट अगोदर वारलें, बाळंभटाच्या स्त्रिया दोघी वारल्या तेव्हां गावचे ओझे डोईवर घेउन गावचा कारभार करुन निभावणी करायेचे सामर्थ्य नाहीं तेव्हां तक्षीमा तीन केल्या गुण्ये १ हळबे १ डोंगरे १ येकूण तीन तक्षीमा

श्री ४

सारख्या करुन गा(वा)ची उगवणी होत असे ऐसे असतां रामरायेचे कारकीर्दीस रुपया अनिवार पडला त्या सर्पवस्व विकून गांवचे भरी घालोन पलोन वडील गेले मागाहून हलबे व डोंगरे पलोन गेले व दोन वर्षे तिकडें होते उपरांतीक गांवांत आले पूर्ववत्प्रमाणें चालत होते. डोंगरे टाकीत करीत यैसे चालत होते बाळ जोशी प्रारब्धवान् निघाला त्यामुळे त्याची चाल पर्वा गोष्टी पडली पुढे आमचा सोपेत नानल हरि गोविंद होते त्याची मुलीचे लग्न झाहाले त्या समयी साडेचे मानाचा प्रथ कज्या हलबे याणी केला ते(व्हा) आपले तीर्थस्वरुप बाळभटा(नी) त्यास मान दिल्हा नाहीं (यामुळे) (ना)नलाचा मुलं वारला व नार जोशी मोघे लग्नांत कारभारी होते त्याची स्त्री वारली त्यास विषबाधा झाहाला आपली मातुश्री आठ वर्षे अव्यावस्त होती त्या समई देव धर्मास पुसो लागले तेव्हा देवधर्म सांगो लागले खोती सोडा मान त्यास द्या बायको पाहिजे तर ही गोष्ट करा. तेव्हा खोती सोडली मतुश्रीस वा(र) हरिल गांवीं नेउ ठेविली मग बाळ जोशी यास शरण जाउन तीन वेल नार टेउन गोष्ट वारवली त्यावर त्या बरोबर कज्या कोणे गोष्टी केलो नाहीं पुढें केसोपंतभट येउन आमचे ठिकाण+ वडिलास पुसोन राहिलें त्याचे अन्व(ये) आमचे ठिकाणांत रोप्या १३ घातल्या

(पान ४ मागील बाजू)

(विदपती) कुभांड करुन आपलं+ साधन घालावे या अन्वये त्या ++ घातल्या यैसा केल्या फणसाचे माडे तीन त्याणी केले त्यावर केसोपंत निघून गेले उपरांतीक त्या रोप्या गोविंदपंत शिंपो लागले त्यास वर्षे सुमार ३८ तदनंतर पेशजी रोप्या ते १३ नारळ माड १ यैसा घातल्या त्या समई आपली मातुश्री अद्यावस्त होती तंनिमित्य आप(ण) कलह करायेस भय प्राप्त झाहाले परंतु युक्तीचे वाटीनें पुसावे यैसे योजिले इतकीयांत **धोंडो हरि याणे रोप्या उपट्न टाकिल्या त्याचा याचा कलह लागला** उपरांती मातुश्री वारली आम्ही मोकलें झाहा(लो) वर त्या स्थली भाजी व भाजी तो त्याणी भाई दिल्ही त्यावर त्याचा **आमचा कज्या लागोन किला आलो.**

लेखांक १००

मठ-दप्तर श्री **सुमारे इ. स. १७७९**

यादी ठिकाण खासगत चतु:सीमा

दक्षणेकडें सारण

उत्तरकडें गडगा

पश्चमेकडें आगरपाट

पुर्वेकडें पाणंद

ठिकाण झाडा

सारणीवलीकडे गुण्ये १

सारणी खालीकडें भाटवडेकर ठिकाण १

+ ह्या चिन्हांनीं युक्त शब्द पुसट रेघांनीं खोडले आहेत. कंसांतील मजकूर अंदाजानें लावला आहे. मूळ लेख बाळबोधींत आहे. कागद अगदीं जीर्ण झाला आहे. अक्षराचें वळण जुनें आहे.

भाटवडेकराजवल टेंवकर
१

टेंवकरा खालीकडें हा-
लवे टिका
१

हलवे जवळ डोंगरेचा, व आ-
मच्या कजियाचे ठिकाण
१

त्याचे जवळ केशभट
डोंगरा ठिकाण
१

देवस्थली; वलामा; ग
याले नियांत ठिकाणे
२

कुणभावें

गुण्ये टेंवकर गुण

भाटवडेकर कुणभावा
१

भावा वऱ्हातीस
१

डोंगरे कुणभावे
२

हलवे कुणभावा
१

गुरव म्हार कुणभावा
१

कोंड आजणारी जवल गणे-
शभट व कासीभट भाट-
वडेकर कुणभावा
१

दुसरा कोंडा असोडे जवल
डोंगरे कुणभावा
१

कुणभावे वहातीस आठ
येणें प्रमाणें पुरातन चाल

लेखांक १०१

भा. इ. सं. मंडळ पुणें ।

बलाल (१३-५) चांफेट. श्री धनाई प्रा

राजेश्री कृष्णराव बलाल गुण्णे गोसावी यासी

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्यें श्री सिवाजी थोरात दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकियें लिहिणें विशेंस हैदर नाईकाची नालबंदी चिरंजीव कृष्णाजी थोरात याणी आणली रुपयें तीस हजार, त्यास चाकरीस न जाणें म्हणून आज्ञा सरकारांतून जाहाली ते सदरहु रुा नालबंदीचे सरकारांत देणे म्हणून त्याजवरून सरकारांत आपणाकडून यैवजाची निशा करविली रा सदरहू प्रा सरकारांत आपण द्यावे मुदती सरकारांत केली आहे त्याप्रमाणें ऐवज तुम्हास पावता आम्हीं करुन देऊं इया छ १७ जिलकाद ता. छ १८ जिल्हेजी येका महिंनेंत देऊं मुदतीपुढें ऐवज राहिला तर दिडिच्या प्रा व्याज राहील त्या ऐवजास देऊं रुा आरकाट गजी कोट बहुत काय लिहिणें छ मार सुा खमस सबैन मया व अलफ हे विनंति

सदरहु पैकी पावती रुपये

१०००० गुा गोपाळ नाईक तगारे छ १५ मोहरम पांच हजार व छ १ सफर पांच हजार येकून दहा हजार सन मजकुर रुपये हुकेरी

हस्ताक्षरे बाबूराव बाा पत्रा प्रा साक्ष

सिमाजी कारकून दिा। मजकूर बजी बाबाजी म्हैसकर.

लेखांक १०२

श्री

कृष्णाजी रघुनाथ (५–८) मठ

यादी कृष्णाजी रघुनाथ गुण्ये विज्ञापना ऐससीजे

श्रीमंत राजश्री पंत सचीव याजकडें आमचे तीर्थरुप यांचे वेळचा कर्जाऊ ऐवज व नेमणुक व हुजुरचा दरक व असाम्या दरकी दिल्ह्या त्या समंध्वे वगैरे येणे ती

[1] १...
....
....

१ श्रीमंत राजश्री **बाबासाहेब पतप्रधान** याणी. सचिवाचे दौलती संमध्ये आमची आदाणतीनें घरची चीज बस्त सुा जप्ती करुन वडिलास* आटकेंत ठेविले तेंव्हा मोकळीक होण्याबदल सन समान मयातेनांत चौकडा नजर देऊन मोकळीक केली त्या समध्ये बाा खर्च वगैरे मिळोन खर्च पडला तो बाा याद रु. ८५५५६।।।

लेखांक १०३

[कै. रा. रा. यशवंतराव लक्ष्मण गुण्ये यांचें ऐतिहासिक चरित्रविभागांतील चरित्र पहा. ही कैफीयत त्यांचे दत्तक पुत्र रामचंद्र यशवंत यांनीं लिहिली आहे.]

यशवंतराव लक्ष्मण गुण्ये, ग्वाल्हेर दरबार वकील पुणे.
यशवंतराव लक्ष्मण (८–८) मठ
श्री गजानन प्रा
मसुदा

कैफियत लिहिण्यांत येते कीं **श्रीमंत बाजीराव साहेब** मुा पुणे येथे महाराज अधिकारावर असोन **विंचूरकर** यांचे पागेत वडिल **येशवंतराव**

---

१. ही याद एकंदर ७ बंदांची आहे. त्यांत ६ व्या बंदावर मागच्या बाजूस वरील लेखांकांतील मजकूर आला आहे. कागद इ. स. १८५० च्या सुमाराचा आहे.

* राघो नारायण गुणे—(वं. नं. ५–२ शाखा कुर्णे-मठ) यांच्या कैदेचा उल्लेख भा. इ. सं. मं. त्रैमासिक व. ६ पान १३० वर आला आहे. त्याचें कारण वरील लेखांवरून समजतें. हे गुणे उत्तर पेशवाईंत पुण्यांत मोठे सावकार होते. ऐतिहासिक चरित्र विभागांत यांची माहिती दिलेली आहे. बाबासाहेब पंतप्रधान म्हणजे दुसरे बाजीराव पेशवे होत.

गुणे हवालदारीच्या दरोग्यांवर असोन शरीरसंपदा पाहून श्रीमंतानीं जवळ पाहाऱ्यावर बलाविले. नंतर कितीयेक दिवसांनीं बंड जाले ते वेलेस नौकरीवर पागा गेली तेथें जिंकून सरकारीं काम करुन पुन्हा महाराजांनी जवळ ठेउन हमेशा अर्दलि व भोजन पंगतीस राइत असे सिपाईगिराचे काम करत पाहून मर्जी प्रसन्न राहत असे. पुढें संवत १८७३ सन १८१७ कार्तिक शके १७३९ चे साली मोठे बंड होउन श्रीमंत फिरत फिरत ब्रह्मावर्त येथें आलें, त्याजबराबर पागा घेउन आले. विंचूरकर याचे नाव मात्र असोन त्याणी पागा मय असबाब सर्व वडिलास दिल्हा मुकत्यारी; ब्रम्हावर्त येथे **भुतेश्वर** जवळ श्रीमंतानीं पागेस छावणी दिल्ही हालि त्याची निशाणी मोठी झाडे निंबाची व पिंपळाची महजूद आहेत. पुढें तेथें सर्व फौजची व्यवस्था लाविणें बदल मालकानीं मनात आणून पत्रें राजे लोक दिल्ही असीं कीं, आज परियंत आम्ही सर्व फौजेचे पालण पोषण केले आतां तुम्ही आमचे असोन या लोकांचे जसे आम्ही करीत होते तसें यांचे ताबेदारीवर लक्ष देऊन पालणपोषण करावे या प्रो पत्र सिंदे **श्रीमंत दौलतराव महाराज** साहेब यास दिल्हे, ते पत्र घेऊन पागां घेउन वरकरती आले, येथें **गणपतराव विंचूरकर** हे पुणेचे विंचूरकर यांचे वकील असत, परंतु हेहि विंचूरकर त्याच याच नांवाने प्रख्यात होते, तेव्हां पत्र सरकारांत देउन लग्यांत हुकुम दिल्हा कीं, पागेस जागा देउन पागनिसींत पागा भरति करुन घेणें ज्या प्रो पागेचा सेरा असेल त्या प्रो देत जावा त्या प्रा जाले, जागा पांगेस जनक गंज **आपासाो कुंटे** यांचे पिछाडीस मिळाली ती हलि सर्वत्रास पागेची जागा माहीत आहे व राहणेस विचूरकर यांचे वाड्यात. पुढें कांहीं दिवसानीं शिपाईगिरी करतब पाहून मर्जी प्रसन्न होऊन **गुणे मुकामी** छावणी राहत असें तेथें अपसर **उदाजी खटके** साो होते तेथें जाणेचा हुकूम जाहला तेथून कांहीं दिवसांनीं **पावागड बराणपूर** येथें व **चंदेरी येथें** दंगा झाहाला सरकारांतून सांगणें जाले कीं गुणेची पागा तेथे पाा तेथील बंदोबस्त करावा नंतर तेथील महाल सर करुन आले साहेब लोकांनीं काम पाहून खुषी होऊन येक १ रफल व भाला १ तलवार १ देउन बाहादुरी देवुन सरका-

रांत हुकूम पाठविला, सरकारांतहि ही माणसें समयांत उपयोगीबहुत पहतील लक्ष ठेवावें, पावागड व वराणपुरास कांहीं दिवस राहिले बाद पुन्हा गुण्यास सरनोबत सो याणी बलाउन घेतले नंतर दौलतराव सो यांचा देव लोक जाला, सबब दक्षणेतून जानकोजी माहाराज आणणेची योजना जाली ते वेळेस येथून कोणी पो याची सला ठरत होती. तितक्यात मातुश्री बाळजाबाई सो. यास स्मरण पूर्विंचे होऊन सांगितले कीं येशवंतराव गुणे यास पागा घेउन बलवा जमासिरस्त्यानें पाठविणें कारण ते बाम्हण असोन प्रसंगी कामास आले, ते मुलास सांभाळु आणतील काळजी राहणार नाहीं त्यांा जाउन जानको माहाराज यास घेऊन आले मार्गी त्यांची मर्जी संपादन केली त्या योगं त्यास असे वाटलं कीं हमेशा गुणे जवळ असावे, असें मनांत येउन येथें आलेवर गादी स्थापन जाल्यावर सांा १८८४ सन १८२८ मातुश्रीस महाराजानीं सांगितलें गुणे पागःसुः मजजवल असोन म्हणजे मजला बंदूक भाला कसरत वगैरे तालीम करणेस बरे पडेल हे समजोन बालजाबाई सो यांणीं विचार करुन येकदोन रोजांनीं वडिलाची परीक्षा घेतली, ती कशी कीं फंदफितुर व कुबुद्धि व चालचलण वगैरे सर्व पाहून जवळ पाहऱ्यावर राहून कम जास्ती कांहीं न होतां राहण्याचा हुकुम दिल्हा. मग पागा पुढें बाईसो येथून निघून आग्रा येथें गेली तेव्हां माहाराजानीं खात्रीचा असामी समजोन पागा सुा पोंचविण्यास दिल्हे मार्गी बाई सो याणी तलास केली कीं आपल्या बरोबर फौज कोणकोणती आली आहे चौकसी करिता गुणे पागा सुा आहेत. नंतर वडिलास जवळ बलाऊन खात्री केली, तुम्ही मनांत कांहीं वेमनस्व आणु नये काळ वर्तमान आहे तो समजावे. पुढें मी आल्यावर योग असल्यास पाहतां येईल, आतां तुम्ही परत जावे या प्रो बाई सो यास पोचउन माघारें येउन पूर्वि प्रा सरकार जवल राहिले जनकोजी माहाराजानीं चार घोडे करुन दिल्हे पत्र सुभेदार सा उदाजी खटके इ. स. १८३३ सा १८८९, पुढे आमचे मातुश्रीस देवाज्ञा जाली नंतर वडील लग्न करीत न नवते परंतु सरकारचा बहुतआग्रह जाहाला. खर्चास बारासे रुो दिल्हे नंतर झाशीस लग्न केलें. बराबर सरकारनी हती पागा लिवा-

जमा दिल्हा सरदारीचा, त्याजवरुन सामोरे होणेकरितां राजे सा। झासिवाले आले व लग्नांतहि पानसुपारीस आले मेजवान्या परसपरें. पोषाख वगैरे देऊन नंतर वडील लस्करांत येउन तिकडील हकिकत यजमान सा। यास विदित केली नंतर मर्जी प्रसन्न होऊन येकंदर खर्च माहाराजांनीं दिल्हा दुकानांतून (पिछाडी Bank) मध्यंतरी पागेपैकीं चार स्वारांचा तनखा निराळा करून दिल्हा. पुढें जनकोजी महाराज देव लोक जाले. जयाजी महाराज गादीवर बसले. परंतु नोकरी पूर्वि प्रा। होत होती. पुढें श्रीमंत ताराबाई साजपापुरास गेले नंतर पिछाडीस पुराणें मंडळी बिलकूल न राहिली सर्व लोक बराबर गेले मामा सा। जाधव कारभारी होते. तेव्हा पिछाडी खाली समजोन जयाजी यांची मर्जी प्रसन्न पाहून विश्वासू जनानखान्यांत वागणारें योग्य असे समजोन मामा सा। जाधव याणीं सरकारास विच्यारिले कीं आतां पिछाडीस कोणी मनुष्य पाहिजे. मातुश्री लक्ष्मीबाई सा। अज्ञात आहेत. मग सरकारनीं सांगितले, गुणे माजे खातरीचे आहेत यास घेउन जांउन पिा। सर्व माहिती व जामदारखाना कुजा (किल्या) वगैरे कुलमुख्यारि (Powers) सोपून देणें. दुसरें यांची मला खातरी नाहीं हें समजोन मामा सा। याणी सुपुर्द केलें नंतर वडिलांना अर्ज केला कीं, हुजुरानीं आजपासून सुपुर्द मी जाहल्याची हजरी घेणेची परवानगी व्हावी त्याजवरुन हुकूम जाहाला कीं, ठीक आहे हजरी घ्यावी. त्या प्रा। घेतली गेली. पुढें लक्ष्मीबाई सा। देवलोक जाले नंतर चिमणा राजा याची हि सेवा पूर्वि प्रा। चालू होत. श्रीमंत बायजाबाई यांचे पुत्र भाऊ वैशंपायन याज बराबर आले व जबानी, गुणे हे खातरीचे असून वागणूक बहुत उत्तम तर आतां चिमणाराजा ही आपली कन्या समजोन कोणती गोष्ट उमयेतां विरुद्ध न येतां येकोप्याने ठेविल्यानें मला बहुत आनंद होत जाईल या प्रा। लेख होता. मर्जी प्रसन्न राहिल्यानें हुजरात जरीपटका सुभाती पागा विठ्ठल मंदिर, गांव चारपांच वहिवाटीस दिल्हे पुढें सा। १९१४ साली गदर जाहाला तेव्हा स्वारीबरोबर जामदारखानाचे दागिन्याच्या पेट्या व पडश्या कंठाली घोडे व उंटावरुन घालून मातुश्री चिमणा राज्याच्या स्वारीमार्गे. मागे

नरवरास पोंचलें. पुढें लस्कर जालेवर जामदारखाना बरोबर दुसरें दिवशीं मागून येऊन पिछाडीस हजरी करुन दिल्ही कांहीं तसनस न होता. व सरकारास सांगून दिल्हे आणि अर्ज केला कीं, आतां माझे दिवस आयुष्याचें थोडे आहेत व मी हि श्रीमंत बाजीराव साहेब व आपली सेवा बहुत केलीं आतां गंगा सेवन करीन तेव्हा आज्ञा जाहली कीं तुमचा बंदोबस्त नीट तरेनें करणे आहे. जलदी करु नये गजरांत मंडळी कामास आल्याचे योगानें, वस्त्रे व आलंकार व दरमहा सर्वत्राबरोबर मिळोन तुमचे चिरंजीवास रुोचे दरमाहा ४० मिळत जातील. नोकरी चाकरी माफ केली मर्जी येईल ते वेळेस येत जावे. सा १९१६ आमचे कुटुंब निवरतले. नंतर मातुश्री सोबानी लग्नाबा खर्च नगदी कापड वगैरे देउन केलं गेलं. सरकारांत अर्ज कधि कधि करीत असत, कीं चिरंजीवाचे नावे दरमहा करुन गंगेस पांा वडिलाची अति निष्टा पाहून परवानगी दिल्ही गंगावासा बाा दर माहा रुपये २५ तुमचे असामी बाा चिरंजीवाचे नांव; दर्ज दरमाहा रुो ११५ मिळत जातील खर्चांस येक हजार देऊन वस्त्रे दिल्ही. तेथें राहिलेवर आणखी तजवीज करुन देउं व मी हि तेथें येणेचा विचार करुन आहे. या प्राा हकिकत होउन जाते वेळेस शाल जोडी पागोटे, लुगडे, रेशमी धोतर व नगदी मातुश्रीबाईसो याणी तीनसे रुपये देउन ब्रम्हावर्तास पोचविणेस घोडी रथे जासूद देउन रवानगी केली. सा १९२२ सालीं नंतर सरकार सो यांच्या भेटी, वरषांतून येक वेल होत असें, तेथें काहीं कारण परत्वे कमजास्ती रुपये लागला सबब अर्ज कारितां आणखी हजार रुपये दिल्हा. नंतर पुढें तेथील सेरवाटणी आफीसर **गणेश सदाशिव साठे** कामदार होते ते मरण पावलें चिरंजीव सिलक, सरकारी अफरा तफरा जाले; जे फरार जाले ठिकाण नांहीं समजोन तजवीज वहिवाट सेरापी सरकारनीं समक्ष सुपुर्द केली. जबानी सांगितलें कीं, कमजास्ती वाटणी कशी आहे तिचा हाल कलवावा. जिमेदारी तुमची, बाद मर्जी प्रो हुकूम देउ फिकीर न करावीं नंतर सर्व हाल पत्री कलाउन अर्ज लिाा मी गंगावासास आलो तरी येथील तो फीर न राहतां पुरेभरती होणेची परवानगी द्यावी, नंतर हुकुम आलां कीं तुमची मनिषा प्राा भरती करुन रपोट

द्यावा मंजुरी होत जाईल. व दरमाहा रुाये ५० कारकुनीं बाा १० येकूण ६० कलदार आतां तुम्हास मिळत जातील पुढें कामदार दुसरे केशवराव-भाऊ जाले परंतु दरमाहा रुाो ५० मिळत गेले पंचवीस परवार्षित असे ७५ मिळत होते ते संाा १९२७ सालीं श्रावण वद्य ८ देवलोक जाले पुढें दोन वरषानें कांहीं अपवादे करुन ग्रहदशेनें चिटा आमचा बंद जाला नंतर मातुश्री चिमणाराजा साो यांची सेवा पूर्वीपासून करणेचे योगे त्यांणीं चिठा बंद झाला असें समजाविले नाहीं दरमहा रुाो २० हातखर्च कोठीतून सरंजाम व जामदारखान्यातून कापड वाटणीच्या रुाो पैाा रुाो मिळत गेले स्वारींत घोडी, रथ, हत्ती, भोजन मुहत्रकांत या प्राो कांहीं दिवस चालले पुढें आसामी सिलेदारींत; या आसामीवर ३६०० नजराणा होता तो आम्हास माफ करुन, सरकारनीं करुन दिल्ही परवर्षीत+++प्राो व रुाो १० कारखान्यांत अहेलकार लोकांचे पटांत आहेत. नोकरी चाकरी पिछाडीस संाा १९०४ सालापासून सुरु हलि परयंत करीत आहे. लक्ष्मीबाई साो चिमणाराज्या साा मधली बाई साो व हलि राणी माहाराणा साो सुरु आहे. या प्राा हकिकत आहे.

लेखांक १०४

पेशवे दप्तर

नगर जमाव रु. नं. १०७३ इ. स. १७६६

श. १६८८

जमीन झाडा मौजे प्रतापपूर व सुक्तपूर ताा हवेली पाा संगमनेर सन ११६७ चावर २० मो बिघे२४००

....

पैकीं जमीन कुरण खंडेराऊ बर्गे *पागा मौजे असीर्वा खुर्द चावर ३ मो.

३६० बिघे

---

* पागा आश्वीकडे ३६० बिघे जमीन प्रतापपूर सुकतपूरपैकीं होती असें दिसतें.

लेखांक १०५

[या लेखांकावरून सरदार रामचंद्र गणेश कानड्यांच्या हुजुर पागेचा एकंदर खर्च ९४००० रु. होता असें दिसतें. पागा फडणीस बच्याजी महादेव गुणे (५–१) चांफेट हे आश्वी शाखेचे मूळ पुरुष होत. ले. १४ व ले. ९१ पहा.]

श्री

पे. द. घढणी इ. स. १७६८।६९

रु. न. ४९५

पट **रामचंद्र गणेश** व पुत्र **माधवराव रामचंद्र** याजकडे जातीस व फौजेचे बेगमीस सुा तिसा सितैन मया व अलफ खासा रामचंद्र गणेश याजकडे सालीना तैनात

सन आर्बा सितैनात (इ. स. १७६३)———————रुा

१५०००

(तपशील)

माधवराव रामचंद्र यांचे नांवे पागेस व सिलेदार निसबतीचे यांचे बेगमीस देखील चरिदा व लागवड वगैरे बारमाही नेमणूक मख्ता सन आर्बा सितैनापासून बाा सनद छ———————रुा

८०००० पागा व सिलेदार येकूण स्वार २०० दोनशे; ४० चांगलें स्वार हजार रुपयाचे तैनातेचे दाखली याचे १६० मध्यम व कनिष्ठ गणतीचे

२००

— सरासरी शेऱ्या रुा ४०० प्रमाणे

५०००० पागा सरकारची घोडी वगैरे—

१०० बारगीर

३५ तटें

१५ उंटे बैल वगैरे

५० पसा व सिंगरे

२००

पो नेमिले स्वार १०० यो दर स्वारास रुपये
५०० प्रो
३०००० सिलेदार स्वार १०० दर राउतीं रुपये ३००
तीनसे प्रो

८००००

२००

५१८५ कारकून आसामी येकूण तैनात सालीनां रुो
१८७५ बाबूराव यादव (कानडे ?) दिवाण
१५०० जातीस
१२५ दिवट्या आताागिऱ्या तेल सुधा
५० पोर्गा
२०० कापड आख ५०० दर २।।

१८७५

११०० बच्याजी महादेव (गुणे) फडणीस
८०० जातीस
१३० दिवट्या व आताागिऱ्या तेल सुधा
५० पोर्गा
१२० कापड आख ३०० दर २।।

११००

३२५ रामचंद्र नारायण मजमदार
२५० खुद
५० आताागिऱ्या
२५ कापड आख ६०

३२५

२२५ अंताजी बावजी पोतनीस देखील कापड
१६६० कीता कारकून
३४० हरी नारायण (सोमण ?) ठाणे
पातोडे
....

३४० गणेश गोविंद (कानडे) ठाणे
.... आसी
३९० हरि बलाल
....
२५० महादाजी शंकर (रानडे)
____
१६६०
____
५१८५

....

____
९३८००

येकूण त्र्याणव हजार आठसे यासी सरंजाम लाऊन दिल्हा——रुो

............(तपशील)........

८०० गांव ताा हवेली पाो संगमनेर *पोतनखा.

लेखांक १०६

[कालें-शाखेपैकीं रामाजी बलाल गुणे (१३–४) चांफेट, व त्यांचे बंधु कृष्णराव व धोंडोपंत यांच्या तनख्याची माहिती या लेखांत आली आहे. तसेच त्यांचे पुत्र सदाशिवपंत यांचीहि माहिती आलेली आहे.]

श्री

पे. द. घडणी रु. नं. ४९६ इ. स. १७६९।७०
शा. १६९२

---

* तर्फ हवेली पाो संगमनेर पाो चारहि गांवांचा उल्लेख यापूर्वींच्या लेखांकांतून आला आहे. त्यावरून पिंपरी, लोकी, अजमपूर व ओझर बुाा हीं गांवें इ. सन १७६३ पासून रामचंद्र गणेश कानड्यांच्याकडे हुजूरच्या पागेकरितां होतीं असें दिसतें. इ. स. १८०९ मध्यें तीं गांवें सरदार पांडुरंग रामचंद्र ढमढेऱ्यांच्याकडे गेलीं (ले. ११५ पहा) व पुढें फसली १२२८ त पेशवाई नष्ट झाल्यावर खालसा मुलखांत जमा झालीं.

यादी रामाजी बलाल गुणे सुरु सबैन मया व अलफ बेरीज——रुो
४६४०८= खुद रामाजी बलाल याजकडे गांव वगैरे——————रुो

२९३९॥= गांव प्रा कऱ्हाड पो सन खमस सितेनात बदल मुशाहिरा दिल्हे गांवाचा आकार बेहडा सन सीत——रुो

............(तपशील).........

१६९५।० आपाजी पायगुडे यांचे पागेची दिवाणगिरी चाकरीवर कृष्णराव बलाल भाऊ गेले आहेत——रुो

१६७५ नक्त————

५५० खासा
१००० पालखी
१२५ दिवट्या आतागिऱ्या
——
१६७५

२०।० कापड आख ५१ पो जमा नक्त
——
१६९५।०

२७७५ सदासिव राम मारनिलेचे पुत्र यांस तैनात पेशजी लक्ष्मण बलाल याची होती ते सन आर्बा सीतैनांत करार केली वगैरे————————रुो

२६५० तैनात————रुो

२४०० नक्त सालीना

१२०० खुद
१२०० पालखीचे
——
२४००

२५० कापड आख ५०० पो निमे नक्त.
——
२६५०

१२५ मौजे नांदगाव पो सिराळे पो जमीन.....

सदरहू जमीन गोपाळजी भोसले याजकडून लक्ष्मण बलाल याजकडे पेशजी होती ते मारनिलेनीं सरकारांतून तैनातीसिवाय करार करुन घेतली आहे जमीन दुतर्फा चालत आहे.

२७७५

३२७२ धोंडो बलाल मुतालिक निा मंत्री —— खो
२००० आसामीचे वेतन
१७७२ गांव जमीन

....

३२७२

१०६८७८=

कीता —— कलमें

रामाजी बलाल याची,
दस्तके सालाबादी छ २६
राखर सन तिसा.
१ प्रा बैलसर ४० चालीस
खो फिरंगाण कोंकणांतून
तांदूळ खेपा दोन काल्यांस
आणतील त्याविसी जकातीचा
आकार होईल तो बा मुा
धरावा या प्रा करार असे.
१ प्रा दस्तक बैलसर ४० चालीस
राजापूर व परदेश येथून सुपारी
व खोबरे वगैरे किराणा जिनस
खो करून खेपा दोन काल्यांस

सदासिवराम येका वर्षाआड
पोवते.
जामदारखाना पालखीचे
सा पो आख.........
*.........

* हा लेखांक अपूर्ण आहे. आवश्यक तेवढाच भाग घेतला आहे.

आणतील त्याविशी

२

लेखांक १०७

[आश्वीशाखेपैकीं बच्याजी महादेव (५–१) चांफेट यांना १७७३ त पालखीचा मान होता असें दिसतें. एकंदर तनखा १७६६ रु. दिला आहे.]

श्री

पे. द. पुणे जमाव कानडे
रु. नं. १६८४

इ. स. १७७३.
श. १६९५

झडती माहाल पागा हुजूर स्वारी राजश्री पंतप्रधान निा माधवराव रामचंद्र सुरु आर्बा सबैन मया व अलफ बाा छ. ८ रजब ताा छ. २३ रोावल

अखेर साल जमा————————————बेरीज

*..

बाकी साल गुाा——————————

....

तपसील

२८५८०॥।॰ बाा हिशेब

——————शो

....

९०१७८=॥। निसबतवार

....

४० बच्याजी महादेव फडणीस* पागा माार

* यावरून माधवराव रामचंद्र कानड्यांची पागा निसबत हुजूर असून तीवर आश्वी शाखेपैकीं बच्याजी महादेव गुणे (५–१) चांफेट, फडणीस होते असें दिसतें. आवश्यक तेवढाच मजकूर घेतला आहे.

....

१७६६ बच्याजी महादेव फडणीस तैनात

————————रुो

११०० खासा व आफतागिऱ्या व दिवट्या वगैरे

६६६ पालखीची तैनात

————————रुो

१०००

पाो आठमाही

————

१७६६

यासी आदा सदरहू प्राो

————

लेखांक १०८

[या लेखावरून इ. स. १७७३ त मौजे पिंपरी, लोकी अजमपूर हीं तिन्हीं गांवें माधवराव रामचंद्र कानड्यांच्याकडे होतीं असें दिसतें.]

श्री

पे. द. नगर जमाव इ. स. १७७३

रु. नं. १०७४ श. १६९५

याद मौजे पिंपरी लोकी अजमपूर सुरु आर्बा सबैन मया व अलफ ३९३॥ माजी कामदार याणी जमाबंदी करून येवज घेतला

जमा————————————————रुो

३०५ ऐन जमाबंदी

४८॥ गांवखर्च

२५ जप्तीमुळे सरकार बाबती वगैरे

३७८॥ तीनशे साडे आठ्याहातर करार करावे

पैकी————————————————

३०५ माधवराव रामचंद्र याजकडे बसूल बाा रसीदा मारनिले

————

लेखांक १०९

[आश्वी शाखेपैकीं बच्याजी महादेव (५–१) व महादेव बलाल यांच्याबद्दलची माहिती या लेखांकांत आली आहे.]

श्री

पे. द. पुणे जमाव, कानडे — इ. स. १७८०

रु. नं. १६४२ — श. १७०२

बच्याजी महादेव (५–१) चांफेट

महादजी बलाल (५–६) चांफेट

झडती खासगत राजश्री रामचंद्र गणेश सुरु आर्बा रुजु, इहिदे समानीन मया व अलफ शके १७०२ शार्वरी नाम संवछरे बा। अवलसाल ता। अखेर साल जमा रुो

....

जमा साल मजकूर ———— रुो

(पान ४) महाल गांव प्रां। खानदेश बा। हिशेब वि॥ [1]महादाजी बलाल कमाविसदार ———— रुो

परगणे मेहुणबारे देह १३ येकूण ———— रुो

....

---

१ या लेखांकाच्या प्रारंभीं दिलेल्या रु. नं. १६४२ मध्यें श. १७०२ शिवाय आणखी श. १७०४–५–६ अशा तीन वर्षांच्या सदरील 'झडती'सारख्या झडत्या आहेत व त्यांतहि प्रांत खानदेश पा। मेहुणबारेची कमाविसदारी महादाजी बलाल यांचेकडे असल्याचे उल्लेख आहेत. त्यावरून श. १७०२ ते श. १७०६ पर्यंत पांच वर्षे ते त्या जागेवर होते असें दिसते. रु. नं. १६४३ मध्यें श. १७०७ मध्येंहि ते त्याच जागेवर असल्याचा उल्लेख आहे. याप्रमाणें येकूण ६ वर्षे सतत त्या जागेवर होते असें दिसतें. श. १७०७ त देहानगी खर्चाच्या यादींत त्यांच्या घरीं एकूण २४॥।=॥ रुपयांचा आहेर झाल्याचा उल्लेख आहे. त्यांत ६।=॥ रु. लुगडें, ६ रु. तिवट, १२ शेला ·॥· खण असा जिनसांचा उल्लेख आहे. आश्वी शाखेपैकीं (५-६) चांफेट म्हणजे हे गुणे होत.

कारकून आसामी ——————— याो रुाो

कीता ——— रुाो

१५५४||~। बच्याजी महादेव फडणीस
साहीना तैनात १६७५ पाो रुाो
१३२०|||= गाव दरोबस्त बाा
नेमणूक तैनात जाबत्या
प्रमाणे देहे ५

२०१|||= + + + + +[1]
प्रांा खानदेश
१११९ ताा हवेली संगमनेर[2]
पाो देहें ४ याो

१३२०|||=

२३३||≥। मुकाम सासवड पुणे येाा रुाो
......[3]तपशील......

लेखांक ११०

[या लेखांकावरून आश्वी शाखेपैकीं मोरो महादेव गुणे (५–४) चांफेट, यांच्या घरीं लग्न झालें असावें. जानकीबाई या बच्याजी महादेव (५–१) चांफेट यांच्या भार्या होत.]

१ प्रांत खानदेश पाो सांप्रत आश्वी शाखेच्या गुण्यांकडे चालू असलेलें वाघडू गांव होय. याचा पूर्वीच्या खासगत दप्तरांताल लेखांकांतहि उल्लेख आला आहे.

२ तर्फ हवेली संगमनेरपैकीं पिंपरी, लोकी, अजमपूर व ओझर बुाा हीं गांवें होत. पूर्वीच्या ले.तून त्यांचा उल्लेख आला आहे.

३ यांत २३३||≥। रुपयांचा बारीकसारीक खर्चाचा तपशील आहे; त्यांत कोणते दिवशीं किती रुपये घेतले तें दिलें असून 'छ ३० जिल्हेज' रोजीं '०||=|| आंगरख्याचे आस्तरास रावेरी ' असा उल्लेख आहे.

पे. द. जमाव, पुणें (कानडे) इ. स. १७८८
रु. नं. १६४३ श. १७१०

झडती खासगत······राजश्री **माधवराव रामचंद्र** मुा पुणे सुरु सन तिसा समानीन मया व अलफ शके १७१० कीलक नाम संवछरे

······················

आहेर खर्च————————————————————रुो

तपसील

मुा पुणे व सासवड रुो

३६४।।।=।।· आहेराबद्दल सनगे सुमार ७२

············

४०।।≡ **मारो महादेव** यांचे घरीं लग्न झालें सबब सनगे सुमार ४

५।।। लुगडे सुमार १

·।≡ खण १

९ तिवट आख ६०० दर दीड

२५।।· शेला सुमार १

४

४०।।≡

७।। **जानकीबाई गुणी** यांस गर्डंगणेर केला सा लुगडे सुमार १

रुो

लेखांक १११

डेक्कन कॉलेज, पुणें
पारसनीस दप्तर. रु. नं. ५४ पत्र नं. १६६

आषाढ शु॥ ५, श. १७१२
ता. १६ जुलै १७९०

श्री

*सेवेसी विज्ञापना ता। छ ३ जिलकाद पर्यंत वर्तमान यथास्थित असो विशेष स्वामीनी छ ३० सवालची पत्रें पाठविलीं ती पावली. **सदाशिवपंत गुणे वारले स्त्री समागमे गेली** येविसीं पूर्वीं दोन पत्रें डाके बराबर रवाना केलीं तीं पुण्यास गेली असतील. तुम्हास पावली असतील तर तुम्ही कांहीं तरी लिहिते. ते असो. **सदाशिवपंत चांगला होता. रीत चांगली प्रामाणीक माहीत.** ईश्वरी इच्छेस उपाय नाहीं. त्यांचे घरी कागद जासुदाजवळ होते तें घेऊन जा म्हणून सांगितले म्हणोन आज्ञा, त्यास **म्हल्हारजी वोरपे** याचे पत्र स्वामीस आले. ते पहावयास पाठविले ते पावले. पत्र पाहिलें मजकूर कलला. त्यास सदाशिवपंताचे वर्तमान येथें आले ते स्वामीस लिहिलेंश आहे. ईश्वराचे इच्छेस इलाज कोणाचा रा छ मजकूर हे विज्ञापना

लेखांक ११२

डेक्कन कॉलेज पुणें
पत्र नं. २ रु. नं. ५४

श्री

ता. १३ जुलै १७९०
आषाढ शु॥ १ श. १७१२

पौ छ ३ जिलकाद इहिदे तिसेन.
आषाढ शु॥ ५ श. १७१२
१६ जुलै १७९०

सेवेसी विज्ञापना **सदाशिवपंत गुणे नागपुरास** रवाना जाले ते **वाडेगवाण** नागपुरापासून आलीकडें पांच मजली गेले दोन दिवस मार्गी

---

* हें पत्र हरिपंत फडक्यांनीं नाना फडणविसास पाठविलें आहे. त्यावरून सदाशिव राम गुणे (१३-७) चांफेट, यांच्या स्वभावाची माहिती उत्तम प्रकारें मिळते आहे. त्यांनीं पेशव्यांच्या वतीनें सन १७७९ ते १७९० पर्यंत सुमारें ११ वर्षे भोसल्यांच्या दरबारीं वकिली केली.

पोटांत शुल जाहाला. अधीक वदी नवमी सोमवारी देवाज्ञा जाली. स्त्री समागमें होती तिणें सहगमन केले या प्रा॥ पत्र त्यांचे पुतणे पुण्यांत आहेत त्यास आले. ईश्वरी इच्छेपुढें कोणाचा इलाज नाहीं. स्वामीचे पदरचे चांगले माणूस गेले. योजना काय जाले काय, तस्मात् ईश्वरी इच्छा जें होणार ते चुकत नाहीं. समागमे त्यांचा भाचा आहे. त्याचे पत्र आले. सरकारचा सरंजाम त्याजसमागमे हती वगैरे आहे, त्यास नागपुरास घेऊन जाणे म्हणून लिहावे किंवा तेथेच राहाणें म्हणून ल्याह'वें ये विसीची आज्ञा यावी. पांच मजली नागपूर मधीच कशास राहावे. सरकारचा सरंजाम पाठविला आहे तो नागपुरांस घेऊन जावे तेथें राहावे. स्वामीची स्वारी पुण्यास आल्यावर कोण पाठवावयाचा त्याची योजना जाल्यावर जाईल. तो पत्रें व सरंजाम भोसल्यास प्रविष्ट करील जसी आज्ञा येईल तसें लिहून पाठऊं रा. छ. २९ सवाल (१३ जुलै इ. स. १७९०) मंगलवार आवसीची प्रहर रात्र हे विज्ञापना.*

लेखांक ११३

[या लेखावरून दुसऱ्या बाजीरावाचा इ. स. १८०९ त आश्वी खुर्द येथें दोनदा मुक्काम झालासें दिसतें. आश्वी शाखेपैकीं जनार्दन बच्याजी गुणे (५-५) चांफेट, यांचेकडे आश्वीखुर्द येथें तेव्हां १० बिघे जमीन वहिवाटीस होती असें दिसतें. बाबाजीपंत गुणे म्हणजे तेच असावेत.]

पेशवे दप्तर पुणें.

श्री

नगर जमाव रु. नं. १०४१ इ. स. १८०९

श. १७३१

यादी वहिवाटकाची मौजे **आसीखुर्द** ता॥ हवेली प्रा॥ संगमनेर सुरु सन अशेर मयातेन व अलफ अजलागवड बिघे.

---

* हें पत्र हरिपंत फडक्यांचें नानांना आहे. सदाशिव राम गुणे (१३-७) चांफेट यांच्या मृत्यूची तारीख या पत्रावरून समजते. ती—अधिक आषाढ व॥ ९ श. १७१२, ५ जुलै इ. स. १७९०. ले. १११ पहा.

	बिघे	खरीप	रबी
ज्ञानाना गाईा	२५	१५	१०
वहीनाजी पाा	६१	२६	३५
रामा गाईा.	१७॥·	१०	७॥·
गोपाला गाईा	२०॥·	१७॥·	३
येमाजी वल्हेकर	४५	२६	१९
वलकोजी वल्हेकर	४५	३०	१५
सकोजी गाईा	३५	१५	२०
दिनानाथ भंडारी	३०	२२	८
खंडु सिदाम	१०	१०	०
पांडु कुवल	२०	२०	०
जनार्दन बच्याजी	१०	१०	०
नाना(?) सकु बांदल	५	५	५
	३२४	२०६॥·	११७॥·

यास आकार——————————रुो

१५४।।।= जमा——————————रुो

१५४।।।= खरीफ बिघा २०६॥ पाो. सरकारचा तळ-पडून हिरवाळ व तुरी दरोबस्त सरकारचे बईलाणी खाले साा दर. गा. प्राा. बिघे

० रबी दरोबस्त सरकारचे मुकामामुळे बैलानी खालली सूट.

१५४।।।=

——————————रुो

९३ सरकार पोत बिाा बापु गोडबोले कादार

४० पोष्य मास गुाा रामसेट

३५ माघमास ,,

१८ फाल्गुनमास ,,

९३

३७॥· गांवखर्च

१० देशमूख देशपांडे यास द्यावयाचे
३ सरकार नि॥
२ भेट दसरा
१ पहार्णा भट

धर्मादाय

१ गावजोसी
३ सीतारामबाबा ताहाराबादकर
१ राहुरीकर भटजी
१ हरबा यास

६

२ भिलास सालाबाद प्रमाणे
१ दुखोटा सटवा रामोसी
२ आहेर बाबाजी गुणे
२ श्री मारुतीकडे तेलास
२ चावडीचा गासाई त्यास खादी
१ ++++++ त्या महादसेट
१ काजीस दिल्हे सालाबाद प्रा
२ हुताशणी खर्च
२॥· गासाई ++
३ ताबूत

३७॥·

२४॥।~॥· सरकारचा मुकाम दोन वेळा जातां येताना

सबब

६॥।·।· दुसरे वेली
·॥· काबू ३
८≡ आडी

१८८~।· पहिल्यानें
८= आडी
·॥· काबू तीन

·।· दही
१ भट
४ ताकीदार आा ५

६॥।·।·

·।= लोणी
८~।· बोर
८= जांब
८= दही
१ भट
५ ताकीदार आा ५
·॥·।· सीदा सरंजाम रुो
१० खसतीस + ई
... ण्यास आले
सबब दिल्हे

१८८~।·

२४॥।~॥·

१५४॥।~॥·

खर्च रुो

८।·

तारीख छ ११ जमोवल सुरु समान अशर

लेखांक ११४

[आश्वी शाखेपैकीं जनार्दन बच्याजी गुणे यांच्याकडे मौजे पिंपरी वगैरे गांवांची कमाविस होती असें दिसतें. जनार्दनपंत (५–५) चांफेट.]

श्री

इ. स. १८०९
श. १७३१

पे. द. नगर जमाव
रु. नं. १०७४

हिशेब झडतीकाचा आकार मौजे पिंपरी लोकी अजमपूर प्रा संगमनेर सुा अशर मयातेन व अलफ शके १७३१ शुक्लनाम संवत्सरे सन १२१९ बाा अवलसाल ताा अखेरसाल

....

‿——————————————————————को

१६०८= पोते सरकार राजश्री जनार्दन बच्याजी विा बालाजी नारायण ठाणे मौजे आसी खुर्द

लेखांक ११५

[जनार्दन बच्याजी गुणे (५–५) चांफेट ले. १०६ पहा.]

पे. द. नगर जमाव
रु. नं. १०७४

श्री

इ. स. १८११
श. १७३३

हिसेब झडतीकाचा आकार मौजे पिंपरी लोकी अजमपूर ताा हवेली पाा संगमनेर सुरु इसन्ने अशर मयातेन व अलफ सन १२२१ शके १७३३ प्रभावती नाम संवत्सरे जांगीर श्रीमंत राजश्री पांडुरंग रामचंद्र ढमढेरे* विा राजश्री गणेश भगवंत कमाविसदार ब्राा अवलसाल ताा अखेर साल

....

‿——————————————————————को

४२० पोते भरणा निाा सरकार विाा राजश्री जनार्दन बच्याजी ठाणे मौजे आसी खुर्द

---

* सुरुसन अशर मयातेन व अलफ २७ रबिलाखर रोजीं म्हणजे श. १७३१ त म्हणजे इ. स. १८०९ मध्यें दुसऱ्या बाजीरावानें सरदार रामचंद्र माधवराव कानडयांचा सुमारें पाऊण लाखाचा सरंजाम जप्त केला व सरदार पांडुरंग रामचंद्र ढमढेऱ्यांच्याकडे तो लावून दिला, त्यामुळें गुण्ये व कानडे यांचा संबंध संपून आतां सरदार ढमढेऱ्यांच्याबरोबर नवीन संबंध सुरू झाला. या अदलाबदलींत ताा हवेली पाा संगमनेर पाो ओझर बुाा गुण्यांकडून गेलें काय न कळे, मात्र पाा चाळिसगांव पाो ओझर व वाघड्ढ चालूच असावे. यासंबंधीं त्या गांवच्या जमावदप्तरांत विशेष माहिती मिळाली नाहीं. ओझर व वाघड्ढ चालू असण्याचें कारण असें वाटतें कीं सांप्रतहि तेथील पाटिलकी आश्वी शाखेच्या गुण्यांकडे चालू आहे. सन १२२४ फसलींचीहि अशीच 'झडती' उपलब्ध असून तींत ४५७ रु. चा पोतेभरणा रा जनार्दनपंत गुणे (५-५) चांफेट, यांच्या नांवावर आहे.

लेखांक ११६

[या लेखावरून जनार्दनपंत (५-५) चांफेट, यांना बाबाजीपंत गुणे म्हणत, असें दिसतें.]

श्री

इ. स. १८११

पे. द. नगर जमाव

रु. नं. १०७३

गाव झाडा मौजे प्रतापपूर व सुगतापूर ता हवेली .... सुरु सन १२२१

....

—————————— रो

३४। निा सरकार पोते भरणार विद्यमान राजश्री गोविंद रावजी काादार गुाा जनार्दन बच्याजी गुणे

श्री

पे. द. नगर जमाव

रु. नं. १०७३

तहसील मौजे प्रतापपूर व सुगतपूर ताा हवेली पाा संगमनेर सुरु इसके अशर मयातेन व अलफ सन १२२१ शके १७३३ छ १८ माहे रोवल उर्फ चैत्र मास

....

—————————— रो

१५ पोते भरणार निाा सरकार विाा बाबाजी गुणे ठाणे मौंजे आसी खुर्द ताा भगा वानी गुाा सटवाजी पाा अंधळे छ २८ रोज

लेखांक ११७

श्री

इ. स. १८१७

पे. द. नगर जमाव

रु. नं. १०७४

हिसेब गाव झाडा मौजे पिंपरी लोकी अजमपूर देह तीन ता हवेली प्रा संगमनेर सुरु समान अशर मयातेन व अलफ सन १२२७

रकबा चावर
३०
....

बिघे
३६००

११७५ कुरण व सेऱ्या ठाणे आश्वी खुर्द याजकडे आजमासे बिघे

लेखांक ११८

[या लेखांकावरून प्रतापपूरची कमाविस आश्वी शाखेपैकीं जनार्दन बच्याजी गुण्यांकडे (५-५) चांफेट, होती असें दिसतें.]

श्री

पे. द. नगर जमाव
रु. नं. १०७३

इ. स. १८१७
श. १७३९

तहसील मौजे प्रतापपूर सुक्तापूर ता हवेली पांो संगमनेर सुरु समाण अशर. सन १२२७ साल गुा माहे. आशाढ शुा १०

१२ सटवाजी पाा सीलक
१० खाा सीलक
२ गंगाजी पाा
१२
२० रावजी इलग
१० खाो. १० सालु
१२॥= घनश्याम म्हसका
२ महादुकली १०॥= रोख
२० भाऊ महादेव
४५ बाबाजी गुणे
१०९॥=

४ गंगाजी पाा
१६ दारकोजी; काकडा
६ १०
४। गरभाजी गाहकल
८ राघोजी गुंजाळ
१ हरी महाराकडे
१ सदनराम गुा
६ रोख
८
३२।

१४१।॥=

पो झाडा —— शो—

१२०। सरकार भरणा माहे रजब ता। आशाढ शु। ७

४५ मा। राजश्री बाबाजी गुणे पोत जुने

५५। मा। छदनसींग गौड

१३ कांकड	६ राघु गुंजाळ
४। गाइकवाड	९ रावजी
१३ रोख	१० घनश्याम
३०।	२५

५५।

२० भाऊ महादेव

१२०।

१५॥= मोकासी याजकडे भरणा

१३ रोख गु। पानसरा, २॥- किता रोख भाऊ महादेव

२ गाव खर्च——

१ तिगस्ताचे उचापती बा। सहजराम, १ छदनसींग पानसुपारी

१३७॥=

बाकी शो ४——

....

लेखांक ११९

[बाबाजीपंत गुणे म्हणजे आश्वी शाखेपैकीं जनार्दन बच्याजी गुणे होत. ले. ११६ पहा.]

श्री

पेशवा दप्तर पुणे इ. स. १८२१।२२

नगर जमाव रु. नं. १०७३

जमीन झाडा मौजे प्रतापपूर सुकतपूर ताा हवेली पाो संगमनेर सुर सन १२३२ फसली

....

....

चा जुमला येकूण रकबा पाा

१ निंबाजी बलद सटवाजी पाा गंगाजी व चिमणाजी विटाजी पाा आंधळे	४२०
२ बाबाजी गुणे	२५
....	....
६ कुरण गास निाा	३६॥।
७ सरकारखेती गिरजोजी वर्गे याजकडे वहिवाट	१६१

प्रथम खंड समाप्त.

[कऱ्हाडे ब्राह्मणांच्या इतिहासाचीं साधनें]

॥ श्रीलक्ष्मी–पल्लीनाथ प्रसन्न ॥

गुण्ये(णे) घराण्याचा इतिहास

द्वितीय खंड (कुलवृत्तान्त)

प्रकरण पहिलें

या कार्याचें प्रयोजन

" यास्तव एकंदर लोकांच्या उपयोगाचा मार्ग म्हटला म्हणजे इतिहास, देशांतरवर्णनें, प्रवासाच्या हकिकती वगैरेच होत. यांचा यथास्थित अभ्यास केला असतां कूपमंडूक किंवा उंबरांतील किडे यांसारखी सदोदित अवस्था असल्याच्या योगानें ज्या मूर्ख समजुती व जे दुराग्रह मनास स्वभावतःच जडून कालेंकरून त्यास अगदीं खिळून जातात ते दूर होतात. "

—निबंधमाला

" Of man's activity and attainment the chief results are aeriform, mystic and preserved in Tradition only."

—CARLYLE

या प्रकरणामध्यें प्रामुख्यानें दोन गोष्टींसंबंधीं विचार करावयाचा आहे. एक म्हणजे सर्वसामान्य इतिहासाच्या अभ्यासाचें महत्त्व व दुसरी म्हणजे कुलवृत्तान्तापासून त्या कुलास होणारे फायदे. पहिल्या गोष्टीचा विचार स्वतंत्र तऱ्हेनें न करितां कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं आपल्या ' इतिहास ' या निबंधांत या विषयासंबंधीं जे विचार व्यक्त केले आहेत, त्यांतील कांहीं महत्त्वाचा तेवढा भाग येथें देत आहें—

" इतिहासांत ज्यांस कांहींएक अर्थ दिसत नाहीं, जे त्याचा तिरस्कार करतात, असे मनुष्य पुष्कळ आढळतात. पण नवल हें कीं, ज्यांच्या ठायीं विचारशक्ति चांगली प्रखर दृष्टीस पडते, जे समाजसत्तेचा मोठा आव घालतात,

अशांमध्येंहि इतिहासाची अप्रीति पुष्कळ वेळां दृष्टीस पडते. इंग्रेजलोकांतला प्रसिद्ध ग्रंथकार जॉनसन् हा अशाविषयींचें एक मोठें उदाहरण आहे. एकंदर इतिहासाविषयीं हा आपला तिरस्कार वारंवार प्रगट करीत असे. आपणांमध्येंहि असें पुष्कळ म्हणणारे सांपडतील कीं, "अहो! मागील काळाशीं आपणांला काय करायाचें आहे? ते लोक गेले, मेले, पार झाले; आतां त्यांची कर्मकटकट आपणांस कशाला हवी? बाजीरावानें दिल्ली घेतली, नाना फडणविसानें अशी अशी युक्ति लढविली,—आपणांला त्यांत काय लभ्य आहे? सध्यां चाललें आहे तें खरें! ज्यांत आपला कांहीं नफाहि नाहीं व तोटाहि नाहीं अशा मागच्या गोष्टी मिळवावयाच्या, जुने लेख पाहावयाचे, वगैरे जी विनाकारण यातायात करावयाची तींत काय अर्थ?" खरेंच! जीवमान आहे तोंवर खाऊन घ्यावें; दुपारीं वामकुक्षी चुकूं देऊं नये, संध्याकाळच्या खाशा वेळीं शानदारसा पोषाख करून बाहेर पडावें, मग गंध्याचें दुकान, किंवा (विद्येचा षोक अथवा सुधारणेंत पुढारीपणा दाखविणें असल्यास) लायब्ररी, अशा ठिकाणीं चार घटका साऱ्या जगाच्या उलाढाली करून नंतर रमत रमत घरीं यावें; अशा थोर लोकांपुढें बाजीराव काय आणि मोठा शिकंदर बादशाहा झाला म्हणून तो तरी काय!!

असो; तर याप्रमाणें इतिहासास नाक मुरडणारे वर सांगितलेले दोन प्रकारचे लोक असतात. एक वरचे वामकुक्षीवाले. यांच्या मतांत तर अर्थात् मुळींच अर्थ नाहीं. त्यांचें चमचमीत भोजन, वामकुक्षी, तंबाखू, गप्पा, यांस जोंपर्यंत कांहीं हरकत होत नाहीं तोंपर्यंत इतर कशासहि ते मोजीत नाहींत! हा एक वर्ग व हा फार मोठा आहे यांत संशय नाहीं. दुसरा वर्ग जॉनसन्सारख्या दुराग्रही व स्थूलबुद्धि लोकांचा. यांचीं मतें इतर विषयांवर केवढींहि मान्य असलीं, तरी ज्यावर त्यांनीं कधीं व्यासंग केला नाहीं, अशा विषयांवरचीं त्यांचीं मतें असमंजस मानण्यास कांहीं हरकत नाहीं; तेव्हां या दोन्ही लोकांचे आक्षेप मनास आणण्यासारखे नाहींत. आतां इतिहासाचे उपयोग कोणकोणते आहेत याविषयीं लिहितों.

मनुष्यमात्राचे ठायीं जिज्ञासा ही मोठी उच्छृंखल आहे, हिचा मुळींच अभाव असता तर जगाच्या मूळच्या स्थितींत आज फारसा फरक पडता ना, हें उघड आहे.

या संसाररूप महानाटकांत आजपर्यंत कोणकोणतीं पात्रें आपआपली भूमिका आटपून निष्क्रमण करतीं झालीं हें चित्तावर चांगलें ठसलें असतां चांगला मार्ग कोणता, वाईट कोणता हें सुज्ञ मनुष्यास सहज निवडतां येतें. खरें सुख, खरें समाधान, खरी प्रतिष्ठा कशांत आहे हेंहि कळूं लागतें. सहस्रावधि मनुष्यांचा अनुभव थोडक्यांत त्यास आलासा होतो; त्याच्या योगानें त्याची दृष्टि फांकते; आणि तो जर तसा समजुतीचा व दृढ निश्चयाचा असेल, तर लवकरच तो कोणाचा तरी कित्ता उचलून–खलाशी लोक ध्रुवाच्या ताऱ्यावरून जसें नौकेचें नियमन करतात–त्याप्रमाणें तो त्या निवडलेल्या पुरुषाच्या चरित्रावर सारखी नजर ठेवून तदनुरूप आपलें आयुष्यक्रमण करतो. याप्रमाणें इतिहासापासून सदुपदेश प्राप्त होतो व म्हणूनच एका थोर ग्रंथकारानें 'इतिहास हा प्रत्यक्ष उदाहरणें दाखवून केलेला बोध होय' असें यथार्थ म्हटलें आहे.

इतिहास हा मनास उन्नति व प्रसन्नत्वहि देणारा आहे. म्हणजे त्याच्या निरंतर वाचनानें चित्त शांत व स्थिर राहतें आणि थोर होतें. संगतिविशेषाचें फल अचिंत्य होय. याचें तरी कारण पाहूं जातां फार खोल आहे असें नाहीं. मनुष्य जन्मून त्यास जगांतील व्यवहार थोडेफार कळूं लागले म्हणजे त्याच्या हातून कांहींना कांहीं तरी व्यापार अवश्य झालाच पाहिजे. त्यास सर्वथा निर्व्यापार असें कधींच राहतां येणार नाहीं. असें जर आहे तर मग त्यानें कोणतें आचरण करावें? अर्थात् जवळच्या चारचौघांचें जें पाहील तेंच, हें अगदीं स्वभावास अनुसरून आहे. यास्तव मुलांस आईबापांचे जितके गुण लागतात–त्यांतूनहि विशेषतः आईचे–तितके दुसऱ्या कोणाचे लागत नाहींत. असो; तर अनुकरणाकडे मनुष्याची प्रवृत्ति जर येवढी साहजिक व बलवत्तर आहे तर लहानपणापासून इतिहास, चरित्रें वगैरे वाचण्याची जर त्यास गोडी लागेल तर ती त्यास किती हितावह होईल बरें! सज्जन व थोर मनुष्यांशीं निरंतर सहवास असणें हें हजारांमध्यें एखाद्याचें कदाचित् भाग्य असल; बाकीच्यांस वरच्या विरुद्ध लोकांशींच नेहमीं प्रसंग! सदाचरण-प्रीति व खरा थोरपणा मनांत बिंबण्यास वरच्याखेरीज दुसरें कोणतें साधन आहे? दुसरें असें कीं, वरच्यासारखे थोर लोक कोणत्याहि देशांत ईश्वरकृपेनें एखादें

वेळेसच उत्पन्न होतात. पण तेवढा काळ गेला कीं आटोपलें! इतिहासचरित्रें वगैरे लिहिण्याचा प्रघात नसला म्हणजे पांचपन्नास वर्षांत त्यांची आठवणहि पार बुजून जाते! मग पुढील लोकांच्या ठायीं उत्साह कसा उत्पन्न व्हावा? व देशाची पहिली थोरवी तरी कशी राहावी? तेव्हां अनुकरणाचें फल कांहीं विलक्षण आहे! पण ते पुरुष होऊन गेल्यावर त्यांचें स्मरण पुढें कोणासच होत नाहीं. यास्तव इतिहास असावे लागतात; कीं देशाची स्थिति अगदीं बदलून गेली तरी ते वाचून पुढें-मागें कोणास तरी त्यांपासून उत्साह व प्रेरणा प्राप्त होते. नेपोलियन बादशहाचा किंवा शिवाजीचा पराक्रम वाचून जर त्यास वाटलें कीं, अहाहा! मनुष्याच्या बुद्धीचा प्रभाव केवढा आहे!–कधीं कधीं एकट्याच मनुष्याच्या हातीं किती लोकांचें कल्याण व नाश करण्याचें असतें!–पाहा! येवढा युरोप हाताखालीं असतांहि त्या नेपोलियनास संतोष म्हणून झालाच नाहीं व शेवटीं एका दीड वर्षांत त्याची काय दशा झाली! एवढ्या अचाट बुद्धीबरोबर परोपकाराची इच्छा जर त्याचे ठायीं तिळभरहि असती, तर जगाचें केवढें हित होतें!–शिवाजीचें चरित्र पाहा! दादोजी कोंडदेवानें लहानपणीं थोडें बहुत जें त्यास कांहीं शिकवलें तेवढ्याच ज्ञानानें त्यानें पुढें केवढें स्थित्यंतर घडवून आणलें! हिंदूंची राजसत्ता सुमारें हजार वर्षें अस्तास गेली होती तिचा अरुणोदय मावळच्या डोंगरावर पुनः झाला!–तेव्हां मोठी बुद्धि असण्यापेक्षां सदाचरण-प्रीति असणें हेंच विशेष हितकारक आहे. मनुष्याच्या मनाचा असा चमत्कार आहे कीं, 'लाभाल्लोभः प्रवर्तते' तेव्हां आहे त्यांत संतोष मानून राहणारा मजूरहि मोठ्या बादशहापेक्षांहि सुखी असेल! म्हणून इतिहासापासून मनास शांति व उन्नतत्त्व प्राप्त होतें हा एक त्यापासून मोठा लाभ आहे.

इतिहासाचा चवथा उपयोग मनाचें रंजन. निरनिराळ्या देशांत घडलेले वृत्तान्त समजल्यानें व त्यांचें मनन केल्यानें मागें सांगितल्याप्रमाणें जिज्ञासा-वृत्तीचें समाधान तर होतेंच, पण जर ते इतिहास तशा शैलीनें लिहिले असतील तर त्यांच्या वाचनानें वाचकांस आल्हादहि होईल.

व्यक्तिभूत मनुष्यास जितका चरित्राचा उपयोग तितकाच मुत्सद्यांस इतिहासाचा; म्हणजे 'पुढच्यास ठेंच मागला शहाणा' या म्हणीप्रमाणें पूर्वी

होऊन गेलेल्या मनुष्यांचा अनुभव जसा पुढच्यांस उपयोगी पडतो त्याचप्रमाणें या पृथ्वीवर आजपर्यंत जीं अनेक राज्यें होऊन गेलीं त्यांचा अनुभव हल्लीच्यांस कामास येतो. मागें इतिहासाचे जे आक्षेपक सांगितले ते एवढाहि विचार करीत नाहींत कीं, मुळाशिवाय जशी झाडाची स्थिति संभवत नाहीं, किंवा पायावांचून घर राहणें जसें अशक्य, त्याप्रमाणेंच प्राचीन स्थितीशिवाय कोणत्याहि राष्ट्राची त्या त्या वेळची नवी स्थिति आली नसती.

इतिहासाचा शेवटला उपाय म्हटला म्हणजे मनाचें पोषण होय. म्हणजे त्याच्या वाचनानें व मननानें मनाच्या निरनिराळ्या शक्ति प्रगल्भ होतात. एक तर स्मरणशक्ति, शक, मिति, स्थलांचीं नांवें, मनुष्यांचीं नांवें, एकंदर मजकूर हीं अगदीं बरोबर ध्यानांत ठेवावीं लागल्यामुळें या शक्तीचें काम पडून ती उत्तरोत्तर वाढत जाते. दुसरी कल्पनाशक्ति. इतिहास यथास्थित समजण्यास व त्याची पुरतेपणीं गोडी लागण्यास वाचकाची कल्पना जागृत असली पाहिजे. तिसरी विचारशक्ति. इतिहासांत निरनिराळ्या पात्रांचे निरनिराळे गुणदोष, निरनिराळे स्वभाव, निरनिराळ्या कृती स्पष्ट दाखविल्या असतात. यास्तव मानवी स्वभावाचीं अनेकविध अशीं चित्रविचित्र रूपें वाचकांच्या दृष्टीस पडून त्यांचें व्यवहारांत अत्यंत उपयोगी असें मार्मिक व पूर्ण ज्ञान त्यांस होतें. निरनिराळ्या देशांतील लोकस्थिति, राज्यव्यवस्था, रीतीरिवाज, धर्मादि विषयांवरील समजुती वगैरे कळल्या असतां मनुष्याची नजर दूरवर फांकते. वस्तुमात्राविषयीं त्यास विशेष यथार्थ ज्ञान होऊं लागतें. बुद्धीवर जो संकुचितत्वाचा वाईट संस्कार घडलेला असतो तो मोडण्यास दोनच मार्ग आहेत; एक देशोदेशीं हिंडून परराष्ट्रांविषयीं प्रत्यक्ष माहिती करून घेणें; दुसरा मार्ग म्हटला म्हणजे अर्थातच तसें ज्यांनीं केलें असेल त्यापासून भाषणद्वारां किंवा लेखनद्वारां तें ज्ञान मिळविणें. आतां पहिला मार्ग व दुसऱ्यांतील पहिली सोय हीं फारच थोड्यांस अनुकूल असतात; यास्तव एकंदर लोकांच्या उपयोगाचा मार्ग म्हटला म्हणजे इतिहास.* तेव्हां मनाचा दृक्प्रदेश वाढून कोत्या समजुतींपासून

*या प्रकरणाच्या आरंभीं उद्धृत केलेलें शास्त्रीबुवांचें वाक्य यावरून किती यथार्थ आहे तें सहज कळेल!

इतिहास त्यास मुक्त करतो व आपणांविषयीं व इतरांविषयीं यथार्थबुद्धि मनांत आणून देऊन इतरांशीं सलोख्यानें वागण्यास तो आपणांस शिकवितो. ”

असो; तर याप्रमाणें ऐतिहासिक पुस्तकांच्या वाचनानें काय परिणाम होतात हें आतां आमच्या वाचकांच्या खूपच ध्यानीं आलें असेल. कुलवृत्तान्त, घराण्यांचे इतिहास, जातींचे इतिहास या सर्व पुस्तकांचा अन्तर्भाव या ऐतिहासिक वाङ्मयांतच होतो. तेव्हां त्यांच्या वाचनानें काय फायदे होतात हें स्वतंत्र तऱ्हेनें सांगण्याची आतां आवश्यकता नाहीं असें वाटतें.

आतां इतिहासाचें क्षेत्र काय व या ऐतिहासिक संशोधनाचा उपयोग काय यासंबंधीं थोडें लिहून या प्रकरणांतील बराच लांबलेला परंतु महत्त्वाचा असा हा पहिला विभाग संपवितों. आजपर्यंत समजलें जात असल्याप्रमाणें इतिहास म्हणजे केवळ गतकालीन गोष्टी नव्हत किंवा राजकारणहि नव्हे. इतिहास म्हणजे मानव समाजाच्या गतकालीन हरएक प्रकारच्या घडामोडींची साद्यंत व विश्वसनीय माहिती. मानवसमाजाच्या चरित्रांत राजकारणाखेरीज कित्येक गोष्टी मोडतात. धर्म, आचार, विद्या, व्यापार वगैरे अनेक व्यवहारांच्या घडामोडी राष्ट्रांत होत असतात. या सर्वांचा अन्तर्भाव इतिहासांत होतो. याप्रमाणें दृष्टिकोन विशाल करून पाहूं लागलें असतां, इतिहासाचें क्षेत्र किती विस्तृत आहे व त्यांत कित्येक लहानसहान गोष्टींचा देखील कसा अन्तर्भाव होतो हें सहज दिसून येईल. याप्रमाणें पाहतां प्रथम व्यक्तिचरित्र, नंतर वर्ग अथवा जाति, नंतर उपकुल, नंतर कुल, अशीं अनेक कुलें मिळून पृथ्वीवरील अखिल मानवसमाज, असा इतिहासमांडणीचा क्रम पायरीपायरीनें वाढत जातो. सांप्रत इतिहासाचा सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीनें फारच मोठ्या प्रमाणावर विचार केला जातो. सर्व प्रकारच्या वाङ्मयीन व ऐतिहासिक संशोधनाचा मुख्य उद्देश हाच कीं, मानवसमाजाची प्रगति कालाच्या ओघांत कसकशी होत आहे तें दाखविणें. सर्व प्रकारच्या संशोधनाच्या मुळाशीं संस्कृतीचें संरक्षण व संवर्धन हींच कारणें असतात.

याप्रमाणें कुलवृत्तान्ताच्या कार्याचें ऐतिहासिकदृष्ट्या काय महत्त्व आहे तें निवेदन केलें. आतां यापासून घराण्यास काय काय फायदे होतात याचा थोडा विचार करूं. आजचीं दळणवळणाचीं साधनें उपलब्ध होण्यापूर्वी एकाच

कुटुंबांतील माणसें एका विशिष्ट गांवांत किंवा पंचक्रोशींत कित्येक वर्षे कायम राहत असल्यामुळें कौटुंबिक एकोपा उत्तम प्रकारें राहत असे. आतां यापुढें अशा प्रकारचा एकोपा राहणें कठीण होत चालल्यानें एकत्र कुटुंब असतांना जो एकमेकांबद्दल प्रेमभाव व आदर असे तोहि नाहींसा होत चालला. साहजिकच त्यामुळें घरांतील विशिष्ट कुलाचार व चालीरीती यांचा विसर पडत चालला आहे. तेव्हां कुलसंघटनेच्या दृष्टीनें एकमेकांबद्दलची आत्मीयता वाढावी म्हणून अशा ग्रंथांची अत्यंत आवश्यकता आहे. यापुढें कुलधर्म, कुलाचार अशा ग्रंथांतूनच फक्त संरक्षिले जातील. घराण्यांतील धनवान् मंडळींनीं कुलसंघटनेच्या दृष्टीनें एकादा कायमचा निधि करून ठेवल्यास अनेक दृष्टीनें उपयुक्त होईल. निधि मोठा असल्यास घराण्यांतील गरीब मंडळीच्या मुलांच्या शिक्षणाचीहि व्यवस्था करतां येईल. दोन वर्षानें संमेलन भरवून त्याचा खर्च भागवितां येईल, एवढा तरी निधि असणें अत्यावश्य आहे. संमेलनापासून काय काय फायदे होतील हें लिहिण्याची आवश्यकता नाहीं. अशा प्रकारचा उपक्रम प्रस्तुत घराण्यांतील मंडळींनीं केल्यास लेखकानें हातांत घेतलेल्या कार्याची पूर्ती होईल.

'आम्हीं असें काय केलें आहे, म्हणून आमची इतिहासांत माहिती द्यावी' असें म्हणणारे बरेच जण आढळून येतात. हें विधान ते संकुचित दृष्टीनें करतात. सामान्य मंडळींतूनच असामान्य व्यक्ति जन्मास येतात. आमच्या आश्वि शाखेचेंच उदाहरण पहा. ६ पिढ्यांपूर्वी वेदमूर्ति महादेवभट गुण्ये– आमचे पूर्वज,–चांफेट गांव सोडून देशावर आले. पुढील पांच पिढ्यांत त्यांच्या वंशजांची एकसारखी भरभराट होत गेली. आज महाराष्ट्रांत निरनिराळ्या क्षेत्रांत आपापल्या हिंमतीनुसार त्यांचे वंशज उत्तम प्रकारची कामगिरी बजावत आहेत. महादेवभटांसंबंधींची माहिती उपलब्ध होणें फार कठीण गेलें. मातृपितृप्रेम हें नेहमीं प्रत्येकाचे अंतःकरणांत दाट भावनेनें खोलखोल वसत असतें. आज स्वतःस ज्या व्यक्ति सामान्य समजतात, त्यांचेच असामान्य वंशज उद्यां कोणत्याहि कार्यांत त्यांच्या सामान्य पूर्वजांना विसरतील असें म्हणतां येत नाहीं. इतिहास हा जरी असामान्य व्यक्तींचा असतो असें समजण्यांत येतें, तरी ती असामान्य व्यक्ति अगर विभूति एकटी काय करूं शकणार? 'गाड्या-

बरोबर नळ्याची यात्रा होते ' अशी एक म्हण आहे. त्याप्रमाणें घराण्याचा इतिहास लिहितांना सामान्य व्यक्तींची माहिती असामान्यांबरोबर येणें अगदीं साहजिक आहे. रत्नें-माणकांबरोबर घराण्यांत कांहीं गणंग हे असणारच. मौल्यवान रत्नाची शोभा तें ज्या हिणकस अशा कोंदणांत बसविलेलें असतें त्यावांचून काय असणार ?

हे कुलवृत्तान्त जर अगदीं साग्र रीतीनें लिहिले गेले तर त्यांत घराण्यांतील कित्येक पिढ्यांचें एक छोटेंसें रेकॉर्ड पहावयास सांपडेल. वतनासंबंधींच्या बहुतेक सर्व कागदांचा या इतिहासांत अन्तर्भाव होतो. घराण्याच्या शाखा-उपशाखांकडून ते आलेले असतात. हा इतिहास म्हणजे अनेक वर्षांच्या जुन्या, विस्तीर्ण अशा वटवृक्षाच्या बुडख्याप्रमाणें आहे. त्या वृक्षाच्या छायेंत आपणांस येथें घराण्यांतील सर्व लहानथोर मंडळी जमलेली पहावयास सांपडतात. कित्येक वर्षांमुळें ज्या आपल्या कुलबंधूंचा विसर पडला असेल त्यांची नव्यानें ओळख होते. आत्मीयता व प्रेमभाव वाढतो. सर्वजण एकत्र जमूं म्हट-ल्यानें कधींच जमणें शक्य नाहीं. येथें वामकुक्षी घेतांघेतां सर्वांना आपण भेटूं शकतों. पूर्वजांच्या चांगल्या व वाईट गुणांची छाननी करतों. त्यांच्या कीर्तीचे पोवाडे गातों. वर्तमानप्रसिद्ध व्यक्तींबद्दल आदर व अभिमान वाटतो. येथें लहान मुलांना त्यांच्या भविष्यकाळाची शिकवण मिळते. एकूण कुलवृत्तान्त हा घराण्याच्या भूत-भविष्य-वर्तमान काळांतील दुवा आहे.

इतिहासलेखक हा नेहमीं सत्यप्रियच असावा लागतो, व त्यामुळें शक्य तोंवर अशा ऐतिहासिक ग्रंथांतून सत्याचा अपलाप केलेला आढळून येत नाहीं. येथें आपणांस घराण्यांतील प्रत्येक स्त्री व पुरुषासंबंधीं बारकाईनें माहिती पहावयास सांपडते. वधूवरसंशोधनाचे दृष्टीनें या पुस्तकांची उत्तम प्रकारची मदत होते.

राष्ट्राचा इतिहास त्याच्या घटकांवर अवलंबून असल्यानें ऐतिहासिक दृष्ट्या कुलवृत्तान्ताचें महत्त्व काय हें प्रकरणाचे आरंभींच निवेदिलें आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून पुढील मंडळींनीं आपले इतिहास तयार केले आहेत. कोंक-णस्थ ब्राह्मणांपैकीं आपटे, थत्ते, परांजपे, कोल्हटकर, गोळे, चितळे, वेलणकर, पेंडसे, लिमये, साठे, खरे, भावे, चाफेकर, सोमण, गर्दे, पटवर्धन (संस्थानिक),

रास्ते-गोखले, बर्वे, वाईकर सहस्रबुद्धे इत्यादिकांनीं आपले कुलवृत्तान्त लिहिले आहेत. याशिवाय मराठे, कर्वे, रानडे, लोंढे, चिपळूणकर, मोडक, साने इत्यादि आपले इतिहास लिहीत आहेत. कऱ्हाडे ब्राह्मणजातीपैकीं प्रस्तुतचा इतिहास **तिसरा आहे**. याशिवाय पुण्याचे प्रा. दत्तोपंत पोतदार, सायल्याचे पुरोहित, मिरजेचे देशपांडे, मुंबईचे ढापरे व सिद्धये, बार्शीचे नाडकर, साताऱ्याचे राजोपाध्ये, राजापूरचे पाटणकर–आपापले इतिहास लिहीतच आहेत. देशस्थ ऋग्वेद्यांत पानसे व देशस्थ शुक्ल यजुर्वेद्यांमध्यें शेटेपाचे माध्यंदिन शाखा, प्राचिनस गोत्र यांनीं आपले इतिहास लिहिले आहेत. मराठे जातींत वाठारकर, निंबाळकर, कुलाब्याचे आंग्रे इत्यादींनीं आपले इतिहास प्रसिद्ध केले आहेत.

अशा पुस्तकांची आवश्यकता आणखी एका दृष्टीनें भासते. कालमानाबरोबर जुनी राहणी जाऊन नवीन प्रचारांत येत आहे. पूर्वजांची आठवण ठेवण्याची जुनी प्रथा मोडत आहे व नवीन तऱ्हेची दैनंदिनी ठेवण्याची संवय अद्याप अंगीं बाणली नाहीं. प्रोष्टपदी (भाद्रपद शुद्ध १५) श्राद्ध बहुधा कोणीच करीत नाहीं. कित्येकांस हें श्राद्ध करतात याची जाणीवहि नाहीं ! या श्राद्धांत वृद्ध प्रपितामह, त्याचा पिता व पितामह अशी त्रयी येते, व अशा तऱ्हेनें पितरादित्रयी जी श्राद्धास लागते व त्याचे मागील त्रयी अशा सहा पिढ्यांची माहिती कायम ध्यानांत राहत असे. आमच्या शास्त्रकारांनीं अशी उत्कृष्ट व्यवस्था करून ठेविली आहे. आज तिचा कांहीं उपयोग नाहीं. प्रोष्टपदी तर दूरच, पण वर्षश्राद्धसुद्धां करणें कठीण ! त्यामुळें पितृगणांची यादी राहत नाहीं. अशा परिस्थितींत जी कांहीं माहिती मिळेल ती एकत्र करून पुस्तकरूपानें प्रसिद्ध करणें अत्यावश्यक आहे. लेखकास असें वाटतें कीं, श्राद्धतिथीस अशा पुस्तकांचे वाचनानें आपल्या पूर्वजांचें पुण्यस्मरण सहज होईल. सध्यां प्रवासाची हौस फार वाढत आहे, परंतु तीर्थोपाध्याकडे आपली माहिती देऊन तीर्थविधि करणारे लोक कमी होत चालले. यामुळें जुन्या पिढींतील पुरुषांचीं नांवें माहीत होण्याचा मार्ग आकुंचित होऊं लागला. तीर्थोपाध्यांकडील जुने लेखहि जीर्ण होत आहेत. सध्यां बारा-तेरा पिढ्यांची जी माहिती उपलब्ध होते ती या गंगापुत्रांच्या जबरदस्त मदतीमुळेंच ! तेव्हां

क्षेत्रास जाणारानें निदान आपला लेख न विसरतां तीर्थोपाध्याकडे द्यावा. नवीन पिढींतील मंडळींत इतिहासाची गोडी असणारे थोडे. जुन्या कागदाचें महत्त्व जाणणारे त्याहून थोडे ! त्यामुळें जुने कागद नदीस अर्पण होत आहेत. या सर्व कारणांकरितां प्रत्येक ज्ञातीनें व प्रत्येक घराण्यानें आज आपली जेवढी माहिती मिळेल ती संग्रहीत करून आपले कुलवृत्तान्त विनाविलंब प्रत्येकानें अवश्य प्रसिद्ध करावे. क्रान्तीचा काल येत चालला आहे. नवीन नवीन विचारसरणी अवलंबिली जात आहे. अनेक राष्ट्रांची उलथापालथ होत आहे. उद्यां काय होईल याची खात्री नाहीं. ज्या संस्कृतींतून व विचारसरणींतून आपण पुढें आलों तिचे आपणांवर अनंत उपकार आहेत. या प्रकरणारंभीं उद्धृत केलेल्या अवतरणांत कार्लाइल म्हणतो, " मानवी कृति क्षणभंगुर आहे. तथापि परंपरेनेंच आपण तिचें संरक्षण केलें पाहिजे. " येथें एक गोष्ट नमूद करावीशी वाटते कीं, ह्या गुण्ये घराण्याच्या इतिहासाचें उगमस्थान एका आख्यायिकेंतच आहे. सदाशिवभट गुण्यांनीं पुरसीसींत इ. स. १७७३ त मठ गांवचे वसाहतीसंबंधीं व तेथील गुण्यांचे वतनासंबंधीं जी पुरातन माहिती दिली तिचे अखेरीस –" ऐसी आख्या आहे "—असा उल्लेख केला आहे. (खं. १, ले. ३४ पहा.) या सर्व गोष्टींचा विचार करूनच हें कार्य आम्हीं हातीं घेतलें. घराण्यांतील प्रत्येक व्यक्तीनें या सर्व गोष्टींचा विचार करून एक प्रत तरी आपले संग्रहीं ठेवावी. या कार्याचें सातत्य चालू ठेवावें म्हणून पुढें कांहीं ठळक गोष्टींचा उल्लेख देत आहें. त्याप्रमाणें या खंडाचे अखेरीस जीं कोरीं पृष्ठें साडलीं आहेत तेथें वारंवार लिहीत जावें.

(१) जन्मस्थळ नि शक, मिति.
(२) नांव–पाळण्यांतील–रूढ–टोपण वगैरे.
(३) शिक्षण जसें अधिक होईल तसतसें लिहीत जाणें. शिष्यवृत्त्या, पारितोषिक वगैरे.
(४) व्यायामाची आवड, प्रकार व त्यांतील प्रावीण्य.
(५) विवाहकाल–शक, मिति.
(अ) मुलाचेविषयीं—वधूंचीं सासरमाहेरचीं नांवें, जन्मस्थळ व काळ. तिचें शिक्षण. पतीचे घराण्यांत आल्यावर तिची

सर्व माहिती पुरुषाप्रमाणें लिहावी. तिचे पित्याचें पूर्ण नांव, आडनांव व गांव.

(आ) मुलींचे विषयीं—जन्मस्थळ, काळ, व्यवसाय, पतीचें पूर्ण नांव, आडनांव, गांव.

(६) स्थलांतर झाल्यास—स्थळ, काळ नि कारण.

(७) व्यवसाय—सविस्तर हकीकत.

(८) विशेष आवड—(सर्व प्रकारच्या कलांची).

(९) परोपकार, दातृत्व, ग्रंथकर्तृत्व इत्यादि.

(१०) मृत्यूचा काल, स्थल, कारण.

(११) कुटुंबाचे स्थितीवर महत्त्वाचा परिणाम करणाऱ्या गोष्टी.

प्रकरण २ रें

कुलदेवता, कुलधर्म व कुलाचार

कुलदेवताः—सर्व कऱ्हाडे ब्राह्मण ऋग्वेदी आहेत, व त्यांचें सूत्र आश्वलायन आहे. सर्व गुण्ये, गुणे मंडळी कऱ्हाडे ब्राह्मण असून त्यांचें गोत्र अत्रि व प्रवर तीन आहेत (आत्रेयार्चनानसश्यावाश्वेति त्रिप्रवरान्वित). सर्व गुण्यांचा कुलस्वामी रत्नागिरी तालुक्यांतील पालीचा '**श्रीलक्ष्मीपल्लिनाथ**' हा आहे व कुलस्वामिनी कोल्हापूरची '**श्री आंबाबाई**' ही आहे. मंगलकार्याचे समयीं कुलदेवता–आवाहनाचा मंत्र, "**श्री महाकाली महासरस्वति महालक्ष्मी श्री लक्ष्मीपल्लिनाथ महाविष्णु प्रमुख पंचायतन देवताभ्यो नमः**" या प्रमाणें आहे.

पुढें देत असलेल्या कुलधर्माचे वेळीं उच्चारण्यांत येणाऱ्या देवतांमध्यें मठच्या 'भवानी सोमेश्वरा'चा उल्लेख चांफेट शाखेंतील मंडळीसुद्धां करतात असें दिसून येईल. चांफेट शाखेंतील मंडळी आपण मूळचे मठगांवचे आहोंत असें म्हणतात. त्याला हा एक विशेष आधार आहे. देशावर आलेल्या बहुतेक सर्व मंडळीस या कुलधर्माचे वेळीं उच्चारण्यांत येणाऱ्या देवतांच्या नांवांचा विसर पडला आहे. त्यांच्या नांवांची सविस्तर शाखावार माहिती येणेप्रमाणें:—

शाखा मठः—या शाखेंतील कोंकणांतील गुण्ये या देवतांचीं नांवें पुढीलप्रमाणें सांगतात—रा. दत्तात्रेय केशव गुण्ये मु॥ मठ; (१) भवानी सोमेश्वर, (२) मठच्या निरनिराळ्या ग्रामदेवता; रा. शिवराम गोपाळ गुण्ये मु॥ कुणें; (१) सोमेश्वर मठ, (२) ग्रामदेवता मौजे मठ, (३) ग्रामदेवता मौजे कुणें. देशांवरील पुण्याचे रा. यशवंतराव लक्ष्मण गुण्ये, ग्वाल्हेर दरबार वकील, यांच्याजवळील यादींत या देवतांचीं नांवें येणेप्रमाणें आहेत : (१) सोमेश्वर, (२) मठचे देव, (३) आजोबास्वामी, (४) ग्रामदेवता–नवलाई, पावणाई. ग्वाल्हेरची या शाखेंतील मंडळी याप्रमाणेंच नांवें सांगतात.

शाखा चांफेट—वों केशवभट वासुदेवभट गुण्ये मु॥ चांफेट—(१) भवानी सोमेश्वर, (२) ग्रामदेवता मौजे चांफेट–नवलादेवी, पावणादेवी, विठलादेवी, राघोबा. वों बळवंत ऊर्फ हेरंब रामचंद्र गुणे मु॥ पुणें यांच्या पूर्वजांना देशावर येऊन सुमारें सवाशें वर्षें होत आलीं : (१) सोमेश्वर, (२) नवलाई, पावलाई, विठाई, दुर्गा. या शाखेंतील देशावरील इतर सर्व मंडळींना या देवतांच्या नांवांची माहिती नाहीं. कुलधर्मास ते नैवेद्य घालतात येवढेंच !

कुलाचार—कुलाचार हे दिवसेंदिवस लोपत चालले आहेत म्हणून सविस्तर माहिती देत आहें. रा. रा. य. ल. गुण्ये, ग्वाल्हेर दरबार वकील, पुणें, यांच्याजवळील कुलधर्म-कुलाचाराची एक जुनी यादी मिळाली तिच्या साह्यानें व कुलवृत्तान्त-प्रश्नपत्रिकांतून आलेल्या माहितीच्या आधारें पुढील माहिती देत आहें.

चैत्र शु॥ १ (पाडवा)–कडुनिंब खाणें, पितांबर किंवा पैठणी व चोळी, भांडें व साखरेची गाठी यांची गुढी उभारणें, पुढें रांगोळी घालणें, नंतर गुढीची पूजा व नैवेद्य, पुरण आवश्यक, ब्राह्मण व सवाष्ण पंक्तीस बोलावणें.

चैत्र शु॥ ३—गौरीदेवीची तीज–गृहिणीनें गौरीची स्थापना करणें, पंक्तीस सवाष्ण. संध्याकाळीं हळदी-कुंकूं.

चैत्र शु॥ १५—दौणी पौर्णिमा–देवास दवणा वाहणें. मठच्या उपशाखांतून (कुणें वगैरे) वरील कुलदेवतांस नैवेद्य घालतात. मठमध्यें फक्त दौणाच वाहतात. चांफेट शाखेंतहि फक्त दौणाच वाहतात. नैवेद्य नाहीं. पंक्तीस ब्राह्मण व सवाष्ण. पुरण अवश्य पाहिजे. देशावरील मंडळींत फक्त देवदिवाळीस वरील

देवतांस नैवेद्य घालतात. इतर कुलधर्माच्या पौर्णिमेच्या वेळीं बहुधा ब्राह्मण, सवाष्ण व घरच्या देवांस आणि कुलस्वामिनीस नैवेद्य घालण्याची चाल आहे.

चैत्र व।। ३—गौरीची तीज–पंक्तीस सवाष्ण व हळदीकुंकूं.

वैशाख शु।। ३—अक्षय्य तृतीया. उदककुंभ गव्हावर ठेवून त्यांत पाणी भरून, त्यावर लहान भांडें ठेवून, त्याची पूजा करून, काकडी, पंखा व दक्षिणा यांसह; पितृ, पितामह, मातामह, मातुःपितामह, व मातुःप्रपितामह यांचा उच्चार करून ब्राह्मणास दान देणें. गौरीचा शेवटचा दिवस. चैत्र शु।। ३ पासून या दिवसापर्यंत गौरीची रोज पूजा करावयाची असते. शिवाय या महिन्यांत केव्हांतरी एकदां शुभदिनीं हळदीकुंकूंसमारंभहि पण मोठ्या प्रमाणवर करावयाचा असतो. त्या दिवशीं आरास मांडून गौरी सुशोभित करतात. हा दिवस गौरीचा शेवटचा दिवस असल्यानें पंक्तीस सवाष्ण व ब्राह्मण व सायंकाळीं लहानसा हळदीकुंकूं-समारंभ करण्यांत येतो. त्यास मुलींचें हळदीकुंकू म्हणतात.

ज्येष्ठ शु।। १५—वटपौर्णिमा–भट सांगेल त्याप्रमाणें सुवासिनींनीं व कुमारिकांनीं मिळून वटसावित्रीची पूजा करणें.

आषाढ शु।। ११ ते कार्तिक व।। ११—चातुर्मास्यांतील सर्व एकादशा करणें. जेव्हां दोन एकादशा येतील तेव्हां दुसरी करणें.

आषाढ व।। ३०—गृहिणीनें समयांची पूजा करणें. लाह्या वगैरे व आघाडा-दूर्वा आवश्यक.

श्रावण शु।। ५, नागपंचमी—मातीचा नाग करणें व एक वाटीहि पण तयार करणें. नागाचीं आठ पिलें करणें व त्याजवळ ठेवणें व नऊ पदर नऊ गाठी करून दोरा वाहणें. गृहिणीनें चणे, लाह्या, आघाडा, दूर्वा, दूध इत्यादिकांनीं पूजा करणें. संध्याकाळीं अक्षता टाकून विसर्जन करणें व सकाळीं वाहिलेला दोरा गळ्यांत घालणें. पंक्तीस ब्राह्मण व सवाष्ण. पदार्थ चिरणें किंवा भाजणें वर्ज्य. दिंडें नैवेद्यास आवश्यक. स्त्रिया झोंपाळ्यावर झोंपे काढतात व नाच वगैरे करितात.

श्रावण शु।। ७, शीतला सप्तमी—लहान दगडांच्या गोट्यांचा ‘कोकोबा’ सोवळ्यानें, जलस्थानापासून गृहिणीनें स्वतः आणावा. त्याची, गंधाच्या

सहाणेवर ठेवून पूजा करावी. तांदळाच्या धिरड्यांचा नैवेद्य दाखविणें. कोकोबास सर्व लहान मुलांनीं पूजनानंतर साष्टांग नमस्कार घालावा व त्याचें तीर्थ मातोश्री देते तें घ्यावें. नंतर गृहिणींनें जलस्थानाचे ठिकाणीं कोकोबाचें दक्षिणेसह विसर्जन करावें.

श्रावण शु॥ १५, पोवती पौर्णिमा—कुलधर्म, दारांवर स्वस्तिक काढून त्याची पूजा करितात. वरील कुलदेवतानां नैवेद्य; पांचपदरी वीतभर लांब दोरे हळदीकुंकुवानें पिवळे करून देवांस वाहणें व तसेंच तीन पदरांचे दोरे काढून ते जेवावयास बसतांना घरांतील लहानथोर मंडळींनीं हातांत बांधणें. देवांस पोवतें वाहिल्यावर नैवेद्य व आरती व नंतर ब्राह्मण-सवाष्णीस भोजन. पुरण आवश्यक.

श्रावण व॥ ३०—पिठोरी अमावास्या, गृहिणी आपल्या लहान मोठ्या बालकांच्या नांवानें 'वाणें' घालते. प्रत्येक वाणास पुढील गोष्टी आवश्यक—वाटीभर दुधाची खीर. ती वाटी लहान पोळीनें झाकलेली असते. तीवर पुरणाचा दिवा ठेवण्यांत येतो. माता सर्व वाणें जिवतीच्या चित्रापुढें ठेवते. नंतर आपल्या प्रत्येक बालकास 'आतीत कोण' म्हणून विचारते. बालक 'मी' म्हणून उत्तर देतो. नंतर माता 'वाण कोणाचें' म्हणून विचारते. बालक 'माझें' म्हणून उत्तर देतो. याप्रमाणें सर्व लहान व वयस्क बालकांना माता प्रश्न विचारते व वाणें देते. जेवतांना तीं खाण्यांत येतात.

श्रावण शु॥ ५ किंवा १५ स. घरांतील सर्व लहानथोर मंडळींनीं ब्राह्मण सांगेल त्याप्रमाणें श्रावणी करणें.

श्रावणांतील चारी रविवारीं गृहिणींनें आदित्यनारायणाची आकृति पाटावर काढून गूळखोबऱ्याचा नैवेद्य व गव्हल्याच्या खिरीचा नैवेद्य यांनीं पूजा करणें. आदित्यनारायणाची आकृति रक्तचंदनानें, दह्यानें, दुधानें अथवा तुपानें चारी रविवारीं वेगवेगळ्या प्रकारानें काढतात. काडवातीनें आरती करितात. सूर्यनारायणास कार्पासवस्त्र पूजनसमया अर्पण करितात. श्रावणांतील चारी सोमवारीं सकाळीं उपवास व सायंकाळीं भोजन. महादेवास अभिषेक. पंक्तीस सायंकाळीं ब्राह्मण आवश्यक. श्रावणांतील चारी बुधवारीं व गुरुवारीं बुधबृहस्पतींच्या चित्राची पूजा गृहिणी करित्ये. चारी शुक्रवारीं

गृहिणीनें जिवतीच्या चित्रांची पूजा करावयाची असते. पूजेनंतर लहान मुलांनीं नमस्कार करावयाचा असतो. चारी शुक्रवारीं सवाष्ण आवश्यक असते. मधल्या कोणत्या तरी एका शुक्रवारीं पुरण घालतात. तसेंच संध्याकाळीं चारी शुक्रवारीं जवळपासच्या स्त्रियांना हळदीकुंकूं असतें. बारा महिने दर शुक्रवारीं फुटाण्यांसह गृहिणीनें उंबऱ्याची पूजा करण्याची चाल आम्हां आश्वीशाखेंतील मंडळींत आहे. पूजेनंतर हळदीकुंकू होतें व घरांतील लहानथोर सर्व मंडळींना दूध व फुटाणे वांटण्यांत येतात. श्रावणांतील चारी शनिवारीं गृहिणीनें पिंपळाची पूजा करावयाची असते. पिंपळापुढें हरभऱ्याची मूठभर डाळ व गूळखोबरें नैवेद्याप्रीत्यर्थ ठेवण्याची चाल आहे. त्या त्या वारीं स्त्रिया त्या वाराची कहाणी वाचतात.

नूतन वधूनें पहिलीं पांच वर्षे, दरवर्षी चातुर्मास्यांतील चार महिने देवापुढें गोपद्माची रांगोळी काढावयाची असते. ती निरनिराळया धान्यांच्या पिठानें काढण्याची चाल आहे. नूतन वधूनें चारी सोमवारीं प्रत्येक सोमवारीं निरनिराळ्या धान्यानें महादेवास शिवामूठ वहावयाची असते. तसेंच चारी मंगळवारीं विवाहानंतरचीं पहिलीं पांच वर्षे मंगळागौरीचें पूजन मैत्रिणींसह भावी शुभमांगल्याप्रीत्यर्थ करावयाचें असतें. त्या दिवशीं पुरण आवश्यक असतें. त्या दिवशीं एक प्रकारें मांगल्याचें, आनंदाचें व विनोदाचें वातावरण सर्व घरांत भरलेलें असतें. आम्हां हिंदूंच्या सणांचें वैशिष्ट्य अशा प्रसंगीं फार उत्तम प्रकारें दृष्टोत्पत्तीस येतें. याशिवाय संक्रांतीस व रथसप्तमीस नूतन वधूनें ओळखीच्या मंडळीच्या घरीं जाऊन वाणें द्यावयाचीं असतात. विवाहानंतरच्या पहिल्या वर्षी सासरची मंडळी वराचा दिवाळसण थाटानें साजरा करतात. संक्रांतीचा सण हा प्रायः जसा नूतन वधूचा असतो तद्वतच दिवाळसण हा वराचा असतो. नूतन वधूस मंगळागौरीप्रीत्यर्थ तिच्या माहेरींहि पण पाठविण्याची चाल असते.

भाद्रपद शु।। ४, गणेश चतुर्थी—ब्राह्मणानें पूजा सांगणें व यजमानानें गणपतीची स्थापना करणें. रोज सकाळ-सायंकाळ दोन वेळां पूजा. पहिले दिवशीं मोदकांचा नैवेद्य व पुढें पंच खाद्याचा. ज्या दिवशीं गौरींचें आगमन असेल त्या दिवशीं गृहिणीनें त्या आणावयाच्या असतात. गौरी वाघानें खाल्ल्या असल्यामुळें त्या हळकुंडाच्या बसवितात. आगमनानंतर दुसरे दिवशीं गौरीचें

जेवण असतें. त्या दिवशीं पुरण अवश्य घालावें लागतें. तिसरे दिवशीं गौरींचें विसर्जन असतें. त्याच दिवशीं गणपतीचेंहि पण विसर्जन गौरीबरोबर करण्याची चाल या घराण्यांत आहे.

भाद्रपद शु॥ १४—अनंतचतुर्दशी. ज्याचेकडे अनंत असेल ते हें पूजन करितात. या शुद्ध पंधरवड्यांत कांहीं मंडळींच्याकडे 'मुक्ताभरणाची' चाल आहे.

भाद्रपद ब॥ ३०–सर्वपित्री अमावास्या—खीर आवश्यक, पंक्तीस ब्राह्मण. शक्य तों या वद्य पंधरवड्यांत 'पक्ष' आटोपून घ्यावा.

अश्विन शु॥ १–घटस्थापना—दुर्गेचें नवरात्र या दिवसापासून सुरू होतें. यजमानानें स्वतः देवीचें पूजन करणें व भटानें पूजा सांगणें. यजमान जाग्यावर नसल्यास भटानें करणें. मठशाखेंतील मंडळी, सर्वसामान्यतः ज्या दिवशीं नवरात्र उठतें, त्यापूर्वीं एक दिवस म्हणजेच पूर्णाहुति अथवा महा अष्टमीचे दिवशीं उठवितात. चांफेट शाखेंतील मंडळी ९ वे दिवशीं सकाळीं उठवितात. माळ, नंदादीप व श्रीसूक्त आणि पुरुषसूक्तानें दोन्ही वेळेस पूजा. संध्याकाळीं फक्त आरती व नैवेद्य. नऊ दिवस ब्राह्मण, सवाष्ण. नवरात्रांत पाठ नाहींत. कोंकणांत दूधपोह्यांचा व दहीपोह्यांचा नैवेद्य असतो. कालें शाखेंतील मंडळी पाठ ठेवतात. सप्तशतीचा रोज एक व 'लक्ष्मीहृदय' व 'नारायणहृदय' संकलित पाठ 'चढते' म्हणतात, व तशीच त्रिकाल पूजा असते.

अश्विन शु॥ ५, ललितापंचमी—कांहीं गुण्ये मंडळी करतात.

अश्विन शु॥ १०, दसरा—शस्त्रास्त्रांचें व अश्वाचें सकाळीं पूजन. सायंकाळीं सीमोल्लंघन व शमी लुटणें. तांदुळांत आंगठी लपविलेली तरवारीनें रास फोडून आंगठी घेऊन देवापुढें ठेवणें. रात्रीं वडील मंडळींच्याकडून ओवाळून घेणें. मठशाखेंतील मंडळी कुलदेवतांस नैवेद्य घालतात; चांफेट शाखेंत ती चाल नाहीं.

आश्विन शु॥ १५, कोजागिरी पौर्णिमा—कांहीं लोक करतात. या दिवसापासून तुळशीपुढें दिवा लावणें.

अश्विन व॥ १२, वसुबारस—स्त्रिया धान्यफराळ करतात. संध्याकाळीं सवत्स गाईची पूजा. दिवाळीचा प्रारंभ, आकाशांत आकाश-दिवा.

अश्विन व॥ १३, धनतेरस.

अश्विन वा। १४, नरक-चतुर्दशी; प्रातःस्नान अभ्यंग.

अश्विन वा। ३०, सायंकाळीं लक्ष्मीपूजन—दागिने व रुपये भांड्यांत ठेवून ब्राह्मण सांगेल त्याप्रमाणें पूजन करणें. साळीच्या लाह्या अवश्य पाहिजेत.

कार्तिक शु। १—पाडवा.

कार्तिक शु। २—भाऊबीज.

कार्तिक शु।। १२.—सायंकाळीं तुळशी-विवाह. करंज्या-अनरश्यांचा नैवेद्य. यजमानानें पूजा करणें व ब्राह्मणानें सांगणें.

मार्गशीर्ष शु।। १; देवदिवाळी—वर आलेल्या कुलदेवतांना नैवेद्य घालणें, वडे-घारगे अत्यावश्यक. सामान्यतः ५ नैवेद्य घालतात. आमच्या घरीं ६ नैवेद्य घालतात व १ घरच्या देवास मिळून एकूण ७ नैवेद्य घालतात. नैवेद्य दाखविल्यावर ते गाईस घालतात. ब्राह्मण-सवाष्ण अत्यावश्यक.

पौष वद्यांत संक्रान्त, तिळगूळ व हळदीकुंकूं वगैरे.

माघ शु।। ७; रथसप्तमी—आदित्यनारायणाची पूजा. घरांतील सर्व स्त्रिया मिळून आदित्याची पाटावर आकृति काढून पूजा करितात. अंगणांत लहान बोळक्यांत दूध ठेवून तें ओतास घालवितात.

माघ व।। १४; महाशिवरात्र—दिवसभर उपवास, ब्राह्मणाकरवीं महादेवास अभिषेक व दक्षिणा. दुसरे दिवशीं पारणें. ब्राह्मण-सवाष्ण आवश्यक.

फाल्गुन शु।। १५, हुताशनी पौर्णिमा—होळी-पूजन. होळींत खोबरें टाकून नंतर तें काढून प्रसाद म्हणून सर्वांना वांटणें. चांफेट व मठ दोन्ही शाखांतून या दिवशीं वरील कुलदेवतांना नैवेद्य घालतात. कुलधर्म, ब्राह्मण-सवाष्ण पंक्तीस भोजनास बोलावणें.

फाल्गुन व।। ५; रंगपंचमी—देवावर केशरी रंग उडविणें. मिष्टान्नभोजन. सर्व लहानथोर मंडळी रंग खेळतात.

काळें शाखेंतील मंडळी 'श्रीलक्ष्मीपल्लिनाथ' व 'श्रीआंबाबाई' आणि 'श्रीरामास'हि उपास्य दैवत मानतात. आडिव्रें शाखेंतील आज ग्वाल्हेरास जी मंडळी आहेत ती कुलस्वामि श्रीलक्ष्मीपल्लिनाथ व श्रीआंबाबाई असेंच सांगतात. त्यांना नवरात्राशिवाय विशेष कुलधर्म माहीत नसावेत, असें त्यांच्या-

करून भरून आलेल्या प्रश्नपत्रिकांवरून दिसतें. राजवाडीचें घराणें म्हणजेच आडित्रे घराण्याची उपशाखा. हे श्रीलक्ष्मीपल्लिनाथच कुलस्वामी मानतात. पुणें-सासवड शाखेपैकीं सध्यां पन्ना संस्थानांत असलेले डॉ. धोंडो नारायण गुणे यांना श्रीलक्ष्मीपल्लिनाथाचा विसर पडला असावा, असें त्यांच्या पत्रांवरून दिसतें. त्या शाखेपैकीं ते एकटेच आज विद्यमान आहेत. शिरगांव-इंदूर शाखेपैकीं कोणीच विद्यमान नसल्यानें त्या शाखेंतील कुलदेवतांची माहिती मिळणें शक्य नाहीं.

एकंदरींत सर्व गुण्यांचा कुलस्वामी 'श्रीलक्ष्मीपल्लिनाथ' व कुलस्वामिनी श्रीआंबाबाई आहे हें वरील माहितीवरून उघड होतें.

श्रीलक्ष्मीपल्लिनाथाचें ध्यान—

जपाकुसुमसंकाशं रक्तनेत्रं त्रिलोचनम् ।
दिगम्बरं महाकायं भक्तानामभयप्रदम् ॥ १ ॥
त्रिशूलं डमरुं खड्गं पात्रं च करपंकजे ।
बिभ्राणं योगिनीनाथं पल्लीशं भूतनायकम् ॥ २ ॥
युवानं हास्यवदनं ताम्बूलेनामृताननम् ।
ऊर्ध्वकेशं भूतिभालं चिन्तयेत् कार्यसिद्धिदम् ॥ ३ ॥

—इति श्रीपल्लिनाथध्यानम्

श्रीलक्ष्मी-पल्लिनाथ-स्तव

आर्या

श्रीपल्लिनाथ देवा, नमुनी त्याचेंच रूप वर्णितसें ।
निर्विघ्नता तयानें द्यावी, ऐसें तयासि मागतसें ॥ १ ॥
त्रिगुणात्मक, तेजस्वी, त्रिशूल डमरू असे जया हातीं ।
शेषारूढ असे जो, खड्गधरी लोक ते जया म्हणती ॥ २ ॥
ज्याच्या पायालागीं कमळाची ऊपमा अती साजे ।
भक्ताविषयीं ज्याच्या हृद्भागीं प्रेम तें बहु विराजे ॥ ३ ॥
उपवित अथवा शेला, ज्याच्या अंगावरी बहु शोभे ।
भूषण म्हणुनी लिंगें, सर्वांगीं घेइ जो अती लोभें ॥ ४ ॥

शेषारूढ म्हणोनि ज्यालागीं विष्णु समजती लोक।
प्रेमानें भक्तीनें पवमानाचा करीति अभिषेक ॥ ५ ॥
त्रिशूल डमरू हातीं म्हणुनि जया पार्वतीश समजून।
रुद्राचा अभिषेकहि सद्भावें करिति विप्र येऊन ॥ ६ ॥
त्या पल्लिनाथ प्रभुला अति लीनपणें करीतसें नमन।
प्रार्थीं तयास हें कीं, निष्पाप असो सदा मदीय मन ॥ ७ ॥

—ले. य. ल. गुण्ये, ग्वाल्हेर दरबार वकील, पुणें.
५-३-१८९७

प्रकरण ३ रें

वंशविस्तार व कोंकणांतील मूळ गांव आणि वंशावळीचें स्पष्टीकरण

वंशविस्तार—येथून पुढें प्रकरण ४, ५, ६ मध्यें या घराण्याच्या निरनिराळ्या शाखांच्या वंशावळी व त्या वंशावळींतून आलेल्या व्यक्तींची माहिती देण्याचें योजिलें आहे. वंशावळीच्या शुद्धाशुद्धतेबद्दल चर्चा त्या त्या प्रकरणाचे प्रारंभीं केली आहे. शिवाय त्यानंतर प्रत्येक व्यक्तीस निश्चिती यावी म्हणून कागदोपत्रींचे खंड १ मधील आधार दिले आहेत. आजपर्यंत मिळालेल्या माहितीवरून त्या त्या शाखेंतील व्यक्तींच्या कोंकणांतील मूळ गांवाचे आधारें या घराण्याच्या पुढीलप्रमाणें **५ प्रमुख शाखा होतात. त्या येणेंप्रमाणें—(१) मठ-शाखा, (२) चांफेट-शाखा, (३) आडिवरे-राजवाडी-शाखा, (४) सासवड-पुणें शाखा, (५) शिरगांव-इंदूर शाखा.**

प्रकरण ४ मध्यें मठशाखेचा वृत्तान्त, प्रकरण ५ मध्यें चांफेट शाखेचा व प्रकरण ६ मध्यें राहिलेल्या ३ शाखांचा वृत्तांत ‘संकीर्ण’ या शीर्षकाखालीं दिला आहे.

कोंकणांतील मूळ गांव—सर्व गुण्यांचें कोंकणांतील मूळ गांव कोणतें हें मिळालेल्या माहितीवरून निश्चित सांगतां येत नाहीं. तरी पण अतिशय विस्तृत अशा व ह्या वृत्तान्तांतील $\frac{3}{4}$ पेक्षां अधिक भाग ज्यांनीं व्यापिला

आहे अशा मठ व चांफेट शाखांचें मूळगांव रत्नागिरी तालुक्यांतील असोडें असावें हें निश्चित सांगतां येतें.

इ. स. १७७४ मधील सदाशिवभट गुण्ये यांच्या पुरसीसींत पुढीलप्रमाणें माहिती आलेली आहे. " .... आमचे वडील **असोंडें** यांत नांदत असतां समई ओढ्यापलीकडील लागवणांत पाटपाणी काढून वसाहत केली होती. त्याजवर कनकगीर गोसावी याणें असोंडे व खानु व आजणारी या तिही गांवची जमीन हकीमापासून मागोन घेऊन गांव सचंत्र करून घेतला आणि देवळाजवळ मठ बांधिला. म्हणून गांवाचें नांव मठ येसें पडिलें. त्या समयीं वडिलांनीं गांवचं मूलपण व खोती व ग्रामोपाधिक व इनाम जमीन; हकिमीं येसीं वतनदारी करून घेतली. ते कारकीर्द राजा नरपति विद्यानगर येसीं आख्या आहे. त्यापासून सर्व अधिकार आमचे वडील करीत आले. त्यांची नांवें लिहावीं, तर बहुता वर्षांचे वृत्त आहे. यास्तव नांवें लागत नाहीं. त्या अलिकडे कारकीर्द विजापूरच पातशाही तेव्हां पुढें सैदास गांव मोकासा जाहला आपले पुरुष रामभट त्याचे पुत्र शंकरभट त्याचे पुत्र विष्णुभट हे सर्व गांवचा कारभार करीत......... " (ले. ३६ खं. १ पहा.)

या उताऱ्यावरून मठ-शाखेंतील गुण्यांचे संबंधीं पुढील अनुमानें करतां येतात : (१) मठची वसाहत होण्यापूर्वी गुण्ये असोंडें गांवांत राहत होते. (२) मठची वसाहत विजयनगरचे कारकीर्दींत म्हणजे इ. स. १३७५चे सुमारास झाली असावी. (३) मठची वसाहत होण्यापूर्वी म्हणजे सु. इ. स. १३७५ च्या पूर्वी गुण्ये असोंड्यांत राहत असावेत. (४) मठची वसाहत झाल्यानंतर पुढें आदिलशहाचा तळकोंकणांत अंमल होईतोंपर्यंतची गुण्ये व्यक्तींची वंशावळ-हकिकत बरीच जुनी असल्यामुळें देतां येत नाहीं, असें म्हटलें आहे. (५) विजापूरचा तळकोंकणांत अंमल सुरू झाल्यापासूनची वंशावळ दिलेली आहे. (६) मठची वसाहत झाल्यापासून व विजापूरचा तळकोंकणांत अंमल होई-तोंपर्यंत म्हणजे इ. स. १३७५ पासून इ. स. १५२५ पर्यंत सुमारें १५० वर्षें कालावधींत गुण्ये व्यक्तींची वंशावळ देतां आलेली नाहीं. या कालावधींत निदान ५ पिढ्या तरी झाल्या असाव्यात, व विजापूरचे अंमलापासून आज-तागायतपर्यंतच्या तेरा पिढ्यांचीं नांवें उपलब्ध आहेत. यापासून सुमारें

गेल्या २० पिढ्या गुण्यांची मठ गांवांत वस्ती आहे. विजयनगरचा तळ-कोंकणांत इ. स. १३७० ते १४३० पर्यंत अंमल होता. १४३० पासून पुढें १५०२ पर्यंत तळकोंकणांत एक प्रकारची बंडाळी चालू होती. १३०० पासून आजपर्यंत म्हणजे सुमारें ६०० वर्षे गुण्ये मठांत आहेत.

चांफेट-शाखेबद्दल इतकी जुनी माहिती उपलब्ध नाहीं तरी पण अदिल-शाहींच्या कारकीर्दीपासून म्हणजे सुमारें १६०२ पासून गुण्ये चांफेटांत आहेत.[1] चांफेट शाखेचे मूळपुरुष केशवभट गुण्ये यांचा काळ इ. स. १६०० च्या मागें नेतां येत नाहीं.[2] पुनसेंतील गुण्यांचें ग्रामोपाधिक केंव्हां-पासूनचें आहे हें समजत नाहीं. तथापि इ. स. १६००च्या सुमारास कृष्ण पाध्ये (गुण्ये) यांनीं पुनसेची खोती केल्याचा उल्लेख आहे.[3] त्यावरून त्या काळीं गुण्यांचा पुनसेशीं संबंध असावा असें दिसतें.

मठ-शाखेच्या वंशावळींतील मूळपुरुष रामभट यांचा काल इ. स. १५७० किंबहुना त्याहिपेक्षां पूर्वीचा आहे.[4] (खं. १ ले. ९९ पाहा.) चांफेट-शाखेचे

---

१. “ नमस व जागलधाट.........ठिकाणें ईदलशहा कारकीर्दीस इनाम चालत होतीं.........”—गोविंद नारायण गुण्ये इ. स. १७६८ तील यादि-करीणा. (खं. १ ले. २८ पहा.)

२. मूळ पुरुष केशवभट यांचे पुत्र हरभट व कृष्णंभट या उभयतां बंधूंमध्यें सुमारें इ. स. १८६८ त वांटणीपत्र झाल्याचा पुढीलप्रमाणें उल्लेख आहे. त्यावरून केशवभटाचा काल १६०० असा निश्चित करतां येतो—गोविंद नारायण गुण्ये यांचा यादिकरिणा इ. स. १७६८. “ ....वांटप झाले त्यास वर्षे अदमासें शंभर होतील..........(खं. १ ले. २८ पहा.)

३. इ. स. १७६४ तील गोविंद नारायण यांचा करीणा “ ....आमचे आजे कृष्ण पाध्यें यांणी...... खोतीचा कारभार केला......त्याजवर रामाजी अनंत सुभेदार यांची कारकीर्द......” (खं. १ ले. २४ पहा.) रामजी अनंत सुभेदार इ. स. १६०० पासून दाभोळ सुभ्यास होता.

४. जबानी सदाशिवभट गुणे यांची इ. स. १७०३ मधील—“ ......पुत्र कृष्णभट आजे, कारकीर्द शिवाजीराजे.......” (खं. १ ले. ३८ पहा.)

मूळ पुरुष केशवभट यांचा काळ इ. स. १६००. रामभट व केशवभट यांचे-मध्यें एका पिढीचें अंतर पडतें. मठ-शाखेच्या सर्वसामान्यतः १३ पिढ्या होतात व चांफेट-शाखेच्या सर्वसामान्यतः १२ पिढ्या होतात. केशवभट व रामभट हे कदाचित् समकालीन असावेत.

केशवभट हे किंवा यांचे पूर्वज बहुतांशीं मठांतून चांफेटास आले असावेत. मठ व चांफेट यांत अवघें ५ मैलांचें अंतर आहे. कोंकणांत गुण्ये मठचे म्हणूनच संबोधिले जातात. चांफेटकर गुण्ये अर्थात् सध्यां कोंकणांत असलेली मंडळी 'आम्हीं मूळचे मठचे आहोंत' असें म्हणतात. चांफेटकर गुण्यांच्या कुलदेवतेंत मठ येथील गुण्यांची कुलदेवता भवानी सोमेश्वर हिचा प्रामुख्यानें उल्लेख केला जातो. कोंकणांत अद्यापपर्यंत मठकर गुण्ये व चांफेटकर गुण्ये एकमेकांबद्दल तीन दिवस सुतक पाळतात. मठच्या वंशावळींत मूळ पुरुष रामभट यास पुत्र, नातू व पणतू एकेकच दाखविले आहेत. सामान्यतः आजाच्या बंधूचें स्मरण फारच क्वचित् वेळां राहतें. मग सदाशिवभटांनीं इ. स. १७७३ त मागील सहा पिढ्यांची माहिती देतांना कदाचित् रामभटांचे पुत्र, नातू, पणतू इत्यादि विसरल्यामुळें वगळले असल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. आज तरी मठ व चांफेट शाखेचा मूळपुरुष एक आहे असें दाखवितां येत नाहीं. एवढें खरें कीं, चांफेटकर गुण्ये मूळचे मठचे व मठ-शाखेंतील मंडळी मूळची असोंडें गांवची राहणारी.

याप्रमाणें मठ व चांफेट-शाखांचें मूळगांव असोंडें हें निश्चित ठरतें.

मठ व चांफेट; आडिवरें, सासवड, पुणें व शिरगांव-इंदूर या सर्व शाखांचा मिळून एकमेकांशीं मूळचा संबंध काय हें सांगणें उपलब्ध माहितीवरून तरी अशक्य आहे. 'संकीर्ण' प्रकरणांत या अन्य त्रोटक शाखांबद्दल सविस्तर चर्चा केलेली आहे. सासवड-पुणें शाखेंतील मंडळींनीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सुभा सावर्डें यांतील मूळगांव खेडें असा नाशिक, त्र्यंबकेश्वर येथील लेखांत उल्लेख केला आहे. आडिवरें राजापूर तालुक्यांत आहे. शिरगांवहि राजापूर तालुक्यांतच आहे. आडिवरे-शाखेंतील कांहीं गुण्ये मूळ गांव चांफेट असा ना. त्र्यं. चे लेखांत उल्लेख करतात. त्यामुळें ती शाखा कदाचित् चांफेट-शाखेची उपशाखा असण्याचा संभव आहे. एकूण सर्व गुण्ये मंडळी रत्नागिरी व राजापूर

तालुक्यांतील राहणारी होत. सर्वांचें मूळ गांव कोणतें हें उपलब्ध माहिती-वरून निश्चित करतां येत नाहीं.

वंशावळींचें स्पष्टीकरण—वंशावळीचे शिरोभागीं (त्या त्या प्रकरणांतील वंशावळीनुसार) अनुक्रम नं. दिला आहे. व तसेंच खुलाशाकरितां थोडी माहिती दिलेली आहे. डाव्या बाजूस रकान्यांतील आंकडे. पिढी-नंबर आहेत. पिढयांचा अनुक्रम दर पिढीस चढता ठेवला आहे. हे क्रमांक त्या त्या वंशावळीपुरते मर्यादित आहेत. वंशावळ ज्या पुरुषाचा विस्तार दर्शवितें त्या पुरुषाच्या मागील सर्व पुरुष त्यास जोडूनच चौकटी कंसांत दाखविले आहेत. त्यामुळें प्रत्येक वंशावळ ही अगदीं मूळपुरुषापासून तों तींतील अखेरच्या पुरुषापर्यंत सर्व वंशविस्तार दर्शवितें. (उदा. मठ-शाखा वंशावळ नं. २ कृष्णाजी विष्णु (१–६–८) या १, ६, ८ नंबरपैकीं १ नंबर वंशावळ नंबर दर्शवितो. ६ हा पिढी दर्शवितो व ८ नंबर त्या वंशावळींतील त्या व्यक्तीचा क्रमांक दर्शवितो; कृष्णाजी–विष्णु यांस लागून असलेले कृष्ण-विष्णु इत्यादि चढत्या क्रमानें मुळपुरुषांपर्यंतचे सर्व पुरुष दर्शवितात.)

वंशावळी लिहितांना ज्या ज्या लोकांनीं नाशिकयात्रा व त्र्यंबकेश्वरयात्रा करून स्वतःचा लेख दिला आहे त्यांचे नांवांखालीं ना. या. किंवा त्र्यं. या. असा उल्लेख केला आहे. यांत नाशिकयात्रेचे अस्सल लेख वे. शा. सं. चिंतामण जगन्नाथ भडकमकर, गुण्यांचे नाशिकचे उपाध्ये, यांचेकडे पहावयास मिळतात. तसा प्रकार त्र्यं. येथील लेखांचा नाहीं. ना. या. किंवा त्र्यं. या. हा उल्लेख सर्वच ठिकाणीं नसून मधूनमधून केला आहे.

वंशावळींतील स्त्रियांचीं नांवें या लेखांचे आधारानेंच दिलीं आहेत. प्रकरण ४, ५ व ६ यांत व्यक्तींची माहिती देतांना प्रकरणाच्या आरंभीं एकदां सर्व वंशावळी दिल्यानंतर त्या वंशावळीच्याच.अनुक्रमानें सर्वांची माहिती दिली आहे. विद्यमान व्यक्तींच्या मागें * हें चिन्ह घातलें आहे. प्रत्येक व्यक्तीची माहिती देतांना प्रथम जन्म व मृत्युशक, नंतर भार्येचें नांव, अनेक भार्या असल्यास क्रमानें प्रत्येकीच्या आपत्यांचीं नांवें भार्येच्या माहितीनंतर लगेच दिलेलीं आहेत. भार्येच्या नांवानंतर तिच्या माहेरच्या उपनांवाचा व कंसामध्यें गांवाचा उल्लेख केला आहे. गुण्यांचे घराण्यांतील माहेरवासिणींची माहिती देतांना फक्त सासरचें आडनांव व गांव यांचा उल्लेख केलेला आहे. क्वचित् ठिकाणीं आलेले हें + चिन्ह भ्रतार दर्शवितें.

आपण मूळचे कोणत्या घराण्यांपैकीं आहोंत हें पुढें देत असलेल्या कालानुक्रमें होत गेलेल्या वसाहतींच्या ठिकाणांवरून सहज लक्षांत येईल.

शाखा चांफेट–१

- असोडे शके ११०० ते १३५०. ता. रत्नागिरी (इ. स. १३००–१४००)
  - मठ इ. स. १४००
    - चांफेट इ. स. १५०० चा सुमार
      - काले इ. स. १७०० चा सुमार (जिल्हा सातारा)
        - पुणें
          - धार
        - भिलवडी
        - कऱ्हाड
      - सातारा इ. स. १७२० चा सुमार
        - अश्वि इ. स. १७८० (जि. नगर)
          - कोल्हापूर १८८०
            - पंढरपूर
            - अहमदनगर
            - संगमनेर इ. इ.

शाखा चांफेट–२. (वडील घराणें)

- असोडे सुमारें इ. स. १३००–१४००
  - मठ इ. स. १४००
    - चांफेट इ. स. १५००

- इंदूर, जालवण, झांशी, पुणें, चाफळ इ. स. १८०० च्या सुमारास
  - चांफेट (हल्लीं या ठिकाणच्या मंडळींची कांहींच माहिती नाहीं.)
- पुणें अंधरसुला (जि. नाशिक) इ. स. १८४०
  - मुंबई.

शाखा मठ.

- असोडे शके ११०० ते १३५०
  - मठ इ. स. १४००
    - हरचिरी इ. स. १७४०
      - पुणें
        - हरचिरी
          - कुर्णे
            - वेरळ
    - पुणें इ. स. १८००
      - ब्रह्मावर्त १८१८
        - ग्वाल्हेर १८५०
      - झांशी
        - बीना
    - कापडगांव (रत्नागिरी)
      - पुणें
        - ब्रह्मावर्त
          - ग्वाल्हेर
      - मुंबई १८९७
        - ग्वाल्हेर
          - वर्धा १९१४
            - पुणें १९३५

शाखा सासवड-पुणें-पन्नाः—

वरवडें प्रांत दाभोळ शके १६३०
|
खेडें सुभा सांवर्डें शके १६४१
|
सासवड शके १६५०
|
पुणें इ. स. १७९०
|
पन्ना १९१०

शाखा शिरगांव-इंदूरः—

शितेवेळंब इ. स. १७००
|
शिरगांव प्रान्त दाभोळ
|
नाशिक १७७८
|
इंदूर इ. स.१८३०

या शाखेपैकीं गणेश पांडुरंग गुण्ये यांनीं संवत् १९३५ त काशीयात्रा करून तेथें लेख दिला आहे. त्यांत मूळगांव शिरगांव, नंतर नाशिक, हल्लीं इंदूर, असा उल्लेख आहे. शितेवेळंबे या शाखेचें मूळगांव असल्याचा उल्लेख नाशिकयात्रेच्या लेखांत यांच्या एका पूर्वजानें केला आहे. आज यांचेपैकीं कोणी मंडळी आहेत अगर नाहींत याबद्दलची माहिती मिळाली नाहीं.

नाशिक येथील एका लेखासंबंधीं कांहीं चर्चा-लेख येणेंप्रमाणें—" वे. शा. सं. राजमान्य राजेश्री यज्ञेश्वर दिक्षित भडकमकर यांसी विद्यार्थी पांडुरंगभट बिन रामभट पुराणिक राहणार खिणगिणी पुत्र सिवराम आजे विनायकभट व पणजे सीताराम उपनांव गुण्ये. "

हल्लीं गंगाधर विष्णु पुराणिक म्हणून खिणगिणी, पोस्ट राजापूर, येथें आहेत असें कळल्यावरून त्यांना पत्र पाठविलें. परंतु कांहींच उत्तर आलें नाहीं. रा. रा. रामचंद्र गोपाळ गुण्ये मु॥ राजवाडी, पोस्ट आडिवरें, यांच्या पत्रांतील या लेखांसंबंधीं मजकूरः—" खिणगिजी हें नांव नसून पंढरवले हें नांव उपलब्ध

झालें आहे. तेथील रा. रा. गंगाधर विष्णु पुराणिक हे गुण्ये नसून पुराणिक नांवाचेच आहेत, असें वडील सांगतात. त्यांना गोत्रें २ लागतात. अत्रि किंवा भारद्वाज. त्यांचीं आणखी कांहीं माहिती मिळाल्यास पाठवून देतों. याच्यापेक्षां जास्त माहिती माझ्या वडिलांना नाहीं." यावरून वरील नाशिक येथील लेखांतील पुराणिकांचें गुण्ये हें नांव चुकून पडलें असावें असें वाटतें.

प्रकरण ४ थें

मठ-शाखेचा वृत्तान्त

या प्रकरणांत देत असलेली मठ-शाखेची वंशावळ पुढील ५ कागदपत्रांच्या आधारें व नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील लेखांच्या साहाय्यानें तयार केली आहे तीं कागदपत्रें—(१) इ. स. १७७४ मधील सदाशिवभट गुण्ये यांची पुरसीस (ले. नं. ३६ खंड १ पहा); (२) अंताजी केशव गुण्ये मु॥ मठ यांनीं दिलेली वंशावळ. (३) दिवडचे इनामदार विश्वनाथ दत्तात्रय गुण्ये यांच्या संग्रहांतील वंशावळ. (४) ग्वाल्हेर दरबार वकील यशवन्तराव गुण्ये यांच्या संग्रहांतील वंशवृक्ष–पाली येथें संवत् १९५१ मध्यें कै. रामचंद्र यशवन्त गुण्ये यांनीं तयार केलेला. (५) कै. यशवन्तराव लक्ष्मण गुण्ये शिलेदार यांनीं लिहून ठेवलेली पितृतर्पणाची यादी. (ले. नं. ९७ खंड १ पहा).

संवत् १९५१ मध्यें पाली कापडगांव येथें तयार केलेल्या वंशवृक्षांत एक ढोबळ चूक आहे. या प्रकरणांत पुढें देत असलेल्या वंशावळ नं. १ मध्यें चवथ्या पिढीचे कृष्णभट यांचे पुत्र अनंतभट दाखविले आहेत. सदरील वंशवृक्षांत अनंतभटाचा उल्लेख न करतां चुकीनें चवथ्या पिढीचे कृष्णभट यांचे पुत्र सदाशिवभट व रामभट (पिढी नं. ६) दाखविले आहेत. ही चूक सर्वांनीं दुरुस्त करून घ्यावी.

पुढें देत असलेल्या वंशावळ नं. १ मधील धोंडोपंत अनंतभटाचे पुत्र असून ते जनार्दनभट (१, ७) यांनीं दत्तक घेतले असावेत असें त्र्यं. लेखावरून दिसतें. तेथील लेखांत प्रथम वंशावळ नं. १, ६ व्या पिढींचे रामभट व धोंडोपंत सख्खे बंधु असा उल्लेख आहे व पुढें चुलतबंधु असा उल्लेख आहे. वंशावळ

नं. १ मध्यें चवथ्या पिढीचे राघोपंत यांचा उल्लेख बाळंभट गुण्ये यांच्या व्यं. लेखांत आहे. इतरत्र कुठेंहि नाहीं. वंशावळ नं. २ मध्यें माहितीच्या अभावीं वयोमानाप्रमाणें व्यक्ति दाखवितां आलेल्या नाहींत.

या प्रकरणांतील वंशावळीसंबंधीं कांहीं महत्त्वाची माहिती—

या प्रकरणांतील वंशावळ नं. १ पहा. चवथ्या पिढीचे कृष्णंभट यांस पुत्र चार. त्यांपैकीं बाळंभट (१–५) सोडून राहिलेले तिघे बंधू म्हणजे विष्णुभट (१–४), अनंतभट (१–६) व जनार्दनभट (१–७) या तिघांचाच काय तो वंशविस्तार द्यावयाचा. व तदनुक्रमें या प्रकरणांत वंशावळीच्या तीन तक्षिमा केल्या आहेत. वडील विष्णुभट यांचा विस्तार म्हणजे तक्षिम नं. १, अनंतभट यांचा विस्तार म्हणजे तक्षिम नं. २, जनार्दनभट यांचा विस्तार म्हणजे तक्षिम नं. ३. विष्णुभटास पुत्र २. कृष्णाजीपंत (१–८) व रघुनाथपंत (१–९) कृष्णाजीपंताचा विस्तार म्हणजे मठ-शाखा वडील घराणें. खुद्द मठमध्यें राहणारी मंडळी. रघुनाथपंताचा विस्तार म्हणजे मठ-शाखा वडील घराणेंच; परंतु रघुनाथभट मठ-शाखेंतून इ. स. १७४९ त विभक्त झाले. पुढें ते हरचिरीस राहूं लागले. हरचिरींतून पुढें यांचे वंशज कुर्णे, वेरळ वगैरे ठिकाणीं गेले. तेव्हां तक्षिम नं. १ चें पुनः दोन विभाग येणेंप्रमाणें:—कृष्णाजी-पंताचा विस्तार म्हणजे तक्षिम नं. १ अ व रघुनाथपंताचा विस्तार म्हणजे तक्षिम नं. १ ब.

त्याचप्रमाणें तक्षिम नं. २ चे अनंतभट यांस पुत्र २ : सदाशिवभट (१–१०) व रामभट (१–११). सदाशिवभटाचे वंशज मठांतून विभक्त होऊन कापड-गांवास रहावयास गेले. तेथून पुढें ग्वाल्हेर, ब्रह्मावर्त वगैरे ठिकाणीं यांचा विस्तार झाला. रामभटाचे वंशज एकदम मठांतून ब्रह्मावर्त व ग्वाल्हेर येथें गेले. याप्रमाणें तक्षिम २ चे पुन्हां येणेंप्रमाणें, सदाशिवभटाचा विस्तार म्हणजे तक्षिम नं. २ अ, व रामभटाचा विस्तार म्हणजे तक्षिम नं. २ ब असे विभाग केले आहेत.

चवथ्या पिढीचे जनार्दन कृष्ण यांच्यापैकीं कांहीं मंडळी मठासच राहिली व कांहीं ब्रह्मावर्त व ग्वाल्हेर येथें गेली.

या मठ-शाखेच्या पुढें देत असल्याप्रमाणें एकूण ११ वंशावळी छापण्याच्या सोईकरितां केल्या आहेत. वंशावळींतून आलेल्या व्यक्तींना कागदोपत्रींचे आधार येणेंप्रमाणें देतां येतात:—

वंशावळ नं. १ या वंशावळींतील सर्व व्यक्तींचा उल्लेख खंड १ मधील ले. ३८ मध्यें आला आहे. चौथ्या पिढीचे राघो विष्णु यांचा उल्लेख ले. ३८ मध्यें नसून याच वंशावळींतील पांचव्या पिढीचे बाळंभट गुणे यांच्या त्र्यं. च्या लेखांत आहे. त्र्यं. येथील लेखांच्या वाचनावरून धोंडोजनार्दन (१२)* हे अनंतभटाचे (६) पुत्र जनार्दनभटांनीं दत्तक घेतले असावे असें दिसतें. परंतु खं १ मधील ले. ३८ मध्यें तसा उल्लेख नाहीं.

वंशावळ नं. २—गोपाळकृष्ण (१)* ले. ५०; विष्णुकृष्ण (३) ले. ६८; मोरो विष्णु (११) ले. ६९. या वंशावळींतील पिढी नं. ८ ते १० या अगदींच अलिकडच्या आहेत. मठच्या गुण्यांच्या सांगण्याप्रमाणें नांवें लिहिलीं आहेत, व तसेंच ना. त्र्यं. च्या लेखांचाहि आधार दिला आहे.

वंशावळ नं. ३ आणि ४ या विद्यमान व्यक्तींच्या चालू वंशावळी आहेत.

वंशावळ नं. ५—रघुनाथ नारायण (२); गंगाधर नारायण (३);—ले. ८२; गणेश (७) कृष्णाजी (८) रामचंद्र (९) रघुनाथ—ले. ८२; शंकराजी विठ्ठल (१३) मावळंकर घराण्याचा इतिहास उत्तरार्ध खं. २, पृ. ३०२. काशिनाथ व सखाराम विठ्ठल यांच्यासंबंधीं विशेष माहिती व्यक्तिगत माहितींत पहा.

वंशावळ नं. ६ कुर्णेदप्तर व दिवड दप्तरांतील वंशावळीच्या आधारानें तयार केली. ही वंशावळ गेल्या पन्नास वर्षांसंबंधींच आहे.

वंशावळ नं. ७ चालू वंशावळ.

वंशावळ नं. ८ आधारार्थ लेखांक ९७ पहा.

वंशावळ नं. ८, ९, १० व ११ पाली—कापडगांव (ता. रत्नागिरी) येथें संवत् १९५१ मध्यें ग्वाल्हेरच्या कै. रामचंद्र यशवंत गुण्ये (८–१४) मठ; यांनीं तयार केलेल्या वंशवृक्षाच्या आधारें दिल्या आहेत.

---

*एका विशिष्ट वंशावळींतील व्यक्तींना कागदोपत्रींचे आधार देतांना त्या त्या व्यक्ति लवकर ओळखूं याव्यात म्हणून त्या विशिष्ट वंशावळींतील त्या त्या व्यक्तींचे क्रमांकच फक्त कंसांत दिले आहेत. या इतिहासाच्या खंड १ मधील लेखांक, आधारार्थ दिले आहेत. ज्या व्यक्तींना ना. व त्र्यं. च्या लेखांचे आधार दिले आहेत त्यांना पुनः खंड १ मधील लेखांकाचे आधार शक्य तों दिले नाहींत.

पिढी नं. | वंशावळ नं. १]

मठ-शाखेची वंशावळ

रामभट मूळपुरुष (सुमारें इ. स. १५६५)

- २ — शंकरभट
  - ३ — १ विष्णुभट
    - ४ — २ कृष्णंभट
      - ५ — ४ विष्णुभट
        - ६ — ८ कृष्णाजी+रखमाबाई (वं. नं. २)
        - ६ — ९ रघुनाथ (वं. नं. ५)
        - (अ) ←तक्षिम १→ (ब)
      - ५ — ५ बाळंभट — o ना. या.
      - ५ — ६ अनंतभट
        - ६ — १० सदाशिवभट (वं. नं. ८)
        - ६ — ११ रामभट (वं. नं. १०)
        - (अ)←तक्षिम २→(ब)
        - ६ — *धोंडोपंत
      - ५ — ७ जनार्दनभट
        - ६ — १२ *धोंडोपंत दत्तक (वं. नं. ११) आले
        - तक्षिम ३
    - ४ — ३ राघोपंत — o

पिढी न. | वंशावळ नं. २]

शाखा-मठ वडील घराणें

[तक्षिम १ ली (अ)

[कृष्णाजी (१-६-८),-विष्णु-कृष्ण-विष्णु-शंकर-राम]

७ — १ गोपाळ; २ अनंत+आनंदी (ना. या.); ३ विष्णु; ४ भास्कर (०)

८ — ५ नारायण; ६ कृष्णाजी (०); ७ भिकाजी (०); ८ महादेव (०); ९ विठ्ठल+रखुमाई; १० श्रीधर; ११ मोरो+अन्नपूर्णा (० ना. या.)

९ — १२ केशव (वं.नं.३); १३ वामन +सगुणा ऊर्फ वाराणसी (वं. नं. ४); १४ विनायक (ना.या.); १५ बाळकृष्ण; १६ रामचंद्र (० ना.या.); १७ सदाशिव (०)

१० — १८ रामकृष्ण; १९ रामचंद्र (०); २० जनार्दन (०); २१ हरि (०)

११ — २२ गोविंद ऊर्फ बापू (०)

पिढी नं. | वंशावळ नं. ३] शाखा-मठ वडील घराणें [तक्षिम १ ली (अ) चालू

[केशव (२-९-१२)—नारायण—गोपाळ—कृष्णाजी—विष्णु—कृष्ण—विष्णु—शंकर—राम]

१० १ दत्तात्रेय २ अनंत

११ ३ वामन ४ श्रीराम ५ श्रीरंग ६ पांडुरंग ७ नारायण ८ जगन्नाथ ९ यशवंत १० नरहरि

१२ १२ जयराम १३ विनायक ११ रघुनाथ

(मठ) (मठ) १०

पिढी नं. | वंशावळ नं. ४; वं. नं. २ वरून] शाखा-मठ वडील घराणें [तक्षिम १ ली (अ) चालू

[वामन (२-९-१३)—नारायण—गोपाळ—कृष्णाजी—विष्णु—कृष्ण—विष्णु—शंकर—राम]

१० वासुदेव

ना. या.

११ गणपति गोपाळ


१२ केशव विष्णु प्रभाकर दिनकर

[मुंबई (गिरगांव)] [मुंबई (गिरगांव)]

पिढी नं.	वंशावळ नं. ५] शाखा-मठ, वडील घराणें-पोटशाखा कुणें-दिवड [तक्षिम १ ली (ब)
	वंशावळ नं. १ वरून चालू—
	[रघुनाथ (१-६-९)-विष्णु-कृष्ण-विष्णु-शंकर-राम]
७	१ नारायण+लक्ष्मी ना. या.
८	२ रघुनाथ+ जानकी ३ गंगाधर ४ विसाजी ५ हरि ६ विठ्ठल
९	७ गणेश ८ कृष्णाजी ना. या. (वं. नं. ६) ९ रामचंद्र १० सीताराम (वं. नं. ७) ११ यशवंत (नारो ?) १२ काशिनाथ १३ शंकराजी
	१४ सखाराम त्र्यं. या.

पिढी नं॰ | वंशावळ नं. ६] शाखा-मठ, वडील घराणें-पोटशाखा कुणें-दिवड [तक्षिम १ ली (ब) चालू

[रघुनाथ (५-८-२)-नारायण-रघुनाथ-विष्णु-कृष्ण-विष्णु-शंकर-राम]



पिढी नं. | वंशावळ नं. ७]   शाखा-मठ, वडील घराणें-पोटशाखा कुणें   [तक्षिम १ ली (ब) चालू

वंशावळ नं. ५ वरून—

[सीताराम (५-९-१०)-गंगाधर-नारायण-रघुनाथ-विष्णु-कृष्ण-विष्णु-शंकर-राम]

१० | १ रघुनाथ   २ गोपाळ+आनंदी

११ | ३ कृष्णाजी ४ *विष्णु (दत्तक आले)   ५ गणेश   ६ वासुदेव   ७ मोरेश्वर   ८ विनायक   ९ शिवराम

१२ | १० राजाराम   ११ रामचंद्र १२ *लक्ष्मण (दत्तक) १३ सखाराम १४ अनंत १५ शंकर   १६ दत्तात्रेय १७ गंगाराम

१३ | १८ भास्कर १९ मुकुंद (कुणें)   २० श्रीनिवास २१ शांताराम २२ गोपिनाथ २३ मोरेश्वर (वेरळ)   २४ प्रभाकर २५ गजानन (कुणें)

पिढी नं. | वंशावळ नं. ८] शाखा-मठ, पोटशाखा कापडगांव व ग्वाल्हेर [तक्षिम २ (अ)

वंशावळ नं. १ वरून—

[सदाशिवभट (१-६-१०)–अनंतभट–कृष्णंभट–विष्णु–शंकर–राम]

७ — १ बाजीश (०) · २ लक्ष्मणभट+रमा · ३ शंकर (०) · ४ सखाराम (०)

८ — (२ लक्ष्मणभट यांचे पुत्र) ५ सदाशिव+गोपिका · ६ घनःश्याम (०) · ७ शिवरामभट+पार्वती · ८ यशवंतराव+सरस्वती · ९ वासुदेव+वाराणसी (०)

९ — (५ सदाशिव यांचे पुत्र) १० काशिनाथ · ११ आत्माराम · १२ विसाजीपंत (०) · १३ विष्णुभट+जानकी (वं. नं. ९); (८ यशवंतराव यांचा पुत्र) १४ *रामचंद्र+राधा (द. आ.) (०)

१० — (१० काशिनाथ यांचा पुत्र) १५ शिवराम (०) · (११ आत्माराम यांचा पुत्र) १६ *रामचंद्र (दत्तक)

पिढी नं. | वंशावळ नं. ९] शाखा-मठ, पोटशाखा ग्वाल्हेर-पुणें [तक्षिम २ (अ) चालू

[विष्णुभट (८-९-१३)–शिवराम–लक्ष्मण–सदाशिव–अनंत–कृष्ण–विष्णु–शंकर–राम]

10 १ लक्ष्मणराव+सुंदरा २ कृष्णराव+सावित्री ३ दिनकर+रमा ४ गणपतराव+सावित्री

11 ५ यशवंतराव+ { सरस्वती, सरस्वती, इंदिरा } ६ सदाशिव

12 ७ शरच्चंद्र ८ वसंत ९ मुकुंद १० श्यामकांत

(पुणें)

[तक्षिम २ (ब)

शाखा-मठ, पोटशाखा ग्वाल्हेर

पिढी नं. वंशावळ १०]

वंशावळ नं. १ वरून—

[रामभट (१-६-११) अनंतभट–कृष्णभट–विष्णुभट–शंकर–राम]

पिढी नं.	
७	१ नारायण (o) ; २ अनंत
८	३ छोटू (o) ; ४ बाळशास्त्री ; ५ राजाराम उर्फ गोपाळ ; ६ नारायण
९	७ लक्ष्मण ; ८ विनायक उर्फ बाळकृष्ण ; ९ अनंद उर्फ सोनभट ; १० वामन (o)
१०	११ नारायण ; १२ गोपाळ ; १३ महादेव उर्फ चिंतामणी ; १४ रामकृष्ण ; १५ शंकर ; १६ रघुनाथ
११	१७ प्रभाकर ; १८ वसंत

(रामभट : १ नारायण, २ अनंत. २ अनंत : ३ छोटू, ४ बाळशास्त्री, ५ राजाराम उर्फ गोपाळ, ६ नारायण. ४ बाळशास्त्री : ७ लक्ष्मण, ८ विनायक उर्फ बाळकृष्ण. ५ राजाराम : ९ अनंद उर्फ सोनभट. ६ नारायण : १० वामन. ७ लक्ष्मण : ११ नारायण, १२ गोपाळ. ८ विनायक : १३ महादेव उर्फ चिंतामणी, १४ रामकृष्ण. ९ अनंद : १५ शंकर, १६ रघुनाथ. ११ नारायण : १७ प्रभाकर. १२ गोपाळ : १८ वसंत.)

(ग्वाल्हेर)

वंशावळ नं. ११] **शाखामठ पोटशाखा मठ व ग्वाल्हेर बीना** [तक्षिम ३

वंशावळ नं. १ वरून—

[धोंडो (१-६-१२) जनार्दन–कृष्ण–विष्णु–शंकर–राम]

पिढी नं.						
७	१ सीताराम		२ गणेशपंत		३ बल्लाळ उर्फ बाबाजीपंत	
८	४ कृष्णराव	५ नारायण	६ विठ्ठलपंत दत्तक		७ मोरोबा	
९	८ सीताराम उर्फ छोटू भैया	९ बळवंत उर्फ बाळकृष्ण	१० महादेव	११ लक्ष्मण	१२ धोंडभट	१३ रामचंद्र
१०	१४ श्रीनिवास, १५ त्र्यंबक	१६ शंकर				१७ गणपति, १८ वामन
११	१९ नारायण (बीना)					२० लक्ष्मण, २१ रामचंद्र

मठ-शाखेचा वृत्तान्त—वंशावळीचे अनुक्रमानें चालू—

वंशावळ नं. १ (पृ. नं. २३८ पहा.)

या घराण्यांतील कांहीं पुरुष मठची वसाहत होण्यापूर्वी बरींच वर्षे मठच्या शेजारीं असलेल्या आसोडें या गांवांत राहत असावेत असें दिसतें. (खं. १ ले. ३६ पहा.) विजयनगरचा तळकोंकणांत अंमल असतांना म्हणजे इ. स. १४०० च्या सुमारास मठगांवची वसाहत कनकगीर गोसावी यानें केली. (खं. १ ले. ३६ पहा) व त्याच वेळीं त्यानें गांवचे सर्व हक्क व ग्रामोपाधिक वगैरे गुण्यांचे स्वाधीन केलें. विजयनगरनंतरचा काल म्हणजे बेदर व अदिलशहाची कारकीर्द होय. अदिलशहाचा तळकोंकणांत इ. स. १५०५ पासून अंमल सुरू झाला. त्या वेळेपासूनची या घराण्याची वंशावळ उपलब्ध आहे. अदिलशहाचे कारकीर्दीतील पुरुष–रामभट, त्याचे पुत्र शंकरभट, त्याचे पुत्र विष्णुभट या तीन पुरुषांनीं वतनें चालविलीं. यांचेबद्दल विशेष माहिती उपलब्ध नाहीं. (खं. १ ले. ३८ पहा.)

कृष्णंभट विष्णुभट (१–२) खं. १ ले. ९९ वरून यांचेसंबंधीं पुढील माहिती मिळते. हे गर्भी असतांनाच यांचे वडील विष्णुभट वारले. यांच्या मातुश्री पण लहानपणींच निवर्तल्या. विवाहसंबंध भाटवडेकर घराण्याशीं झाला. वडिलार्जित ' पूर्ववतनदारीचा परामृश केला तो असोडें गेले. ' तेव्हां यांनीं कोंडवी चिंद्रावलीहून भाटवडेकर, निवसराहून हलबे यांना आणून गांवाची उभारणी केली. डोंगरे व टेंबकर हेही पण याच सुमारास गांवांत आले. दामभट भाटवडेकराची स्त्री ती यांची मावशी. वडिलकी व ग्रामोपाधिकाचा व्यवसाय करीत. वैदिक होते. खोतीच्या कारभारांत गम्य नाहीं. यास्तव त्यांनीं खोती गोंद जोशी हलबे यांस सांगितली. इ. स. १६८० च्या सुमारास मृत्यु पावले असावेत. त्या समयीं त्यांचीं मुलें लहान होतीं म्हणून त्यांनीं गांवचा कारभार केसो रुद्र भाटवडेकर यांस सांगितला. ते कृष्णंभटाचे मेहुणे लागत.

रघुनाथ विष्णुभट (१–३) बाळंभट गुण्ये यांच्या त्र्यं. लेखांत यांचा उल्लेख आहे. विशेष माहिती मिळत नाहीं.

विष्णुभट कृष्णंभट(१-४) हे लहान असतांनाच वडील कृष्णंभट निवर्तले. जाणते झाल्यावर भाटवडेकरांकडील गांवचा कारभार आपल्याकडे घेण्याचा प्रयत्न केला परंतु तंटे झाले. त्यांतच पुढें ते निवर्तले. यांचा वंशविस्तार म्हणजेच मठ—वडील शाखा व कुरणें आणि दिवड शाखा होत. ते इ. स. १७०० च्या सुमारास निवर्तले असावे.

बाळंभट कृष्णंभट (१–५) यांना दोन कुटुंबें होतीं. (ले. ९९ पहा.) मठची खोती ३५-४० वर्षे केली. हे राज्यक्रान्तीचे सुमारास निवर्तले. कारण त्यांच्या पश्चात् त्यांच्या स्त्रिया क्रान्तीनंतर निवर्तल्याचा उल्लेख आहे. यांनीं मठच्या खोतीचे तीन सारखे विभाग केले. एक आपल्याकडे ठेवला. एक बाळंभट हलबे यांस दिला, व एक रामभट डोंगरे यांस दिला.

अनंतभट कृष्णंभट (१–६) राज्यक्रान्तीचा बराच उपद्रव यांना सहन करावा लागला. त्या सुमारास सरकारची भरती करून ते पळून गेले (ले. ९९ खं. १ पहा). ते ग्वाल्हेर व कापडगांव शाखेचे मूळ पुरुष होत.

जनार्दन कृष्णंभट (१–७) १७४३ तील आज्ञापत्रकांत यांचा उल्लेख आहे.

सदाशिवभट अनंतभट (१–१०) हलबे व गुण्ये यांचेमध्यें झालेल्या वादांत यांनीं फारच उत्तम प्रकारची माहिती दिली आहे. यांचा स्वभाव अतिशय सात्त्विक असावा. ते उत्तम वैदिक ब्राह्मण होते. (ले. नं. ५५ खं. १ पहा.) हे कापडगांव व ग्वाल्हेर शाखेचे मूळपुरुष होत.

रामभट अनंतभट (१–११) संवत् १८७४ मध्यें यांनीं काशीयात्रा करून लेख दिला आहे.

धोंडो जनार्दन (१–१२) संवत १८३१ मध्यें यांनीं काशीयात्रा केली. आठल्ये घराण्याचा इतिहास पान १३९ वर यांचा उल्लेख आहे.

वंशावळ नं. २ पृष्ठांक २३९ पहा माहिती चालू—

गोपाळ कृष्ण (२–१) हे पुण्यास इ. स. १७९७ च्या सुमारास फडणवीस होते.

भिकाजी गोपाळ (२–७) समाधिस्थ झाले.

महादेव गोपाळ (२–८) काशींत वारले.

श्रीधर अनंत (२–१०) बाहेरगांवाहून खूप पैसा मिळवून कोंकणांत आले.

मोरो विष्णु (२–११) इ. स. १७८७ पासून १७९७ पर्यंत पुण्यास पेशव्यांचेकडे कारकून होते.

रामचंद्र विठ्ठल (२–१६) अविवाहित मृत्यु.

सदाशिव श्रीधर (२–१७) आचाऱ्याचा धंदा करून पैसा मिळविला.

रामकृष्ण विनायक (२–१८) मुंबईस सरकारी नोकरीवर होते. कस्टम खात्यांत नोकरी होती. उतारवयांत पेन्शन घेऊन मठास येऊन राहिले होते.

वंशावळ नं. ३, पृ. २४० पहा—माहिती चालू

***दत्तात्रेय केशव** (३–१) वय ६१ वर्षे. भार्या सीताबाई, ४२ वे वर्षी मृत्यु पावल्या. माहेर पाध्यांकडे. कन्या (१) वत्सला–वय ३३. (जोशी) (२) मनु–भाटवडेकर. (`असोर्डे). (३) अनसूया–पाध्ये वकील (राजापूर). (४) बनु–हलवे (शिकंदराबाद). (५) द्रौपदी–वय बारा. शिक्षण चालू. शिक्षण साधारण. ग्रामोपाधिक व शेतीचा व्यवसाय. सांपत्तिक स्थिति मध्यम. भजन व गायनपटु आहेत.

***अंताजी केशव** (३–२) वय ५८. भार्या सुभद्रा. माहेर भाटवडेकर. कन्या–प्रमिला, अहिल्या, सुशीला. लहान असून शिकत आहेत. व्हर्न्याक्युलर फायनल पास. इंग्लिश चांगलें समजतें. शाळामास्तर. कांहीं दिवस रत्नागिरीस कचेरींत कारकून. व्यापार पण केला. सांपत्तिक स्थिति मध्यम. मोडी अक्षराबद्दल प्रशस्तिपत्रकें मिळालीं आहेत. खानेसुमारींत उत्तम काम केल्याबद्दल सरकारकडून सनद. गायनाचा नाद आहे. उभयतां बंधु मठास असतात.

***वामन दत्तात्रय** (३–३) माहिती मिळाली नाहीं.

***श्रीराम दत्तात्रय** (३–४) वय २६. भार्या इंदिरा. माहेर जोशी. मिरज सरकारचे खाजगी नोकर.

***श्रीरंग दत्तात्रय** (३–५) वय २०.

***पांडुरंग दत्तात्रय** (३–६) उभयतां मठास असतात.

***नारायण अनंत** (३–७) वय २९. भार्या शारदा. माहेर हर्षे. व्ह. फा. पास. सांगलीस चहाचें दुकान चालवितात.

*जगन्नाथ अनंत (३-८) वय २५. भार्या ताराबाई. माहेर आठल्ये.
व्ह फा. पास. शेती पाहतात.
*यशवंत अनंत (३-९) वय २०. मुंबईस नोकरीवर.
*नरहरी अनंत (३-१०) वय १७. ' उगार शुगर वर्क्स 'मध्यें सांग-
लीस नोकरीस आहेत.

वंशावळ नं ४, पृ. २४० पहा.—

*गणपति वासुदेव (४-२).
*गोपाळ वासुदेव (४-३ मुंबईस मोत्याचे व्यापारी. गिरगांव बॅकरोड.
माहिती मिळाली नाहीं.

वंशावळ नं. ५, पृ. २४१ पहा—शाखा कुरणें व दिवड यांची माहिती.

राघो नारायण (५-२) ऐतिहासिक चरित्र विभाग खं. २ यांत
माहिती पहावी.
गंगाधर नारायण (५-३) यांना शके १७२३ त भोरकरांचे दौलतीस
उपयोगी पडल्याबद्दल पुणें जिल्ह्यांतील पवनमावळ प्रांतांत दिवड हें गांव
इनाम मिळालें आहे. तें इनाम हल्लीं यांचे वडीलबंधु राघो नारायण यांच्या
वंशजांकडे चालू आहे. व राघो नारायण यांनीं मिळविलेली कुरण्याची खोती
गंगाधर नारायण यांचे वंशजांकडे चालू आहे. भार्या—रमा. कन्या—काशीबाई.
करकऱ्यांकडे दिल्या होत्या. शके १७६५ त मृत्यु. शके १७६० त हरचिरी
सोडून कुरण्यास आले. यांचे वंशज म्हणजेच आजचे कुरणेकर गुण्ये होत.
(५-४, ५-६) विसाजी, हरि व विठ्ठल-नारायण—बंधुत्रय
पुण्यास राहत असत.
गणेश रघुनाथ (५-७) यांच्या नांवें भोरसंस्थानांतील किल्ले साधनगड
येथील हसबनिशीची सनद उपलब्ध आहे.
कृष्णाजी रघुनाथ व रामचंद्र रघुनाथ (५-८, ९) भोरकरांना
दिलेल्या कर्जाच्या कागदांतून यांचा पुष्कळ ठिकाणीं उल्लेख आहे. रामचंद्र
रघुनाथ यांचा वंश म्हणजेच हल्लींचे दिवडकर गुण्ये होत.
यशवन्त हरि (५-११) कुरणें दप्तरांतील कागदांतून यांचा उल्लेख
आहे. त्यावरून मठच्या गुण्यांच्याबरोबर यांनीं वाद केला होता असें दिसतें.

काशिनाथ विठ्ठल (५-१२) कृष्णाजी रघुनाथ गुण्ये (५-८) यांच्या नाशिकच्या लेखांत यांचा उल्लेख आहे. कुर्णे येथील वंशावळींत नाहीं.

शंकराजी विठ्ठल (५-१३) सरदेसाई घराण्याचा इतिहास उत्तरार्ध खं. २ पान ३०२ वर देवळेकर सरदेसाई प्रकरणांत यांचेसंबंधीं बरीच माहिती आलेली आहे.

सखाराम विठ्ठल (५-१४) कृष्णाजी रघुनाथ (५-८) यांच्या नाशिकयात्रेच्या लेखांत यांचा उल्लेख नाहीं. कुर्ण्यांच्या वंशावळींत यांचा उल्लेख आहे व तींत मृत्यु शक फाल्गुन शु. ३ शके १८०९ दिलेला आहे. कृष्णाजी रघुनाथ गुण्ये (५-८) यांचा ना. लेख, दिवडची वंशावळ व गंगाबाई भ्रतार शंकरजी विठ्ठल यांचा काशीयात्रेचा लेख हीं सर्व पाहतां काशीनाथ विठ्ठल हें नांव वरील कृष्णाजी रघुनाथ गुण्यांनीं चुकून सखारामा-बद्दल सांगितलें असावें असें दिसतें. दिवडच्या ज्या दोन वंशावळी मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकांतच फक्त काशीनाथाचा उल्लेख आहे. यावरून वरील विधान-काशीनाथ विठ्ठल (५-१२) हें नांव चुकून कृष्णाजी रघुनाथ (५-८) यांनीं नाशिक येथील लेखांत दिलें असावें.

वंशावळ नं. ६, पृ. २४२ दिवड शाखेची माहिती चालू

***दत्तात्रय विश्वनाथ** (६-७) दिवड येथें शेती करतात.

***नारायण गंगाधर** (६-८) दिवड येथें सावकारी व शेती करतात. इनामतीचे वतनाचा व्यवसाय.

वंशावळ नं. ७, पृ. २४३ पहा. कुर्णे शाखा—

सीताराम गंगाधर (५-१०) मृ. श. १८०४. भार्या—मथुरा. कन्या—द्वारका जोशी (खानु.)

चोखणे, कोंढ्य, वेरळ, गावाणे येथील खोती गहाण घेतली. आडवली येथील खोती सुटली. व्यापार व शेती हा मुख्य धंदा.

रघुनाथ सीताराम (७-१) मृ. श. १८२२. भार्या (१) जानकी—माहेर भाटवडेकर (मिरझोले). कन्या—वेणु पंडीत. भार्या (२) सीता—माहेर खांडेकर (कुरधोंडे). कन्या—(१) गंगुताई—देसाई. (खावडी). (२) येसुताई—अम्बर्डेकर (रत्नागिरी).

शिक्षण साधारण झालें होतें. व्यापार व शेतीचा व्यवसाय. सांपत्तिक स्थिति उत्तम.

गोपाळ सीताराम (७–२) जन्म शक १७५६, मृ. श. १८१२. भार्या–सखू–खेर (रत्नागिरी). कन्या (१) काशी–हलबे (मठ). (२) वालुताई –हयात, वय ७५. आठल्ये (शिपोशी). (३) कृष्णा–घाटे (कोतापूर). (४) आवडी–लळीत (कोल्हापूर).

शिक्षण साधारण. खोती व सावकारीचा व्यवसाय. वेरळ येथील लक्ष्मी केशवाचें देवालय दुरुस्त केलें. सांपत्तिक स्थिति उत्तम.

कृष्णाजी रघुनाथ (७–३) ज. श. १८०४ मृ. श. १८२१. भार्या–रुक्मिणी–वय ५०. माहेर–हलबे (यवतमाळ.)

***विष्णु रघुनाथ** (७–४) ज. श. १८२० हयात. भार्या–अन्नपूर्णा, वय ३५. माहेर–पाध्ये (वेरळ). कन्या (१) इंदू–भागवत, (२) सुमति, (३) कुसूम, (४) चंपूताई लहान आहेत.

शिक्षण साधारण. व्यापार खोतीचा व्यवसाय. सांपत्तिक स्थिति मध्यम.

गणेश गोपाळ (७–५) मृत. विशेष माहिती उपलब्ध नाहीं.

वासुदेव गोपाळ (७–६) मृ. श. १८२३. भार्या–लक्ष्मी. माहेर–देसाई (रुण). कन्या (१) सईताई, वय ५८–धाकरस (नाटे). (२) भीमा, वय ५६–हलबे (यवतमाळ). (३) मथुताई, मृत.–खांडेकर (घाटीवले). (४) अंबूताई, मृत.–खेर (केळे). (५) रंगुताई, वय ४० जिवंत. तांबे (कोलपे). (६) अनसूया–मृत–पुरोहित (आडवली).

शिक्षण साधारण. खोती व व्यापार. सांपत्तिक स्थिति मध्यम.

मोरेश्वर गोपाळ (७–७) ज. श. १७८३. मृ. श. १८५५. भार्या–सरस्वति–माहेर मोघे (साटवली). कन्या (१) चंद्रा–मृत–तांबे. (२) दुर्गा–मृत–शौचे (नाटे). यमूताई–मृत–फळणीकर. (तोणदे)

शिक्षण साधारण. खोती व व्यापार. सांपत्तिक स्थिति–मध्यम.

विनायक गोपाळ (७–८) ज. श. १७९१, मृ. श. १८५४. भार्या–यमुना, वय ६५. माहेर–हलबे.

शिक्षण साधारण. दुकानदारी व्यापार व खोती. सांपत्तिक स्थिति–मध्यम.

***शिवराम गोपाळ** (७-९) ज. श. १७९३ विद्यमान. भार्या-गंगा मृत. माहेर-पळसुले, देसाई (रायपाटण) कन्या. (१) चम्पूताई-मृत-हलबे (मठ). (२) द्वारका-वय ३५-हलबे (मठ). (३) शान्ता-मृत-भाट्ये (उमरे). (४) यमु-जोशी (खानु.)

शिक्षण मराठी ५ यत्ता. खोती व शेतीचा व्यापार. स्थिति मध्यम.

***राजाराम वासुदेव** (७-१०) ज. श. १८०६. भार्या (१) भागीरथी-मृत-माहेर खांडेकर (रत्नागिरी). कन्या (१) कृष्णा-वय ३०.-आठल्ये (देवरुख). (२) काशी-वय २८-सातवळेकर (मुंबई). (३) नमूताई-वय २६.-जोशी (असोंडे). भार्या (२) इंदिरा-वय ३५. माहेर पळसुले देसाई. कन्या (१) प्रमिला, (२) सिंधु, (३) गंगा व दोन मुलगे-भास्कर, मुकुंद.

शिक्षण इंग्रजी ४ यत्ता. खोती व शेतीचा व्यवसाय. स्थिति-मध्यम.

***रामचंद्र मोरेश्वर**(७-११) ज. श. १८१४. भार्या (१) जानकी-मृत-माहेर पाध्ये (देवधे). कन्या (१) बयोताई-गुर्जर (राजापूर). पुत्र-श्रीनिवास, शान्ताराम व गोपीनाथ. भार्या (२) जानकी-माहेर नावलेकर (हर्डी). कन्या (१) शकुंतला, (२) विमल. पुत्र-मोरेश्वर.

शिक्षण मॅट्रिकपर्यंत. खोती व शेतीचा व्यवसाय. स्थिति-मध्यम. कॉमनवेल्थ विमा कंपनींत हजाराचा विमा.

***लक्ष्मण मोरेश्वर** (७-१२) दत्तकापूर्वीचें नांव. रघुनाथ सीताराम (७-१) यांना दत्तक. दत्तकानंतरचें नांव विष्णु रघुनाथ.

***सखाराम विनायक** (७-१३) जन्मशक १८२३. भार्या (१) सखुताई-मृत-पंडीत (हरचिरी). भार्या (२) सुंदरा-मृत-माहेर पाध्ये (देवधें). कन्या (१) इंदू, (२) मालती. पुत्र-प्रभाकर.

शिक्षण मॅट्रिकपर्यंत. व्यवसाय नौकरी. सांपत्तिक स्थिति उत्तम. एम्पाअर ऑफ इंडिया इन्शुअरन्स कंपनींत विमा.

***अनंत विनायक** (७-१४) ज. श. १८२६. भार्या आनंदी-वय २८. माहेर-रंगनाथ दिनकर ढवळे (वेळवंड). पुत्र-गजानन.

मॅट्रिक पास. नोकरी. सांपत्तिक स्थिति मध्यम. मु॥ जयगड, पोस्ट जयगड.

***शंकर विनायक** (७-१५) ज. श. १८३२. भार्या–लक्ष्मी. वय २५. माहेर–हलबे (मठ). कन्या–शालिनी.

दत्तात्रय शिवराम (७-१६) ज. श. १८२०. मृ. श. १८४०. मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालें.

***गंगाराम शिवराम** (७-१७) ज. श. १८२९. भार्या–(१) मनोरमा मृत–माहेर भागवत (राजापूर). भार्या (२) सुभद्रा–मृत–देसाई (देवळें). भार्या (३) राधा–मृत–माहेर कुलकर्णी ऊर्फ कावळे (आशिवळे). कन्या–कमल. वय ८. भार्या (४) राधा वय १९. माहेर सरदेशपांडे (साखरपें). शिक्षण इंग्रजी २ इयत्ता. खोती व शेतीचा व्यवसाय. स्थिति मध्यम.

***श्रीनिवास रामचंद्र** (७-२०) ज. श. १८४२ अविवाहित. व्ह. फा. पर्यंत शिक्षण. व्यापार व दुकानदारी मु॥ वेरळ.

***शान्ताराम रामचंद्र** (७-२१) ज. श. १८०७. अविवाहित. शिक्षण चालू. मॅट्रिक १९४० बॉम्बे युनिव्हर्सिटी. विलिंग्डन कॉलेजांत फर्स्ट क्लास, फार्युसन कॉलेजांत B. Sc. चें शिक्षण घेत आहेत. ह्या घराण्याचा इतिहास लिहिला जाण्यास ज्या दोनतीन व्यक्ति कारणीभूत झाल्या त्यांपैकीं एक.

इ. स. १९४० पासून अगदीं मनापासून या कामांत मदत करीत आहेत. स्वभाव फारच उत्तम.



शान्ताराम रामचंद्र

वंशावळ नं. ८ पृ. २४४ पहा. कापडगांव व ग्वाल्हेर शाखा

मठशाखेच्या एकंदर तीन तक्षिमा करतां येतात. पांचवे पिढीचे विष्णु कृष्ण यांचा वंशविस्तार म्हणजे पहिली तक्षिम. पांचवे पिढीचे अनंत कृष्ण यांचा

वंश म्हणजे तक्षिम दोन. पांचवे पिढीचे जनार्दन कृष्ण यांचा वंश म्हणजे तिसरी ताक्षिम. ताक्षिम एक मठशाखेचें वडील घराणें त्यांतच दिवड व कुर्णे शाखा मोडतात. तक्षिम दोन म्हणजे यापुढें माहिती देत असलेली ग्वाल्हेर शाखा.

वंशावळ नं. ८ मधील व्यक्तींच्याबद्दल विशेष माहिती मिळत नाहीं.

यशवन्तराव लक्ष्मण (८–८) यांचें चरित्र खं. २ मध्यें ऐतिहासिक चरित्रविभागांत दिलें आहे.

आत्मारामभट शिवरामभट (८–११) चांगले विद्वान् व शास्त्री म्हणून प्रसिद्ध. ग्वाल्हेर सरकारकडून तनखा होता.

विष्णुभट शिवरामभट (८–१३) उत्तम दशग्रंथी विद्वान् ब्राह्मण म्हणून पंचक्रोशींत कोंकणांत, कापडगांवचे आसपास प्रसिद्ध होते. शरीरयष्टि बळकट. कापडगांवचे १२ आणे हिश्श्याचे खोत होते.

रामचंद्र यशवंत (८–१४) हे आत्माराम भटांचे चिरंजीव (८–११) यशवन्तराव (८–८) यांनीं दत्तक घेतले. त्यांनीं ग्वाल्हेर सरकारची सर्व नोकरी पिछाडीस केली. इ. स. १९०३ मध्यें ते वारले. ग्वाल्हेर सरकारचे ते शिलेदार होते.

वंशावळ नं. ९ पृ. २४५ पहा. ग्वाल्हेर-पुणें शाखा.

***यशवन्तराव लक्ष्मण** (९–५) ज. भा. कृ. ५ शके १८०३. भार्या– (१) सरस्वती–गंगु. माहेर–मुकुंदराव भोपटकर (लष्कर ग्वाल्हेर) कन्या–बबी–मृत्यु ९ जून इ. स. १९०९. भार्या (२) सरस्वती–कृष्णा–माहेर अमृत निलकंठ पंडीत (भंडारा). कन्या–हेमलता–पार्वती टिकेकर + महादेव रघुनाथ टिकेकर, बी.ए., लष्कर ग्वाल्हेर. पुत्र–शरचंद्र. भार्या (३) इंदिरा–बनी–माहेर कृ. के. वैद्य (बंधु) सॉलिसिटर (विलेपार्ले). तृतीय भार्येच्या कन्या–(१) कुमारी कुसुम यशवन्त गुण्ये. ज. श. १८४५. वैशाख व॥ ५. मॅट्रिकला मुंबई विश्वविद्यालयाचें दळवी संस्कृत प्राईझ मिळालें. सर परशुरामभाऊ कॉलेजांत अनेक प्राईजेस् मिळालीं. स्कॉलरशिपहि चालू होती. सध्यां सीनिअर बी.ए. त आहेत. (२) मालती ज. श. १८४७. वैशाख शु. ४. सध्यां ज्यूनिअर बी.ए.

ला स. प. कॉलेजांत आहेत. (३) लीला. ज. श. १८४९ ज्येष्ठ शु. १५ इंग्रजी ५ व्या यत्तेंत शिकत आहेत.

बबी, सुवर्णलता, कमला, कमलाकर, कुंदा व सुरेश हीं लहानपणींच निवर्तलीं.



यशवंतराव लक्ष्मण

इन्टर आर्टस्च्या दुसऱ्या वर्गात विल्सन कॉलेजांतून पास झाले. बी.ए. दुसरा वर्ग व्हिक्टोरिया कॉलेज ग्वाल्हेर. कॉलेज मेडल् मिळालें. फर्स्ट एल्एल्. बी. पहिला वर्ग अलाहाबाद लॉ कॉलेज. सेकंड एल्एल्.बी. पहिला वर्ग. लॉ-कॉलेज मेड्ल मिळालें.

गु. घ. इ. १७

इ. स. १९०१ ते १९१० पर्यंत शिंदे सरकारचे कॅम्प क्लार्क म्हणून होते. नंतर एल्एल्.बी. झाले. १९१४-१९३५ वर्ध्यास, मध्यप्रांतांत हायकोर्ट वकील. प्राप्ति २०० ते ४००. १-१०-१९३५ पासून ग्वाल्हेर दरबार वकील म्हणून पुण्यास योजना. पगार रुपये २००. वर्ध्यास न्यू इंग्लिश स्कूल स्थापन केलें. १९१४-१९३० पर्यंत त्या शाळेचे सेक्रेटरी होते. आतां त्याचें हायस्कूल होऊन कॉलेजमध्यें रूपांतर झालें आहे. अनेक मासिकांत लेख लिहिले. त्यांनीं लिहिलेलीं पुस्तकें—(१) पेरेन्टस् ॲन्ड टीचर्स लीग पॅम्लेफेट नं. ३ "प्रिव्हें-न्शन ऑफ क्रुएल्टी टू चिल्ड्रन" (याचें मराठी भाषान्तर झालें आहे). (२) शीलशिक्षण–माला, पुष्प पहिलें, 'आत्मसंयमन' पुष्प २ रें, 'उद्योग'. 'आत्मसंयमनाचें हिंदींत भाषांतर झालें आहे.

कै. रामचंद्र यशवन्त गुण्ये (८–१४) यांच्या शिलेदारीचा एक घोडा व ६० दरमहा रुपये राजश्री यशवन्त लक्ष्मण गुण्ये यांचे नांवें (कै. रामचंद्र यशवन्त गुण्ये यांच्या निधनापासून म्हणजे) ता. २० जुलै १९०२ पासून ऑक्टोबर १९१० पावेतों चालू होते. शिवाय ६० रु. माहेवार प्रायव्हेट ऑफिसांत काम करण्याबद्दल मिळत.

***शरच्चंद्र यशवन्त** (९–७) ज. आश्विन शु. १५ शके १८३९. अविवाहित. क्रॅडॉक हायस्कूल वर्धा येथून मॅट्रिक. नागपूर सायन्स कॉलेजांतून इंटर सायन्स व स. प. कॉलेजांतून बी.एस्सी. (With Physics & Mathematics). उत्तम लेखक. अनेक मासिकांतून लेख लिहिले आहेत. 'रुपेरी पडद्यामागें' या पुस्तकाचे लेखक. सिनेमा फिल्ममध्यें असिस्टंट रेकॉर्डीस्ट (R. C. A. System), इलेक्ट्रिकल असिस्टंट, प्ले बॅकर रेकॉर्डीस्ट, असिस्टंट प्रॉजेक्टर, ऑपरेटर हीं कामें केलेलीं आहेत व त्या अनुभवांवरूनच वरील पुस्तक लिहिलें. हिंदी विशारद मद्रास, हिंदी अध्यापक महाराष्ट्र. 'रेडिओ कम्युनिकेशन एंजिनिअरिंग डिप्लोमा' बॉम्बे गव्हर्मेंटचा. असिस्टंट एडिटर लोकशक्ति व सकाळ. हल्लीं 'फ्रि प्रेस'चे असिस्टंट एडिटर आहेत.

***वसंत यशवन्त** (९–८) भावे स्कूल पुणें येथून मॅट्रिक. स. प कॉलेज-मधून बी.ए., यू.टी.सी. सार्जंट होते. रा. स्व. संघाचे भोक्ते. चित्रकलेची आवड आहे.

***मुकुंद यशवन्त** (९–९) ज. श. १८५४ आषाढ शु. ४.

***शामकान्त यशवन्त** ज. श. १८०४ पौष वद्य ३. उभयतां शिकत आहेत.

वंशावळ नं. १० पृ. २४६ पहा. ग्वाल्हेर शाखा

अनंतभट रामभट (१०-२) 'कोंकणांतून ब्रह्मावर्तास गेले. तेथें बाराशें शिष्य उत्तम अष्टादशग्रंथी तयार केले, व नंतर ग्वाल्हेर येथें परत आले' असें यांचे नातू रा. विनायक बळवन्त गुण्ये, मु. लष्कर, हे कळवितात.

बाळशास्त्री अनंत (१०-४) मृ. संवत् १९७२ कार्तिक कृष्ण १२. भार्या गंगाबाई-मृत-माहेर डोंगरे. दशग्रंथी विद्वान्, न्याय, व्याकरण, वेदान्त मीमांसा या चार शास्त्रांत प्रवीण. खूप शिष्य तयार केले.

राजाराम उर्फ गोपाळ (१०-५) मृ. श्रा. व. ८ संवत् १९५१. भार्या-रखमाबाई-मनुबाई. माहेर-चिमणाजीपंत मोघे. वैदिक होते.

लक्ष्मण बाळशास्त्री (१०-७) मृ. संवत् १९८७. पौ. शु. १०. भार्या-रमाबाई-मृत-माहेर गोपाळराव आठल्ये (ब्रह्मावर्त). ग्वाल्हेर स्टेटचे क्लार्क होते.

***विनायक ऊर्फ बाळकृष्ण बाळशास्त्री** (१०-८) ज. तारीख १०-१२-१८४१(?) भार्या सरस्वति-मृत-माहेर-लक्ष्मणभट पिंगे (ब्रह्मावर्त). ट्रॅव्हेलिंग ऑडिटर, ग्वाल्हेर स्टेट.

***अनंद ऊर्फ सोनुपंत गोपाळ** (१०-९) ज. संवत् १९४८ मार्गशीर्ष शु. १५. भार्या कमला-भागवतांकडे माहेर (श्रीनगर). कन्या (१) ताराबाई-सौ. उमाबाई भागवत (झांशी) + मुकुंदराव भागवत. (२) शकुंतला-सौ. सरस्वतिबाई मोघे + रामचंद्रराव मोघे (ब्रह्मावर्त). (३) ठकुताई-लक्ष्मीबाई. अम्बर्डेकर + केशवराव अम्बर्डेकर (झांशी). (४) सोनु ऊर्फ मनु-लहान. नॉन-मॅट्रिक. इलेक्ट्रेशिअन. सांपत्तिक स्थिति साधारण. मु॥ लष्कर ग्वाल्हेर.

***नारायण लक्ष्मण** (१०-११) वय भार्या-इंदिरा. माहेर विनायकराव आगटे (उज्जयनी). कन्या-प्रभावती. म्युझिक प्रिन्सिपॉल-माधवसंगीत विद्यालय, ग्वाल्हेर.

***गोपाळ लक्ष्मण** (१०–१२) ज. १३ जुलै १९११. भार्या–शारदा. माहेर–लक्ष्मणराव खांडेकर. कन्या–पुष्पा ऊर्फ अनसूया. म्यूझिक प्रोफेसर, डी. ए. व्ही. हायस्कूल, आग्रा.

***चिंतामण ऊर्फ महादेव विनायक** (१०–१३) ज. संवत् १९७०. सर्वपित्री अमावास्या. भार्या-मालती. माहेर–गोविंदराव मोघे (उज्जयनी). संगीत-शिक्षक, केंब्रिज हायस्कूल, दिल्ली.

***रामकृष्ण विनायक** (१०–१४) ज. २४-१०-१९७७. मॅट्रिकमध्यें शिकत आहेत.

***शंकर अनंद** (१०–१५) ज. अश्विन शु. ११ शके १८४९. ८ व्या वर्गांत शिक्षण चालू आहे.

***रघुनाथ अनंद** (१०–१६) ज. माघ कृ. ६ इ. स. १९४०.

वंशावळ नं. ११ पृ. २४७ पहा. वीना, ग्वाल्हेर, मठ, कापडगांव शाखा

या वंशावळींतील व्यक्तींसंबंधानें सविस्तर माहिती उपलब्ध नाहीं. ७ व्या पिढीचे गणेश धोंडो व बल्लाळ धोंडो यांच्या वंशासंबंधीं तर कांहींच कळत नाहीं.

वामन रामचंद्र (११–१८) यांनीं काशीयात्रा करून फाल्गुन शु. ५ संवत् १९८७ मधील लेख दिला आहे. तो येणेंप्रमाणें:—" गुणे वामन रामचंद्र गोत्र अत्रि, राहणार मठ, तालुका रत्नागिरी, आजे मोरेश्वर बल्लाळ पुत्र लक्ष्मण व रामचंद्र, फाल्गुन शु. ५ संवत् १९८७. " लक्ष्मण वामन व रामचंद्र वामन हे आज विद्यमान असून सुमारें १५-२० वर्षांचे असावेत. वामन रामचंद्र निवर्तल्याचें मठांतील गुण्यांनीं सांगितलें. त्यांच्या मुलांच्याबद्दल त्यांना नक्की माहिती नाहीं. गणपती रामचंद्र (११–१७) यांना फक्त एकच मुलगी होती, असेंहि त्यांनीं सांगितलें. विशेष माहिती मिळविली पाहिजे.

शंकर बळवंत (११–१६) व त्यांचे वडील, आजे वगैरे सर्वजण कै. यशवन्तरावजी लक्ष्मण गुण्ये, शिलेदार ग्वाल्हेर, यांचेकडे असत, असें पुण्याचे ग्वाल्हेरदरबार वकील गुण्ये सांगतात.

सीताराम धोंडो (११–१) हे झांशीस राहत.

कृष्णराव सीताराम (११-४) इ. स. १८५७ च्या बंडांत झांशीच्या राणीबरोबर रणांगणांत मृत्यु पावले. भार्या–सखूबाई–माहेर हरि नारायण मुळ्ये. (डामरोण, जिल्हा झांशी). भर्त्याचे मृत्यूनंतर त्यांनीं आपल्या चिरंजीवांचें पालनपोषण माहेरीं डामरोणास मुळ्यांकडे केलें.

कृष्णराव सीताराम हे राणीचे कारभारी होते. वैद्यकीचें चांगलें ज्ञान होतें. झांशी सरकार नेवाळकर यांजकडून तीन गांवें इनाम होतीं. ते समरांगणांत मृत्यु पावल्यानंतर मुलें लहान असल्यानें सरकारनें तीं जप्त केलीं. यांचें सविस्तर चरित्र ऐतिहासिक चरित्रविभागांत पहावें.

सीताराम ऊर्फ छोटु भैय्या कृष्णराव (११-८) इ. स. १९२९ मध्यें मृत्यु. भार्या–(१) येसूताई–माहेर बक्षी, (२) जानकी–वेणू–माहेर–सखारामपंत मोघे (गुलसराई). कन्या (१) सखू–झांशी सरकारचे दिवाण मुळे यांकडे सासर. (२) मनु–झांशीतील मुरलीधराच्या देवालयाचे पुजारी गोळवलकर यांजकडे. (३) कृष्णा–उमा. नावलेकर (झांशी). जानकीताईंना वैद्यकीचें उत्तमच ज्ञान होतें. त्यांचे पुत्र श्रीनिवास व त्र्यंबक.

सीतारामपंत डामरोणवाल्या मुळ्यांची शेती–मुखत्यारी, शेती व वैद्यकी करीत असत.

***श्रीनिवास सीताराम** (११-१४) विद्यमान. ज. संवत् १९५५. भार्या–राधाबाई–मिरा. माहेर गोपाळभट शेवडे. (लहार तहशील, ग्वाल्हेर). कन्या–(१) गोदावरी, (२) बबी व चिरंजीव नारायण.

डामरोण येथें शेती व वैद्यकीचा व्यवसाय. सांपत्तिक स्थिति मध्यम.

***त्र्यंबक सीताराम** विद्यमान. (११-१५) ज. १९६६ संवत्. भार्या सीताबाई–मालती. माहेर केशवराव मोघे. (खुरई तहशील मध्य हिंदुस्थान).

वैद्यकी, रेल्वे खात्यांत नौकरी. कारपेंटरी इत्यादि व्यवसाय. उत्पन्न मध्यम. दोघे बंधू बीना, मध्य हिंदुस्थान येथें असतात.

प्रकरण ५ वें

चांफेट-शाखेचा वृत्तान्त

चांफेट शाखेची वंशावळ पुढें देत असलेल्या कागदपत्रांचे आधारें व नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील लेखांचे साहाय्यानें तयार केली आहे. (१) भटंभट गुण्ये यांचा इ. स. १७६८ मधील करीणा. (खंड १ ले. २९ पहा) (२) १८४६ मधील जदनामा यांत दिलेली वंशावळ (खंड १ ले. ८० पहा) (३) भारत इतिहास-संशोधक मंडळ पुणें, यांच्या दप्तरांतील कऱ्हाड-कालें शाखेची वंशावळ. (४) पुण्याचे भटजी गुण्ये यांच्या संग्रहांतील वंशावळ. (५) कै. प्रो. पांडुरंग दामोदर गुण्ये यांनीं लिहून ठेवलेली अश्वि शाखेची वंशावळ. (६) नगरचे गंगाधरशास्त्री गुण्ये यांचेजवळची वंशावळ. (७) कऱ्हाडचे वकील रा. सदाशिवराव यशवन्त गुण्ये यांचेजवळील कऱ्हाड-कालें शाखेची वंशावळ. (८) धारचे इनामदार महादेवराव विनायक गुण्ये यांच्या संग्रहांतील कऱ्हाड-कालें-शाखेची वंशावळ. या सर्व वंशावळींत नं. ३ च्या वंशावळींत बरेच दोष व उणेपणा हीं आढळलीं. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील लेखांच्या आधारें वरील सर्व वंशावळी दुरुस्त करून नंतर या प्रकरणांतील विस्तृत व शुद्ध वंशावळ देत आहें.

कऱ्हाड–काले येथील इतिहासप्रसिद्ध गुणे घराण्याची वंशावळ पुढें देत असलेल्या त्र्यंबकेश्वरच्या लेखाच्या आधारें या चांफेटच्या वंशावळीस जोडली आहे. भटंभट गुण्ये यांच्या १७६८ तील करिण्यांत आलेल्यां वंशावळींत या कालें–शाखेच्या गुणे मंडळींचा उल्लेख नाहीं. त्याचें कारण त्या वेळीं या घराण्यांतील मंडळीस देशावर येऊन बराच काल लोटल्यामुळें यांचा उल्लेख तींत करण्याची आवश्यकता त्यांना वाटली नसावी. कऱ्हाड–कालें–शाखेचे मूळपुरुष जनार्दनभट यांचा त्र्यंबकेश्वरचा स्वदस्तुरचा लेख येणेंप्रमाणें आहे; “ लिखितं जनार्दनभट पिते गोविंदभट चुलते कृष्णंभट पुत्र बाळाजी पुतने रघुनाथ गुणे गांव चांफेट महाल पांवस श्री त्र्यंबकचे तीर्थ उपाध्यपण नीलकंठ विप्रदास लेहून दिले आहे. आमचे वंशीचे येतील ते तुम्हांस पुजितील.” वहि नं. १, पान ४ वर हा लेख रा. वासुदेवभट मेघश्याम मुा

त्र्यंबकेश्वर यांचे संग्रहांत आहे. या लेखावर शकाचा उल्लेख नाहीं. तरी या
लेखाच्या जवळच्या लेखांकावरून पाहतां तो शके १६११ शुक्लनाम संवत्सरां-
तील असावा असें दिसतें. या लेखांतील 'पुतने रघुनाथ' म्हणजे कोण तें कळत
नाहीं. ते जनार्दन भटाचे पुतणे नसून बाळाजीचे पुतणे असतील तर बरोबर
आहे. लेख वाचतांना जुन्या लेखांतून अनेक वेळां चुलत बंधूस पुतणे म्हट-
ल्याचें आढळून आलें आहे. तसा प्रकार येथेंहि घडण्याचा संभव आहे. तसें
असेल तर हा लेख पूर्णपणें शुद्ध आहे.

चांफेट–शाखेंत वडील घराणें कोणतें हें नक्की ठरवितां येत नाहीं. म्हणून
१७६८ मधील करिण्याचा (खं. १ ले. २९ पहा) क्रम ठेवून पुढें काले–
शाखेचें घराणें जोडलें आहे.

पुढें देत असलेल्या वंशावळीसंबंधीं कांहीं विशेष माहितीः—

वंशावळ नं. १ पहा; चांफेट शाखेचे मूळ पुरुष केशंभट गुण्ये यांस पुत्र ३,
असें उपलब्ध झालेल्या माहितीवरून दिसतें. तें येणेप्रमाणें—१ हरभट २ कृष्णं-
भट ३ गोविंदभट. तदनुक्रमानें हरभटाचा विस्तार म्हणजे तक्षिम नं. १, कृष्णं-
भटाचा विस्तार म्हणजे तक्षिम नं. २ व गोविंदभटाचा विस्तार म्हणजे तक्षिम
नं. ३. याप्रमाणें तीन तक्षिमा केल्या आहेत. हरभटाच्या तक्षिम १ मधील
वंशविस्तारांपैकीं जवळजवळ तीन चतुर्थांश मंडळी १९ व्या शतकांत जालवण-
झांशी, इंदूर, बीना, सागर इ. ठिकाणीं गेली होतीं. त्यांची माहिती आज
मिळत नाहीं. खुद्द चांफेटमध्यें या वडील घराण्यापैकीं फक्त एकच व्यक्ति
आहे. ते म्हणजे वेदमूर्ति केशवभट गुण्ये मुाा चांफेट हे होत. विसाव्या
शतकांत एकाएकीं एवढ्या मोठ्या वंशावळीचा पुढील विस्तार कां थांबावा हें
समजत नाहीं.

दुसरे पुत्र कृष्णंभट यांस पुत्र ४. परन्तु वंशविस्तार फक्त रघुनाथभट व
नारायणभट यांचाच चालू आहे. रघुनाथभटाचे पुत्र महादेवभट इ. स. १७२०
च्या सुमारास सातार्‍यास आले. पुढें महादेवभटाचे पुत्र ता. संगमनेर जिल्हा
नगर मौजे अश्वि खुर्द येथें तिकडील गांवें सरंजाम मिळाल्यानें रहावयास गेले.
त्यांचा विस्तार म्हणजेच आजचें विस्तृत असें अश्वि शाखेचें गुणे घराणें.

रघुनाथभटाचे बंधु नारायणभट यांच्या वंशजांपैकीं कांहीं मंडळी चांफेटास
राहिली व कांहीं मंडळी १९ व्या शतकांत पुण्यास आली.

याप्रमाणें तक्षिम २ चे पुनः तक्षिम २ अ, अश्वि शाखा (रघुनाथभटाचा विस्तार) व तक्षिम २ ब म्हणजे चांफेट व पुणे शाखा (नारायणभटाचा विस्तार) असे दोन विभाग केले आहेत.

केशवभटाचे तिसरे पुत्र गोविंदभट यांचे नातु बाळाजी जनार्दन यांचा विस्तार म्हणजे कऱ्हाड-काले शाखा. ही तक्षिम नं. ३ होय.

या चांफेट शाखेच्या एकंदर १८ वंशावळी छापण्याच्या सोईकरितां केल्या आहेत. या वंशावळींतून आलेल्या व्यक्तींना कागदोपत्रींचे खंड १ मधील आधार येणेप्रमाणें देतां येतात.

वंशावळ नं. १—या वंशावळींतील व्यक्ति क्रमांक ३, १० व १५, (कालें शाखेचे पहिले तीन पुरुष) बाकीची सर्व वंशावळ ले. नं. २९ मध्यें आली आहे. काले शाखेंतील पहिले तीन पुरुष श. १६११ तील त्र्यं. येथील जनार्दन गोविंद गुणे (१०) यांच्या अस्सल लेखाच्या आधारें जोडले आहेत. लेख या प्रकरणारंभीं प्रास्ताविक चर्चेत दिला आहे. बाळाजी जनार्दन (१५) खंड १, ले. ६ व ८३ पहा.

वंशावळ नंबर २, ३ व ४ या लेखांक नं. ८० च्या आधारें तयार केल्या आहेत. ज्या व्यक्तींचा उल्लेख ले. ८०त नाहीं त्या व्यक्ति ना. व त्र्यं. च्या लेखाधारें दिल्या आहेत. त्यांनीं कोणत्या शकांत यात्रा केल्या तेंहि पण व्यक्तींच्या माहितीमध्यें दिलें आहे.

वंशावळ नं. ५—क्रमांक नं. १ ते ४ या व्यक्तींचा उल्लेख ले. २९ मध्यें आला आहे. शिवाय लेखांक १३, १४, १५, १६ व ९४ पहा.

वंशावळ नं. ६, ७, ८, ९, १०—या सर्व व्यक्ती विद्यमान असून लेखकाचे अगदीं जवळचे भाऊबंद आहेत.

वंशावळ नं. ११—चिमणाजी गोविंद (१) ले. २२; गोपाळ गोविंद (२) ले. २८, विठ्ठल चिमणाजी (३) ले. ३४, बाकीची माहिती ना. व त्र्यं. येथील लेखाधारें व पुण्याचे उपाध्ये गुण्यांच्या दप्तरांतील वंशावळीच्या आधारें दिली आहे.

वंशावळ नं. १२—चालू वंशावळ.

वंशावळ नं. १३, १४ व १५—खंड १ मधील ले. ८३ च्या आधारें व धार येथील इनामदार गुण्यांच्या वंशावळीच्या साह्यानें दिल्या आहेत.

वंशावळ नं. १६, १७ व १८—या चालू वंशावळी आहेत.

पिढी नं. | वंशावळ नं. १]

चांफेट शाखेची वंशावळ

केशवभट गुण्ये मूळ पुरुष (सुमारें इ. स. १६००)

२ — १ हरभट — २ कृष्णंभट — ३ गोविंद

३ — ४ केशवभट ५ विठ्ठलभट ६ रघुनाथभट ७ गणेशभट ८ नारायणभट ९ हरि १० जनार्दनभट

५ विठ्ठलभट — ०
६ रघुनाथभट — त्र्यं.या.
९ हरि — ०
१० जनार्दनभट — त्र्यं. या. श.१६११सु.

४ — ११ हरभट+लक्ष्मी ना. या. (वं. नं. २ पहा) १२*महादेवभट दत्तक आले (वं. नं. ५ पहा) १३ दामोदरभट — ० त्र्यं.या. (वं.नं.११) १४ गोविंद *महादेव — रघुनाथभटास दत्तक १५ बल्लाळ उर्फ बाळाजी (वं. नं. १३ पहा)

तक्षिम १ ली — (अ) ← तक्षिम २ री → (ब) — तक्षिम ३ री

पिढी नं. वंशावळ नं. २]

शाखा-चांफेट, वडील घराणें

[तक्षिम १ ली

[हरभट (१-४-११)-केशवभट-हरभट-केशंभट]

५ १ भटंभट उर्फ रामकृष्ण+गंगाबाई; ना. या. २ सदाशिवभट ० ३ केशवभट ४ विठ्ठलभट (वं. नं. ४ पहा) ५ अनंतभट ६ चिंतामणभट ना.या. ०

६ ७ काशिनाथभट ८ विश्वनाथभट ९ विष्णुभट १० गणेशभट (वं.नं. ३ पहा) ११ दामोदरभट ना. या. १२ रघुनाथभट १३ वासुदेव

७ १४ बाळकृष्णभट (८ विश्वनाथभट यांचा)

या वंशावळींतील व्यक्तींच्या माहितीकरितां खंड १ ले. ८० पहा.

पिढी नं. | वंशावळ नं. ३] शाखा-चांफेट, वडील घराणें [सक्षिम १ चालू

(गणेशभट (२-६-१०)-भटंभट-हरभट-केशवभट-हरभट-केशंभट)

७ १ रामकृष्णभट उर्फ बालंभट २ सखारामभट ३ सीताराम ४ सदाशिव उर्फ जयराम

५ आत्मारामभट+यमुना

८ ६ मोरभट ७ दामोदरभट ८ विनायक ९ वासुदेवभट

१० चिंतामणभट+सरस्वती
ना. या. इंदूरहून

९ ११ केशवभट

१० १२ मोरेश्वर १३ गणेश

(चांफेट)

या वंशावळींतील व्यक्तींच्या माहितीकरितां खंड १ ले. ८० पहा.

पिढी नं. | वंशावळ नं. ४]

शाखा चांफेट, वडील घराणें

[तक्षिम १ ली चालू

वंशावळ नं. २ वरून चालूं—

[हरभट (१-४-११)–केशवभट–हरभट–केशंभट]

५ केशवभट | विठ्ठलभट | अनंतभट

६ १ हरभट | २ विनायकभट+यशोदा | ३ गंगाधरभट ४ रामकृष्णभट

७ ५ बळवंत का. या. | ६ विठ्ठलभट ना. या. ७ केशवभट ८ महादेवभट ना. या. | ९ बाबजीभट १० नारायण

८ ११ विनायक १२ चिंतामण

व्यक्तीच्या माहितीकरितां ले. ८० खंड १ पहा.

पिढी नं. वंशावळ नं. ५] **चांफेट शाखा, पोटशाखा आश्वी (नगर)** [तक्षिम २ (अ)

वंशावळ नं. १ वरून—

[रघुनाथ (१-३-६),–कृष्णंभट–केशंभट]

४ महादेवभट + उमाबाई

५ १ बच्याजीपंतबाबा उर्फ रघुनाथभट ना. या.+जानकी — २ लक्ष्मण+सत्यभामा — ३ बाळाजी उर्फ बल्लाळ — ४ मोरोबा + काकुआई (o)

६ ५ जनार्दनपंत+लक्ष्मी (१ चा पुत्र) — ६ महादेव उर्फ महादाजी +गिरिजा उर्फ गंगा (३ चा पुत्र) (o)

७ ७ रामचंद्रपंतदादा + काशी उर्फ आहोआई — ८ लक्ष्मणपंत + दुर्गा उर्फ मथुरा (वं. नं. १० पहा)

८ ९ वामन उर्फ अण्णा (वं. नं. ६ पहा) — १० कृष्णाजी उर्फ अबा (वं. नं. ७ पहा) — ११ रघुनाथ उर्फ राघोपंत (वं. नं. ८ पहा) — १२ दामोदरपंत (वं. नं. ९ पहा) — १३ नारायण (o)

पिढी नं. | वंशावळ नं. ६] शाखा–चांफेट, पोटशाखा आश्वी वडील घराणें [तक्षिम २ (अ)चालू

[वामन (५-८-९),–रामचंद्र–जनार्दन–रघुनाथ–महादेव–रघुनाथ–कृष्ण–केशंभट]

९ — १ चिंतामणी उर्फ बाबा; २ मोरेश्वर

१० — ३ यशवंतराव; ४ विष्णु; ५ रामचंद्र उर्फ अप्पा; ६ विनायक

११ — ९गणपति; १०वसंत (पेंढरकरांकडे दत्तक); ११गोविंद; १२पांडुरंग; १७श्याम; १८भास्कर; १९श्रीरंग (राहुरी); २० विजयकुमार

१२ — २२ अविनाश; २३ अशोक; १३ मुकुंद; १४ अनंत; १५शशिकांत; १६श्रीकांत; ७ श्रीधर; ८ सदाशिव

२१ मधुकर (कोल्हापूर)

(कोल्हापूर)

पिढी नं. | वंशावळ नं. ७] शाखा चांफेट, पोटशाखा आश्वी (नगर) वडील घराणे [तक्षिम २(अ) चालू

[कृष्णाजी (५-८-१०)–रामचंद्र–जनार्दन–रघुनाथ–महादेव–रघुनाथ–कृष्ण–केशंभट]

९ — १ गोपाळ; २ आनंदराव (०)

१० — (गोपाळचे पुत्र) ३ पुरुषोत्तम उर्फ तात्या (आश्वी); ४ दत्तात्रेय

११ — (दत्तात्रेयचे पुत्र) ५ शरच्चंद्र; ६ प्रभाकर (कोल्हापूर); ७ दिनकर

पिढी नं. | वंशावळ नं. ८] शाखा चांफेट, पोटशाखा आश्वी (नगर) वडील घराणें [तक्षिम २ (अ) चालू

[रघुनाथ (५-८-११)–रामचंद्र–जनार्दन–रघुनाथ–महादेव–रघुनाथ–कृष्ण–केशंभट]

पिढी नं.						
९	१ हरिपंत	२ जनार्दन	३ त्र्यंबकराव			
१०	४ वासुदेव उर्फ नाना	५ रंगनाथ उर्फ बाबूराव	६ श्रीकृष्ण	७ विठ्ठल		
११	८ रामकृष्ण उर्फ मधुकर	९ रघुनाथ	१० रघुनाथ उर्फ वसंत	११ पांडुरंग	१२ गोविंद	
			१३ जनार्दन	१४ गोपाळ	१५ प्रकाश	

(कोल्हापूर)

(पंढरपूर)

पिढी नं. | वंशावळ नं. ९] शाखा चांफेट, पोटशाखा आश्वी (नगर) वडील घराणें [तक्षिम २(अ) चालू

[दामोदर (५-८-१२) रामचंद्र–जनार्दन–रघुनाथ–महादेव–रघुनाथ–कृष्ण-केशंभट]

- ९ — १ केशवराव (नगर)
  - १० — ५ बाळकृष्ण, ६ नरहरी, ७ गणेश
- ९ — २ माधवराव (संगमनेर)
  - १० — ८ मनोहर
    - ११ — १६ सुधाकर, १७ श्रीराम
  - १० — ९ कमलाकर
    - ११ — १८ शरच्चंद्र (किंब्यांकडे दत्तक), १९ वेणिमाधव
  - १० — १० प्रभाकर
- ९ — ३ भालचंद्र
  - १० — ११ दत्तात्रेय (मुंबई), १२ वामन, १३ अच्युत
    - ११ (वामन) — २० अशोक (पुणें), २१ अविनाश, २१ विजय
- ४ पांडुरंग
  - १४ नारायण (शिकारपूर), १५ अरविंद

पिढी नं. | वंशावळ नं. १०] शाखा चांफेट, पोटशाखा आश्वी(नगर) धाकटें घराणें [तक्षिम २(अ)चालू

वंशावळ नं. १ वरून—

[लक्ष्मण (५-७-८)–जनार्दन–रघुनाथ–महादेव–रघुनाथ–कृष्ण–केशंभट]

८ | १ विनायकराव+गंगा — २ गणपतराव

९ | ३ गोपाळ ४ महादेव ५ वैजिनाथ ६ विश्वनाथ ७ सीताराम ८ पंढरीनाथ ९ जगन्नाथ उर्फ स्वामी कुवलयानंद

१० | १० गंगाधरशास्त्री ११ शंकर १२ नारायण १३ त्र्यंबक १४ रमाकांत १५ रघुनाथ

११ | १६ कृष्णाजी (नगर) १७ जनार्दन १८ मुरलीधर (चाळिसगांव) १९ मुकुंद २० पद्मनाभ (नाशिक) (सातारा) (लोणावळा)

पिढी नं. | वंशावळ नं. ११]

शाखा चांफेट, पोटशाखा पुणें व चांफेट

[नारायण (१३-८)--कृष्णंभट--केशंभट]

[तक्षिम २ (ब)

पिढी नं.								
४	गोविंद				महादेवभट (रघुनाथभटांना दत्तक दिले)			
५	१ चिमणाजी				२ गोपाळ			
६	३ विठ्ठल	४ शिवराम ०	५ कृष्ण ०	६ शंकर ०	७ रामचंद्र (वं.नं. १२)	८ गोविंद ऊर्फ बाबाजी	९ सीताराम+रखमाई	
७	१० श्रीधर ०	११ बल्लाळ ऊर्फ बाळाजी			१२ विनायक ऊर्फ रावजी ०	१३ विष्णु	१४ नारायण ना.या. का.या.	
८		१५ रंगनाथ+राधा त्र्यं. या.			१६ गोपाळ	१७ गोविंद	१८ कचेश्वर ०	
९		१९ गणेश ०			२० सीताराम (चांफेट)	२१ महादेव	२२ अनंत (मुंबई)	२३ नारायण

- नारायण (१३-८)--कृष्णंभट--केशंभट
  - गोविंद
    - १ चिमणाजी
      - ३ विठ्ठल
        - १० श्रीधर ०
        - ११ बल्लाळ ऊर्फ बाळाजी
          - १५ रंगनाथ+राधा (त्र्यं. या.)
            - १९ गणेश ०
      - ४ शिवराम ०
      - ५ कृष्ण ०
    - २ गोपाळ
      - ६ शंकर ०
      - ७ रामचंद्र (वं.नं. १२)
      - ८ गोविंद ऊर्फ बाबाजी
        - १२ विनायक ऊर्फ रावजी ०
      - ९ सीताराम+रखमाई
        - १३ विष्णु
          - १६ गोपाळ
            - २० सीताराम (चांफेट)
          - १७ गोविंद
            - २१ महादेव
            - २२ अनंत (मुंबई)
            - २३ नारायण
        - १४ नारायण (ना.या. का.या.)
          - १८ कचेश्वर ०
  - महादेवभट (रघुनाथभटांना दत्तक दिले)

पिढी नं. | वंशावळ नं. १२] शाखा चांफेट, पोट शाखा पुणें [तक्षिम २ (ब) चालू

[रामचंद्र (११-६-७)–गोपाळ–गोविंद–नारायण–कृष्ण–केशंभट]

७ १ विठ्ठल २ गणपति (०)

८ ३ रामचंद्र ४ लक्ष्मण १२ विनायक

९ ५ धोंडभट ६ बळवंत ऊर्फ हेरम्ब ७ चिंतामण ८ मोरेश्वर ९ भालचंद्र १० गजानन ११ गणपति

१० १३ दत्तात्रेय १४ गोपाळ (धोंडभट यांचे); १५ प्रभाकर १६ यशवंत १७ वसंत (बळवंत यांचे); १८ पद्माकर (चिंतामण यांचे); १९ श्रीहरि (मोरेश्वर यांचे) (पुणें); २० विश्वनाथ (गणपति यांचे) (मलाया)

पिढी नं. | वंशावळ नं. १३] **शाखा–चांफेट, पोटशाखा काले-कऱ्हाड** [तक्षिम ३ री

वंशावळ नं. १ वरून—

[जनार्दन (१-३-१०)–गोविंद–केशंभट]

४ बाळाजी ऊर्फ बल्लाळ

५ १ रामाजीपंत+ अन्नपूर्णा, २ लक्ष्मणपंत, ३ धोंडोपंत+ भागीरथी, ४ बापूजी ऊर्फ गोविंद, ५ कृष्णराव, ६ हरि (०)

६ ७ सदाशिव (०) (रामाजीपंत यांचे पुत्र); ८ गणपतराव (०) (लक्ष्मणपंत यांचे पुत्र); ९ जगन्नाथ, १० विष्णु (धोंडोपंत यांचे पुत्र); ११ व्यंकटराव, *माधवराव (दत्तक) (बापूजी यांचे पुत्र); १२ *माधवराव (दत्तक आले) (कृष्णराव यांचे पुत्र)

७ १३ रामराव (व्यंकटराव यांचे पुत्र)

(वं. नं. १४, १५) (वं. नं. १६)

वंशावळ नं. १४] शाखा चांफेट पोटशाखा, काले-कऱ्हाड [तक्षिम ३ री चालू

[जगन्नाथ (१३-६-९)-धोंडदेव-बाळाजी-जनार्दन-गोविंद-केशंभट]

पिढी नं.	
७	१ त्र्यंबक, २ नारायण+गोदु, ३ हरि
८	४ रामचंद्र (०), ५ रघुनाथ, ६ विष्णु (०), ७ सीताराम, ८ पांडुरंग (०), ९ वासुदेव
९	१०*विनायक दत्तक आले, ११*विनायक दत्तक, १२ वामन, १३ रामचंद्र, १४ सदाशिवराव, १५ श्रीपाद
१०	१७ माधवराव, १८ त्र्यंबक, १९ नरहरि उर्फ बाळासाहेब, २० मुकुंद, २१ भार्गव, २२ अच्युत
	१६ बळवंत
	२३ कमलाकर, २४ सदानंद, २५ विद्याधर

(धार) (भिलवडी)

पिढी नं. | वंशावळ नं. १५] शाखा चांफेट पोटशाखा काले-कऱ्हाड [तक्षिम ३ चालू

[विष्णु (१३-६-१०) धोंडदेव-बाळाजी-जनार्दन-गोविंद-केशंभट]

७ १ गणपतराव २ शिवराम+अंबिकाबाई ३ धोंडो (०) ४ हरिहर (०)

८ ५ दत्तात्रय+लक्ष्मीबाई (१ गणपतराव यांचे पुत्र)

९ ६ गंगाधर (०) ७ कृष्णाजी (५ दत्तात्रय यांचे पुत्र)

७ कृष्णाजी — ना.या.

१० ८ गणेश ऊर्फ राजाराम (भिलवडी) ९ नारायण ११ १२

पिढी नं. | वंशावळ नं. १६] शाखा–चांफट, पोटशाखा कालें-कऱ्हाड [तक्षिम ३ चालू

[रामराव (१३-७-१३)–व्यंकटराव–बापूजी–बाळाजी–जनार्दन–गोविंद–केशंभट]

८ — १ व्यंकटराव ऊर्फ बाळा+लक्ष्मी; ९ गोविंदराव

९ — (व्यंकटरावाचे पुत्र) ३ रघुनाथ; *यशवंत दत्तक; ४ गणेश; ५ नारायण (वं. नं. १७) — (गोविंदरावाचा पुत्र) ६ *यशवंतराव दत्तक आले (वं. नं. १८)

१० — (रघुनाथाचे पुत्र) ७ बाळकृष्ण; ८ भास्कर°; ९ जनार्दन

११ — (बाळकृष्णाचा पुत्र) १० अनंत — (जनार्दनाचे पुत्र) ११ प्रभाकर; १२ कमलाकर; १३ रत्नाकर ऊर्फ बाळ

१२ — (अनंताचे पुत्र) १४ अरुण; १५ प्रकाश (गडहिंग्लज) — (कऱ्हाड)

पिढी नं. | वंशावळ नं. १७]   शाखा चांफेट, पोटशाखा काळें-कऱ्हाड   [तक्षिम ३ री चालू

व्यंकटराव (१६-८-१)-रामराव-व्यंकटराव-बापूजी-बाळाजी-जनार्दन-
गोविंद-केशंभट]

९ गणेश   नारायण

१० १ महादेव   २ कृष्णाजी   ३ राजाराम ४ दत्तात्रेय ५ श्रीराम ६ अच्युत

११ ७ श्रीवत्स ८ मधुसूदन ९ शरच्चंद्र १० श्रीराम ११ प्रभाकर
(पुणे)   (महावळेश्वर)   (कऱ्हाड)

पिढी नं. | वंशावळ नं. १८]   शाखा चांफेट, पोटशाखा काळें-कऱ्हाड   [तक्षिम ३ री चालू

[यशवंत (१६-९-६)-गोविंद-रामराव-व्यंकटराव-बापूजी-बाळाजी-
जनार्दन-गोविंद-केशंभट]

१० १ रामचंद्र   २ शंकर   ३ सदाशिव   ४ पांडुरंग

११ ५ लक्ष्मीकांत ऊर्फ बाळ   ६ वसंत ७ मधुकर ८ आनंद   ९ परशुराम   १० भालचंद्र
(इस्लामपूर)   (कऱ्हाड)

वंशावळी अनुक्रमानें—चांफेट-शाखेचा वृत्तान्त

वंशावळ नं. १ पृष्ठ २६५ पहा—

चांफेट शाखेचे मूळ पुरुष केशवभट इ. स. १६०० च्या सुमारास होऊन गेले असावेत. (खं. १ ले. २८ पहा) चांफेटच्या वतनासंबंधीं जी जुनी माहिती मिळाली आहे तीवरून पहातां विजापूरचा कोंकणांत अंमल असतांना हे चाफेटला असावे असें दिसतें. हे मूळचे चांफेटचेच राहणारे कीं काय हें नक्की कळत नाहीं. मठांतून चांफेटास बहुधा आले असावे. यांचेकडे चांफेट व पुंनसचे ग्रामोपाधिकाचें वतन होतें.

हरभट केशवभट (१-१) हे चाफेट सोडून निंबूचे वाडीस रहावयास गेले. त्यांचे पुत्र पुन्हां चाफेटास रहावयास आले. (खं. १ ले. २८ पहा)

कृष्णंभट केशवभट (१-२) शेतीचा व्यवसाय. कांहीं वर्षे पुनसेची खोती केली (खं. १ ले. २४ पहा)

गोविंदभट केशवभट (१-३) माहिती उपलब्ध नाहीं.

केशवभट व विठ्ठलभट—हरभट (१-४, ५) केशवभट हे निंबूचे वाडीहून परत चांफेटास आले. विठ्ठलभटांनीं १०० लारीची जमीन प्रतिनिधीं-कडून इ. स. १७०२ मध्यें इनाम मिळविली. (खं. १ ले. १ पहा) ती अद्याप त्यांचे वडील बंधूंचे वंशजांकडे चालू आहे.

रघुनाथ कृष्णंभट (१-६) खं. १ मधील चांफेट गांवच्या वतना-संबंधीं जे जे लेख आले आहेत त्या सर्वांत यांचा उल्लेख आहे. चांफेट गांवची खोती इ. स. १७१० चे सुमारास मुळ्यांचेकडून यांनीं मिळविली. ती पुढें यांचे वंशज देशावर गेल्यामुळें (अश्विकर गुण्ये) यांचे धाकटे बंधु नारायण कृष्ण यांचेकडे चालू राहिली. सांप्रत चांफेटचे रा. सीताराम गोपाळ गुण्ये खोतीचे वतन पाहतात. यांना (रघुनाथभटाला) मुलगा नाहीं. यांनीं यांचे धाकटे बंधु नारायण कृष्ण यांचे चिरंजीव महादेवभट यांना दत्तक घेतलें. रघुनाथभटांचा विस्तार म्हणजे हल्लींचें अश्विकर गुण्ये होत.

नारायण कृष्ण (१-८) पुणें, मुंबई वगैरे ठिकाणीं यांचा वंशविस्तार झाला आहे.

जनार्दन गोविंद (१-१०) यांनीं शके १६११ चे सुमारास त्र्यंबके-श्वराची यात्रा करून लेख दिला आहे. हे काले-शाखेचे मूळ पुरुष.

हरभट केशवभट (१-११] यांनीं तिसऱ्या पिढीचे नारायण कृष्ण यांचेविरुद्ध खोतीचे वतनासंबंधीं वाद उपस्थित केला. त्याचा निकाल यांचे चिरंजीव भटंभट यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस लागला.

महादेवभट रघुनाथ (१-१२) अग्निशाखेचे मूळ पुरुष इ. स. १७२० च्या सुमारास साताऱ्याला आले असावेंत. यांचा व वाईकर वैद्यांचे दिवाण यांचा बराच पत्रव्यवहार होता (खं. १ ले. १३ पहा)

गोविंद नारायण (१-१४) वडील घराण्याबरोबर झालेल्या वादांत यांनीं दिलेली चांफेट येथील वतनासंबंधीं माहिती या इतिहासाचे दृष्टीनें फारच महत्त्वाची आहे.

बाळाजी जनार्दन (१-१५) ऐतिहासिक चरित्रविभागांत यांचें चरित्र पहावें.

वंशावळ नं. २ पृ. २६६ पहा.

भटंभट (२-१) इ. स. १८४६ तील जदनाम्यावरून पहातां हे सन १७८६ चे सुमारास निवर्तले असावे. चांफेट शाखेंतील वतनासंबंधीं झालेल्या वादास हेच मूळ कारण होत. यांना सात पुत्र होते. त्यांचा विस्तार उत्तर हिंदुस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं झाला, परंतु आज त्या गुण्ये मंडळी-संबंधीं कांहींच माहिती मिळत नाहीं.

वंशावळ नं. ३ पृ. २६७ पहा.

मोरेश्वर कृष्ण (३-६) शके १८१८ त ६० वर्षांचे असतां मृत्यु पावले.

दामोदर रामकृष्ण (३-७) मृत्यूसमयीं वय १०. भार्या लक्ष्मी. माहेर चांदोरकर. लक्ष्मीबाई शके १८३० मध्यें मरण पावल्या.

विनायक रामकृष्ण (३-८) पहिल्या प्लेगांत मृत्यु. अविवाहित. इंदूर येथें रहात असत.

वासुदेव रामकृष्ण (३-९) मृत्यु शके १८२३. भार्या-रुक्मिणी मृत-माहेर तांबे (खेडकुली). दशग्रंथ म्हटले होते. सर्व अभ्यास इंदूरास केला. सांपत्तिक स्थिति उत्तम. इंदुरास किब्यांचे कारभारी. डिके यांचे हे उपाध्ये होते.

चिंतामण आत्माराम (३–१०) यांच्या त्र्यंबकेश्वराचे लेखांकावरून ते आपल्या मातोश्रींसह इंदूरास राहत असावे असें दिसतें.

***केशवभट वासुदेव** (३–११) ज. श. १७९१. भार्या (१) सरस्वति–माहेर आठल्ये (देवळें). कन्या–(१) अम्बू–भाटे (उम्बरे). (२) कृष्णा–खांडेकर (घाटीवले). (३) चंद्रा–चांदोरकर (चांदोरे). भार्या–(२) आनंदी–माहेर भागवत. कन्या–बाबी–मोघे यांजकडे. भार्या–(३) जानकी–माहेर हलबे. दशग्रंथाचा अभ्यास वडिलांजवळ केला. सांपात्तिक स्थिति मध्यम. मु।। चांफेट.

***मोरेश्वर केशव**—वय ३०. भार्या–शारदा माहेर–भाटवडेकर (उमरे). शिक्षण मध्यम. धंदा–व्यापार. सांपत्तिक स्थिति मध्यम. मु।। चांफेट.

***गणेश केशव** (३–१३) अविवाहित. वय ३०. सांपात्तिक स्थिति चांगली.

वंशावळ नं. ४ पृ. २६८ पहा.

रामकृष्णभट अनंतभट (४–४) यांचा उल्लेख जदनाम्यांतील वंशावळींत नाहीं. त्यांचे बंधु गंगाधर अनंत यांच्या त्र्यं.च्या लेखांत आहे.

बळवंत हरि (४–५) यांनीं संवत् १९२१ त काशीयात्रा करून लेख दिला आहे. त्यांत 'मूळगांव चांफेट व हल्लीं वस्ती जालवण' असें लिहिलें आहे. जदनाम्यांतील वंशावळींत यांचा उल्लेख नाहीं.

विठ्ठल विनायक (४–६) यांनीं झांशीहून श. १७८९ पौ. शु. ३ ला ना. यात्रा करून लेख दिला आहे.

केशव विनायक (४–७) यांना विनायक व चिंतामण हे पुत्र असल्याचा उल्लेख जदनाम्यांत नाहीं. त्यांचे बंधु विठ्ठल विनायक यांचे ना. याचे लेखांत आहे.

महादेव विनायक (४–८) शके १७२२ त ना. यात्रा करून लेख दिला आहे. त्यांत ' मूळगांव चांफेट हल्लीं वस्ती चाफळ ' असा उल्लेख आहे.

वंशावळ नं. ५ पृ. २६९ पहा. आश्वीशाखेची माहिती चालू

रघुनाथ उर्फ बच्याजी महादेव (५–१) प्रकरण ८ मध्यें यांचें चरित्र दिलें आहे.

लक्ष्मण महादेव (५–२), **बाळाजी महादेव** (५–३), **मोरो महादेव** (५–४), **जनार्दन बच्याजी** (५–५), **महादाजी बल्लाळ** (५–६) या सर्वांचीं चरित्रें प्रकरण ८ मध्यें दिलीं आहेत.

रामचंद्र जनार्दन (५–७) वयाचे ८० वर्षांचे सुमारास निवर्तले. भार्या–उमा ऊर्फ काशीबाई, माहेर–आगटे. या गणपतीच्या उपासक होत्या. गणपतीनें प्रसन्न होऊन त्यांना औषधांचा बटवा दिला. अश्वीच्या पंचक्रोशींत उत्तम वैद्य म्हणून प्रसिद्ध होत्या. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकरांच्या मातोश्री यांची सख्खी बहीण. बेळापूरचे आगटे हे गणपतीचे उपासक होते. वयाच्या ९६ वे वर्षी त्या निवर्तल्या. त्यांना एकंदर २० मुलें झालीं व त्यांतील ५ जगलीं. त्या गौरवर्णाच्या, बांध्यानें नाजूक व ठणकदार होत्या. त्यांना 'आहोआई' म्हणत. कन्या (१) वेणु–किरकिरे, (२) बया–बारामतीचे मावळंकर यांजकडे दिल्या होत्या.

रामुदादा ग्वाल्हेरला तांबवेकर सावकारांचे दिवाण होते. कांहीं दिवस इंदूरास होते. उतार वयांत ते अश्वीस आले, असें ऐकिवांत आहे. यांच्या भगिनी वारुताई या खांडेकरांकडे दिल्या होत्या.

लक्ष्मण जनार्दन (५–८) भार्या–मथुरा ऊर्फ दुर्गा. विरक्त वृत्तीचे होते. कांहीं दिवस चाकणची किल्लेदारी केली. आश्वीस फारच थोडे दिवस असत. उतार वयांत पैठणांत राहत.

वामन ऊर्फ अण्णा, रामचंद्र (५–९) ७४ वे वर्षी मृत्यु. भार्या–यशोदा, माहेर नारळीकर. कन्या (१) पिलुताई ४० वे वर्षी मृत—पारनेरच्या देवाकडे सासर. (२) बहिणाताई ८७ व. वयाच्या होऊन २ वर्षापूर्वी वारल्या. भ्राा कै. डॉ. रामचंद्रपंत तळवलकर, L. M. & S. गायकवाड दरबार सर्जन होते. (रामचंद्रपंतांना चार पुत्र असून ते सर्व सुविद्य, श्रीमान् व सुस्वभावी आहेत. त्यांचे प्रथम पुत्र वासुदेवराव बी. ई. असून बडोदे संस्थानांत नौकरीवर होते. हल्लीं पेन्शन घेतलें आहे. दुसरे पुत्र केशवराव ऊर्फ नानासाहेब हेही बी. ई. असून सध्यां त्यांनीं पेन्शन घेतलें आहे. तिसरे पुत्र डॉ. गजाननराव ऊर्फ बापूसाहेब हे एल्.एम्. अँड एस्.टी.डी.डी. असून अहमदाबादेस क्षयतज्ज्ञ

म्हणून ख्यातनाम आहेत. चौथे पुत्र शंकरराव ऊर्फ अण्णासाहेब मुंबई हे विश्व-विद्यालयाचे एम्. ए. असून जर्मनीस पाश्चात्य औषधें तयार करण्याचें ज्ञान संपादन करून आले व पुण्यास 'फार्मा-स्युटिकल लॅबोरेटरी' काढली आहे. त्यांचीं पेटंट औषधें फारच मोठ्या प्रमाणावर खपतात. चारीही बंधूंचे मुलगे सुविद्य असून त्यांच्यांपैकीं कांहींनीं वैद्यकांच्या पाश्चिमात्य देशांतील उच्च पदव्या संपादिल्या आहेत. महाराष्ट्रांतील कऱ्हाडे ब्राह्मणांतील हें एक आदर्श घराणें आहे.)



वामनराव रामचंद्र

वामनराव अण्णांचें शिक्षण मराठी चार इयत्तापर्यंत झालें होतें. आणेवारीची परीक्षा पास. मोजणीखात्यांत शिरस्तेदार होते. पगार रु. ३४ होता.

कृष्णाजी ऊर्फ आबा रामचंद्र (५-१०) मृत्यु २३-२-१९०१ वयाचें ७५ वे वर्षी. भार्या—गोपिकाबाई माहेर—पंडीत (वैजापूर). कन्या (१) बकु—मृत्यु ४० वें वर्षी. भ्र।। शंकरराव किबे. (२) साळुताई—मृत्यु ७० वर्षे वयास. भ्र।। गंगाधरराव ढवळे. (३) यमु—मृत्यु ५८ वर्षे वयास. भ्र।। विश्वनाथराव आठल्ये, सातारा. (४) सुंदराबाई—मृत्यु ३५ वर्षे वयास. भ्र।। डॉ. हरिभाऊ रायकर बडोदे (यांच्या :मुलीचे चिरंजीव म्हणजे प्रसिद्ध साहित्यिक व इतिहाससंशोधक प्रा. दत्तो वामन पोतदार. या इतिहासलेखनास कारणीभूत झालेल्या व्यक्तींपैकीं प्रमुख). (५) गया—मृत्यु ५२ वर्षे वयास. भ्र।। गणपतराव शेवडे.



कृष्णराव रामचंद्र

कृष्णराव आबांची आणेवारीची परीक्षा झाली होती. प्रथम अहमदनगरास कारकून होते. पुढें कांहीं दिवस मामलेदार.

रघुनाथ ऊर्फ राघोपंत रामचंद्र—वयाचे ८३ वे वर्षी इ. स. १९१८ त पौष वद्य ११ स मृत्यु. भार्या—जानकी. माहेर—पैठणचे अम्बर्डेकरांकडे. कन्या –(१) मथूताई मृत. कोंकणांत धामणकरांकडे. (२) चिमाताई वय ८०. भ्रतार केशवराव भागवत (मृत)–नाशिक. (३) ठकूताई–मृत–भास्करपंत गर्दे. (४) **विठाताई–वय ७२. भ्रा॥ कै. गंगाधर शंकर खेर वकील (रत्नागिरी). यांचे एकुलते एक पुत्ररत्न म्हणजे मुंबई प्रांताचे माजी पंतप्रधान बाळासाहेब खेर होत.** अशा थोर घराण्याचे इतिहास अवश्य झाले पाहिजेत. पुढें त्यांचें त्रोटक चरित्र दिलें आहे तें पहा. (५) द्वारका वय सुमारें ६५. भ्रा॥ विष्णुपंत सदाशिव आंगलेकर (कोल्हापूर)–मृत.



रघुनाथराव रामचंद्र व सौ. जानकीकाकी

कै. ती. दादांची आणेवारीची परीक्षा झाली होती. प्रथम पैमाशीकडे ठाणें जिल्ह्यांत कारकून होते. नंतर कोल्हापुरास जंगलखात्यांत नौकरी. सर्व आयुष्य जंगलखात्यांतील नोकरींत गेल्यामुळें वनस्पतींशीं बराच संबंध येई. वनस्पतींचें फारच उत्तम ज्ञान. उत्तम प्रकारचे वैद्य. कै. ती. हरिभाऊ व कै. ती. गोपाळराव कृष्ण यांच्या मेडिकल एज्युकेशनला हेच कारणीभूत झाले. पुढें ती. केशवराव अनंतराव इत्यादींचीं शिक्षणें एकमेकांचे साहाय्यानें होत गेलीं. अश्वीकर गुण्यांचें घराणें पुढें आलें तें ती. दादांमुळेंच. कै. ती. बाबा 'श्री शाहू आर्यौषधी कारखान्याचे' संस्थापक, यांचें शिक्षण ती. दादांच्या देखरेखीखालीं झालें व अहमदनगरच्या आयुर्वेद-आश्रम फार्मसीचे संस्थापक ती. गंगाधरशास्त्री गुण्ये यांचें शिक्षण कै. ती. बाबांच्या देखरेखीखालीं झालें. अशा तऱ्हेनें ती. दादा हें घराण्यांतील वैद्यकीय शिक्षणाचे उगमस्थान होत. घराण्यांत

वैद्यकीचा मूळ उगम कै. ती. आहोआई यांच्यापासून झाला व त्याचा प्रसार त्यांचे नं. ३ चे चिरंजीव ती. रघुनाथराव यांनीं केला. स्वभाव थोडा रागीट परंतु प्रेमळ. शिस्त करडी. गायनाची चांगलीच माहिती होती. भजनाचा नाद. गु. भागवतबुवा बेलापूरकर हे भागवतसांप्रदायांतील त्यांचे गुरु. दानधर्माकडे प्रवृत्ति. फार मोठ्या प्रमाणावर गरिबांस औषधें विनामूल्य दिलीं. रोग्याचे सेवेला सदैव हजर असत. त्यामुळें त्यांचे भोंवतीं सदैव लोकांचा गराडा असे. पंढरपुरास, कोल्हापुरास, नगर इत्यादि ठिकाणी लोकप्रिय वैद्य म्हणून प्रसिद्ध.

वयाच्या पूर्वार्धामध्यें यांनीं व यांचे धाकटे बंधु नारायणराव या उभयतांनीं १९ व्या शतकाच्या मध्यांत संगमनेर व अहमदनगर येथें फार मोठ्या प्रमाणावर किराणा सामानाचा व्यापार केला, व त्यांत अखेरीस दिवाळें वाजलें. अश्वि येथील सर्व जमिनी गहाण पडल्या व त्यामुळें अश्वि सुटली. कोल्हापुरास आले. तेथून पुढें उपरोक्त लिहिल्याप्रमाणें घराण्याचे उन्नतीस कारणीभूत झाले.

(ती. बाळासाहेब खेरांचें चरित्र—

कै. ती. गंगाधर शंकर खेरांचा व माझ्या आजोबांचा आणि ती. अण्णांचा सर्व आयुष्यभर एकसारखा संबंध येत गेला. याचें विशेष कारण म्हणजे ती. अण्णांच्यावर कै. ती. गंगाधरपंतांची विशेष मर्जी होती. त्यांचें पंढरपुरास मधून मधून येणेंजाणें होई. कै. ती. गंगाधरपंतांच्या आयुष्यांतील पहिलीं कांहीं वर्षें कोल्हापुरास कारकुनी करण्यांत गेलीं. नंतर त्यांनीं मराठी वकिलीचा अभ्यास केला, व पुढें कुंदगोळास १२ वर्षें वकिली केली. पुढें आश्वीस शेती घेतली व १२ वर्षें शेती केली. पुढें शेती सोडली व ते स्वतः हिंदुस्थानच्या तीर्थयात्रेस गेले. परत आल्यावर प्रवासामुळें थकले होते व त्यामुळें पुढें १९१२ त पंढरपुरास निवर्तले. त्यांचे एकुलते एक चिरंजीव म्हणजे ती. **बाळासाहेब खेर होत.**—ती. बाळासाहेबांचा जन्म २४ ऑगस्ट इ. स. १८८८ त रत्नागिरीस झाला. १९०२ मध्यें 'नगर सोसायटी' हायस्कूलमधून ते मॅट्रिक झाले. पुढें विल्सन कॉलेजांत प्रवेश केला. तेथें अनेक बक्षिसें मिळालीं. १९०६ मध्यें बी. ए. झाले. संस्कृतचें 'भाऊ दाजी' प्राइझ मिळालें. नंतर १९०८ मध्यें एल्‌एल्‌.बी. झाले व सॉलिसिटर फर्ममध्यें नांव नोंदविलें.

१९१२ मध्यें युरोप व अमेरिकेचा प्रवास करून परत आले. परत आले तेव्हां जवळ खिशांत अवघे दोन रुपये होते. नौकरीकरितां वर्तमानपत्रांत पुढीलप्रमाणें जाहिरात दिली. 'A double graduate will to accept a job' (डबल ग्रॅज्युयेटला नौकरी पाहिजे आहे). नंतर न्यायमूर्ति बीमनसाहेबांनीं आपले सेक्रेटरी म्हणून त्यांना बोलाविलें. न्यायमूर्ति डोळ्यानें अंध होते. १९१६ त न्यायमूर्तींबरोबर तीं. बाळासाहेब परदेशगमनाकरितां प्रवासास गेले. परत आल्यावर मणिलाल नानवटीबरोबर इ. स. १९१८ त सॉलिसिटरची फर्म चालू केली आणि त्याच व्यवसायांत उत्तम यश संपादिलें. सामाजिक कार्य तेव्हांसुद्धां चालू होतेंच. गांधींच्या राजकारणाचा अभ्यास करून १९२२ त राजकारणांत पदार्पण केलें. तेव्हां ते ' स्वराज्य पार्टी 'चे व ' बार्डोली चौकशी कमिटीचे ' सेक्रेटरी होते. त्यांनीं मुंबईत हरिजनांच्या उद्धारार्थ एकसारखे प्रयत्न चालू ठेवले आहेत. महाराष्ट्र हरिजन सेवासंघाचे ते अध्यक्ष होते. १९३० त मीठ–सत्याग्रहांत त्यांनीं भाग घेतला होता. १९३२ मध्यें दोन वर्षें प्रर्यंत् कैद. १९३७ मध्यें मुंबईप्रांताचे पंत-प्रधान झाले. ते सदैव हंसतमुख असतात. स्वभाव प्रेमळ, निस्पृह, सत्यप्रिय व बाणेदार.)

दामोदर रामचंद्र (५–१२) मृ. सन १९१५, वयाचे ८४ वे वर्षी. भार्या–(१) माहेर पैठणचे अम्बर्डेकरांकडे. (२) अन्नपूर्णाबाई–पतीच्या पश्चात् एक वर्षानें कोपरगांवीं निवर्तल्या. पातिव्रत्यानें दामोदरपंतांची सेवा केली म्हणूनच त्यांचें आयुष्य वाढलें. दामुकाकांना दम्याचा विकार अतिशय. दम्यामुळें चालणें अशक्य होई. तेव्हां घोड्यावर त्यांना बसवून आपण हातांत घोड्याच्या दोऱ्या धरून त्यांना कचेरींत पोहोंचवीत. वेळप्रसंगीं स्वतः कचेरींत त्यांचें औषध व दशमी घेऊन जात. शेकणें, रगडणें, औषधोपचार यांस त्या कधींच कंटाळल्या नाहींत. तोंडानें फटकळ, वृत्तीनें संतापी व तापट तथापि अत्यंत मेहेनती व कष्टाळू. पुणतांबे येथील दशग्रंथी विद्वान् ब्राह्मण वेदान्ती यांच्या कन्या. त्यांस भाऊ अगर बहीण कोणीच नव्हतें. पुणतांबे येथें वेदान्त्यांचा चिरेबंदी मोठा वाडा असून तो वारसाहक्कानें यांचेकडे आला होता. परन्तु पुढें त्यांच्या मुलानें त्याकडे न पाहिल्यानें तेथील लोकांचे ताब्यांत तो गेला आहे. कन्या— (१) सई–वाडेकर (२) चंद्रा–टोळ (३) वारु–

मिराशी (४) गोदुताई–काशीकर. (दुर्दैवानें गोदूताई बालविधवा झाल्या. परंतु त्यांचे बंधु प्रा. तात्यासाहेब गुणे यांच्या प्रोत्साहनानें पुण्याच्या 'सेवा-सदन 'मार्फत ४ वर्षे अभ्यास करून बी. एम्. एन्. ए. झाल्या. सेवासदनानें हिंदुस्थानांत जेथें जेथें लोकोपयोगी कामें केलीं, तेथें यांनीं नर्स म्हणून बहुमोल कामगिरी केली आहे. बेंगलोर म्युनिसिपालिटीमध्यें चीफ मेट्रन म्हणून १० वर्षे उत्तम नोकरी केली. त्याबद्दल नियमास अपवाद करून म्युनिसिपालिटीनें त्यांना पेन्शन मंजूर केलें आहे. वृत्तीनें धार्मिक व प्रेमळ असून अखिल भारताचा प्रवास त्यांनीं केला आहे.)

दामोदर अण्णांचें शिक्षण घरगुतीच झालें होतें. मोडी अक्षर उत्तम. ज्योतिषाचें चांगलें ज्ञान. गायनाबद्दल उत्तम आवड असून रागदारी उत्तम माहीत होती. प्रथम कागलास व नंतर अहमदनगर जिल्हा रेव्हिन्यू खात्यांत कारकून. फारच हुशार व अव्वल दर्जाचे जमाबंदी कारकून म्हणून जिल्ह्यांत प्रसिद्ध. भक्तिप्रधान वृत्ति. भजनाचा अखंड परिपाठ. तुकाराम, एकनाथ, नामदेव, ज्ञानेश्वर इ. चे अभंग मुखोद्गत. एकनाथी भागवताचें व श्रीमत् भागवताचें नित्य अध्ययन व जन्मांत अनेकदां पारायणें. वृत्ति कर्मठ नसून अत्यंत उदारमतवादी. यांचे कनिष्ठ चिरंजीव कै. प्रो. पांडुरंग दामोदर गुण्ये जर्मनींस तीन वर्षे राहून परत आल्यावर प्रायश्चित्ताचा प्रश्न निघाला. त्या वेळीं त्यांनीं त्यांस असें सांगितलें कीं "तुझा पत्रव्यवहार माझेशीं मोडींत असून वरती तूं श्रीहरी असें लिहिण्याचें विसरला नाहींस, अशा माणसास प्रायश्चित्ताची कांहीं जरूरी नाहीं." श्री एकनाथमहाराजां-प्रमाणें अस्पृश्याच्या चुकलेल्या मुलास कडेवर घेऊन उगे करून त्याचे घरीं पोहोंचविण्याचा प्रसंग, ब्राह्मणभोजन घालण्याबद्दल अत्यंत आवड, आचरण अत्यंत शुद्ध, निर्व्यसनी भावंडांत सर्वांत लहान असून सर्व आयुष्य घोर दारिद्र्यांत! अखेरचा पगार ३० रु.। पेन्शन रु. १२॥ महिन्यास ।। वयाचे १६ वे वर्षापासून दम्याची जोरदार व्यथा, ती अखेरपर्यंत. अत्यंत बुद्धिवान्. केवळ वाचनानें व ऐकण्यानें संस्कृतचा अर्थ समजण्याइतकी तयारी.

बेलापूरचे भानुदासबुवा हे भक्तिसांप्रदायांतील यांचे गुरु होत. भानुदास-बुवांचे दिंडीस दरवर्षी हे नगरास जेवण देत असत. अत्यंत प्रेमळ, साधु-

कोर्टांतील, उत्तर आयुष्य स्थितप्रज्ञतेंत, जगापासून अगदीं वेगळें असें घालविलें.

नारायण रामचंद्र (५-१३) भार्या—सगुणा, माहेर पंडितांकडे. वयाचे ४५ वे वर्षी निवर्तले. लहान मुलें अत्यन्त प्रिय असत. वडील बंधू निरनिराळ्या खात्यांत नौकरीस गेल्यास अश्वि येथील शेती पाहण्याचें काम यांजकडे असे.

वंशावळ नं. ६. पृष्ठ २७० पहा. अश्वी शाखा माहिती चालू.

चिंतो वामन ऊर्फ बाबा गुण्ये— (६-१) ६-९-४१ रोजी वयाचे ८३ वे वर्षी मृत्यु पावले. भार्या भागीरथी-मृत. माहेर पंडित. कन्या- (१) मथू मृत्यूसमयीं वय ४०-पित्रे (विजापूर) (२) वेणु-वय ३० जिवंत. तळवलकर (अष्टे) (३) कमला-मृत्युसमयीं वय २५-नाकें (४) सई-वय २५—जोशी.



बाबा गुणे

मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण त्यांच्या वडिलांचे देखरेखीखालीं पुण्यास झालें. मॅट्रिक होतांच डोळ्यास एक प्रकारची व्यथा जडून उजव्या डोळ्यास कायमची अंधता आली. तेव्हां पुढें युनिव्हर्सिटी डिग्रीचे पाठीमागें न लागतां घरांतीलच पिढीजात धंदा उत्तम तऱ्हेनें करण्याचें ठरविलें व वैद्यकीचा अभ्यास सुरू केला. ती. बाबांचें अध्ययन कै. कृष्णशास्त्री भाटवडेकर (सर भालचंद्र यांचे वडील) व कै. अप्पाराव वैद्य पटवर्धन पुणें (गुंड गणपतीचे उद्धारक) यांच्या हाताखालीं झालें. औषधीकरण विद्या कै. सीतारामशास्त्री भागवत यांचेजवळ शिकले. कुपीस्थ रसायनें बनविण्याची विद्या वैद्य भागवतशास्त्री यांचेजवळ कोल्हापुरास शिकले. वनस्पतींचें ज्ञान राघोपंतदादांना फार उत्तम प्रकारचें होतें. ते पुण्यांतील शिक्षणक्रम संपवून कोल्हापुरास आल्यानंतर राघोपंतदादांचे

देखरेखीखालींच त्यांनीं वैद्यकीचा व्यवसाय सुरू केला व त्याच वेळीं ती. दादांचेपासून वनस्पतींची माहिती मिळवून घेतली. व्यवस्थितपणा, निरलस वृत्तीनें काम करीत असणें, रोग्यांबरोबर प्रेमानें वागणें, अत्यंत कळकळीनें रोगचिकित्सा करणें, योग्य तो उपाय स्पष्टपणें सांगणें इत्यादींमध्यें त्यांच्या वैद्यकीचें वैशिष्ट्य होतें. रोज शें-दोनशें रोगी आले नाहींत असें कधींच घडत नसे. कोल्हापूरचे आसपासचे भागांत अत्यंत प्रसिद्ध होते. गरीबांपासून ते थोरांपर्यंत एकच प्रकारची रोगचिकित्सा. आलेल्या रोग्यानें पैसे दिले कीं नाहीं याची कधींच चौकशी केली नाहीं. ' सर्वभूतानि चात्मनि ' अशी त्यांची वृत्ति होती. त्यांच्या वैद्यकीय प्रवीणतेबद्दल त्यांना ' राजवैद्य ' असा किताब कै. शाहूमहाराज कोल्हापूर यांनीं दिला होता.

ती. बावांचें आचरण अत्यंत शुद्ध, पवित्र, धार्मिक व व्यवहारदक्षतेचें होतें. गेलीं १५–२० वर्षें वर्षांतून ८ महिने ते अश्वीस काढीत. ते तेथें होते म्हणूनच सर्व गुण्ये मंडळींच्या शेतीची परिस्थिति आज दिसत आहे अशा स्वरूपांत राहिली. अश्वीकर गुण्ये पुढें येण्यास दोन व्यक्ति कारणीभूत झाल्या. एक कै. ती. रघुनाथराव (दादा) व दुसरे कै. ती. बावा होत. ती. दादांनीं आपल्या चारी भावांचीं मुलें पुढें आणलीं, तर ती. बावांनीं चुलत घराण्यांतील सर्व मंडळी पुढें आणली.

मोरेश्वर वामन (६–२) वयाचे ३५ वे वर्षीं मृत. भार्या लक्ष्मी–माहेर खांडेकर. कन्या–(१) सुंदरा, २० वे वर्षीं मृत–सासर गर्दे यांजकडे (२) नर्मदा--वय २२.–धामणकर. (३) दुर्गाबाई–महाजनी.

शिक्षण साधारण. इरिगेशन खात्यांत कारकून होते.

***यशवन्त चिंतामण** (६–३) वय ६०. भार्या उमा. माहेर नारायणराव सरदेसाई इनामदार साखरी. कन्या (१) चंद्राताई–वय ३५. डॉ. रघुनाथराव आठल्ये (सातारा). (२) गोदुताई–वय २८–खेर (कोल्हापूर). (३) मालुताई वय २०–पित्रे (कोल्हापूर). (४) सखु–वय १६. मॅट्रिकमध्यें. (५) विमल, वय १२. इंग्रजी शिकत आहे.

मॅट्रिकपर्यंत शिक्षण; पुढें वैद्यकीचा अभ्यास, कोल्हापुरास वाकणकरांकडे.

ती. बाबांचे देखरेखीखालीं सर्व वैद्यकीय शिक्षण पूर्ण झालें. नामांकित वैद्य म्हणून कोल्हापुरास ख्याति. श्रीशाहू आर्यौषधी कारखाना ती. बाबांनीं सुरू केला व यांनीं त्याचा खूपच विस्तार करून गेले वर्षी तो 'लिमिटेड' केला. कर्नाटकांत आयुर्वेदाचा प्रसार यांनीं फारच मोठ्या प्रमाणावर केला. स्वभाव अत्यंत सरळ व सात्विक वृत्तीचा. आदरातिथ्य फार उत्तम प्रकारचें. राहणी अत्यंत साधी, वृत्ति धार्मिक, भजनाचा नाद. भागवतसांप्रदायाची आवड. कोल्हापुरास अतिशयच लोकप्रिय. ते आजारी असतांना बरे होण्याकरितां कोल्हापूरच्या लोकांनीं अंबेस नवस केले. स्वतःचा स्वार्थ विसरून कुटुंबीयांना मदत करण्यांत वाटेल तीं घस सोसण्याची अतुलनीय मानसिक तयारी.



यशवंत चिंतामण

* **विष्णु चिंतामण** (६–४) वय ४२. भार्या–यमुना. माहेर–कात्रे. कन्या–(१) इंदु–खेर. (२) कमल–वय १०.

बी.ए. व नंतर फर्स्ट एल्एल्.बी. पर्यंत शिक्षण. कांहीं दिवस वकिली केली. लोकलबोर्डाकडे मामलेदार म्हणून कोल्हापूर सरकारनें नेमणूक केली. हल्लीं कोल्हापुरास आहेत.

* **रामचंद्र ऊर्फ अप्पा** (६–५)—वय ३८. भार्या–कृष्णा. माहेर–घाटे. कन्या–रजनी. वय ८.

मॅट्रिकपर्यंत शिक्षण. पुढें वैद्यकीचा अभ्यास. हल्लीं राहुरीस वैद्यकी करतात.

* **विनायक चिंतामण** (६–६) वय ३५. भार्या शारदा. मॅट्रिकपर्यंत शिक्षण. पुढें वैद्यकीचा अभ्यास. हल्लीं अहिल्याबाईसाहेबांचे दवाखान्यांत कोल्हापुरास वैद्य.

श्रीधर मोरेश्वर (६–७) २२ वे वर्षी मृत्यु. भार्या–ताराबाई. माहेर–पंडितांकडे.

* **सदाशिव मोरेश्वर** (६–८) वय ३५. भार्या–पार्वती. माहेर–आगटे (सातारा). कन्या–शालिनी, इंटरपर्यंत शिक्षण. हल्लीं कोल्हापुरास वैद्य.

* **गणपति यशवन्त** (६–९) वय ३०. भार्या–शान्ता. माहेर–खांडेकर (सातारा). कन्या–(१) नलिनी–वय ८. (२) मंदाकिनी–वय ३.


शिक्षण मॅट्रिकपर्यंत. कलेची व खेळाची आवड. सांपत्तिक स्थिति चांगली. ' श्री शाहू आयौंषधी कारखाना लिमिटेड 'चे मॅनेजर.

* **वसंत यशवन्त**—(६–१०) पेंढारकरांकडे दत्तक. विष्णु रघुनाथ हें दत्तकानंतरचें नांव.

* **गोविंद यशवन्त**—(६–११) जन्म २५-१२-१९१५. भार्या–सरोजिनी, माहेर विष्णुपन्त सरदेसाई साखरीकर. Mechanical Engineering चा डिप्लोमा. हल्लीं श्रीशाहू आयौंषधी कारखान्याचें काम पाहतात. प्रकाशक 'सांजवन' कट्टर सुधारक, हार्मोनिअमपटु, देशी व्यायाम व सर्व तऱ्हेचे खेळ यांत तयार. विमा 'नवभारत इन्शुअरन्स कंपनी' (६–१२ ते ६–१९)—सर्वजण लहान असून शिकत आहेत.

वंशावळ नं. ७ प. २७१ पहा. आश्रि शाखा चालू


गोपाळ कृष्ण—(७–१) ज. श. १७८३; २६ जुलै १८६१. मृत्यु १७–१०–१९३४. भार्या–सत्यभामा. माहेर–गुर्जर पुराणिक (पुणें).



डॉ. गोपाळ कृष्ण व चि. प्रभाकर

शिक्षण इंग्रजी ७ यत्तापर्यंत. पुणे मेडिकल स्कूलची परीक्षा पास झाले. करवीर सरकारचे नोकर. ॲलोपथीबरोबर होमिओपाथीचा अभ्यास केला होता. कोल्हापुरांत नामांकित होमिओपाथिक डॉक्टर होते.

* **आनंदराव कृष्ण** (७–२) ज. श. १७८६ अश्विन शुा ७—भार्या-गंगाबाई माहेर पंडीत. मराठी मुलकी व इंग्रजी स्कूल फायनल पास. कलकत्त्याची L. M. H. S. ही होमिओपाथीची पदवी मिळविली. लहान मुलांचे रोगचिकित्से-बद्दल प्रसिद्ध, राहणी साधी, स्वभाव सात्विक व अत्यंत सरळ. आदरातिथ्य उत्तम प्रकारचें, वागणूक प्रेमळपणाची, ज्येष्ठ बंधूंच्या मुलांवर अपत्यनिर्विशेष प्रेम. हे उभयतां बंधू म्हणजे या घराण्यांतील रामलक्ष्मणच !



डॉ. आनंद कृष्ण

* **पुरुषोत्तम गोपाळ** (७–३) ज. १८८९ इ. स. भार्या—यशोदा, माहेर शिरगांवकर (ती. सौ. यशोदा वहिनींच्या भगिनींचे पुत्र म्हणजे पुण्याचे फर्ग्युसन कॉलेजचे प्रसिद्ध प्रिन्सिपॉल रँगलर गणपतराव महाजनी होत. त्यांचें घराणें कऱ्हाडयांतील एक सुप्रसिद्ध घराणें आहे) (तारळे). कन्या—कुसुमताई—कर्वे युनिव्हर्सिटीच्या इन्टर आर्टस् पास. भ्राा महादेव बाळकृष्ण अध्ये, M. B. B. S. मुंढवा.

हे मुंबई विश्वविद्यालयाचे एम्. बी. बी. एस्. पास आहेत. गेल्या महायुद्धांत कॅप्टन म्हणून लष्करांत नौकरी केली. पुढें तीन वर्षांनीं नौकरी सोडली. शेतीचा नाद. सर्व आयुष्य अश्वीचे शेतींत घालविलें. हरतऱ्हेच्या यांत्रिक शेतीचा नाद. सर्व आयुष्य अश्वीचे शेतींत घालविलें. शेतीचे निरनिराळे नवीन प्रयोग करण्याची आवड. सांपत्तिक कलेंत पारंगत. स्थिति चांगली.

* **दत्तात्रेय गोपाळ** (७–८) ज. इ. स. १८९७. भार्या गोपिका—मृत. माहेर तळवलकर. कन्या (१) अनुताई—लुकतुके. शिक्षण इंग्लिश ७ वी यत्तेपर्यंत. (२) मनुताई ज. १९२१—खंडकर. शिक्षण इन्टर आर्टस्पर्यंत. (३) शान्ता-

बाई–मुंबई विश्वविद्यालयाच्या मॅट्रिक. कोल्हापूर सेंटरला पहिल्या १९४३ इंटर सायन्स. हल्लीं पुण्यास बी. जे. मेडिकल स्कूलमध्यें शिकत आहेत. मनुताई व शान्ताबाई दोघीहि कोल्हापुरास हायस्कूलमध्यें स्कॉलर म्हणून होत्या.

शिक्षण मॅट्रिकपर्यंत. हरएक प्रकारचें यांत्रिक कलेंत प्रवीण. सिनेमांतील फोटोग्राफीमध्यें उत्तम लौकिक मिळविला आहे. कित्येक वर्षें तोच व्यवसाय करतात. सध्यां 'नवयुग पिक्चर्स 'मध्यें फोटोग्राफर म्हणून आहेत.

*__शरद् दत्तात्रय__ (७–५) ज. १९१९, मुंबई वि. वि. मॅट्रिक पास. कलकत्ता युनिव्हर्सिटीची होमिओपाथीची एम्. डी. डिग्री घेतली आहे. कोल्हापूर येथें हल्लीं उत्तम प्रॅक्टिस आहे. दरमहा ३०० रु. उत्पन्न.

*__प्रभाकर दत्तात्रय__ (७–६) ज. १९२६. मुं. वि. वि. १९४३ सालीं मॅट्रिक. मॅट्रिकला हायस्कूलमध्यें पहिले आले. हल्लीं फर्ग्युसन कॉलेजांत फर्स्ट इयर सायन्सला आहेत.

*__दिनकर दत्तात्रय__ (७–७) ज. १९२८. इंग्रजी शाळेंत शिकत आहेत.

वंशावळ नं. ८ पृ. २७२ पहा. अश्वि-शाखा चालू

हरि रघुनाथ (८–१) वयाचे ८२ वे वर्षी ता. १२ मे १९३७ वैशाख शु॥ २ रोजीं मृत्यु. भार्या–रमाबाई-ठकुताई. माहेर–विष्णुपंत हैबतराव खंडकर, मु॥ नाशिक. ७७ वे वर्षी निवर्तल्या. कन्या–(१) बाळुताई–वय ५९. कडगांवकर. (२) अम्बूताई–वय २५ वे वर्षी मृत–किराणे. (३) येसूताई–वय ५०–देसाई मु॥ पुणें. (४) कृष्णाताई वय ४५. शेणोलीकर मु॥ कोल्हापूर.

बी. जे. मेडिकल स्कूलमध्यें शिकत असतां बक्षिसें मिळालीं. एच्. ए. एस्. पास होते. होमिओपाथीचा अभ्यास केला होता. कोल्हापूरचे छत्रपतींचे पर्सनल डॉक्टर होते. " ऑनेस्ट ॲन्ड सिन्सिअर सर्व्हिसेस टु दी रॉयल फॅमिली " अशा अर्थाचें एक पदक त्यांना कै. शाहू छत्रपति यांनीं सादर केलें होतें. ते भक्तिमार्गाचे अनुयायी असून भक्तिमार्गांतील ह. भ. प. भागवत-बुवा बेलापुरकर हे त्यांचे गुरु. पंढरपूरची यात्रा नेमानें करीत. भजनाची आवड. आध्यात्मिक विषयांकडे विशेष लक्ष. कमालीची सहनशीलता अंगांत होती. एक प्रकारच्या उच्च कोटींतील साधुपुरुष होते.

जनार्दन रघुनाथ (८–२) १८–१९ वर्षे वयाचे सुमारास निवर्तले.

*डॉ. त्र्यंबकराव रघुनाथ (८-३) ज. २०।३।१८७७ इ. स. चैत्र शु॥ ५ मंगळवार श. १७९९. **भार्याः-सावित्री**-काशी. माहेर-कै. ती. पांडुरंग दीक्षित (महागांव, जि. सातारा). ती. सौ. आईचा स्वभाव अत्यंत प्रेमळ व सरळमार्गी आहे. कन्या-(१) **माई**-कमळाबाई भ्र॥ बार्शीचे प्रसिद्ध वकील ती. वासुदेवराव परशुराम आठल्ये, बी.ए., एल्एल्.बी., (२) **गोदुताई**-सीताबाई भ्र॥ पंढरपूरचे प्रसिद्ध डॉ. ती. रामचंद्र वळवंत श्रीखंडे, बी.ए., एम्.बी.बी.एस्., (यांचे वडीलबंधु रा. वासुदेवराव श्रीखंडे हे डॉक्टर असून कोल्हापुरास असतात. दुसरे वडील बंधु ती. प्रा. वामनराव बळवंत श्रीखंडे हे इंदुरास होळकर कॉलेजांत तत्त्वज्ञानाचे प्रसिद्ध प्राध्यापक होते. सध्यां सेवानिवृत्त झाले असून पुण्यास असतात. तिसरे वडील बंधु ती. अण्णासाहेब ऊर्फ शंकरराव श्रीखंडे, बी. ई. असून सध्यां एक्झिक्युटिव्ह एंजीनिअर झाले आहेत. हे ती. अण्णांच्या चुलत बंधूंचे जावई. ती. रामभाऊंचे धाकटे बंधु रा. लक्ष्मणराव श्रीखंडे, एम्. बी. बी. एस्. असून सोलापुरास प्रसिद्ध डॉक्टर आहेत. कऱ्हाडे ब्राह्मण जातींतील हें एक प्रसिद्ध घराणें आहे). (३) **त्रिवेणी**-२१ वर्षे वयाचे सुमारास मृत. भ्र॥ बाबूराव शहाणे (भाळवणी, ता. पंढरपूर).

ती. अण्णा इ. स. १८९३ मध्यें कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमधून मॅट्रिक झाले. १८९८ मध्यें मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमधून (L.M. & S.) डॉ. झाले. हायस्कूलमध्यें असतांना अनेक बक्षिसें मिळविलीं. शेवटपर्यंत पहिल्या प्रतीचा अभ्यास होता. (First class career). सर्व शिक्षण स्कॉलरशिपवर झालें.

डॉक्टर झाल्यावर गुजराथेंत असिस्टंट सर्जन म्हणून दुष्काळी कामावर टेंपररी सर्व्हिसवर कांहीं वर्षे होते. त्यानंतर जसदन संस्थानांत मेडिकल ऑफिसर म्हणून काम केलें. १९०१ मध्यें जुलै महिन्यांत ती. कै. दादांच्या क्षेत्रावासार्थ म्हणून पंढरपुरास मेडिकल ऑफिसरची नौकरी स्वीकारली, ते १९२२ पर्यंत या जागेवर होते. त्यानंतर मुंबई सरकारनें आजपर्यंतची त्यांची नौकरी पाहून स्वतंत्र ठराव करून त्यांची पंढरपूरचे फर्स्टक्लास हेल्थ ऑफिसर म्हणून योजना केली. १९३३ मध्यें ह्या कामावरून ते सेवानिवृत्त झाले.



उभे—[illegible]—(१) [illegible]वंत (२) पांडुरंग. **खुर्चीवर**—(१) सौ. गोदूताई थोरखंडे. (२) ती. डॉ. त्र्यंबक रघुनाथ. [illegible]

१९११ मध्यें ती. आण्णांना पंढरपूरच्या आरोग्यव्यवस्थेसाठीं म्हणून "कैसर-इ-हिंद' पदक मिळालें. १९२७ मध्यें पंढरपुरास भयंकर कॉलरा झाला असतां त्यांनीं शहरचें आरोग्य फारच उत्तम ठेवलें म्हणून सरकारनें १९२८ त 'रावसाहेब' पदवी बहाल केली. १९३४ त हेल्थ ऑफिसरच्या जागेवरून सेवानिवृत्त झाले तरी यात्रा-कमिटीचें काम त्यांच्याकडे होतेंच. जून १९३९ ते जून १९४० पर्यंत. 'पंढरपूर म्युनिसिपल कमिटी ऑफ मॅनेजमेंट'चे (Ex-chairman) अध्यक्ष म्हणून त्यांची योजना मुंबई सरकारनें केली. ही नेमणूक त्यांच्या आजपर्यंतच्या उत्तम कामगिरीमुळें व विशेषतः त्यांच्या निःस्पृह वागणुकीमुळें झाली होती.

ती. अण्णा सोलापूर जिल्ह्यांतील ख्यातनाम डॉक्टर म्हणून प्रसिद्ध आहेत. ते पंढरपूरचे मेडिकल ऑफिसर असतांना दवाखान्यांत रोग्यांची रीघ लागलेली असे. अनेक छोटेमोठे रोगी येत. रोग्यांची पुत्रवत् काळजी घेऊन ते त्यांची चिकित्सा हळुवारपणानें करीत. वैद्यकव्यवसायला यांनीं उच्चकोटीला नेलें आहे. वाटेल त्या वेळीं रोग्यानें यावें ती. अण्णा त्याची सेवा करावयास नित्य सज्ज. त्यांतच त्यांना आनंद वाटे. रोगचिकित्सा करणें हेंच कर्तव्य, रुग्ण हा देव व रुग्णसेवा म्हणजे जणूं भक्तानें केलेली देवपूजा अशा वृत्तीनेंच ते आपला व्यवसाय करीत. 'शुनि चैव श्वपाके च पंडिताःसमदर्शिनः' ही उक्ति त्यांच्या बाबतींत अगदीं तंतोतंत लागू पडते. ती. अण्णांचा आयुर्वेदाचा अभ्यासहि फार मोठा आहे.

पंढरपूरचें आरोग्य सुधारण्यांत ती. अण्णांनीं आपलें सर्व आयुष्य वेंचलें आहे. पंढरपूरच्या आरोग्यखात्याचे मुख्य अधिकारी (Health officer) असतांना त्यांनीं एक तपपर्यंत फारच मोठी तपश्चर्या तेवढ्याकरितां केली आहे. आळंदीहून येणाऱ्या श्रीज्ञानेश्वराच्या पालखीस पाण्याची उत्तम व्यवस्था करून यात्रेकरूंना हटकून होणारा कॉलरा त्यांनीं पार नाहींसा केला. शहराचें आरोग्य सुधारण्याबाबत जिवापाड मेहनत घेतली. पंढरीच्या यात्रेच्या दिवसांत त्यांना रात्रंदिवस अविश्रांत काम पडे. तरीहि न त्रासतां, न रागावतां प्रत्येकाशीं प्रेमानें वागून ते आपलें कर्तव्य व्यवस्थित पार पाडत. ते पंढरपुरास १९०१ सालीं आले तेव्हां यात्रेंत कॉलऱ्याच्या २०० केसेस सरसहा होत;

तेथें हल्लीं क्वचित्‌च एकादी केस झाल्याचें ऐकूं येतें. अनेक यात्रेकरूंचे दुवे या साधुकोटींतील पुरुषाला नित्यशः मिळत असतील. या बाबतींतील त्यांची कर्तबगारी अवर्णनीय आहे.

एवढे मोठे कर्तबगार, मिळवते, थोर अधिकारी असतांनाहि यांच्या अंगीं तिळमात्र गर्व नाहीं, किंवा यत्किंचित् देखाव्याचीहि पण आवड नाहीं. स्वभाव अत्यंत निःस्पृह व सरळमार्गी! जनसेवेकरितां वाटेल तो स्वार्थत्याग करावयास तयार! आपल्या वडिलांच्या अनुज्ञेबाहेर ते केव्हांहि जात नसत. केवळ त्यांच्या आज्ञेप्रीत्यर्थ त्यांनीं पंढरपूरचा वास पत्करला. मातृपितृभक्ति अपूर्व होती. सतत काम करूनहि ते न कंटाळतां शरपंजरीं पडलेल्या आपल्या मातेची सेवा एकनिष्ठपणानें करीत असत. त्यांचें जेवण झाल्याशिवाय स्वतः अन्न घेत नसत. वृत्ति धार्मिक व दयाशील, स्वभाव प्रेमळ व परोपकारी, आचरण शुद्ध व पवित्र, भजनपूजनाची अत्यंत आवड. शिस्तीचे कडक आहेत. सर्वच चरित्र अति अनुकरणीय, बोधप्रद, नेक्रीचें व पवित्र असें आहे. अशा थोर पुरुषांनींच या घराण्याची कीर्ति अजरामर केली आहे. शेतीच्या व्यवसायाची अत्यंत आवड. ती. वै. पं. गंगाधरशास्त्री गुणे कै. ती. दादांच्या जवळील व ती. अण्णांच्या जवळील आपलें शिक्षण पूर्ण करून जात असतांना ती. अण्णांनीं त्यांना केलेल्या उपदेशांत त्यांच्शा जीवनाचें सार आढळून येतें. " उपकार करीत रहा म्हणजे त्यांत सर्व कांहीं आलें. " (माझ्या आठवणी), स्वतःच्या ज्ञानाचा फायदा इतरांना देत देत सर्व आयुष्य परोपकारांत घालविणारे साधुपुरुष असाच यांचा उल्लेख केला पाहिजे.

हिंदुस्थान सरकारच्या ' टाइम्स ऑफ इंडिया ' या इंग्रजी वर्तमानपत्रांतील, ता. १४ जुलै १९२७ व ता. १४ सप्टेंबर १९२७ च्या अंकांत पंढरपूरच्या यात्रेसंबंधीं आलेले उतारे व २६ मे १९३० चा मुंबई सरकारचा ठराव हीं पुढें देत आहें, त्यावरून ती. अण्णांच्या कार्याचें योग्य तें स्वरूप कळून येईल.

"TIMES OF INDIA" DATED 14 JULY 1927
FIGHTING CHOLERA AT PANDHARPUR
"EXCELLENT ARRANGEMENT"

One of the most interesting and remarkable fights against Cholera, is that which has apparently been so suc-

cessfully waged, during the past few days at Pandharpur, where the Health authorities have pitted their limited strength against well over a Lakh and a half of pilgrims, coming from all parts of the Presidency, often through districts where cholera was raging, carrying off its dozens daily, against all inconveniences and worries which naturally accompany the crowding of such a huge crowd, in a Town which normally houses about 25,000 people only. But the result has been a Triumph of organisation and preventive measures, against that "Trinity" of evils, Dirt, ignorance and indifference. In order to see exactly how the whole health of the Presidency for the next few weeks was to be guarded and a serious epidemic to be prevented from spreading through the agency of 1,50.000, potential carriers, to villages, stretching from Amraoti Dist. to southernmost Taluka of Dharwar District, I, paid a Special visit to Pandharpur during the week end, and studied the arrangements for two days, and when I came away on Sunday evening I left behind me in the Cholera Hospital, a minimum of cases and the situation well in hand to prevent returning pilgrims from infecting other places on the homeward track. As every pilgrim enters the Station at Kurduwadi, he or, she, has to pass through a narrow aisle during which he runs the gauntlet of the eagle eyes of the Medical Inspectors, whose symptoms make it so readily recognisable. Then when the train is crammed full, each carriage of truck, is once again inspected, so that it is practically ensured that every one of the dozens of Specials, which convey nearly half and a Lakh of pilgrims to the Ashadhi Fair, starts off clean.

AMAZING CLEANLINESS

On arrival at Pandharpur, the first thing which draws attention to itself, is the amazing cleanliness of everything,

in spite of the sudden influx of one lakh, fifty thousand visitors, and this impression is intensified, as one drives through the Town itself. Though the streets and by-lanes are so packed, as to make passage merely a Crawl, not a single evil, smell, or, dirty sight meets one. Whilst the amazing absence of flies causes the feeling, one must be anywhere, but, at a pilgrim centre in India. Similarly, one distinguished visitor, actually mistook, a night-soil cart, for a Water cart ; so free was it of smells and flies. "And here might it be said that both Poona Cantonment and Suburban Municipalities, could learn a lesson and order immediately a few barrels of Crude Oil." It must be remembered that, practically every person travelling with the Palkhis, had been watched for miles, with advance guards, to permanganate their water, rear guards to clean up after them and Inspectors to look after their health. And the same attention will be theirs on the return trip. Twelve years ago, pilgrims to Pandharpur faced the same danger and suffered the same troubles, as they did Three-hundred years ago, and seven years ago conditions were not very much better.

"THE ONE BRIGHT SPOT IN PANDHARPUR", as— Dr. T. R. Gune, the Health Officer is called, tell stories of only a few days ago, when six-hundred cases a Day, was a usual tale of woe, and when three-hundred cases were nightly taken to the Burning-ghats. But "Now"—"Thanks" to the unceasing efforts of Dr. T. R. Gune, and the patient persistence of Dr. Da Gama, A. D. P. H. C. R. D., Poona : there can be no such dismal record for even this year, when the very districts from which the majority of the pilgrims have come, have been attacked by 15,000 cases of Cholera, the toll at Pandharpur, is even now at the near end of the fair, under-200. Their success is evident.

COMPLETE CONTROL

No better illustration of the value of adequate preventive measures and careful control, could be produced, than the Ashadhi-Fair at Pandharpur, this year.

For twenty.five years Dr. Gune, has seen the Ashadhi Fair, at Pandharpur, but doubtless, never has he seen it pass off with such thankfulness as this year, when he—Dr. T. R. Gune, and Dr. Da Gama have produced such excellent results under such foreboding circumstances. Both the Hon. Sir, Chunilal Metha and Dr. Jamshyd Munsiff, after inspecting all the arrangements, expressed themselves, in ....unmeasured terms, of the excellence of the organisation and the completeness of the control, which not only demonstrated the worth of the Public Health Department when it is enabled to work, with Local Authorities but also ensured practically the safety of the Presidency from a terrible epidemic.

"TIMES OF INDIA" DATED 14TH SEPTEMBER 1927

THE PANDHARPUR FAIR

"A SANITARY TRIUMPH"

A most illuminating and interesting survey of the remarkable results attending the precautionary work of the Public Health Department this year, in carrying through the famous Ashadhi Fair, at Pandharpur, against tremendous odds, is now available, and the survey shows what can be done in the way of preventing serious Cholera Epidemics, even whilst permitting the pilgrims to carry out his great religious aim, with as little interference as possible.

In summarising the difficulties attending their work the Director of Public Health says ;—"It would have been

too much to expect that there would be no case of Cholera among the vast crowd of pilgrims who came from infected parts and who would have developed the disease, even if they had stayed in their own villages, or, that Pandharpur town would escape infection, or. even that Cholera would not spread to any place through the returning pilgrims. All that we could hope to do was, to limit these calamities to a minimum."

PERFECT CO-ORDINATION

In concluding the report of the Fair, the Director of Public Health adds : "The successful management of this Ashadhi Festival is largely due to the organising capacity of the Assistant Director, Dr. Accacio Da Gama, and to the indefatigable industry of the Pandharpur Medical Officer of Health, Dr. T. R. Gune ; whilst the perfect co-ordination, between the Government and the Municipal Health authorities also had a good deal to do, with the highly successful carrying out of the Fair."

Probably no more elaborate piece or, organisation for public health, is in existence, in this Presidency and the results this year, when every thing seemed against a Pilgrimage free from disease or, epidemic on a large scale are certainly deserving those responsible for the arrangements.

"THE PANDHARPUR FAIR"

ASHADHI FAIR IN THE YEAR 1929

Government Resolution No. "R" 58, Dated 26th May 1930. "Rao Sahib Dr. Gune, was as usual indefatigable throughout, and it is mainly due to his personal efforts that the Town of Pandharpur, is kept so remarkably clean in spite of the unprecedented influx."

* **वासुदेव ऊर्फ नाना हरि** (८–४) जन्म १२–४–१८८७ भार्या–(१) इंदिरा, २५ वर्षे वयाचे सुमारास मृत. माहेर–काशीनाथपंत खांडेकर मुा निपाणी. भार्या–(२) इंदिरा–वय ४०. माहेर–नारायण वामन भाटे (कोल्हापूर). कन्या–सुलोचना वय ११. इंग्रजी शिकत आहे.

यांनीं बी. जे. मेडिकल स्कूलचा कोर्स पुरा करून नंतर कलकत्त्याची एच्. एम्. बी. पदवी मिळविली. त्या वेळीं परीक्षेंत पहिले आले. वडिलांचेप्रमाणेंच भक्तिमार्गाचे अनुयायी आहेत. भजनाचा नाद आहे. सांपत्तिक स्थिति मध्यम.

* **रंगनाथ ऊर्फ बाबुराव त्र्यंबक** (८–५) ज. २२–५–१९०५. भार्या—जानकीबाई –अम्बूताई, माहेर—गोविंदराव ऊर्फ अण्णासाहेब महादेव दिक्षीत (सातारा). कन्या–सुनंदा ऊर्फ मंदाकिनी. वय १॥ वर्ष.




चि. नंदा

बाबुराव इ. स. १९२४ मध्यें पंढरपूरचे व्ही. जे. हायस्कूलमधून मॅट्रिक झाले. इ. स. १९२७ मध्यें फर्ग्युसन कॉलेजांतून इंटर सायन्स झाले. ग्रँट मेडिकल कॉलेज (मुंबई)मधून फायनल एम्. बी. बी. एस्.ला १९३३ एप्रिल व डिसेंबरमध्यें बसले. पुढें १९३४ डिसेंबरमध्यें एल्. सी. पी. एस्.ला बसले व त्या वेळीं एल्. सी. पी. एस्. झाल्यामुळें फायनल एम्. बी. बी. एस्.चा जो ग्रुप राहिला होता त्यास पुन्हां बसले नाहींत.

पंढरपूर येथें प्रॅक्टीस करतात. सांपत्तिक स्थिति मध्यम, स्वभाव शान्त, सरळ व एकमार्गी आहे. (छा. चि. पृ. २९८ पहा.)

* **श्रीकृष्ण ऊर्फ बाळ त्र्यंबक** (८–६) ज. श. १८३५. भाद्रपद शुा १० बुधवार रात्रीं १०॥ चे सुमारास. भार्या—रुक्मिणी ऊर्फ वत्सलाबाई. माहेर–अनंत सखाराम चुनेकर (सातारा). इंजिनिअर. हल्लीं मुंबई. कन्या–सुशीला ऊर्फ बेबी. जन्म १९३४ ऑगस्ट ४. मराठी चौथी शिकत आहे.





चि. विजय

चि. विजय ऊर्फ प्रकाशचा जन्म ता.१४-२-१९४३ रोजीं झाला. तो सदैव हंसतमुख असतो.

बाळासाहेब इ. स. १९३१ सालीं पंढरपूरच्या व्हीं. जे. हायस्कुलमधून मॅट्रिक झाले. पुढें ॲडव्होकेट परीक्षेस बसण्याचें ठरवून पुण्याचे भालाकार भोपटकरांच्या क्लासांत तें शिक्षण घेतलें व १९३३ एप्रिलमध्यें ॲडव्होकेटची पहिली परीक्षा पास झाले. १९३४ पासून १९४० पर्यंत व्ही. जे. हायस्कूलमध्यें पंढरपुरास शिक्षकाची नोकरी केली. १९३९ ऑक्टोबरमध्यें ॲडव्होकेटच्या दुसऱ्या परीक्षेंत पास झालें. १९४० मध्यें शिक्षकाचा व्यवसाय सोडला व पंढरपुरास वकिली सुरू केली. १९४१ पासून नगर जिल्ह्यांत बेलापूररोड येथें निवासस्थान केलें व तेव्हांपासून तेथें वकिली करि-

(३) सौ. रुक्मिणाबाई. तात. प्रयत्नवादी, उद्योगी व

* विठ्ठल त्र्यंबकः—(८-७) जन्म ता. ५।१२।१९२१ मार्गशीर्ष शु॥ ६ सोमवार रात्रौ १० वा. ३२ मि. स्टॅ. टा. प्रमाणें श. १८४३. भार्या—वैजयन्ती-



विठ्ठल त्र्यंबक व सौ. वैजयन्ती

वेणु (माहेर—तीं. रा. बाळकृष्ण रामचंद्र सरदेसाई, रिटायर्ड एक्झिक्युटिव्ह एंजिनीअर, डेक्कन जिमखाना, पुणें.) ती. बाळासाहेबांचे वडील बंधु ती. गणपतराव

उर्फ अप्पासाहेब बी. ई. असून अहमदाबादेस कार्पोरेशनमध्यें एंजिनीअर आहेत. त्यांचे धाकटे बंधु तीं. सदाशिवराव ऊर्फ दत्तोपंत, बी. ए., एल्‌एल्. बी. असून तळेगांवच्या ' नवीन समर्थ विद्यालय ' संस्थेचे आजीव सेवक व त्याच संस्थेच्या पुणें येथील ' समर्थ भारत ' छापखान्याचे चालक आहेत. सदरील छापखान्यांत या इतिहासाचें मुद्रण झालें. मावळंकर–सरदेसाई घराणें हें कऱ्हाडे ब्राह्मणज्ञातींतील एक सुप्रसिद्ध घराणें असून गोविंद सखाराम सरदेसाई नामक विद्वद्वर्यांनीं याचा गेल्या ४० पिढ्यांचा सविस्तर इतिहास लिहिला आहे.

सौ. वैजयन्तीचा जन्म १०।११–२–२४ रात्रौ २ वा. १० मि. स्टँ. टा. माघ शु।। ५ रविवार (उजाडतां सोमवार). विवाह–ता. ६ जुलै, १९४३ आषाढ शु।। ४ मंगळवार. शिक्षण–१९४१ त मुंबई विश्वविद्यालयाच्या मॅट्रिक पास. मॅट्रिकमध्यें गणित व सायन्समध्यें डिस्टिंक्शन. हल्लीं कर्वे युनिव्हर्सिटीच्या पुणें येथील कॉलेजांत जी. ए. च्या वर्गांत आहेत. नेहमीं कॉलेजांत पहिल्या असतात. जी.ए.ला ऐच्छिक विषय संस्कृत आहे. गुण्यांच्या सासुरवासिणींमध्यें एवढें शिक्षण घेतलेल्या त्याच पहिल्या आहेत.

विठ्ठलराव १९३९ त पंढरपूरच्या व्ही. जे. हायस्कूलमधून मुंबई विश्वविद्यालयाची मॅट्रिक परीक्षा यशस्वी रीतीनें उत्तीर्ण झाले. १९४१ त सर परशुरामभाऊ कॉलेजच्या इन्टर आर्टस्‌चे वर्गांत असतांना या इतिहासलेखनास आरंभ केला आहे. १९४३ त ऐच्छिक विषय संस्कृत घेऊन त्याच कॉलेजांतून दुसऱ्या वर्गांत B. A. (ऑनर्स) पास. सांप्रत संस्कृत व पाली हे दोन विषय घेऊन ज्यू. एम्. ए. चा अभ्यास चालू.

शेतीकामाबद्दल अतिशय आवड. स्वधर्माबद्दल अत्यंत अभिमान असून तत्त्वज्ञानाची विशेष आवड आहे. या इतिहासाचे लेखक.

***रामकृष्ण ऊर्फ मधुकर** (८–८) ज. ७ जुलै १९२०. इन्टर आर्टस्‌मध्यें राजाराम कॉलेजांत शिकत आहेत.

***रघुनाथ वासुदेव** (८–९) ज. १९२५; १९४२ त मॅट्रिक. हल्लीं पुण्यास आयुर्वेद रसशाळेच्या विद्यालयांत वैद्यकीचें शिक्षण घेत आहेत.

***रघुनाथ ऊर्फ वसंत रंगनाथ** (८–१०) वय १५, पंढरपूरच्या व्ही. जे. हायस्कूलमध्यें इंग्लिश सहावी इयत्ता शिकत आहेत. अभ्यास उत्तम.

*पांडुरंग, गोविंद, जनार्दन व गोपाळ सर्वजण लहान असून शिकत आहेत.

वंशावळ नं. ९ पृ. २७३ आश्वीशाखा चालू

*केशवराव दामोदर (९-१) ज. शक १७९१ चैत्र. भार्या (१) सीताबाई इ. स. १९१० च्या सुमारास मृत. माहेर पंडितांकडे. पुत्र (१)– बाळकृष्ण ऊर्फ बापू, १४ वे वर्षी मृत. (२) विठ्ठल लहानपणीं मृत. कन्या (१) काशीताई चौकरांकडे (२) बकुळाताई ऊर्फ द्वारका वय सुमारें ३८, भ्र॥ शंकरराव ऊर्फ अण्णासाहेब बळवंत श्रीखंडे, एक्झिक्युटिव्ह एंजिनीअर, सोलापूर. (३) कमलाताई–भ्र॥ कै. डॉ. गणपतराव भास्कर गर्दे.

भार्या (२)–सीताबाई ऊर्फ माई. माहेर चांदोरकर (संगमनेर). पुत्र (१) अनंत, वयाचे सातवे वर्षी मृत. (२) नरहरि ऊर्फ बाळ ज. २१-१२-१९१६. (३) गणपति, ज. १८-८-१९२३. कन्या (१) जोत्स्ना.– खेर (नगर). (२) मालती–खेर (नगर).

केशवरावदादांच्या इंग्लिश पहिल्या तीन इयत्ता पुण्याच्या हायस्कूलमधून झाल्या. कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमधून मॅट्रिक. फर्स्ट बी.ए. राजाराम कॉलेजांतून, इ. स. १८९३ त मुंबईच्या विल्सन कॉलेजांतून बी.ए. झाले. या गुणे घराण्यांतील ते पहिले मॅट्रिक व पहिले बी.ए. होत. त्यामुळें त्या वेळीं त्यांचा वडील मंडळींनीं खूपच गौरव केला. इ. स. १८९४ ते १८९६ पर्यंत जुन्नर व पुणें येथें इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक. त्यांत पुण्यास नू. म. वि. मध्यें सहा महिने शिक्षक.

पुढें त्या वेळच्या कालानुरूप व घरांतील परिस्थितीमुळें सरकारी नोकरींत शिरले. इ. स. १८९६ त मुलकीखात्यांत सेकंडकारकून म्हणून कर्जत तालुक्या-वर प्रथम नेमणूक झाली. १८९७ ते १९०१ पर्यंत दुष्काळी कामावर हेडक्लार्क म्हणून काम केलें. १९०३ मध्यें ॲक्टिंग व पुढें थोड्याच दिवसांत पर्मनंट मामलेदार म्हणून नेमणूक झाली.

पुढें सरकारनें त्यांची आतांपर्यंतची उत्तम नोकरी पाहून १९१७-२७ पर्यंत दहा वर्षे जव्हार संस्थानचे ' गव्हर्नमेन्टस् लेन्ट सर्व्हन्ट ' म्हणून नेमणूक केली. दादासाहेब जव्हार संस्थानांत नेमले गेले तेव्हां संस्थानच्या तिजोरीचें बहुतेक



दिवाळेंच वाजलें होतें. अशा बिकट परिस्थितींत संस्थानाची त्यांनीं खूपच सुधारणा केली. त्याचा आर्थिक दर्जा वाढविला व ते सेवानिवृत्त झाले तेव्हां संस्थानच्या तिजोरींत लाखों रुपये शिल्लक पडले. याशिवाय त्यांनीं तेथें असतांना अन्य कितीतरी लोकोपयोगीं कामें अगदीं व्यवस्थित पार पाडलीं व संस्थानची सर्वांगीण सुधारणा केली. इ. स. १९२७ त ते आपल्या पहिल्या नौकरीवरून वयास ५५ वर्षें झाल्यामुळें सेवानिवृत्त झाले. पुढें १९२७ ते १९३० पर्यंत सरकारनें त्यांची जव्हारचे कारभारी म्हणून योजना केली. १९३० त त्या नौकरीवरून ते सेवानिवृत्त झाले. संस्थानांतील त्यांच्या उत्तम प्रकारच्या कामगिरीबद्दल सरकारनें त्यांना रावबहादुराचा मान दिला.

या घराण्यांतील गेल्या पिढींतील बरीच मंडळी सरकारी नौकरींत शिरलेली होती. परंतु तेथें सुद्धां प्रामाणिकपणानें व सत्यानें नौकरी करून उत्तम मार्ग संपादन करितां येतो हें गेल्या पिढींतील मंडळींनीं सिद्ध करून दाखविलें आहे. दादासाहेबांनीं उत्तम प्रकारें व सरळ मार्गानें सरकारची नौकरी करून व त्या बरोबरच संस्थानांत लोकोपयोगीं कार्य करून या घराण्याच्या लौकिकांत भर घातली आहे. गेल्या शतकांत धार संस्थानांत याच चांफेट शाखेपैकीं कै. राघो नारायण गुणे यांनीं उत्तम प्रकारें कामगिरी करून मान संपादन केला. तीच परंपरा या विसाव्या शतकांत दादासाहेबांनीं पुनः चालवून जव्हार संस्थानची पुनर्घटना केली आहे.

दादासाहेब हे दामोदरअण्णांचे वडील पुत्र असल्यानें व दामोदरपंतांची सांपत्तिक परिस्थिति मध्यम प्रकारची असल्यानें, आपल्या धाकट्या बंधूच्या उच्च शिक्षणाची जबाबदारी दादासाहेबांच्यावर होती, व ती त्यांनीं उत्तमप्रकारें पार पाडली. कोणत्याहि प्रकारची बिकट परिस्थिति आली तरी डगमगून न जातां ते अत्यंत शांतपणानें व धिमेपणानें तींतून पार पडले आहेत. या घराण्यांतील गेल्या पिढींपैकीं ज्या ज्या मंडळींनीं उत्तम कार्य करून घराण्याचा नांवलौकिक वाढविला त्यांपैकीं ते एक आहेत.

***माधव दामोदर** (९–२) वय सुमारें ६९. भार्या–गिरिजा इ. स. १९१५ त मृत. माहेर खानवेलकर. कन्या (१) बनु भ्र॥ कै. रामचंद्र अनंत


किबे (फलटण). (२) वेणु–मृत–भ्र॥ गणेश मोरेश्वर टोळे. (३) सुमति–लहानपणींच मृत.

हे मॅट्रिक असून पोस्टमास्तरच्या सरकारी नोकरीवर होते. हल्लीं सेवानिवृत्त. नाना तऱ्हेच्या उत्तमोत्तम गोष्टी त्यांना माहीत आहेत. सांपत्तिक स्थिति मध्यम. (छा. चि. पृ. ३१०)

भालचंद्र दामोदर (९–३) ज. श. १८०१ मृ. इ. स. १९२७. भार्या–सरस्वतिबाई जिवंत वय ५८. (माहेर कै. मोरो वामन कीर्तने, पुणें. सरस्वतीकाकींच्या भगिनी म्हणजे कै. लक्ष्मीबाई ऊर्फ माई, रावबहादूर गोविंदराव सखाराम सरदेसाई रियासतकार यांच्या भार्या होत. काकींचे मावसभाऊ म्हणजे पुणें येथील स. प. कॉलेजचे माजी सुप्रसिद्ध प्राध्यापक नानासाहेब हर्डीकर हात. कऱ्हाडे ब्राह्मणांतील सुविद्य घराण्यांपैकीं कीर्तने व हर्डीकर यांचीं घराणीं आहेत. कै. मोरो वामन ऊर्फ अण्णासाहेब कीर्तने हे शिक्षण खात्यांत उच्च अंमलदार होते. ते अत्यंत परोपकारी, दातृत्वसंपन्न व साधुकोटींताल गृहस्थ होते. प्रा. नानासाहेब हार्डिकरांनीं पुण्याच्या 'शिक्षण प्रसारक मंडळी ' या संस्थेंत केलेली कामगिरी प्रसिद्ध आहे). कन्या–(१) सुशिला–मृत–विष्णु नारायण पंडीत (गणेशखिंडी). (२) कुसुम भ्र॥ वामन पांडुरंग भागवत ओव्हरसीयर. (३) चमेली–पांडुरंग अनंत पाध्ये एजिनीयर (मुंबई). (४) शांताबाई भ्र॥ डॉ. येरवडेकर. शांताबाईचा शाळेंतील अभ्यास पहिल्या प्रतीचा होता. त्या १९४१ त इन्टर आर्टस् झाल्या. कॉलेजांतहि त्यांना बक्षिसें मिळालीं होतीं.

नगरच्या सोसायटी हायस्कूलमधून भाऊकाका १८९९ त मॅट्रिक पास झाले. युनिव्हर्सिटीमध्यें १३ वा नंबर. विल्सन कॉलेजांतून १९०३ मध्यें बी.ए. उत्तम स्कॉलर म्हणून प्रसिद्ध होते. बी.ए. झाल्यावर मुलकीकडे कारकून म्हणून लागले व पुढें लवकरच मामलतदार झाले. बुद्धिमत्ता तीव्र, संस्कृत भाषेवर प्रभुत्व, भजनाचा नाद, आवाज पहाडी, म्हणणें प्रासादिक, ज्ञानेश्वरीचा अभ्यास चांगला, धाडसी, लोकसंग्राहक, लोकनायकत्व व परोपकारित्व उत्तम प्रकारचें. परंतु सरकारी नोकरीमुळें त्या गुणांचा प्रकाश सार्वजनिकरीत्या पडूं शकला नाहीं. सरकारी नोकरींत न शिरते

ता. रत्नागिरी–दक्षिणविभाग



गुण्ये मंडळींची कोंकणांतील ता. रत्नागिरीमधील पुरातन वतनीं गांवें.
खंड २ रा, प्रकरण ३ पहा.



डॉ. पांडुरंग दामोदर गुणे

तर हातून मोठालीं कार्यें होतीं. शेतीची आवड. गुरुजनांविषयीं कमालीचा आदर. सकृद्दर्शनीं अति तापट परंतु स्थायीभाव प्रेमळ. वडिलांच्या उपदेशा-प्रमाणें ब्राह्मण-भोजनें घालण्याचा अत्यंत नाद. जवळ थोडीफार शिल्लक राहिली कीं अन्नदानांत खर्च त्यामुळें त्यांच्याजवळ पैसा कधींच शिल्लक राहत नसे. अलोट पितृभक्ति. वयाच्या ३२ वे वर्षी मधुमेहाचा तीव्र विकार. मूळव्याधा तीव्र, मूळव्याधीचें वयाच्या ३२ वे वर्षी पंढरपुरास डॉ. त्र्यंबकराव गुण्यांच्या-कडे ऑपरेशन. पुढें दुर्धर रोगामुळें पंढरपुरास मृत्यु. कर्तव्य करीत परंतु परिणामाविषयीं विचार करीत नसत. कधींहि व्यर्थ प्रापंचिक चिंता लावून घेतली नाहीं. आनंदी, थट्टेखोर व परोपकारी असल्यानें भोंवतीं पांचपंचवीस माणसें नित्य असावयाचींच व त्यामुळें लोकप्रिय होते. (छा. चि. पृ. ३१०).

डॉ. पांडुरंग दामोदर गुणे (९-४) जन्म मे १८८४ इ. स. राहुरीस, जि. नगर. भार्या–इंदिरा–मृत. माहेरचें नांव चंपा कीर्तने. सुप्रसिद्ध मोरो वामन ऊर्फ अण्णासाहेब कीर्तने यांचे बंधु सबरजिस्ट्रार श्रीधर वामन कीर्तने यांची ही कन्या होय. कन्या (१) डॉ. मधुमालती गुणे (२) कुसुदिनी-वयाचे १६ वे वर्षाचे सुमारास मृत.

तीं. पांडुरंगपंतांना तात्यासाहेब गुणे म्हणत. कै. तीं. दामुकाकांचे ते शेव-टचे पुत्र असल्यानें त्यांचे फारच लाडके होते. प्राथमिक शिक्षण संपल्यावर तीं. तात्यांनीं नगर एज्युकेशन सोसायटी हायस्कूलमध्यें प्रवेश केला व तेथून ते इ. स. १९०० मध्यें मुंबई विश्वविद्यालयाचे मॅट्रिक झाले. त्याना प्रथमपासून संस्कृत विषयाची आवड होती. व अखेरीस मॅट्रिकमध्यें दुसरी 'जगन्नाथ शंकर-शेट शिष्यवृत्ति ' मिळविली. हायस्कूलमध्यें ते हुषार, नियमित व पद्धतशीर म्हणून प्रसिद्ध होते. सर्व शिक्षकांची त्यांच्यावर हुषार म्हणून मर्जी असे. पुढें त्यांनीं मुंबईच्या विल्सन महाविद्यालयांत प्रवेश केला व तेथून ते इ. स. १९०४ मध्यें पहिल्या वर्गांत बी. ए.ची परीक्षा पास झाले. कॉलेजांतील चारी वर्षांत मुंबई विश्वविद्यालयाच्या ज्या ज्या परीक्षा त्यांनीं दिल्या त्या सर्वांमध्यें बहुतेक सर्व विश्वविद्यालयाच्या संस्कृतच्या शिष्यवृत्त्या व बक्षिसें त्यांनीं मिळविली. बी. ए. झाल्यावर दोन वर्षे एम. ए. चा अभ्यास करीत असतांना ते कॉलेजांत ' दक्षिणा फेलो ' म्हणून होते. इ. स. १९०६ मध्यें दुसऱ्या वर्गांत एम्. ए.ची

परीक्षा पास झाले. त्या वेळचे त्यांचे परीक्षक डॉ. सर रामकृष्ण भांडारकर यांनीं त्यांच्या पेपर्सची खूपच स्तुति केली.

पौर्वात्य ज्ञानाच्या संशोधनाचा जगभर प्रसार व्हावा ही त्यांची प्रथमपासूनची इच्छा. सर्व आयुष्य ज्ञानसंपादनांत घालवावें असें त्यांना वाटे व त्यामुळें सरकारी नौकरी न स्वीकारतां स्वार्थत्याग करून त्यांनीं पुण्याचे डी. इ. सोसायटींमध्यें प्रवेश केला व फर्ग्युसन कॉलेजांत व न्यू स्कूलमध्यें शिकविण्याचें काम सुरू केलें. १९०८ पासून ते फक्त कॉलेजचेंच काम पाहूं लागले. याच सालीं ते त्या सोसायटीचे तहाहयात सभासद (Life Member) झाले. विनोदी स्वभावानें व शिकविण्याच्या आकर्षक पद्धतीनें ते फर्ग्युसन कॉलेजांतील विद्यार्थ्यांचे आवडते प्राध्यापक म्हणून प्रसिद्धीस आले.

पुढें त्यांना हिंदुस्थान सरकारची संस्कृतची शिष्यवृत्ति मिळून ते १९१० सप्टेंबरमध्यें संस्कृतचें उच्च ज्ञान संपादण्याकरितां म्हणून जर्मनीस गेले. जर्मनीस जाण्यापूर्वी त्यांनीं जर्मन भाषेचें ज्ञान संपादन केलें होतें. जर्मनींत लिपझिग युनिव्हर्सिटीमध्यें डॉ. बुगमान यांच्या देखरेखेखालीं त्यांनीं तीन वर्षें काढलीं. तेथें त्यांनीं भाषाशास्त्राचा अभ्यास केला व तेवढ्याकरितां लॅटीन व ग्रीक भाषेचें ज्ञान त्यांनीं करून घेतलें. दुसऱ्या वर्षाच्या अखेरीस जर्मनींत त्यांची प्रकृति बिघडली व तेथेंच क्षयाचा उद्‌भव झाला. त्यांतून त्यांची प्रकृति पुढें तीन महिन्यांनीं सुधारली. तिसऱ्या वर्षाच्या अखेरीस त्यांनीं आपला भाषाशास्त्रावरचा निबंध पूर्ण करून युनिव्हर्सिटीस सादर केला. नंतर त्यांना डॉक्टरेटची पदवी सादर करण्यांत आली. ते दुसऱ्या वर्गांत पास झाले. [Second Class with distinction] पुढें १९१३ सप्टेंबरांत ते हिंदुस्थानांत परत आले. जर्मनीस जाण्यापूर्वी ते कांहीं दिवस लंडनला गेले होते. जर्मनींत असतांना तिकडील अनेक विद्वान् लोकांचा त्यांना सहवास घडला. त्यांच्या स्वभावांत दुसऱ्याचें मन आकर्षून घेण्याची एक विलक्षण शक्ति होती. त्यामुळें तेथें त्यांनीं अनेक मित्र जमा केले व नंतर ते मायभूस परत आले.

१९१३ ते १९२० पर्यंतचीं सात वर्षें म्हणजे त्यांच्या आयुष्यांतील मुख्य कर्तबगारीचा काळ होय. ते इतके उद्योगांत असत कीं त्यांना विश्रांतीसाठीं

फारच थोडा वेळ मिळे व यामुळेंच पुढें त्यांची प्रकृति बिघडली. १९१६ त पुण्यास भांडारकर प्राच्य विद्यासंशोधन मंदिराची स्थापना यांचेच पुरस्कारामुळें व प्रयत्नामुळें झाली. ती. तात्यासाहेबांना पौर्वात्य ज्ञानाच्या संशोधनाचा प्रसार करून पाश्चिमात्यांप्रमाणेंच आमच्याकडेहि पण संशोधन होऊं शकतें हें दाखवावयाचें होतें. १९१७ ते १९२० पर्यंत तीन वर्षें ते या संस्थेचे सेक्रेटरी होते. १९१६ मध्यें पहिली 'पौर्वात्य सभा' (First Oriental Conference) झाली त्या सभेस अनेक पौर्वात्य पंडित जमले होते. त्या सभेच्या सेक्रेटरीचें काम ती. तात्यांच्याकडे होतें. सेक्रेटरी असतांना तीन वर्षांत 'भांडारकर ओरिएन्टल इन्स्टिटयूटचे' कार्याचा जितका म्हणून त्यांना प्रसार करितां आला तितका त्यांनीं केला. अनेक ग्रंथांचें प्रकाशन त्यांनीं केलें. हें काम करीत असतांनाच कॉलेजचें कामहि पण पहावे लागे. विद्यार्थ्यांना शिकवितांना ते चालू विषयाशीं अगदीं एकतान होऊन जात. मधूनच कोट्या व विनोद करीत. ऋग्वेद ते फारच उत्तम प्रकारें शिकवीत. विद्यार्थ्यांच्या हरएक प्रकारच्या शंका तें दूर करीत. गरीब विद्यार्थ्यास नेहमीं मदत करीत. केव्हांहि विद्यार्थ्यांना शिकविण्यास ते तयार असत.

इ. स. १९२० पासून त्यांना क्षयाची बाधा झाली त्यामुळें कांहीं दिवस ते अगदीं अंथरुणावर पडून होते. १९२० मध्यें त्यांचें पहिलें ऑपरेशन झालें. नंतर कोरड्या हवेकरितां म्हणून ते पंढरपुरास त्यांचे चुलत-बंधु ती डॉ. त्र्यंबकराव अण्णांच्याकडे आले. तेथें त्यांची प्रकृति ती. अण्णांच्या देखरेखेखालीं खूपच सुधारली व नंतर पुनः ते १९२१ मार्चमध्यें हिंडूं फिरूं लागून पुण्यास गेले. तेथून पुढें त्यांची बदली सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजवर झाली व तेथें पुनः सांगलीच्या हवेनें त्यांची प्रकृति बिघडून पुनः क्षयाचें ऑपरेशन झालें. परंतु प्रकृति बिघडतच गेली व ते इ. स. १९२२, २५ नोव्हेंबरला निवर्तले. अगदीं मृत्यूच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनीं आपला उद्योग सोडला नाहीं. ते निवर्तले तेव्हां त्यांचें प्राकृतांतील एक पुस्तक छापण्याचें काम चालू होतें.

रोगानें त्रस्त झाले होते तरी स्वभाव विनोदी व चेहऱ्यावर नेहमीं हास्य विलसत असे. यामुळें ते सर्वांनाच अतिशय प्रिय झाले होते. त्यांचे मृत्युसमयीं

अवघें ३८ वर्षांचें वय होतें; त्यांच्या अकालीं मृत्यूनें प्राच्य संस्कृतीच्या संशोधनाची अवर्णनीय हानि झाली. त्याचीं कित्येक कार्यें अपूर्ण राहिलीं. या घराण्यांतील फार मोठा विद्वान् मनुष्य नाहींसा झाला. संस्कृतचा एक फार मोठा जगन्मान्य पंडित गेला. फर्ग्युसन कॉलेज मासिकाच्या डिसेंबर १९२२ च्या अंकांतील कै. ती. तात्यांच्यासंबंधींचा संपादकीय समालोचनांतील इंग्लिश उतारा देत आहें त्यावरून कै. ती. तात्यांच्या कार्याची व स्वभावाची योग्य ती कल्पना येईल.

FERGUSSON COLLEGE MAGAZINE, DECEMBER 1922

(From Editorial Notes)

Hardly has a year passed since in these pages we had to record the death of Principal Patwardhan and now we have the misfortune of bewailing the loss of another of our ablest colleagues and fellow workers. Dr. Pandurang Damodar Gune passed away on the 25th of November. This loss coming so close upon that other, has completely unnerved us and we do not know what the Society is coming to.

The late Dr. Gune had endeared himself to his friends and pupils, as much by the geniality of his temper as by the splendour of his intellect, and indeed his numerous personal friends will miss the many amiable qualities of his heart more than his really rare and exquisite genius. You could never see Dr. Gune morose or gloomy or discontented with the world or with his circumstances, and he had the happy knack of making his companions as gay and lively as he was. Amidst the severe and varied buffetings of fortune he ever remained calm and dignified, when he did not literally laugh his misery out. Where shall we find the like of him now ?

In circumstances far from affluent, he always readily-in the eyes of some, too readily-extended his helping hand to the deserving and the poor, and his extravagance in this respect brought upon him the odium of those wonderful specimens of humanity in whose eyes parsimony is the greatest virtue under the Sun. Why was his heart formed with so much sensibility? Or why was not his fortune adapted to its impulse?

Nature had endowed Dr. Gune with the abilities of a scholar, and he had developed them by a steady and persistent effort. He loved Sanskrit and Marathi beyond all other subjects and his projects in the field of oriental research,—if only he had lived to carry them out;—were such as could shed lustre on the most renowned scholar in the whole world; but even his actual achievements are of no mean order.

His philological work, we were told in Oxford, exacted unstinted admiration from such a scathing critic, as Dr. Macdonell, and he could almost on his death-bed, carry on a bitter controversy with such a formidable opponent as Mr. C. V. Vaidya, on the beginnings of Marathi. Critical insight, freedom from prejudice, quick perception, and untiring energy—these were the distinguishing marks of his scholarship and long shall we have to wait in our country for another endowed with these qualities and in such abundance as fell to his lot. There have been many popular teachers, but Dr. Gune's was one of those rare examples whose popularity is not of their own seeking. He never stooped to flatter his students, never pandered to their prejudices, or slackened his discipline, or refrained from pointing out their defects, and yet such was his popularity as heroes might envy. A love of the entire human kind, an ardent and sincere affection for the younger generation,

a wonderful scholarship, and a rare power of exposition had won for him the popularity which he so richly deserved. And his friends idolised him as much as his pupils.

A scholar among scholars and a teacher among teachers, he never thrust his scholarship on those around. He ever carefully avoided whatever may cause a jar or jolt in the minds of those with whom he was cast. He was a perfect gentleman.

His life was gentle, and the elements
So mix'd in him that nature might stand up
and say to all the world "This was a Man".

* * * *

The Board of Life-members, and the Council of the Society held special meetings to honour Dr. Gune's memory, passed resolutions of condolence and communicated them to his family.

All the institutions of the Society were closed for a day in memory of the deceased, and in all of them the students and Staff met and jointly passed their resolutions of condolence, which were duly communicated to Dr. Gune's family.

* **डॉ. मधुमालती गुणे**—वय सुमारें ३० भ्रा पुणें येथील 'वाडिया' कॉलेजचे व्हॉइस-प्रिन्सिपॉल प्रा. एन्. जी. सुरु, एम्. ए.

डॉ. मधुताई मुंबई विश्वविद्यालयाच्या मॅट्रिक झाल्या व नंतर पुण्याच्या बी. जे. मेडिकल स्कूलमध्यें प्रवेश करून (L. C. P. S.) डॉक्टर झाल्या. पुढें स्वतःच्या हिंमतीनें व मोठ्या साहसानें इंग्लंडला जाऊन डब्लिनचा रोटंडा डिप्लोमा मिळविला व इ. स. १९३४ त मायभूस परत आल्या. पुढें पुण्यास जंगलीमहाराज रोडवर 'इंदिरा प्रसूतिगृह' काढून डॉक्टरीचा व्यवसाय चालू केला. आपल्या व्यवसायांत त्यांनीं सुयश संपादन केलें आहे. कांहीं दिवस त्या पुण्याच्या नगरपालिकेंत मेंबर होत्या. त्यांचें सर्व आयुष्य साहसानें व

उद्योगानें भरलेलें आहे. या घराण्यांतील स्त्रियांमध्यें डॉक्टर होण्याचा मान त्यांनींच प्रथम मिळविला आहे.

* **नरहरी ऊर्फ बाळ केशव** (९–५) ज. २११२।१९१६ अविवाहित, नगर येथें घरीं असतात. होमिओपथीचा अभ्यास केला आहे.

* **गणेश केशव** (९–६) ज. ११–८–१९२३ अविवाहित, १९४३ त पूना ॲग्रिकल्चर कॉलेजमधून I. A. G. त्या कॉलेजच्या तिसऱ्या वर्गात सध्यां शिकत आहेत.

* **मनोहर माधव** (९–७) ज. १५।२।१९०२. भार्या–मनोरमा वय ३२ माहेर शंकर विष्णु तांबे (कोलदे) 'तांबे आरोग्यभुवनचे मालक' मुा दादर, मुंबई. तांब्यांचें घराणें हें कऱ्हाडे ब्राह्मणांतील एक इतिहासप्रसिद्ध घराणें आहे. कन्या (१) सिंधू वय १४ भ्राा पुरुषोत्तम धुंडीराज आगटे (हैदराबाद). (२) माणिक–वय ९

नगरच्या वैद्यकीय शाळेचे आयुर्वेदतीर्थ असून हल्लीं संगमनेरास वैद्यकी करतात. सांपत्तिक स्थिति मध्यम. शेतीची आवड, त्यांच्या मनाची ठेवण अत्यंत समतोल असून सुखदुःखाकडे समत्वानें पहावयाची दुर्लभ वृत्ति त्यांनीं संपादन केली आहे. अयाचित वृत्तीनें वैद्यक व्यवसाय करून संगमनेरास लोकप्रिय झाले आहेत. (छा. चि. पृ. ३२८)

* **कमलाकर माधव** (९–८) ज. १९०७. भार्या–इंदिरा–पंडित (सातारा). कन्या (१) कुंदा (२) सुमन. यांचे पहिले पुत्र शरद हे कै. रामचंद्र अनंत किबे फलटण (यांच्या भगिनीचे यजमान) यांस दत्तक दिले आहेत. फलटणास ते शेती पाहतात.

* **प्रभाकर माधव** (९–९) ज. १९१३. भार्या उषा–प्रमिला (माहेर श्रीपाद नरहर फडणीस, मुा सातारा) हे मॅट्रिक पास असून सिनेमा फोटोग्राफीचें सर्व शिक्षण पूर्ण. सध्यां 'तांबे आरोग्य भुवन' दादर येथें असतात.

* **दत्तात्रय भालचंद्र** (९–१०) ज. ४।१२।१९०३ विवाह मे १९२६ त. भार्या–अन्नपूर्णा ऊर्फ गंगूताई. वय ३१. माहेर दत्तात्रेय पांडुरंग जोशी, ते मुंबईच्या मोरारजी गोकुळदास मिल्समध्यें वीव्हिंग सुपरिंटेंडंट आहेत. कन्या–सुधा, वय ११.

दत्तोपंत बी. एस्सी. असून शिवाय 'डिप्लोमा इन् डाईंग' मिळविला आहे. क्रिकेटपटु, वृत्तीनें कष्टाळू, कर्तव्यशील व सरळ स्वभावाचे. मुंबईस



(१) सौ. शांता येरवडेकर. (२) सुधा. (३) अच्युत.
(४) दत्तात्रेय भालचंद्र

कोहिनूर मिलमध्यें डाईंग व विव्हिंग मास्टर आहेत. पगार रु. ३००. वडील लवकर वारल्यामुळें उत्पन्न झालेल्या अडचणींना धैर्यानें तोंड देऊन आपल्या

बहीणभावांना योग्य तें शिक्षण देण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली व ती त्यांनीं पूर्णपणें पार पाडली आहे. या घराण्यांतील मंडळी प्रसंगीं एकमेकांस उपयोग करीत आली तो गुण अगदां चालू पिढीपर्यंत आला आहे.

(छा. चि. पृ. ३२८)

* **वामन भालचंद्र** (९–११) ज. ११–९–१९०५ भार्या–लीला वय २७ माहेर पंडित. विवाह इ. स. १९३३ त. इ. स. १९२६ त पुण्याच्या स. प. कॉलेजांतून B. A., LL. B. १९३२ त. वडिलांच्या अकाली मृत्यूमुळें व बहीणभावांच्या मदतीकरितां म्हणून बी. ए. होताच पांच वर्षें पुण्याच्या नू. म. वि. हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून काम केलें. पुढें १९३२ त वकील झाले. त्यानंतर संगमनेरास पांच वर्षें वकिली केली कांहीं दिवस नगरास होते. हल्लीं पुण्यास ब्लाझम फॅक्टरीचे मॅनेजर विमा १००० रु. शेतीची मनापासून आवड. (छा. चि. पृ. ३२८)

* **अच्युत भालचंद्र** (९–१२) ज. १९१५ ऑक्टोबर, अविवाहित इ. स. १९३२ मध्यें पुण्याच्या नू. म. वि. मधून मॅट्रिक, गणित व संस्कृतमध्य डिस्टिंगशन मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमधून १९४० त दुसऱ्या वर्गांत एम्. बी. बी. एस. पास व डॉक्टर झाले. चालू महायुद्धांत किंज कमिशन मिळाले. मलाया ५।२।१९४२ त पडला व तेव्हांपासून जपानच्या ताब्यांतील युद्धकैदी. कॅप्टन् आहेत. स्वभावानें मेहनती महत्वाकांक्षी व धाडसी असून रुबाबदार शरीरयष्टि आहे. (छा. चि. पृ. ३२८)

* **नारायण (ऊर्फ पपी) पांडुरंग** (९–१३) वय सुमारें ३५. भार्या–उषा, माहेर घाटे (जबलपूर).

मुंबई विश्वविद्यालयाचे एम्. ए. विषय संस्कृत व इंग्लिश. सांप्रत सिंधमध्यें शिकारपूर आर्ट्स् कालेजांत प्राध्यापक. विषय इंग्लिश व संस्कृत. त्यांनीं उत्तम कविता कल्या असून त्या विद्वन्मान्य झाल्या आहेत. त्यांचे वडील कै. तात्यासाहेब त्यांच्या लहानपणींच निवर्तले. ते आजारी असतांना यांनीं त्यांची

अनन्यभावानें सेवा केली. वडील लवकर निवर्तल्यामुळें व कुटुंबांतील वडील



नारायण पांडुरंग



सौ. उषाबाई

हेच असल्यानें लहान बंधुभगिनींची जबाबदारी त्यांच्यावर पडली. त्या बिकट परिस्थितींतून ते धैर्यानें व मेहनतीनें योग्य प्रकारें पार पडले.

* **अरविंद पांडुरंग** (९–१४) वय सुमारें २७. विवाहित.

फर्ग्युसन कॉलेजमधून इन्टर सायन्स झाले. पुढें पुण्याच्या बी. जे. मेडिकल स्कूलमध्यें एल. सी. पी. एस.चा अभ्यास चालू असतां किंग्ज कमिशन मिळालें व त्यामुळें युद्धावर गेले. अत्यंत साहसानें व मेहनतीनें व मनाच्या कठीण निश्चयानें त्यांनीं युद्धनौकरी मिळविली. तिकडे त्यांची चांगलीच प्रगति झाली असून सध्यां ते लेफ्टनंट आहेत.

वंशावळ नं. १० पृ. २७४ पहा. अश्वि शाखा चांफेट घराणें
लक्ष्मण जनार्दन यांचा विस्तार

विनायकराव लक्ष्मण (१०–२) सुमारें ६५ वे वर्षी मृत. भार्या (१) गंगाबाई–माहेर भाटवडेकर, पुत्र–गोपाळराव व महादेव. भार्या (२) माई–जनाबाई नांवाची कन्या होती. लग्नानंतर वयाचे २५ वे वर्षी निवर्तली.

पुत्र–वैजनाथ विश्वनाथ व सीताराम. कोल्हापुर, कागल व बडोदा येथें क्लार्क होते.

गणपतराव लक्ष्मण (१०-२) भार्या–सरस्वती. माहेर–बडोदे. संस्थानांत व डभई इत्यादि ठिकाणीं नोकरीवर होते.

गोपाळराव विनायक (१०–३) वयाचे ६५ वे वर्षी मृत. भार्या–राधाबाई–माहेर पंडीत. कन्या–सुंदरा. वयाचे १६ वे वर्षी मृत.

चाळीसगांव येथें वैद्यकी करीत असत. ते मेहनती, चाणाक्ष, बुद्धिमान् व चतुर होते.आसपासचे भागांत बऱ्याच ओळखी होत्या. स्वभाव कांहींसा तापट.

महादेव विनायक (१०–४) वयाचे ७२ वे वर्षी मृत. भार्या–पार्वती. माहेर विंचूरचे गर्दे यांजकडे. कन्या–(१) नर्मदा–किबे. (२) कृष्णा–जांभेकर (सुरत).

सर्व्हे सेट्लमेंट डिपार्टमेंटमध्यें हेडक्लार्क होते.

वैजनाथ विनायक (१०–५) काशीस हे प्रसिद्ध तारका मठाचे महन्त होते. तेथें त्यांनीं मुळे स्वामींकडून संन्यासाश्रम घेतला. अखेरपर्यंत महन्त होते. त्यांचे बरेच शिष्य हल्लीं काशीस आहेत.

***पंढरीनाथ गणेश** (१०–८) ज. १-८-१८७९ श्रावण शु।। १४ शके १८०१. भार्या–बाळुताई–मृत–उमराणीकर (भोर). भार्या–(२) गोदु–आगटे. कन्या–(१) सुशीला–पराडकर. भ्र।। कृष्णराव गोपाळ पराडकर, बडोदा. (२) लीला–बडोद्यास शिकत आहे. पुत्र रमाकान्त व रघुनाथ.

***जगन्नाथ गणेश गुणे ऊर्फ स्वामी कुवलयानंदः**—(१०–९); ती. कुवलयानंदाचा जन्म बडोदे संस्थानांत डभई गांवीं इ. स. १८८३ त श्रावण वद्यांत शके १८०५ मध्यें झाला. इ. स. १९०३ मध्यें पुण्याच्या नूतन मराठी विद्यालय हायस्कूलमधून मुंबई विश्वविद्यालयाचे मॅट्रिक झाले. तेव्हां त्यांना संस्कृतची ‘ जगन्नाथ शंकरशेट ’ संस्कृत शिष्यवृत्ति मिळाली. उच्च शिक्षण बडोद्यास झालें. इ. स. १९१० सालीं ते बी.ए. झाले. बडोद्यास प्रसिद्ध प्रो. माणिकरावांचा सहवास झाला व त्यांच्या देखरेखीखालीं ते मल्ल-विद्येंत व आसनादिकांत प्रवीण झाले. इ. स. १९१६ पर्यंत ते बडोद्यास शिक्षक होते. पुढें १९१६ पासून ते १९२६ पर्यंत खानदेश शिक्षण मंडळांत

त्यांचें कार्य चालू होतें. १९२१ ते १९२३ पर्यंत ते खानदेशांत, अमळनेरास



जगन्नाथ गणेश उर्फ स्वामी कुवलयानंद

निघालेल्या राष्ट्रीय महाविद्यालयाचे प्रमुख होते. सदरील संस्थेचे ते आजीव सदस्य झाले होते. इ. स. १९२४ मध्यें लोणावळ्याच्या कैवल्यधामाची त्यांनीं स्थापना केली. सांप्रत महाराष्ट्रांतील प्रमुख व जगद्विख्यात झालेल्या संस्थांपैकीं ती एक आहे.

तो. कुवलयानंदांना तो. छबूकाका असेंहि म्हणतात. त्यांनीं पुढील ग्रंथ लिहिले आहेत.—इ. स. १९०१ मध्यें त्यांनीं कांहीं किरकोळ स्वरूपाच्या कविता लिहिल्या. पुढील ग्रंथ महत्त्वाचे आहेत. इ. स. १९०४ मध्य सुदामदेवचरित्र खंड व काव्यरत्नावलि लिहिली. इ. स. १९१७ मध्यें त्यांनीं कुवलयानंदांचीं गाणीं छापलीं. हीं गाणीं हृदयस्पर्शी व उच्च दर्जाचीं आहेत. १९२४ पासून १९३२ पर्यंत योगमीमांसा म्हणून मासिक त्यांनीं इंग्रजींतून चालविलें. त्यामुळें त्यांच्या कार्याकडे सर्व जगाचें लक्ष वेधलें गेलें. १९३२ मध्यें त्यांनीं प्राणायाम म्हणून महत्त्वाचें पुस्तक इंग्रजींतून छापलें त्याचा प्रसार फारच झाला. सांप्रतहि त्यांचें बरेंच लिखाण चालू आहे. परंतु अद्याप त्याचें प्रकाशन व्हावयाचें आहे.

ज्या कार्यामुळें तो. कुवलयानंदांची जगभर ख्याति झाली तें म्हणजे त्यांनीं लोणावळा येथें काढलेली 'कैवल्यधाम आश्रम' संस्था. या संस्थेची स्थापना इ. स. १९२४ त झाली. पूर्व, पश्चिम यांच्या संस्कृतींचा मेळ घालून, दोहोंच्या संयोगानें अखिल मानवजातीला उद्बोधक असें नवीन तत्त्वज्ञान निर्मावयाचें असा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. पूर्वेकडील योगीजनांची संस्कृति हीं आध्यात्मिक ज्ञानावर आधारलेली आहे, तर पश्चिमेची संस्कृति जड-वस्तुनिष्ठ असून प्रायोगिक विज्ञानावर आधारलेली आहे. यामुळें दोन्ही संस्कृति अत्यंत भिन्न आहेत. परंतु पुरातन योगीजनांच्या यौगिक सिद्धान्तांचें नव्या शास्त्रांच्या साह्यानें स्पष्टीकरण करावें व त्यायोगें या दोन भिन्न संस्कृतींची सांगड घालून द्यावी, अशी कैवल्यधामाची ईर्षा आहे. त्याबरोबरच आत्मिक, सामाजिक व शारीरिक शिक्षणाचा प्रसार करावा असाहि या संस्थेचा हेतु आहे. आश्रमाच्या स्थापनेपूर्वीच तो. कुवलयानंदांनीं यौगिक क्षेत्रांत खूपच संशोधन केलें होतें. आश्रमाच्या स्थापनेबरोबरच त्यांनीं 'योगमीमांसा' नांवाचें त्रैमासिक चालू केलें व त्यांत आसनें, बंध क्रिया, मुद्रा व प्राणायाम यांचा 'क्ष' किरणादि अर्वाचीन शास्त्रीय साधनांच्या साह्यानें केलेला अभ्यास त्यांत प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. या मासिकानें थोड्याच कालांत जगाचें लक्ष वेधून घेतलें व जर्मनी, इंग्लंड, अमेरिका या देशांतील पंडितांकडून तो. काकांची प्रशंसा होऊं लागली. त्यांना लवकरच, या मासिकांतून विवरण केलेलीं आसनें वगैरे व्यायामाचे प्रकार सुरू केल्याचीं पत्रें देशी-विदेशी विद्वानां-

करून आली. शरीरशिक्षा व रोगपरिहार या बाबतींत योगाची उपयुक्तता अर्वाचीन शास्त्रांच्या आधारें त्यांनीं सिद्ध करून, आश्रमांत अनेक रोग्यांना ते परिहार देऊं लागले. पुढें लवकरच रोग्यांच्या तपासणीकरितां म्हणून ' क्लिनिकल लॅबोरेटरी ' स्थापन करण्यांत आली. इ. स. १९२७ ते ३० च्या दरम्यान तेथें सुमारें तेराशें रोग्यांची परीक्षा विनामूल्य करण्यांत आली. कांहीं रोग्यांना ट्रीटमेंटकरितां तेथें रहावें लागतें. त्यांची राहण्याची व्यवस्थाहि पण आश्रमांत होते. सर्व उपचार योगिकपद्धतीनें करण्यांत येतात.

योगिक शरीरशिक्षेचा एक अभ्यासक्रम आंखून त्याचा प्रसार करावा असा आश्रमाचा फार हेतु आहे. हिंदुस्थानांतील अनेक शिक्षणसंस्थांनीं ती. काकांच्याकडे सल्ला व मदत मागितली होती व सांप्रतहि वारंवार विचारणा करितात. मुंबई सरकारनें १९२७ सालीं शारीरिक शिक्षण-विचारासाठीं नेमलेल्या कमेटीवर ती. काकांची योजना झाली होती. कमेटीनें आपल्या अहवालांत आश्रमाचा स्वतंत्र तऱ्हेनें उल्लेख करून त्याची पुष्कळच स्तुति केली आहे. संयुक्त प्रांत सरकारनें खास निमंत्रण केल्यावरून ती. काका लखनौस गेले होते. तेथें त्यांनीं सुमारें २८ शिष्य तयार करून त्यांच्या द्वारें शारीरिक शिक्षणाचा प्रसार केला. त्यांनीं लखनौ युनिव्हर्सिटी व मेडिकल कॉलेजांत दिलेलीं व्याख्यानें लोकप्रिय झालीं व संयुक्तप्रांत सरकारनें त्यांच्या शिक्षणपद्धतीचा आपल्या प्रांतांतील शाळांतून प्रसार केला आहे.

अमेरिकेच्या 'येल युनिव्हर्सिटी'मधील एक संशोधक श्रीयुत बेहनान हे आश्रमाला कांहीं वर्षांपूर्वी भेट देऊन गेले. योग विद्येच्या प्रचारासाठीं ती. काकांना 'येल' येथें बोलवावें असा त्यांचा विचार होता.

ती. काकांचे गु. माधवदास म्हणून अध्यात्म विद्येंतील गुरु होते. अध्यात्म्याच्या उन्नतीसाठींच योगविद्या आहे असें आश्रमाचें ठाम मत असल्यानें तसे समर्थ योगी निर्माण करून " कैवल्यधाम अध्यात्म-सेवा-संघ करावा " अस आश्रमाचें अंतिम ध्येय, म्हणून त्यांनीं आपल्या गुरुजींचे नांवाचे 'विद्यापीठ' आश्रमांत स्थापलें असून त्याला 'श्रीमन् माधवयोगमंदिर' नांव दिलें. विद्यापिठाच्या शिक्षणक्रमाचा काल ठरलेला आहे. योगविद्या, दर्शनें, पश्चिमेकडील तत्त्वज्ञान–मानसशास्त्र, शरीरविज्ञान, रोगपरीक्षा जगांतील प्रमुख


शासनसंस्थांचा अभ्यास व अर्थशास्त्र इत्यादि विषय शिकविले जातात. ती. काकांच्या शिवाय त्यांनीं आपल्या मदतीस बरीच तज्ज्ञ मंडळी या कार्याप्रीत्यर्थ घेतली आहेत. आश्रमाच्या स्थापनेपासून आजपर्यंत आश्रमास अनेक मोठ-मोठ्या धनिकांनीं व राजेरजवाड्यांनीं, संस्थानिकांनीं हजारों रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. आश्रमाची मिळकत लाखों रुपयांची आहे. व जगभर त्याची ख्याती झालेली आहे.

कॉंग्रेस सरकारच्या राजवटींत ती. काकांची मुंबई विश्वविद्यालयाच्या (Physical Culture Board) शारीरशिक्षण-प्रसारक समितीवर योजना झाली होती. सांप्रत दिलें जाणारें कॉलेजांतील व शाळांतील (Physical training) शारीरिक शिक्षण, यांची पद्धति ती. काकांनीच सुरू केलेली आहे. मुंबईस चौपाटीला लागून त्यांचा एक नवीन भव्य आश्रम गेल्या कांहीं वर्षांत निघाला आहे. तेथें अनेक रोग्यांच्या रोगांचा परिहार केला जातो. कांदिवली व बोरीवली या दोन नवीनच शाखा मुंबईस सुरू करण्यांत आल्या आहेत. राष्ट्राच्या उन्नतीस त्या राष्ट्राची शारीरिक व बौद्धिक अशा दोन प्रकारची उत्तम वाढ व्हावी लागते. त्यांतील पहिली गोष्ट फारच महत्त्वाची आहे. ती करून ती. काकांनीं या घराण्याच्या लौकिकांत फारच मोठी भर घातली आहे.

कै. ती. डॉ. पांडुरंग दामोदर गुणे, त्यांनीं केलेल्या या देशांतील प्राच्य संशोधनाच्या सेवेमुळें ते प्रसिद्धीस आले! तर ती. काकांनीं पुरातनच्या योगसाधनांचा नवीन शास्त्राधारें पुनरुद्धार करून जगभर या भरत देशाची कीर्ति पूर्वीप्रमाणेंच पुनः पसरविली आहे!!

ती. काकांचा प्रेमळ स्वभाव, ब्रह्मचर्ययुक्त पवित्र व शुद्ध आचरण, आजन्म योगविद्येची सेवा व ज्ञानदान व आर्तांस सतत मदत करण्याची त्यांची तयारी आणि त्यांची प्रथमपासूनची राष्ट्रीय बाण्याची वृत्ति या सर्व गोष्टींचा विचार केला असतां कैवल्यधाम म्हणजे या विसाव्या शतकांतील पुरातन कालांतील ऋषींच्या आश्रमाचेंच एक नवीन उदाहरण आहे असें वाटतें.

* **गंगाधर गोपाळ ऊर्फ गंगाधरशास्त्री गुणे** (१०-१०)— वय ६२. भार्या—आनंदी (माहेर पंडितांकडे) या दिवंगत झाल्यास तीनचार



उभे—(२) मनोहर माधव, (३) कृष्णाजी गंगाधर, (४) वामन माळवंद, (५) सौ. दुर्लंकर, (६) सौ. कुसुम गंगाधर.
सौ. मनोरमा कृष्णाजी, (३) ... (४) अच्युत माळवंद, (५) सरस्वती माळवंद

वर्षे झालीं. मृत्युसमयीं वय सुमारें ४५ वर्षे. त्यांच्या व शास्त्रीबुवांच्या तेहतीस वर्षांच्या सांसारिक प्रवासांत अनेक सुखदुःखांच्या प्रसंगीं, अत्यंत उच्च दर्जाचें, अत्यंत प्रेमळ, निष्पाप व हार्दिक सहकार्य त्यांनीं शास्त्रीबुवांच्या बरोबर केलें होतें. त्यांच्या अंगीं सुगृहिणीचे अनेक गुण होते. त्यांना इंदु नांवाची एक कन्या होती. ती नाशिकच्या माईणकरांच्याकडे दिली होती.

गुणे कुलास प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या ज्या थोड्या व्यक्ति झाल्या त्यांत वै. पं. गंगाधरशास्त्र्यांची गणना केलीं पाहिजे. त्यांचें बालपण फार कष्टांत व दारिद्र्यांत गेलें. त्यांचे वडील कै. गोपाळ विनायक गुणे हे वेदान्ती बाण्याचे व करारी वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांनीं जन्मभर नाना उद्योग व कष्ट केले. (कॉन्ट्रॅक्टरी, वैद्यकी, शेती वगैरे) परंतु ते फलदायी न झाल्यानें त्यांची स्थिति नेहमीं हलाखीची असे. व त्यामुळें शास्त्रीबुवांचें शिक्षण ते आधुनिक पद्धतीनें करूं शकले नाहींत. कै. चिंतोपंत ऊर्फ सुप्रसिद्ध बाबा गुणे वैद्य कोल्हापूर यांनीं शास्त्रीबुवांना आपल्याजवळ ठेवून, आपले चिरंजीव यशवंत-राव गुणे वैद्य यांच्याबरोबर वैद्यकीचें प्राथमिक शिक्षण दिलें व पुढें पुण्यास सुप्रसिद्ध वैद्य वाकणकर व लागवणकर यांच्याकडे पुढील शिक्षण पूर्ण झालें. शास्त्रीबुवांचें इंग्रजी शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालें होतें. पंढरपुरांत कै. राघोपंत दादा गुणे व डॉ. त्र्यंबकराव रघुनाथ गुणे यांच्याकडे राहून डॉ. त्र्यंबकरावा-कडून पाश्चात्य वैद्यकीचें प्रात्यक्षिक ज्ञानहि त्यांनीं घेतलें. त्यांची बुद्धि तीव्र असल्यानें त्यांनीं वैद्यक विषयाचें उत्तम ग्रहण करून त्याचा स्वतःस उपयोग करून घेऊन अध्यापनद्वारा इतरांसहि ते आपल्या ज्ञानाचा आज गेलीं पंचवीस वर्षे फायदा देत आहेत.

आपलें अध्ययन पुरें करून वयाचे १९ वे वर्षी शास्त्रीबुवांनीं अहमदनगर येथें आपला वैद्यकी व्यवसाय चालू केला व हळूहळू रोग्यांबद्दलची कळकळ, द्रव्याबद्दलची एक प्रकारची अयाचित वृत्ति व वैद्यक विषयाचें सतत वाचन यामुळें त्यांचें बस्तान नगरास उत्तम प्रकारें बसलें व जन्मभर सतत हालअपेष्टांशीं झगडणाऱ्या आपल्या पित्यास वृद्धपणीं स्वास्थ्याचा लाभ करून दिला व त्यांचा अपूर्ण राहिलेला संसार पुढें यथास्थित रीतीनें पार पाडला. त्यांनीं आपला स्वतःचा संसार उत्तम प्रकारें केला यांत नवल नाहीं, परंतु त्याबरोबरच

त्यांचे धाकटे दोन बंधू यांचा संसार—अगदीं शिक्षणापासून ते लग्नें होईपर्यंत व सर्व व्यवस्था नीट लागेपर्यंत—उत्तम प्रकारें करून दिला. शास्त्रीबुवांना सांपत्तिक लाभहि उत्तम प्रकारचा झाला. त्यांनीं स्वकष्टार्जित पैशानें वडिलार्जित आर्श्वाच्या जमिनी कर्जांतून सोडविल्या व त्या बंधूंच्या संसारास मदत म्हणून त्यांना दिल्या. स्वतः उत्तम जमिनी, घरें, बंगले खरेदी केले. एकंदर पूर्वींची सांपत्तिक स्थिति उत्तमच सुधारली, बंधूंना मदत करण्यांत आपल्या जुन्या अविभक्त कुटुंबांतील स्वार्थत्यागाचें मर्म ओळखून तें पुरेपूर आचरणांत आणलें हें त्यांना खचित भूषणावह आहे.

त्यांचा स्वभाव जात्याच चळवळी, उद्योगी व महत्त्वाकांक्षी असल्यामुळें स्वतःच्या प्रपंचांतच मग्न न रहातां त्यांनीं पुष्कळच सार्वजनिक उद्योग केले. ‘ जें जें आपणासि ठावें, तें तें दुसऱ्यांशीं शिकवावें, शहाणे करून सोडावे सकलजन ’ या समर्थोक्तीप्रमाणें त्यांनीं आयुर्वेदाचा सर्वांगीण प्रसार व्हावा म्हणून अहमदनगर येथें आयुर्वेदाचें महाविद्यालय १९१७ सालीं स्थापलें व त्याच्या उत्कर्षासाठीं त्यांनीं अत्यंत परिश्रम केले. लोकाराधना व लोकसंग्रह केला. हळूहळू हजारों रुपये जमविले व स्वतः हजारों रुपयांची घस सोसली व ते नांवारूपास आणलें. विद्यालयास हॉस्पिटलचीहि जोड त्यांनीं दिली. आणि आज विद्यालय व हॉस्पिटल ह्या नमुनेदार संस्था नगरमध्यें रुग्णांच्या रोगपरिहाराचें काम विनामूल्य उत्तम प्रकारें करीत आहेत. विद्यालयामुळें होतकरू, गरीब मुलांच्या वैद्यकीय शिक्षणाची सोय निघून अन्यथा वायां जाणारे शेंकडों तरुण उपजीविकेस धंदा मिळून मार्गी लागले. या संस्थांना खर्चाची उणीव पडूं नये म्हणून त्यांनीं स्वतःचा खाजगी औषधी कारखाना आयुर्वेदसेवासंघ या संस्थेच्या हवाली (good will वगैरे) कांहीं नफा न घेतां केला. व प्रथमपासूनच त्यांत पैसा मिळविण्याची व्यापारी दृष्टि ठेवली नाहीं. जो नफा होईल त्यांतील निम्मा आयुर्वेदाच्या कार्यास खर्च करण्यास व विशेषतः आयुर्वेदमहाविद्यालय व हॉस्पिटल यांचा योगक्षेम चालविण्यास खर्च करावयाचा असा त्यांनीं प्रथमपासूनच दंडक घालून दिला. पुढें ‘ आयुर्वेदाश्रम फार्मसी ’ ही संस्था लिमिटेड झाली. ते वेळीं निमा नफा वर लिहिल्याप्रमाणें आयुर्वेद सेवा संघास देऊन पुढेंहि जर ६।• वर नफा राहिला तर नफा ६।• भागी-

दारांना देऊन राहिलेला नफाहि आयुर्वेद सेवासंघाकडे वरील कार्यासाठीं द्यावा असा नियम, (Memorandum of Association मध्येंच) त्यांनीं आग्रह-पूर्वक घातला. यामुळें शास्त्रसेवा व व्यापार दोन्ही साधून त्यामुळें ५००। ६०० लोक आपली उपजीवीका करीत आहेत. चार लाखांचेवर फार्मसीची विक्री हल्लीं असते यावरून तिच्या कार्याचा पसारा व व्याप ध्यानांत येईल. पुणें, सातारा येथील आयुर्वेद विद्यालयें व औषधी कारखाने हे शास्त्रीबुवांचें उदाहरण पाहूनच उत्पन्न झाले व उदयास आले. त्यांनींहि आपले नियम शास्त्रीबुवांचें उदाहरण पाहूनच बनविले आहेत. हें पाहिलें म्हणजे शास्त्री-बुवांच्या कार्याची उपयुक्तता पटेल.

याशिवाय औद्योगिक क्षेत्रांतहि शास्त्रीबुवांचें लक्ष असतें. नगरच्या व नगर-जिल्ह्यांतील अनेक संस्थांतून ते अध्यक्ष आहेत.

सतत अध्यापन करावें लागल्यामुळें त्यांचा आयुर्वेदाचा अभ्यास वाढत जाऊन त्यांनीं आयुर्वेदावर व विशेषतः औषधीकरणांवर पुष्कळ ग्रंथहि लिहिले आहेत. भिषग्विलास नांवांचें आयुर्वेदाचें मासिक ते स्वतःच्या संपादनाखालीं गेलीं कित्येक वर्षे चालवीत आहेत. आयुर्वेदाच्या या महान् कार्यामुळें ते 'अखिल भारतीय आयुर्वेद महामंडलाचे' अध्यक्ष निवडले गेले होते व प्रांतिक आयुर्वेदीय संमेलनाचे ते कित्येक वेळां अध्यक्ष होते.

ते अत्यंत भावनाप्रधान व धार्मिक मनोवृत्तीचे आहेत. नगरच्या सनातन धर्मसभेचे ते एक मोठा आधार आहेत. नगर येथील त्यांचें घर हिंदुगृहस्था-श्रमाचा एक उत्तम नमुना आहे. त्यांच्या कै. पत्नी आनंदीबाई यांनीं त्या घरास वैशिष्ट्य प्राप्त करून दिलेलें आहे. शास्त्रीबुवांना दुसऱ्याचे घरीं राहून अध्ययन करावें लागलें याचें स्मरण ठेवून ते आपल्या घरीं आयुर्वेद शिक्षणा-करितां विद्यार्थी ठेवून घेऊन त्यांच्या शिक्षणास मदत करतात. त्यांचा स्वभाव शांत व आनंदी आहे. कोणतीहि गोष्ट ते मनास कधींच लावून घेत नाहींत व या त्यांच्या स्वभावामुळें त्यांना आरोग्यहि चांगलें लाभलें आहे. द्रव्य पुष्कळ मिळविलें व त्याचा व्ययहि खूप केला. त्यांचे पुत्र चांगले सुविद्य झाल्यापासून त्यांनीं आपलें मन द्रव्यसंचय व व्यय यांतून काढून घेतलें आहे व एक प्रकारें ते वानप्रस्थाश्रमी बनले आहेत. ही दुर्लभ गोष्ट त्यांनीं आपल्या

उतार वयांत उत्तम प्रकारें साधली आहे. त्यांना हृदयाचा (Heart Arota) विकार असूनहि त्यांनीं नियमित वागणुकीनें प्रकृति उत्तम ठेवली आहे. सांप्रत त्यांचें वय सुमारें ६२ आहे.

ते उत्तम आचार्य (Principal) व संपादक व उत्तम लेखक आणि नामांकित वैद्य असून अनेक संस्थांचे अध्यक्ष आहेत. ते मराठी किती हलुवार व उत्तम प्रकारें लिहितात हें ते सांप्रत लिहीत असलेल्या 'माझ्या आठवणी' या पुस्तकावरून दिसून येईल.

शुद्धचारित्र्य, सतत अध्ययन व अध्यापन, ग्रंथसंपादन व लेखन, धार्मिक आचार व विचार वगैरे गोष्टीनीं संपन्न असल्यानें ते यथार्थत्वानें ब्राह्मण आहेत असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. या घराण्याचा ज्या अनेक 'ब्राह्मणांनीं' लौकिक वाढविला आहे त्यांपैकीं ते एक आहेत.

* **शंकर गोपाळ** (१०-११) वय सुमारें ५०. भार्या (१) गंगाबाई. मृत-माहेर कात्रे. (२) गिरिजा-पंडीत. कन्या-(१) लीला-वय १७. मॅट्रिकमध्यें. (२) नलिनी-वय १५. इंग्रजी ४ मध्यें. (३) उषा-वय ७- मराठी पहिली, पुत्र-मुरलीधर.

आयुर्वेद विशारद. वैद्यकी, पाटीलकी व शेतकीचा व्यवसाय. सांपत्तिक स्थिति मध्यम. मु॥ चाळीसगांव.

* **नारायण गोपाळ** (१०-१२) ज. इ. स. १९०२ कार्तिक वद्य १२. भार्या-कमला. माहेर महाजनी. कन्या (१) शान्ता-वय १७. इंग्रजी ५ वींत.

* **त्र्यंबक महादेव** (१०-१३) मिलिटरी अकौन्टस्‌मध्यें सर्व्हिसला होते. हल्लीं पेन्शन घेतलें आहे. निरनिराळ्या ग्रंथांच्या वाचनाचा नाद आहे.

* **कृष्णाजी गंगाधर ऊर्फ कुशाभाऊ** (१०-१६) वय सुमारें ३०. भार्या-सुलोचना; माहेर ठाकूर लिंबचें. कन्या.

कुशाभाऊ मुंबई विश्वविद्यालयाचे मॅट्रिक व इन्टरसायन्स झाले व नंतर फार्माकोपिया हा विषय घेऊन बनारस युनिव्हर्सिटीचे फर्स्टक्लास बी. एस्‌सी. इ. स. १९३५ मध्यें फार्मास्युटिकल शिक्षण घेऊन झाले. पुढें १९३५ ते १९४३ पर्यंत नगरच्या आयुर्वेदाश्रम फार्मसीचे मॅनेजर होते. अवघ्या आठ वर्षांत दोन लाखांवरून चार लाखांपर्यंत त्यांनीं फार्मसीच्या औषधांचा खप वाढविला.

पुढें तेथील क्षेत्र कार्यास संकुचित वाटल्यावरून गले वर्षापासून त्यांनीं मुंबईस अलट्रा लॅबोरेटरी नांवाची पाश्चात्य औषधें तयार करणारी संस्था काढली आहे. या घराण्याच्या तरुण पिढींत अशा प्रकारचं कार्य करणारें तेच पहिले आहेत. त्यांचा स्वभाव अत्यंत आनंदी, सरळमार्गी असून यांचा मित्र-परिवार मोठा आहे.

* **जनार्दन गंगाधर ऊर्फ जनूभाऊ** (१०-१७) वय सुमारें २५. विवाह ता. १२ मार्च १९४४ भार्या—बेबी, माहेर मोटे (उमरावती) नुकतेच (L. C. P. S.) डॉक्टर झाले आहेत.

वंशावळ नं. ११ पृ. २७५ पहा. शाखा चांफेट—पोटशाखा पुणें.

चिमणाजी गोविंद (११-१) जुन्या कागदांतून यांचा उल्लेख आहे. हे महादेवभट गुण्यांचे बरोबर सातार्‍यास राहत असावे. (खं. १, ले. २२ पहा) यांनीं शके १६९९ कार्तिक वद्य ८ ला काशीयात्रा केली.

गोपाळ गोविंद (११-२) वडील घराण्याबरोबर झालेल्या वादांत अनेक प्रसंगीं यांनीं माहिती पुरविली आहे.

विठ्ठल चिमणाजी (११-३) गोपाळ गोविंद (११-२) व हे यांचे-मधील चांफेट वतनासंबंधींचें वांटणीपत्र उपलब्ध आहे.

रामचंद्र गोपाळ (११-७) पुणें येथील गुण्यांचे मूळ पुरुष.

गोविंद गोपाळ (११-८) चांफेटच्या कांहीं कागदांतून यांचा उल्लेख आहे.

सीताराम गोपाळ (११-९) अंधरसुला जिल्हा नाशिक येथें राहत.

श्रीधर विठ्ठल (११-१०) ज. १७९० चे सुमारास. इ. स. १८२७ त चांफेटचे खोती वतनासंबंधीं कंपनी सरकारपुढें सर्व माहिती सादर केली. (खं. १, ले. ७७ पहा.)

विष्णु सीताराम व नारायण सीताराम (११-१३, १४) हे उभयतां शितोळे सरकारच्या देवाची पूजा करून अंधरसुला येवल्यानजीक (नाशिक) येथें राहत असें ऐकिवांत आहे.

गोपाळ विष्णु व गोविंद विष्णु (११–१६, १७) अंधरसुरास रहात.

* **सीताराम गोपाळ** (११–२०) वय ४०. भार्या इंदिरा–माहेर पंडित (हरचिरि) व्ह. फा. पास. चांफेटच्या शेतीचा व खोतीचा व्यवसाय करतात. हल्लीं यांचेकडे वडिलार्जित वतन (खोतीचें) तक्षिम २ आणे धारा आहे. ५० रु. दस्त मिळतो.

***महादेव *अनंत *नारायण–गोविंद**—सर्वजण मुंबईस असतात. माहिती मिळाली नाहीं. नारायण गोविंद १९३४ त मुंबई सेंटरला मॅट्रिकला बसले होते.

वंशावळ नं. १२, पृ. २७६ पहा. चांफेट-शाखा, उपशाखा-पुणें

विठ्ठल रामचंद्र (१२–१) १५ वर्षांचे सुमारास चांफेटहून पुण्यास आले. पुण्यास इनामदार रायरीकर यांनीं आश्रय दिला. सरवट्यांचेकडे विवाहसंबंध. मृत्यु शके १८१२ फाल्गुन शु।। ११. मृत्युसमयीं सन्यास घेतला होता. यांनीं त्र्यंबकेश्वर येथें दिलेल्या लेखांत बंधु गणपति रामचंद्र (१२–२) यांचा उल्लेख केला आहे. नाशिकचे लेखांत नाहीं.

रामचंद्र विठ्ठल (१२–३) ८० वर्षें वयास मृत. शके १८५६ श्रावण वद्य ४, मंगळवार ऑगस्ट २८. भार्या–जानकी. मृत्यु–शके १८५६ भाद्रपद



रामचंद्र विठ्ठल



सौ. जानकी

शु॥ ४. माहेर सीताराम श्रीकृष्ण श्रीखंडे (गुलबुर्गा). कन्या–(१) यमुना–घराडकर. (२) भिकु–सरवटे. उभयतां कन्या मृत.

रामभट पुण्यामध्यें वैदिक व याज्ञिक म्हणून प्रसिद्ध होते. धंदा भिक्षुकी. सांपत्तिक स्थिति मध्यम.

लक्ष्मण विठ्ठल (१२–४) मृत. रेल्वेंत नोकरीवर होते.

धोंडो रामचंद्र (१२–५) ज. श. १८१३. भाद्र शु॥ १२. मृत्यु–वैशाख शु॥ १५. शके १८६४. भार्या यशोदा वय ४२. माहेर लळीत. कन्या–मैना–भागवत.

धंदा भिक्षुकी. वैदिक व याज्ञिक दोन्ही. स्थिति मध्यम.

***हेरंब ऊर्फ बळवंत रामचंद्र** (१२–६) ज. श. १८१२ फाल्गुन वद्य २. भार्या–सत्यभामा–ठाकूर (जामसंडे). कन्या–(१) सुमति वय ८. (२) शालिनी–वय २. धंदा भिक्षुकीचा. वस्ती पुणें, सांपत्तिक स्थिति मध्यम.

***चिंतामण रामचंद्र** (१२–७) ज. श. १८२४ ज्येष्ठ शु॥ १५. भार्या (१) राधा–मृत. माहेर–लुकतुके (चिंचवड). (२) रमा–गर्दे. कन्या–विमल व लीला. उभयतां प्रथम भार्येच्या आहेत.

***मोरेश्वर रामचंद्र** (१२–८) ज. श. १८२८ माघ शु॥ १५. भार्या–(१) इंदिरा–मृत. माहेर–खांडेकर. पुत्र–श्रीहरी. (२) कालिंदी–माहेर –जोशी.

शिक्षण मॅट्रिकपर्यंत. सर्व प्रकारची मेकॅनिकल एंजिनिअरिंग येते. महाराष्ट्र शुगर फॅक्टरी स्टेशन बेलापूर येथें नौकरी.

***भालचंद्र रामचंद्र** (१२–९) ज. १९१२. व्ह. फा. पास. मॅट्रिक-पर्यंत इंग्रजी शिक्षण. अविवाहित. पुण्यास घरींच असतात.

***गजानन लक्ष्मण** (१२–१०) ज. २५-२-१८९५, भार्या लक्ष्मी. माहेर–कानेटकर (रहिमतपूर). कन्या (१) लीला. ज. १५-९-१९२९. (२) कृष्णा. ज. १०-२-१९३१. (३) प्रभावति. ज. २१-५-१९३५, सर्व-जणी शिकत आहेत.

पाटबंधारे खात्यांत नौकरी आहे. शुक्रवार ४३१/१ पुणें, टिळकरोड येथें राहतात. सांपत्तिक स्थिति मध्यम.

*गणेश लक्ष्मण (१२–११) ज. इ. स. १८९७. भार्या–कमलकुमारी. माहेर डॉ. रामचंद्र शंकर किवे (कोल्हापूर). कन्या–शकुन्तला ज. १९३५. शिकत आहे.

हे मुंबई विश्वविद्यालयाचे एम्. बी. बी. एस् आहेत. सध्यां मलायामध्यें प्रॅक्टिस करितात. परदेशांत जाऊन स्थायी होणारे हें एक मोठें साहस करून दाखविलें आहे. सांपत्तिक स्थिति उत्तम आहे. 97 *Jalan Meriam* Muar Federted Malay States. यांचे चिरंजीव शिकत आहेत.

*विनायक लक्ष्मण (१२–१२) ज. १८९९. भार्या सिंधू, तळेगांवास नौकरीवर आहेत.

*दत्तात्रय धोंडो (१२–१३) ज. श. १८४३ पौ. व. १४. अविवाहित. व्हह. फा. पास. इंग्रजी ३ री इयत्ता. सध्यां वैदिक व संस्कृत शिकत आहेत. (१२-१४ ते १२-२०) सर्वजण लहान असून शिकत आहेत.

वंशावळ नं. १३, पृ. २७७ पहा शाखा कऱ्हाड-काले

जनार्दन गोविंद यांच्या शके १६११ च्या सुमारास केलेल्या त्र्यंबकेश्वर यात्रेच्या वेळीं केले. दिलेल्या लेखाच्या आधारें ही वंशावळ चांफेटच्या वंशावळीस जोडली आहे. या प्रकरणाच्या आरंभीचा मजकूर पहा.


बाळाजी जनार्दन इ. स. १७०० नंतर हे देशावर आले असावेसें दिसतें. (खं. १ ले. ४ पहा) यांचे चिरंजीवाचे नाशिकचे लेखांत मातोश्री मनुबाई व लक्ष्मीबाई अशीं दोन नांवें आहेत. त्यावरून यांना दोन भार्या असाव्यात. वंशावळ नं. १३ त यांचे ६ पुत्र दाखविले आहेत. त्यांत वडील कोण हें नक्की ठाऊक नाहीं. तसेंच प्रथम भार्येचे कोण व दुसऱ्या भार्येचे कोणते हें समजत नाहीं. त्र्यंबकेश्वर व नाशिकचे लेखांत यांच्या चिरंजीवानें जो क्रम सांगितला आहे तोच वंशावळींत ठेवला आहे. हरि बल्लाळ गुण्ये यांचा उल्लेख १७२० मध्यें येत असल्यानें (खं. १ ले. ३ पहा) रामाजी बल्लाळापेक्षां ते वडील असण्याचा संभव आहे व कदाचित् प्रथम भार्येचे पुत्रहि असावेत. कारण त्यांच्या व्यतिरिक्त त्यांचे पांच बंधूंनीं नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील लेखांत यांचा उल्लेख फक्त एक दोन ठिकाणींच केला आहे. या वंशावळींतील सर्व व्यक्तींची माहिती प्रकरण ८ मध्यें दिली आहे.

वंशावळ नं. १४, पृ. २७८ पहा. कऱ्हाड, काले व धार शाखा

राघो नारायण (१४-५)-धार संस्थानचे पुनरुज्जीवक. यांचें चरित्र ऐतिहासिक चरित्रविभागांत दिलें आहे.

पांडुरंग हरि (१४-८) इंदूर सरकारचे नौकरीवर होते. पुढें विनायक-राव रघुनाथ लहान असल्यानें त्यांचे पालक म्हणून धारेस राहत होते. उतार-वयांत भ्रम झाला होता. शेवटीं संन्यास घेतला.

वासुदेव हरि (१४-९) ६५ वर्षें वयास १९१४ त मृत्यु. भार्या (१) शेणोलीकर यांचेकडील. (२) भागीरथी-माहेर भागवत (पूर्वले). पुत्र-रामचंद्र. (३) यशोदा-माहेर कानेटकर (देवराष्ट्र). कन्या-काशी-गर्दे (भिलवडी). यांना पुत्र ३.-सदाशिव, श्रीपाद व बळवन्त. व्यवसाय शेतीचा, सांपत्तिक स्थिति मध्यम.



वासुदेव हरी



विनायक रघुनाथ

विनायक रघुनाथ (१४-१०) मृत. भार्या-लक्ष्मी.

विनायक रघुनाथ (१४-१०) मृत. भार्या-लक्ष्मी.
चांगले विद्वान् व हुशार होते. कांहीं वर्षे धार संस्थानचे हुजूर ट्रेझरर, इनाम कमिशनर व चीफ रेव्हिन्यू ऑफिसर. कै. रघुनाथराव नारायण

(१४–५) यांचें कुटुंब कै. जानकीबाई यांनीं यांना दत्तक घेतलें. ते सीताराम हरि (१४–७) यांचे पुत्र होत.

रामचंद्र वासुदेव (१४–१३) मृत ४८ वें वर्षी. भार्या जानकी. माहेर वैद्य (इचलकरंजी). गाण्याचा नाद, शेती पाहत असत.



रामचंद्र वासुदेव

***सदाशिवराव वासुदेव** (१४–१४) ज. १२ जून १८९७. भार्या-उमा. वय.२१. माहेर वामन लक्ष्मण कानेटकर (देवराष्ट्र). कन्या (१) सुमति वय ४. (२) उषा, वय २.

शिक्षण मॅट्रिकपर्यंत. मुख्य व्यवसाय शेती. गौण व्यवसाय लष्करांतील नौकरी. सनातनी मताचे परंतु प्रवृत्ति सुधारक. घरांत मुद्दाम वैश्वदेव सुरू केला. गायनवादनाचा नाद. तत्त्वज्ञानाची फार आवड. संस्कृत काव्याची आवड. इ. स. १९२३ त लष्करांत शिपाई म्हणून शिरले, ते कॅप्टन झाले. ६ वे जॉर्ज बादशहा यांचे आमंत्रणावरून राज्यारोहणप्रसंगीं लंडनला गेले होते. राजेसाहेब व राणीसाहेब यांचेबरोबर खाना झाला. एकंदर सातजण इंडियन्स होते. प्रवासाचा वृत्तांत लिहिला आहे तो सरकारी लष्करी वर्तमानपत्रांतून निरनिराळ्या भाषांतून छापला गेला आहे. २ वर्षांपूर्वी त्यांना मेजर ही लष्करां-

तील बहुमानाची पदवी मिळाली आहे. हल्लीं पुणें येथें मेजर म्हणून लष्करांत काम करीत आहेत. यांचेच पूर्वज पेशव्यांचे दरबारीं मानानें राजकारणाचीं



मेजर सदाशिवराव वासुदेव

खलबतें करीत. योग असा कीं, यांना आज परकीय सत्ता असतांनाहि त्या राजसत्तेच्या सम्राटाकडून पूर्वजांप्रमाणेंच मान मिळाला !

* **श्रीपाद वासुदेव** (१४-१५) वय ४०, भार्या—आनंदी वय १८. माहेर भागवत. कन्या—सरोजिनी ऊर्फ बेबी. मराठी सात इयत्ता व इंग्रजी ५ इयत्ता शिक्षण. व्यवसाय शेती.

* **बळवन्त वासुदेव** (१४-१६) वय ३३. भार्या—प्रमिला वय १८. माहेर पेंढारकर (कऱ्हाड). शिक्षण मॅट्रिकपर्यंत. व्यवसाय शेती व पोल्ट्री फार्मिंग.

* **माधवराव विनायक** (१४-१७) वय सुमारें ५०. कन्या—कु. कृष्णाताई, हिंगण्यास शिकत आहेत.



माधवराव विनायक

शिक्षण मॅट्रिकपर्यंत. मौंजे एकलघुना व मौंजे कालखेडी या दोन गांवचे इनामदार सांपत्तिक स्थिति उत्तम. स्वभाव उत्तम. या इतिहासास सवाशें रुपयांची देणगी दिली आहे.

त्र्यंबक विनायक (१४-१८) लहानपणींच निवर्तले.

* **नरहरि ऊर्फ बाळासाहेब** (१४-१९) इनामदार—धार.

वंशावळ नं. १५ पृ. २७९ पहा. काले कऱ्हाड (भिलवडी)

शिवराम विष्णु (१५-२) यांनीं इ. स. १८५७ मध्यें इनाम कमिशन पुणें यांस या घराण्याचें पेशवाईच्या आरंभापासूनचें साद्यंत वृत्त सादर केलें आहे. त्यांची स्वतःची माहिती त्यांत आली आहे. (खं. १ ले. ८३ पहा.)

हरिहर विष्णु (१५-४) फारशी उत्तम जाणत, हैदराबाद संस्थानांतील मिर्झा अल्ली नबाब यांचे जहागिरींत मनसबदार होते.

दत्तात्रय गणपति (१५–५) मृत्युसमयीं वय ६०. भार्या (१) माहेर कशाळकर. भार्या (२) उमाबाई जिवंत वय ६० माहेर ढवळे (रिसवड). मराठी शिक्षण झालें होतें. इस्लामपूरच्या मंत्र्यांचे कारभारी होते.

कृष्णाजी दत्तात्रय (१५–७) मृत्युसमयीं वय ४०. भार्या राधाबाई वय २५. माहेर नवरे (मुंबई). कन्या (१) गंगू वय १४.

मराठी ६ यत्ता व इंग्रजी ६ इयत्ता, व्यवसाय शेती.

वंशावळ नं. १६ पृ. २८० शाखा कऱ्हाड काले व गडहिंगलज.

रघुनाथ व्यंकटेश (१६–३) मृत. भार्या जानकी. कन्या–ताई घाटे. शिक्षण मॅट्रिकपर्यंत, सरकारी नौकरी, सांपत्तिक स्थिति मध्यम.

गणेश व्यंकटराव (१६–४) मृत्युसमयीं वय ३२. मृत्यु चैत्र वय ६ शके १८२६. भार्या–अन्नपूर्णा ऊर्फ साळु, माहेर लक्ष्मण नारायण मावळकर. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. पोस्ट खात्यांत नौकर.

* **नारायण व्यंकटराव** (१६–५) वय सुमारें ६०. भार्या आनंदी. माहेर पेंढारकर (कऱ्हाड). कन्या (१) गंगू–ठाकूर (विटे) (२) गोदावरी–सावरेकर (हैद्राबाद). शिक्षण साधारण. सुखवस्तु आहेत. व्यवसाय शेती. जमिनीचें वार्षिक उत्पन्न हजार रुपये.

यशवन्त गोविंद (१६–६) मृत्यु १०-१२-१९१५ भार्या (१) सरस्वति मृत. माहेर एकांडे (साकडे). कन्या (१) कृष्णा–विष्णु नारायण भाटे मुंबई. भार्या (२) सरस्वति–माहेर पाध्ये (उंब्रज) यांचे पुत्र रामचंद्र. भार्या (३) गंगाबाई माहेर–पेंढारकर (सातारा) कन्या अनसूया मृत. खेर (मुंबई) यांचे पुत्र शंकर यशवन्त. भार्या (४) यशोदा–माहेर तांबे (धावडशी) कन्या (१) कृष्णा (२) अनसूया. यांचे पुत्र सदाशिव यशवन्त व पांडुरंग यशवन्त.

यशवन्त गोविंद यांचें शिक्षण मराठी ७ यत्तेपर्यंत झालें होतें. वार्षिक उत्पन्न १५०० रु. होतें.

* **बाळकृष्ण रघुनाथ** (१६–७) वय ६५.

शिक्षण मॅट्रिकपर्यंत पोस्ट खात्यांत नौकरी. हल्लीं पेन्शन. सांपत्तिक स्थिति

चांगली. हैदराबाद संस्थानांतून सरंजामी पोलिटीकल पेन्शन रु. ३०० मिळतें. मुक्काम गडहिंगलज.

* **भास्कर रघुनाथ** (१६-८) वय सुमारें ३५.

इ. स. १९०० च्या सुमारास छायाचित्रकलेच्या धंद्यांत शिरून उत्तम फोटोग्राफर (B. R. Gune) म्हणून पुण्यांत ख्याति मिळविली व २५-३० वर्षांत सुमारें पाऊण लाख रु. मिळविले. ते पाऊण लाख रुपये पुढें वैद्यकीय संशोधनांत खर्च केले. हिंवताप, कॉलरा, नारु इत्यादींवर गुणकारक पेटंटें तयार केलीं. केवळ आपल्या बुद्धिवैभवानें या शास्त्रांत प्रवेश केला. या पेटंटाचे संशोधनाबद्दल १९२५ सालीं पूना मर्चंटस् असोसिएशनतर्फे यास १२०० रु. ची थैली जाहीरसत्कार करून अर्पण करण्यांत आली. पुणें येथें भरलेल्या मॅन्युएल आर्ट सोसायटीचे प्रदर्शनांत त्यांचे औषधांचे अनेक प्रयोग करून ते यशस्वी झाल्यामुळें पुण्याचे कलेक्टर मि. मॉउन्टफोर्ड यांनीं त्यांना सुवर्णपदक देऊन गौरव केला. ठिकठिकाणचे लोकल बोर्डांना यांनीं आपलीं औषधें अत्यल्प किंमतीनें दिलीं. व गरीब जनतेला विनामूल्य औषधें देऊन त्यांचेवर उपकार केले आहेत. त्यांच्या संशोधनाबद्दल दे. भ. सुभाषचंद्र बोस, शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी, डॉ. मुंजे, भडकमकर इ. निरनिराळ्या क्षेत्रांतील प्रसिद्ध पुढाऱ्यांनीं त्यांचा गौरव केला आहे. इ. स. १९४० दिनांक १२ सप्टेंबर रोजीं महाराष्ट्रीय जनतेतर्फे अध्यक्ष न्यायमूर्ति लोकूर यांनीं त्यांना मानपत्र दिलें आहे.

* **जनार्दन रघुनाथ** (१६-९) वय ६०. भार्या गंगा. माहेर हर्डीकर. कन्या-सुशीला (सातारा) (२) इंदू (३) प्रमिला (४) रत्नप्रभा लहान असून शिकतात.

मॅट्रिकपर्यंत शिक्षण. पेटंट औषधांचे डॉक्टर. सांपत्तिक स्थिति चांगली.

* **अनंत ऊर्फ बाबूराव बाळकृष्ण** (१६-१०) वय ३५.

एल्. सी. पी. एस. आहेत. गडहिंगलजला प्रॅक्टीस, दरमहा ४००-५०० रु. उत्पन्न. विशेष माहिती मिळाली नाहीं.

* **कमलाकर जनार्दन** (१६-१२) अविवाहित. एल्. सी. पी. एस. च्या शेवटच्या वर्गात शिकत आहेत.

वंशावळ नं. १७, पृ. २८१ पहा. कऱ्हाड कालेशाखा

* **महादेव गणेश** (१७–१) ज. श. १८१८, कार्तिक वद्य ९. २९-११-१८९६. भार्या–सुशीला. मनोहर नवरे (सातारा), कन्या (१) कुसुम–भागवत (मुंबई). (२) मालती, वय १७. (३) गंगू, वय १३. (४) सिंधू, वय ११. (५) कमला, वय ८. सर्वजणी शिकत आहेत.

मुंबई विश्वविद्यालयाचे बी. ए. फर्ग्युसनमधून. सरकारी नोकरी. शाळाखात्यांत क्लार्क. मु॥ पुणें. उत्पन्न सुमारें १५००. विमा व प्रॉव्हिडंड फंड.

* **कृष्णाजी गणेश** (१७–२) महाबळेश्वर क्लबमध्यें क्लार्क आहेत.

* **राजाराम नारायण** (१७–३) सोलापूरला मिलमध्यें नोकर आहेत.

* **दत्तात्रय नारायण** (१७–४) अहमदाबादला मिलमध्यें नोकर.

* **श्रीराम नारायण** (१७–५) मुंबईस कोहिनूर मिलमध्यें नोकर.

* **अच्युत नारायण** (१७–६) इंग्रजी ६ वी शिकत आहेत.

* **श्रीवत्स महादेव** (१७–७) ज. २०-१-१९२०. एल. सी. पी. एस. च्या शेवटच्या वर्षांत पुण्यास शिकत आहेत.

* **मधुसूदन महादेव** (१७–८) ज. १-१०-१९२५. इंग्रजी ३ री मध्यें आहेत.

वंशावळ नं. १८, पृ. २८१ पहा. शाखा कऱ्हाड काले

* **रामचंद्र यशवन्त** (१८–१) वय ५४. भार्या–सीता, माहेर आगटे (सातारा). कन्या (१) इंदू–मृत–शेणोलीकराकडे. (२) सुभद्रा–सातवळेकर (हुबळी). (३) कमल–महाजनी (सातारा). (४) कु. विमलाताई. १९४० त मॅट्रिक पास. १९४२ त धारवाड कॉलेजांतून सेकंड क्लास इंटर पास. हल्लीं पुण्यास बी. जे. मेडिकल स्कूलमध्यें एल. सी. पी. एस. फायनलचा अभ्यास करीत आहेत.

सब डिव्हिजनल ऑफिसर आहेत. वैद्यकीची माहिती चांगली. पगाराचें उत्पन्न २१०० व शेतीचें ३०० ते ५०० मुक्काम इस्लामपूर.

* **शंकर यशवन्त** (१८–२) वय ४४. भार्या–पार्वती–कानेटकर (देवराष्ट्र). कन्या वत्सला.

शिवणकाम उत्तम, प्राप्ती ६०० रु.

* **सदाशिव यशवन्त** (१८–३) ज. ९-१०-१९०१. भार्या गंगाबाई-माहेर आठल्ये (टेम्भू). कन्या (१) प्रमिला (२) तिलोत्तमा.

मॅट्रिक पास, नंतर ॲडव्होकेटची परीक्षा पास. हल्लीं कऱ्हाडास वकील. जमिनीचें उत्पन्न ६०० व प्राप्ती ६०० रु.

* **पांडुरंग यशवन्त** (१८–४) वय ३३. भार्या मालती, माहेर–भागवत. मॅट्रिक पास. मुंबईस कोहिनूर मिलमध्यें नोकर. उत्पन्न १२०० रु.

प्रकरण ६ वें

संकीर्ण

या प्रकरणांत संशोधनार्थ म्हणून एकूण पांच वंशावळी देत आहें. आवश्यक ती माहिती व जुनीं कागदपत्रें यांच्या अभावामुळें या प्रकरणांतील पांचहि वंशावळींतील गुण्ये व्यक्तींचा वृत्तान्त अपूर्ण स्वरूपांत लिहिला जात आहे.

या प्रकरणांतील एकंदर पांच वंशावळींपैकीं नं. १, २ व ३ या वंशावळींचा मूळ पुरुष एकच असून तो वं. नं. १ मधील आडिवरें शाखेचा मूळ पुरुष ' रामभट ' असावा असें दिसतें. तथापि तशा प्रकारची विशेष माहिती न मिळाल्यानें वं. नं. १, २ व ३ याहि पण स्वतंत्रच ठेवल्या आहेत. पुढील या वंशावळींचे संबंधींचे विवरण वाचतांना हें लक्षांत येईल.

वं. नं. ४ व ५ या अगदींच स्वतंत्र आहेत.

पुढें देत असलेली वंशावळ नं. १ ही आडिवऱ्याची (ता. राजापूर) 'मोगरे' म्हणून एक वाडी आहे, तेथील गुण्ये घराण्याची आहे. ही वंशावळ फक्त ना. व त्र्यं. येथील लेखांच्या आधारानेंच तयार केली आहे. या वंशावळीसंबंधीं जुनीं कागदपत्रें मिळालीं नाहींत. या वं. नं. १ पैकीं सातव्या पिढीचे दामोदर बाळकृष्ण गुणे हे कांहीं थोड्या वर्षांपूर्वी आडिवऱ्यास होते; पुढें ते निवर्तले असें समजलें. हल्लीं गोपाळ महादेव गुणे म्हणून राजवाडी (आडिवऱ्याचीच एक वाडी) स आहेत. तेहि आपलें मूळ गांव आडिवरें–मोगरेच सांगतात. त्यांची वं. नं. २ ही पुढें देत आहें. ही वं. नं. २ ही वं. नं. १ मधील सातव्या

पिढीचे महादेव धोंडो गुणे येथें जोडतां येईल. परंतु विशेष आधाराच्या अभावीं तशीच ठेवली आहे. ग्वाल्हेरास लक्ष्मण गोपीनाथ गुणे म्हणून आहेत, तेहि पण आपलें मूळ गांव आडिवरें–मोगरेच सांगतात. त्यांची वं. नं. ३ पुढें देत आहें. वं. नं. ३ ही वं. नं. १ मधील सहाव्या पिढीचे केशव शिवराम गुणे येथें जोडतां येईल. परंतु तसें करण्यास विशेष आधार नाहीं.

वं. नं. १ मधील पांचव्या पिढीचे नारायण बाळंभट गुणे यांनीं नाशिकची यात्रा केली असून त्या लेखांत मूळ गांव चांफेट असल्याचा उल्लेख केला आहे. त्यांनीं त्र्यंबकेश्वरचीहि पण यात्रा केली आहे. लेख तेथील कऱ्हाड्यांचे त्या वेळचे उपाध्ये बेजेकर यांच्याकडे दिला आहे. सध्यां त्या वह्या वे० पाटणकरांकडे आहेत. त्यांत अस्सल लेख उपलब्ध झाला नाहीं. नामावळींत चांफेटचा उल्लेख नाहीं. त्यांचा ना. या. चा ले. याप्रमाणें—" लिखितं नारायणभट्ट गुण्ये पिते बाळंभट आजे लक्ष्मणभट पणजे हरभट चुलते वासुदेवभट बंधु त्रिंवकभट चुलत बंधु शिवरामभट व केशवभट व नरसीभट व निलकंठभट पुत्र बाळकृष्णभट्ट चुलत बंधूचे पुत्र रामकृष्ण रामचंद्र वतनी गांव चांफेट महाल कसबे पांवस प्रांत राजापूर हल्लीं वस्ती आडिवरे महाल राजापूर. शके १७०० विलंबी नाम संवत्सरे कार्तिकमासे वद्य १" (वही नं. ११ पान १४ वे. चि. ज. भडकमकर नाशिक).

वंशावळ नं. १ मधील इतर मंडळींनींहि ना. त्र्यं. च्या यात्रा केल्या आहेत, परंतु मूळ गांव चांफेट असा उल्लेख केला नसून 'आडिवरें' असाच उल्लेख केला आहे. या वंशावळींतील फक्त दोनच व्यक्तींनीं म्हणजे, (१) चौथ्या पिढीचे हरि लक्ष्मण गुणे यांनीं त्यांच्या त्र्यं. येथील बेजेकरांना दिलेल्या लेखांत मूळ गांव चांफेट असल्याचा उल्लेख केला आहे. हा उल्लेख नामावळींत आहे. अस्सल लेख उपलब्ध नाहीं. (२) दुसरी व्यक्ति म्हणजे पांचव्या पिढीचे नारायण बाळंभट गुणे यांनीं ना. च्या लेखांत वर आल्याप्रमाणें मूळ गांव चांफेट असल्याचा उल्लेख केला आहे.

वरील दोन उल्लेख जर बरोबर असतील तर मग या प्रकरणांतील वं. नं. १, २ व ३ या पांचव्या प्रकरणांतील चांफेट शाखेच्याच उपशाखा मानाव्या लागतील. परंतु तसें करण्यास विशेष कागदपत्रें मिळालीं पाहिजेत. सध्यां तरी या तिन्ही वंशावळी स्वतंत्रच ठेवाव्या लागत आहेत.

पिढी नं. | वंशावळ नं. १]

आडिव्रे-मोगरे शाखा

१ रामभट
२ हरभट
३ लक्ष्मणभट ना. या.
४ हरि [ना. या. श. १६७६ (७-३०) व त्र्यं.या. 'लेखांत मूळ गांव चांफेट'] — बाळंभट — वासुदेव
५ (हरि यांचा) शिवराम ऊर्फ राम; (बाळंभट यांचे) नारायण, लक्ष्मण ना.या., त्रिंबक; (वासुदेव यांचे) केशव, नरसिंह (०), नीलकंठ (०)
६ (शिवराम यांचे) रामकृष्ण ना.या. (१८-२७), केशव, त्रिंबक; (नारायण यांचा) बाळकृष्ण; (लक्ष्मण यांचा) रामचंद्र; (त्रिंबक यांचे) हरि, धोंडभट +अंबा [ना. या. श. १७६४ (२१-१४)]; (केशव यांचे) सीताराम, रामचंद्र, शिवराम
७ (रामकृष्ण यांचे) हरि, भिकाजी ना.या. (२१-११) व त्र्यं.या.; (बाळकृष्ण यांचा) दामोदर; (धोंडभट यांचा) महादेव (अंबाबाईच्या ले. याचा उल्लेख आहे.)

[कंसांतील अंक अनुक्रमें नाशिक येथील वा. चिं. ज. भडकमकर यांच्या वहीचा अनुक्रम नं. व तींतील पानांच्या नंबरचे आहेत.]

सातव्या पिढीचे दामोदर बाळकृष्ण हे ५, ६ वर्षांपूर्वी आडिवरें येथें भिक्षुकी करीत असत. पुढें ते निवर्तले. यांना कन्या (१) सुंदरा भ्र.॥ दत्तात्रेय हरि देव, धारवाड. (२) ठकू, भ्र.॥ गंगाधर दत्तात्रेय देव यांचे मावस बंधु यास दिली होती. उभयतां कन्या निवर्तल्या. ही माहिती व. नं. २ मधील रामचंद्र गोपाळ गुणे मु॥ राजवाडी यांनीं कळविली.

सातव्या पिढीचे भिकाजी रामकृष्ण गुणे हे महाडला राहत असावे असें त्यांच्या ना. व त्र्यं. च्या लेखांवरून दिसतें. विशेष माहिती उपलब्ध नाही.

वंशावळ नं. २—

आडिव्रे राजवाडी शाखा-रामचंद्र गोपाळ गुणे
मु॥ राजवाडी यांच्याकडून आलेली वंशावळ

धोंडदेव
|
महादेव
|
गोपाळ—बाळकृष्ण गोविंद हर्डीकर दत्तक आले.
|
शंकर | **रामचंद्र** (राजवाडी) | **लक्ष्मण**

वं. नं. २ संबंधीं माहितीः—

* **गोपाळ महादेव**—जन्म शक १७०१ मार्गशीर्ष. भार्या, सरस्वति-द्वारका-माहेर नारायण गोपाळ गुर्जर, भालावली ता. राजापूर, जन्म श. १८१७; विवाह श. १८२७, साक्षर आहेत.

वेदाध्ययन संहिता ब्राह्मणापर्यंत, धंदा भिक्षुकी, हे महादेव धोंडदेव गुण्यांनीं दत्तक घेतले. पूर्वीचें नांव बाळकृष्ण गोविंद हर्डीकर. दत्तक मातोश्रींचें नांव जयंतीबाई, महादेव गुणे श. १८३८ च्या सुमारास वारले.

* **शंकर गोपाळ**—जन्म श. १९३२ माघ. भार्या, वनमाला-इंदू-माहेर प्रभाकर महादेव गुर्जर-भालावली, ता. राजापुर. विवाह श. १८६२. साक्षर आहेत. व्यवसाय शेती.

* **रामचंद्र गोपाळ**—ज. श. १८३५ फाल्गुन, व्यवसाय शेती. सांपत्तिक स्थिति मध्यम.

लक्ष्मण गोपाळ—ज. श. १८३८ व मृत्यु श. १८४४.
सर्वजण राजवाडीस असतात.

वंशावळ नं. ३, आडिवे ग्वाल्हेर शाखा

लक्ष्मण गोपिनाथ गुण्ये यांचे चिरंजीव विश्वनाथ लक्ष्मण गुण्ये यांनीं पाठविलेली वंशावळः—

* केशव
|
* हरि
|
गोपिनाथ–मूळ गांव आडिवे

- गणपतराव — ना.या.
- रामचंद्र
  - पुरुषोत्तम
    - दिनकर
- लक्ष्मण
  - विश्वनाथ (ग्वाल्हेर)
- विष्णुपंत — ना.या.

* या चिन्हानीं दाखविलेले दोन पुरुष ग्वाल्हेरच्या वंशावळींत नाहींत ते नाशिक येथें तीर्थयात्रेस गेले असतांना विष्णु गोपिनाथ गुण्यांनीं श. १८४३ चे. कृ. १२ स दिलेल्या लेखाच्या आधारानें दिले आहेत.

वंशावळ नं. ३ माहिती

गोपिनाथपंत गुण्येः—ज. इ. स. १८१७ संवत् १८७४. मृत्यु इ. स. १८६७ संवत् १९२४. भार्या–कृष्णाबाई, कन्या–गंगू–सखू+शिवराम पेंढारकर–उज्जैन.

शिक्षण फक्त मराठी व मोडी वाचनापुरतें झालें होतें. सर्व ऋग्वेद पाठ. दशग्रंथी विद्वान्, सर्व प्रकारचें लढाईचें शिक्षण अवगत होतें. सैन्यांत नौकरी व शेती करणें हा व्यवसाय; राज्याची सेवा केली. २, २॥ हजार दंड-

बैठका. सांपत्तिक स्थिति उत्तम. दक्षिण हिंदुस्थान व थोडा उत्तर हिंदुस्थान पाहिला. वार्षिक उत्पन्न २००० रु.

गणपतराव गोपिनाथः—ज. १८५९ स.; संवत् १९१६; मृत्यु सन १९१४; संवत् १९७२ भार्या—सरस्वतीबाई.

व्ह. फा. पर्यंत शिक्षण. उत्तर हिंदुस्थान, कोंकण व महाराष्ट्र पाहिला. ग्वाल्हेर स्टेटची सरकारी नौकरी केली. व्यायाम घेत असत, गाणें येत होतें. हे परोपकारी होते; ब्राह्मणभोजनें करण्याचा शोक होता. केशराच्या कढ्या, घीवर वगैरे पंचपक्वान्नांच्या ५०० लोकांच्या पंक्ति केल्या. बनारस—काशी, ग्वाल्हेर, ब्रह्मावर्त येथें ब्राह्मणभोजनें करण्यांत यांचा फार लौकिक झाला. ग्वाल्हेरास निरनिराळ्या उद्योगांत पैसा गुंतविला. वार्षिक उत्पन्न १२०० रु. होतें. आपट्यांची पायगा लष्कर ग्वाल्हेर येथें राहत असत. यांनीं शके १८६१ मध्यें ना. या. केली व पुढीलप्रमाणें लेख दिला आहे.—'गणपतराव गोपिनाथ पितामह हरभट प्रपितामह केशवभट, चुलते दामोदरभट व विश्वनाथभट बंधु, रामचंद्र व लक्ष्मण व विष्णुपंत, पुतणे पुरुषोत्तम इत्यादि. नांव गुणे, राहणार मोगरे कशेलीजवळ, ता. राजापूर; ग्वाल्हेर लष्कर.

रामचंद्र गोपिनाथः—ज. सन १८६४ संवत् १९२१; मृत्यु सन १९२१ संवत् १९७६. यांचें शरीर छान होतें; विशेष माहिती मिळाली नाहीं.

लक्ष्मणराव गोपिनाथः—वय भार्या—राधाबाई. माहेर विनायकराव गोळवलकर, झाशी.

हे मराठी व संस्कृत बरेच शिकले आहेत; गणिताबद्दल प्रसिद्ध आहेत. यांनीं उत्तर हिंदुस्थान पाहिला. दक्षिणेंत फक्त महाराष्ट्र पाहिलें. सरकारचे नौकर होते. आखाडेबाजी व कुस्तीची आवड. दोन अडीच हजार दंड-बैठकांची तालीम होती. कुस्तींत प्रसिद्ध आहेत. कुस्तीमुळें यांचा डावा हात अधू झाला आहे. सांपत्तिक स्थिति मध्यम, मुक्काम आपट्यांची पायगा, लष्कर ग्वाल्हेर.



(१) लक्ष्मण (२) लक्ष्मण गोपिनाथ

***विष्णु गोपिनाथः**—वय एक मुलगी, अंबू ऊर्फ पार्वती आहे. वैदिक शिक्षण. सर्व हिंदुस्थानचा प्रवास केला. हल्लीं अमृतसर येथें आहेत. यांनीं श. १८४३ चै. कृ. १२ स ना. या. करून पुढील लेख दिला आहेः— " विष्णु गोपिनाथ, आजे हरि केशव, बंधु लक्ष्मण, पुतणे पुरुषोत्तम रामचंद्र. गांव लष्कर. "

***पुरुषोत्तम रामचंद्र गुण्येः**—जन्म संवत् १९९० (?). मॅट्रिक पास, सरकारी नौकर आहेत, उत्तरचा प्रवास. स्थिति मध्यम. माहिती पाठविली नाहीं.

विश्वनाथ लक्ष्मण गुण्येः—जन्म १९२६ इ. स. इंग्रजी ६ वी शिकत आहेत, पहिल्यापासून पहिला नंबर आहे. फिडलमध्यें स्टेट दरबारांत तिसरा नंबर. शरीर उत्तम; स्पोर्टस्मध्यें बक्षिसें मिळालीं.



विश्वनाथ लक्ष्मण

वंशावळ नं. ४ सासवड-पुणें शाखा

पुढें देत असलेली सासवड-पुणें शाखेची वंशावळ खालीं देत असलेल्या नाशिक येथील ४ लेखांचे व तसेंच त्र्यंबकेश्वर व काशी येथील लेखांच्या आधारें तयार केली आहे. डॉ. धोंडो नारायण गुणे, पन्ना, यांनीं पाठविलेली वंशावळ यांत त्यापूर्वीची माहिती घालून लेखांचे आधारें सुधारली आहे. स्त्रियांचीं नांवें ना. त्र्यं. येथील लेखाधारें घातलीं आहेत. रघुनाथ सदाशिव यांच्या का. या. लेखांत आजे विठ्ठल असा उल्लेख आहे.

नाशिक येथील या शाखेचे कांहीं लेखः—

वं. नं. पा. नं.

१-३३ महादेवभट पिते दादंभट आजे गणेशभट चुलते नारायणभट उ० नांव गुणे गांव खेडे सुभा सांबर्डे.

२-४ नारायणभट पिते गणेशभट आजे महादेवभट बंधु दादंभट पुत्र महादेवभट उपनांव गुणे गांव खेडे सुस, सासवड-पुणें. हा लेख श. १६५० तील आहे.

२९-१३६ राघो सदाशिव आजे बापूजीपंत पणजे महादेव पुत्र नारायण मा. पार्वती आ. लक्ष्मीबाई पणजी पार्वतीबाई उपनांव गुणे गांव पुणें शहर; हा लेख श. १७८५ मधील आहे.

३८-४९ नारायण रघुनाथ आ. सदाशिव बापूजी प. महादेव पुत्र धोंडोपंत व रघुनाथ ऊर्फ अप्पा स्त्री लक्ष्मी-उपनांव गुणे गांव पुणें हल्लीं उज्जैन.

पिढी नं. सासवड-पुणें शाखेची वंशावळ:—

१ महादेवभट गुणे, मूळ पुरुष, मूळ गांव खेडें

२ गणेश

३ दादंभट — नारायणभट ना. या. श. १६५०, गांव खेडें, सुरू सासवड (अस्सल लेख आणला आहे.)

४ महादेव+पार्वती–गांव खेडें, सुभा सांबर्डे (प्रांत परशुराम, सुखवास सासवड ८-३० ना. या.) ना. या.

५ बापूजी ऊर्फ विठ्ठल+साळूबाई व लक्ष्मी — काशिनाथभट

६ सदाशिव+पार्वती ना.या. (१६-७१) — राघोपंत

७ रघुनाथ (काशि व ना. या.) — रामचंद्र

८ * नारायण ना. या. (अडविलेकर पंडित घराण्यांतील दत्तक)

पिढी नं.

८ * नारायण रघुनाथ

९ धोंडदेव (पन्ना संस्थान) — रघुनाथ

१० श्रीकृष्ण (पन्ना संस्थान)

वंशावळ नं. ४ माहितीः—सासवड-पुणें शाखेची माहिती

बापूजी ऊर्फ विठ्ठल महादेव—भार्या-साळु व लक्ष्मीबाई; हे इ. स. १७९७-९८ च्या सुमारास दुसऱ्या बाजीरावाचे मुलकीकडील नौकर होते असा उल्लेख २ ऱ्या बाजीरावाचे रोजनिशींत आहे. 'व्यापार हुंडी वगैरेचा धंदा व पुण्यास बुधवार पेठेंत किब्यांचे वाड्यांत रहात' अशी माहिती यांचे निपणतू डॉ. धोंडो नारायण गुणे, पन्ना, यांनीं कळविली आहे. यापुढील सर्व माहिती डॉ. धोंडो नारायण यांच्या पत्राप्रमाणें, व कांहीं थोडी उपलब्ध झाली ती मिळून देत आहें:—

सदाशिव बापूजीः—(पिढी नं. ६) भार्या-पार्वती. धंदा व्यापार हुंडी वगैरे वस्ति पुणें. कै. राघो नारायण गुण्ये, दिवडकर इनामदार यांचें जुनें दप्तर. त्यांचे वंशज रा. दत्तात्रेय विश्वनाथ गुण्ये, पुणें, यांच्याकडे आहे त्यांच्या कांहीं कागदांतून शके १७५८ च्या सुमारास यांच्या नांवाचा उल्लेख आला आहे.

रघुनाथ सदाशिवः—(७) व्यापार, सराफी वगैरे धंदा, पुणें.

नारायण रघुनाथः—(८) वयाच्या ८२ वर्षी मृत्यु पावले. भार्या-लक्ष्मी, माहेर कृष्णाजी वासुदेव शहाणे-अहमदनगर, कन्या-(१) काशीताई, बडोद्याच्या किब्यांच्या घराण्यांत दिल्या. (२) बबूताई-लवाटयांच्या घराण्यांत दिल्या-पुणें. (३) मथुताई+रामचंद्र सिद्धेश्वर देव-पुणें. (४) सखुताई+डॉ. W. R. भट L. R. C. P. D. P. H. उमरावती.



हे पुण्यास एलिनेशन ऑफिसमध्यें नौकर होते पुढें पेन्शन घेतलें. हे अडविलेकर पंडित घराण्यांतील दत्तक होत.

नारायण रघुनाथ

***धोंडो नारायणः**—(९) वय ६३. भार्या-(१) नाशिकचे भडकमकर घराण्यांतील. भार्या-(२) अहंमदनगरच्या किबे घराण्यांतील. कन्या-(१)

सोनू–कोल्हापूरच्या सरदेसायांस दिल्या. (२) लिलाताई, आगटे घराण्यांत दिल्या; सातारच्या राममंदिराचे मालक. (३) कुमारी नलिनी वय १० शिकत आहे.

इन्स्पेक्टर ऑफ डिस्पेन्सरीजचा व्यवसाय होता. हल्लीं पेनन्शन घेतलें आहे.

रघुनाथ नारायणः—(९) मृ. व. १८ वर्षी इन्टर झाले होते.

***श्रीकृष्ण धोंडोः**—(१०) वय १५ वर्षे, अविवाहित. मॅट्रिक शिकत आहेत. सर्वजण पन्ना संस्थानांत असतात.

वंशावळ नं. ५ शिरगांव इंदूर शाखा

पिढी नं.			
१	सोमनाथभट मूळपुरुष		
२	काशिनाथभट		
३	रामभट ना.या.–मूळगांव शितेवेळंब (शिरगांव प्रांत दाभोल त्र्यं.लेखांत)		
४	* पांडुरंगभट	विश्वनाथभट	बाळंभट–नाशिक
५	जनार्दनभट त्र्यं. या.		त्र्यंबकभट ० त्र्यं. या.
६	चिंतामणभट		
७	पांडुरंगभट–इंदूर त्र्यं. या.		
८	+ गणेशभट		

* चौथ्या पिढीचे पांडुरंगभट व बाळंभट हे श. १६९९ त नाशिकचे, जनस्थानचे, तीर्थोपाध्ये होते असे गुण्यांचे ना. उपाध्ये रा. भडकमकर यांच्या वह्यांवरून दिसतें.

+ गणेशभट यांनीं इंदूरहून संवत् १९३५ त काशीयात्रा करून तेथें (काशीस) गुण्यांचे उपाध्ये रा. कात्रे यांच्याकडे लेख दिला आहे त्यांत ' इंदूर तोफखाना ' असा पत्ता आहे. यांचेसंबंधीं माहिती मिळण्याचा संभव आहे.

ही वंशावळ, नाशिक, त्र्यंबकेश्वर व काशी येथील लेखांचे आधारानें तयार केली आहे. या वंशावळीपैकीं आज कोणी हयात आहे किंवा कसें हें कांहीं कळत नाहीं.

प्रकरण ७ वें

सामान्य विचार

या प्रकरणांत गुण्यांचें कऱ्हाडे ब्राह्मणांतील स्थान, व्यवसाय, शिक्षण, वयोमान इत्यादि सर्वसामान्य गोष्टींचा विचार करावयाचा आहे. या प्रकरणांतील अनुमानें कऱ्हाडेच काय पण सर्व ब्राह्मणसमाजाचे दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत.

कऱ्हाड्यांतील गुण्यांचें स्थान

१ संख्या

इ. स. १९३१ मध्यें मुंबई इलाख्यांतील (देश, कोंकण आणि हैद्राबाद सोडून देशी संस्थानें) कऱ्हाडे ब्राह्मणांची लोकसंख्या २५१९६ होती, ती गेल्या दहा वर्षांत थोडीफार वाढली असण्याचा संभव आहे. अखिल भारतांतील कऱ्हाडयांची लोकसंख्या ४० ते ५० हजारांपेक्षां ज्यास्त नसावी. उत्तर हिंदच्या खानेसुमारींत ब्राह्मणांच्या पोट जातींचा उल्लेख नसल्यानें मुंबई इलाख्यांतील लोकसंख्येवरूनच कऱ्हाडयांची एकंदर लोकसंख्या काढणें भाग पडतें.

कऱ्हाडयांची शुद्ध गोत्रावळी बहुत परिश्रमानें कै. जनार्दन हरि आठल्ये, इनामदार शिपोशी, ता. रत्नागिरी यांनीं शके १७९० त तयार केली. तीवरून पाहतां कऱ्हाडयांचीं एकंदर आडनांवें ५४५ आहेत असें दिसतें. कऱ्हाडयांची आजची लोकसंख्या ४५ हजार धरल्यास एका उपनांवाच्या स्त्री-पुरुषांची संख्या ८० असावी व पुरुषव्यक्तींची संख्या सुमारें ४० असावी.

कऱ्हाड्यांचे आजपर्यंत फक्त दोनच इतिहास छापले गेले आहेत. त्यांत रा. वि. वा. आठल्यांनीं त्यांच्या इतिहासाचे प्रस्तावनेंत म्हटलें आहे कीं, आठल्यांचीं सुमारें ६० ठिकाणीं २०० कुटुंबें नांदत आहेत. यावरून आठल्यांच्या घराण्यांतील पुरुषव्यक्तींची संख्या २५० पेक्षां जास्त भरेलसें वाटत नाहीं.

दुसरा इतिहास सरदेसायांचा. यांनीं अशा प्रकारचा उल्लेख कोठेंच केला नाहीं. तरी हें घराणें बरेंच मोठें असल्यानें ३००, ३५० पेक्षां जास्त पुरुष-व्यक्ति भरतीलसें वाटत नाहीं. सरदेसायांचा इतिहास हा, मावळंकर, सरदेसाई व लळित अशा तीन घराण्यांचा मिळून आहे हें महत्त्वाचें आहे. हीं तिन्ही घराणीं एकच आहेत. गुण्ये घराण्यांतील लहानापासून ते थोरापर्यंत, पुरुष-व्यक्तींची संख्या १९६ आहे.

वर आलेल्या तीन घराण्यांतील पुरुष-व्यक्तींची संख्या आणि एका आड-नांवाच्या सुमारें ४० पुरुष-व्यक्ति असाव्यात या अनुमानावरून, कऱ्हाड्यांचीं जीं एकंदर ५४५ आडनांवें वरील गोत्रावळींत आलीं आहेत, तीं आज त्याच प्रमाणांत समाजांत प्रचलित असतील काय, अशी शंका येते. याबद्दल थोडासा विचार करितां येईल.

एका आडनांवाच्या साधारण ४० पुरुष-व्यक्ति धरल्यास वरील आडनांवां-पैकीं बरींच आडनांवें आज प्रचलित नसावींत. कारण खेर, भागवत, पंडित, पाध्ये, मावळंकर इत्यादि घराण्यांचा विस्तार फारच मोठा असावा असें दिसतें. असें असल्यास मग प्रत्येक आडनांवाच्या वांट्यास किती पुरुष-व्यक्ति येतील? कदाचित् मुळांत एक नांव असून नंतर त्यांतून पुन्हां अधिक उपनांवें निघालीं असावींत; हा प्रकार कांहीं घराण्यांचे बाबतींत सध्यांसुद्धां दिसून येईल. वरील गोत्रावळी प्रत्यक्ष वाचून पाहतां सुद्धां, तींतील बरींच नांवें आज प्रचलित नाहींत असें दिसून येईल. वरील बहुसंख्य घराण्याचे इतिहास झाल्याशिवाय निश्चित अनुमानें करतां यावयाचीं नाहींत.

गुण्ये घराण्यांत आज १९६ पुरुषव्यक्ति ३८ ठिकाणीं विभागलेल्या आहेत. वरील विवेचनावरून या घराण्याचा विस्तार मध्यम प्रतीचा आहे असें म्हणतां येईल.

२ उपनांवाचा काल

सामान्यतः उपनांव अगदीं अलीकडच्या काळांत सुरू झालें असल्यास व्यक्तींची संख्या फारच अल्प असण्याचा संभव असतो. वरील विवेचनांत गुण्यांचा विस्तार मध्यम प्रतीचा आहे हें सिद्ध झालें आहे. तेव्हां सर्वसाधारण दृष्टीनें पाहतां, उपनांवें सुमारें ७०० ते ८०० वर्षांपासून सुरू झालीं असें

मानल्यास हें उपनांव गेलीं ५०० वर्षें तरी प्रचलित असावें. मावळंकर या उपनांवाचा काल ९०० वर्षांपूर्वीचा आहे, आणि या उपनांवाचीं पुन्हां उप-उपनांवें झालीं आहेत. त्र्यंबकेश्वराच्या श. १६११ तील लेखांत गुण्ये या उपनांवाचा जुन्यांत जुना लिखित उल्लेख सांपडतो; त्याचप्रमाणें चांफेटच्या जुन्या कागदांतून (२०० वर्षांपूर्वींच्या) उपाध्ये व पाध्ये असें नांव आढळून येतें; चिमणाजी गोविंद गुण्ये शाखा चांफेट यांनीं नाशकास दिलेल्या लेखांत (वहि १०, पान ३३ नाशिकचे लेखाची) पणजे कृष्ण पाध्ये असा उल्लेख केला आहे. लेख कार्तिक वा॥ ८ श. १६९९ चा आहे. उपाध्ये लिहून नंतर उपनांव 'गुण्ये' असेंहि कांहीं कागदांतून आहे. हा उल्लेख ज्या कागदांतून येतो ते कागद २०० वर्षांपूर्वी लिहिले आहेत; परंतु ज्या संदर्भांत हा उल्लेख येतो तो काळ ५०० वर्षांपूर्वीचा आहे; गुण्यांच्यापैकींच कांहीं पुराणिक नांव लावत असल्याचा उल्लेख नाशिकच्या एका लेखांत होता. त्याची चर्चा या खंडाच्या आरंभास केली आहे. पाध्ये व पुराणीक हीं नांवें व्यवसायाचीं असावींत. शेवटीं एक महत्त्वाची गोष्ट लिहिली पाहिजे ती ही कीं, गुण्ये हें शुद्ध व पुरातन नांव सोडून नुसतें "गुणे" असें निव्वळ सोईच्या दृष्टीनें नांव लावणें बरें नाहीं, असें वाटतें.

आज जिवंत असलेल्या १९६ व्यक्तींचीं ८५ प्रकारचीं नांवें आहेत. त्यांत बहुसंख्य नांवें येणेंप्रमाणें १६ आहेतः—

अनंत ५	यशवंत ४
केशव ४	रघुनाथ ५
गणेश ४	रामचंद्र ६
गोपाळ ५	वसंत ५
दत्तात्रेय ६	विनायक ४
नारायण ८	विष्णु ४
प्रभाकर ७	शंकर ५
मुकुंद ५	शरच्चंद्र ५

राहिलेलीं सुमारें ३६ नांवें एका नांवास एक व्यक्ति या प्रमाणांत आहेत. दत्तात्रेय हें नांव नव्यानें सुरू झालें आहे. त्यावरून लोकांची प्रवृत्ति दत्तो-

पासनेकडे होत आहे असें दिसून येईल. या दृष्टीनें सूचीचें बारकाईनें वाचन केल्यास बऱ्याच गोष्टी ध्यानांत येतील.

नव्यानेंच या घराण्यांत प्रचलित होत असलेलीं नांवें:—

अच्युत २	दिनकर ३	मुकुंद ५	शशिकांत १	श्रीहरि १
अरविंद १	पद्मनाभ १	मुरलीधर १	श्याम २	सदानंद १
अरुण १	पद्माकर १	रत्नाकर १	श्रीकांत १	सुधाकर १
आनंद ३	प्रकाश १	लक्ष्मीकांत १	श्रीनिवास २	निर्मल १
अविनाश २	प्रभाकर १	विजयकुमार १	श्रीपाद १	परशुराम १
अशोक २	भार्गव १	विद्याधर १	श्रीरंग २	
कमलाकर ३	मधुकर ३	वेणिमाधव १	श्रीराम ३	
गोपिनाथ १	मनोहर १	शरच्चंद्र ४	श्रीवत्स १	

प्रचारांतून मागें पडत असलेलीं नांवें:—

कृष्णाजी	बच्याजी	महादेवभट	सोमनाथभट
चिंतामण	बल्लाळ	रामाजी	कचेश्वर
महेश्वरभट	बापूजी	चिमणाजी	भटंभट
दादंभट	बाबदेव	वैजिनाथ	
दामोदर	भिकाजी	हरिहर	

३ व्यवसाय

पुढें देत असलेल्या आंकडेवारीवरून पाहतां गुण्यांचा मुख्य धंदा, वैद्यकी असल्याचें दिसून येईल. याशिवाय संगीत-तज्ज्ञ, व्यापारी व फोटोग्राफी वगैरे धंदे करणारे लोकहि बरेच आहेत. वैद्यकी या स्वतंत्र व्यवसायाचे बरोबरीनें नौकरी करणारे लोक दिसून येतील. औद्योगिक किंवा इतर कलात्मक धंद्यांकडे फारसें लोकांचें लक्ष नाहीं असें दिसून येईल. परंतु त्यांची आवश्यकता फार आहे. बरेच लोक शेती करून सुखवस्तु असल्याचें दिसून येईल.

मुख्य धंद्यांच्या दृष्टीनें शेंकडेवारी

धंदा	शेंकडेवारी
नौकरी	३४
स्वतंत्र धंदे	३५
शेती	१९
भिक्षुकी	१२
एकूण	१००

उद्योगधंद्याच्या दृष्टीनें निरनिराळ्या व्यवसायांची खुलासेवार माहिती:—

सरकारी नौकर		बिनसरकारी नौकर		स्वतंत्र		स्वतंत्र	
सरकारी नौकरी	७	खासगीकडे	४	आर्टिस्ट	२	शेती	२०
ऑडिटर	१	कंपाउंडर	१	वकील	२	किराणा दुकान	४
प्रोफेसर	१	गिरणींत	४	डॉक्टर	११	शिंपी काम	१
सेवानिवृत्त	८	कारखान्यांत	४	वैद्य	११	मोत्याचा व्यापार	२
मेजर	१	रेल्वेंत नौकर	१	भिक्षुकी व व्यापार	१३	योगशाळा	१
एकूण	१८	एकूण	१४	एकूण	३९	संगीत शिक्षक	४
						शिक्षक	१
						एकूण	३३

एकूण १०४

४ शिक्षण

गुण्ये घराण्यांत लहान मुलें ३३; प्राथमिक विद्यार्थी २५; दुय्यम (हायस्कूल) विद्यार्थी २४; कॉलेज विद्यार्थी ८ व वेदशास्त्राध्ययन करणारे २. एकूण मुलें व विद्यार्थी मिळून ९२ आहेत.

महाविद्यालयांतील शिक्षण घेण्यास कोंकणांतील विद्यार्थी उत्तम सांपत्तिक परिस्थितीचे अभावीं मुकलेले दिसतात. गुण्यांचेपैकीं $\frac{3}{8}$ व्यक्तींना हायस्कूलमधील शिक्षण (५–६ इयत्तेपर्यंत) मिळालें आहे असें दिसून येईल. इंग्लिश न

जाणते फारच थोडे लोक आढळतील. प्रत्यक्ष प्रवासामुळें या बाबतींत बरीच माहिती मिळू शकली.

विद्यमान पुरुष-पदवीधरांची संख्या सुमारें २३ आहे; यांत वैद्यकीय पदवीधर जास्त आहेत; वैद्यकांच्या निरनिराळ्या शाखांतील पदव्या संपादन केल्या आहेत. हें या घराण्याचें एक प्रकारचें वैशिष्ट्य आहे. यांत्रिक शास्त्रांतील पदवीधर कोणीच नाहींत असें म्हटलें तरी चालेल. गुण्ये हें उपनांव ह्या घराण्यांतील व्यक्तींच्या गुणांवरून पडलें आहे असें म्हणण्यापेक्षां या घराण्यांतील व्यक्ति दुसऱ्यास (वैद्यकींत रोग दूर करून) गुण देतात म्हणून पडलें असावें असें वाटतें.

पदवीधरांची आंकडेवारी

एम. बी. बी. एस.	३	बी. ए.	५
एल. सी. पी. एस.	२	बी. ए., एलएल. बी.	२
एच. एम. बी.	२	ॲडव्होकेट	२
एल. एम. ॲन्ड एस.	१	एम. ए.	१
आयुर्वेद-विशारद	३	बी. एससी.	३
			२४

स्त्रीशिक्षणः—अन्य घराण्यांतून गुण्यांच्या घराण्यांत आलेल्या नवीन पिढींतील स्त्रियांपैकीं बऱ्याच इंग्लिश जाणणाऱ्या आहेत. गुण्यांच्या सासुरवासिणींमध्यें सौ. वैजयन्ती गुणे याच यंदा पहिल्या पदवीधर होणार. यंदा त्या बी. ए. होतील. विशेष माहितीकरितां पृ. ३०७ पहा.

गुण्यांच्या घराण्यांतून अन्य घराण्यांत गेलेल्या स्त्रियांत डॉक्टर होण्याचा मान डॉ. मधुमालती गुणे (सुरू) यांनीं मिळविला.

सौ. मनु गुणे खंडकर (दत्तात्रेय गोपाळ ७-४ चांफेट यांच्या कन्या) यांना कोल्हापूर दरबारची 'पेटा' स्कॉलरशिप होती. यांच्याच भगिनी कु. शांताबाई गुणे १९४१ त मॅट्रिकला कोल्हापूर सेंटरला पहिल्या आल्या त्याहि पण 'पेटा' स्कॉलर होत्या. त्यांना शाळेंत व कॉलेजांत निरनिराळीं बक्षिसें मिळालीं आहेत. १९४३ त त्या इंटर सायन्स झाल्या व सध्यां पुण्यास बी. जे.

मेडिकल स्कूलमध्यें First L. C. P. S. चें शिक्षण घेत आहेत. सौ. शांताबाई गुणे—येखडेकर (कै. भालचंद्र दामोदर ९–३ चांफेट यांच्या कन्या) १९३९ मध्यें मॅट्रिकला संगमनेर हायस्कूलांत पहिल्या आल्या होत्या.

कु. विमल गुणे— (रामचंद्र यशवंत १८–१ चांफेट यांच्या कन्या) १९४० त मॅट्रिक झाल्या. १९४२ त धारवाड कॉलेजांतून सेकंड क्लास इंटर सायन्स. गेले वर्षी फर्स्ट एल्. सी. पी. एस्. पास झाल्या व सध्यां Final L. C. P. S. चा पुण्यास बी. जे. मेडिकल स्कूलमध्यें अभ्यास करीत आहेत.

कु. कुसुम गुणे (यशवंतराव लक्ष्मण ९–५, मठ च्या कन्या) १९४० मध्यें हुजुरपागेंतून मॅट्रिक झाल्या व मॅट्रिकचें 'दळवी संस्कृत प्राइझ' मिळविलें. १९४२ त सर परशुरामभाऊ कॉलेजांतून इंटर आर्टस्‌ला बसल्या व दुसऱ्या वर्गांत पास झाल्या.

गेल्या वीस वर्षांत स्त्रीशिक्षणाची वाढ फारच झपाट्यानें होत आहे. गुणे घराण्यांत, ज्यांना पोथ्या वाचण्याइतकें बालबोध येत नाहीं अशा फारच थोड्या स्त्रिया गेल्या पिढींत दिसून येतील. शहरांत राहत असलेल्या मुलींनीं कांहींना कांहींतरी दुय्यम शिक्षण संपादन केलेलें आढळून येईल. स्त्रीशिक्षणाची प्रगति झपाट्यानें होत आहे हें वरील विवेचनावरून दिसून येईल. कॉलेजांत शिक्षण घेत असलेल्या निदान दहा मुली तरी दाखवितां येतील. वरील यादींत फक्त स्कॉलर मुलींचाच उल्लेख आला आहे.

५ वसतिस्थानें

खालीं जिल्हेवार दिलेल्या वस्तीवरून पाहूं जातां गुण्यांची वस्ती कोंकणांत रत्नागिरी तालुक्यांत व देशावर पुणे जिल्ह्यांत जास्त आहे असें दिसून येईल. मुंबई इलाख्यांतील (पुढें देत असलेल्या कऱ्हाड्यांच्या वस्तीच्या आंकड्यांवरून) कऱ्हाड्यांची वस्तीसुद्धां कोंकणांत जास्त आहे, देशावरील वस्तीच्या दुप्पट आहे असें म्हटलें तरी चालेल. एकंदर हिंदुस्थानांतील कऱ्हाड्यांची वस्ती ३६ हजार धरल्यास कोंकणांत (रत्नागिरी जिल्हा) जवळजवळ १६ हजार लोकवस्ती आहे असें दिसून येईल. सातारा, कोल्हापूर, नगर, ग्वाल्हेर या भागांत गुण्यांची वस्ती बरीच आहे.

गुण्यांच्या प्रांतवार वस्तीचे आंकडेः—

रत्नागिरी	३६	खानदेश	२
पुणें	३२	सोलापूर	८
कोल्हापूर व इतर संस्थानें	३०	अहंमदनगर	२०
मुंबई बेट	९	मलाया	३
सातारा	३१	मध्यप्रांत	२२
नाशिक	३		

गांववार वस्ती याप्रमाणें आढळून येईलः—देशावर– पुणें, कोल्हापूर, कऱ्हाड व ग्वाल्हेर येथें आणि कोंकणांत– चांफेट, मठ, कुर्णे इत्यादि गांवीं जास्त वस्ती आहे.

गुण्यांची गांववार वस्तीः—

अहंमदनगर	८	बीना	२
अहमदाबाद	१	बेलापूर रोड	३
अमृतसर	१	भिलवडी	१०
आश्वी	१	मठ	११
इस्लामपूर	२	महाबळेश्वर	१
कऱ्हाड	१३	मलाया	३
कुर्णे	१०	मिरज	१
कोल्हापूर	२३	मुंबई बंदर	९
गडहिंग्लज	४	राजवाडी	३
ग्वाल्हेर	१२	राहुरी	४
घोडा	१	लोणावळा	१
चांफेट	६	वेरळ	५
चाळिसगांव	२	शिकारपूर	१
जयगड	१	संगमनेर	४
दिवड	२	सांगली	२
दिल्ली	१	सातारा	२
धार	२		
नाशिक	३		
पंढरपूर	८	एकूण	१९६
पन्ना	२		
पुणें	२८		
फलटण	३		

६ वयोमान

गुण्ये घराण्यांत जिवंत पुरुष-व्यक्ति = १९६, जिवंत जनक ६५ आणि आजे ८ आहेत. आश्वीकर गुण्यांमध्यें पणतू पाहणारे बरेच लोक होऊन गेले. कै. ती. बाबा गुणे, कोल्हापूर, यांनीं आपल्या दोन नातवांचीं मुलें पाहिलीं. त्यांच्या भगिनी कै. ती. बहिणाताई (बडोदे दरबारचे सर्जन कै. डॉ. रामचंद्रपंत तळवलकर यांच्या भार्या सुमारें ८६ वर्षें वयास मृत) यांनीं ८, ९ वर्षें वयाचे पणतू पाहिले. ती. बाबा परवां ४ महिन्यांपूर्वीं वयाच्या ८३ व्या वर्षीं निवर्तले. वर जे ८ आजे दाखविले आहेत, त्यांत निम्मे आश्वी शाखेपैकीं आहेत. त्यांत मुलींच्या बाजूनें पणजेसुद्धां आहेत. यांची संख्या तर पुष्कळच भरेल. गुण्ये घराण्यांतील पुरुषांचें सरासरी वयोमान ८० पर्यंत जातें. इतकेंच काय पण या घराण्यांतील स्त्रियांनासुद्धां हें वयोमान लागू करतां येईल हें वरील उदाहरणावरून उघड होत आहे. वयवारी येणेंप्रमाणें आहेः—

वय वर्षं	गुण्ये व्यक्तिसंख्या	वय वर्षं	गुणे व्यक्तिसंख्या
०- ५	२५	४१-४५	१६
६-१०	२५	४६-५०	९
११-१५	१८	५१-५५	५
१६-२०	२४	५६-६०	७
२१-२५	१६	६१-६५	८
२६-३०	१७	६६-७०	२
३१-३५	१३	७१-७५	५
३६-४०	५	७६-८०	१

७ विवाहसंबंध

इतर घराण्यांशीं लग्नव्यवहारामुळें झालेल्या सुमारें २०० विवाहांसंबंधांची माहिती या पुस्तकांत आली आहे. गुण्ये हे अत्रि गोत्री कऱ्हाडे ब्राह्मण होत. (गविष्ठर गोत्र सोडल्यास) अत्रि गोत्राचा सर्व गोत्रांशीं संबंध होऊं शकतो; अत्रि गोत्री कऱ्हाडे ब्राह्मणांची एकंदर ७७ नांवें आहेत. अर्थात् सगोत्र विवाह वर्ज्य असल्यानें यांच्याबरोबर विवाहसंबंध होणें शक्य नाहीं. (५४५-७७) ४६८ उपनांवांशीं संबंध होण्यास हरकत नाहीं. खालीं देत असलेल्या ८० उपनांवांशीं गुण्यांचे गेल्या २-३ पिढ्यांत शरीरसंबंध झाले आहेत. त्यांत खेर-मावळंकर, सरदेसाई, पंडित, भागवत, पाध्ये, खांडेकर या घराण्यांशीं पुष्कळच वेळां संबंध झाला आहे. तेव्हां हीं विस्तारानें बहुधा मोठीं असावीत, किंवा

महाराष्ट्रांत तरी यांचा बराच विस्तार असावा. तांबे, भाटवडेकर, गर्दे वगैरे घराणीं वरील घराण्यांच्या खालोखाल आढळून येतील.

वर उल्लेखिलेलीं ८० घराणीं सोडल्यास (४६८ – ८०) = ३८८. या घराण्यांशीं संबंध कां न व्हावा हें कळत नाहीं. कदाचित् तीं फारच अल्प असतील, किंवा त्यांपैकीं बरींच उपनांवें आज प्रचलित तरी नसावींत. याविषयीं या प्रकरणाच्या आरंभीं सविस्तर चर्चा केली आहे. पुढें देत असलेल्या घराण्यांशीं विवाहसंबंध झाले आहेत.

गुण्यांचे गेल्या दोन-तीन पिढ्यांत इतर घराण्यांशीं झालेले विवाहसंबंध

अध्ये १	गुर्जर ३	नारळीकर १	रायक १
आगटे ५	गुर्जर पुराणिक १	नावलेकर १	लुकतुके १
आगलेकर १	गोळवलकर १	पंडीत १०	वाडेकर १
आठल्ये ९	पाध्ये ७	पळसुले देसाई २	वेदांती १
आंबरडेकर ३	घाटे ३	पिंगे १	वैद्य १ (कोंकणस्थ इचलकरंजी)
एकांडे १	चांदोरकर २	पित्रे २	
कशालकर १	चुनेकर १	पुरोहित २	वैद्य (कोंकणस्थ) १
कांटदरे १	चौककर १	पेंडरकर ३	शहाणे २
कानेटकर ४	जोशी ७	फळणीकर १	शिरगांवकर १
कात्रे २	टिकेकर १	भट १	शेणोलीकर ३
कांबळे ऊर्फ कुळकर्णी २	टोळे १	भडकमकर १	शेवडे २
	ठाकूर २	भागवत १२	शोचे १
काशीकर १	डोंगरे १	भाटवडेकर ५	श्रीखंडे ३
किबे ४	ढवळे ३	भाटये ३	सरदेशपांडे १
किर्तने २	तळवलकर ३	भोपटकर १	सरवटे २
किरकिरे १	तांबे ५	मणेरिकर १	सातवळेकर २
किराणे १	दिक्षित २	महाजनी १	सावरेकर १
खडकर ३	देव ३	मावळंकर ३	हर्षे १
खांडेकर ९	देसाई ३	सरदेसाई ५	हळबे ८
खानवेलकर १	धामणकर १	लळीत २	हेरवाडकर
खेर ५	नवरे २	मिराशी १	२१२
गर्दे ६	नाके १	मोघे ४	

प्रकरण ८ वें

ऐतिहासिक व्यक्तींचीं चरित्रें

या प्रकरणांत अकारादि क्रमानें या घराण्यांत होऊन गेलेल्या ऐतिहासिक व्यक्तींचीं चरित्रें उपलब्ध माहितीच्या आधारें पुढीलप्रमाणें देत आहें.

कृष्णराव बल्लाळ गुणे (*१३-५ चांफेट, कार्ले-कऱ्हाड उपशाखा)

शाहूमहाराजांनीं यांना सरदार थोरात वाळवेकर यांच्या पागेवर नेमिलें होतें. यांचे बंधु हरि बल्लाळ गुण्ये व हे स्वतः पेशव्यांच्याबरोबर इ. स. १७५० नंतरच्या उत्तरेंतील स्वाऱ्यांत होते. हिंदुस्थानच्या स्वारींत ऐन प्रसंगीं थोरातांनीं पेशव्यांना मदत देण्याचें नाकारलें असतां या बंधुद्वयांनीं तीन लक्ष रुपये कर्ज उभारून पेशव्यांना मदत केली. त्या कर्जांतील सवा लक्ष कर्ज रावबाजीच्या कारकीर्दीस उरलें तेव्हां रावबाजीनें या शाखेंतील गुण्यांचीं सर्व वतनें जप्त केलीं (खं. १ ले. ८३ पहा).

इ. स. १७६३ च्या सुमारास यांच्याकडे सरदार पायगुड्यांच्या पागेची दिवाणगिरीची असामी होती; तिची नेमणूक नक्त १६९५।~ रु.यांची होती. यांना पालखीचा मान होता. पालखीकरितां सालीना हजार रुपये मिळत (खं. १ ले. १०६ पहा).

शिंदेशाईचीं राजकारणें या पुस्तकांत लेखांक १७७ मध्यें इ. स. १७८८। ८९ त. '१०००० रु. कृष्णराव गुण्ये' यास असा उल्लेख आला आहे. शिवाय खंड १ मधील ले. १०१ पहा.

कृष्णराव सीताराम (११-४ शा. मठ-झांशी, बीना) यांचे नातू श्रीनिवास सीताराम व त्र्यंबक सीताराम यांचें १६।५।४१ चें पत्र आलें. त्यांतील मजकूरः—

" आमचे पूर्वज रत्नागिरी तालुक्यांतून दोन भाऊ आले १ भाउ संस्थान ग्वालियार श्रीमंत सरकार महादाजी शिंदे बरोबर आले, दुसरे झांशीचे सुभेदार

---

* या दोन अंकांपैकीं पहिला आंकडा त्या शाखेच्या वंशावळीचा नंबर आहे. व दुसरा आंकडा त्या विशिष्ट वंशावळींतील त्या व्यक्तींचा क्रमांक आहे. या प्रकरणांतील चरित्रें अकारविल्हेनें दिलीं आहेत.

श्रीमंत सरकार शिवराव भाऊसाहेब बरोबर झांशीला आले, पेशवाईच्या जमान्यांत;

श्रीमंत सरकार ग्वालीयरचे श्रीमंत सरकारनें त्यानां एकांड्याची जागा दिली असे त्यांचे पाळण पोशण केले;

श्री. म. सरकार झाशीने गुण्याला खासगीचे काम दिले व त्याप्रमाणें संमत १९१४ साल पर्यंत चालले; ती. रा. रा. कृष्णरावराव बलवंत गुणे श्रीमंत महाराणी लक्ष्मीबाई बरोबर लढाईमध्यें वारिले, त्यांचे चि. सीताराम कृष्ण गुणे, त्यावेळीं त्यांचे वय १ वर्षाचे होते.

व ह्या प्रसंगाच्या व त्यावेळेस त्यांची ती. गं. मातोश्री सखूबाई आपल्या चिरंजीवाला घेऊन माहेरी आली. त्यांचे माहेर हरि नारायण मुळे डामरोणवाले; डामरोण गांवा परगणा करेरा जिला झाशी.

ती. रा. रा. कृष्णराबळवंत गुणे यांचे लढाईमध्यें वारल्यानें पुढचें कागदपत्र वाडा व गांव, श्री. सरकार झाशीनें गांव दिलें. गांव ते; एकहि मिळाले नाहीं त्यावेळेस गुण्याकडें मोठा वयसकर कोणी नव्हते.

अशा गडबडींत इंग्रेज सरकारनें जप्त केले.

सिर्फ आमचे वडील असें सांगत असत कीं आपले गांव दक्षण प्रांतामध्यें कापड व पेटन गांव (चांफेट ?) तालुका रत्नागिरी........ "—महत्त्वाचा तो मजकूर घेतला आहे. झाशीच्या राणीचे कागद उपलब्ध झाल्यास यांची बरीच माहिती मिळावी.

जनार्दन, बच्याजी ऊर्फ रघुनाथ (५–५ चांफेट, आश्वी) यापुढें आश्वी शाखेपैकीं बच्याजी महादेव गुण्यांचें चरित्र दिलें आहे, त्यांचे हे पुत्र होत. सरदार माधवराव रामचंद्र कानड्यांच्याकडील श्रीमंताच्या पागेच्या फडणिसाचें काम यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर यांना ता. २६ जानेवारी इ. स. १७९१ त मिळालें.* सुमारें वीस वर्षे त्यांनीं हें काम केलें व वडिलांच्या प्रमाणें सर्व सरंजाम उपभोगिला. पुढें इ. स. १८१० त रावबाजीनें सरदार रामचंद्र माधवराव कानड्यांचा सर्व सरंजाम जप्त केला व त्यांच्याकडील पागा व पथक दूर करून तें सरदार पांडुरंग रामचंद्र ढमढेरे यांना दिलें.

* खं. १ ला, ले. ९१ पहा.

इ. स. १८१० पर्यंत पुढील सरंजाम जनार्दपंतांच्याकडे चालत होता. प्रांत संगमनेरपैकी मौजें पिंपरी, लोकी व अजमपूर व मौजे ओझर हे चार गांव सरंजामास होते. शिवाय पां चाळिसगांवपैकीं मौजे वाघडू व मौजे तळेगांवचीं सरदेशमुखी वतनें चालू होती.[१] याशिवाय सरकार संगमनेरपैकीं मौजे प्रतापपूर व सुकतपूर गांवचीं कमावीस चालू होती. सरंजामी गांवांत वहिवाटीच्या सरकारी शेऱ्या होत्याच. त्याशिवाय मौजे प्रतापपूर व मौजे आश्वी खुर्द येथें मिरासी वहिवाटीची जमीन होती.[२]

इ. स. १८१० नंतर पुढें मौजे पिंपरी लोकी व अजमपूर व मौजे प्रतापपूर व सुकतपूर या गांवची फक्त मामलत त्यांच्याकडे चालू राहिली. या गांवांतील सरकारी शेऱ्यांची जमीन व मौजे आश्वीखुर्द येथील मिरासी जमीन चालूच होती. इ. स. १८१७ त कुंपणीचा अंमल झाला व मग पुढें सदरील गांवांची मामलत आपोआपच दूर झाली व फक्त सर्व गांवांतील वहिवाटीच्या जमिनी तेवढ्या राहिल्या. सांप्रत त्या या शाखेंतील गुण्यांकडे चालू आहेत.

जनार्दनपंतांचें वास्तव्य इ. स. १८१० नंतर नेहमीं अश्वीसच असावें.[३] त्यांच्यासंबंधीं ऐकीव माहिती—

इ. स. १८१८ त दुसरे बाजीराव पळत सुटले असतां त्यांच्याबरोबर जनार्दनपंत पळत होते असे त्यांची सून तीं. गं. भा. आहो आई सांगत. त्या म्हणत "या पाठलागांत सैन्याबरोबर आम्ही असतांना मला आंबोऱ्याच्या घाटांत न्हाण आलें". कै. तीं. बाबा गुणे, आहो आईचे नातू हें नेहमीं सांगत.

आश्वीचा वाडा जनार्दनपंतांनीं बांधला असें म्हणतात. ते त्रिंबकजी डेंगळ्याचे कारभारी होते असेंहि ऐकिवांत आहे. त्रिंबकजींचा जाळीलींबगांव हा गांव आश्वीखुर्दपासून ४ मैल आहे. जनार्दनपंत इ. स. १८३०च्या सुमारास निवर्तले असावे.

धोंडो बलाल (१३-३ शा. चांफेट, काले-कऱ्हाड)—यांच्याकडे शाहू-महाराजांनीं सरदार मंत्र्यांची मुतालकी दिली होती. (खं. १, ले. ८३ पहा) त्याबद्दल सालीना वेतन २०००रु. होते. शिवाय खंड १मधील ले.८ व ९ पहा.

---

१ खं. १, ले. ६६ व ९२ पहा. २ खं. १, ले. ११३ व ११९ पहा.
३ खं. १. ले. ११४ पहा.

बच्याजी ऊर्फ रघुनाथ महादेव—(५-१ शाखा चांफेट, आश्वी.)

आश्वी शाखेचे मूळ पुरुष महादेव भट गुणे हे त्यांचें कोंकणांतील वतनी गांव चांफेट सोडून अठराव्या शतकाच्या पूर्वार्धांत देशावर सातान्यास रहावयास आले असावे.[१] त्यांचे प्रथम पुत्र म्हणजे बच्याजीपंत नाना होते. बच्याजी पंतांनीं श. १६७७ आषाढ वा। ५ व श. १६८४ आश्विन शु। ६ अशीं दोनदां ना. यात्रा करून लेख दिले आहेत; परंतु त्यांत वस्ती आश्वी असा उल्लेख नसून मूळ गांव चांफेट दिलें आहे. बच्याजीपंताच्या भार्येचें नांव जानकीबाई. बच्याजी गुणे ह्यांनीं श. १७२४ त नाशिकची यात्रा आश्वीहून केली असून लेख दिला आहे. पेशव्यांचे सरदार माधवराव रामचंद्र कानडे यांनीं जानकीबाईना त्यांचे घरीं लग्न झालें म्हणून इ. स. १७८८ त आहेर केल्याचा उल्लेख आहे.[२]

पेशव्यांचे प्रमुख सरदार रामचंद्र गणेश कानडे यांच्या पागेची कुलयेकत्यारी बच्याजीपंतनानांना ८।४।१७५८ रोजीं वर्षप्रतिपदेस मिळाली. तेव्हां ते श्रीमंत रघुनाथराव दादांच्याबरोबर लाहोरास होते. त्याच वेळीं त्यांना श्रीमंतांनीं आपदागिरीचा मानही पण दिला.[३] त्या पूर्वीपासून ते सरदार कानड्यांच्या पथकांत नौकरीवर असावे.[४] लाहोरची स्वारी मराठ्यांच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. त्या स्वारींतच मराठ्यांनीं अटकेपार भगवा झेंडा लाविला.

लाहोरच्या स्वारीपासून बच्याजीपंतांची एकसारखी प्रगतीच होत गेली असावी असें दिसतें. रामचंद्र गणेशांच्या पागेची फडणिशी शेवटपर्यंत त्यांच्याकडे होती.[५] त्यांना पालखीचा मान होता. पागफडणीस[६] असल्यानें त्यांना ज्या ज्या वेळीं श्रीमंतांची फौज स्वारीवर जाई तेव्हां स्वारीबरोबर जावें लागे. रामचंद्र गणेशांच्या पागेचा सालीना खर्च सुमारें एक लक्ष रुपयांचा होता[७]. यावरून बच्याजीपंतांच्याकडे केवढें जबाबदारीचें काम होतें याची कल्पना येईल. पागेची फडणिसी नानांच्याकडे असल्यानें पागेची सर्व प्रकारची व्यवस्था त्यांना पहावी लागे. रामचंद्र गणेशांनीं पानिपतावर पेशव्यांची जी फार मोठी

---

१ खं. १ ले. १३ ची तळटीप पहा; २ खं. १ ले. ११० पहा; ३ खं. १ ले. १४ पहा व ले. १०५ पहा; ४ खं. १ ले. १३ पहा. ५ खं. १ ले. ८७ पहा. ६ खं. १ ले. १०७ पहा. ७ खं. १ ले. १०५ पहा.

नुकसानी झाली तिची भरपाई केली. श्रीमंत थोरले माधवरावांचे रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण हे अगदीं उजवे हात होते. बच्याजीपंतांना रामचंद्र गणेशांबरोबर उत्तरेंतील व दक्षिणेंतील त्यांच्या ज्या ज्या स्वाऱ्या इ. स. १७६२ ते १७८० च्या दरम्यान झाल्या त्या स्वाऱ्यांतून जावें लागलें असावें. तशा प्रकारचे उल्लेख रामचंद्र गणेशांच्या कांहीं खासगत रोजनिश्यांतून आले आहेत. बच्याजीपंत इ. स. १७९१ जानेवारीच्या सुमारास मृत्यु पावले असावे. कारण सदरील पागेची फडणिसी त्यांच्या मृत्यूमुळें त्यांचे पुत्र जनार्दनपंत यांना ता. २६ जानेवारी बुधवार इ. स. १७९१ त मिळाल्याचा उल्लेख आहे.[१]

बच्याजीपंतांचें उतारवय झाल्यामुळें त्यांचे बंधु मोरोपंत हे त्यांचें काम श. १७०५ म्हणजे इ. स. १७८३ पासून ते १७९० पर्यंत पाहत. पुढें १७९१ पासून बच्याजीपंताचे पुत्र तेंच काम पाहूं लागले.[२]

बच्याजीपंताचा मुक्काम नेहमीं पुण्यास अथवा सासवडास असावा असें दिसतें.[३] इ. स. १७६३ त त्यांची सालीची तैनात ११०० रु. होती. तेव्हां त्यांच्याकडे पागाफडणिशी नसावी. इ. स. १७७३ त फडणीस असून तेव्हां त्यांचा तनखा १७६६ रु. आहे. त्यांत पालखीची तैनात आठ महिन्यांची ६६६ रु. दिली आहे व तेव्हांहि तैनात ११०० रु. होती. पुढें तो वाढत गेला असें दिसतें. इ. स. १७७४ पासून २६०० रुपयांचा उल्लेख आहे. अर्थातच ज्याप्रमाणें स्वाऱ्या जास्त–कमी होत त्याप्रमाणें अधिक वाढ मिळत असे, असें इ. स. १७७४च्या २६०० रुपयांच्या उल्लेखावरून दिसतें. कारण १७६३ पासून ते १७७४ पर्यंत कदीम तैनात ११०० रुपयेच आहे. याशिवाय त्यांना पालखीची तैनात ११०० रु. सालीना होती. यावरून बच्याजीपंतांना बराच मोठा मान होता असें दिसतें. तनखानुरूप त्यांच्याकडे सरंजामास सरकार संगमनेरपैकीं मौजे पिंपरी, मौजे लोकी व मौजे अजमपूर आणि मौजे ओझर हीं चार गांवें होतीं. परगणे चाळिसगांवपैकीं मौजे वाघडू गांवची सरदेशमुखी होती.[४] आज महाराष्ट्रांत जी नांव घेण्यासारखी गुण्ये मंडळी आहेत ती सर्वजण नानांचे वंशज आहेत.

---

१ खं. १ ले. ९१ पहा. २ खं. १ ले. ९० ची तळटीप पहा. ३ खं. १ ले. १०९ पाहा. ४ खं. १ ले. १०५, १०७, ८७ व ८८ पाहा.

बाळाजी महादेव (५-३ चांफेट, आश्वी)—

आश्वी शाखेचे मूळ पुरुष महादेवभट गुणे यांचे हे तृतीय पुत्र होत. आश्वीच्या वस्तीचा जुना उल्लेख यांच्या श. १७०४ शुभकृतुनामसंवत्सरे ज्येष्ठ शु.॥ १३ च्या त्र्यंबकेश्वरच्या लेखांत आला आहे. यांचे वडील बंधु बच्याजीपंत ऊर्फ राघोपंत यांनीं श. १६७७ व १६८४ अशी दोनदां नाशिकची यात्रा केली आहे, परंतु त्या दोन्ही लेखांत आश्वीचा उल्लेख नाहीं. तेव्हां यावरून श. १६८४ ते श. १७०४ च्या दरम्यान केव्हां तरी आश्वीस या शाखेंतील गुण्यांचें प्रथम वास्तव्य झालें असावें. यांचे पुतणे जनार्दनपंत हे नेहमीं आश्वीसच राहत असावे.[1] बच्याजीपंतनानांचें कुटुंब जानकीबाई यांनीं श. १७२४ त ना. या. केली असून लेख दिला आहे; त्यांत त्यांनीं हल्लीं वस्ती आश्वी असा स्पष्ट उल्लेख केला आहे.

बच्याजीपंतांचेकडे पिंपरी, लोकी, अजमपूर हीं गांवें सरंजामांत होतीं व त्यामुळें प्रथम आश्वीची वस्ती होण्यापूर्वी पिंपरीसच वस्ती होणें साहजिक होतें. कारण त्या वेळीं अश्वीशीं तसा कोणत्याच प्रकारचा विशेष संबंध नव्हता. आश्वी खुर्दची पागा ही हुजूरची पागा असून ती रामचंद्र गणेशाकडे होती व त्यांचे कामगार त्या पागेच्या देखरेखीकरितां असत.[2] गुण्यांचा संबंध पुण्याच्या हुजूरपागेशीं होता. पिंपरी येथील शिकारीच्या मळ्यांत प्रथम आपले पूर्वज आले असेंच आमच्या घराण्यांतील वडील मंडळी सांगत, तेंच बरोबर आहे.

प्रतापपुरास या शाखेंतील गुण्यांचा एक वाडा होता. प्रतापपूरशीं आश्वी शाखेंतील गुण्यांचा संबंध प्रथम केव्हां आला हें निश्चित सांगतां येत नाहीं, तरी पण तो बच्याजीपंतांचे कारकीर्दीतच आला असावा. जनार्दनपंताकडे प्रतापपूरची कमाविस होती[3]. खंड १ मधील ले. ११८ त, "मी राजश्री बाबाजी गुणे पोत जुने" बाबाजी म्हणजे जनार्दन बच्याजी गुणे होत[4]. जनार्दनपंताच्या वेळीं 'पोत' जुने झाले तेव्हां अर्थातच त्यांच्या पूर्वीचे म्हणजे बच्याजीपंताच्या कारकीर्दीतील ते 'पोत' असावे, (पोत म्हणजे स[illegible]रांत द्यावयाचे पैसे). तथापि प्रतापपूरची वस्ती पिंपरीच्या वस्तीच्या सुमारासच

१ खं. १ लें, ११४ पाहा. २ खं. १ लें, १०५ पाहा. ३ खं. १ ले. ११६ पहा. ४ खं. १ ले. ११३ व ११६ पहा.

झाली असावी असें फार तर म्हणतां येईल. बाळाजी महादेव, मोरो महादेव, बच्याजीपंताकडे जो पांच गांवचा सरंजाम होता त्याची व्यवस्था पाहत असावे. बच्याजीपंतांचा बराच काळ पुण्यांत व सासवडास सरदार कानड्यांच्याजवळ पागेच्या देखरेखींत जात असावा.

बाळाजीपंतांचा उल्लेख खंड १ मधील ले. १३ व १४ यांत महादेवभट पुण्यांचे पत्रांत आला आहे. कानड्यांच्या दप्तरांत त्यांच्याबद्दल विशेष माहिती मिळाली नाहीं. त्यांचे चिरंजीव महादाजीपंत प्रांत खानदेशचे कमाविसदार होते. त्यांचें चरित्र पुढें दिलें आहे. इ. स. १७९७ च्या पूर्वीं हे निवर्तले असावे. कारण यांचे पुत्र महादाजीपंत व पुतणे जनार्दनपंत व बंधु मोरोपंत यांच्यांत भाऊपणाचे वांटणीचा कजा इ. स. १७९७ त लागला होता.[1]

बाळाजी जनार्दन (१-१५ शा. चांफेट कालें-कऱ्हाड)—

हे कालें शाखेचे मूळ पुरुष होत. शाहू छत्रपती यांना ज्या ज्या मंडळींनीं इ. स. १७१० पासून मनःपूर्वक मदत केली त्यांच्यांपैकीं हे एक होते. प्रथम शाहूनें त्यांना नागपूरकर भोंसल्यांच्याकडे कांहीं कामाकरितां म्हणून पाठविलें. तें काम उत्तम झाल्याचें पाहून त्यांना मौजे खरोड पेटा तासगांव येथें १॥ चावर जमीन इनाम दिली.

पुढें इ. स. १७१९ च्या सुमारास नारो राम शेणवी हे मंत्री झाले. तेव्हां त्यांच्या दिवाणगिरीचें काम महाराजांनीं यांच्याकडे दिलें व त्याबद्दल मौजे आऊसगांव, वरुडे व हिरहाळी या तीन गांवचा चौथाई अंमल मोकासा दिला. शिवाय काले पेटा कऱ्हाड येथें ४० विघे जमीन घर बांधावयास दिली व प्रतिनिधींनीं कासार सिंबें हा गांव इनाम दिला. शिवाय रिळें गांवचें कुलकर्णवतन पुरातनपासून चालत होतें (खंड १ ले. ४, ८ व ८३ पाहा).

बाळाजी जनार्दनाच्या मृत्यूसमयीं त्यांचे सहा पुत्र लहान होते म्हणून त्यांनीं त्यांचें पालन करण्याचें शाहूमहाराजांकडून वचन मिळविलें होतें. यावरून ते इ. स. १७४९ च्या म्हणजे शाहूच्या मृत्यूपूर्वीं निवर्तले असावे.

यांचे पुत्र धोंडोपंत यांनीं शके १६७६ त ना. या. करून लेख दिला आहे. त्यांत ‘ मातुश्री उभयतां लक्ष्मीबाई व मनुबाई असा उल्लेख आहे, त्यावरून

१ खं. १ ले. ६६ पहा.

यांना दोन भार्या होत्या असें दिसतें. यांना एकंदर सहा पुत्र होते व ते सर्व कर्तबगार निघाले. वरील धोंडोपंताचे लेखांत यांचे पुत्र हरिपंत यांचा उल्लेख नाहीं. परंतु त्यांचा उल्लेख खंड १ मधील ले. ८३ व ले. ३ मध्यें आला आहे. त्यावरून ते प्रथम पत्नीचे पुत्र असावेत व बाकीचे पांचजण द्वितीय पत्नीचे असावेत.

महादाजी बलाल (५–६ चांफेट, आश्वी)

आश्वी शाखेचे मूळ पुरुष महादेवभट गुणे यांचे तृतीय पुत्र बाळाजीपंत गुणे यांचे हे चिरंजीव होत. यांच्या कुटुंबाचें नांव गिरिजा ऊर्फ गंगा होतें. त्यांनीं पुण्याहून त्र्यं. ची यात्रा करून लेख दिला आहे. त्या पुण्यांत राहत असाव्या असें दिसतें.

माधवराव रामचंद्र कानड्यांकडे प्रांत खानदेशपैकीं परगणे मेहुणबारे व परगणे चाळिसगांव येथील कांहीं गांव सरंजाम म्हणून होते. प्रांत खानदेशच्या गांवांची कमाविसदारी सदरील गुण्यांकडे होती. परगणे मेहुणबारेमध्यें १३ गांव कानड्यांच्याकडे होते व त्यांची कमाविस सुमारें १५००० रु. सालीना होती. परगणे चाळिसगांवपैकीं सहा गांव खेरीज मुकाशा अमल करून सरंजामास होते व तीन गांव मौजे वाघुड व ओझर बु।। व वाकडी सरदेशमुखी अमलाचे होते. या सर्व गांवांशीं ते प्रांताचे कमाविसदार (Collector) असल्यानें त्यांचा संबंध आला होता. मौजे ओझर व वाकडीची पाटिलकी माधवरावांची खासगी होती.[1] वाकडीची पाटिलकी त्यांनीं सदरील गुण्यांच्या साहाय्यानें श. १७०६ मध्यें २०० रुपयांस खरेदी केली असें ऐकिवांत आहे. मौजे वाघड्ड आश्वी शाखेच्या गुण्यांकडे इ. स. १७६० च्या सुमारापासून चालू आहे (बच्याजीपंताचें चरित्र पहा). मौजे आझो खु।। ची पाटिलकी इनाम जमिनींसुद्धां आश्वीशाखेच्या गुण्यांना कानड्यांनीं बक्षीस दिली होती असें म्हणतात, ती बहुधा सदरील गुण्यांनाच मिळाली असावी. यांच्या विशेष माहितीकरितां खं. १ मधील ले. १०९ व ले. ८९ पहा. यांच्यामध्यें व यांचे चुलतबंधु जनार्दनपंत या उभयतांमध्यें भाऊपणाचा कज्या लागला होता.[2]

---

१ खं. १, ले. ९३ पहा; २ खं. १ ले. ६६ पहा.

मोरो महादेव (५-४ चांफेट, आश्वी)—

हे, आश्वीशाखेचे मूळ पुरुष महादेवभट गुणे यांचे चौथे पुत्र होत. आमच्या चुलत आत्या कै. ती. बहिणाबाई तळवळकर यांनीं यांच्या भार्या कै. ती. गं. भा. काकुआई यांना पाहिलें होतें. त्यांचें संस्कृत उत्तम होतें व मुलांना त्या शिकवीत. कै. ती. काकुआईची कढी त्या काळीं आश्वींत प्रसिद्ध होती. दुसऱ्या बाजीरावांचा मुक्काम अश्वींत नेहमीं होई.[1] त्या वेळीं त्यांच्याकडे यांची कढी जात असे. अश्वीस आमच्या वाड्यास लागून रावबाजीचा वाडा होता. आतां त्याचा पाया व एक बळद येवढेंच राहिलें आहे. त्या बळदांत वाड्यांतील खांबाच्या जुन्या मोठ्या दगडी खुर्च्या टाकण्यांत आल्या आहेत असें सांगतात.

यांचे वडील बंधु बच्याजीपंतनाना रामचंद्र गणेश कानड्यांच्या हुजूरपागेचे फडणीस होते. त्यांच्या उतारवयांत तेंच काम मोरोपंत पाहत असावेत.[2] शके १७०४ सालीं माधवराव रामचंद्र कानड्यांनीं त्यांना २६।≈ रुपयांचा आहेर केला आहे; त्यांत १८॥. रु. चा शेला व ७॥≈ रु. चें तिवट दिलें आहे. इ. स. १७८८ त त्यांच्या घरीं लग्न झालें तेव्हां ४०॥≈ रुपयांचा माधवराव रामचंद्रांनीं त्यांना आहेर केला आहे.[3] इ. स. १७८५ त कर्नाटकच्या स्वारीस त्यांनीं आपल्या वतीनें स्वार पाठविला होता.[4] बच्याजीपंतांना नेहमीं पुण्यास राहावें लागल्यानें आपल्या आयुष्याच्या पूर्वार्धांत यांना व यांचे वडील बंधु बाळाजीपंत यांना सरंजामाची व्यवस्था पहावी लागत असावी.

यशवंतराव लक्ष्मण (८-८ शाखा-मठ-ग्वाल्हेर).

श्री. रा. रा. यशवंतराव लक्ष्मण, ग्वाल्हेर दरबार वकील पुणें यांनीं यांचें चरित्र याप्रमाणें लिहून ठेविलें होतें तें त्यांनीं दिलें; (खंड १ मधील ले. १०३ पहा).

" माझे चुलत पणजोबा ती. यशवंतराव हे शेवटच्या बाजीराव पेशव्यापाशीं विंचूरकरांच्या पागेंत हवालदार होते. इंग्रजांशीं झालेल्या लढायांत ते पेशव्यांचे तर्फेनें लढले आहेत. परंतु त्यांची शरीरसंपत्ति उत्कृष्ट असल्यानें ते पेशव्यांचे शरीरसंरक्षक म्हणून बहुधा असत." " हमेशा आरदलींत राहून पंक्तीस भोजन

---

१ खं. १, ले. ७५ पहा; २ खं. १, ले. ९० पहा; ३ खं. १, ले. ११० पहा; ४ खं. १, ले. ८९ पहा.

असें " पेशवे सन १८१७ मध्यें ब्रह्मावर्तास गेले, तेव्हां यशवंतराव आपला पागा घेऊन त्यांचे बरोबर गेले व पेशव्यांचे आश्रयानें ब्रह्मावर्तास राहिले. पुढें पेशव्यांचे अंतःकालचे सुमारास " आपल्या फौजेची व्यवस्था लावण्याबद्दल



यशवंतराव लक्ष्मण (शिलेदार)

मनांत आणून पत्रें दिल्हीं........ या लोकांचे ताबेदारीवर लक्ष देऊन त्यांचें पालणपोषण आम्ही करीत आलों तसें करावें. " म्हणोन पत्रें दिलीं. तसें एक

पत्र दौलतराव शिंदे यांचे नांवें दिल्हें. तें घेऊन यशवंतराव आपल्या पागेसह ग्वाल्हेरास आले. तेथून त्यांना प्रथम गुणा (Goona C. I.) येथें उद्र ा खटके यांचे छावणींत, नंतर पावागड, बऱ्हाणपूर वगैरे ठिकाणीं तिकडील दंगे-धोपे शमविण्याकरितां पाठविण्यांत आलें. तेथें यशस्वी होऊन परत आल्यावर श्री. शिंदे सरकारांनीं "एक रफल, एक भाला, एक तलवार बक्षीस देऊन बहादुरी दिली."

श्री. दौलतराव शिंदे यांचा देवलोक झाल्यावर दक्षिणेंतून श्री. मुकुंदराव ऊर्फ जानकोजी वय ११, शिंदे यास आणण्याचें ठरलें तेव्हां यशवंतराव गुण्ये, "ब्राह्मण असून प्रसंगीं कामास आलेले, मुलास सांभाळून आणतील" अशी श्री. बायजाबाईंची आज्ञा झाल्याप्रमाणें यशवंतराव दक्षिणेंत जाऊन श्री. जानको महाराजांस घेऊन आले. "मार्गी त्यांची मर्जी संपादन केली." महाराजांनीं मातोश्री बायजाबाईस सांगितलें जे, "गुण्ये पागेसुद्धां मज-पाशीं असावेत.........मजला बंदुक, भाला, कसरत तालीम करण्यास बरें पडेल." त्याप्रमाणें योजना झाली.

पुढें श्रीमंत बायजाबाई आग्रा येथें राहण्यास गेल्या तेव्हां खात्रीचे म्हणून यशवंतराव पागेसह त्यास पोंचवावयास गेले.

यशवंतरावाची प्रथम पत्नी कोंकणांतील होती. ती सन १८३३ च्या सुमा-रास वारली. ह्या वेळीं ५० शीच्या जवळपास वय असल्यामुळें ते दुसरें लग्न करीत नव्हते. परंतु महाराजांनीं आग्रह करून झाशीच्या तांबे घराण्यांतील एक मुलगी ठरविली. पागा आणि लवाजमानिशीं यशवंतराव झाशीस गेले, "सामोरे होण्याकरतां राजेसाहेब झाशीवाले आले होते." लग्नाचा एकंदर खर्च महाराजांनीं दिला.

श्री. जानकोजी महाराजांच्या नंतर श्री. जयाजी महाराज (वय ८) गादीवर आले, आणि राजमाता श्री. ताराबाई, साजापुरास राहण्यास गेल्या. नवीन महाराणी श्री. लक्ष्मीबाई अज्ञान जाणून यशवंतरावास "विश्वासाचे म्हणून पिछाडी देवडीकडील कुलमुखतारी दिली." श्री. लक्ष्मीबाईनंतर चिमणा राजेसाहेबांचे वेळीं तीच व्यवस्था कायम राहिली.

संवत् १९१४ सालीं गदर झाल्या वेळीं श्री. महाराज आग्र्यास गेले...... चिमणाराजेसाहेब नरवरच्या किल्ल्यांत गेल्या. समागमे जामदारखान्यांतील जवाहिराच्या पेट्या पडश्यांतून घोड्यावर लादून गुण्ये गेले.........जवाहिराची हजरी दिल्ही " कांहीं तसनसन होता सुपुर्द केले. "

सन १८५९ मध्यें वृद्धापकाल झाला म्हणून गंगावासाची परवानगी घेऊन श्रीक्षेत्र ब्रह्मावर्तीं येऊन राहिले " ते वेळीं अघाडी (महाराजांकडून) पिछाडी (राणींकडून) वस्त्रें मिळविलीं " " घोडे जासूद वगैरे बरोबर देऊन बंदोबस्तानें रवानगी केली " पागा ग्वाल्हेरीस राहिली.*

ब्रह्मावर्तास श्री. शिंदे सरकारकडून शेरवाटणी होती (शिधा देणें) त्या कामावर यशवंतरावांची योजना होऊन त्यांना दरमहा ११५ रु. तनखा मुकर झाला. ब्रह्मावर्तास त्यांनीं दोन देवळें बांधलीं. पुजारी नेमून त्यांचे योगक्षेमासाठीं त्याना सरकारांतून शेर करून दिला (सदर व्यवस्था १९१० इ. स. पर्यंत चालू होती.)

संवत् १९२७ श्रावण वद्य ८ रोजीं यशवंतराव कैलासवासी झाले त्या वेळीं त्यांचें वय ९० चे आसपास होतें. ते रंगानें गोरे, उंच, धिप्पाड, तेजःपुंज व भव्य दिसत. त्यांच्या मिशा पीळ भरलेल्या भरगच्च असत. पट्टा फिरविण्यांत व घोडयावर बसण्यांत ते पटाईत होते. स्वारी शिकारीस जातांना चिलखताचे बंडीवर रुदार अंगरखा दुपटयानें कमर बांधून तींत पिस्तूल आणि पिछवा हीं हत्यारें, तलवार कमरेस, हातांत भाला, वर शिंदशाही पगडी आणि हनुवटीवरून धोटा बांधलेला असा त्यांचा पोषाख असे. हरणाच्या तंगडया धरून त्याला ते उभा फाडू शकत. शिवकवचाची पोथी चांदीच्या नळींत घालून ते आपल्या उजव्या दंडास बांधीत. पार्थींव पूजा केल्याशिवाय ते अन्नग्रहण करीत नसत; त्यांना मूलबाळ नसल्यानें नात्यागोत्याचा आणि आश्रित मंडळींचा

* यशवंतरावांनीं दत्तक घेतलेले रामचंद्र ऊर्फ अण्णासाो हे लढाऊ नव्हते त्यामुळें पागेंतील रास (घोडे) कमीकमी होत गेले. शेवटीं सन १८८८ चे सुमारास एकच रास रु. ६० अण्णासाहेबांचे नांवे शिलेदारीं राहिलीं. त्यांची नौकरी आमरण पिछाडीकडेच होती. सन १९०३ मध्यें ते कैलासवासी झाले व नंतर सदर रास माझे नांवे लागला तो १९१० मध्यें बंद झाला.

प्रपंच ते चालवीत इ. इत्यादि माहिती माझ्या पणजीच्या सांगण्यावरून मला कळलेली आहे. त्यांची ही तसबीर अगदीं हुबेहुब आहे असें मला पणजीकडून समजलें आहे. त्यांचें हस्ताक्षरहि मजपाशीं उपलब्ध आहे. हें (हस्ताक्षर) म्हणजे यशवंतरावांनीं त्यांचे दत्तक चिरंजीव तो. रामचंद्र यांचे विवाहप्रसंगीं कुलदेवतांना दिलेलें निमंत्रण उपलब्ध आहे. त्यांच्या तलवारी वगैरे हत्यारें मीं पाहिलीं.

राघो नारायण (५–२ शाखा मठ; कुर्णे पुणे दिवड)

हे पुण्यांत मोठे सावकार म्हणून उत्तर पेशवाईत प्रसिद्ध होते. त्यांनीं भोरच्या सचिवांना दोन लक्ष रुपये कर्ज दिलें होतें. सचिवांनीं पुढें त्यांना त्याबद्दल दिवडगांव (जि. पुणें) इनाम दिला. तें इनामपत्र यांचे बंधू गंगाधर नारायण गुणे यांच्या नांवाचें आहे. सांप्रत हा गांव राघो नारायणांच्या वंशजांकडे चालू आहे, व कोंकणांतील कुर्णे गांवची खोती राघो नारायणांच्या नांवची होती ती, त्यांचे बंधु गंगाधर नारायण यांच्या वंशजांकडे चालू आहे.

कांहीं दिवस त्यांनीं सचिवांच्या दरबारांत न्यायाधिशाचे काम केलें. तेव्हां त्यांना पालखीचा मान होता.

राघो नारायण कांहीं दिवस दुसरे बाजीरावाचे दरबारीं मुलकीकडे नौकर होते. दुसऱ्या बाजीरावानें त्यांना 'सचिवाच्या दौलतीसमंधे आमची आदाल-तीनें घरची चीजवस्त सुा जप्ती करून वडिलास (राघोपंतांना) आटकेंत ठेविले' होते (खं. १ ले. १०२ पहा) श. १७२६ त आटकेंत ठेवले व श. १७२९ त मोकळीक झाली. बाजीरावानें त्यांच्या घरचा एकदा जो ऐवज जप्त केला तो पुनः कांहीं परत दिला नाहीं. ('पेशवाईच्या सावलींत' ले. ना. गो. चाफेकर पृ. २०, २८, १२८ व १२९ पहा.) यांचा पुण्यांत एक मोठा वाडा शनिवार पेठेंत होता. पुढें त्यांच्या वंशजांनीं तो डी. ई. सोसा-यटीस विकला. विशेष माहितीकरितां खंड १ मधील ले. ७१, ७२, ८२ पहा.

राघो नारायण (१४–५ शाखा चांफेट, काले-कऱ्हाड धार)

श्री. रा. रा. माधवराव विनायक गुणे इनामदार यांचे पत्रांतील मजकूरः–

"आमचे आजे रघुनाथ नारायण हे श्रीमंत लेट हिज हायनेस यशवंतराव पवार यांनीं दक्षिणेहून येतांना नाशिक मुक्कामाहून धारेस आपलेबरोबर



कै. रावो नारायण गुणे, इनामदार, दिवाण धार

आणून, एजन्सी वकील ह्या नात्यानें त्यांची नेमणूक केली. पुढें यशवंतराव महाराज १८५७ च्या सुमारास कॉलऱ्यानें वारले व त्या वेळेस त्यांनीं आपले कनिष्ठ बंधु लेट आनंदराव महाराज यांस आपल्या राज्याचे वारस करून त्यांस सर्व राज्याधिकार दिले.* त्या सुमारास कांहीं कारणामुळें अंतस्थ बंडाळी माजून त्याचें रूपांतर १८५७ सालच्या बंडात झालें; त्यामुळें धारचें राज्य इंग्रज सरकारनें खालसा केलें होतें, तें राज्य रघुनाथ नारायण यांनीं खटपट करून पुन्हां आनंदराव महाराज यास मिळवून दिलें त्याबद्दल श्रीमंतांनीं दोन गांवें व कांहीं जमिनी रघुनाथ नारायण यांस इनाम दिल्या आहेत, त्या आजतागाईत आमच्याकडे चालू आहेत व त्या सुमारासच पोलिटिकल एजंट व श्रीमंत यांच्या संमतीनें रघुनाथ नारायण यांची नेमणूक दिवाणपदावर केली. त्याप्रमाणें यांनीं सुमारें १८७० पर्यंत दरबारची नौकरी इमानें-इतवारें केली व पुढें कांहीं कारणानें सुटी घेऊन दक्षिणेस गेले होते. येतांना तापी नदीचा

---

* या संबंधांत आवश्यक ती धारच्या पवारांची वंशावळः—

रामचंद्रपंत पवार मृत्यु १८३३

यशवंतराव दुसरे मलठणच्या उदाजीच्या वंशांतील दत्तक यांची कारकीर्द १८३४ ते १८५७ इ. स.

आनंदराव तिसरे यशवंतरावाचे सावत्रबंधु दत्तक कारकीर्द १८५७ ते १८९८ इ. स.

उदाजीराव दत्तक

इ. स. १८५७ त धार संस्थान जप्त करण्यांत आलें; कारण बंडाळी झाली. वास्तविक आनंदराव लहान असून त्यांचा त्यांत कांहींच भाग नव्हता. संस्थान १८५७ त खालसा केलें तें आनंदरावांना १८६४ सालीं गव्हर्नर जनरल लॉरेन्सनें मुखत्यारी दिलीं व मग ते राज्यकारभार पाहूं लागले.

ज्ञानकोश विभाग १६ 'घ' यांतून तळटिपेंतील मजकूर घेतला आहे)

पूल मोडून तेथेंच त्यांना देवाज्ञा झाली व पुढें तीं. गं. भा. जानकीबाई गुणे यांनीं आपले पुतणे विनायकराव यांस दरबार-हुकमानें दत्तक घेतलें." त्यांनींहि उत्तम प्रकारें सरकारची सेवा केली.

धार संस्थान इतिहास कचेरींतील मुख्य अधिकारी चिं. व. लेले यांच्या ता. २७।७।४२ च्या पत्रांत कै. राघो नारायणासंबंधीं पुढीलप्रमाणें माहिती मिळाली आहे. तें पत्र याप्रमाणें:—

"गुणे घराण्यासंबंधीं त्रोटक माहिती (१) गुणे घराणें मूळचें सांगली संस्थानांत डिग्रज या गांवचे राहणारे. त्यांच्या वडिलांचे नांव नारो जगन्नाथ. राघो नारायण गुणे यांचे प्राथमिक शिक्षण पुणे येथेंच झालें. पुढें ते रत्नागिरी येथें कलेक्टर कचेरींत दरमहा रुपये ७५ वर अव्वल कारकुनाचे जागेवर होते. मात्र पुढें त्यांनीं ती नौकरी सोडली व उभयतां पितापुत्र नाशकास येऊन स्थायिक झाले. नारो जगन्नाथ हे शके १७७४ त नाशकास आल्याचा उल्लेख नाशिक येथील श्री. भडकमकर यांचे संग्रही असलेल्या गुणे यांचे लेखांवरून अनुमित आहे. खुद्द राघो नारायण फाल्गुन शुा ३ शके १७७५ रोजीं (ता. २ मार्च १८५४) नाशकास राहण्यास आले.

(२) श्रीमंत यशवंतराव पवार (द्वितीय) यांच्या दक्षिण यात्रेंतील नाशिक येथील मुक्कामांत राघो नारायण गुणे हे महाराजांच्या आश्रयास राहिले (१८५४) धार दरबारच्या नौकरीसंबंधीं खालील माहिती उपलब्ध आहे. त्यांच्या नोकरीचे मुख्यतः तीन भाग पडतात.

१ महाराजांचे इंग्लिश सेक्रेटरी म्हणून.

२ नंतर एजन्सींत धार दरबारचे वतीनें वकील.

३ नंतर कर्नल वुडनें (कर्नल मीडसाहेबांच्या आज्ञेवरून) त्यांना धारच्या दिवाणगिरीवर नेमलें.

दिवाण पदावर येतांच राघो नारायण गुणे यांचा त्या वेळचे ऑफिशिएटिंग (हंगामी) सुपरिंटेन्डन्ट पी. एन्. व्यनिरमन यांचेसमोर ता. ३० सप्टेंबर १८६४ रोजीं खालीलप्रमाणें लेखी शपथविधि झाला.

"I, Raghunath Narain Gune, having been appointed Dewan of the Dhar State do hereby bind myself to conduct

the duties of the State truly and honestly to render judicious advice to the best of my ability to H. H. Raja on all occasions and always to conduct myself with all due respect and obedience to him as my Chief."

(3) Appreciations of Ragho Narayan by R. A. Hamilton A. G. G. in C. I.

"Ragho Narayan, the Vakeel on the part of the Dhar State was not an old servant of the Durbar, he entered the Late Raja's services at Nasik in January 1854, on the Raja's trip to the Bombay Presidency. He is not a native of Dhar State and was not previously known to the people of the place. He speaks English and is a very intelligent person but had no local influence and weight."

(४) राघो नारायण यांचा मृत्यु अपघातानें झाला (बऱ्हाणपुराजवळील रेल्वे अपघात) ता. २३ जून १८६७. या अपघाताच्या नुकसानभरपाईबाबत त्यांचे चिरंजीव विनायकरावजी गुणे यांनीं मुंबई हायकोर्टांत फिर्याद लावली होती. त्याचे निकालांत (पृ. ३८२ पहा) गुणे घराण्यांची माहिती आली आहे (Vide Bombay High Court Reports Vol. VII Original Civil Jurisdiction Page 113).

(५) राघो नारायण यांना धार दरबारकडून जहागीर गांव आहेत. ते गांव कोणत्या विशिष्ट कार्याबद्दल मिळालेले आहेत याबद्दल स्पष्ट उल्लेख अजून उपलब्ध झालेला नाहीं. दक्षिणेंत सातारा जिल्ह्यांतील इस्लामपूर तालुक्यांत पेशवाई अमलापासून त्यांना कांहीं उत्पन्न मिळत असे. त्याऐवजीं ब्रिटिश सरकारांकडून त्यांच्या घराण्याकडे रु. ६०० चें नगदी उत्पन्न मिळतें. त्यांतून राघो नारायण यांचेकडे चौथा हिस्सा मिळतो. वास्तविक इ. स. १८६४ पूर्वी गुणे हे धारमध्यें नव्हते. तेव्हां बंडाचे बाबतींत त्यांच्या मदतीनें मोबदल्या-दाखल वरील जहागीर मिळाली असेल असें विधान करण्यास आधार नाहीं. इनाम जहागीर मिळण्यास काय कारण झालें, हें अधिक शोधाअंतीं उजेडांत येईल. कदाचित् एजन्सींत वकील असतांना त्यांचा उपयोग होणें संभवतें.

Bombay High Court Reports Vol. VII page 113 Civil Suit No. 612/of 1868

Vinayak Raghunath ... *Plff.*
The Great Ind. P. Railway ... *Defdts.*

29th August 1870

Westroop C. J.—Raghunath Narayan Chief Dewan or Minister of H. H. the Rajah of Dhar was travelling in a second class carriage, part of a train, upon the Defdt's railway, early on the morning of the 26th June 1867. The train then met an accident at that part of the line where there is a bridge over the SUKI NALLA between Bhusawal and Nimbora $\frac{3}{4}$. The Diwan was by that accident so much injured that he died upon the 28th of the same month....

The judgment is confined to the fourth and the fifth issues. The fourth is—whether the Plff. is entitled to recover any damages for his own benefit. The fifth issue is—whether Plff. is entitled to recover any damages on behalf of the daughter and widow of the deceased.

The deceased Diwan had a son who predeceased him by only 8 days. The deceased left surviving him a widow named Janki Bai, aged about 36 years at the time of her husband's death and four daughters three of whom were married before his death. The fourth named Mathra or Mathura is about f e or six years of age and still unmarried. Janki Bai has since her husband's death adopted the Plff. as a son of the deceased.........The Plff. was the Diwan's first cousin, once removed. and lived in his house at Dhar, but at the time of the occurrence of the accident or of the death was not adopted....The Plff. was then seventeen years of age....The Dewan had an Inam village in the Dhar territory and other property. The fourth issue is found in the negative.

The next question is the amount of damages which should be awarded to the Plff. not on his own behalf but on that of the widow and the daughter. The Diwan's father Naro Jagannath Gune stated that the Diwan was 38 years of age at the time of his death, but this old man was not a very accurate witness and it is safer to assume that the Diwan was of the age of 40 years which is that named in the plaint. He had formerly been in the British service as a Karkun at Ratnagiri in the Collector's dept. at Rs. 75/- to 100/- p.m. and had been educated at the High School of Puna. Three or four years ago having left the British service he became Diwan to H. H. the Raja of Dhar at Rs. 250/- p.m. as salary with a further allowance of Rs. 6/- p.m. (as a Brahmin writer Vishwanath Narayan a person attached to his suite deposed). The Diwan's father spoke also of Rs. 131/- p.m. being allowed to the deceased as wages for 26 attendants. They were not mentioned by the Brahmin and I understand them to have been persons allotted to him as assistants in his office of Diwan and not as personal attendants. I, therefore, do not reckon their wages as forming any personal allowance to the deceased or as increasing his dignity. Rs. 256/- p.m. equal to Rs. 3,072/- per annum......Looking at his education, his appointment at the time of his death, the probability if he had lived and lost that appointment of his getting another, the position in society enjoyed by his widow and daughter while he held his office of Diwan and lost to them by his death,......I think that Rs. 10,000/- (ten thousand) will be a fair sum at which to assess the damages payable to them—whereof Rs. 7,000/- must be allotted to the widow and Rs. 3,000/- to the daughter......Decree accordingly.

रामाजी बल्लाळ (१३–१ शाखा चांफेट, कालें–कऱ्हाड)

शाहू महाराजांनीं यांच्याकडे यांचे वडील बाळाजी जनार्दन मृत्यु पावल्यावर मंत्र्यांची मुतालकी दिली होती ती दूर करून इ. स. १७४८ त त्यांना नागपूरकर भोसल्यांचे दरबारीं पेशव्यांच्याकडून वकिलीचें काम सांगितलें. या वकिलीचे कामाबद्दल त्यांना १०००० रु. सालीना तनखा दरबार खर्चार्थ होता. त्यांनीं इ. स. १७५० पासून ते इ. स. १७७३ पर्यंत पेशव्यांच्या वतीनें हें वकिलातीचें काम केलें. हे राजकारणी व मुत्सद्दी होऊन गेले. सर्व गोष्टी भोसले यांच्या सल्ल्यानें करीत, असें कांहीं पुढें देत असलेल्या पेशवे दप्तरांतील छापलेल्या पत्रांवरून दिसतें. खंड १ मधील पुढील ले. ८, ९, १०, ७९, ८३ व १०६ पहा. याशिवाय पुढें निरनिराळ्या पुस्तकांतील यांचे उल्लेख देत आहें त्यावरून यांची योग्यता काय होती याची कल्पना येईल.

ऐतिहासिक पत्रव्यवहार (इ. स. १६९० ते १८६७)—ले. गो. स. सरदेसाई, यांतील पुढील पत्रांक पहा– पत्रांक—११३, १२१, १२८, १२९, १३०.

नागपूर प्रांताचा इतिहास—–ले. या. मा. काळे. पृष्ठांक १४१, १४२, १४३, १५२, १९५, १९८.

पेशवे दप्तरांतील निवडक कागद विभाग २०—–ले. गो. स. सरदेसाई, पत्रांक–१३०, १३१, १३२, १३५, १३६, १३७, १३८, १४९, १५२, २८५, २८७, २८८, २९२, २९७, ३००–विभाग ३८ पत्रांक ३१.–विभाग ४४ पत्रांक ३३.


मराठी रियासत (मध्यविभाग ४) ले. गो. स. सरदेसाई; पृष्ठांक ५३, ५६, ८२ व ३२१.

राजवाडे खंड १० वा–पत्रांक ७२.

ऐतिहासिक लेखसंग्रह भाग २ रा––ले. वा. वा. खरे, पत्रांक ३२०, ३१८ ३२१.

लक्ष्मण महादेव (५–२ चांफेट, आश्वी)

आश्वी शाखेचे मूळ पुरुष महादेवभट यांचे हे द्वितीय पुत्र होत. यांच्या कुटुंबाचें नांव सत्यभामाबाई होतें, असें यांच्या वडील बंधूचें कुटुंब जानकीबाई बच्याजी गुणे यांच्या ना. व त्र्यं. च्या लेखावरून दिसतें.



हें पत्र **रामाजी बल्लाळ गुणे** (१३–१ शा. चांफेट–कालें) यांनीं ता. १८-११-१७६२ मध्यें रघुनाथराव पेशव्यांना लिहिलें आहे. त्यांचे हस्ताक्षराचा दाखला म्हणून येथें देत आहे. दोन्ही ब्लॉक्स मिळून एकच पत्र पूर्ण होतें. पृ. १८४ वरील त्यांचें चरित्र पहा. (पत्राकरितां पे. द. सिलेक्शन् नं. २०, ले. नं. १३२ पहा.)

योग [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

लक्ष्मणपंत हे नागपूरकर भोसल्यांच्या दरबारांत कांहीं नोकरी मिळाल्यास ती करावी अशा हेतूनें नागपूरच्या दरबारांत ज्याचें वजन होतें अशा विश्वनाथभट व रामभट वैद्यांकडे प्रयत्न करीत होते असें दिसतें. इ. स. १२।१०।१७५८ त ते नागपुरास नौकरीवर गेले असल्याचा उल्लेख ले. १६ खं. १ मध्यें आला आहे.

यांच्या विशेष माहितीकरिता त्यांनीं स्वतः लिहिलेलीं खं. १ मधील ले. १४, १५, १६ तील पत्रें पहा.

लक्ष्मण बलाल (१३–२ शा. चांफेट, कालें कऱ्हाड)

हे श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब यांच्या जवळ असत. श्रीमंत भाऊसाहेब यांच्यावर पानिपतास गरदी झाली तेव्हां त्यांच्याबरोबर गेले. यांना पालखीचा मान होता असें दिसतें. खं. १ मधील ले. ७९, ८३ व १०६ पहा..

विष्णु धोंडदेव (१३–१० शाखा चांफेट, कालें-कऱ्हाड)

यांच्याकडे श्रीमंत पेशव्यांच्या खासबारदारीचें काम होतें. यांना रावबाजीनें सर्व सरंजाम जप्त केल्यामुळें गतवैभव पाहावें लागलें. हे पेशवाईच्या अखेरच्या काळांत व कुंपनीच्या सुरवातीस होऊन गेले. विशेष माहितीकरितां पुढील खंड १ मधील ले. ६७, ७०, ७९, व ८३ पहा.

व्यंकटराव बापूजी (१३–११ शा. चांफेट, कालें-कऱ्हाड)

सदाशिव राम गुणे (यांचें चरित्र पुढें आलें आहे) ५ जुलै १७९० त मृत्यु पावल्यावर त्यांच्याकडे जो सरंजाम चालू होता तो यांच्या नांवानें सुरू झाला. व्यंकटराव बापूजी हरिपंततात्या फडक्यांच्या बरोबर कर्नाटकच्या स्वारीस गेले. तेथें ते मृत्यु पावले. विशेष माहितीकरितां खं. १ ले. ७९ व ८३ पहा.

सदाशिव राम (१३–७ चांफेट, कालें-कऱ्हाड).

कालें-कऱ्हाड शाखेपैकीं पेशव्यांचे वतीनें वकिलातीचे कामावर तीन पुरुष नागपूरकर भोसल्यांच्या दरबारांत इ. स. १७२० ते १७९० च्या दरम्यान होऊन गेले. शाहूछत्रपति थोरले यांनीं बाळाजी जनार्दन गुणे यांना प्रथम भोसल्यांच्याकडें कामावर पाठविलें.* पुढें यांचे पुत्र रामाजी बलाल यांची योजना महाराजांनीं इ. स. १७५०च्या सुमारास केली. ते इ. स. १७७३ पर्यंत या कामावर होते. (या प्रकरणांत त्यांचें चरित्र पृ ३७१ वर आलें आहे.)

* खं. १, ले. ८३ पहा.

रामाजी बल्लाळाचे पुत्र सदाशिव राम गुणे यांची वकील म्हणून नानानें १२।९।१७७९ च्या सुमारास योजना केली.[१] सदाशिव रामांनीं एकूण ११ वर्षें तें काम केलें. त्या कामावर असतांनाच ते ५ जुलै १७९० रोजीं मृत्यु पावले.[२]

यांच्या योग्यतेची कल्पना त्यांच्या मृत्यूनंतर हरिपंत फडक्यांनीं नाना-फडणविसास पाठविलेल्या पत्रांतील पुढील उताऱ्यावरून येईल : " सदाशिव-पंत चांगला होता. रीत चांगली. प्रामाणीक माहीत; स्वामीचे पदरचे चांगले माणूस गेले. योजना काय जाले काय, तस्मात् ईश्वरी इच्छा जे होणार ते चुकत नाहीं. " (खंड १, ले. १११, ११२ पहा.) त्याच पत्रांत त्यांच्या-बरोबर त्यांची स्त्री समागमें गेल्याचा उल्लेख आहे.

पुण्याच्या डेक्कन कॉलेजांतील पारसनीस दप्तरांत भोसल्यांच्या बंगालमधील स्वाऱ्यांसंबंधीं यांनीं नानांस व हरिपंततात्यास लिहिलेलीं सुमारें २०० पत्रें आहेत असें समजतें. अद्याप तीं या लेखकास पाहावयास मिळालीं नाहींत. तीं पत्रें व इतर या घराण्यांतील प्रसिद्ध व्यक्तींचा मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश पाडणारा पत्रव्यवहार पुढें छापण्यांत येईल, त्या वेळीं याचें समग्र चरित्र लिहिण्यांत येईल.

पुण्याचे इतिहाससंशोधक रा. शंकरराव लक्ष्मण वैद्य यांनीं भारत इतिहास-संशोधन मंडळांत यांच्या कर्तबगारीसंबंधीं कांहीं निबंध वाचले आहेत. त्यांचे पूर्वज रामभट, विश्वनाथभट व बाबूराव वैद्य भोसल्यांचे दरबारांत मोठे मुत्सद्दी म्हणून होते. सदाशिवपंतांच्या विशेष माहितीकरितां या इतिहासाच्या खंड १ मधील पुढील ले. नं. ५१, ५२, ५३, ५८, ६२, ७९, ८३, ८९, १११ व ११२ पहा.

याशिवाय **जगन्नाथ धोंडदेव** (खं. १, ले. ६२, ७९ व ८३ पहा); **बापूजी बल्लाळ** (खं. १, ले. ७९ व ८३); **बापूजी महादेव** (खं. १, ले. ६९); **माधवराव कृष्ण** (खं. १, ले. ६२, ७९ व ८३); **मोरो विष्णु** (खं. १, ले. ६९) व **हरि बल्लाळ** (खं. १, ले. ३ व ८३). इत्यादि गुण्ये व्यक्तींचे मराठ्यांच्या ऐतिहासिक कागदपत्रांतून उल्लेख आले आहेत.

---

१ भोसल्यांची बखर ले. या. मा. काळे पृ. १५६ पहा. २ खं. १, ले. १११ व ११२ पहा.

प्रकरण ९ वें

उपसंहार

" Hast thou ever meditated on that word 'Tradition' : How we inherit not life only, but all the garniture and form of life ; and work, and speak, and even think and feel, as our Fathers and primeval grand-fathers, from the beginning have given it us ? "—*Carlyle.*

या प्रकरणांत कालानुक्रमानें या घराण्याचीं कोणकोणतीं स्थित्यंतरें झालीं, त्यांचा परिणाम घराण्यांतील मंडळींवर काय झाला, व त्यांची एकंदर परिस्थिति कशी काय होत गेली, इत्यादि गोष्टींचा विचार या घराण्याच्या निरनिराळ्या शाखानुक्रमानें व आतांपर्यंत मिळालेल्या माहितीच्या आधारें करावयाचा आहे.

१ **शाखा-मठ**; आजपर्यंत मिळालेल्या माहितीवरून सर्व गुण्यांचें कोंकणांतील मूळ गांव (असोडें सोडल्यास) मठ, ता. रत्नागिरी हेंच होंय असें अनुमान करावें लागतें.[१] विजयनगरच्या तळकोंकणांत अंमल असतांना[२] म्हणजे इ. स. च्या चौदाव्या शतकाच्या अखेरीस या गांवाची वसाहत झाली.[३] इ. स. १५०० ते १६०० च्या दरम्यान या शाखेंतील पहिले तीन पुरुष रामभट, शंकरभट व विष्णुभट या तीन पुरुषांनीं एकामागून एकानें गांवचे सर्व अधिकार उपभोगिले. विजापूरच्या आदिलशाहीच्या तळकोंकणांतील अंमलाचे वेळीं गांवमोकासा झाला व त्यामुळें पुढें अर्थातच गुण्यांचें वर्चस्व कमीं होत गेलें. विष्णुभटांचे पुत्र कृष्णंभट हे लहान असतांनाच विष्णुभट निवर्तले. कृष्णंभट गांवांत आले तेव्हां गांव ओस होता. तेव्हां त्यांनीं जवळच्या खेड्यांतून हळबे, डोंगरे, भाटवडेकर इत्यादिकांना आणून त्यांना जमिनी देऊन इ. स. १६५० च्या सुमारास पुनः गांवाची वसाहत केली[४] 'भटाला दिली

१ या खंडातील प्रकरण ३ पहा; २ विजयनगरच्या तळकोंकणांतील अंमलाचा प्रश्न थोडा वादग्रस्त आहे; प्रा. द. वा. पोतदार यांचा विजयनगर स्मारक ग्रंथांतील लेख पहा; ३ खंड १, ले. ३६. ३७, ३८ पहा; ४ खंड १, ले. ३९ व ९९ पहा.

ओसरी व भट पाय पसरी' या म्हणीप्रमाणें पुढें सतराव्या शतकाच्या अखेरीस व विशेषतः अठराव्या शतकाच्या प्रारंभीं हळबे व डोंगरे यांचें वर्चस्व गांवांत फार झालें. गुण्ये केवळ वैदिक, दिवाणीच्या ज्ञानाचा अभाव, खोतींत गम्य नाहीं यामुळें अर्थातच ते मागें पडले. छत्रपतींच्या कारकीर्दीच्या अखेरीस गांव खोती झाली. खोतींत गम्य नाहीं म्हणून तें वतन त्यांनीं हळब्यांना दिलें. हळब्यांना दिवाणांत विशाळगडी मान. यामुळें पुढें त्यांनीं वाटेल ते वाद उपस्थित केले. मठच्या खोती वतनासंबंधीं २२ वर्षे गुण्यांच्या बरोबर त्यांनीं वाद घातला[1] त्यांत खोती हळब्यांची झाली व गुण्ये गांवचे वहिवाटदार रयत ठरले. वास्तविक हळबे प्रथमच गुण्यांच्या वतीनें खोतीचे वहिवाटदार! येवढ्यावरच भागलें नाहीं. वादांत तीन हजार रुपये खर्च झाला व गुण्यांची आर्थिक परिस्थिति अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत अतिशय खालावली. घरांत कुटुंब मोठें असतांना सुद्धां (वं. नं. १ पहा) देशांतर करण्याचें साहस त्या वेळीं या शाखेंतील मंडळींनीं केलें नाहीं. अखेरीस १९ व्या शतकाच्या प्रारंभीं कांहीं मंडळी ग्वाल्हेर, ब्रह्मावर्त इत्यादि ठिकाणीं गेली. व कांहीं मंडळी विशेषतः सदाशिवभटांचे वंशज मठगांव सोडून तेथून जवळच असलेल्या कापडगांवांत खोतीचें नवीन वतन मिळवून तिकडे गेली. (वं. नं. ८ पहा.)

(अ) पुणे दिवड कुर्णे शाखाः—याउलट या मठच्या गुण्यांपैकीं वडील घराण्याचे विष्णु कृष्ण (पिढी नं. ५ वं. नं. १) यांच्या दोन पुत्रांपैकीं कृष्णाजीपंत व राघोपंत यांतून राघोपंत १७६० च्या सुमारास विभक्त झाले व हरचिरींत रहावयास गेले. त्यांचे नातू राघो नारायण गुणे इ. स. १७६० च्या सुमारास पुण्यांत प्रसिद्ध सावकार म्हणून पुढें आले. त्यांनीं सचिवांना दोन लक्ष रुपये कर्ज दिलें होतें[3]. पुढें या कर्जाबद्दल सचिवांकडून त्यांच्या बंधूंना दिवडगांव (जि. पुणें) इनाम मिळाला. राघो नारायणांनीं कोंकणांत कुर्णे वगैरे तीन चार गांवची खोती सावकारींत मिळविली. ती सांप्रत त्यांचे बंधु गंगाधर नारायण गुणे (व. नं. ७ मठ) यांच्या वंशजांकडे चालू आहे व

१ खंड १ ले. २७ ची तळटीप पहा. २ खंड १ ले. ११ पहा; ३ खंड १, ले. ८२.

दिवडगांव गंगाधर नारायणांना मिळालें ते राघो नारायणाच्या वंशजांकडे चालू आहे. यासंबंधीं खासगी वांटणीपत्रें झालीं असावींत. राघो नारायण गुण्यांच्या इतके धनवान् या शाखेंत आजपर्यंत कोणी झालें नाहीं. त्यांच्या जुन्या कागदांवरून पाहतां हजारों रुपयांचे त्यांचे व्यवहार होते, असें दिसून आले. कोंकण सोडून देशावर येतांच लागलीच यांना येवढा पैसा कोठून मिळाला कळत नाहीं.

(ब) ग्वाल्हेर, झांशी, ब्रह्मावर्तः—यापूर्वी कापडगांवांत कांहीं मंडळी मठ सोडून आली म्हणून सांगितलें ते सदाशिव भटाचे वंशज होत (वं. नं. ८ मठ पहा.) त्यांच्यांपैकीं रामभटांचे वंशज (वं. १० मठ) उत्तरेंत १९ व्या शतकाच्या मध्यांत ब्रह्मावर्ताकडे गेले. अनंतभट रामभट हे ब्रह्मावर्तास असत. ते मोठे विद्वान् होते. त्यांनीं १२०० शिष्य उत्तम पढविले असें सांगतात. सांप्रत यांचे वंशज ग्वाल्हेरास संगीत-तज्ज्ञ म्हणून आहेत. त्याचप्रमाणें यशवंतराव लक्ष्मण (८–८ मठ) देशांतर करून विंचूरकरांच्या-कडे पागेंत राहिले. पुढें कांहीं दिवस बाजीराव दुसरे यांच्याजवळ होते व नंतर ग्वाल्हेरास बाजीरावांच्या सांगण्यावरून शिंद्यांच्याकडे १८३५ च्या सुमारास ब्रह्मावर्ताहून आले. शिंदे सरकारचा त्यांच्यावर अत्यंत विश्वास म्हणून त्यांनीं त्यांची आपल्या जनानखान्यांत योजना केली. दुसरे कृष्णराव सीताराम (११–४ मठ) हेहि याच सुमारास झांशीच्या राणीचे खाजगी कारभारी होते. तिच्याबरोबरच ते १८५७ च्या स्वदेशस्वातंत्र्याच्या शेवटच्या लढाईत निवर्तले.

सर्वच शाखांतून प्रथमारंभीच्या काळांतील लोकांचा मुख्य व्यवसाय वेदाध्ययन व ग्रामोपाध्यपण हाच होता असें दिसतें. प्रथमारंभीचे या शाखेंतील लोक अतिशय धार्मिक, साधे, सरळ व सत्त्वशील होते. सदाशिवभट गुण्ये यांनीं केवळ 'सत्यानें' वाद जिंकला.* अनंतभट, शिवरामभट, काशीनाथभट व विष्णुभट इत्यादि मंडळी उत्तम वैदिक विद्वान् म्हणून रत्नागिरी जिल्ह्यांत प्रसिद्ध होती. यशवंतराव लक्ष्मण व कृष्णराव सीताराम राजांच्या विश्वासांतील होऊन गेले. राघो नारायण सुप्रसिद्ध सावकार झाले. सांप्रत या शाखेंत संगीत-

---

* खं. १, ले. ५५ पहा.

तज्ज्ञ, उत्तम वकील, उत्तम लेखक, वैद्य वगैरे बरीच मंडळी आहेत. या शाखेंतील मंडळी देशापेक्षां कोंकणांत कुण्यांस जास्त आहेत. कोंकणांतील मंडळी खोती वतनें सांभाळून असून त्यांची सांपत्तिक स्थिति कोंकणच्या ..नानें चांगलीच आहे.

वंशविस्ताराच्या दृष्टीनें वंशावळ नं. २, ५, ६, ८, ९, ११ इत्यादि पाहूं जातां वंशविस्तार बराच होतो परंतु वंशाचें सातत्य (Continuity) फारच अल्प राहतें असें दिसतें.

२. शाखा चांफेटः—(अ) चांफेट मुख्य; ही शाखा मठ-शाखेची उपशाखा असावी (खं. २ प्रकरण ३ पहा) पण मठ-शाखेपेक्षां विस्तारानें हीच अधिक मोठी होऊन आश्वी वगैरे पोटशाखा तींतून निघाल्यामुळें तिला प्रमुख शाखा म्हटलें तरी चालेल. या शाखेचे मूळपुरुष केशवभट (काल सुमारें इ. स. १५८०) हे मूळचे चांफेटचे किंवा बाहेरून प्रथमच चांफेटास आले हें समजत नाहीं. केशवभटांचे पुत्र हरभट यांचे नातू हरभट (व. नं. २) यांचा वंशविस्तार बराच झाला. या वडील घराण्यांतील सर्वजण वैदिकच होते असें दिसतें. हरभट धाकटे यांचे नातू बाळंभट गणेशभट गुण्ये इंदुरास पाठशाळेवर मुख्य होते. या वडील घराण्यांतील मंडळी परिस्थितीनुरूप वारंवार चांफेट सोडून बाहेर पडली. (वंशावळ नं. २ व ३ पहा.) भटंभटाचे व तसेच गणेशभटाच्या पुत्रांपैकीं बहुतेक सर्व उत्तर हिंदुस्थानांत गेले असल्याचें दिसून येईल. आज फक्त वाो केशवभट गुण्ये ही एकच व्यक्ति सांप्रत चांफेटास आहे. ते विद्वान् दशग्रंथी असून पंचक्रोशींत प्रसिद्ध आहेत. या व ील घराण्यांत सतत ११ पिढ्या वेदाध्ययन व संस्कृत भाषेचा अभ्यास अद्यापपर्यंत चालू आहे।

या वडील घराण्यांपैकीं उत्तरेंत जी मंडळी गेली त्यांची कांहींच माहिती उपलब्ध झाली नाहीं. (वं. नं. २ व ३ पहा) सर्वांचाच निर्वंश झाला काय कळत नाहीं! वंशविस्ताराच्या दृष्टीनें विचार करूं लागल्यास या वडील घराण्याच्या वंशाचें सातत्य (Continuity) मठशाखेंत दाखविल्याप्रमाणेंच अत्यल्प आहे.

(व) आश्वीः— चांफेट शाखेचे मूळपुरुष केशवभट यांचे द्वितीय पुत्र कृष्णंभट यांस चार पुत्र. त्यांपैकीं रघुनाथभट व नारायणभट यांचा वंशविस्तार बराच झाला (वं. नं. १ चांफेट पहा.) चांफेटच्या खोतीचें वतन रघुनाथभटानेंच प्रथम संपादन केलें. त्यांचे वंशज म्हणजेच आश्वीकर गुण्ये होत. चांफेट शाखेच्या वडील घराण्यांतील भटंभट गुण्यांच्या धाकट्या घराण्यांतील कृष्णंभटाच्या पुत्रांच्या बरोबर वाद[1] चालला होता, त्यांत रघुनाथभटांचे पुत्र व कृष्णंभटाचे नातू महादेव भट गुणे यांनीं विशेष लक्ष न घालतां पूर्ववतनें सोडून ते देशावर सातार्‍यास इ. स. १७२० च्या सुमारास राहावयास आले. ते मोठे वैदिक विद्वान् होते. महादेवभटांचे वडील पुत्र रघुनाथपंत ऊर्फ बच्याजीपंत हे नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत सैन्यांत शिरले. पुढें लाहोरच्या स्वारींत अटकेपार झेंडे लावले. व लाहोरासच त्यांनीं श्रीमंतांच्या कडून इ. स. १५५८ त पुण्याच्या हुजूरपागेची कुलयेकत्यारी व आपदागिरीचा मान मिळविला. पुढें लवकरच श्रीमंतांची सरदार कानड्यांच्याकडे जी पागा होती तिची फडणिशी व पालखीचा मान मिळाला. पांच गांवें सरंजामास होतीं. शिवाय कांहीं गांवांतून वहिवाटीस जमिनी मिळाल्या होत्या. त्यांचे धाकटे बंधू मोरोपंत यांचाहि त्यांना या कामीं फार उपयोग होई. नानांच्या उतार वयांत पंतच फडणविसीचें काम पाहत. पानिपतची नुकसानी भरून काढण्याकरितां म्हणून श्रीमंत थोरले माधवराव यांनीं रामचंद्र गणेश कानडे व विसाजी कृष्ण बिनिवाले या दोन अद्वितीय सरदारांची योजना उत्तरेंतील स्वार्‍यांकरितां केली होती. पुढें त्यांनीं दक्षिणेंतहि पण कर्नाटकांत स्वार्‍या केल्या. रामचंद्र गणेशासारख्याच्या पागेची फडणिशी करतांना नानांना केवढी मोठी लष्करी व बौद्धिक जबाबदारी पार पाडावी लागली असेल! पागेचा खर्च एक लक्षाचा होता. यावरून या बंधुद्वयाच्या योग्यतेची कल्पना येईल.[2] बच्याजीपंताचे पुत्र जनुकाकाहि त्याच कामावर होते. त्यांचे पुतणे महादाजी बल्लाळ यांच्याकडे प्रांत खानदेशची कमाविसदारी (Collector) होती. आश्वीशाखेंतील गुण्यांची त्या काळांत फारच भरभराट झाली. पुढें दुसर्‍या बाजीरावानें इ. स. १८१० मध्यें कानड्यांचा सरंजाम जप्त केला.

१ खंड १ ले. २८ पहा. २ प्रकरण ८ मधील या बंधुद्वयांचीं चरित्रें पहा.

गुण्यांचा व कानड्यांचा संबंध संपला व सरदार ढमढेऱ्यांच्याबरोबर तो सुरू झाला. परंतु जनार्दनपंताच्याकडे इ. स. १८१० नंतर फक्त कांहीं गांवांची कमाविसदारीच राहिली. त्यानंतर कंपनीचा अंमल झाला. कांहीं अन्य कारणामुळें म्हणा किंवा पेंढाऱ्यांनीं लुटल्यामुळें म्हणा सर्व वैभव नष्ट झालें! रामुदादांच्या कारकीर्दीस दारिद्र्य प्राप्त झालें. पुढें रामुदादांच्या पांच पुत्रांनीं आश्वी सोडली. कै. तो. दादांनीं सर्व घराणें कोल्हापुरास आणलें. पुढें चालू पिढीचीं शिक्षणें सुव्यवस्थित पार पडलीं व त्यामुळें सांप्रत या शाखेंतील मंडळींनीं आयुर्वेद, पाश्चात्य वैद्यक, योगभाषाशास्त्र इत्यादि प्रकारच्या शास्त्रांतून प्रावीण्य मिळविलें असून कांहींनीं आपल्या कार्याचा प्रसार पाश्चात्य देशापर्यंत पसरविला आहे. कांहींनीं लोकसेवेंत व परोपकारांत आपलें आयुष्य वेंचलें आहे; कांहींनीं फोटोग्राफींत प्रावीण्य मिळविलें आहे. अशा प्रकारें निरनिराळ्या क्षेत्रांतून सांप्रत या शाखेंतील मंडळी काम करितांना आढळून येतील.

(क) पुणें:—गृहकलहांत न पडतां महादेव रघुनाथ गुणे हे साताऱ्यास निघून आले म्हणून पूर्वी सांगितलेंच; त्यानंतर त्यांचे सख्खे चुलत बंधु गोविंद नारायण गुणे यांना त्या वादांत भाग घ्यावा लागला. शेवटीं तेच खरे ठरले. खोती, शेती व उपाध्यपण असा तीन प्रकारचा व्यवसाय कोंकणांत या धाकट्या घराण्यांतील आरंभींच्या चार पिढ्यांनीं केला. पुढें जसजसा वंशविस्तार अधिक वाढत गेला तसें कांहीं लोक अंधरसुला, नाशिक व पुणें या भागांत आले. पुण्यांत आलेल्या मंडळींनीं उत्तम याज्ञिक व वैदिक म्हणून प्रसिद्धि मिळविली. या घराण्यांत अद्यापहि उपाध्यपण चालू आहे. यांच्यापैकीं गणपतराव लक्ष्मण (१२-११ चांफेट) यांनीं पाश्चात्य वैद्यकाचें ज्ञान संपादन करून ते मलायांत जाऊन तिकडेच रहिवासी बनले आहेत. गोविंद नारायणांच्या वंशजांपैकीं कांहीं अद्याप कोंकणांत चांफेटास आहेत.

(ड) कालें-कऱ्हाड शाखा:—चांफेट शाखेचे मूळपुरुष केशवभट यांचे तृतीय पुत्र गोविंदपंत यांचे नातू बाळाजी जनार्दन गुणे हे अठराव्या शतकाच्या पूर्वार्धांत शाहूछत्रपति यांचे कारकीर्दीचे आरंभास देशावर साताऱ्यास आले. बाळाजी जनार्दनाचे वडील प्रथम मलकापूरप्रांतांत कोंकणांतून येऊन

त्यांनीं रिळे गांवचें कुलकर्णवतन संपादिलें असावें.[1] नंतर बाळाजीपंत सातान्यास आले असावे. यांना शाहूनें नागपूरच्या भोसल्यांच्याकडे कांहीं कामावर पाठविलें होतें. पुढें त्यांना इ. स. १७१९ च्या सुमारास मंत्र्यांची दिवाणगिरी मिळाली. तें काम या घराण्यांतील मंडळीकडे इ. स. च्या १९ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत चालू होतें. बाळाजी जनार्दनाचे सहा पुत्र–रामाजी बल्लाळ, लक्ष्मण बल्लाळ, धोंडो बल्लाळ, बापूजी बल्लाळ, कृष्णराव बल्लाळ व हरि बल्लाळ यांनीं छत्रपति, पेशवे, मंत्री, सरदार थोरात (वाळवेकर) व सरदार पायगुडे इत्यादिकांचीं जबाबदारीचीं कामें पत्करून तीं सुव्यवस्थित पार पाडून वतनें संपादन केलीं. इ. स. १७६० च्या सुमारास उत्तरेंत फौजा गेल्या असतां कृष्णराव आणि हरि बल्लाळ यांनीं, थोरातांनीं पेशव्यांना मदत करण्याचें नाकारल्यामुळें तीन लक्ष रुपये कर्ज उभारून ऐन वेळीं पेशव्यांना मदत केली. रावबाजीच्या कारकीर्दींत सुमारें सवा लक्ष देणें राहिलें. त्यामुळें दुसऱ्या बाजीरावाच्या धामधुमींत बापू गोखल्यांनीं, गुण्यांनीं पेशव्यांना साहाय्य करण्यासाठीं व केवळ थोरातांनीं ऐन वेळीं नकार दिला, म्हणून कर्ज काढलें, हें विसरून, त्या कर्जफेडीसाठीं गुण्यांचींच वतनें जप्त केलीं व करवीरकरांनीं गुण्यांचा ऐवज लुटला.[2] इ. स. १७५० पासून ते १७९० पर्यंत नागपूरकरांच्या दरबारांत गुण्यांचें वजन चांगलेंच होतें. बाळाजी जनार्दनानंतर रामाजी बल्लाळ व त्याचे पुत्र सदाशिवराम यांनीं पेशव्यांच्या वतीनें भोसल्यांच्या दरबारांत वकीली केली. रामाजीपंतास दरबारखर्चार्थ दहा हजार रुपये तनखा होता. शिवाय वतनांचें उत्पन्न सुमारें ११ हजार रु. व याशिवाय नानासाहेबांनीं वाळवेकर थोरातांचा कर्ज फिटेपर्यंत लावून दिलेला सर्व सरंजाम, इतकें उत्पन्न चालू होतें.[3]

सांप्रतहि या घराण्यांत मेजर, डॉक्टर, फोटोग्राफर वगैरे मंडळी आहेत.

एकंदरींत चांफेटशाखा ही या घराण्यांतील सर्व शाखांपेक्षां भरभराटींत आहे, असें वरील माहितीवरून दिसून येईल.

---

१ खंड १, ले. ४ व ३ पहा. २ खंड १, ले. ८३ पहा. ३ खंड १, ले. १०६ व १० पहा.

३ " सासवड व पुणे, पन्ना " शाखाः— या शाखेचे मूळपुरुष महादेवभट ('संकीर्ण' प्रकरण ६ पहा) खेडें ता. रत्नागिरी येथें राहत. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत हे पुण्यानजीक सासवड येथें राहावयास आले. यांच्यापैकीं बापूजी महादेव गुण्ये हे पुण्यास इ. स. १७९७–९८ च्या सुमारास दुसऱ्या बाजीरावाच्या फडणविसींत होते. यांचे पुढील वंशज पुण्यास व्यापार करीत. यांच्यांपैकीं नारायण रघुनाथ गुणे इ. स. १९१० च्या सुमारास पुण्याच्या पेशवे दप्तरावर मुख्य कारकून होते. हल्लीं त्यांचे चिरंजीव रा. धोंडोपंत गुणे पन्नास्टेटमध्यें डॉक्टर आहेत. या 'सासवड–पुणें' शाखेची संतति (Continuity) चालू आहे येवढेंच. एका व्यक्तीस एकापेक्षां अधिक मुलें झाल्याचें गेल्या १० पिढ्यांत आढळून येत नाहीं. झाल्यास टिकत नाहींत. अखेरीस आठव्या पिढीचे नारायण रघुनाथ हे अडिवलेकर पंडित घराण्यांतील दत्तक घेतले गेले.

